# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# '''समाज प्रबोधन पत्रिके'तील ग्रंथपरीक्षणातून व्यक्त झालेला समीक्षा विचार: एक अभ्यास''

पीएच्.डी. पदवी करीता सादर
करावयाचा शोधप्रबंध


* संशोधक *
शशिकला भीमराव रणदिवे–वाणी
गिरिस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय,
महाबळेश्वर, जि.सातारा

* मार्गदर्शक *
प्रा. डॉ. उदय रामचंद्र जाधव
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
ता.खटाव,जि.सातारा–४१५५०५


साहित्य आणि ललित कला अभ्यास मंडळ,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

ऑगस्ट २०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, रणदिवे शशिकला भीमराव यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली '''समाज प्रबोधन पत्रिके' तील ग्रंथ परीक्षणातून व्यक्त झालेला समीक्षा विचार: एक अभ्यास'' हा शोधप्रबंध इ.स.२०१४–२०१५ या कालावधीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठास पीएच.डी. (मराठी) या पदवीसाठी सादर केला आहे.

यांनी हा 'शोधप्रबंध' स्वतंत्ररित्या लिहिलेला असून इतरत्र कोणत्याही विद्यापीठात पदवी किंवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही. याची मला खात्री आहे.

करीता प्रमाणपत्र दिले आहे.

**मार्गदर्शक**

**(डॉ. उदय रामचंद्र जाधव)**
**शहाजीराजे महाविद्यालय,खटाव**

# प्रतिज्ञापत्र

मी, रणदिवे शशिकला भीमराव असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास पीएच.डी. (मराठी) या पदवीसाठी **''समाज प्रबोधन पत्रिके''तील ग्रंथ परीक्षणातून व्यक्त झालेला समीक्षा विचार : एक अभ्यास'** हा शोधप्रबंध सादर केला आहे. हा 'शोधप्रबंध' मी स्वत: लिहिला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे.

हा 'शोधप्रबंध' मी इतर कुठल्याही विद्यापीठास अथवा कोणत्याही स्वरूपात पदवी किंवा इतर कारणांसाठी सादर केलेला नाही. याची ग्वाही देते.

**संशोधक**

**(रणदिवे शशिकला भीमराव)**

**गिरिस्थान कला व वाणिज्य महाविद्यालय, महाबळेश्वर)**

# प्रकरण पहिले

# मराठी नियतकालिकांच्या समीक्षा विषयक कार्याचा आढावा

# प्रकरण पहिले

# 'मराठी नियतकालिकांच्या समीक्षा विषयक कार्याचा आढावा'

**प्रस्तावना –**

नियतकालिक म्हणजे एकाच नावाने ठराविक कालाच्या अंतराने नियमितपणे प्रसिद्ध होणारे प्रकाशन. ठराविक काळानंतर म्हणजे सात दिवसांनी, पंधरा दिवसांनी, एक महिन्यानंतर, तीन महिन्यानंतर वा दररोज प्रसिद्ध होणाऱ्या मुद्रित लेखनास साधारणपणे नियतकालिक म्हणतात. नियतकालिक रंजक वा ज्ञानवर्धक मजकूर विशिष्ट कालावधीने पुरविते. नियतकालिकाच्या धोरणाप्रमाणे त्यात अनेक लेखकांचे अनेक विषयांवरचे लेख प्रकाशित होतात. कथा, कविता वा लघु किंवा ललित निबंधही प्रकाशित होतात. कधी नियतकालिके एकाच विषयावरील अनेक लेखकांचे लेख प्रकाशित करतात. त्या अंकांना वा विशिष्ट निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या अंकांना विशेषांक म्हणतात.

'नियतकालिक' याशब्दाचा अर्थ ठराविक वेळी प्रसिद्ध होणारे, निश्चित समस्यावर निघणारे पत्र असे संबोधले जाते. नियतकालिकात दैनिकांच अंतर्भाव होत नाही. वेब्स्टर्स वर्ल्ड युनिर्व्हसिटी डिक्शनरीत 'नियतकालिक'चा अर्थ, "A Publication put out at regular intervals greater than a day, as a weekly, monthly, quarterly." असा दिलेला आहे. नियतकालिके वृत्तपत्र वाटत असली, तरी त्यांचे स्वरूप बातम्या देण्यापुरतेच मर्यादित नसते. त्यांच्यातून प्रसिद्ध होणारे लेखन अल्पजीवी, क्षणभंगूर नसते. नियतकालिकांचा बहुतेक भाग विविध विषयावरील ज्ञान, विज्ञान, वैचारिक, विवेचनात्मक आणि ललित वाङ्मयाने व्यापलेला असतो. एखाद्या विषयाची सांगोपसांग चर्चा, मीमांसा, विश्लेषण, परिक्षण, समीक्षण केलेले असते. नियताकलिकातील लेखन विद्वान, अभ्यासकांनी, संशोधकांनी, समाजसुधारकांनी, विविध क्षेत्रातील मान्यवर तत्वज्ञ, शास्त्रज्ञांनी सखोल, तपशीलात्मक आणि चिंतनातून केलेले असते.

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांनी मराठी वाङ्मयाच्या समृद्धी, वैभवात अत्यंत महत्वाची भूमिका आणि कामगिरी बजावली आहे. नियतकालिके ही सामाजिक, राजकीय, धार्मिक,

वाङ्मयीन अशा मानवी जीवनातील विविध विषयांना वाहिलेली असतात. विविध क्षेत्रातील अनेक प्रश्नांना, 'वाचा' फोडणारे 'नियतकालिक' एक 'व्यासपीठ'च होतय. इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासातून आपणाकडे नियतकालिके निघाली. या नियतकालिकांनी वाङ्मय व समीक्षेच्या निर्मिती व विकासाला चालना दिल्याचे दिसते. नियतकालिकांच्या कामगिरीविषयी डॉ. बी.एन. पाटील म्हणतात, ''समाजमनावर विचार जागृतीची बीजे पेरण्याचे प्रभावी माध्यम नियकालिकेच होय. महाराष्ट्रातील नव्या युगाची, नव्या जागरणाची, नव्या संस्कृतीची बीजे पेरण्याचे कार्य नियकालिकांनीच केलेले आहे. महाराष्ट्राच्या मराठी वाङ्मयात नियतकालिकांचे वाङ्मयीन आणि सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक इत्यादी विविध क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे.''[१]

इ.स. १८०० मध्ये पेशवाईस अखेरची घरघर लागली. इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. भारतात ब्रिटिश सत्तेचा अंमल सुरू झाला. भारतात इंग्रजांचे राज्य आले आणि त्यांच्या राजसत्तेबरोबरच त्यांची संस्कृती, अनेक विद्या, शास्त्रे यांचाही भारतीय जीवनावर फार मोठा प्रभाव पडला. नवे ज्ञान, विज्ञान, कायदे, वेष, उद्योगधंदे यांच्या रूपाने भारतीयात नविन जीवनविषयक दृष्टी प्राप्त झाली. इंग्रजी सत्तेबरोबरच लेखनाला अक्षररूप देणारी, लेखन बहुजनांपर्यंत पोहोचविणारी 'मुद्रणकला' ही भारतात आली. इंग्रजी ज्ञान–विज्ञानाच्या प्रभावामुळे इंग्रजी साहित्याचे अनुकरण भारतीय लोकांमध्ये होऊ लागले. त्यातूनच वाङ्मय निर्मितीला प्रेरणा मिळू लागली. ''पाश्चात्य प्रबोधनवादी दृष्टिकोण स्वीकारून तो ह्या भूमीवर प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न झाला.''[२] असे प्रतिपादन भा.ग.सुर्वे यांनी केले आहे. मुद्रणकला व वृत्तपत्र यांचे उगमस्थान आशियातील चीन हा देश असला तरी प्रगतीच्या व परंपरेच्या दृष्टीने पाहिले तर आपण युरोपीय, विशेषत: इंग्रजी भाषा व वाङ्मय यांच्या संबंधित होतो.

जगातील पहिले नियतकालिक १६६३ साली जर्मनीत निघाले. Erbauliche Monath-Untrerre-dungen हे त्या नियताकलिकाचे लांबलचक नाव होते. अमेरिकेतील पहिले नियतकालिक १७४१ मध्ये निघाले. भारतातील पहिले नियतकालिक बंगालमध्ये १८१८ मध्ये निघाले. या पहिल्या साप्ताहिकाचे नाव होते 'समाजदर्पण' आणि याच साली सुरू झालेल्या

मासिकाचे नाव होते 'दिग्दर्शन.' याच धर्तीवर १८३२ साली 'दर्पण' हे पाक्षिक बाळशास्त्री जांभेकरांनी सुरू केले. त्याचेच पुढे त्यांनी साप्ताहिकात रूपांतर केले. १८४० साली 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही सुरू केले. बंगालीतील 'समाजदर्पण' चे मराठीत 'दर्पण' झाले आणि 'दिग्दर्शन' सरळ 'दिग्दर्शन' राहिले.

'दर्पण' या वृत्तपत्राची ओळख पहिले मराठी वृत्तपत्र या नावाने होत असली तरी या प्रयत्नांपूर्वी फक्त मराठी भाषेतील वृत्तपत्र काढण्याचा एक प्रयत्न झाला होता. ते वर्तमानपत्र होते 'मुंबापुरी वर्तमान'. याची जाहिरात १८२८ साली जुलै महिन्यात 'बॉम्बे गॅझेट आणि बॉम्बे कुरिअर्स' या अंकात पहावयास मिळते. यावरून २० जुलै १८२८ रोजी 'मुंबापुरी वर्तमान' हे पहिले मराठी वृत्तपत्र मुंबईतून सुरू झाले''[3] पण ते किती काळ चालले आणि पुढे काय झाले? याचा उलगडा कोठेच होत नाही. 'मुंबापुरी वर्तमान'चा अपवाद वगळला तर मराठी वृत्तपत्राचे जनकत्व बाळशास्त्री जांभेकर यांच्याकडेच जाते हे मात्र निर्विवाद! 'दर्पण' हेच मराठी भाषेतील कागदोपत्री उपलब्ध असलेले रूढअर्थाने पहिले मराठी वृत्तपत्र होय.

इ.स.१८०० ते इ.स.१८७४ या आधूनिक मराठी वाङ्मयाच्या पहिल्या कालखंडात नियतकालिकांच्या कार्याला प्रारंभ झाला. मराठीतील आरंभीची नियतकालिके ही वर्तमानपत्रे नव्हती. त्यांचे स्वरूप 'वृत्तकथन' करण्यापेक्षा ज्ञानसंग्रह आणि ज्ञानवितरण यांचेच होते. म्हणून त्यांचे स्वरूप अल्पकालीन नव्हते. इंग्रजी वृत्तपत्रांचा आदर्श मराठी वृत्तपत्रांपुढे होता. ज्ञानसंपादनाचे, ज्ञानसंग्रहाचे, ज्ञानग्रहणाचे ध्येय त्यांनी बाळगलेले होते. सामान्य जनात जागृती करणे, समाजोद्धार करणे, व्यवहारोपयोगी ज्ञान समाजाने मिळवावे, ह्या हेतूने तत्कालीन नियतकालिकातून लिखान होत होते.

अर्वाचीन मराठ गद्यातील पहिले महत्त्वाचे वाङ्मयाचे वाङ्मयीन 'शतपत्रे' तीही एका नियतकालिकातूनच प्रकट झाली. हरिभाऊ आपटे यांच्या बऱ्याच कादंबऱ्या व कथा त्यांच्या 'करमणूक' तून प्रथम लोकांपुढे आल्या. 'मनोरंजन' मासिकानेही वाङ्मय प्रकाशन आणि वाङ्मय विषयक विचार ह्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी बजावली. नियतकालिकांच्या कामगिरीविषयी रा.श्री.जोग म्हणतात, ''नियतकालिकांच्या द्वारे हे होत राहिल्याचा फायदा असा झाला की मराठी

वाचकांच्या अभिरूचीस सतत आणि नेमाने काही खाद्य मिळत राहिले, व कोणते खाद्य चांगले, कोणते वाईट ह्या विषयी सतत संस्कार होत गेले. लोकांत वाङ्मयभिरूचीचे बीजारोपण व त्यातून झालेल्या अंकुराचे व रोपाचे संगोपण करण्याचे उपकारक असे कार्य सतत होत राहिल्याने मराठी वाङ्मयभिरूचीचे संस्करण सतत होत राहिले.''[४]

मुद्रणकला ही विज्ञानाची आधुनिक संस्कृतीला मिळालेली देणगी आहे. नियतकालिके मुद्रणकलेची अपत्ये आहेत असे म्हटले जाते. आपले मत, विचार, प्रगटीकरण्यासाठी नियतकालिके ही प्रभावी साधने आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील नियतकालिकांची निर्मिती विशिष्य ध्येयाने प्रेरित होऊन झालेली होती. ज्ञानदान, समाजप्रबोधन, ज्ञानप्रसार, समाजसुधारणा, वैचारिक जागृती, लोकांमध्ये वाचनाभिरूची वाढविणे अशी विशिष्ट मूल्ये नियतकालिकांनी जोपासली. लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम म्हणून नियतकालिकांकडे पाहिले जाऊ लागले.

''नियतकालिके ही वाङ्मयविषयक व जीवनविषयक नव्या अभिरूचीची प्रकाशनपत्रेच असतात. काय घडते आहे तेवढच सांगणारी नियतकालिके प्राधान्याने व्यवस्थेची नियतकालिके असतात तर उजेडाच्या रोखाने काय घडावे हेही सांगणारी नियतकालिके मुख्यत्वे परिवर्तनवादी उद्रेकांची असतात.''[५] असे डॉ. यशवंत मनोहर म्हणतात ते योग्य वाटते.

वैचारिक क्रांतीचे श्रेय नियतकालिकांनाच जाते. समाजातील तरूणांमध्ये चिकित्सक बुद्धी वाढवून, ज्ञानलालसा या पिढीमध्ये निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नियतकालिकांनी केले. समाजातील विविध समस्या, विश्लेषणात्मक स्वरूपात समाजापर्यंत पोहोचविण्याचे समर्थ माध्यम नियतकालिक होय. ''समाजास वाचनाभिरूची वाढावी, वाचनाच्या योगाने विद्येचा व ज्ञानाचा समाजात फैलाव व्हावा, लोक बहुश्रृत व गुणसंपन्न व्हावेत म्हणून विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या आगेमागे निघालेल्या बहुतेक मासिकांचा अवतार झाला होता.''[६] अशी नियतकालिकांच्या निर्मितीची प्रेरणा बा.द.सातोस्करांनी मांडली आहे तर सु.र.चुनेकर नियतकालिकांच्या निर्मितीचे कारण सांगताना म्हणतात, ''अभिरूची उत्पन्न करणे आणि त्या अभिरूचीला सातत्याने खाद्य पुरविणे हे नियतकालिकांचे कार्य असते.''[७]

नियतकालिके ही मोठी सामाजिक शक्ती आहे. पाश्चात्य देशात त्याचा उल्लेख "Fourth estate of the kingdom" असा केला जातो. समाजमनावर आपल्या विचारांचे संस्कार हळूहळू पण ठामपणे रूजविण्याचे कार्य नियतकालिके करीत असतात. सातत्याने समाजमनावर संस्कार घडविणे हे नियतकालिकांचे वैशिष्ट्ये. लोकाभिरूची सोबतच लोकमानस तयार करणे ही त्यांची मोठी जबाबदारी. ही जबाबदारी मराठी नियतकालिकांनी समर्थपणे सांभाळली, पेलली आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' ने सुधारणावादी मतांचा प्रसार सुरू केला. पुढील नियतकालिकांनी वाङ्मय निर्मितीला स्फूर्ती दिली. पारतंत्र्याच्या काळात ज्ञानप्रसार करणे तसेच वैयक्तिक मत प्रकटन करून आपली मते मांडणे अशा स्वरूपाचे कार्य नियतकालिकांद्वारे होत असे. समाजामध्ये वैचारिक स्वरूपाची जागृती घडवून आणावयाची हे नियतकालिकांचे उद्दिष्ट असे. त्यासाठी लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन म्हणून नियतकालिकांचा वापर समाजात होऊ लागला. ''कोणतेही नियतकालिक हे त्या त्या काळाचे, विचारधारणेचे प्रकटीकरण करणारे असे एक मुखपत्र असते. त्यातून तो काळ, त्यातील विचार प्रवाह, साहित्यरूप लक्षात येत असतात. त्यातूनच तत्कालीन साहित्य व्यवहाराच्या जडणघडणीवर व विचार प्रवाहांवर प्रकाश पडत जातो.''[८] असे मत डॉ. उषा देशमुख यांनी मराठी नियतकालिकांच्या वाङ्मयीन कामगिरीविषयी व्यक्त केले आहे.

### १.१ पहिला कालखंड–

महाराष्ट्रीय वृत्तपत्रीय सृष्टीत बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, कृष्णाशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, आगरकर, न.चि.केळकर, अ.ब.कोल्हटकर, कृ.प.खाडिलकर, बाबा पद्मजी इत्यादी विद्वानांचा, समाजसुधारकांचा तत्कालीन वृत्तपत्रीय वाङ्मयात लेखनात, लौकिकाने उल्लेख केला जातो. वाचकांची अभिरूची संपन्न होऊन या अभिरूचीला खतपाणी घालण्याचे काम लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक, आगरकर,अशा विद्वान संपादकांनी केले. मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रकारांना उत्तेजन नियतकालिकांमधून मिळाले. निबंध, कथा, कविता, लघूकथा, समीक्षा अशा विविध वाङ्मय प्रकारांची ओळख झाली. त्यांचा विकास झाला. त्या काळातील नियतकालिकांचे स्वरूप कसे होते याबाबत व.दि. कुलकर्णी म्हणतात,

''नियतकालिके आपणास जीवनाचे कार्य व सर्व बाजूंनी आवश्यक ते आणि तेवढे दर्शन घडवितात. भोवतालचे जीवन समजण्याची आणि आस्वादण्याची क्षमता त्यामुळे आपल्या अंगी येते. वैयक्तिक खाजगी जीवनाबाहेरच, जीवनाभोवतालचे आणखी एक वेगळे, पण आपल्याशी संलग्न असे एक जीवन आपण अप्रत्यपणे कसे जगत आलो याची जाण नियतकालिके करून देत असतात.''[९] त्यानंतर नियतकालिकांच्या कार्याविषयी म्हणतात, ''वाङ्मयीन नियतकालिके ही साहित्यनिर्मितीच्या साहित्यप्रचाराच्या आणि साहित्याभिरूची घडविण्याबाबतीत फार मोलाचे कार्य करीत असतात. ''[१०]

'ज्ञानप्रकाश', 'मराठी ज्ञानप्रसारक', 'ज्ञानदर्शन,' 'ज्ञानविसतर', 'ज्ञानाकार', 'ज्ञानसंग्रह', 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका', 'प्रमोदय', 'उदयप्रभा', अशी शेकडो नियतकालिके एकोणिसाव्या शतकात निघाली. त्यांच्या नावावरूनच त्यांच्या स्वरूपाची कल्पना येते. ही नियतकालिके सुरू करताना मात्र निश्चित असे ध्येयधोरणे निश्चित केली होती. त्यानुसार त्या त्या नियतकालिकांची वाटचाल होती. ध्येयधोरणाबाबत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''या नियतकालिकांना ध्यास लागलेला आहे तो ज्ञानाचा! नव्या आधूनिक ज्ञानविज्ञानाचा परिचय आपल्या लोकांना करून घ्यावा, त्यांना शहाणे करून सोडावे ही ज्ञानजिज्ञासा सर्वच नियतकालिकांनी शिरोधार्य मानलेली आहे.''[११] थोडक्यात रसिक वाचक व लेखक या दोन घटकांना जवळ आणण्याचे काम नियतकालिकांमुळे झाले. लोकशिक्षणाबरोबरच लोकरंजनाचेही काम नियतकालिके करू लागली.

*** 'दर्पण':– (१८३२–१८४०)**

'दर्पण'हे मराठीतील पहिले नियतकालिक १८३२ मध्ये मुंबईहून बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले. 'दर्पण' इंग्रजी आणि मराठी भाषांमध्ये निघत असे. इंग्रजीत 'The Bombay Darpan' असे नाव होते. या नियतकालिकाचे नऊ अंक प्रसिद्ध झाले. या नियतकालिकाचे ठळक विशेष म्हणजे 'ज्ञानप्रसार' हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. प्रारंभी पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक या स्वरूपात हे नियतकालिक निघू लागले. या प्रवासात बाळशास्त्री जांभेकरांनी विलायतेमधील विविध विद्यांचा अभ्यास वाचकांना घडवून आणला. तसेच नियतकालिक हा

वाङ्मयाचा नवीन अविष्कार साहित्य क्षेत्रात रूजू केला. 'दर्पण' च्या पहिल्या अंकात ''स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रतेने व उघड रितीने विचार करावयास स्थळ व्हावे, असा 'दर्पण' चा उद्देश असल्याचे सांगितले असून मनोरंजन करणे, चालते काळाचे वर्तमान कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे, असे संपादकीय धोरण जाहिर केलेले आहे.''[१२] आधूनिक काळ आणि चालू परिस्थितीची लोकांना माहिती देणे हा 'दर्पण' पत्राचा उद्देश होता. जातिभेद, स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, धर्म, वाफेचे यंत्र, धूमकेतू इत्यादी विषयांवरील लेख त्यात येत असत.

बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्र हा व्यवसाय न मानता व्रत म्हणून स्वीकारला. त्यांनी स्वसंस्कृती तसेच स्वाभिमान लोकांमध्ये निर्माण करण्याचे कार्य केले. वैचारिक प्रगल्भता, देशाभिमान, लोकशिक्षण इत्यादी 'मूल्ये', 'दर्पण' च्या माध्यमातून जोपासली. राजकारण, समाजकारण, माहितीपर अशा विविध विषयांवर निबंध जांभेकरांनी लिहिले. महाराष्ट्राच्या वैचारिक जडण–घडणीत जांभेकरांनी मोलाची भर घातली. जांभेकरांच्या कार्याचा गौरव करताना गो.म.कुलकर्णी म्हणतात, ''नव्या ज्ञानाच्या प्रचंड शक्तीचा व महतीचा साक्षात्कार व त्यांच्या प्रचारासाठी अविरतपणे चाललेला प्रयत्न बाळशास्त्री जांभेकरांच्या जीवनात आढळतो. जिज्ञासानेच व तळमळीने अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुमर्यादित त्यांनी या दिशेने केलेले कार्य विस्मयचकित करणारे आहे. जुन्या शास्त्रांना मान्यता देऊनही ज्ञान म्हणजे जाणणे अशी ज्ञानाची व्याख्या त्यांनी केली आणि प्रत्यक्ष प्रमाणाच्या दृष्टीने नवे विज्ञान कसे महत्त्वाचे अहो हे ही पटवून देण्याचा प्रयत्न केला.''[१३] या शब्दांत गो.म.कुलकर्णी यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. 'दर्पण' विषयी सोमनाथ कोमरपंत म्हणतात, ''वृत्तपत्राबरोबर मतपत्र म्हणूनही, 'दर्पण' चा ठसा उमटला.'' बाळशास्त्रींची मूळ बैठक शिक्षकाची होती. वैचारिक प्रगल्भतेबरोबरच लोकशिक्षणाचा वसा त्यांनी घेतला. नियतकालिकांच्या सुप्त शक्तीची जाणीव त्यांना होती. त्यांच्या दृष्टेपणामुळे त्यांनी मुंबई इलाख्यात ज्ञानप्रसाराचा पाया घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. प्रतिकूल परिस्थितीत आणि कोणतीही पूर्वपरंपरा नसताना त्यांनी वृत्तपत्राची मांडणी, विषय, भाषा, अग्रलेख स्फुटे याविषयी निकष ठरविले. ''[१४] दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील पारंपारिक

विचारांच्या पलिकडे जाऊन नव्याने विचार करणाऱ्या पहिल्या पिढीची प्रतिनिधी होते. त्यांनी मांडणी, विषय, भाषा याविषयी जे निकष ठरविले त्याच मार्गावरून आजची नियतकालिके वाटचाल करीत असल्याचे दिसते बापडेकर म्हणतात, ''दर्पण सुरू होऊन (आणि बंद होऊनही) इतका कालावधी लोटला पण कालानुरूप झालेले बदल वगळता आजची वर्तमानपत्रे अजूनही 'दर्पण'ने रूढ केलेल्या मूळ साच्यात पुढे प्रत्येकाने आपापल्या क्षमतेप्रमाणे भर घालून वर्तमानपत्र विकसित केले. पण त्या प्रत्येकाची मूळ प्रेरणा 'दर्पण'च राहिली, असे म्हटले तर वावगे ठरू नये.''[१५]

*** 'दिग्दर्शन' –**

मराठीतले पहिले 'दर्पण' वृत्तपत्र काढणाऱ्या बाळशास्त्री जांभेकर यांनीच मराठीतील पहिले मासिक 'दिग्दर्शन' नावाने इ.स. १८४० मध्ये काढले. 'दिग्दर्शन' च्या पहिल्या अंकातील प्रस्तावनेत संपादकाने पुढील खुलासा केला आहे. ''आता यात परलोकाच्या उपयोगी जे वेदांतशास्त्र त्याविषयी...... इथे काही लिहावयाचे नाही. त्यावाचून इतर व्यवहाराविषयी जी शास्त्रे व विद्या राहिल्या त्यांचे 'दिग्दर्शन' म्हणजे दिशा दाखवावी असे योजिले आहे. आम्ही जे लिहिणार त्याचेवरून त्या विद्यांचे परिपूर्ण ज्ञान होईल असे समजू नये.....''[१६] मासिकाचे वाचनाने मनोरंजन व्हावे, वाचनाची गोडी लागावी, विविध ग्रंथांचा अभ्यास व्हावा, ज्ञान–विज्ञानाची दृष्टी यावी, कला–कौशल्यांची आवड निर्माण व्हावी, इत्यादीसाठी मासिक उपयुक्त व्हावे, हा त्यांचा हेतू होता. 'दिग्दर्शन'मासिक सुमारे तीन वर्षांपर्यंत चालले. तत्काली वाचकांचा अभाव, कमी शिक्षित वर्ग, वाचनाची आवड नसणे, तसेच मासिकाची अनियमितता इत्यादी कारणांनी इ.स. १८४४ मध्ये 'दिग्दर्शन' मासिक बंद पडले.

'दिग्दर्शन' मधून रसायन शास्त्र, ज्योतिषशास्त्र, इतिहास, भूगोल इत्यादी विषयावरील लेख, चीनचे वर्णन, मुंबईचे वर्णन, सूक्ष्मदर्शक यंत्र, कागदाची उत्पत्ती, मोडी व बालबोध अक्षरांचे ताम्रपट हिंदुस्थानचा नकाशा इत्यादी विविध विषयावर लेख प्रसिद्ध झाले. 'दिग्दर्शन' मासिकाने अव्वल इंग्रजी काळात अर्वाचीन वाङ्मयीन अभिवृद्धीस मौलिक हातभार लावल्याचे दिसून येते.

*** 'ज्ञानचंद्रोदय' :–**

डिसेंबर १८४० मध्ये मुंबई येथून पांडुरंग बापू जोशी, पावसकर यांनी संपादित केलेले साहित्यिक स्वरुपाचे 'ज्ञानचंद्रोदय' हे नियतकालिक चार वर्षे चालले. जुन्या मराठी काव्याचे प्रकाशन करणे हा 'ज्ञानचंद्रोदय' चा हेतू होता. प्राचीन वाङ्‌मय छापून प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न 'ज्ञानचंद्रोदय' ने केला. या मासिकात ज्ञानेश्वरांपासून वामन, मोरोपंत, मुक्तेश्वरांपर्यंतच्या कवींच्या कवितांचा उल्लेख आढळतो. या मासिकातून कृष्णलीलामृत, संस्कृत भागवत् गीता इत्यादींसह जुनी मराठी कविता छापण्याचा उपक्रम चालविला. सुमारे चार वर्षांच्या कालावधीत विक्रम चरित्र, राधाभुजंग, गोपीगीत, सीतास्वयंवर, भवतलीलामृत इत्यादींचे क्रमश: लेखन मासिकातून करण्यात आले.

*** 'ज्ञानोद्य' :–**

जून १८४२ साली अहमदनगर येथून ख्रिस्तीधर्म प्रसाराचा उद्देश ठेवून निघाले. रे हेन्री बॅलेटाईन हे या नियतकालिकाचे पहिले संपादक होते. 'ज्ञानोदय' धर्मप्रसारासाठी सुरु झाले असले तरी त्यात उदयास पावलेली अनेक शास्त्रे आणि त्यातील नवनवी संशोधने लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने होत होते. मुलांसाठी स्वतंत्र मजकुराची पाने देवून वृत्तपत्रे ही विज्ञानांची मिरासदारी न ठेवता त्यात सर्व वयोगटाच्या आणि क्षमतेच्या वाचकांना सामावून घेण्याचा मराठीतील पहिला मान 'ज्ञानोदय' कडेच जातो.

'ज्ञानोदय' च्या वेळोवेळीच्या संपादकात एक नाव प्रकर्षाने घ्यावे लागते, ते रेव्हरंड टिळकांचे. मराठी काव्यात ज्यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय पुढेच जाता येणार नाही ते 'सृष्टी तुला पाहुनी धन्य माते' सारख्या अप्रतिम कवितांचे कवी आणि त्यांचे सुपुत्र देवदत्त टिळक यांनीही कालपरत्वे 'ज्ञानोदय' चे संपादक म्हणून काम पाहिले. धर्मप्रसार हे ज्ञानोदयचे प्रमुख उद्दिष्ट असले तरी मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात ज्ञानोदयची कामगिरी अजोड आहे.

*** 'उपदेशचंद्रिका' :–**

'उपदेशचंद्रिका' हे जानेवारी १८४४ ला सुरु झाले. या कालातील थोडे वेगळ्या स्वरुपाचे मासिक होते. ख्रिस्त धर्मप्रसारासाठी इंग्रजांनी 'ज्ञानोदय' मासिकाचा आधार घेतला.

त्याच्या विरोधी पावित्र्यात 'उपदेशचंद्रिका' निघाले. हिंदू धर्माचे कट्टर अभिमानी श्री. मोरभट्टजी यांनी मिशनऱ्यांना विरोध करण्यासाठी 'उपदेशचंद्रिका' काढले. 'उपदेशचंद्रिका' मासिकाचे तत्कालीन महत्वाचे कार्य म्हणजे, परमधर्मीयांचा हिंदु धर्मावरील हल्ल्यांचा प्रतिकार करणे हे होते. धर्मकार्यकरिता अत्यंत तळमळीने, कळकळीने केलेल्या कार्यामुळे 'उपदेशचंद्रिका' मासिक उल्लेखनीय झाले.

*** मराठी ज्ञानप्रसारक :–**

'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा' इ.स. १८४८ मध्ये स्थापन झाली. त्या सभेत वेळोवेळी निबंध वाचले जात असत. मान्यवरांची व्याख्याने होत असत. त्यांच्या संग्रहासाठी इ.स. १८५० मध्ये 'मराठी ज्ञानप्रसारक' मासिक काढण्यात आले. या मासिकातून शास्त्रीय, सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादी विषयावरील लेख, चरित्रे, देशवर्णने, इतिहास, लोकस्थिती इत्यादी विषयांवरील लेख प्रसिद्ध केले जात असत.

या नियतकालिकात विविध विषयांवरील वैचारिक निबंध प्रकाशित होत असत. तसेच गोविंद नारायण माडगावकर यांचे 'व्यवहार उपयोगी नाटक' हे नाटक हप्त्याहप्त्याने प्रसिद्ध झाले. कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' या संस्कृत नाटकाचे भाषांतर ही प्रसिद्ध झाले. उपदेशपर, रहस्यमय, कथेबरोबरच नाना फडणीस सारखे परिचयात्मक स्वरुपाचे चारित्रात्मक लेख ही मराठी ज्ञानप्रसारक मध्ये आहेत.

यात वाङ्मय समीक्षेसंबंधीत सत्तावीस लेख आढळतात. त्यात ग्रंथ परिक्षणे, कला, साहित्य, साहित्येतिहास, साहित्यिक अशा विविध विषयांवर भर लिदेला आढळतो. मोरोपंतांचे 'केकावली', दादोबा पांडुरंग यांचे 'यशोदा पांडुरंगी' या पुस्तकांवर टीकात्मक स्वरुपात परीक्षण लेख लिहिले आहेत. 'मराठी ज्ञानप्रसारक' या नावाप्रमाणेच 'ज्ञान प्रसारक' हे उद्दिष्ट असलेले, विद्येला वाहिलेले असे हे नियतकालिक होते.

*** सर्वसंग्रह :–**

मार्च १८६० मध्ये मुंबई येथून माधव चंद्रोबा डुकले व अनंत चंद्रोबा डुकले या बंधूंनी 'सर्वसंग्रह' मासिक सुरु केले. या मासिकाने मराठी वाङ्मय क्षेत्रात मोलाची कामगिरी केली.

‘जुन्या मराठी काव्याचे शुद्धपाठ छापणे’ हा मासिकाचा प्रमुख हेतू होता. ‘सर्वसंग्रहा’ तून प्राचीन मराठी काव्याचे संपादन व संशोधन लोकांपुढे आणले होते. अशा या वेगळ्या उपक्रम करणाऱ्या मासिकाचे कौतुक करताना बा. द. सातोस्कर म्हणतात, ‘‘मराठी साहित्याच्या क्षेत्रात पायाभूत ठरेले अशी मौलिक स्वरुपाची कामगिरी ‘सर्वसंग्रहा’ ने बाजवली आहे. प्राचीन मराठी काव्य संपादन व संशोधन ‘सर्वसंग्रहा’ नेच प्रथम मोठ्या प्रमाणावर जनतेपुढे आणते. ‘सर्व संग्रहा’ने जुनी कविता प्रयत्नपूर्वक पैदा करुन छापली नसती तर पुढीलांचा मार्ग विकट झाला असता. अशा तऱ्हेचा प्रयत्न हा मराठी साहित्याच्या इतिहासात पहिला होता.’’ [१७]

‘सर्वसंग्रहा’ने प्राचीन कवी वामन, आनंदतनय, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर यांच्या कविता शुद्ध करुन त्यावर टीपा देऊन प्रसिद्ध केल्या. तसेच मोरोपंतांचे आर्याभारत, रामायणे, केकावली, मंत्रभागवत यांनाही प्रसिद्धी दिली. ‘मराठी विश्वचरित्र’ कोशात सर्वसंग्रहाविषयी पुढील माहिती उपलब्ध होते. ‘‘ह्या मासिकाच्या संपादनात त्यांना नवनीत कार परशुराम (तात्या) गाडबोले, बाळू यज्ञेश्वर पाध्ये आणि त्यांचे बंधू अनंत चंद्रोबा यांचे सहकार्य लाभले. प्राचीन कवींच्या कविता छापतेवेळी विरामचिन्हांचा वापर करण्याची पद्धत ‘सर्वसंग्रहा’ने सुरु केली. प्राचीन मराठीची ओळख करुन देताना त्या कवितांचा अभ्यास करण्याची गोडी ह्या मासिकाने निर्माण केली. ह्या मासिकात ‘आर्याभारत’ ‘मंत्रभागवत’, ‘मादालसोपाख्यान’, ‘ब्रह्मोत्तर खंड’ आदी मोरोपंतांची काव्ये तसेच मुक्तेश्वरी भारताची तीन पर्वे आदी कवितांचा अंतर्भाव होतो.’’ १८

*** पुणे पाठशाला पत्रक :–**

१ मे १८६१ साली सुरु झालेले हे पत्रक १८७५ मध्ये बंद पडले. शिक्षण संस्थेचे नियतकालिक असल्यामुळे प्रारंभी त्यात शिक्षण विषयक लेख येत असत. नंतर मराठी भाषा व वाङ्मय असे त्यांचे रुप झाले. शैक्षणिक दृष्टिकोण असलेले तसेच शिक्षणव्यवहाराशी संबंधीत कविता, निबंध, ललित साहित्य शालापत्रकातून प्रसिद्ध होत असे. सामाजिक विषयांवर जसे लेखन होत असे तसे वाङ्मयीन विषयांवरही भर दिला जात असे. ‘वाचनाचे फायदे’ अशा वाङ्मयीन निबंधामधून वाचकांना मार्गदर्शन होत असे.

शालापत्रकातून विष्णूशास्त्रींचे समीक्षात्मक लेखन प्रसिद्ध झाले ते अतिशय मौलिक स्वरुपाचे असे होते. अनेक प्राचीन कवींच्या कवितांचे समग्रपणे विवेचन त्यांनी केले. उदा. भवभूतीच्या काव्य विवेचनात त्यांनी संस्कृतमधील कवींची परस्पर तुलना केलेली आहे. इंग्रजी व संस्कृत कवितांच्या विवेचनानंतर विष्णुशास्त्री मराठी कवितेकडे वळले. संस्कृत वाङ्मयाचे भाषांतर करुन साहित्यातील पूर्व वैभवाची ओळख शालापत्रकातून रसिकांना त्यांनी करुन दिली. तर इंग्रजी वाङ्मयाच्या भाषांतराने नवीन आशय तसेच अभिव्यक्तीचा परिचय मराठी साहित्याला झाला.

*** विविधज्ञानविस्तार :–**

श्री. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनी इ.स. १८६७ मध्ये 'विविध ज्ञानविस्तार' हे मासिक काढले. १८६७ मध्ये निघालेले 'विविध ज्ञानविस्तार' डिसेंबर १९३७ मध्ये बंद पडले. वाङ्मयीन विषयांना वाहिलेले हे मासिक प्रदीर्घ काळ चालले. एकोणसत्तर वर्षे हे मासिक विविध ज्ञान विषयांची ओळख महाराष्ट्राला करुन देत होते.

'विविधज्ञानविस्तार' च्या पहिल्या अंकावरील मुखपृष्ठावर हे मासिक 'कुलस्त्रिया व गृहस्थ' यांच्यासाठी उपयुक्त असल्याचा उल्लेख आहे. सर्वांगीण साहित्यचर्चा करणारे असे हे मासिक असल्यामुळे 'विविधज्ञानविस्तार' चे संपूर्ण धोरण साहित्यिक अशा स्वरुपाचे होते. या नियतकालिकात शिक्षण, व्यावहारिक प्रश्न, मनोरंजन या तीन अंगाने लेखन केले जात असे.

रा. भि. गुंजीकरांनी सर्वांगीण साहित्य चर्चेबरोबरच समकालीन विविध प्रश्नांचीही दखल घेतली. वाङ्मयाद्वारे लोकांमध्ये जागृती करण्याच्या कार्यावर त्यांचा विश्वास होता. गुंजीकरांनी अनेक लेखकांना लिहिण्यासाठी प्रवृत्त केले. नवनवीन लेखक शोधून त्यांना लिहिण्यास प्रवृत्त करण्यास 'विविधज्ञानविस्तार' चा हातभार लागलेला दिसतो. तसेच जून्या व्यासंगी अभ्यासकांकडून लिहून घेणे हाही 'विविधज्ञानविस्तार' चा वेगळेपणा होता. 'विविधज्ञानविस्तारा'मुळे महाराष्ट्रातील व्यासंगी लेखकांना वाचकांसमोर येण्यासाठी व्यासपीठ मिळाले. 'विविधज्ञानविस्तारा'त लेख छापून येणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात असे. ''मराठी भाषेत गेल्या शंभरावर वर्षात जेवढी मासिके निघाली त्यात अग्रपुजाचा मान जर कोणाला

द्यावयाचा असेल तर तो 'विविधज्ञानविस्तार' लाच द्यावा लागेल.'' [१९]

*** 'विविधज्ञानविस्तार'चे वाङ्मयविषयक कार्ये :–**

तत्कालीन सामाजिक प्रश्नांच्या विचारमंथनाबरोबरच 'विविधज्ञानविस्तार'ने वाङ्मयविचाराला प्राधान्य दिले. वाङ्मयातील विविध वाङ्मय प्रकारांना 'विविधज्ञानविस्तारा'त विस्तारित स्वरुपात स्थान मिळालेले दिसते. वाङ्मयचिकित्सा, वाङ्मयचर्चा, वाङ्मय समीक्षा या सर्वांचा विचार मासिकात केला जात असे. कथा, कादंबरी, नाटक, काव्य आा वाङ्मयाच्या सर्व प्रकारांना 'विविधज्ञानविस्तार' मध्ये स्थान होते.

*** 'विविधज्ञानविस्तार' मधील काव्यविचार :–**

'विविधज्ञानविस्तार' मधील काव्यविचार पाहिल्यास त्यातील वैविध्य वाचकाला जाणवते. पहिल्याच अंकापासून काव्यनिर्मिती, काव्यसमीक्षा, काव्यतत्वविचार याला प्राधान्य दिलेले दिसते. कवितेच्या प्रातांतील नवनवे प्रश्न व त्या प्रश्नांची दखल 'विविधज्ञानविस्तार' मधून घेतली आहे. याचे विश्लेषण मांडताना उषा देशमुख म्हणतात, ''संत काव्याची चिकित्सा, ऐतिहासिक कवनांची चिकित्सा, शाहिरी कवितेची चर्चा, अव्वल इंग्रजी काळातील मराठी कवितेचे स्वरुप, विविध काव्यसमीक्षा तसेच नव्या वळणापेक्षा जुन्या वळणाची कविता 'विविधज्ञानविस्तार'ने अधिक जोपासली.''[२०]

थोडक्यात कवितेसंबंधातील नवविचारांना सतत स्थान या मासिकाने दिले. स्वतंत्र कविता, भाषांतरित कविता, खंडकाव्ये, ऐतिहासिक कवणे, संस्कृत सुभाषिते या सर्वांचा समावेश काव्यात केलेला आहे. 'करडू आणि लांडगा', 'बेडकांना राजाची हौस', 'प्रभातकाळ', (गं. र. पुरंदरे) 'सायंकाळचे वर्णन' (त्रि. ब. दाणी) अशा स्फूट कविताही आहेत. प्रभाकर, राम जोशी, बाळा बहिरु, राणू सुतार, अशा प्रसिद्ध शाहिरांचे पोवाडे, 'विविधज्ञानविस्तारा'त प्रसिद्ध झाले आहेत. संतकाव्याप्रमाणेच ऐतिहासिक काव्यांची चिकित्सा, शाहिरी कविता, संस्कृत काव्याची भाषांतरे, प्राचीन काव्य, आधुनिक काव्य, इंग्रजी काळातील मराठी कवितेचे स्थान अशा विविध दृष्टिकोणातून काव्याची चिकित्सा 'विविधज्ञानविस्तारा'ने केली. कालिदास, भवभूती, बाणभट्ट, सुबंधू, दण्डी अशा प्राचीन कवींच्या काव्याची चिकित्सा 'विविधज्ञानविस्तारा' मधून केलेली आहे.

*** 'विविधज्ञानविस्तार' मधील नाट्यविचार :–**

नाट्यविचाराला मोलाचे स्थान या नियतकालिकाने दिलेले आढळते. अनेक नाटकांवर परीक्षण लेख, पुस्तक परीक्षण 'विविधज्ञानविस्तार' मध्ये आढळते. 'नाटक' हा (१८७०) मधील प्रदीर्घ लेख नाट्यविचाराची मांडणी करणारा आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी जवळ–जवळ पंधरा वर्षे नाट्यपरीक्षणे लिहिली. त्यात त्यांनी नाट्यतत्वांचा सूक्ष्मपणे शोध घेतलेला दिसतो. नाट्यानुभव, नाट्यरचना तंत्र, नाट्याविष्कार, याविषयी त्यांनी स्वतंत्र विचार मांडलेले आहेत.

'विविधज्ञानविस्तार' मधून नाट्यरसिकांची अभिरुची जोपासली गेली. कोल्हाटकरांचे 'मूकनायक', ना. म. समर्थ यांचे 'कृष्णकुमारी' व 'यमुना' अशी क्रमश: नाटके प्रसिद्ध झाली. संस्कृतप्रमाणे इंग्रजी नाटकांची भाषांतरे ही 'विविधज्ञानविस्तार' मध्ये प्रकाशित झाली. एडवर्ड यांच्या 'रिव्हेज'चे द.मा.जयवंत यांनी 'भयंकर सूड' असे भाषांतर केले आहे. तसेच संस्कृतमधील कालिदास, भवमूर्ती, शूद्रक, भास या प्रसिद्ध नाटककारांच्या नाट्यकृती 'विविधज्ञानविस्तारा'त प्रसिद्ध झाल्या.

*** 'विविधज्ञानविस्तार' मधील कादंबरी वाङ्मय :–**

'कादंबरी' वाङ्मय प्रकाराची दखल 'विविधज्ञानविस्तार' मधून घेतलेली आहे. अनेक कादंबऱ्या 'विविधज्ञानविस्तार' मध्ये क्रमश: छापलेल्या आहेत. पहिल्याच अंकापासून 'मोचनगड' ही रा. भि. गुंजीकरांची ऐतिहासिक कादंबरी 'विविधज्ञानविस्तार' मधून प्रकाशित झाली. 'गोदावरी' रा. भि. गुंजीकर, 'ठगाची जबानी' आ. स. सुर्वे, 'स्वयंवर', रा. रा. भागवत, या कादंबऱ्या विविधज्ञानविस्तार मधूनच प्रसिद्ध झाल्या. काही इंग्रजी कादंबऱ्यांचे अनुवादही प्रसिद्ध झाले. मेडोज टेलरच्या 'कन्फेशन्स ऑफ द ठग' ही अनुवादीत कादंबरी, तर रा. वि. टिकेकरांची 'पाईकर भटजी' ही गोल्डस्मिथच्या 'व्हीकार ऑफ वेकफिल्ड' आधारे लिहिलेली कादंबरी छापून आली.

*** 'विविधज्ञानविस्तारा'तील कथा वाङ्मय :–**

इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणे कथा वाङ्मयालाही 'विविधज्ञानविस्तार'ने महत्व दिलेले आहे. कथेचे विषय नीतीशिक्षण देणारे, प्रबोधनात्मक अशा स्वरुपाचे आहेत. 'कन्या विक्रयावर

उतारा', 'खरे पातिव्रत्य', 'दोन चोर', 'कृत्रिम पणाचा आणि सरळपणाचा परिणाम', अशा विविध विषयांवर अनेक कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'विविधज्ञानविस्तार' मधून अनेक कथालेखकानांही प्रोत्साहन मिळाले. 'चांदण्यातील गप्पा' काशीबाई कानिटकर, 'समाजचित्रे', कमलाबाई किवे अशा कथा प्रसिद्ध झाल्या.

*** 'विविधज्ञानविस्तार' मधील चरित्रे :–**

प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रे व चरित्रविषयक लेखांची दखल 'विविधज्ञानविस्तार' मध्ये घेतलेली आढळते. समाज सुधारणा, इतिहास, राजकारणातील मान्यवर व्यक्तींचे जीवन व कार्यवकर्तृत्वाची माहिती समाजासमोर चरित्रलेखनाच्या स्वरुपात मांडली.

'वॉरन हेस्टिंग्ज', 'लॉर्ड बेकन', 'महाराजा रणजितसिंग' 'कृष्णशास्त्री चिपळूणकर', 'केरो लक्ष्मण छत्रे', अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे 'विविधज्ञानविस्तार' मधून प्रसिद्ध झालेली आहेत.

इतिहास संशोधनालाही 'विविधज्ञानविस्तार' मधून प्रसिद्धी दिली गेली आहे. काही वेळा 'विविधज्ञानविस्तार' म्हणून प्रसिद्ध झालेल्या वादविवादातून अस्सल कागदपत्रे उजेडात आणली आहेत. शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, मल्हार रामराव चिटणीस यांनी लिहिलेली बखर व आज्ञापत्र 'विविधज्ञानविस्तारा'मधून प्रकाशित झाले. ऐतिहासिक विषय, ऐतिहासिक पुरुषांचे चरित्र, ऐतिहासिक पुस्तकाचे समीक्षण, ऐतिहासिक पोवाडे, अशा प्रकारे लोकांमध्ये इतिहासाची रुची वाढविण्याचे कार्य या नियतकालिकेने केले.

*** भाषा व व्याकरण :–**

'देशी भाषांची दर्दशा' 'मराठी भाषा' अशा लेखांमधून मराठी भाषेला प्रतिष्ठा तसेच मराठीला लोकमान्यता, राजमान्यता मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न पहिल्या अंकापासून 'विविधज्ञानविस्तार' मधून गेला आहे. भाषेची जडण–घडण, भाषाशुद्धी, भाषा लेखन नियम, भाषेची शास्त्रीय परिभाषा अशा विविध अंगांनी भाषेचा अभ्यास 'विविधज्ञानविस्तार' मधून मांडला आहे.

भाषेप्रमाणे साहित्य निर्मिती, साहित्य समीक्षा व साहित्य शास्त्रीय विचार या घटकांचा

विचारही, ‘विविधज्ञानविस्तार’ मध्ये आढळतो. इंग्रजी साहित्याची ओळख व संस्कृत ग्रंथांचा परिचय असेही काम ‘विविधज्ञानविस्तार’ ने केले. ‘साहित्यशास्त्र’ या साहित्यविषयक ग्रंथाचे मौलिक समीक्षण अभ्यासनीय आहे. खास भारतीय साहित्यशास्त्रीय संकल्पनांचा परिचय करुन देण्यासाठी ‘काव्यविचार’ हे सदर या नियतकालिकाने सुरु केले होते.

*** ‘विविधज्ञानविस्तार’ मधील साहित्यसमीक्षा :–**

जुने प्राचीन कवी व त्यांचे काव्य यावरील चर्चात्मक लेखातून प्राचीन मराठी कवितेची समीक्षा केलेली दिसते. ‘मोरोपंत’, ‘मुक्तेश्वर’ आणि मोरोपंत ‘अमृतराय’ अशा विविध लेखांमधून प्राचीन काव्यावर चर्चा केलेली आहे. प्राचीन काव्याप्रमाणेच संस्कृत कवी व त्यांचे काव्य यावरही लेख आहेत. संस्कृत कवीमध्ये कालिदास, भवभूती, सुबंधू, दंण्डी अशा संस्कृत कवीच्या काव्याची चिकित्सपणे मांडणी केलेली आहे. कालिदास कवीचा यश काल, ‘संस्कृत कवी’ असे काव्यावर तात्विक चर्चा करणारे लेखन आहे.

‘विविधज्ञानविस्तार’ने अनेक नाटकांवर परिक्षण लेख लिहून नाट्यरसिकांची नाटकाची अभिरुची जोपासली. कोल्हटकरांच्या प्रदीर्घ लेखनातून नाट्यतत्वांची मीमांसा आढळते. त्यांनी नाट्यतत्वांच्या सूक्ष्मतेचा शोध घेतला. नाट्यानुभव, नाट्य स्वतातंत्र, नाट्याविष्कार याविषयी आपले विचार ‘विविधज्ञानविस्तारा’मध्ये मांडले.

‘विविधज्ञानविस्तार’ मधून आलेली कांदबरीची परीक्षणे महत्वपूर्ण आहेत. कादंबरी परीक्षणातून कादंबरीचे स्वरुप, आशय, रचना, संविधान या गोष्टीचीही चिकित्सा केली आहे. केशव रघूनाथ फडके यांच्या ‘वसंतमाला’ कादंबरीचे परीक्षण नारो सदाशिव रिसबूड यांच्या ‘विश्वासराव’ कादंबरीचे परीक्षण केलेले आहे.

प्रस्तुत परीक्षणाच्या माध्यमातून साहित्याच्या विविध वाङ्मयप्रकारांना ‘विविधज्ञानविस्तार’ मध्ये स्थान मिळाले तसेच पुस्तक समीक्षेतून साहित्याचे विविध वाङ्मयीन प्रश्न हाताळले. उदा. ‘षड्ऋतूवर्णन’ मधून काव्याची वर्णन कशी असावीत याचा उलगडा होतो. ‘साहित्यशास्त्र’ ग्रंथाच्या परीक्षणातून साहित्यशास्त्राची ओळख करुन दिलेली आहे. ‘साहित्यविचार’ हे सदर वाचकांना साहित्यशास्त्राची ओळख करुन देत असे. तर ‘काव्यविचार’

या सदरातून काव्यलक्षण, काव्यप्रयोजन, रस, ध्वनी यांची माहिती दिली जात असे.

*** 'विविधज्ञानविस्तार' चे कार्य :–**

वाङ्मयाच्या विविध प्रकारांद्वारे जनसामान्यात जागृती करण्याचा निर्धार 'विविधज्ञानविस्तारा'च्या मार्फत रा. भि. गुंजीकरांनी साध्य करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी मराठी भाषा व साहित्याची विविध अंगे त्यांनी विकसित करण्यास हातभार लावला. ''गुंजीकरांच्या प्रोत्साहनाने अनेक विद्वान लिहिल्यास प्रवृत्त झाले. १८७० पासून १९३० पर्यंत 'विविधज्ञानविस्तार' या मासिकाने एवढे विद्वानांना लेखक म्हणून लोकांपुढे येण्यास एक श्रेष्ठ व्यासपीठ तयार केले आणि मराठी वाङ्मय व संस्कृती यांच्या विविध पैलूंवरील साधकबाधक विचारांचे महाराष्ट्रात बीजारोपण केले.''[२१]

'विविधज्ञानविस्तार'च्या वाङ्मयीन आढाव्याचा अभ्यास केल्यावर वरील वर्णन यथार्थ वाटते. बहुजन समाजातील सामान्य माणसांच्या गरजा, त्यांच्या आकांक्षा, इच्छा, त्यांची वाङ्मयीन अभिरुची यांचे उन्नयन करण्याचा प्रयत्न 'विविधज्ञानविस्तार'ने आपल्या माध्यमातून केला. मराठी भाषेचा अभिमान गुंजीकरांच्या लेखणीने वेळोवेळी व्यक्त केलेला दिसतो. मराठी भाषेला राजमान्यता मिळवून देण्याचाच गुंजीकरांचा हा प्रयत्न म्हणावा लागेल. आपल्या प्रदीर्घ अशा कारकिर्दीत अनेक पिढ्यांचे विचार 'विविधज्ञानविस्तार'ने लोकांपर्यंत पोहचविले. सर्वसामान्यांच्या वाङ्मयीन अभिरुचीला योग्य वळण लावले. थोडक्यात 'विविधज्ञानविस्तार' ने या वाङ्मयीन आलेखाशिवाय 'नियतकालिकांचा इतिहास' पुरा होत नाही.

*** 'आनंदलहरी' :–**

गोमंतकातील पहिले मराठी मासिक म्हणून 'आनंदलहरी' ची ओळख आहे. १८७० मध्ये पणजीहून हे मासिक सूर्याजी सदाशिव महात्मे यांनी काढले. मुलांच्या मनोरंजनाकरीता काढले होते.

*** 'दंभहारक' :–**

१८७१ मध्ये 'दंभहारक' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. 'दंभहारक' मध्ये वाङ्मयबरोबरच धर्म, नीती, व्यवहार या विषयावरही लेखन प्रसिद्ध होत असे. निबंध, कविता,

चरित्रे, पुस्तक परिक्षण, गोष्टी, रुपके अशा स्वरुपात 'दंभहारक' मधील वाङ्मय प्रसिद्ध होत असे. यात महादेव मोरेश्वर कुंटे, यांच्या 'राजा शिवाजी' या काव्यावर परिक्षण केलेले आहे. तसेच पांडुरंग व्यंकटेश चिंतामणी पेटकर यांच्या 'गंगावर्णन', 'विष्णुशास्त्री चिपळूणकर' यांच्या 'कविता संस्कृत' यावर तात्विक अंगाने विचार 'दंभहारक' मध्ये मांडला आहे.

*** 'ज्ञानसंग्रह' :–**

जानेवारी १८७२ मध्ये विदर्भातून 'ज्ञानसंग्रह' निघू लागले. 'विविज्ञानविस्तार' च्या परंपरेतील हे मासिक होते. ललित व गंभीर स्वरुपाचे वाङ्मय 'ज्ञानसंग्रह' प्रकाशित करीत असे. ज्ञानसंग्रहाविषयी माहिती सांगताना बा. दा. सातोस्कर म्हणतात, ''या मासिकाचे प्रवर्तक वा संपादक कोण होते हे कळत नाही. त्याचा पहिला अंक निघाला तेव्हा तत्कालीन नियतकालिकांनी त्यांचे स्वागत केले. पण त्यातही 'विदर्भाकडील मंडळींनी काढलेले मासिक' इतकाच उल्लेख आढळतो. विदर्भाचे हे पहिले मासिक होय.''[२२] या विवेचनावरुन आपल्या असे लक्षात येते की, 'विविधज्ञानविस्तार'च्या कालखंडात महाराष्ट्राच्या विदर्भासारख्या पुण्या–मुंबईपासून दूर असणाऱ्या भागातसुद्धा साहित्याची चळवळ जोमदारपणे चालू होती.

*** 'निबंधमाला' :–**

२५ जानेवारी, १८७४ मध्ये पुणे येथून विष्णूशास्त्री चिपळूणकर संपादित 'निबंधमाला' सुरु झाला. सतत सात वर्षे 'निंबधमाले'तून एक व्यक्ति निर्मित निबंध लिहिले गेले. 'निबंधमाले'चे नियतकालिक म्हणून मोलाचे योगदान आहे. ''मराठी भाषेच्या घडणीवर परिणाम करणारे व मराठी मनाच्या घडणीवर संस्कार करणारे मराठी मासिक म्हणजे 'निबंधमाला'हे होय.''[२३] या बा. द. सातोस्कर यांच्या उद्‌गारातच 'निबंधमाले'चे यश सामावलेले आहे. निबंधमालेच्या जन्मापासून मराठी नियतकालिकांच्या इतिहासात वैभवशाली युग सुरु झाले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. 'निबंधमाले'तील वाङ्मयाने मरगळेल्या मराठी माणसाला नवीन तजेला मिळवून दिला. स्वदेशाभिमान, स्वभाषाभिमान, समाजप्रबोधन, लोकशिक्षण, शिक्षणाचा प्रसार अशी अनेक उद्दिष्टे 'निबंधमाले'तून साधली जाऊ लागली. 'निबंधमाला'ने वाचकांना नवी वाङ्मयीन दृष्टी मिळवून दिली.

''१८७४ ते १९२० या संबंध कालखंडावर विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा प्रभाव विशेष राहिला आहे. त्यांनी घालून दिलेल्या वळणानेच या काळातील साहित्यविचार आणि समीक्षा जात राहिली. अर्वाचीन साहित्यविचार आणि समीक्षा यांचा पाया चिपळूणकरांनी घातला. त्यांच्या लेखनात भावी वाङ्मयविस्ताराची बीजे दिसतात. जे आपल्याला माहित आहे ते आपल्या इतर देशबांधवांना सांगावे त्यांना ज्ञानी करावे अशी राष्ट्रीय शिक्षकाची भूमिका आहे.''[२४] या चुनेकरांच्या मतातून चिपळूणकर व 'निबंधमाले'तून प्रकट होणारी त्यांची भूमिका स्पष्ट होते.

मराठी भाषा व तरुण मनाच्या जडणघडणीसाठी सतत प्रयत्नशील असे 'निबंधमाले'चे वर्णन करता येते. स्वाभिमान, स्वदेशाभिमान, स्वभाषाभिमान ही निबंधमालेची त्रिसूत्रीच मानता येईल. इंग्रजी भाषा व राजवटीचा तरुण वर्गावर पडलेला प्रभाव त्यामुळे स्वभाषेची झालेली अवहेलना थांबवण्यासाठी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखणीने महत्वाचे कार्य केले. स्वभाषेची अभिवृद्धी व्हावी अशी तळमळ मराठी तरुणात असेल तर तिचा अभिमान बाळगला पाहिजे. मराठी भाषेमध्ये ग्रंथरचना केली पाहिजे. आपल्या भाषेचा विकास साधण्यासाठी 'नवी वाङ्मय'विषयक दृष्टी व अभिरुची लोकांमध्ये निर्माण झाली पाहिजे अशी भूमिका चिपळूणकरांच्या वाङ्मयातून प्रकट झालेली दिसते.

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिती' या निबंधातून त्यांनी मराठी भाषा व तत्कालीन समाजातील तिचे स्थान याचे वर्णन केले आहे. तसेच भाषेची प्रगती व्हावी या दृष्टीने मार्गदर्शनही केले आहे. 'भाषा दूषण', 'लेखन शुद्धी', 'भाषा पद्धती' अशा भाषा विषयक निबंधातून त्यांच्या भाषिक संवर्धनाची भूमिका जाणवते.

चिपळूणकरांनी राजकीय, सामाजिक, वाङ्मयविषयक अशा विविध विषयांवर निबंधलेखन केले. 'संपत्तीचा उपभोग', 'लोकाभ्रम' अशा निबंधातून सामाजिकतेचा आढावा घेतला आहे. तर 'इतिहास', 'आमच्या देशाची स्थिती' या राजकीय निबंधातून देशाच्या पारतंत्र्याची अवस्था व त्याला कारणीभूत असणाऱ्या घटकांची मीमांसा केली आहे.

वक्रोक्तीपूर्ण, ठशीव, अभ्यासपूर्ण मुद्द्यांचा वापर करुन वाङ्मयात एक वेगळा असा चिपळूणकरी निबंधांनी उमटवला. ठाशिव समर्पक शब्दांचा वापर, वक्तृत्वपूर्ण भाषा शैलीमुळे

चिपळूणकरांच्या निबंधांनी साहित्यविचार व समीक्षा विचाराला एक दिशा दिली. नियतकालिकातील निबंधाला एक कलात्मक स्वरुपाची प्रतिष्ठा प्राप्त झाली.

'डॉ. जॉन्सन' हा चरित्रपर निबंध तसेच 'लोकहितवादी' व्यक्तीपरीक्षणात्मक स्वरुपाच्या निबंधाने चरित्रलेखनाची नवी दिशा निबंध वाङ्मयाला दिली. 'विदृत्व आणि कवित्व', 'ग्रंथावर टीका' या निबंधातून समीक्षात्मक स्वरुपाचे लेखन चिपळूणकरांनी केले. ग्रंथावर अभिप्राय देणे, त्यांचे गुणदोष विवेचन करणे हे मासिक पुस्तकाचे एक महत्वाचे कार्य आहे असे चिपळूणकरांनी मालेच्या उद्देशात म्हटले होते. त्यांनी निबंधमालेत सोळा पुस्तकांवर टीका केलेली आहे. त्यांचा 'ग्रंथावर टीका' हा निबंध या दृष्टीने महत्वाचा आहे.

समीक्षेचा विचार करताना 'मोरोपंतांची कविता' हा कवितेवरील प्रदीर्घ स्वरुपाचा निबंध मराठी टीकेलाच नवीन वळण लावणारा असा आहे. मोरोपंतांच्या कवितेतील आशयसंबंधी आक्षेपांचे निरसन चिपळूणकरांनी या निबंधातून केले आहे. या निबंधाचे वैशिष्ट्य म्हणजे तत्कालीन मराठी सुशिक्षित तरुणांच्या मराठी कवितेबाबतच्या दृष्टीकोनात या निबंधाने आमूलाग्र क्रांती केली.

'निबंधमालेतून' होणारा पत्रव्यवहाराची मराठी भाषा व वाङ्मयाच्या विकासाला हातभार लावताना दिसतो. 'विचारविनिमय' हे या पत्रव्यवहाराचे मुख्य उद्दिष्ट होते. निबंधमालाकार वाचक आणि पत्रलेखक हे सर्व घटक या चर्चेत सहभागी होत असत. खंडनमंडनपर या चर्चेला परिसंवादाचेच रुप प्रपात होत असे.

'विनोद महदाख्ययिका' 'सुभाषित संग्रह' अशा सदराची पुढे स्वतंत्र पुस्तके छापली गेली. अलंकाराच्या वापरामुळे सुभाषिते ही साहित्याला पूरक अशी होती. 'व्यक्ती परीक्षणे', 'वाङ्मयविचार', 'निबंध', 'ग्रंथपरीक्षण', 'लेखक परीक्षणे', 'वाङ्मय टीका' अशा विविध सदरांमुळे वाचकांची अभिरुची वाढण्यास मदत झाली. त्याचबरोबर सौंदर्यस्थळांचा आस्वाद घेण्याची एक नवी दृष्टी रसिक वाचकांना लाभली.

'निबंधमाले'चे कार्य स्पष्ट करताना ल. रा. पांगारकर म्हणतात, ''शास्त्रीबोवांनी आपली विशिष्ट मते फैलावण्याकरिता प्रथम निबंधमाला गुंफण्यास प्रारंभ केला. त्यांनी या मालेत दोन

कार्ये केली. एक पूर्वीच्या दुर्मतांचे खंडण व दुसरे आपल्या मताचे मंडण. राजाला जसे विरोधकांना दंडावयाचे व स्वकीयांना सांभाळावयाचे अशा दोन्ही कामगिऱ्या करावयाच्या असतात किंवा साधूला प्रवृत्तिपर चित्तवृत्ति आवरुन निवृत्तिपर चित्तवृत्तीची जोपासना करावयाची असते. त्याप्रमाणे लोकाग्रहीलाही दूराग्रहाचे व अज्ञानाचे खंडन करुन योग्य विचारांचे बी समाजात पेरवयाचे असते. शास्त्रीबोवांनी 'निबंधमाले'च्या द्वारे ही दुहेरी कामगिरी केली.''[२५]

*** 'काव्येतिहासंग्रह' :–**

जानेवारी १८७८ मध्ये जर्नादन बाळाजी मोडक व काशिनाथ नारायण साने यांनी निव्वळ ऐतिहासिक साधने प्रसिद्ध करणारे 'काव्यसंग्रह'सुरु केले. या मासिकाच्या संपादनासाठी काशिनाथ साने यांचे बहुमोल सहकार्य लाभले. 'काव्येतिहासंग्रह' या नियतकालिकाच्या इतिहास विभागाचे प्रमुख संपादक म्हणून साने काम पहात होते. '' 'काव्येतिहासंग्रह' त्यांनी १८९० पर्यंत नेटाने चालविले. सुरुवातीच्या अकरा वर्षात त्यांनी २२ बखरी, ५०१ ऐतिहासिक महत्वाचे कागद आणि काही मराठी व संस्कृत साहित्य प्रसिद्ध केले.''[२६]

ऐतिहासिक संशोधनात्मक लेख प्रसिद्ध करणारे खास संशोधनासाठी वाहिलेले असे हे नियतकालिक होते. बखरी, कैफियती, दप्तरे, जुनी काव्ये, जुने काव्यव्यवहार असा ऐतिहासिक साधनांना प्रसिद्धी 'काव्येतिहासंग्रहा'तून दिली जात असे. चित्रगुप्त, सभासदकृत शिवाजीच्या बखरी तसेच रामराजांचे चरित्र अशा ऐतिहासिक साधनांचा समावेश 'काव्येतिहासंग्रहा'त आढळतो.

*** 'निबंधचंद्रिका' :–**

जानेवारी १८८३ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या स्मृतिसाठी रा. भि. जोशी आणि त्यांचे मित्रमंडळ यांनी 'निबंधचंद्रिका' सुरु केले. पुढे १८८७ मध्ये 'निबंधचंद्रिका', 'मनोरंजन'मध्ये समाविष्ट करण्यात आली. सामाजिक, धार्मिक, वाङ्मयविचार असे विषय 'निंबधचंद्रिके'तून आले.

'निबंधचंद्रिके'च्या पहिल्या अंकातील उपोद्घातात्म 'निबंधचंद्रिका' ही मालेचे अनुकरण करणार असल्याचेच घोषित करण्यात आलेले आहे. त्यामुळे भाषासंशोधन, इतिहास संशोधन,

जुन्या कवितांचे संपादन 'निंबधचंद्रिके'त दिसते.

'मराठी भाषेची दैना' या लेखात स्वभाषेत ग्रंथनिर्मिती होणे कसे गरजेचे आहे याचे प्रतिपादन केले आहे. मुक्तेश्वर, रघुनाथ पंडित अशा प्राचीन कवीचा परिचय करणारे लेखन 'निबंधचंद्रिके'त प्रसिद्ध झाले. तर काव्यमंजूषा या सदरातून नवीन प्रवृत्तीच्या काव्याला प्रसिद्धी मिळाली.

*** 'केरळकोकिळ' :–**

१८८६ मध्ये कोचीनहून 'केरळकोकिळ' हे नियतकालिक निघू लागले. मराठी वाङ्मयक्षेत्रातील मार्मिक टीकाकार कृष्णाजी नारायण आठल्ये यांनी हे मासिक काढून पुढे २६ वर्षे ते चालविले.

'केरळकोकिळ' मधील नाट्यविचार, कादंबरी विचार, चरित्र विचार या साहित्यिक विविध अंगांनी मराठी सामजाला वाचनाची गोडी लावली. वाचन अभिरुचीचा प्रसार करण्यात 'केरळकोकिळ'यशस्वी झालेली दिसते. 'सासरची पाठवण', 'माहेरचे मूळ' अशा दीर्घकाव्ये, विविध लेख, कविता लेखन, गद्यलेकन, तसेच भरपूर चित्रे, स्थळवर्णन, देशवर्णन या सर्व गोष्टींनी 'केरळकोकिळ'ने अफाट लोकप्रियता मिळविली होती.

*** 'काव्यरत्नावलि' :–**

जून १८८७ साली जळगाव येथून नारायण नरसिंह फडणीस यांनी अर्वाचीन काव्य प्रसिद्ध करणारे 'काव्यरत्नावली'हे मासिक सुरु केले. इंग्रजी काव्याचे अनुकरण करत करत मराठीत स्वतंत्र अशी कविता निर्माण होऊ लागली. तिला प्रसिद्ध करण्याचे काम 'काव्यरत्नावली'ने केले.

काव्यरत्नावलीचे यथार्थ वर्णन शकुंतला आठवले यांच्या पुढील विवेचनातून होते. ''आधुनिक मराठी कवितेला मानाचे स्थान प्राप्त होण्यासाठी काव्याची प्रसिद्धी करणे आणि होतकरु कवींना उत्तेजन देऊन बीज स्वरुपातील त्यांची प्रतिमा अंकुरित, पल्लवित करणे हे महत्कार्य 'काव्यरतनावलि' ने एकहाती केले. काव्याची आणि पर्यायाने संस्कृतीची 'काव्यरत्नावलि' ने केलेली ही सेवा म्हणजे चंद्रशेखरांनी म्हटल्याप्रमाणे आणि पूर्वी

उल्लेखिल्याप्रमाणे ‘भीष्माचार्यीव्रत’च होते. रुपांतरांची साथसंगत घेत साकारलेल्या ‘काव्यरत्नावलि’चे आधुनिक कवितामय बाल्य, केशवसूत–रेंदाळकर–मुजूमदार इत्यादी समवेत रंगलेले तिचे तारुण्य आणि आर्थिक दुरावस्था व दुरावलेले दर्जेदार कविवर्ग यामुळे ‘काव्यरत्नावलि’ला आलेले मानसिक वार्धक्य असे तिचे विकासक्षम व्यक्तिमत्व मूर्त झाले.’’[२७]

अलिकडच्या काळातील प्रसिद्ध कविंनी ‘काव्यरत्नावलि’तून आपले काव्य प्रसिद्ध केले. केशवसूत–बालकवी, विनायक, तांबे, गोंविदाग्रज, अशा मान्यवर कवींचे काव्य ‘काव्यरत्नावलि’मधून प्रसिद्ध झाले. काव्यपरीक्षण, प्राचीन अर्वाचीन काव्यातील महत्वाचे उतारे, महाराष्ट्रातील कवींवर निबंध, काव्यविषयक पुस्तकांवर अभिप्राय अशा बहुविध रुपाने ‘काव्यरत्नावलि’त प्रकाशित होत असे. काव्याविषयी आस्था बाळगून कवींना उत्तेजन देण्याचे कार्य जवळ–जवळ ४७ वर्षे चाललेल्या ‘काव्यरत्नावलि’ने केले. या नियतकालिकाचा शेवटचा अंक ऑक्टोबर १९३५ मध्ये निघाला.

## दुसरा कालखंड

१८९० ते १९२० हा राष्ट्रीय चळवळीचा काळ असलेला कालखंड. लोकशिक्षणाबबरोर समाज सुधारणा, राजकारण महत्व या काळात जास्त आलेले दिसते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून लो. टिळक, गो. ग. आगरकर, न. चि. केळकर, यांच्या लेखणीने सामाजिक तसेच राजकीय जागृती नियतकालिकांच्या माध्यमातून घडवून आणली. या काळातील ‘नियतकालिका’चे उद्दिष्ट मनोरंजनापेक्षा उद्‌बोधन, समाजप्रबोधन हेच दिसते. टिळकांच्या ‘केसरी’तून राजकीय स्वातंत्र्याचे वारे वाहत असतानाच ‘सुधारक’मधून समाज सुधारणा चालू होती. तर ‘करमणूक’सारख्या मासिकातून निखळ स्वरुपाचे मनोरंजन केले जात होते. या कालखंडात मराठी वाङ्मयक्षेत्रातील काव्य, नाटक, निबंध अशा विषयांना वाहिलेली स्वतंत्र स्वरुपाची मासिकेही निघाली. ‘काव्यसंग्रहा’सारखे प्राचीन मराठी काव्याशी संबंधित मासिक याच कालखंडातील आहे. गो. म. कुलकर्णी म्हणतात, ‘‘१९२० नंतर जी नवी वाङ्मयीन संस्कृती वा सौंदर्याभिरुची जन्माला आली आणि तिने समकालीन काव्य, कविता, विनोद, नाट्यछटा, ललित निबंध, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने यासारख्या वाङ्मयप्रकारांना प्रचोदित आणि प्रवाहित केलं. त्यांचे

फार मोठे श्रेय्य या काळातील वाङ्मयीन नियतकालिकांनाच द्यावे लागते.''[२८]

याच कालखडातील 'आनंद', 'खेळगडी', 'बालोद्यान' अशी खास लहानमुलांसाठीही काढलेली मासिके होती.

बालकांसाठी अशी मासिके निघाली तशीच 'स्त्री'च्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा विचार करण्याच्या विचारातून स्त्रियांच्या विचारांना, मतांना चालना देण्याच्या उद्दिष्टाने 'अबलामित्र' (१८७७), 'आर्यभगिनी' (१९९०), 'स्त्री' (१९३०) ही मासिके निघाली. 'ग्रंथमाला', 'मासिक मनोरंजन', 'महाराष्ट्र कोकिळ', 'कादंबरी कल्पद्रुप', 'करमणूक' अशा विविध मासिकांनी नियतकालिकांच्या जागेत भरीव अशी स्वरुपाची कामगिरी केली.

*** 'काव्यसंग्रह' :–**

जानेवारी १८९० मध्ये 'काव्यसंग्रह' हे मराठी काव्याशी संबंधित मासिक निघाले. प्राचीन मराठी काव्य संशोधित करुन ते प्रसिद्धीस आणण्याचे महत्वाचे कार्य 'काव्यसंग्रहा'ने केले. मराठी संत व पंत कवींचे काव्याचे संशाोधन 'काव्यसंग्रहा'ने केले व काव्याला प्रसिद्धी ही दिली.

*** 'करमणूक' :–**

ऑक्टोबर १८९० मध्ये निघालेल्या हरिभाऊ आपटे यांच्या 'करमणूकी'ने २७ वर्षे साहित्याची सेवा केली. 'करमणूकी'ने वाचकांना ज्ञान व मनोरंजन या दोन्ही गोष्टीचा लाभ व्हावा असा उद्देश हरिभाऊंचा होता. 'करमणूकी'मध्ये कथा, कादंबरी, कविता, चरित्र वाङ्मय अशा विविध वाङ्मय प्रकारांना प्रसिद्धी मिळाली.

गोविंदाग्रजांच्या 'अल्लड प्रेमास', 'मनातील पाल', 'बापासाठी रडणारास' अशा विविध कविता 'करमणूकी'मधून प्रसिद्ध झाल्या. ऐतिहासिक व सामाजिक स्वरुपाच्या कादंबरीला 'करमणूकी'ने स्थान दिले. 'करमणूकी'चे मधून प्रसिद्ध होणाऱ्या कथांवर हरिभाऊंच्या कथालेखनाचा प्रभाव जाणतो. घटनाप्रधान आा स्वरुपाच्या कथांनी विशिष्ट परिणाम साधलेला जाणवतो. पांढरपेशा मध्यमवर्गीच परिस्थितीचे चित्रण करमणूकीतील कथांमधून साकारलेले आहे. हरिभाऊंनी कथारचनेचे विविध प्रयोग 'करमणूकी'तून केले. याशिवाय स्फूट गोष्टी, निबंध, चरित्रे, शास्त्रीय मनोरंजनपर माहिती अशा विविध प्रकारांनी लोकरंजन व लोकशिक्षण समाजाला दिले.

'मुर्खपणा', 'बावले विसरभोळे आणि कंपनी' असे विनोदी लेख तसेच 'संगीत पिवळा', 'मुकुट नाटक', अशी नाटके 'करमणूकी'तून प्रसिद्ध झाली. वा. ज. कुंटे यांच्या 'गोकाकचा धबधबा' व 'दुधसागर' श्री साधूदास यांच्या 'खिद्रापूरचा कोपेश्वर' अशा प्रवासवर्णनात्मक लेखांनाही 'करमणूकी'ने उत्तेजन दिले. खास स्त्री वाचकांसाठी, 'सगुणाबाईची आपल्या मुलीस पत्रे' अशी माला 'करमणूकी'ने चालविली. सर्वसामान्य वाचकांना बहुश्रुत करण्याचे मौलिक कार्य हरिभाऊंच्या 'करमणूकी'ने केले. 'करमणूकी'तील वाङ्‌मयाने मनोरंजनाबरोबर उपदेशासही प्राधान्य दिले. तसेच वाचकांना मनोरंजन व ज्ञानाजर्नाचाही लाभ मिळाला.

'करमणुकीत' आचरट व पाचकळ मजकूर येणार नाही तर 'पुढल्या माडीपासून चलीपर्यंत व दिवाणखान्यातील टेबलापासून फणी-करंड्याच्या पेटीपर्यंत कोणाच्या हाती वर्तमान पत्र पडेल त्याने वाचावे' असा हरिभाऊंचा निर्वाळा होता. 'पण लक्षात कोण घेतो?'सारख्या कादंबऱ्या, 'गार्फील्ड चरित्र' सारखी चांगली चरित्रे, उपयुक्त ज्ञानसंग्राहक माहिती, चटकदार वर्तमानसार, ज्ञानाचे कण, मधुर वचने यांनी 'करमणूक' समृद्ध बनली.

*** ग्रंथमाला :-**

एप्रिल १८९४ मध्ये कोल्हापूर येथून विष्णू गोविंद विजापूरकर यांनी 'ग्रंथमाला'नावाने मासिक काढले. १२ वर्षे त्यांनी हे मासिक चालविले. 'ज्ञानप्रसार' ग्रंथमालेचे उद्दिष्ट होते. महाराष्ट्राचा इतिहास, संशोधन, राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार, त्याचप्रमाणे वैचारिक वाङ्‌मयाची निर्मिती या विविध क्षेत्रात ग्रंथमालेने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे. अनेक नवीन होतकरु लेखकांना प्रसिद्धी देण्याचे काम 'ग्रंथामले'ने केले.

या मासिकातून विविध ग्रंथ छापण्यात येत असत. त्यातील बहुतांश इंग्रजीतून मराठीत आणलेले होते. या व्यतिरिक्त निबंध, टीकात्मक लेख, पुस्तक परिक्षणे इत्यादी विविध विषय 'ग्रंथमाले'त येत असत. अ. ना. ठाकूर या ग्रंथमालेविषयी म्हणतात, ''भारतीय युवकांत राष्ट्रप्रेम निर्माण व्हावे व त्यांनी आधुनिक विचारांची कास धरावी म्हणून विजापूरकरांनी लेखन केले. मराठी मासिक 'ग्रंथमाले'चे (१८९४-१९०६) संपादक असताना त्यांनी त्यातून 'युरोपचे संक्षिप्त इतिवृत्त' व 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष'चे अनुवाद प्रसिद्ध केले. हे मासिक त्यांनी परतंत्र

नागरिकांची अंधश्रद्धा घटवून विवेकशक्ती वाढविणे आणि त्यांना सारासार विचार करायला शिकविणे यासाठी काढले होते.''[२९] 'ग्रंथमाले'चा शेवटचा अंक मार्च १९०६ मध्ये निघाला.

*** 'मनोरंजन' :–**

जानेवारी १८९५ ते फेब्रुवारी १९३५ असे प्रदीर्घ काळ चाललेले हे मासिक काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी मुंबईहून काढले. ४० वर्षे चाललेल्या 'मनोरंजन'ने पाश्चात्य ललित मासिकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्याचे प्रभावी अनुकरण केले. ललित साहित्याच्या जडणघडणीचा पाया 'मनोरंजना'ने घातला असे म्हटले जाते. ललित साहित्यावर 'मनोरंजन'ने भर दिला.

'मनोरंजन'मध्ये केशवसुत, टिळक, दत्त, विनायक, तांबे या प्रसिद्ध कवींच्या कविता प्रकाशित झाल्या. तसेच १९२० नंतरच्या काळातील कवी यशवंत, काव्यविहारी, केशवकुमार, माधव ज्यूलियन, भवानीशंकर पंडित अशा कविंच्या कविताही प्रसिद्ध झाल्या. हरिभाऊंची 'श्रुतकीर्ति चरित्र', 'सुमतिविजय', 'जबरी विवाह' ही अनुवादित नाटके प्रसिद्ध झाली. तसेच सामाजिक नाटके, फार्स, प्रहंसने यांनाही 'मनोरंजन'मध्ये स्थान मिळाले.

कादंबरी, प्रवासवर्णने, विनोदी लेख या वाङ्मयप्रकारांनीही 'मनोरंजन'ने घरोघरी पाठविले. लघूकथेचा पूर्वज म्हणता येईल असा 'संपूर्ण गोष्ट'नावाचा नवा वाङ्मय प्रकार 'मनोरंजन'ने वाचकांना दिला.'मनोरंजन' मासिकाने कथेच्या प्रांतात मोलाची कामगिरी बजावली. 'मनोरंजन'ने अद्‌भूत बोधप्रदान कथेला वास्तवतेत आणले. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अशा लेखनाने मासिक 'मनोरंजना'ने मासिकाच्या इतिहासात आपले नवे युग सुरु केले. 'मनोरंजन'चा शेवटचा अंक फेब्रुवारी १९३५ मध्ये निघाला.

*** 'कादंबरी कल्पद्रूप' :–**

१९०० ते १९०६ या काळात वाईतील भावे, सहस्त्रबुद्धे आणि मंडळी यांनी 'कादंबरी कलपद्रूप' हे मासिक केवळ कादंबऱ्या प्रसिद्ध करणे या उद्दिष्टाने काढले.

'नरेंद्र मोहिनी', 'चंद्रकला', 'वसंतमालती' या रामचंद्र नीलकंठ सहस्त्रबुद्धे यांच्या कादंबऱ्या या मासिकातून प्रसिद्ध झाल्या. तसेच वा. न. भावे यांच्या 'प्रतिसापूर्ती', 'संसार',

'दीपनिर्वाण' अशा कादंबऱ्यांना प्रसिद्धी देण्याचे काम या मासिकाने केले.

*** 'रंगभूमि' :–**

एप्रिल १९०७ साली सरु झालेले 'रंगभूमि' मासिक १९१४ ला बंद पडून १९२७ ला पुन्हा सुरु झाले. शंकर बापूजी मुजूमदार यांनी काढलेले 'रंगभूमि' मासिक होते.

'रंगभूमि' मासिकाच्या उद्देशासंबंधी लिहिताना कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर म्हणतात, ''वर्तमानपत्रातून व मासिक पुस्तकातून 'नाटके' व 'नाटकमंडळ्या' या संबंधाने जी चर्चा चालली होती त्याकडे पाहिले म्हणजे असल्या चर्चेला स्वतंत्रपणे वाहिलेले पुस्तक असणे जरुरीचे आहे असे कोणालाही वाटल्यावाचून राहणार नाही. मराठी रंगभूमिसंबंधाने जेथे नेहमी साधार सोपपत्तिक व सविस्तर विवेचन चालले असे स्थळ निर्माण झाल्यास त्यायोगे आमच्या रंगभूमिची वाढ होऊन त्यामुळे तिचा होणारा अभ्युदय रसिकजनांस आल्हाददायक व इतरांस मार्गदर्शक होईल यात संशयच नाही.''[३०]

पाश्चात्य रंगभूमीवरील नवीन चळवळ, भरतमूनींच्या नाट्यशास्त्राचे भाषांतर, नाटकांची स्थित्यंतरे असे अनेक लेख 'रंगभूमि' मधून प्रसिद्ध झाले. नाट्यकलेची उत्पत्ती, नाटकाची घटना, नाट्यकलेचे ललितत्व असे नाट्यविषयक तात्विक लेखही 'रंगभूमि' तून प्रसिद्ध झाले.

नाट्यविषयक चर्चा करणाऱ्या सदरातून रामकृष्ण वासुदेव कर्वे यांचा 'नाटक व इतिहास' रा. गो. दंडवते यांचा 'नट व शिक्षण' हे लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

'महाराष्ट्रीय नाटककार' या 'रंगभूमि'तील सदरातून नाटककरांची माहिती छापली जात असे. या सदरातून विष्णूदास भावे, विनायक कीर्तने, शंकर रानडे, कृष्णशास्त्री राजवाडे, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी अशा प्रसिद्ध नाटककारांनी नाट्य कलेला कशाप्रकारे योगदान दिले याची माहिती सांगितली आहे. 'रंगभूमि'चा शेवटचा अंक मार्च १९२८ मध्ये निघाला.

*** 'नवयुग' :–**

'नवयुग' चा पहिला अंक मे १९१३ मध्ये प्रकाशित झाला. पुढे मे १९२३ पर्यंत 'नवयुग' चालू होते. दत्ताराम काशिनाथ मालणकर यांच्या इच्छेने 'नवयुग' काढले. विठ्ठल शिवाजी

नाडकर्णी यांनी संपादनाचे काम केले हे नियतकालिक १० वर्षे सुरु हाते. समाजात शांति–समृद्धि निर्माण व्हावी, जगात नवयुग प्रवर्तावे म्हणून हे मासिक काढीत आहोत अशी भूमिका संपादकांनी मांडली.

'नवयुग' मधून दर महिन्याला कादंबऱ्यांची प्रकरणे प्रसिद्ध होत असत. 'नवयुग' मधून पाच पूर्ण कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्या सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. सौ. मीराबाई यांची 'डॉ. पार्वतीबाई' ही स्त्रीची कर्मकथा सांगेत, माधव दामोदर आळतेकरांची 'ललित', दत्तात्रय माधव कुलकर्णी यांची 'अरुणोदय' कृष्णाजी केशव गोखलेंची 'एकत्र की विभक्त' अशा कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

ऐतिहासिक, रहस्यमय, भाषांतरित कथा 'नवयुग' मधून प्रसिद्ध झाल्य. 'स्वदेशासाठी आत्मयज्ञ', 'ऐतिहासिक स्त्रियांच्या गोष्टी' या कथेबरोबरच हणमंत बापूराव अत्रे यांनी मुन्सी प्रेमचंदांच्या कथांचे भाषांतर करुन चार कथा लिहिल्या. प्रसिद्ध लेखिका गिरीजाबाई केळकर, लेखक चि. वि. जोशी यांचे कथासाहित्य 'नवयुग' मध्ये प्रकाशित झाले आहे.

परीक्षण, टीकात्म लेखाच्या साहाय्याने वाङ्मय समीक्षेची मांडणी 'नवयुग' मध्ये दिसते. 'तुकाराम बोवांचे धर्मविचार', 'तेरा भिक्षुणी रत्ने' अशा पुस्तकांवर परीक्षणे आहेत. गं. त्र्यं. माडखोलकर यांनी केशवसुत, तांबे, विनायक, बालकवी, टिळक अशा कवींच्या कवितांवर टीकात्मक लेख लिहिले आहेत. याशिवाय विनोदी लेख, चरिपिर व माहितपर लेख, नीतिशास्त्र, आरोग्य अशा विविध विषयांना 'नवयुग'मध्ये स्थान मिळालेले आढळते. आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीमध्ये स्वजन, स्वभाषा सेवा हे उद्दिष्ट जोपसण्याचे कार्य 'नवयुग' ने केले. 'नवयुग' च्या कामगिरीविषयी डॉ. उषा देशमुख म्हणतात, '''नवयुग' ने नवीन लेखकांना लिहिण्याची स्फूर्ती दिली. 'नवयुग'ने निर्माण केलेला लेखकवर्ग वाढत गेला आणि या वर्गाच्या आधारे मग पुढे नवनवीन नियतकालिके उदयाला आली. बहुजन समाजाला डोळ्यापुढे ठेवून त्यांच्या गरजा, इच्छा–आकांक्षा, अभिरुची यांच्यासह माणसाचे उन्नयन करण्याच्या उद्देशाने 'नवयुग'ने अखेरपर्यंत प्रयत्न केले.''[३१]

## तिसरा कालखंड

१९२० ते १९४७ या काळातील मासिकांनी समाधानकारक अशी प्रगती साधलेली दिसते. 'स्त्री', 'महाराष्ट्र साहित्य प्रत्रिका', 'यशवंत', 'प्रतिभा', 'अरुण', 'मनोहर', 'पारिजात', 'ज्योत्सना', 'लोकशिक्षण', 'सत्यकथा', 'सह्याद्रि' अशी मासिके या काळात निघाली. मुलांसाठी, महिला वर्गासाठी, आयुर्वेद, औद्योगिक, ज्योतिष, संशोधन, वाङ्मय अशा विविध विषयांसाठी खास मासिके ही निघाली. साहित्य समीक्षा, प्रमेकथा, भावकविता, नवकथा, नवकाव्य याचा विचार मासिकांमधून होऊ लागला. विविध वाङ्मयीन वादांचे पडसाद याच काळातील मासिकांमधून उमटू लागले.

*** 'मुमुक्ष' :–**

पुण्यामधून जानेवारी १९२१ मध्ये निघालेले 'मुमुक्ष' हे नियतकालिक तेरा वर्षे चालू होते. या कालावधीमध्ये भक्तिरसप्रधान सरस अशी वाङ्मयाची निर्मिती 'मुमुक्ष'म धून झाली. 'मुमुक्ष' चे संपादक लक्ष्मण रामचंद्र पांरगावकर होते. जानेवारी १९३३ पर्यंत 'मुमुक्ष' चालू होते.

'''मुमुक्ष' या नियतकालिकांतून पांगारकरांनी परमार्थ विषयक, संशोधनपर सामाजिक आणि राजकीय विषयांवर विपुल लेखन केले. मराठी भाषा आणि साहित्य हा त्यांचा निरंतर ध्यासाचा आणि अभ्यासाचा विषय होता. भक्तीमार्गाचे ते उपासक होते. वाणी आणि लेखणी या माध्यमाचा उपयोग करुन तत्कालीन जनमाणसास भक्तिप्रवण करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला.''[३२] जानेवारी १९३३ मध्ये 'मुमुक्ष'चा शेवटचा अंक निघाला.

*** 'अरुण' :–**

जून १९२४ साली 'अरुणमाला' नावाने पहिला अंक प्रसिद्ध झाला. पुढे त्याचे 'अरुण' असे नामकरण झाले. मोतीराम गजानन रांगणेकर हे 'अरुण'चे संपादक होते. मुंबईहून निघणाऱ्या या मासिकात संपादकाने मासिकाचा उद्देश सर्वसाधारण वाचकांसाठी व स्त्रियांसाठी असा दिला आहे.

साहित्यक्षेत्रातील अनेक नामवंत व प्रसिद्ध साहित्यिकांनी 'अरुण'ला सहकार्य केले आहे. वि. स. खांडेकर, भा. वि. वरेरकर, कवी यशवंत, गिरिश, माधव ज्यूलियन, ग. त्र्यं. माडखोलकर,

ना. सी. फडके आदी कवी व लेखकांचे साहित्य ‘अरुण’ मधून प्रसिद्ध झाले आहे.

‘अरुण’ च्या प्रथम पृष्ठावरच कवितेला स्थान मिळाले आहे. माधव ज्यूलियन, नंदलाल, बार्लेश, गिरिश, गांगेय यांच्या कविता ‘अरुण’ मधून प्रकाशित झालेल्या आहेत. भावनांचे संमोहन, कवीसृष्टी व वास्तवातील अंतर, मानवी मनाचा अपेक्षाभंग व निराशा अशा विविध विषयांवरचे काव्य ‘अरुण’ मध्ये आढळते.

‘मराठी नाट्यकथा’ या सदरातून प्रसिद्ध नाट्यकृतीचा ओळख करुन दिली जात असे. नाटिका, नाट्यछटा तसे नाट्यविषयक लेखनातून नाटककारांचे अनुभव व प्रेक्षकांच्या नाटकांबद्दलच्या ‘अपेक्षा’ व्यक्त केल्या आहेत. मामा वरेरकरांनी ‘माझ्या नाटकातील माझी आवडती अपत्ये’ या लेखातून रंगभूमीबाबतचे अनुभव मांडले आहेत.

मो. ग. रांगणेकरांची ‘मृगजय’ मं. भा. कुलकर्णी यांची ‘मधाचे मोहोळ’या कादंबरीला प्रसिद्धी ‘अरुण’ मधूनच मिळाली.

विषय व अविष्काराने नटलेल्या विविध कथाकारांच्या कथा ‘अरुण’ मधून प्रसिद्ध झाल्या. वि. स. खांडेकर, बाळूताई खरे, कुमुदिनी प्रभावळकर, अशा कथाकारांच्या कथांना ‘अरुण’ मध्ये स्थान मिळाले. खांडेकरांची ‘कवीच लग्न’ कै. गो. ग. लिमये यांची ‘अबला प्रभाव’, चिं.वि.जोशी ची ‘गुलाब’अशा विविध कथांचा यात समावेश होतो.

‘अरुण’ मधून आकर्षक अशा लेखमालाही प्रकाशित हो असत. ‘पुढील जन्मी मी कोण होणार?’, ‘माझ्या आठवणीतील गमतीदार प्रसंग’ या लेखमालेपेक्षा ‘मी आणि माझे लेखन’ ही विशेष लेखमाला प्रसिद्ध होत असे. या लेखमालेत अनेक साहित्यिकांनी आपल्या लेखनाच्या स्फूर्तीविषयी विचार मांडले आहेत. नाथमाधव, ना. सी. फडके, भा. वि. वरेरकर, वा. म. जोशी, न. चि. केळकर अशा प्रसिद्ध व्यक्तींचा त्यात समावेश आहे.

‘अरुण’ मधील पुस्तक परिक्षणाद्वारे तपशीलवारपणे वाङ्मयविचार मांडलेला दिसतो. कादंबरी, कथा, काव्यसंग्रह, नाटक, लघूकथा संग्रह अशा वाङ्मय प्रकारांच्या पुस्तकांचे परीक्षण ‘अरुण’ मध्ये केले आहे. ह. ना. आपटे यांची ‘त्याला कारण शिक्षण’ ही कादंबरी ‘बंधनाच्या पलीकडे’, पु. य. देशपांडे यांची कादंबरी तसेच कवी साधूदास यांचा ‘गृहविचार’, काव्यसंग्रह,

गिरीश यांचा ‘आंबराई’ हा काव्यसंग्रह, वि.स.खांडेकरांची ‘नवमल्लिका’ हा लघूकथासंग्रह, तसेच त्यांचे ‘रंकाचे राज्य’ हे नाटक अशा विविध वाङ्मय प्रकारातून वाङ्मय विचार ‘अरुण’ मासिकाने मांडला आहे.

*** ‘रत्नाकर’ :–**

ऑक्योबर १९२५ ते १९३३ अशी ‘रत्नाकर’ने ८ वर्षे साहित्यसेवा केली. ‘रत्नाकर’च्या संपादनाचे काम ना. सी. फडके, अ. स. गोखले करत असत. पुण्याहून निघणारे हे मासिक साहित्य, कला, संस्कृती, कलाभिरुची यांना प्राधान्य देणारे होते. तांबे, अज्ञातवासी, काणेकर, अनिल अशा अनेक कवींच्या ४५० कविता ‘रत्नाकर’ने प्रसिद्ध केल्या. दिवाकरांच्या नाट्यछटेविषयी तात्त्विक चर्चा ‘रत्नाकर’ मध्ये आहे. त्याचप्रमाणे संगीत नाटकाची समीक्षाही आढळते. बालगंधर्व व गंधर्व नाटक मंडळीची माहिती देणारा १९३१ मध्ये ‘गंधर्व विशेषांक’ निघाला होता. ना. सी. फडके यांच्या ‘दौलत’, ‘जादूगार’ वि. सी. गुर्जर, यांची ‘जलतरंग’ अशा प्रसिद्ध कादंबऱ्यांची प्रकरणे ‘रत्नाकर’ मधूनच प्रकाशित झाली.

कथा वाङ्मयाच्या क्षेत्रात ‘रत्नाकर’ ने विलक्षण ठसा उमटवला आहे. ना. ह. आपटे, सरस्वतीकुमार, वि.स.खांडेकर, कमलाबाई टिळक, य. गो. जोशी अशा नव्या–जुन्या कथाकारांच्या कथा ‘रत्नाकर’ मधून प्रसिद्ध झाल्या.

रा. श्री. जोग, द. के. केळकर अशा व्यासंगी लेखकांनी ‘रत्नाकर’ मधून टीकात्मक स्वरुपाचे लेखन केले. साहित्य, कला, संस्कृती याकडे सर्वसामान्य वाचकांना वेधून घेण्याचे कार्य ‘रत्नाकर’ने आपल्या वाङ्मयातून केले. ‘रत्नाकर’चा शेवटचा अंक मे १९३३ मध्ये निघाला.

*** महाराष्ट्र साहित्य पत्रिका :–**

मार्च १९२८ पासून ‘महाराष्ट्र साहित्य पत्रिका’ स्वतंत्रपणे सुरु झाली. त्यापूर्वी १९१३ पासून ‘विविधज्ञानविस्तार’ला जोडून ‘महाराष्ट्र साहित्य पत्रिका’ उदयाला आली.

इंग्रजी राजवटीत मराठी भाषा व मराठी साहित्य सामान्य लोकांपर्यंत पोचवून त्यांचे साहित्यासंबंधीचे प्रबोधन करावे असे ध्येय घेऊन ‘महाराष्ट्र साहित्य पत्रिका’ जन्माला आली. समीक्षा, संशोधन, चर्चा या माध्यमातून वाङ्मयीन विचारप्रवाहांचे दर्शन वाङ्मय रसिकांना

'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'ने घडविले. मनोरंजन, ज्ञानसंवर्धन, विवेचक स्वरुपाची टीका, प्रगल्भ परीक्षणे, साहित्सिक तत्वचर्चा, संशोधन अशा चौफर अंगाने पत्रिकेने विषयाची मांडणी केली.

मराठी भाषेच्या समृद्धीसाठी व्याकरण विषयाचे भरपूर लेख, तसेच विविध ज्ञानशाखातील परिभाषिक शब्द, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'तून प्रसिद्ध झाले. 'वाङ्मय वार्ता', 'साहित्यकांचे विचार', 'साहित्यसमीक्षा' अशा साहित्यिक सदरांद्वारे तत्कालीन साहित्याचा आढावा घेतला आहे. विष्णुदास, विश्वनाथ, पद्मनाथ अशा प्राचीन कवींवर संशोधनात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत. वि. स. खांडेकर हेच 'मराठी लघूनिंबधाचे जनक' हा आनंद यादवांचा शोधनिबंध पत्रिकेतून गाजला. नी. र. वऱ्हाडपांडे यांचा 'भाषाशुद्धीच्या निमित्ताने', स. शि. भावे यांचा 'शुद्ध कलाप्रेरणेचे रुप' तसेच के. ना. काळे यांचा 'सौभद्राच्या निमित्ताने' असे विविध वैचारिक लेक पत्रिकेतून प्रकाशित झाले. फ. मु. शिंदे, वसंत दावतार यांनीही वाङ्मयीन समालोचन करणारे लेख लिहिले.

कुसुमाग्रज, निकुंब, बा. भ. बोरकर अशा अनेक प्रसिद्ध कवींच्या कविता पत्रिकेने प्रसिद्ध केल्या. 'लघूनिबंध', तात्विक निंबध, प्राचीन व अर्वाचीन साहित्य विचार, विविध वाङ्मयीन प्रवाह यांना 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'तून स्थान मिळाले. केशवसूत विशेषांक, राजकवि तांबे विशेषांक श्री ज्ञानदेव विशेषांक, तसेच रत्नागिरी व सोलापूर येथील साहित्य संमेलन निमित्त विशेषांक, अशा विशेष प्रसंगाचे औचित्य साधून विशेषकांचे प्रकाशन 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'ने केले.

*** 'स्त्री' :–**

ऑगस्ट १९३० मध्ये शंकरराव किलोस्करांनी खास स्त्रियांचे व्यक्तिमत्व साकारण्यासाठी 'स्त्री' हे मासिक काढले. यात सामाजिक लेख, स्त्रियांच्या चळवळी विषयी माहिती, तसेच विविध क्षेत्रातील प्रसिद्ध स्त्रियांच्या मुलाखती आहेत. याशिवाय वाङ्मयक्षेत्रातील काव्य, कथा, प्रवासवर्णन व इतर ललित साहित्याचा समावेश ही आहे. खास स्त्रियांसाठी वेशभूषा, भरतकाम, खेळ, पदार्थ अशा विविध गोष्टींचाही समावेश 'स्त्री' मध्ये आढळतो.

काव्यविहारी, ग. ल. ठोकल, संजीवनी मराठे, इंदिरा तेलंग अशा कवींच्या कविता 'स्त्री'

मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. मालती बेडेकर, मालती दांडेकर, कमलाबार्स टिळक, कमला फडके या नामवंत स्त्री लेखिका प्रमाणेच ना. सी. फडके, य. गो. जोशी, अरविंद गोखले, वि. स. खांडेकर अशा प्रसिद्ध लेखकांनीही 'स्त्री' मासिकाला योगदान दिले आहे. 'स्त्री' मधील कथा वाङ्मयातून तत्कालीन स्त्रीजीवनाचे चित्रण केले आहे. 'स्त्री' मासिकातून प्रसिद्ध झालेल्या वि. स. खांडेकरांच्या कथा सामाजिक जाणिवेचे दर्शन घडवितात. मानवी जीवनात येणाऱ्या विविध प्रश्नांची गुंफण कथाकराने अत्यंत मार्मिकपणे केली आहे.

*** 'विश्ववाणी' :–**

सप्टेंबर १९३२ मध्ये विश्ववाणी मंडळातर्फे 'विश्ववाणी' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. ब. गो. गर्गे, नी. द. भट हे संपादक होते. मराठीला अन्य भाषांतील वाङ्मयाची व विचारांची आणि हिंदूस्थान बाहेरच्या देशातील समाजाची ओळख करुन देणे, हा विश्ववाणीचा हेतू होता. जागतिक वैचारिक प्रवाहाची ओळख मराठी वाचकांना विश्ववाणीने करुन दिली. पाश्चात्य वाङ्मय, पाश्चात्य साहित्यिक व त्यांच्या साहित्याचा परिचय करुन देणे या दृष्टीने 'विश्ववाणी'ने कार्य केले. दि. का. गर्डे यांनी 'हिंदी साहित्याचे विहंगमावलोकन' या लेखातून हिंदी वाङ्मयाचा प्रारंभ ते वर्तमानकाळापर्यंत परिचय करुन दिलेला आहे.

भा. रा. तांबे, ना. के. बेहरे, अनंत कानेकर, संजीवनी मराठे अशा कवींच्या कविता, 'विश्ववाणी'त बहरल्या. वि. स. खांडेकर, कुसुमावती देशपांडे, जयवंतराव सरदेसाई, वामन चोरघडे, व्य. रा. वनमाळी, यांच्या कथा, 'विश्ववाणी'त प्रसिद्ध झाल्या. 'खैरपद्य' हा माधव पटवर्धन यांचा मुक्तपद्य व स्वैरपद्याचे मराठीतील प्रयोग त्यावरील लेखन प्रसिद्ध आहेत. 'हिंदोळ्यावर', 'कुलवात', 'बन्दिशाळा', 'रत्नफुले', 'दीपकळी' अशा पुस्तकांवर परीक्षणे प्रसिद्ध झाली. 'कला व निती' ब. गो. गर्गे, 'वाङ्मय आणि राष्ट्रीयत्व', अ. वा. ओक यांचे चर्चात्मक लेख 'विश्ववाणी'तून आले.

*** 'प्रतिभा' :–**

२ जानेवारी १९३३ मध्ये निघालेल्या 'प्रतिभा' मासिकाचे संपादक गं. दे. खानोलकर, के. नारायण काळे, विठ्ठल हरी कुलकर्णी होते. 'प्रतिभा' पाक्षिकाने समाजातील शिक्षित पिढीला

साहित्य, कलेचा खुराक दिला. या पाक्षिकाचा उद्देश, ''साहित्यिक मतमतांतरे लोकांपुढे यावीत, उत्तमोत्तम ग्रंथ व ग्रंथकार यांचा परिचय करुन दिला जावा व तात्कालीन सुशिक्षित पिढीची बौद्धिक भूक भागवावी.''[३३] असा होता. वाङ्मयीन चळवळीला वाहिलेले हे मासिक जुलै १९३७ पर्यंत चालू होते.

कवी तांबे, माधव ज्यूलियन, यशवंत, ग.ल. ठोकळ, वा. ना. देशपांडे अशा प्रसिद्ध कवींच्या कविता 'प्रतिभा' मधून प्रसिद्ध झाल्या. वा. म. जोशींची 'इंदू काळे व सरला भोळे' ही पत्रात्मक कादंबरी तसेच विभावरी शिरुरकरांच्या 'हिंदोळ्यावर' व 'कळ्यांचे नि:श्वास' या कलाकृतीवर चर्चात्मक लेख 'प्रतिभा' मधून प्रसिद्ध झाले.

'प्रतिभे'तील साहित्यसमीक्षेचे विशेष कार्य होते हे पुढील विचारावरुन स्पष्ट होते. ''येथील समीक्षा स्वतंत्र आहे. स्वतंत्र या अर्थाने की निष्कर्षांकडे जाण्यापेक्षा येथे सर्व अंगांनी समीक्षण चर्चा सादर करण्यात आली आहे व तिचे वाचकावर आपल्या मतांचा परिणाम घडवून आणावा असा अभिनिवेश येथील संपादनात नाही. कलेसाठी, जीवनासाठी कला, कला–जीवन, समन्वयावाद व कलेतील साम्यवाद, अशा सर्वच अंगांनी येथे चर्चा झाली आहे. मराठी टीकेचे जुने–नवे प्रकार येथे आढळतात. मात्र इंग्रजी समीक्षेच्या संस्कारातून आलेली टीका येथे प्रामुख्याने आहे. मराठीतील कोल्हटकरी पद्धतीची जुनी पाल्हाळिक टीका मागे सारुन समीक्षेचा नवा मार्ग येथे चोखाळला आहे. 'प्रतिभे'तील समीक्षेचा काही ठिकाणी तंत्र प्रियतेकडे कल दिसतो. कारण या काळात तंत्राची चर्चा सर्वाधिक झाली होती.''[३४]

'वाङ्मयवृत्त', 'नूतन वाङ्मयाचे विहंगभावलोकन', 'ग्रंथ आणि ग्रंथकार', 'प्रतिभेच्या न्यायमंदिरात' अशा 'प्रतिभा' मधील वाङ्मय सदरातून वाङ्मय चर्चा केली जात असे. 'वाङ्मयातील वाद' (श्री. म. वर्दे), 'साहित्यातील सत्यदर्शन आणि नीतिबोध' (अ.म. जोशी), यांचे वाङ्मय समीक्षात्मक लेख लक्षणीय आहेत. १९३६ मध्ये 'प्रतिभे'ने 'सावरकर विशेषांक', १९३७ मध्ये 'केतकर विशेषांक' काढले होते.

'प्रतिभा'ने चर्चा, परिसंवाद, टीका, प्रतिटीका, वाद–विवाद, परीक्षणे, रसग्रहणे अशा समीक्षात्मक अंगाला स्थान देऊन वाङ्मय विचारांना चालना दिली. जुलै १९३७ मध्ये

‘प्रतिभे’चा शेवटचा अंक निघाला.

*** ‘‘सत्यकथा’’:–**

नोव्हेंबर १९३३ मध्ये ‘सत्यकथा’ हे मुंबई येथून वाङ्मयीन विषयाला वाहिलेले मासिक सुरू झाले. मो.ग. रांगणेकरांनी संपादित केलेल्या ‘सत्यकथे’ चे संपादक पुढे श्री. पु.भागवत होते. ‘सत्यकथे’तून साहित्य प्रसिद्ध होणे प्रतिष्ठेचे समजले जाई. १९४५ च्या आगे–मागे श्री. पु.भागवत व वा.ल. कुलकर्णी यांचा परिचय झाला. त्यावेळी सत्यकथेसाठी वा.ल.कुलकर्णी यांनी पुढील सहाय्य केले. ‘‘‘सत्यकथा’ मासिकास या वेळी नवे रूप दिले जात होते. या कामात वा.ल. कुलकर्णींनी भागवतांना खूपच सहकार्य दिले. सत्यकथेतून प्रसिद्ध होऊ लागलेल्या नववाङ्मयावर त्याचे स्वरूप स्पष्ट करणारी समीक्षा लेखन त्यांनी ‘सत्यकथे’तून केले. त्यामुळे वाङ्मयातील नवप्रवृत्तीचे मीमांसक म्हणून ते ओळखले जाऊ लागले.’’[३५]

साहित्य, कला, समीक्षा, समाज, संस्कृती या सर्वांना ‘सत्यकथे’ने स्थान दिले. ‘आजकालचे कथालेखक’, ‘आजकालचे कवी’, या लेखमाला सत्यकथेतून प्रसिद्ध होत. ‘नवकाव्य’, ‘नवकथा’, ‘नवकादंबरी’ या सर्वांनाच सत्यकथेने आधार दिला. दैनंदिन जीवनाशी निगडीत प्रश्नांची ओळख कथेच्या माध्यमातून सत्यकथेने करून दिली. एकांकिका, आत्मवृत्तात्मक लेखन, आत्मचरित्रात्मक लेखन अशा विविध वाङ्मय प्रकारांना ‘सत्यकथे’ने प्रोत्साहन दिले. नवीन लेखकांना आपले वाङ्मय प्रसिद्ध करण्याशाठी सत्यकथेने उत्तम व्यासपीठ मिळवून दिले. विसाव्या शतकातील साहित्य चळवळीला उर्जा देण्याचे काम सत्यकथेने केले. सत्यकथेचा शेवटचा अंक ऑगस्ट १९८२ मध्ये प्रसिद्ध झाला.

*** ‘पारिजात’:–**

जानेवारी १९३४ मध्ये रघुवीर सामंत यांनी ‘परिजात’ हे वाङ्मयीन मासिक सुरू केले. अत्यंत अल्पजीवी असे हे मासिक फेब्रूवारी १९३५ मध्ये बंद झाले. वाङ्मयीन अभिरूची वाढविणे, आणि गंभीर समीक्षणात्मक लेखनाला प्रोत्साहन देणे असा पारिजातचा हेतू होता.

अवघे १४ अंक प्रकाशित झालेल्या ‘पारिजात’मध्ये कविता, समीक्षणात्मक लेख, वैचारिक लेखन, लघूकथा, लघूनिबंध, असे साहित्य प्रसिद्ध होत असे. भा.रा.तांबे, भवानी शंकर

पंडित, बा.भ.बोरकर अशा ख्यातनाम कवींच्या कविता 'पारिजात' मधून प्रसिद्ध झाल्या. 'तेथे कर माझे जुळती' ही बोरकरांची कविता १९३४ मध्ये खूपच गाजली.

कमलाबाई टिळक, शांताबाई नाशिककर, य.गो.जोशी यांच्या कथा 'पारिजात'मधून प्रसिद्ध झाल्या. शं.द. जावडेकर, लालजी पेंडसे, स.ह.मोडक,गो.म.सरदेसाई यांचे वैचारिक लेखन पारिजातने प्रसिद्ध केले. वाङ्मय विषयाबरोबरच राजकारण, समाजकारण, अर्थकारण या विषयांनाही 'पारिजात'मध्ये स्थान होते. ऑगस्ट १९३४ मध्ये कोल्हटकर विशेषांक 'पारिजात'ने काढला होता. त्यात ग.त्र्य.माडकोलकर, मा.दा.आलतेकर यांचे प्रदीर्घ लेख आहेत. 'वाङ्मय भक्तांची रोजनिशी','साहित्य मापन' अशा सदरांमधून वाङ्मयविषयक चर्चा घडवली जात असे.

'वाङ्मय भक्तांची रोजनिशी' या सदरामधून मराठी साहित्याची परंपरा, साहित्य विषयक प्रश्न, मराठी वाङ्मयातील तात्विक विचार या सर्वांची चर्चा केली जात असे. ग्रंथपरिक्षणाचे काम 'साहित्यमापन' या सदरद्वारे चालत असे. अल्पजीवी असले तरी 'पारिजात'ने विषय, आशय व अभिव्यक्तीच्या बाबत विविधता आणण्याचा सतत प्रयत्न केलेला दिसतो. वा.ल.कुलकर्णी सारख्या साक्षेपी समीक्षकाचे या मासिकास सहाय्य झाले. ''कॉलेजात विद्यार्थी असतानाच त्यांनी कुमार रघूवीर यांच्या 'पारिजात' मासिकातून समीक्षा लेखनास प्रारंभ केला. 'पारिजात'च्या स्थापनेत आणि संपादनातही त्यांचा वाटा होता.''[३६] 'पारिजात'चा शेवटचा अंक फेब्रुवारी १९३५ मध्ये निघाला.

*** 'मनोहर':-**

१९३४ मध्ये निघालेले 'मनोहर' हे वाङ्मयीन हेतूने प्रसिद्ध झालेले मासिक वाङ्मय जगतात मोलाचे भर घालणारे असे ठरले. 'मनोहर'चे आद्य संपादक शं.वा किर्लोस्कर होते. पुढे मु..श.किर्लोस्कर हे संपादकाचे काम करीत असत. किर्लोस्करांनी संपादित केलेल्या 'स्त्री' व 'मनोहर' या मासिकाच्या निर्मितीविषयी गंगाधर महाम्बरे सांगतात, ''अखिल जनतेशी किर्लोस्कर कारखान्याचा आणितेथे निर्माण होणाऱ्या उत्पादित मालाचा निकट परिचय करून देण्यासाठी आणि तो अधिकाधिक दृढ करण्यासाठी १९२० सालात 'किर्लोस्कर खबर' या नावाने एक सोळा पानी पत्रक शं.वा. किर्लोस्करांच्या संपादनाखाली प्रसिद्ध होऊ लागले. त्यानंतर काही वर्षातच

‘स्त्री’ १९३० आणि ‘मनोहर’ १९३४ साली किर्लोस्कर मासिकांची भावंडे प्रसिद्ध होऊ लागली. किर्लोस्कर मासिक ही अनेक वर्षे मराठी नियतकालिकातील मानदंड म्हणून ओळखली जात’’[३७]

*** ‘महानुभाव’:–**

१९३४ मध्ये औरंगाबादहून ‘महानुभाव’ हे मासिक निघू लागले. सध्याच्या मासिकाचे संपादक साहित्याचार्य संतोष मुनीशास्त्री कपाटे आहेत. या मासिकात महानुभाव साहित्य, अध्यात्मिक विषयक लेखन, महानुभाव संहिता व कविता असे विषय हाताळलेले दिसतात. ग्रंथपरिक्षण या सदरातून श्रीचक्रधर कथा परिमल, महानुभाव दर्शन, प्राचीन मराठी कविता, खंड ७ वा अशा अनेक पुस्तकांचा परिचय दिला आहे.

रमेश आवलगावकर यांचा ‘मराठी संत आणि समाजकार्य’, कन्हैया कुंदप यांचा ‘महानुभाव वाङ्मयाचा अभ्यास’, माणिक धनपलवार यांचा ‘धवलगीत एक विचार शोध’, पं.राजू पवार यांचा ‘अध्यात्म दर्शन’, विलास कुराणे यांचा ‘हे झाड चंदनाचे’ असे अनेक अभ्यासपूर्ण लेख ‘महानुभाव’ मधून प्रकाशित झाले आहेत.

*** ‘सह्याद्री’:–**

१९३५ मध्ये साहित्यकारणाला वाहिलेले ‘सह्याद्री’मासिक निघाले.

*** ‘ज्योत्सना’:–**

मुंबईहून मे १९३६ मध्ये ‘ज्योत्सना’ मासिक निघाले, पुढे ते १९४१ पर्यंत चालू होते. एकूण पाच वर्षे चाललेल्या ‘ज्योत्सना’मासिकाचे ध्येयवाक्य होते–‘जीवन व कला यांना वाहिलेले अभिनव मराठी मासिक’ ‘ज्योत्सना’चे संपादक वि.स.खांडेकर व स.सा.दौडकर होते.

‘ज्योत्सना’ने विविध वाङ्मय प्रकारावर चर्चा घडवून आणल्या. प्रचलित वाङ्मय विचारांचा आढावा घेऊन टीका मांडणारे ‘भाषाभगिनीसंसार’ ‘चांदण्यातील गप्पा’ मधून वाङ्मय विचार, तर ‘साहित्य समालोचन’ मधून पुस्तक परीक्षण अशी विविध साहित्यविचार मांडणारी सदरे ‘ज्योत्सना’ने रसिकांना दिली.

कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर, पु.शि.रेगे, कवी अनिल, वा.रा.कांत, ना.मा.संत, ना.घ.देशपांडे अशा अनेक साहित्यिकांनी ‘ज्योत्सना’मध्ये लेखन केले. खांडेकरांची ‘हिरवा चाफा’, विष्णू

आंबेकरांची ‘काळा ढग’ या कादंबऱ्याही क्रमशः ‘ज्योत्सना’ने प्रसिद्ध केल्या. आक्टोबर १९३७ मध्ये खास ‘नाट्यछटाकार दिवाकर’ असा अंक ‘ज्योत्सना’ ने प्रसिद्ध केला. ‘ज्योत्सना’चा शेवटचा अंक १९४१ मध्ये निघाला.

*** ‘ज्योति’:–**

जानेवारी १९४० मध्ये कुमार रघुवीर या टोपन नावाने रघुवीर सामंतांनी ‘ज्योति’ हे मासिक काढले. ‘ज्योति’ मासिकही ‘पारिजात’ प्रमाणे अल्पजीवी ठरले. फेब्रुवारी १९४१ मध्ये ते बंद पडले. पारिजात मधून येणारे ‘वाङ्मयभक्तांची रोजनिशी’, ‘साहित्यमापन’ ही सदरेही ‘ज्योति’मधून प्रसिद्ध होते. फेब्रुवारी १९४१ मध्ये ‘ज्योति’चा शेवटचा अंक निघाला.

*** ‘समीक्षक’:–**

एप्रिल १९४० मध्ये मुंबईहून पाक्षिकांच्या रूपात ‘समीक्षक’ प्रसिद्ध झाले. त्याचे संपादक ग.दे.खानोलकर, दि.वि.आमोणकर हे होते. सप्टेंबर १९४१ मध्ये ‘समीक्षक’ पाक्षिकाचे मासिक झाले. या मासिकाचे संपादक दि.वि.आमोणकर, वा.ल.कुलकर्णी होते. १९४०–१९४७ असा ‘समीक्षक’ मासिकाचा कालखंड होता.

‘राष्ट्रीय जीवनातील व्यापक घडामोडी आणि साहित्य व शिक्षण क्षेत्रातील चळवळी यांचे समीक्षण करणे आणि साहित्यिक चळवळी  नवसाहित्य प्रकाशन यावर भर देणे’ असे ध्येय ‘समीक्षक’ चे होते.

समीक्षत्माक लेखन, ललित लेखन, वाङ्मयतत्त्वविचार, पारिंपारिक वाङ्मय व परंपरेला झुगारणारे नवसाहित्य या सर्व प्रकारच्या लेखनाला ‘समीक्षक’ ने स्थान दिले. यशवंत, अनिल, श्रीकृष्ण पोवळे, इंदिरा संत, निकुंब अशा कवींच्या कवितांना प्रसिद्धी दिली. ना.सी.फडके, खांडेकर, माडखोलकर, य.गो.जोशी, माधव मनोहर, श्री.ना.पेंडसे इत्यादी जुन्या नव्या कथाकारांच्या कथांना ‘समीक्षक’ने प्रसिद्धी दिली. कुसुमावती देशपांडे, ना.मा.संत, यांचे लघूनिबंध ‘समीक्षक’ मधून प्रकाशित झाले. नवीन लेखकांना अनुकूल वातावरण ‘समीक्षक’ ने निर्माण केले. या मासिकासाठी वा.ल.कुलकर्णी यांनी पुढील प्रमाणे मदत केली. ‘‘१९४० च्या सुमारास ‘समीक्षक’ मासिकाच्या संपादकत्वाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. त्यातून

‘वाङ्मयातील वादस्थळे’ या नावाचे सदर चालविले.’’[३८]

*** ‘अभिरूची ’:–**

फेब्रुवारी १९४३ मध्ये ‘अभिरूची’ हे मासिक सुरू झाले ते १९५२ मध्ये बंद पडून पुन्हा १९६६ फेब्रुवारी ते १९७४ असे मासिकाचे अंक निघाले. बडोद्याहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘अभिरूची’ चे संपादक विमला चित्रे, मंगेश राजाध्यक्ष, पुरूषोत्तम चित्रे होते.

उच्च अभिरूचीचे काव्य, कथा, टीका इत्यादी नवे साहित्य सादर करणे हे ‘अभिरूची’चे ध्येय होते. कथा, कविता, टीकालेख, ललित निबंध, नाटिका, विनोदी लेखन या वाङ्मय प्रकारांना गती देण्याचे काम ‘अभिरूची’ ने केले. प्रसन्न कुमार पाटील, अशोक बंडखळे, अंजली खरे, वसंत पाटणकर, पु.शि.रेगे अशा नव्या कविंची कविता वाचकांपर्यंत ‘अभिरूची’ ने पोचविली. शैला बेल्ले, दिलीप जगताप, भास्कर कुलकर्णी अशा नव्या कथाकारांची कथा ‘अभिरूची’ मधून प्रसिद्ध होत असे.

आ.रा.देशपांडे, शरच्चंद्र मुक्तिबोध, ना.ग.जोशी, गंगाधर गाडगीळ, वा.ल.कुलकर्णी यांच्या तात्त्विक समीक्ष लेखनाने ‘अभिरूची’ च्या वाङ्मय विचारात मोलाची भर घातली. ‘अस्तित्ववाद’ अतियथार्थ वादाची दखल ‘अभिरूची’ च्या लेखात घेतली आहे. ‘संपूर्ण अस्तित्ववाद’ असा विशेषांकही काढला होता. ‘नवे साहित्य’ या सदरातून विविध पुस्तकांचे परीक्षण केले जात असे.

साहित्य विचाराकडे निकोपदृष्टीने पाहून, प्रयोगात्मक लेखनाला प्रसिद्धी देण्याचे मौल्यवान कार्य ‘अभिरूची’ ने केले.

*** ‘युगवाणी ’:–**

विदर्भात नियतकालिकांची वाण प्रारंभापासूनच आहे. वऱ्हाड शालापत्रक आणि वागीश्वरी ही मासिके काही काळ चालली. ‘सुषमा’ हे ललित मासिकही बंद पडले. इ.स. १९४४ साली विदर्भ साहित्य संघाचे पुनरूज्जीवन झाले. आणि विदर्भ साहित्य संघातर्फे ‘युगवाणी’ संघाचे मुखपत्र सुरू झाले. श्री.वा.ना.देशपांडे पहिले संपादक होते. इ.स. १९४६ मध्ये ‘युगवाणी’ मासिकाचा उदय झाला. पहिल्या अंकाच्या संपादकीयात ‘मराठी भाषा व मराठी साहित्य‘ यांची अभिवृद्धी करण्यासाठी मासिकाचा उदय झाल्याचा हेतू सांगितला.

प्रसिद्ध कवींच्या कवितांना ‘युगवाणी’त प्राधान्य मिळाले. एकेक कविना न छापता कवितांचे गुच्छ ‘युगवाणीत’ प्रकाशित होत असत. आचार्य काका कालेलकरांचा ‘नवनिर्मिती’ आणि ‘टीकाकारवृत्ती’ हा समीक्षात्मक लेख, श्रीपाद जोशी यांचा ‘गांधीवादी वाङ्मय’. मा.गो.देशमुख यांचा मराठी साहित्यशास्त्रावर भर देणारी लेख विशेष गाजला. ‘दृकश्राव्य’, ‘गतकालीन’, ‘साहित्यिकांची आत्मकथा’ अशा विविध स्तरातून ‘युगवाणी’ ने आपल्या अंकात वैविध्य आणले.

‘साहित्यिकांची आत्मकथा’ मध्ये प्रसिद्ध साहित्यिकांनी त्यांच्या लेखनासंबंधीचे विचार मांडले आहेत. वि.वा.शिरवाडकरांच्या साहित्यावर तसेच कथेवर ‘युगवाणी’ ने भर दिलेला आहे. ‘श्री ज्ञानेश्वर विशेषांक’, श्री.म.माटे जन्मशदाब्दी विशेषांक, बालगंधर्व जन्मशताब्दी विशेषांक याशिाय फक्त महिलांनी लिहिलेला विशेषांक फेब्रुवारी–मार्च १९७६ ‘युगवाणी’ने काढला. संशोधन कथा, कथा, नाट्य या वाङ्मय प्रकाराव ‘युगवाणी’ ने निरलसपणे प्रेम केले. विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकांचा व्यक्तिपरिचय ‘युगवाणी’त नियमितपणे देण्याची प्रथा संपादकांनी कटाक्षाने पाळली.

*** ‘हंस ’:–**

‘हंस’ हे मराठीतील प्रसिद्ध मासिक होय. त्याच्या निर्मितीविषयी श्रीमती हेमालता अंतरकर म्हणतात, ‘‘हंसचा जन्म झाला,तो केवळ एक ‘छंद’ म्हणून नव्हे किंवा मालकीच्या छापखान्याला काम पुरविण्याची गरज म्हणूनही नव्हे. सर्वांग सुंदर आणि अभिरूची संपन्न असे मासिक काढण्याचा ध्यास घेतलेल्या एका ध्येयवादी संपादकाचे ‘हंस’ हे अपत्य होय.’’ कै. अनंत बाळकृष्ण अंतरकर ह्या अनुभवी संपादकांनी इ.स. १९४६ मध्ये स्वत:चे कथाप्रधान मासिक सुरू केले.

नवनाट्य, नवकाव्य, नवकथा, नवकादंबरी, नवचरित्र, नवसमीक्षा, विनोदी एकांकिका, वैचारिक लेख, मनोरंजनपर लेख असे ‘हंस’ चे रूप आहे. तसचे गूढकथा, परीकथा, नीतिकथा, लोककथा, रहस्यकथा, भयकथा, व्यंगकथा, विनोदीकथा, हेरकथा, युद्धकथा, साहसकथा, प्रेमकथा, विज्ञानकथा इत्यादी विविध कथाप्रकार मराठीत रूजविले. ‘हंस’ चे स्वरूप अत्यंत

विलोभनीय आणि सौंदर्यसंपन्न होते.

पु.ल.देशपांडे, द.मा.मिरासदार, जयवंत दळवी, अशा विनोदी साहित्यिकांचे साहित्य 'हंस' मधून प्रसिद्ध झाले. नवकथा व कथाकारांना आपले नवअविष्कार प्रगट करण्यास 'हंस' ने संधी दिली. गंगाधर गाडगीळ, बी.रघूनाथ, शांताराम अशा कथाकारांनी आपापल्या कथा प्रसिद्ध केल्या. 'चव्हाटा', 'वाचा आणि लिहा', 'संपादक हंस यांस' अशा सदरांमधून लेखक वाचकांच्या 'प्रतिक्रिया' व्यक्त होत असत, तर 'माझे कथालेखन' या लेखमालेतून प्रभाकर पाध्ये, ग.ल.ठोकळ, वसुंधरा पटवर्धन, वि.स.खांडेकर, वि.वि.बोकील, अशा कथाकारांनी आपल्या आत्मनिवेदनात्मक लेखनातून नवकथा लेखकांना मार्गदर्शन केले. आपल्या वाङ्मयाच्या माध्यमातून समाज चिंतनाचे कार्य 'हंस' ने केले. मराठी कथावाङ्मयास वाहिलेल्या 'हंस' चे वाङ्मयीन योगदान महत्त्वाचे आहे.

*** 'साहित्य':–**

'साहित्य' हे द्वैमासिक जानेवारी १९४७ ला वा.रा.ढवळे यांनी सुरू केले. मुंबई मराठी साहित्य संघाचे ते मुखपत्र होते. नाविन्यपूर्ण, आशयगर्भ साहित्यिक विचार 'साहित्य' ने मांडले. यशवंत, य.द.भावे, विं.दा.करंदीकर, इंदिरा संत अशा अनेक कवींच्या कविता 'साहित्य'ने प्रसिद्ध केल्या. वि.स.खांडेकर, गुर्जर, काणेकर, गाडगीळ, सदानंद रेगे, ना.व्यं.देशपांडे, अरविंद गोखले अशा नव्या–जुन्या कथाकारांच्या कथा 'साहित्य' ने प्रकाशित केल्या. ललित निबंध, प्रवासवर्णन, संगीतिका, सुखामिका, रसव्यवस्थेशी निगडीत विविध प्रश्नांवर चर्चा करणारे लेख असे वाङ्मय प्रकार 'साहित्य' मधून प्रसिद्ध झाले.

ना.बा.पराडकर, दि.के.बेडेकर, रमेश तेंडुलकर अशा समीक्षकांनी समीक्षात्मक लेखन 'साहित्य' मध्ये केले. 'साहित्यविचार' या सदरामधून तात्कालीन वाङ्मयीन घडामोडींची दखल घेतली आहे. 'साहित्य' ने नवीन लेखकांना शोधून नवनिर्माण क्षमतेला प्रोत्साहन दिले.

*** 'साधना':–**

जून १९४७ मध्ये साने गुरूजींनी 'साधना' हे वाङ्मयीन व वैचारिक साप्ताहिक सुरू केले. नरेंद्र दाभोळकर हे संपादक होते. मंगेश पाडगावकरांपासून रेणू पाचपोरे इत्यादी कवींच्या

कविता ‘साधना’ मध्ये प्रसिद्ध झाल्या. राजन खान, प्रतिभा जोशी इत्यादींच्या कथा ‘साधना’ मध्ये प्रकाशित झाल्या. तसेच अरूण टिकेकर, मारूती चितमपल्ली यांचे ललित लेखन तर ग.प्र.प्रधान, हेमंत देसाई यांचे वैचारिक स्वरूपाचे लेख ‘साधना’ ने प्रसिद्ध केले. ‘साहित्य परिचय’ या सदरामध्ये विविध पुस्तकांचा परिचय करून दिला जातो. ‘महाराष्ट्राचे शिल्पकार’ या मु.ब.शहा यांच्या पुस्तकाचे यदुनाथ थत्ते यांनी समीक्षण केले आहे. तसेच ‘बोल अनुभवाचे’ हे मोहन धारिया यांच्या पुस्तकाचाअनिल बलेळ यांनी परिचय करून दिला आहे. वैचारिक, सामाजिक व साहित्यिक असा त्रिवेणी संगम ‘साधना’ मधून रसिक वाचकांना घडतो.

अनिल बलेळ यांनी ‘साहित्य कल्लोळ’, आनंद नाडकर्णी यांनी ‘नाट्य परीक्षणे’, प्रभाकर पाध्ये यांची ‘असेही विद्‌वान’ अशी विविध सदरे ‘साधना’ मधून गाजलेली आहेत.

‘साधना’ ने सामाजिक विषयांवर आधारित काही विशेषांक काढले, तर काही व्यक्तिविशेषांक काढले, २६ जानेवारी १९७० मध्ये ‘सामान्य जन विशेषांक’, २ आक्टोबर मध्ये ‘महात्मा गांधी विशेषांक’. १५ ऑगस्ट १९७४ मध्ये ‘छ. शाहू महाराज विशेषांक’, ३० जानेवारी १९७३ मध्ये ‘अच्युतराव पटवर्धन स्मृती विशेषांक’, खास युवकांसाठी १५ ऑगस्टमध्ये ‘युवा अभिव्यक्ती विशेषांक’, १५ जून २००५ मध्ये ‘वंचितांचे शिक्षण’ असे अनेक दर्जेदार विशेषांक ‘साधना’ने वाचकांना उपलब्ध करून दिले.

‘साधना’ चे हिरक महोत्सवी वर्ष १५ ऑगस्य २००८ पासून साजरे करण्यास हिरक महोत्सवी वर्षाच्या आरंभी व समाप्तीच्या वेळी दोन विशेषांक प्रसिद्ध केले. त्यातील पहिला ‘क्रांतीच्या मार्गावर’ या विशेषांकात साने गुरूजींनी १९४२ च्या ‘चलेजाव चळवळी’ त भूमिगत कार्यकर्त्यांना जी बुलेटिन्स लिहिली होती याचा समावेश आहे. त्या अंकातून स्वातंत्र्य व समतेचे आग्रही गुरूंच्या जहाल भाषेचे दर्शन होते. दुसरा विशेषांक हा ‘तत्त्वप्रणारी व अंमलबजावणी– सामर्थ्य व मर्यादा’ हा प्रकाशित झाला. या अंकात स्वातंत्र्योत्तर बलशाली भारत घडविण्यात साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, हिंदुत्ववाद या तत्त्वप्रणाल्यांचा विकास व प्रवास कसा झाला यावर प्रकाश टाकलेला दिसतो. १५ ऑगस्ट २००९ या समाप्तीच्या विशेषांकात ‘भारताचे शेजारी’, ‘अस्थिर राजनीती’, ‘अस्वस्थ समाज’, व ‘भारतातील प्रादेकि पक्ष’ असे वेगळ्या

विषयांना स्पर्श करणारे अंक 'साधना' ने काढले आहेत.

*** 'प्रसाद':-**

संपादक य.गो.जोशी यांनी ऑगस्ट १९४७ मध्ये पुणे येथून 'प्रसाद' हे आध्यात्मिक वाङ्मयीन असे मासिक सुरू केले. सध्या 'प्रसाद' चे संपादक म.य.जोशी आहेत.

अध्यात्म, संतवाङ्मय, साहित्याचे समालोचन, कथा, लोकगीते, कविता अशा विविध विषयांना 'प्रसाद' मध्ये स्थान मिळाले. 'कानफाट्या' ही न.दि. दांडेकर यांची, 'दरिताला देव' ही पां.सी.परांजपे यांची अशा विविध कथा 'प्रसाद' ने प्रसिद्ध केल्या. 'आजकालची साहित्यसृष्टी', 'संतवाङ्मय आणि आपण' कमला पालकर, 'बाणभट्टकालीन समाजस्थिती' 'बाळासाहेब खापडे', 'मराठी संतांची शिकवण', 'संत चोखामेळा', 'मराठीतील आध्यात्मिक शाहिरी कलगीतुरा-शिवाजीराव चव्हाण' असे विविध लेख 'प्रसाद' मध्ये प्रसिद्ध झाले. शिवाजी सावंत यांची ''पाखर , मधुकर कुलकणी यांची 'कशासाठी' अशा कविताही प्रसिद्ध झाल्या. 'उपनिषदांचा अभ्यास', 'सुबोध ज्ञानेश्वरी' सोनपंत दांडेकरांचे 'अभंग संकीर्तन' अशा संत साहित्याशी निगडीत लेखांतून आध्यात्मिक जाणीव वाचकांना 'प्रसाद' ने घडवली. पुस्तक परीक्षण या सदरातून आध्यात्मिक ग्रंथ, श्री अक्कलकोट स्वामी महाराज , भगिनी निवेदिता अशा पुस्तकांचे परीक्षण केले आहे.

*** 'नवभारत':-**

अर्वाचीन महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात वैचारिक जडणघडण करण्याच्या कार्यात 'नवभारत' चे कार्य महत्त्वपूर्ण आहे. विविध ज्ञानक्षेत्रातील व्यासंगपूर्ण साहित्याला नवभारत मासिकात मानाचे स्थान आहे. इ.स. १९४७ मध्ये २ आक्टोबर मध्ये 'नवभारत' चा पहिला अंक निघाला. त्यावेळी मासिकाचे संचालक शंकरराव देव होते. संपादक मंडळात आचार्य शं.द.जावडेकर, आचार्य स.ज. भागवत, श्री. हरी कृष्ण मोहनी आणि प्रा.वि.म.बेडेकर होते. 'नवभारत' ह्या पहिल्याच अंकात संचालकांनी मनोगतात म्हटले होते की, 'हबुजन हिताय बहुजन सुखाय,' अशा जीवनात जे सत्य, शिव व सुंदर आहे. त्याला प्रकाशित व प्रगट करून, त्याचा साक्षात्कार करून घेण्याला महाराष्ट्रातील स्त्री-पुरुषांना मदत करणे, हे 'नवभारत'चे कार्य

आहे.'' नवभारत विषयी वसंत स. जोशी लिहितात, ''स्वातंत्र्योत्तर भारताची पुनर्रचना करताना नव्या पिढीचा वैचारिक पिंड घडविण्याची आवश्यकता होती. ते कार्य नवभारत ने केले आहे...... नवभारत मासिक हे आज महाराष्ट्रातील एक वैचारिक व्यासपीठ बनले आहे.'' [३९]

'नवभारत'च्या मासिकातून प्रसिद्ध होणाऱ्या लेखनात वैचारिक साहित्याबरोबच राजकारण, ललित साहित्य, अर्थकारण, इतिहास अशा विविध विषयांना स्थान मिळालेले आहे. कविता; प्राचीन–अर्वाचीन मराठी साहित्याचा विचार, समीक्षा, पुस्तक परीक्षणे साहित्य संशोधन अशा बहुविध साहित्यिक विषयांना 'नवभारत' ने प्रसिद्धी दिली आहे. 'नवभारत'ने सुरूवातीपासूनच आजपर्यंत पहिल्या अंकात मांडलेल्या भूमिकेप्रमाणेच वाटचाल केली आहे. 'नवभारत' च्या तपस्येविषयी वसंत स. जोशी म्हणतात, ''नवभारत च्या पहिल्या दहा वर्षात कथा, कविता, ललित साहित्याला आवर्जून स्थान देण्यात येत होते, परंतु अकराव्या वर्षापासून ही प्रथा बंद करण्याती आली आणि केवळ वैचारिक साहित्यालाच त्यात अवसर मिळू लागला. तथापि या दहावर्षातही साहित्य क्षेत्रातील अनेक सामाजिक उपक्रमांना व त्यावरील चर्चेला नवभारत ने स्थान व प्रोत्साहन दिले. नवसाहित्याच्या क्षेत्रात पुढे महत्त्वाचे स्थान मिळविलेल्या कवींनी, कथाकारांनी या काळात नवभारत मध्ये लेखन केले आहे.''[४०]

*** 'स्वातंत्र्योत्तर कालखंड':–**

*** 'मोहिनी':–**

१९४९ मध्ये 'मोहिनी' हे विनोदी वाङ्मयाला प्राधान देणारे मासिक सुरू झाले. अनंत अंतरकर हे मोहिनीचे संपादक. विनोदी गोष्टी, विनोदी लेख, विनोदी नाटिका, क्रीडा घटना, चित्रपट सृष्टीशी संबंधित लेख, हास्यचित्रे, असे बहुरंगी रूप 'मोहिनी' चे आहे. जयवंत दळवी, सुभाष भेंडे, पु.भा.भावे, अनंत मनोहर, वसंत सरवटे, वसंत गाडगीळ अशा मान्यवर लेखकांनी 'मोहिनी' त लेखन केले आहे.

'गर्दीतली सुंदरी', व.पु.काळे, 'देवाची करणी,', रा.रं बोराडे, 'दोन्ही घरचा पाहुणा', वसंत गाडगीळ अशा अनेक लेखकांच्या विनोदी गोष्टी 'मोहिनी'तून प्रसिद्ध झाल्या. पु.रा.बेहेरे यांचा 'छत्रीचा उपयोग', इंद्रायणी सावकार यांची 'एरंडेल पहावे पाजून' ही विनोदी नाटिकाही

'मोहिनी' तील विनोदी साहित्याची प्रातिनिधिक उदाहरणे म्हणता येतील.

*** 'प्रतिष्ठान':-**

१९५१ मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्र म्हणून 'प्रतिष्ठान' डॉ. नारायणराव नांदापूरकर यांनी संपादित केले. 'प्रतिष्ठान'च्या निर्मिती विषयी श्री. गो.मा.पवार म्हणतात, ''हैद्राबाद संस्थानच्या निझामी राजवटीत मराठी व इतर देशी भाषांची विलक्षण गळचेपी झाली. पोलीस ॲक्शननंतर हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले. या भागात बोलल्या जाणाऱ्या मराठी, कानडी, तेलुगु आदी भाषांना सोसावा लागलेला छळ संपुष्टात आला. उर्दू भाषेचे व उर्दू भाषिक राजवटीचे जोखड झुगारून देऊन, मराठी भाषिकांची ही वाङ्मयीन संस्था नव्या उभारीने कार्य करू लागली.''

नव साहित्यिकांचे स्वागत मराठवाड्यातील 'प्रतिष्ठान' ने केले. ना.धो. महानोर,राजा मुकूंद, गजमल माळी, फ.मु.शिंदे, चंद्रकांत पाटील, निरंजर उजगरे, जगदिश कदम अशा अनेक कवींनी आपल्या कविता प्रसिद्ध करण्यास 'प्रतिष्ठान' ने वाव दिला.

'प्रतिष्ठान'च्या कादंबरी विशेषांकात 'गारंबीचा बापू' या श्री.ना.पेंडसे यांच्या कादंबरीवर गो.मा. पवार यांनी अतिशय सखोल व मार्मिक विवेचन केलेले आहे. दत्ता भगत यांचा 'मराठी नाटक १९७५ ते २०००' हा नाट्यविषयीचा लेखही प्रसिद्ध आहे. 'प्रतिष्ठान' ने दर्जेदार कथांनाही स्थान दिले. रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, प्रकाश कामतीकर, भास्कर चंदनशिव अशा प्रसिद्ध कथाकारांच्या कथा 'प्रतिष्ठान'मधून प्रकाशित झाल्या. वा.ल.कुलकर्णी, सुधीर रसाळ, नरहर कुरूंदकर, गो.ग. कुलकर्णी, उषा हस्तक, अशा मान्यवर समीक्षकांचे समीक्षा लेखन 'प्रतिष्ठान'मध्ये प्रसिद्ध झाले.

१९६५ साली वा.ल.कुलकर्णी यांच्या समीक्षेचा विचार करणारा विशेषांक, १९६६ साली 'केशवसुत जन्मशताब्दी' निमित्ताने 'मराठी कविता आणि आजचे कवी' व विशेषांक १९७१ मध्ये 'नामदेव विशेषांक' असे विशेषांक ही 'प्रतिष्ठान' ने काढले. पुस्तक परीक्षणे व 'स्वागत' या सदरातून विविध वाङ्मयपर पुस्तकांची ओळख 'प्रतिष्ठान' ने वाचकांना करून दिली.

*** 'मराठी संशोधन प्रत्रिका' :–**

मुंबई मराठी संशोधन मंडळाची दिनांक १ फेब्रुवारी १९४९ रोजी स्थापना झाली. मराठी साहित्याच्या संशोधनासाठी निर्माण झालेली महाराष्ट्रातली ही पहिली संस्था होय. या संस्थेने इ. स. १९५३ साली ऑक्टोबर मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर 'मराठी संशोधन पत्रिका' हे त्रैमासिक सुरु केले. मराठी साहित्याच्या संशोधनाला वाहिलेले हे पहिले नियतकालिक मानले जाते. मराठी साहित्य आणि मराठी भाषा ह्या दोन्ही क्षेत्रात पत्रिकेने संशोधनाचे भरीव कार्य केलेले आहे.

'संशोधन पत्रिके'चे पहिले संपादक श्री. अ. का. प्रियोळकर होते. संपादकाची भूमिका अनेक विद्वानांनी पार पाडली. मराठी भाषेतील विविध महत्वाच्या विषयांवर पत्रिकेने लेखन प्रसिद्ध केले. प्राचीन, अर्वाचीन वाङ्मय, समीक्षा, संशोधनपर लेख प्रकाशित केले. अप्रसिद्ध वाङ्मय प्रकाशित करणे, दुर्मिळ वाङ्मय पुनर्मुद्रित करणे, विविध भाषाविषयक, वाङ्मयीन संशोधन वाचकांना सादर करणे, संशोधनास उपयुक्त ठरणारे सूचि साहित्य तयार करणे, संशोधनाविषयी शास्त्रीय ज्ञान देणे, इत्यादी महत्वाची कार्ये सातत्याने करण्याचे वृत्त संशोधन पत्रिकेने स्वीकारलेले आहे. पत्रिकेचे संशोधन क्षेत्रातील कार्य महत्वाचे असून, संशोधकांना मार्गदर्शक आहे.

स. ग. मालशे, रा. चि. ढेरे, सु. रा. चुनेकर, म. वा. धोंड अशा अनेक विद्ववान संशोधक व्यक्तींचे लेकन पत्रिकेतून प्रसिद्ध करण्यात आले आहे. 'सूची साहित्य', संशोधनाला उपयुक्त लेखनसूची तयार करुन ती प्रसिद्ध करण्याचे काम मराठी संशोधन पत्रिकेने केले आहे.

*** 'छंद' :–**

सप्टेंबर १९५४ मध्ये मुंबईहून सरिता रेगे यांनी साहित्य, कला, भाषा, संस्कृती या विषयाला अनुसरुन 'छंद' हे मासिक काढले. १९६० मध्ये 'छंद' बंद पडले. एकूण सहा वर्षे 'छंद' चालू होते. या काळात नवीन लेखकांच्या लेखनाला वाव देणे, वाङ्मयातील प्रभावी विचार सरणीचा आढावा घेणे, वाङ्मय विवेचनात्मक लेखांचे अनुवाद प्रकाशित करणे, असा उद्देश समोर ठेवून 'छंद' ची वाटचाल चालू होती. हिंदी, उर्दू, युरोपीय कथांचे अनुवाद, पुस्तकांचे परीक्षण, साहित्य, कला, भाषा व संस्कृतीविषयक प्रश्नांवर लेखन अशा विविध अंगाने 'छंद' ची मांडणी

केली होती.

मराठी वाचकांच्या अभिरुचीस वेगळे वळण देऊन काही सकस व दर्जेदार साहित्य देण्याचा व एकंदर ललित कृतीकडे पाहण्याचा नवाच दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न 'छंद'ने या हैमासिकाने केला. नव्या लेखकांना उत्तेजन देणे, त्यांना दिशा दाखविणे, त्यांच्या कृतींचे मूल्यमापन करणे, वाङ्मयीन प्रश्नांची चर्चा करणे, इत्यादी हेतूनी पु. शि. रेगे यांच्या नेतृत्वाने सन १९५४ मध्ये 'छंद' सुरु झाले. वा. ल. कुलकर्णी, गं. ब. ग्रामोपाध्ये, द. ग. गोडसे, रा. भि. जोशी इत्यादी त्यांचे सहकारी होते. अरविंद मंगरुळकर, वामनराव देशपांडे, स. ह. देशपांडे, चैतन्य देसाई इत्यादींनी हेतूंनी पु. शि. रेगे यांच्या नेतृत्वाने सन १९५४ मध्ये 'छंद' सुरु झाले. वा. ल. कुलकणी, गं. ब. ग्रामोपाध्ये, द. ग. गोडसे, रा. भि. जोशी इत्यादी त्यांचे सहकारी होते. अरविंद मंगरुळकर, वामनराव देशपांडे, स. ह. देशपांडे , चैतन्य देसाई इत्यादींनी संगीतावर लिहिले. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या 'स्पंदकारिका' हा शैवागमातील प्राचीन ग्रंथ 'छंद' मध्ये क्रमशः प्रसिद्ध झाला. फडके, वरेरकर इत्यादींच्या ललित कृतींची समीक्षा या द्वैमासिकाने केला.

*** 'पंचधारा'** :–

'पंचधारा' हे त्रैमासिक हैद्राबाद येथील आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषद या संस्थेचे मुखपत्र म्हणून १९५८ मध्ये सुरु झाले. 'पंचधारा' ने कन्नड, तामिळ, तेलगु, उर्दू साहित्याचा परिचय करुन देत असताना मराठी वाङ्मयातील ललित वैचारिक लेखनाची ओळख वाचकांना करुन दिली. विविध भाषांतील ललित कृती व वैचारिक लेखनाचे अनुवाद 'पंचधारा' करते. 'पत्थराचा राजपूत्र' 'कथा ही मोर मयूराची' या मराठीतील कथा उर्दू कथेचे अनुवाद आहेत.

'रंगभूमी विशेषांक', 'भारतीय साहित्य संकल्पना विशेषांक', 'वि. वा. मिराशी विशेषांक', 'मुक्तिबोध विशेषांक', 'उत्तर आधुनिकता वाद विशेषांक' असे साहित्यांशी निगडीत तसेच अनेक व्यक्तींवर 'पंचधारा'ने विशेषांक काढले.

'पंचधारा' मध्ये मध्ययुगीन साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे. तसा समकालीन वाङ्मयीन प्रश्नांचाही ऊहापोह केलेला आहे. 'काव्यपूर्व आणि उगवतीचे रंग', मराठी कथा कालची व आजची स्त्री, 'साहित्याचा मागोवा', 'जोहड' अशा पुस्तकांचे ग्रंथ परिक्षण,

बंगाली कांदबरीचे मराठी अनुवाद ‘पंचधारा’ मध्ये आहेत. हैद्राबादसारख्या अमराठी प्रांतातून मराठी वाङ्मयाची परंपरा ‘पंचधारा’ जिव्हाळ्याने जोपासते आहे.

*** ‘इंद्रायणी’ :–**

नोव्हेंबर १९६२ ते १९६४ या कालावधीत रा. चि. ढेरे यांनी संत वाङ्मयाच्या प्रेरणेतून ‘इंद्रायणी’ हे नियतकालिक काढले. इतिहास, संस्कृती, कला, विज्ञान, शिक्षण, सामाजिक जीवन अशा विविध अंगांनी ‘इंद्रायणी’ मध्ये लेखन येत असे.

मुख्यत: संत संदेश देणारे मासिक असा ‘इंद्रायणी’चा उल्लेख करता येईल. संतांची चरित्रे, संतांचे वाङ्मय सामान्य वाचकांपर्यंत पोचवून त्यांची आध्यात्मिक भूक भागविण्याचे मौल्यवान कार्य ‘इंद्रायणी’ने आपल्या अल्पशा कारकीर्दीत केले.

*** ‘आलोचना’ :–**

साहित्याच्या आलोचनेसाठी निर्माण झालेल्या ‘आलोचना’ मासिकाचा पहिला अंक सप्टेंबर १९६२ मध्ये प्रसिद्ध झाला. मासिकाच्या प्रारंभ काळातील अंकातून अनेक अखिल भारतीय संपन्न भाषातील कवितांचा व कथांचा अनुवाद देण्यात आलेला आहे. प्रा. सदानंद रेगे यांनी ती कामगिरी पार पाडली. पुढील काळात हा प्रयत्न बंद होऊन आलोचनेचे स्वरुप शुद्ध वाङ्मयीन आलोचनेसाठीच ठेवण्याचा प्रयत्न केला.

‘आलोचना’मधून केशवसुत, ह. ना. आपटे, कुसुमाग्रज, बा. सी. मर्ढेकर इत्यादी मान्यवर साहित्यिकांच्या वाङ्मयीन कामगिरीचे स्वरुप अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्याच्या स्वरुपाची, वाङ्मय प्रकारांची अधिक मूलगामी, सर्वकष चर्चा व्हाव्या, या हेतूने, गीतिकाव्य, शोकसंवेदनात्मक नाटक, सुखात्मिक इत्यादी विषयांवर विशेषांक काढले. वाङ्मयाच्या सैद्धांतिक संकल्पना सुस्पष्ट व्हावा म्हणून ‘साहित्य : स्वरुप व समीक्षा’ विशेषांक काढला. ‘आलोचने’ चा काळ हा विविध वाङ्मयीन रुपांची सखोल जाण करुन घेण्याचा काळ होता. ‘आलोचने’तून जवळ जवळ सर्वच प्रमुख वाङ्मय प्रकारांची सखोल चर्चा घडवून आणलेली आहे.

‘आलोचने’तील रसिकतेचा ‘कल’ अभिजाततेकडे आहे. आलोचनेने रसिकतेला मदत

केली. समकालीन विविध प्रवृत्तींबद्दल आस्था बाळगून, त्यांचे ज्ञान रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले. लेखकांच्या साहित्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले. 'आलोचने'चे आलोचनात्मक वाङ्मयीन क्षेत्रातले कार्य अत्यंत मौलिक स्वरुपाचे आहे. मराठी वाङ्मयात 'आलोचना आणि समीक्षा' असे समीकरणच निर्माण झालेले आहे. मराठी समीक्षेला योग्य दिशेने योग्य प्रकारे वळण लावण्याचे काम आलोचनेने केलेले आहे. व्याख्यानमाला, समीक्षणे, विविध वाङ्मयप्रकारांवर चिकित्सक लेखन, वाङ्मयीन टिपणे, कथा, कविता, पुस्तक परीक्षणे, नाट्यसमीक्षा, एकांकिका अशा भरगच्च समीक्षात्मक रुपात 'आलोचना' मराठी रसिकांपर्यंत गेली.

*** 'मांडवी' :-**

जानेवारी १९६३ मध्ये गोव्यातील 'अस्नोडा' मधून निघणारे एकमेव मराठी मासिक म्हणून 'मांडवी' ची ओळख सांगता येते. 'मांडवी' चे संपादक श्रीराम पांडुरंग कामत यांनी 'मांडवी' मधून कला, साहित्य व राजकारण यांची सांगड घातली.

सरिता पदकी, मधुकर केचे, अरविंद कुलकर्णी अशा अनेक कवींच्या कवितांना 'मांडवी' ने प्रकाशित केले. 'प्रवास माझा गोमंतकाचा' हा गोपाळकृष्ण भोबे यांचा प्रवासवर्णन करणारा लेख तसेच पं. महादेवशास्त्री जोशी यांचा 'भारतदर्शन' या लेखमालेने वाचकांना सुखद भ्रमंती घडविली.

पु. रा. बेहरे यांचा गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचा ऐतिहासिक आढावा घेणारा लेख, तसेच सु. रा. चुनेकर यांच्या लेखातून कुसुमाग्रजांच्या वाङ्मयाचे उत्कृष्ट विवेचन आलेले आहे. आपल्या अल्पशा काळात गोमंतकातील लोकांचे जिव्हाळ्याचे प्रश्न व साहित्याची सांगड 'मांडवी'तून १९६९ पर्यंत संपादकांनी घातली आहे.

*** 'ललित' :-**

सन १९६४ पासून केवळ वाङ्मय-प्रसाराला राहिलेले एक हलके-फुलके, पण चटकदार व प्रतिष्ठित मासिक 'ललित' या नावाने प्रसिद्ध होत आहे. पुरुषोत्तम धाक्रस, जयवंत दळवी, शंकर सारडा, केशव कोठावळे, प्र. ना. परांजपे इत्यादींनी या मासिकाची संपादकीय बाजू सावरली. 'ठणठणपाळ' यांचे 'घटका गेली पळे गेली' हे खुमासदार सदर अतिशय लोकप्रिय

झाले. अनेक वाङ्मयीन घडामोडींचा व साहित्यिकांच्या भाषणांचा मोठ्या मिस्किलपणाने यात परामर्श घेतला. अनेक नवी सदरे या मासिकात निघाली. साहित्यिकांचा परिचय, त्यांच्या मुलाखती, त्यांनी स्वत:ची करुन दिलेली ओळख, नवीन पुस्तकांच्या नोंदी, इत्यादी विविध उपक्रमांमुळे 'ललित' भाव कमावून राहिले आहे.

वि. स. खांडेकर, मामा वरेरकर, आचार्य प्र. के. अत्रे, अशा अनेक प्रसिद्ध लेखकांनी आपले पहिले पुस्तक कशा प्रकारे प्रसिद्ध झाले ते 'माझे पहिले पुस्तक' या सदरातून सांगितले. 'ललित'ने वाङ्मय लेखनाबरोबरच इतर उपक्रमही राबविले. 'असे हे वाचक', 'साहित्यिक शहरे', 'ललित शिफारस', 'ललित पारितोषिक' अशा विविध उपक्रमातून वाचक, ग्रंथपाल, लेखक यांच्याशी संवाद साधण्याचा अभिनव 'ललित'ने केला आहे. 'लक्षवेधी पुस्तके'या सदरातून बाजारात आलेल्या पुस्तकांची ओळख वाचकांना करुन दिली जाते. जानेवारी २००३ मध्ये 'ललित' ने मराठी साहित्य संमेलन विशेषांक काढला होता.

*** 'समाज प्रबोधन पत्रिका'** :–

डिसेंबर १९६३ मध्ये 'समाज प्रबोधन पत्रिके'चा पहिला अंक निघाला. १९६५ पासून 'समाज प्रबोधन पत्रिके'चे नियमित प्रकाशन सुरु झाले. १९८२ पर्यंत हे त्रैमासिक होते. १९६४ मध्ये 'समाज प्रबोधन पत्रिके'चे पहिले संपादक श्री. वसंत पळशीकर होते. 'पुण्याहून' हे प्रकाशित होत असे. १९८२ मध्ये 'समाज प्रबोधन पत्रिका' बंद पडले. त्यानंतर जाने. १९९० मध्ये पुन्हा सुरु झाले. त्यानंतर ते सलगपणे सुरु आहे. वसंत पळशीकर, भा. रां. भणगे, डॉ. स. ह. देशपांडे, राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर (संपादक मंडळात किशोर बेडकीहाळ, भास्कर भोळे, शांताराम पंढेरे, आनंद तेलतुंबडे, किसन चोपडे होते.) महेश गावसकर, डॉ. अशोक चौसालकर इत्यादींनी संपादकांची धूरा यशस्वीपणे सांभाळली.

'समाज प्रबोधन पत्रिके' मधून साहित्य व साहित्यचर्चा अशा विषयांना प्राधान्य दिले. नाट्यचर्चा, साहित्य समीक्षा, शैक्षणिक, धार्मिक, अर्थविषयक ग्रंथाचा परिचय, प्रचलित घडामोडीवर संपादकीय टिपणे असे त्या पत्रिकेचे स्वरूप आहे. नाटक, कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन इत्यादी वाङ्मय प्रकारावर परीक्षणे या मासिकातून झाली. आजही

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राष्ट्रीय पातळीवरच्या महत्वाच्या प्रश्नांची चर्चा 'समाज प्रबोधन पत्रिके'तून करण्यात येते.

*** 'मुद्रा' :–**

जानेवारी १९६६ मध्ये पुण्याहून 'मुद्रा' हे त्रैमासिक सदाशिव कृष्ण पाध्ये यांनी सुरु केले. नवीन ग्रंथनिर्मिती व लेखकांना लिहिण्याची प्रेरणा मिळाली. हे उद्देश 'मृदा'समोर होते. 'मुद्रा'च्या पहिल्या अंकात संपादकांनी आपले मनोगत व्यक्त करताना लिहिले आहे, ''कला आणि विचार यांच्या क्षेत्रात अस्सलाचा शोध घेणे व अस्सलाची जपणूक करणे हा मुद्रेचा उद्देश.''[४१]

अ. ज. करंदीकर, दि. वि. काळे, आनंद यादव, अ. म. जोशी असे काही लेखक 'मुद्रे'स लाभलेले दिसतात. ज. वा. जोशी यांचा आल्बेर कामू यांच्या चरित्रावरील व साहित्यावरील लेख व श्री. व्यं. बोकील यांच्या एस्थेटिक्सवरील लेख असे दोन लेख या त्रैमासिकातील गाजले. 'आजचे मराठी ग्रंथ परीक्षण' या सदरामधून विविध पुस्तकांवर वाङ्मयीन परीक्षणे 'मुद्रा' म्हणून प्रकाशित झाली. साहित्यिक प्रश्न, भाषिक संशोधन यावर 'मुद्रा' मध्ये भर देण्यात आला.

*** 'अस्मितादर्श' :–**

१९६८ पासून गंगाधर पानतावणे यांनी औरंगाबादहून 'अस्मितादर्श' ह त्रैमासिक सुरु केले. पुढे जानेवारी १९७७ पासून 'अस्मितादर्श' द्वैमासिकाच्या स्वरुपात प्रकाशित होऊ लागले. नव्या वाङ्मयीन जाणिवा, नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती दलित साहित्याला 'अस्मितादर्श'ने दिल्या. 'अस्मितादर्श'ने सांस्कृतिक चळवळीच्या मदतीने दलितांमध्ये आत्मजागृती निर्माण केली. तसेच '''अस्मितादर्श'ने सातत्याने नव्या जाणिवांचे लेखन करणाऱ्या नव्या लेखकांचा शोध घेतला आहे.''[४२] असे गौरवोद्गार कृष्णा किरवले यांनी मासिकाबद्दल व्यक्त केले आहेत.

'अस्मितादर्श'चे संपादक श्री. डॉ. गंगाधर पानतावणे त्यांच्या नियतकालिकाची भूमिका विशद करतांना म्हणतात, दहा वर्षापूर्वी अस्मितादर्शचा जन्म झाला. त्यावेळी दलितांचा व नवदीक्षित बौद्धांच्या भावभावना, विचार यांना प्रकाशनाचे माध्यम देणारे साधन नव्हते. दलितांतील शिक्षित हा नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती व जाणिवा व्यक्त करण्यासाठी नियतकालिकाचा

शोध घेत होता. बरेचसे दलित लेखक इतर नियतकालिकातून लिहित नव्हते असे नाही. परंतु स्वत:चे आपले साधन त्याला हवे होते. आंबेडकरी विचारांची आग प्यालेल्या नव्या दमाच्या लेखकांना रुपवादी नियतकालिकात स्थान नव्हते. सांगुती, मटन, हाडूक, भंचोद इत्यादी शब्दांचे सोवळे पाळण्याचा अनेक नियतकालिकांना हे अशिष्टपण (?) आम्ही जे जगलो, जे अनुभविले, जे जोपासले, जतन केले, जो संघर्ष जगलो, जे दैन्य व दु:ख आयुष्याभर वागवले या सर्वांची अभिव्यक्ती मुक्तपणे स्वीकारणारे व प्रकाशित करणारे नियतकालिक हवे होते. ह्या हेतूने अस्मितादर्शचा उदय झाला.

कथा, कविता, नाटक, वैचारिक लेख, ग्रंथपरीक्षणे, समाज व संस्कृती यावर संशोधनपर लेख अशा स्वरुपात 'अस्मितादर्श'ने वाचकांसमोर अस्मितेचा आरसा ठेवला.

वा. ल. कुलकर्णी, रा. ग. जाधव, शंकरराव खरात, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, शरणकुमार लिंबाळे, माधव कोंडविळकर अशा सर्जनशील लेखकांनी 'अस्मितादर्श' मध्ये लेखन केले. संत साहित्य आणि दलित साहित्य, मार्क्सवादी आणि दलित साहित्य, ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य अशा तुलनात्मक चर्चा 'अस्मितादर्श'मधून आलेली आहे. इंदुमती शेवडे यांनी दलित कथा व कथाकार यावर आपले विचार मांडले आहेत. तसेच म. सु. पाटील यांनी दलित कवी व त्यांचे काव्य यावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी', 'मुकुंद पावडे' यांचे 'अंत:स्फोट' ही गाजलेली आत्मकथेत 'अस्मितादर्श' मध्ये प्रसिद्ध झाली.

'दलित कथा : वाय आणि वळणे', 'शिक्षण आणि संस्कृती', 'दलित आत्मकथा', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी', 'म. फुले स्मृतिशताब्दी', असे दर्जेदार विशेषांक 'अस्मितादर्श'ने काढले. वाङ्मय लेखनाबरोबरच मेळावा सुरु झाला. पुढे या मेळाव्यांचे रुपांतर 'अस्मितादर्श' साहित्य संमेलनात झाले. वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक चळवळीतील बदल 'अस्मितादर्श'ने आपल्या साहित्याच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोचविले.

*** 'वैखरी' :–**

डिसेंबर १९६९ मध्ये कोल्हापूरमधून प्रा. नि. ना. रेळेकर यांनी 'वैखरी' चा पहिला

त्रैमासिक अंक प्रकाशित केला. कथा, लेख, कविता, संशोधन, पुस्तक परीक्षणे, वाङ्मयीन प्रश्नांची–चिकित्सा, नव्या–जून्या साहित्यातील बदल, ‘वैखरी’ने मोडले. जून्या लेखकांबराबेरच नवीन लेखकांना मुक्त व्यासपीठ ‘वैखरी’ने मिळवून दिले. या व्यासपीठावरुन वाङ्मयीन चर्चेला सर्वांगीण वाव ‘वैखरी’मुळे मिळाला. मराठीतील नव्या–जुन्या मान्यवर साहित्यिकांनी ‘वैखरी’ला सदैव सहकार्यच केले. ‘वैखरी’ ला श्री. वि. स. खांडेकर यांनी ‘स्वकन्या’चे मानलेले होते.

*** ‘इथे मराठीचिये नगरी’ :–**

‘इथे मराठीचिये नगरी’ हे नियतकालिक थोडे वेगळ्या स्वरुपाचे आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने निघणाऱ्या, ह्या मासिकाने संशोधन साधनांना वाहिलेले आहे. इ.स. १९७३ पासून मासिकाचे अंक निघू लागले. नवीन प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांची यादी, विविध प्रकारची ग्रंथसूची व लेखनसूची महत्वाच्या साधनांची माहिती, साहित्य व कला या क्षेत्रातील नव्या लक्षणीय घडामोडी, नाटकांच्या पहिल्या प्रयोगांची नोंद, दुर्मिख व अल्पसात पुस्तकाचे पुनर्मुद्रण, ग्रंथ संग्रहालयाच्या कार्याचे संक्षिप्त वृत्त अशी सदरे त्यात असतात.

मासिकासे महत्वाचे सदर ‘सूची’ होय. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, दैमासिक, त्रैमासिके यातील निवडक लेखांची सूची, तसेच ग्रंथकारांच्या वाङ्मयाची सूची ह्या संशोधकास उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टी मासिकात अंतर्भुत असतात. ग्रंथपरिचय, ग्रंथ आणि ग्रंथालये इत्यादींच्या संबंधित गोष्टीची माहिती मासिकातून मिळते. संदर्भदृष्ट्या महत्वाची पण विस्ताराने छोटेखानी, दुर्मिख पुस्तके पुनर्मुद्रित करणे, हे या मासिकाचे खास वैशिष्ट्य आहे.

*** ‘मनोरा’ :–**

एप्रिल १९७४ मध्ये पुण्याहून पंडित अनंत कुलकर्णी यांनी ‘मनोरा’ हे मासिक काढले. त्यांनी संगीत, काव्य, नाटक, साहित्य, चार पुरुषार्थ असे विविध विषय ‘मनोरा’ मधून प्रसिद्ध केले.

इंदिरा संत, मा.गो.काटकर यांच्याशिवाय नवोदित कवींच्या कवितांना ‘मनोरा’मधून प्रसिद्धी मिळाली. कथा वाङ्मयातील विविध प्रकार ‘मनोरा’तून हाताळले. ग्रामीण कथा, कौटुंबिक कथा, सामाजिक कथा, ऐतिहासिक कथा, रहस्य कथा, ‘मनोरा’तून प्रकाशित झाल्या.

ग.दि. माडगुळकर, कमला फडके, दि.बा. मोकाशी, शैलजा राजे, ग.ल.ठोकळ, शंकर पाटील, रा.रं.बोराडे अशा प्रसिद्ध कथा लेखकांच्या कथा 'मनोरा' मधुन प्रसिद्ध झाल्या.

दरवर्षी जुलै महिन्यातल अंक एकांकिका विशेषांक म्हणून काढला जातो हे 'मनोरा'चे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्याचप्रमाणे पुस्तक परीक्षणापेक्षा पुस्तकातील चांगला उताराच 'मनोरा' मध्ये छापला जात असे. वैचारिक लेख, नाट्यसमीक्षा, ललित निबंध यांनाही 'मनोरा' मधून प्रसिद्धी दिली जात असे. 'साहित्य गंगेच्या काठी' या सदरांमधून ना.सी.फडके यांनी वाचलेल्या नवीन पुस्तकांचे रसग्रहण येत असे.

*** 'लोकवाङ्मय' :–**

१९७५ पासून उमाकांत मोकाशी यांनी 'लोकवाङ्मय' हे त्रैमासिक सुरू केले. 'प्रागतिक विचार आणि संस्कृतीला वाहिलेले नियतकालिक' असे 'लोकवाङ्मय'चे घोष वाक्य आहे. 'ललित वाङ्मय' समीक्षणात्मक लेखनाबरोबर 'मूल्यमापन', 'प्रभाव' नावाचे सदर 'लोकवाङ्मय' तूनच प्रसिद्ध होत. 'मूल्यमापन' मधून ज्योतिबा फुले यांच्य दुर्लक्षित झालेल्या काव्यावर प्रभाकर वैद्यांनी लेखन केले आहे. तसेच 'प्रभाव'मधून विचारवंतांचे साहित्यविषयक विचार मांडले आहेत.

*** 'पूर्वा' :–**

१९७७ मध्ये दिनकर साक्रीकर यांनी 'पूर्वा' हे वाङ्मयीन मासिक सुरू केले. कादंबरी, कथा, कविता, परिसंवाद, विविध विषयांवरून विशेषांक 'पूर्वा' ने प्रसिद्ध केले. कुसुमाग्रत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, यांच्या कविता 'पूर्वा' ने प्रकाशित केल्या. वासुदेव मुलाटे यांचा 'ग्रामीण साहित्य आणि कलात्मकता' तसेच निर्मल कुमार फडकुले यांचा 'साहित्यातील नव्या जाणिवांचा प्रखर आविष्कार' असे वैचारिक लेख 'पूर्वा' मधून प्रसिद्ध झाले.

'मराठी संगीत रंगभूमी संकल्पना', 'स्वातंत्र्य दिन विशेषांक', 'आंबेडकर स्मृति अंक, ''मामा वरेरकर जन्मशताब्दी संकलन ', 'महानगर साहित्य संमेलन'. 'रौप्यमहोत्सवी अधिवेशन विशेषांक' असे विविध विशेषांक 'पूर्वा' ने प्रकाशित केले.

*** 'अनुबंध' :–**

१९७७ पासून मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा या संस्थेचे 'अनुबंध' हे त्रैमासिक निघू लागले. सध्या या मासिकाचे संपादक वि.पां.देऊळगावकर आहेत. कविता, कथा, विविध विषयांवरील लेख 'अनुबंध' मधुन प्रसिद्ध झाले. मीनल वसतमकर यांचा 'तांबेंची कविता', चि.वि.जोशी यांचा 'समकालीन ग्रामीण जीवन व साहित्यिकांची जबाबदारी' तसेच वामन जाधव यांना '१९७५ नंतरची शेतकरी जवनावरील दीर्घ कविता' असे विविध लेख 'अनुबंध' मधुन प्रसिद्ध झाले.

*** 'अनुष्टुभ':–**

१९७८ साली 'अनुष्टुभ' हे वाङ्मयीन द्वैमासिक सुरू झाले. याचे संपादक रमेश वरखेडे. कथा, कविता, ग्रंथपरीक्षणे, साहित्यलेख, 'अनुष्टुभ' मधुन प्रसिद्ध झाले. अनिल द्रविड, ग्रेस, नीरजा, कविता महाजन अशा कवींच्या कविता 'अनुष्टुभ' मधुन प्रसिद्ध झाल्या. तसेच 'रेणूची आई' ही प्रतिमा काणेकर, 'तरंग' जी.के. ऐनापुरे, 'खटारा' विजया जावळे अशा कथांनाही प्रसिद्ध 'अनुष्टुभ'मध्ये मिळाली. 'बळिवंत', 'अर्धविराम' अशा विविध पुस्तकांची परीक्षणे, 'ग्रंथपरीक्षणे' या सदरातून केली. 'गौरी देशपांडे' यांच्या कादंबऱ्या, 'निवेदन व्यवस्था', हरिश्चंद्र थोरात, 'भैरप्पांच्या कादंबऱ्यांची लोकप्रियता', 'सी.एन. रामचंद्रन', 'साहित्य प्रकारांचा अभ्यास'–मिलींद जोशी, प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील स्त्री–पुरुष संबंध, प्रतिभा काणेकर असे विविध साहित्यिक लेख 'अनुष्टुभ' मधून प्रसिद्ध झाले.

'अनुष्टुभ' मधील समीक्षेने वाङ्मय क्षेत्रातील समीक्षेला वेगळे वळण दिले. रशियन रूपवाद, संरचनावाद, कथनमीमांसा, चिन्हंमीमांसा, मानसशास्त्रीय समीक्षा, अदिबंधात्मक समीक्षा अशा विविध समीक्षात्मक प्रश्नांची ओळख 'अनुष्टुभ' ने घडविली. साहित्यनिर्मिती, साहित्यसमीक्षा यांचा परिचय 'अनुष्टुभ'ने वाचकांना करून दिला. परंपरा व नवता यांचा संगम 'अनुष्टुभ' मध्ये आढळतो.

पु.शि.रेगे विशेषांक, प्रभाकर पाध्ये विशेषांक, ललित गद्य विशेषांक, नाट्य विशेषांक, नरहर कुरुंदकर विशेषांक असे विविध विषय विशेषांकातून 'अनुष्टुभ' मांडले. मराठी भाषा,

साहित्य, कला, शिक्षण, संस्कृती या सर्वांचा विकास साधण्यासाठी 'अनुष्टुभ' सतत प्रयत्नशील असलेले दिसते.

विजय तापस यांच्या संपादकत्वाखाली जानेवारी फेब्रुवारी २००६ मध्ये 'नवअनुष्टुभ' सुरू झाले. माधव आचार्य रोहिती तुकदेव यांचा १८८०–१९३० मधील कथात्मक साहित्याचे स्त्रीवादी दृष्टिकोनातून वाचन, अरूण दुभाषी यांचा १९३०–१९६० या काळातील कथात्म साहित्याचे स्त्रीवादी वाचन असेलेख 'नवअनुष्टुभ' मध्ये प्रसिद्ध झाले. 'नवी ओळख', 'आस्वाद', 'प्रवासमुद्रा', 'आमंत्रित कविता' ही या मासिकाची वैशिष्ट्ये आहेत.

*** 'साहित्यसूची':–**

फेब्रुवारी १९८० मध्ये 'साहित्यसूची' हे निखळ वाङ्मयीन मासिक संस्थापक संपादक मोरेश्वर नांदूरकर यांनी सुरू केले. सध्याचे संपादक योगेश मो. नांदूरकर हे आहेत.

नवीन ग्रंथांचा परिचय, तसेच पुस्तकांची सूची, प्रसिद्ध साहित्याचा वेध 'साहित्यसूची' मधून घेतलेला दिसतो. चि.वि.जोशी, दि.बा.मोकाशी, पु.ग.सहस्त्रबुद्धे अशा मान्यवर लेखकांवर विशेषांक 'साहित्यसूची'ने काढला. 'साहित्यवार्ता', 'नवंकोरं' अशा सदरांमधून नवीन पुस्तक परिचयाबरोबर महाराष्ट्राच्या विविध प्रांतातील वाङ्मयीन सांस्कृतिक घडमोडींची ओळख रसिकांना 'साहित्यसूची'मधून घडते असे.

*** 'भाषा आणि जीवन':–**

१९८२ मध्ये भाषेला वाहिलेले त्रैमासिक मराठी अभ्यास परिषद या संस्थेने सुरू केले. मराठी भाषेचा विकास, उत्कर्ष तसेच भाषिक गरजा पूर्तीसाठी 'भाषा अणि जीवन' सतत प्रयत्नशील राहिले.

भाषाविषयक वैचारिक लेख, संशोधनात्मक निबंध, पुस्तक परीक्षण अशा स्वरूपात हे नियितकालिक प्रसिद्ध होते. मिलींद बोकील यांच्या 'मराठीच्या विकासाच्या दिशा' हे वि. इनामदार यांचा 'हरिभाऊ आपटे यांचा साहित्य विचार आणि भाषा विचार' असे अनेक महत्त्वपूर्ण लेख 'भाषा आणि जीवन' मधून प्रकाशित झाले. 'भाषा विवेक', 'भाषा विचार', 'विचार संकल्पना', 'शब्दायन' अशा सदरांमधून भाषेचा सर्वांगीण विचार केलेला दिसतो. 'लोकशिक्षण

विशेषांक', 'अनुवाद विशेषांक', 'पहिली पासून इंग्रजी विशेषांक' असे वाङ्मयला पूरक विशेषांक या मासिकाने काढले.

*** 'कवितारती':–**

१९८५ मध्ये धुळे येथून 'कवितारती' हे खास काव्य विषयाचे द्वैमासिक सुरू झाले. पुरुषोत्तम पाटील हे 'कवितारती' चे संपादक आहेत. प्रसिद्ध कवी. बा.भ.बोरकर यांच्या स्मरणार्थ 'कवितारती' काढण्यात येऊ लागले.

काव्य, काव्यविचार, काव्य समीक्षा, काव्यविमर्श लेखन हे 'कवितारती'चे स्वरूप आहे. बालकवी, विनायक, केशवसुतांपासून आधुनिक नवकवितेतील प्रदीप पाटणकर, जयश्री भाकरे, मेघना पटांगरे अशा विविध कवींच्या कविता 'कवितारती' मधून प्रकाशित झाल्या. म.सु.पाटील यांचा 'वसंत अबाजी डाके यांची कविता', अनुराधा साळवेकर यांचा 'शांता शेळके यांच्या कवितेतील स्त्री जीवन', रत्नाकर मंचरकर यांच्या 'मराठी गझल १९२० ते १९८५' असे काव्यविचार मांडणारे लक्षवेधी लेख, 'कवितारती' मधून प्रसिद्ध झाले. गो.म. कुलकर्णी, व.दि.कुलकर्णी, राम शेवाळकर, रा.ग.जाधव, सुधीर रसाळ अशा मान्यवर समीक्षकांनीही या मासिकातून आपले विचार मांडले. कविवर्य वा.रा.कांत, कुसुमाग्रज, इंदिरा संत, बालकवी, संजीवनी मराठे अशा मान्यवर, कवींवर विशेषांक काढले. ज्ञानेश्वर सप्तशताब्दी विशेषांक, काव्यचर्चा विशेषांक 'कवितारती' ने काढले. 'कवितारती' हे केवळ कवितेला व कविता विचारला वाहिलेले नियतकालिक आहे. सगळ्या प्रकारच्या चांगल्या कविता, सगळ्या प्रकारचे चांगले काव्यविषयक लेखन अशी व्यापक दृष्टी 'कवितारती' ची आहे.

*** 'अंतर्नाद':–**

१९९४ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अंतर्नाद' ने वाङ्मयाच्या मदतीने समाजात सांस्कृतिक समृद्धी रूजविण्याचा प्रयत्न केला. कथा, अनुभव कथन, आत्मकथन, मनकविता, कवितालेख, समीक्षा, व्यक्तिचित्रे, स्वागत या सदरातून विविध पुस्तकांचा परिचय असा भरगच्च वाङ्मय खजिना 'अंतर्नाद' ने वाचकांना उपलब्ध करून दिला. 'मनकविता' या वेगळ्या स्वरूपाचा प्रयोग 'अंतर्नाद' मध्ये केला आहे. एका प्रथितयश कवीने आपली नवी अप्रकाशित

कविता व त्या कवितेबद्दलचे त्याचे मनोगत मांडावयाचे आणि ज्या कविला प्रसिद्धी नही अशा कवींची स्वत:ला आवडलेली कविता तिच्या प्रतिसादासह द्यायची. अशा स्वरूपाच्या मनकवितेमध्ये 'साधेपणातच सामावलेली कविता' गोविंद कुलकर्णी 'कवितेचा विस्तार आयुष्यापेक्षाही मोठा आहे' अरूणा ढेरे, 'शब्दांची मोडामोड चालू आहे'–दासू वैद्य, 'कविता–एक देणे आणि घेणे'–सुहासिनी इर्लेकर अशा अनेक कवींनी मन कवितेचा प्रतिवाद केला आहे.

'विंदा करंदीकरांची 'अष्टदर्शने'–सुभाष भेंडे, 'मराठी कविता आजची दशा'–मनोहर नाईक असे समीक्षणात्मक लेखनही 'अंतर्नाद'मधून प्रकाशित झाले आहे. 'प्रतिसाद' या सदरामुळे वाचकांना आपले विचार मांडण्याची संधी या मासिकाने उपलब्ध करून दिली. कथास्पर्धा या उपक्रमातून कथा लेखनाला उत्तेजन 'अंतर्नाद' ने दिले. वाचक आणि लेखक यांना जोडणारा 'अंतर्नाद'हा दुवा आहे असे आजच्या वाचनसंस्कृतीत 'अंतर्नाद'बद्दल म्हणावे लागेल.

*** 'मेहता मराठी ग्रंथजगत':–**

जानेवारी १९९७ मध्ये संपादक सुनील मेहता यांनी ग्रंथप्रसाराच्य हेतूने 'मेहता मराठी ग्रंथजगत' काढले. विविध पुस्तके वाचकांपर्यंत पोहचावित या दृष्टीने नवीन पुस्तकांचा परिचय तसेच लेखकांच्या समग्र ग्रंथांचा परिचय या मासिकातून दिला जातो. 'साहित्यवार्ता' सदराशिवाय खास वाचकांसाठी स्पर्धा घेतल्या जातात. 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरात वाचक आपले मनोगत मांडतात.

आक्टोबर १९९८ च्या दिवाळी विशेषांकात 'माझ्या पुस्तकाची जन्मकथा' या विषयावर आनंद यादव, उमा कुलकर्णी, आशा कर्दळे, रा.रं.बोराडे अशा अनेक लेखकांनी आपल्या पुस्तकाची जन्मकथा सांगितली आहे. 'संभाव्य साहित्याची रूपरेषा'–आनंद यादव, 'युद्धकथा'–निरंजन घाटे, 'संभाजी कादंबरीबद्दल'–शंकर सारडा, 'कथारूपी खगोलशास्त्री'–लीना दामले असे अनेक लेख मासिकातून प्रकाशित झाले.

*** निरीक्षणे–**

- इ.स.१८०० ते इ.स.१८७४ या आधुनिक मराठी वाङ्मयाच्या पहिल्या कालखंडात नियकालिकांच्या कार्याला प्रारंभ झाला. पेशवाईचा अस्त झाला आणि इंग्रजांची राजवट महाराष्ट्रात आली. मुद्रण कलेची ओळख तसेच नियतकालिकांची ओळख याच काळातील. आहे.
- मराठीतील आरंभीची नियतकालिके ही वर्तमानपत्रे नव्हती. त्यांचे स्वरूप 'वृत्तकथन' करण्यापेक्षा ज्ञानसंग्रह आणि ज्ञानवितरण यांचेच होते. म्हणून त्यांचे स्वरूप अल्पकालीन नव्हते.
- आजपर्यंतच्या नियतकालिकांचा प्रवास अभ्यासत असता कालानुरूप बदल नियतकालिकांच्या स्वरूपात झालेले दिसतात.
- आधुनिक मराठी वाङ्मयाच्या सर्वंगीण विकासाला मराठी नियतकालिकांनी अव्वल दर्जाचे साहित्य केलेले आहे. आधुनिक वाङ्मयाल नवे शब्द, नानाविध नव्या जीवनाभूती, नव्या मराठी गद्याला मराठी नियतकालिकांनीच पुरविले.
- साहित्य छापणे, धर्माचा प्रसार करणे, लोकशिक्षण, विद्येचा प्रसार व प्रचार, ज्ञानदान करून समाज प्रबोधन घडवून समाजाला दिशा देण्याचे उद्दिष्ट सुरूवातीच्या काळातील नियतकालिकांचे दिसते.
- मराठी ग्रंथापेक्षा मराठी नियतकालिकांचाच मराठी समाज जीवनाशी अधिक जवळचा संबंध आला. महाराष्ट्रातील विविध आंदोलनांसाठी लोकजागृतीचे कार्य नियताकालिकांनीच केले.
- 'मराठी ज्ञानप्रसारक' पासून समीक्षाविषयक लेख येण्यास प्रारंभ झाले. संस्कृत, इंग्रजी भाषांतरे नियतकालिकांमधून प्रकाशित होऊ लागली. 'काव्यसंग्रह', 'काव्यार्थदीपिका' अशा मासिकांनी मराठी भाषा समृद्ध करण्यास हातभार लावलेला दिसतो.
- समकालीन साहित्याच्या जडणघडणीत आणि समकालीन वाङ्मयीन अभिरूचीच्या निर्मितीत पुढील नियतकालिकांचे कार्य महत्त्वाचे वाटते.– महाराष्ट्र साहित्य पत्रिका,

सायकथा, अभिरूची, साहित्य, छंद, प्रतिष्ठान, आलोचना, पंचधारा, नवभारत, युगवाणी, समाज प्रबोधन पत्रिका, अनुष्टुभ, ललित, कवितारती, अस्मितादर्श इ.

- 'नियतकालिकांच्या इतिहासात प्रदीर्घ काळ प्रकाशित होणारे एकमेव मासिक म्हणजे 'विविधज्ञानविस्तार' होय. 'विविधज्ञानविस्तार' ६९ वर्षे चालले. 'काव्यरत्नावली' ने ४७ वर्षे आपले अंक प्रसिद्ध केले तर 'करमणूक' ने २७ वर्षे साहित्यसेवा केली. काही नियतकालिके अगदीच अल्पायुषी ठरली. 'पदेशचंद्रिका' १८४४ मध्ये सुरू होऊन १८४७ मध्ये बंद पडले. या मासिकाला हवा तसा वाचकांचा पाठिंबा मिळाला नाही. 'पारिजात', 'ज्योति', 'उपदेशचंद्रिका' या मासिकांचे काही अंकच प्रसिद्ध होऊन बंद पडले. 'पारिजात' हे एक वर्ष चालले अल्पजीवी मासिक होते. तसेच 'इंद्रायणी' हे ही अल्पजीवीच होते.
- एकेका वाङ्मय प्रकाराला वाहिलेली नियतकालिके निघाली होती. 'काव्यरत्नावली'मधून काव्यालाच प्रसिद्धी दिली जात होती. 'कादंबरी कल्पद्रुप' नियतकालिकांचे उद्दिष्टच कादंबऱ्या प्रसिद्ध करणे होते. 'रंगभूमी' नियतकालिकातून नाट्यक्षेत्राचा इतिहास प्रकाशित होत असे. 'नाट्यकला', 'नाट्यमाला', 'नाट्यकथार्णव', 'ऐतिहासिक नाट्यमाला' अशा नाट्यकलेसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांनी नाटक या वाङ्मयप्रकाराला आपल्या मासिकात स्थान दिले. 'इंद्रायणी' हे संतसंदेश देणारे मासिक प्रसिद्ध होत असे. तर 'हंस' हे कथाप्रधान मासिक फक्त कथेला महत्त्व देत असे.
- नियतकालिकांनी मराठी लेखकाला वाव देण्याची कामगिरी केलेली दिसते. तसेच मराठी भाषेला मानाचे स्थान मिळवून देण्याचे उदात्त कार्यही नियतकालिकांनी केले असे म्हटल्यास वावगे होणार नाही.
- समाजमनावर आपल्या विचारांचे संस्कार रूजविण्याचे कार्य नियतकालिकांनी केले. लोकाभिरूची सोबतच लोकमानस तयार करण्याची अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदारी या नियतकालिकांनी पार पाडली आहे असे दिसते.
- विविध मासिकांनी कथा, कविता, कादंबरी, नाट्य, समीक्षा, प्रवास, ललितलेख, पुस्तक

परिक्षण इत्यादी विविध अंगांनी कार्य केले, विविध मासिकांनी संशोधनपर कार्यालयाही मदत केली.

- नियतकालिकांनी समाजाला जागृत करण्याचे, मनोरंजनाचे, ज्ञानदानाचे, संशोधनाचे, वाङ्मयीन परंपरा जोपासण्याचे, दुर्मिळांचा संग्रह करण्याचे तसेच नवनिर्मितीचे कार्य अव्याहतपणे, अखंडपणे केले.
- 'स्त्रियांच्या' विचाराला चालना देऊन, उन्नती घडविण्यासाठी 'स्त्री' (१९३०) मध्ये निघाले. त्यानंतर बायजा, बाई, मिळून साऱ्याजणी अशी नियतकालिके स्त्रीविषयक प्रश्नांची स्त्री–मुक्तीच्या दिशेने चर्चा करताना दिसतात.

**संदर्भः–**


१) डॉ.बी.एन.पाटील, 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती–२०१२,पृ.५४.

२) भा.ग.सुर्वे, 'साहित्य' मराठी विश्वकोश खंड १२ (संपा) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मुंबई,१९८५, पृ.२८५.

३) (संपा)–संजय कोल्हटकर, प्रसाद कुलकर्णी, 'महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्र.आ. २००९, पृ.७.

४) रामचंद्र श्रीपाद जोग, 'मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन', व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती–जाने–१९७६, पृ.१८७.

५) डॉ. यशवंत मनोहर 'समाज आणि साहित्य समीक्षा', सुगावा प्रकाशन, पुणे–३०, प्रथमावृत्ती– ६ डिसेंबर १९९२, पृ.११७

६) बा.द.सातोस्कर, 'मराठी मासिकांचे पहिले शतक', पुणे, १९८६, पृ.२.

७) सु.रा. चुनेकर, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड पाचवा भाग दुसरा, (संपा.) रा.भी.जोग, पुणे, १९७३, पृ.३३८.

८) (संपा) डॉ. उषा मा.देशमुख 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास', खंड तिसरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ.१९९५. पृ.७.

९) व.दि.कुलकर्णी 'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड१, १८३२–१८८२, पुणे १९८७, पृ.३.

१०) व.दि.कुलकर्णी, तजैव, पृ.४.

११) डॉ.यशवंत मनोहर, उनि, पृ.११६.

१२) बा.द.सातोस्कर, उनि, पृ.६.

१३) गो.म.कुलकर्णी, 'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी', पुणे, १९९४, पृ.४५.

१४) सोमनाथ कोपरपंत, 'मराठी विश्वचरित्रकोश२', (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००३, पृ.१३०.

१५) ऋता मनोहर बापडेकर, 'महाराष्ट्रातील प्रमुख संपादक', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ. १८ नोव्हेंबर २००९, पृ.६.

१६) बा.द.सातोस्कर, उनि,पृ.१६.

१७) बा.द.सातोस्कर, तत्रैव, पृ.४६.

१८) (संपा.) श्रीराम कामत, 'मराठी विश्वचरित्र कोश१', गोवा, २००३, पृ. ५५३.

१९) बा.द.सातोस्कर, उनि,पृ.५५.

२०) उषा देशमुख, 'विविधज्ञानविस्तार–साहित्य आणि साहित्यविचार', पुणे, १९९५, पृ.६६.

२१) वि.वा.आंबेकर, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड पाचा, भाग पहिला, (संपा.) रा.श्री.जोग, म.सा.प.पुणे, १९७३, पृ.११४.

२२) बा.द.सातोस्कर, उनि, पृ.७९.

२३) बा.द.सातोस्कर, तत्रैव, पृ.५५.

२४) सु.रा.चुनेकर, उनि, पृ.३४८, ३४९.

२५) ल.रा.पांगारकर, 'निबंधमालेचे स्वरूप कार्य', 'मुमुक्षु', पुणे, आवृत्ती जानेवारी, १९९२, पृ.३.

२६) आर.एच.कांबळे, 'मराठी विश्वचरित्रकोश५' (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००८, पृ.४१६.

२७) शकुंतला आठवले, 'काव्यरत्नावली खानदेशचे एक लेणे', पुणे, १९८६, पृ.१३७.

२८) (संपा.) गो.म.कुलकर्णी, व.दि.कुलकर्णी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड सहावा–भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे, प्र.आ.१९९१, पृ.३०२.

२९) अ.ना.ठाकूर, 'मराठी विश्वचरित्रकोश ४', (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००४, पृ.९०४.

३०) (संपा) डॉ. उषा मा.देशमुख, उनि, पृ.७.

३१) (संपा) डॉ. उषा मा.देशमुख, तत्रैव, पृ.११२.

३२) सोमनाथ कोमरपंत, उनि, पृ.७९२.

३३) रा.वि.मंत्री, 'प्रतिभेचा वाङ्मयविहार' महाराष्ट्र साहित्य पत्रिका, व. ५०, अं.२०२, जुलै–सप्टेंबर १९७७, पृ.३४.

३४) (संपा.) गो.म.कुलकर्णी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सहावा,भाग–दुसरा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे–३०, पृ.३१०.

३५) सुधीर रसाळ 'साहित्य:अध्यापन आणि प्रकार', मुंबई, १९८७, पृ.१९.

३६) सुधीर रसाळ, तत्रैव, पृ.१८.

३७) गंगाधर महाम्बरे, 'मराठी विश्वचरित्रकोश १' गोवा,२०००, पृ.६०७.

३८) सुधीर रसाळ, उनि, पृ.१८.

३९) वसंत स.जोशी, 'महाभारताची तपस्या', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २००–२०१ ते २०३, जानेवारी ते जून १९७७, पृ.२६.

४०) वसंत स.जोशी, तत्रैव, पृ.२६.

४१) प्र.ल.गावडे, 'मुद्रा' मधील काव्यविचार, महाराष्ट्र साहित्य पत्रिका व ५०, अंक–२०२, जुलै–सप्टेंबर, १९७७, पृ.४९.

४२) कृष्णा किरवले, ''अस्मितादर्शचे ऐतिहासिक कार्य'', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, आक्टोबर–डिसेंबर १९८७, पृ.४३.

# प्रकरण दुसरे

# समाज प्रबोधन पत्रिका:
# स्थापना,भूमिका,स्वरूप

# प्रकरण दुसरे

# समाज प्रबोधन पत्रिका: स्थापना,भूमिका,स्वरूप

## प्रस्तावना –

भारतात इंग्रजांचे राज्य आले आणि त्यांच्या राजसत्तेबरोबरच त्यांची संस्कृती, अनेक विद्या, शास्त्रे यांचाही भारतीय जीवनावर फार मोठा प्रभाव पडला. नवे ज्ञान, विज्ञान, कायदे, वेष, उद्योगधंदे यांच्या रूपाने भारतीयात नविन जीवन विषयक दृष्टी प्राप्त झाली. इंग्रजी सत्तेबरोबरच लेखनाला अक्षररूप देणारी, लेखन बहुजनांपर्यंत पोहोचविणारी 'मुद्रणकला' ही भारतात आली. लेखन प्रसाराचे साधन मुद्रणकलेच्या रूपाने प्राप्त झाल्यामुळे अनेक छापखाने निर्माण झाले. अनेक छापखान्यांमुळे नियतकालिकांच्या छापण्याला आणि प्रकाशनाला प्रोत्साहन मिळाले.

वृत्तलेख प्रसिद्ध करणारी नियतकालिके ही अनुभवी पत्रकार आणि पूर्णवेळ वार्ताहर यांच्यामार्फत चालविली जातात. तर वैचारिक जडण–घडण करणारे लेख प्रसिद्ध करणाऱ्या नियतकालिकांकडे स्वतंत्रपणे लेखन करणारे लेखक आणि विद्याविषयातील अभ्यासक–प्राध्यापक यांचे साहित्य येत असते. ख्रिस्तोफर लॅश या इतिहासकाराने नमूद केल्याप्रमाणे टेलिव्हिजनच्या उदयानंतर आणि प्रसारमाध्यमांच्या थैमानानंतर अशा प्रकारची नियतकालिके हीच अभ्यासू आणि विद्वान मंडळींना एकमेकांशी संपर्क साधण्याची माध्यमे राहिली आहेत. बुद्धिवादी मंडळींना एकत्र आणून त्यांच्यामध्ये शिल्लक असलेली थोडीफार एकजूट आणि एकात्मता दृढ करण्याचे काम नियतकालिके करीत आहेत. 'समाज प्रबोधना पत्रिके'च्या बाबतीत हेच म्हणता येईल.

नफा मिळविणारी गुळगुळीत कागदावरील आकर्षक नियतकालिके आणि विचार प्रसार करणारी निवडक वाचकांसाठी चालविली जात असलेली साधी व अनाकर्षक दिसणारी नियतकालिके यांच्यात आणखी एक मोठा फरक आहे. ड्राईट मॅक्डोनाल्ड या समीक्षकाच्या मते, मोठ्या व व्यावसायिक नियकालिकापेक्षाही विचारप्रसार करणारी नियतकालिके अधिक आतूरतेने वाचली जातात. कारण त्यातील व्यक्तिगत प्रकटीकरण हे समविचारी लोकांना उत्कट आवाहन करीत असते 'समाज प्रबोधन पत्रिका' हे मुक्त विचारांने व्यासपीठ असणारे नियतकालिक पन्नास

वर्षानंतरही आपल्या मूळ स्वरूपानुसार वाटचाल करीत असल्याचे दिसून येते.

## * समाज प्रबोधन पत्रिका: प्रारंभ नि कार्य –

महाराष्ट्रात पुरोगामी विचार रूजावेत व समाज परिवर्तनाचे कार्य समाज प्रबोधनाच्या मदतीने सुकर व्हावे म्हणून १९५९ साली 'समाज प्रबोधन' संस्थेची स्थापना झाली. या कामात महाराष्ट्रातील थोर राजकीय पुढारी शंकरराव देव यांनी पुढाकार घेतला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व श्री.जे.पी.नाईक हे या संस्थेचे विश्वस्त होते. प्रा.दि.के.बेडेकर, प्रा.मे.पु.रेगे, प्रा.देवदत्त दाभोळकर व इतर अनेक विचारवंत या संस्थेच्या कार्यात सहभागी झाले होते. विवेक निषं, व्यक्तिस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, व लोकशाही या मुद्यांवर निष्ठा ठेवून ही संस्था काम करीत होती. आपल्या समाजापुढे असणाऱ्या समस्यांचा खोल असा अभ्यास करून वैचारिक जागृतीते काम करवे हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन 'समाज प्रबोधन पत्रिका' हे द्वैमासिक सुरू करण्यात आले.

'पत्रिका' संस्थेने चालविलेली असली तरी ते संस्थेचे अधिकृत मुखपत्र नाही. पहिली गोष्ट म्हणजे कोणत्याही राजकीय पक्षाशी या नियतकालिकाने बांधिलकी ठेवलेली नाही. तुटपुंज्या निधीवर आणि वर्गणीदारांच्या पाठिंब्यावर चालविलेले हे नियतकालिक आहे. बाह्यरूपाने नाही तर आतील मजकूरामुळे महत्व प्राप्त झालेल्या 'पत्रिके' ने विशेष विक्रम केला आहे. या 'पत्रिके'च्या मुखपृष्ठावर असणारी सूचक चित्रे, पत्रिकेला असलेले बोधचिन्हाचे लेणे प्राप्त झाले आहे. हाती घेतलेल्या कार्याचे, त्यासाठी निर्माण केलेल्या संस्थेचे बोधचिन्ह पूर्णत्वाने प्रतिकत्व करते. शब्द अपुरे पडतात तेथे बोधचिन्ह काम करते. त्या बोधचिन्हात परंपरा आणि आधुनिकता यांचा अप्रतिम संगम झालेला आहे. यात पणतीचे सूचन अहे. पणतीशी भारतीयांच्या अनेकविध भावना निगडीत झालेल्या आहेत व त्या सर्व 'समाज प्रबोधन पत्रिके' च्या कार्याशी घनिष्ठपणे निगडीत आहेत. त्याचवेळी गणकयंत्राच्या आधूनिक युगाला अनुरूप असे त्या पणतीचे कलात्म रूप आहे. डिसेंबर १९६३ मध्ये पहिला अंक प्रकाशित झाला. पण सप्टेंबर–डिसेंबर १९६५ पासून अंकाच्या नियमित प्रकाशनास सुरूवात झाली.

१९६५ च्या अंकात आरंभीच्या निवेदनात संपादकाने असे मत व्यक्त केले आहे की,

भारतात बदलाची गती संथ असून समाजातील सर्व थर राष्ट्रीय पुनरूत्थानाच्या नियोजनबद्ध विकासाच्या साहसात भाग घेत नाहीत. वेगवान परिवर्तन व या परिवर्तनात सापडलेला गतिशून्य समाज असे परस्पर विरोधी चित्र निर्माण झाले आहे. कारण भारतातील परिवर्तन हे वरून लादलेले आहे. या परिवर्तनातही जून्या संस्कृतीचे कलम जोमदार असल्याची तक्रार करण्यात आली आहे. एकूणच होऊ घातलेल्या परिवर्तनाचे स्वागत करीत असताना हे परिवर्तन आपला 'मागास' समाज पचवणार की नाही याबाबतची धास्ती या विवेचनात दिसते. म्हणूनच वैचारिक सफाईची गरज आता निर्माण झाली आहे, असे मतही व्यक्त करण्यात आले.

डिसेंबर १९६३ मध्ये 'समाज प्रबोधन पत्रिका' सुरू केली. त्यावेळी तिचे स्वरूप संस्थेच्या वार्तापत्राचे होते. संस्थेच्या कार्यक्रमाचा अहवाल, प्रकाशनाची माहिती, संकल्पित कार्यक्रमाची सूचना देणारे वार्तापत्र असे त्याचे डोळ्यापुढे ठेवले होते. या सगळ्यांच्या जोडीला एखाद दुसरा लेख त्यात असावा अशी कल्पना केलेली होती. त्या स्वरूपात प्रंसगी खंडित प्रकाशने 'पत्रिके'चे ४–५ अंक प्रसिद्ध झाले. संस्थेच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या शंभर–दिडशे व्यक्तींपुराच तिचा प्रसार मर्यादित होता.

सहाजिकच असा प्रश्न आला की 'पत्रिका' बंद का करू नये? पण त्याचबरोबर दुसरा प्रश्न असाच उपस्थित झाला की, मग मुळात ही 'पत्रिका' सुरूच का केली? समाज प्रबोधन संस्था पुस्तके प्रकाशित करीत होती, त्यांचा खपही बरा होत होता. मधून–मधून शिबिरे, परिसंवादही संघटित केली जात आणि त्यांनाही त्या त्या वेळी चांगला प्रतिसाद मिळाला होता. पण तरीही असमाधानाची एक जागा होती. ''समाज विचारशीलांचा परस्परांशी जिवंत संपर्क राहावा, नित्य बदलत्या परिस्थितीच्या संदर्भाने प्रबोधनाचे कार्य चालावे आणि समाजात वैचारिक शक्ती निर्माण व्हावी हे जे संस्थेचे एक प्रमुख उद्दिष्य ते असफलच राहिले असे ते असमाधान होते. त्या दिशेने कार्य सुरू करण्याचे साधन म्हणून ''समाज प्रबोधन पत्रिका'' सुरू केली होती.''[१]

'समाज प्रबोधन पत्रिके' ची भूमिका मांडताना संपादक श्री.वसंत पळशीकर म्हणतात, '' पंधरा वर्षाच्या नियोजनबद्ध आर्थिक विकासाच्या प्रयत्नानंतर ही भारतीय समाजात चैतन्य उसळी

घेताना दिसत नाही. जी काही हालचाल दिसते ती पृष्ठभागावरच. सर्व थरातला समाज राष्ट्रीय पुनरूत्थानाच्या साहसात भाग घेताना दिसत नाही. पण त्या संक्रमणाच्या भोवऱ्यात तो पूर्णपणे सापडला आहे व त्याची सर्व शक्ती केवळ तग धरून राहण्यातच खर्च होत आहे. वेगवान परिवर्तन आणि ह्या परिवर्तनाच्या भोवऱ्यात सापडलेल्या गतिशून्य समाज असे परस्पर विरोधी आणि कमालीचे गुंतागुंतीचे चित्र आपल्या समाजात आज दिसते. महणून विचारांच्या सफाईची नितांत व निकडीची आवश्यकता आहे. पण सफाई व्हायची असेल तर विचार प्रकाशात यायला हवेत. आणि ते टीकेच्या भट्टीत घालून तावून–सुलाखून घेतले पाहिजेत. या 'पत्रिके' ची बैठक या कार्यासाठी आहे, असे वसंत पळशीकरांनी नमूद केले आहे.

'समाज प्रबोधन पत्रिका' एक विशिष्ट हेतू नजरेसमोर ठेऊन स्थापन झाली. समाज प्रबोधन पत्रिकेचा उद्देश स्पष्ट करताना देवदत्त दाभोळकर म्हणतात, ''विवेकनिष्ठा, विचारपद्धती, लोकशाही, जीवनदृष्टी आणि समाजाधिष्ठित नवसमाजनिर्मिती ही वैचारिक आंदोलनाची त्रिसुत्री मानून अपक्ष भूमिकेने लोकशिक्षणाचे काम करण्याच्या उद्देशाने यापत्रिकेचा जन्म झाला.''[२]

'समाज प्रबोधन पत्रिके' चे संपादक म्हणून श्री.वसंत पळशीकर, भा.शं भणगे, डॉ.स.ह.देशपांडे यांनी संपादकाची धूरा यशस्वीपणे सांभाळली आणि पत्रिकेला चांगला दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. १९८२ नंतर 'पत्रिका' बंद पडली. त्यानंतर १९९० साली प्रा.राजेंद्र व्होरा, प्रा.सुहास पळशीकर, प्रा.भास्कर भोळे, रेखा इनामदार, श्री.किशोर बेडकिहाळ यांनी 'पत्रिके'चे पुनरूज्जीवन करावयाचे ठरविले आणि राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर यांनी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. १३ वर्षे त्यांनी 'पत्रिका' चांगल्या प्रकारे चालविली आणि 'पत्रिके'स नवा बहर आला.

२००४ मध्ये समाज प्रबोधन पत्रिकेची धूरा नव्या संपादक मंडळाकडे देण्यात आली. श्री.महेश गावसकर यांनी संपादक म्हणून काम हाती घेतले. संपादक मंडळात प्रा.बगाडे, संजय देशपांडे, अजय दांडेकर, प्रा.नीरज हातेकर यांच्यासारख्या तरूण व नामवंत अभ्यासकांचा समावेश केला होता. 'पत्रिके'चे प्रकाशन बेळगावहून होऊ लागले. हे प्रकाशन नव्या रूपाने आणि नव्या संपादकीय दृष्टिकोनातून होऊ लागले.

२०११ साली ‘पत्रिके’चे कामकाज नव्या संपादक मंडळाकडे सुपूर्द केले आहे. डॉ. अशोक चौसाळकर यांनी संपादक म्हणून कार्यभार स्वीकारला तर डॉ. माधव दातार, डॉ. हेमा मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा.शैलेंद्र खरात यांचा समावेश संपादक मंडळात करण्यात आला. ‘समाज प्रबोधन पत्रिके’चा थोर वारसा जपण्याचा व समाजापुढे असणाऱ्या नव्या आव्हानांचा वेध घेण्याचा प्रयत्न ‘पत्रिका’ करीत आहे. २०१२ ला ‘पत्रिके’ला पन्नास वर्षे पूर्ण झाली. या पन्नास वर्षांमध्ये काळानूसार ‘पत्रिके’च्या स्वरूपात कसा फरक पडत गेला. राज्यात–देशात निर्माण झालेल्या समस्यांचा, प्रश्नांचा वेध पत्रिकेने घेतला याचे प्रत्यंतर त्यातील लेखांवरून येते.

डिसेंबर २०१२ ला ‘समाज प्रबोधन पत्रिके’ला पन्नास वर्षे पूर्ण झाली. पन्नास वर्षांपूर्वी समाज प्रबोधन संस्थेने हे नियतकालिक प्रकाशित करावयास सुरूवात केली. त्यावेळी स्वातंत्र्य मिळून उणीपूरी १४ वर्षे झाली होती व संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेस अजून दोन वर्षे पूर्ण व्हावयाची होती. आतापर्यंत देशाने केलेल्या वाटचालीबाबत सार्थ अभिमान व देशाच्या पुढील वाटचालीबाबत एक प्रकारचा सावधपणा त्यावेळी जाणत्या लोकमाणसात उपस्थित होता. पंडित नेहरूंच्या एकहाती नेतृत्वाचा तो संधिकाळ होता आणि संकटाचे काळे ढग देशाच्या क्षितिजावर अवतरले होते. भारताची यापुढची वाटचाल खडतर असून यापुढचा प्रवास अत्यंत धोकादायक ठरणार आहे, असा इशारा अमेरिकी पत्रकार सेलिंग हॅरिसन याने त्याच्या India- the most dangerous de cades या ग्रंथात दिला होता. आणि दुर्दैवाने तो इशारा खरा ठरलाय. या काळात दोन मोठी युद्धे झाली. दोन पंतप्रधानांचे निधन झाले, मोठे दुष्काळ पडले. देशाचा विकास दर शे–दोन अडीच टक्क्यांच्या आसपासच होता. लोकसंख्या वाढत होती. अनेक प्रांतात विभाजनवादी चळवळी डोके वर काढीत होत्या. त्याकाळात समाज प्रबोधन पत्रिकेने विवेक निष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, व लोकशाही मूल्यांच्या आधारे बिगर पक्षीय पातळीवर व्यापक प्रमाणावर वैचारिक जागृती करण्याचे कार्य आपल्या परीने पार पाडले.

या काळात ‘पत्रिके’मध्ये महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांनी आपले कसदार लिखाण प्रकाशित करून समाज शिक्षणाच्या कामास मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. त्यामुळे अल्पावधीतच वैचारिक जगात चांगली प्रतिष्ठा प्राप्त झाली. या काळात पत्रिकेचे त्यावेळचे संपादक

श्री.वसंत पळशीकर यांचे योगदान भरीव स्वरूपाचे होते. तीच परंपरा प्राचार्य भा.रां. भणगे यांच्या काळातही चालू राहिली. १९८२-९० या काळाचा अपवाद वगळता पत्रिकेचे प्रकाशन चालू राहिले. १९९० नंतर तिचे पुनरूज्जीवन झाले. यापूर्वी पत्रिका द्वैमासिक होते. १९९० नंतर ते त्रैमासिक झाले.

१९९०-९१ नंतर देशाच्या विकासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. १९९१ साली नव्या नरसिंहराव सरकारने देशात जात व जमात याबात निर्माण झालेल्या कलहाला छेद देत नव्या आर्थिक धोरणांना चालना दिली आणि पंडित नेहरू यांच्या काळात निर्माण झालेल्या मिश्र अर्थव्यवस्थेवर उभ्या असणाऱ्या राज्याच्या प्रतिमानाला आव्हान दिले. त्यानंतरच्या काळात मोठ्या देशात मोठ्या प्रमाणात बदल झाले. १९८० च्या दशकात शे. पाच टक्के दराने वाढणारी अर्थव्यवस्था शेकडा सात ते आठ टक्के दराने वाढू लागली. नंतर बाजारात ग्राहकांना विपूल प्रमाणात वस्तू उपलब्ध झाल्या व अभावग्रस्तता संपली. अन्नधान्याचे उत्पन्न १९६७ च्या तुलनेत तिपटीने वाढले. सर्वच क्षेत्रात उत्पादनात वाढ झाली. दरडोई उत्पन्न वाढले व आर्थिक विकासामुळे मध्यवर्गाच्या संख्येत मोठ्याप्रमाणात वाढ झाली. चीनच्या पाठोपाठ आशिया खंडातील वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था असे भारताचे वर्णन केले जाऊ लागले. गेली ५० वर्षे देशाला सतावणारी परकीय चलनाची समस्या कमी झाली.

या बदलाने अनेक नवे प्रश्न निर्माण झाले. १९७१ मध्ये देशात शे. ५५% लोक गरिबीच्या रेषेखाली राहात होते. आज ती संख्या शे.३०% च्या आसपास आहे. पण आजही शे.४०% लोक गरिबीच्या रेषेखाली आहेत. ही संख्या १९७१ पेक्षा शे. १० कोटींनी जास्त आहे. समाजात नवे ताणतणाव निर्माण झाले आहेत. आर्थिक विकासामुळे जातीचा प्रश्न सुटला नाही. त्याची दाहकता काही प्रमाणात कमी झाली असली तरी, राजकीय व व्यावसायिक स्पर्धेमूळे ती विकृत व हिंसक स्वरूपात अभिव्यक्त होत आहे. सर्व समाजास योग्य दिशेने नेणारी सर्वस्पर्शी व्यापक विचार सरणी देशात नसल्यामुळे जात व जमातींच्या अस्मिता तीव्र बनत आहेत. राजकीय पक्ष विखंडित होत असून दोन प्रमुख राकीय पक्षांना मिळून सार्वत्रिक निवडणुकीत शेकडा ५०% पेक्षा कमी मते मिळत आहेत. निम्म्यापेक्षा जास्त प्रांतात प्रादेशिक पक्ष सत्तेत आले असून पाच-

सहा राज्यात सशस्त्र विभाजनवादी चळवळी सुरू आहेत. राखीव जागांच्या मदतीने अनुसुचित जाती व जमातीतील सुशिक्षित वर्गातील काही संप्रदायांनी प्रगती केली असली, तरी या समूहांत मागासपण व गरिबी मोठ्या प्रमाणात आहे.

नव्या आर्थिक धोरणातून खाजगीकरण मोठ्या प्रमाणात होत असून भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेस जोडली जात आहे. या मार्गाने होत असलेल्या आर्थिक विकासात नवे उद्योगधंदे उभे राहत आहेत, शहरे वाढत आहेत. शेतजमिनीवर मोठ्या प्रमाणात आक्रमणे होत आहेत व प्रचंड आर्थिक सामर्थ्य असणाऱ्या नवनव्या 'लॉबिज' निर्माण होऊन आपल्या आर्थिक लाभासाठी निवडून आलेल्या प्रस्थापित लोकशाही यंत्रणा व नोकरशाही यांच्यावर आपले वर्चस्व स्थापन करीत आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

या सर्व परिवर्तनामूळे अनेक लोकांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. काहीजण संपूर्ण कुटुंब घरातील लहानग्या व निरागस मुलांना ठार मारून आत्महत्याही करीत आहेत. बेभान अवस्थेत वाहने चालवून रस्त्यावर बळी घेतले जात आहेत. थोडक्यात समाजाला मूळापासून हलवणारे हे मन्वंतर आहे.

या बदलांकडे केवळ नकारात्मक दृष्टिकोणातून पाहता येणार नाही. कारण, या बदलांना सामोरे जात नव्या जगाकडे आपणास वाटचाल करावी लागणार आहे. त्यासाठी पुन: पन्नाशीच्या दशकातील उपाययोजना उपयोगी असणार नाहीत. नवे प्रश्न, नव्या समस्या, नव्या उत्तरांची अपेक्षा करीत आहेत. समाज प्रबोधन पत्रिकेने पन्नास वर्षाच्या काळात भारतीय समाजात होत असलेल्या परिवर्तनाची, प्रश्नांची दखल घेतल्याचे पत्रिकेच्या व्यामिश्र स्वरूपावरून स्पष्ट होते.

सुरूवातीस पत्रिकेचे प्रकाशन दोन महिन्यांनी होत असे.पत्रिकेच्या प्रकाशनाचा दोन महिने हा काल फार मोठा होता. या दोन महिन्यात जगात खूपच उलाढाली होत असतात. परंतू पत्रिकेच्या वाचकांस दोन महिन्यांनी सन्माननीय लेखकांचे विचार वाचावयास मिळत असे. प्रदीर्घ काळ गेल्याने ज्ञानाचा ताजेपणा राहत नाही. पत्रिकेचे अंतरंग उच्चविद्याविभूषित मंडळींच्या दृष्टीतून पाहता सुंदर आहे. जाणकार मंडळींनी मांडलेले विचार विचारांना चालना देणारा असतात. त्या सर्वांनी आपले लिखाण उच्च पातळीवरून आपल्या खास शैलीत केलेले दिसते.

संस्थेचे कार्यक्षेत्र ग्रामीण महाराष्ट्रात होते. पण पत्रिकेला व संस्थेला आपण सर्वांनी नागरी आणि विशेष करून उच्चविद्याविभूषित बनविले. पत्रिकेबद्दल आपले विचार व्यक्त करताना दत्तू गोरे म्हणतात, ''वाचकांच्या पुरेपूर नजरेत पाहताना पत्रिका तशी रूक्ष रूपाची वाटते. तो दोष अगर गुण म्हणा वाचकांचा की पत्रिकेच्या चालकांच्या एका विशिष्ट प्रवृत्तीचा आहे. हे विचार करण्यासारखे आहे.''[3] आपल्याला मूलत: अभिप्रेत असणाऱ्या समाजापर्यंत पोचावयाचे असेल तर विषयात विविधता आणावी लागेल. पण त्या समाजाने काय वाचावे हे ठरविण्याबरोबर त्या समाजाला काय पाहिजे याचाही विचार करावा लागेल. वरील दोन्ही प्रश्नांचा विचार करून समाज प्रबोधन पत्रिकेने वेगवेगळे विषय हाताळले. राजकारण, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध विषयांवर पत्रिकेमध्ये लेख लिहिले. त्यातून त्या त्या क्षेत्रामध्ये प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

डिसेंबर २०१२ मध्ये समाज प्रबोधन पत्रिकेने पन्नास वर्षांच्या टप्पा पूर्ण केला.पत्रिकेची यशस्वी घौडदौड चालूच आहे. पत्रिकेच्या यशामागे जसे वेगवेगळ्या विषयांवर विचारमंथन करणारे विचारवंत आहेत तसेच संपादकही आहेत. पत्रिकेच्या या स्वरूपावरती संपादकाच्या विशिष्ट विचारसरणीचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. डिसेंबर १९६२ ते डिसेंबर २०१२ पर्यंत अनेक वेगवेगळ्या विचारसरणीच्या संपादकांनी आपल्या कतृत्वाने पत्रिकेला यशस्वीच्येच्या शिखरावर पोहोचविले. त्यामध्ये श्री.वसंत पळशीकर, श्री.भा.रा.भणगे, श्री.स.ह.देशपांडे, श्री.राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, किशोर बेडकिहाळ, श्री. महेश गावसकर, श्री.अशोक चौसाळकर इत्यादी प्रमुख संपादकांचा सिंहाचा वाटा आहे.

*** संपादकांची भूमिका आणि पत्रिकेचे स्वरूप –**

*** श्री.वसंत पळशीकर –**

महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण करणाऱ्या परंपरेतील साठोत्तर काळातील महत्त्वाचे विचारवंत. चिकित्सक लेखनाद्वारे महाराष्ट्राला मार्गदर्शन करणारे विचारवंत. विविध विषयांवर वैचारिक, सखोल लेखन करणारे विचारवंत वसंत पळशीकर हे डिसेंबर १९६२ पासून जून १९७२ पर्यंत संपादक म्हणून जबाबदारी स्वीकारली. ही जबाबदारी स्वीकारत असताना

समाजाला स्थैर्य व सातत्य प्राप्त करून देण्यासाठी वैचारिक विचारप्रणालीची आवश्यकता आहे, अशी त्यांची भूमिका होती. त्यातूनच महाराष्ट्र व भारताच्या नवनिर्मितीसाठी एक मूल्यनिष्ठ, ध्येय संपन्न वैचारिक बैठक घडविण्यास हातभार लावणाऱ्या समाज प्रबोधन पत्रिकेच्या संपादकाची धूरा श्री.वसंत पळशीकरांनी डिसेंबर १९६२ ते जून १९७२ पर्यंत सांभाळली.

तरूण वयातील वाचनाने गांधी विचार पुरेपूर अंगी बाणलेले आणि आचार्य विनोबा भावे, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, साने गुरूजी, रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, बाबा आमटे आदिंच्या सहवासाने व संपर्काने प्रत्यक्ष सामाजिक कार्यातही त्यांनी भाग घेतला. गांधीजींच्या विचाराने, कार्याने ते प्रेरित तर झालेच पण त्याचबरोबर सॉक्रेटिसच्या विचाराने त्यांना मोहिनी घातली होती. त्यांच्या विषयी मे. पु.रेगे म्हणतात, ''सॉक्रेटिसचा विचार, त्यांचे आचरण, त्याचा मृत्यू, अथेन्सच्या उन्नयनासाठी त्याने केलेले आत्मबलिदान ह्यांनी ते भारावून गेले आहेत. सॉक्रेटिस हा त्यांचा नैतिक हिरो आहे तर दुसरे नैतिक हिरो म्हणजे गांधीजी.''[४]

१९५६ साली महाराष्ट्रात परतल्यानंतर त्यांनी समाज प्रबोधनाच्या मौलिक कार्यात जीवनप्रती म्हणून पूर्णपणे झोकून दिले होते. 'नवभारत' या अव्वल वैचारिक नियतकालिकाचे काटेकोर संपादन दीर्घकाळ करून त्यांनी अनेक नवे लेखक व समीक्षकही घडवले. राजकारण, समाजकारण, साहित्य-कला, विज्ञान, शिक्षण, संस्कृती या क्षेत्राविषयी सातत्याने मौलिक लेखन केले. समग्रतेचे भान त्यांच्या लेखनात सातत्याने आढळते. मराठी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांचे लेखन कार्य पायाभूत ठरले आहे. त्यांनी केलेल्या या निष्ठापूर्वक कार्यामुळे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने त्यांचा 'जीवन गौरव' पुरस्कार देऊन सन्मान केला आहे.

श्री.वसंत पळशीकर हे संपादक असताना समाज प्रबोधन पत्रिकेने चांगला दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त केली. सोविएत रशियन क्रांतीच्या सुवर्णमहोत्सव निमित्त काढलेला विशेषांक खूप गाजला. पळशीकरांनी आपल्या सकस मराठी गद्याच्या माध्यमातून अनेक विषयांना हात घातला. अनेक पुस्तक परिक्षणे लिहिली. पत्रिकेत के. मुखर्जी, पन्नालाल सुराणा, देवदत्त दाभोळकर, प्राचार्य नाचण, अ.भि.शहा, म.द.हातकणंगलेकर, दि.क.बेडेकर इ. नामवंत लेखकांचे लेख छापण्यात

आले.

जागतिकीकरणामुळे अधिकच गुंतागुंतीची व आव्हानात्मक झालेल्या परिस्थितीमध्ये समाज स्थितीचे अवलोकन स्वतंत्र बुद्धिने निष्कर्ष काढणारे, पण हे करताना समग्रतेचे भान न सोडणारे विचारवंत ही काळाची गरज होती. ती गरज वसंत पळशीकरांनी आपल्या परीने भागविली. श्री. किशोर बेडकिहाळ म्हणतात, ''दीर्घकाळ आपल्या लेखनाने पळशीकरांनी आपल्या परीने ही समाजाची गरज व्रतस्थ विचारवंतांचे जीवन जगून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला यात त्यांच्या जीवनाचे साफल्य तर आहेच, पण मराठी विचार विश्वालाही अगदी आजच्या कालातही दखल घ्यायला लागेल असे विचारधन त्यांनी दिले, हे त्यांचे मोठेपण नजरेआड करता येत नाही.''[५]

वसंत पळशीकर हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य लेखक विचारवंत असून त्यांनी अनेकांना वैचारिक दिशा देण्याचा निरंतर प्रयत्न आयुष्यभर केला आहे. वसंत पळशीकरांची आधुनिक जीवन मूल्यांशी चोखंदळ बांधिलकी आहे. समुदायनिष्ठ जगण्याचा पुरस्कार करतानाच स्वातंत्र्य, समता, बंधुता, व्यक्तीसन्मान, धर्मनिरपेक्षता, सर्वधर्मसमभाव यांच्या पुरस्कारांच्या जोडीनेच धर्मचिकित्सा करताना पक्षपात अमान्य अशी ठाम विचारधारा त्यांच्या जगण्यातील लिहिण्यातील लेखन शैलीतील अभिमत्वाच्या सहजतेतून वाचकांचा वेध घेतो.

समाज प्रबोधन पत्रिकेमध्ये श्री वसंत पळशीकरांनी सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक विषयांवरील पुस्तकांची परीक्षणे केली. 'क्लाईबिंग ए वॉल ऑफ ग्लास', 'व्हिएटनामचा पेचप्रसंग', 'महाराष्ट्रातील लोकाशाही विचार, 'पापाचा खरा धनी', 'मलमपट्टीचे दिवस संपले', 'नेताजी सुभाषचंद्र बोस', 'विकारवश दुबळे चिंतन', 'गांधी, सत्याग्रह आणि डॉ. लोहिया', 'पर्वप्राय माणूस', 'लहान तोंडी मोठा घास', 'भारतीय लोकशाहीला आव्हान अंधश्रद्धेचे की राजकारणी महत्त्वाकांक्षेचे?' अशा ग्रंथपरिक्षणातून त्यांची चौफेर विचारसरणी स्पष्ट होते. श्री. भास्कर लक्ष्मण भोळे म्हणतात, ''वसंतरावांच्या संपादकत्वामुळे आणि त्यापेक्षाही पत्रिकेतून त्यांनी केलेल्या एकटाकी वजनदार लेखनामुळे त्या नियतकालिकाची प्रतिष्ठा तेव्हा खूप उंचावत चालली होती.''[६]

समाज प्रबोधन पत्रिका या नियतकालिकाचे स्वरूप निखळ वाङ्मयीन नाही तरीही यातून प्रकाशित झालेले वाङ्मयविषयक लेख गुणात्मक दृष्ट्या फारच वरच्या दर्जाचे आहेत. पत्रिकेला वसंत पळशीकरांमुळे हा दर्जा मिळाला. पळशीकरांची वाङ्मय विषयक जाण फारच व्यापक आणि सखोल होती व त्यांना सर्व मानवविधांची व विज्ञानाचीही भक्कम पार्श्वभूमी होती. त्यांचा हा वाङ्मय दृष्टिकोन त्यांच्यानंतर भा.शं.भणगे यांनीही आपल्या संपादन कार्यात दाखवला.

*** भालचंद्र शंकर भणगे–**

जुलै–ऑगस्ट १९७२ पासून सप्टेंबर–ऑक्टोबर १९७८ पर्यंत ते समाज प्रबोधन पत्रिकेचे संपादक होते. १९७८ मध्येते शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले. त्यामुळे त्यांनी संपादकपदाचा राजीनामा दिला. त्यांची एक तत्त्वनिष्ठ साक्षेपी विचारवंत म्हणून महाराष्ट्राला त्यांची ओळख झाली. त्यांनी 'अर्थसिद्धांत–काही चिकित्सक निबंध', 'कॉलेज व्यवस्थापन एक शिफारस', अशी ग्रंथपरीक्षणे केली तर याशिवाय लेख, टिपणे त्यांनी पत्रिकेतून लिहिली. त्यांनी लिहिलेली टिपणे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यांनी पत्रिकेतून ग्रंथपरिक्षणे, लेख कमी लिहिले. पण टिपणे खूप लिहिली. ती वाचकांच्या ज्ञानात भर घालणारी आहेत.

त्यांनी 'आर्थिक नियोजनातील नव्या वाटा, नवी वळणे', 'हे दुःख मोठे आहे!', 'सासवडच्या भेटीनंतर', 'समाजवादाची आशा दुरावली आहे', 'महाराष्ट्रातील विद्यापीठांसाठी नवा कायदा', 'जागतिक भाववाढ' इत्यादी विषयांवर काळाजी गरज ओळखून लेख लिहिले. त्यामधून त्यांनी सामाजिक, आर्थिक प्रबोधन घडवून आणले. श्री. आनंद नाडकर्णी म्हणतात, ''सामाजिक प्रबोधन घडवून आणणे ही त्यांची जीवननिष्ठा होती. त्यासाठी त्यांनी विविध मार्गांनी अहर्निश परिश्रम घेतले. त्यांच्या संपादन कौशल्याचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा पत्रिकेवर उमटला होता. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्यांच्या कामाचा व्याप खूप मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामुळे त्यांनी पत्रिकेच्या संपादक पदाचा राजीनामा दिला.

श्री. भणगे यांच्याजवळ सामाजिक प्रश्नांवर जागरूकतेने विचार करण्याची सवय, त्यासाठी आवश्यक असणारी बुद्धिची समावेशकता त्यांच्याजवळ होती. '''पत्रिके'च्या संपादकत्वाच्या (१९७२–१९७८) काळात त्यांनी नवे लेखक, नवे विषय, नवी सदर, स्वत:

लिहिलेली अनके विषयांवरील टिपणे यातून त्यांनी पत्रिका समृद्ध करीत नेली. व तिला प्रतिष्ठेचं स्थान मिळवून दिलं''[७]

श्री. भणगे 'समाज प्रबोधन पत्रिके'चे संपादक असताना पत्रिकेमध्ये नवे प्रयोग केले आणि अनेक नव्या लेखकांना पत्रिकेच्या व्यासपीठावर स्थान दिले. नंतर ते महाराष्ट्रातील नामवंत विचारवंत म्हणून मान्यता पावले. ते संपादक असताना पत्रिकेत छापलेली प्रख्यात कादंबरीकार प्रा. भालचंद्र नेमाडे यांची प्रा.चंद्रकांत पाटील यांनी घेतलेली मुलाखत खूप गाजली.

देशीवादाचा पुरस्कार करणाऱ्या तरूण साहित्यिकांचा वर्ग समाजात निर्माण झाला व त्यांनी मराठी साहित्य आणि समीक्षा क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले. दुसरा महत्वाचा लेख की शरद पाटील यांचा त्यांनी डॉ. गेल ऑम्बेर यांच्या ब्राह्मणेतर चळवणीवरील पुस्तकाचे विस्तृत परीक्षण केले आणि कम्युनिस्ट पक्षांच्या जातिविषयक भूमिकेवर कडक टीका केली. त्यानंतर केलेल्या वैचारिक संघर्षातून त्यांनी सत्यशोधक कम्युनिष्य पक्षाची स्थापना केली. श्री.भणगे संपादक असताना १९७७ साली झालेल्या निवडणूकीत जनता पक्षाला विजय मिळाला. त्या विजयाचे औचित्य साधून भणग्यांनी जनता वियानंतर हा विशेषांक काढला तो अनेकांना आवडला.

*** डॉ. स.ह. देशपांडे–**

मुंबई विद्यापीठाच्या शेती–अर्थशास्त्र विभागाचे डॉ. स.ह.देशपांडे हे नोव्हेंबर–डिसेंबर १९७८ ते डिसेंबर १९८२ पर्यंत पत्रिकेचे संपादक होते. त्यांनी संपादकत्वाची धूरा यशस्वीपणे सांभाळली. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विषयांवर मराठीतून तसेच इंग्रजीतून देखिल विपूल, कसदार लेखन केले आहे. त्यांची संपादनशैली वाचकांच्या मर्जीस उतरलेली दिसते.

त्यांनी 'भालचंद्र शंकर भणगे', 'शिलारसाहेब आणि पाटण्याचे फडकरी' असे दोनच लेख लिहिले असले तरी त्यांच्या संपादकीयाने प्रबोधनाचे काम केलेले दिसून येते. 'प्रबोधनाचे उन्मेष', 'आनंदमार्ग', 'सर्वस्पर्शी वैचारिक मांडणी' यामध्ये श्री. वसंत पळशीकर यांनी लिहिलेल्या 'सर्वस्पर्शी वैचारिक मांडणी नवसमाज निर्मितीसाठी एक प्राथमिक आवश्यकता' याचा परिचय

करून दिला आहे. 'पंचायतीराज्य', 'राजभाषा मराठीबद्दलचा वाद', 'जातीच्या हरळीची मूळी', 'गोरवाला', 'आपले बौद्धिक जीवन', 'आदिवासींचे हिंदूकरण', 'ग्रामायन', 'माणसंच माणसं', 'आढावा', 'नैतिक उर्जा', 'संपादकीय नीतीविषयी' असे वैविध्यपूर्ण लेख लिहिले. तसेच 'समाजवाद आणि हरिनाम'. 'अजून येतो वास फुलांचा', 'शहा' असे वैविध्यपूर्ण संपादकीय लिहिली.

डॉ. स.ह.देशपांडे हे संपादक असताना पत्रिकेवर टीका झाली. पत्रिका हिंदूत्ववादी असल्याचा आरोप 'तात्पर्यचे' संपादक श्री. सुधीर बेडेकर यांनी केला होता. त्यांच्या आरोपाचे खंडन 'संपादकीय नीतीविषयी' या संपादकीयामध्ये डॉ. स.ह. देशपांडे यांनी केले आहे. पत्रिकेचे स्वरूप मुक्त विचारांचे व्यासपीठ असेच आहे आणि त्या स्वरूपाला अनुसरून संपादकीय लिहिण्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते लिहितात,''माझ्या पूर्वीचे पत्रिकेचे संपादक विविध विचारसरणीचे होते. प्रा.भणगे यांचा मार्क्सवादाकडे कल होता. श्री.वसंत पळशीकर यांच्या समाजवादी विचारांवर गांधवादाचा मोठा प्रभाव आहे. पन्नालाल सुराणा लोकशाही समाजवादी आहेत. पण त्यामुळे पत्रिका अनुक्रमे मार्क्सवादी, गांधीवादी किंवा समाजवादी ठरली नाही. पत्रिका ही पत्रिकाच राहिली मुक्त विचारांचे व्यासपीठ''[८]

समाज प्रबोधन पत्रिकेची भूमिका मांडताना डॉ. स.ह.देशपांडे म्हणतात, ''प्रचार आणि प्रबोधन यात फरक केला पाहिजे. निरनिराळ्या विचारणींना वाव देऊन व शक्यतो त्यामध्ये चर्चेच्या रूपाने संघर्ष घडवून आणून विचारांची क्षितिजे विस्तारित करणे हा प्रबोधनाचा पाया आहे म्हणून कोणताही विचार पत्रिकेला अस्पृश्य नाही. अगदी कोणत्याही विचाराला पत्रिकेत मज्जाव नाही. 'An honest doubt is worth more than a thousand dogmas' हे वाक्य मी शिरोधार्य मानतो''[९]

१९७८ साली डॉ. भणगे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले आणि त्यांच्या राजीनाम्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक व सिद्धहस्त लेखक डॉ. स.ह.देशपांडे यांनी संपादक पद स्वीकारले आणि तीन–साडेतीन वर्षे त्यांनी पत्रिका चालविली. १९८२ मध्ये पत्रिकेचे प्रकाशन बंद झाले.

*** पत्रिकेचे पुनरूज्जीवन–**

१९८२ नंतर महाराष्ट्रात एक प्रकारची वैचारिक उदासीनता निर्माण झाली. पत्रिका बंद पडल्यानंतर 'सत्यकथा' हे मासिक मौजे प्रकाशनाने प्रकाशित करावयाचे थांबवले. त्यानंतर 'तात्पर्य' हे डाव्या विचार सरणीचे मासिक प्रकाशित होत होत. त्यातही सातत्य नव्हते. पण १९९० च्या सुमारास परिस्थितीत बदल झाला. समाज प्रबोधन पत्रिका पुन्हा प्रकाशित करण्याचा निर्णय झाला.

वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी जनसंपर्काची साधने, डावे–उजवे, मध्यमवर्गीय पक्ष, राजकीय व सामाजिक संस्था, ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्ता, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यासारखी सामाजिक शास्त्रे या सगळ्याच वर्तूळात वैचारिक चर्चेचे, वादविवादाचे प्रमाण फार कमी झालेले होते. गंभीर वैचारिक विषयांवर लेखन अगदीच थोडे होत होते. आणि अशा प्रकारचे लेखन प्रसिद्ध करणारी नियतकालिके हळूहळू बंद पडत होती. समाज प्रबोधन पत्रिकेचे प्रकाशनही १९८२ ला बंद झाले. परंतू १९९० नंतर पुन्हा पत्रिका सुरू झाली.

१९९० साली प्रा.राजेंद्र व्होरा, प्रा.सुहास पळशीकर, प्रा.भास्कर भोळे, प्रा.रेखा इनामदार व श्री. किशोर बेडकिहाळ यांनी पत्रिकेचे पुनरूज्जीवन करावयाचे ठरविले आणि प्रा.राजेंद्र व्होरा आणि प्रा.सुहास पळशीकर यांनी संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर त्यांनी १३ वर्षे पत्रिका चांगल्या प्रकारे चालविली आणि पत्रिकेस नवा बहार आला. अनेक नव्या–जुन्या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या अंकाचा चांगल्या प्रकारे उपयोग झाला. अनेक नवे लेखक या निमित्ताने पुढे आले. अनेक नव्या प्रश्नांना तोंड फोडण्यात आले. त्याबाबत मोठ्या प्रमाणाच चर्चा झाली. प्रा.जयंत लेले, प्रा.सदानंद मोरे, प्रा.भा.ल.भोळे, प्रा.राजेंद्र व्होरा, प्रा.एफ.एच.बेलूर, प्रा.य.दि.फडके, प्रा.रावसाहेब कसबे, प्रा.श्रीनिवास खांदिवाले, यांचे लेख पत्रिकेत प्रकाशित झाले. अरूण शौरी यांनी डी. आंबेडकर यांच्यावर केलेल्या टीकेचा प्रतिवाद प्रा.फडके यांनी पत्रिकेच्या एका अंकात प्रदीर्घ असा टीकालेख लिहून केला. विचारवेध संमेलनातील अध्यक्षीय भाषणे यात छापण्यात आली.

वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटना व कार्यकर्त्यांचे गट काही नियताकलिके प्रसिद्ध करतात पण त्यांचे स्वरूप मुख्यत्वेकरून त्या संघटना–गटाच्या मुखपत्राचे असते. त्यामुळे ती त्यांच्या वर्तुळापूरती मर्यादित राहतात. विशिष्य विचाराचे आग्रही प्रतिपादन करणारे किंवा प्रतिपक्षाची भूमिका खोडून काढणारे लेखन होताना दिसत नाही. हा प्रकार सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात सर्वच दृष्टीस पडतो. पुस्तकांची परीक्षणे म्हणजे एकतर त्या पुस्तकाची ओळख असते किंवा तरफदारी असते. अशा प्रकारची परिस्थिती असताना समाजातील विचारवंत असणारा गट शांत राहू शकत नाही. समाजातील ज्या समस्या आहेत, प्रश्न आहेत त्यांना वाचा फोडण्याचे कार्य समाज प्रबोधन पत्रिकेने आपल्या परीने केले आहे. सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात विचारांचे मंथन घडवून नवचैतन्य निर्माण करण्याचे काम पत्रिके ने केले आहे.

सामाजिक शास्त्रांच्या प्राध्यापकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये तर वैचारिक चर्चेचा अभाव फारच प्रकर्षाने जाणवू लागला आहे. भाषा विषयाचे प्राध्यापक, ललित लेखन करणारे साहित्यिक व समीक्षक त्यामानाने बऱ्या स्थितीत आहेत. काही नियतकालिके त्यांची गरज भागवित आहेत. पण साहित्य–समाज संबंध, संस्कृती, नाट्य, जनसंपर्क साधने या क्षेत्रातील चळवळी, नवे उपक्रम यांचा आढावा घेणारे व विश्लेषण करणारे लेखन साहित्याला वाहिलेल्या मासिकातून फारच कमी होते. शिवाय अलिकडे कार्यकर्ते त्यांच्या अनुभवांवर आधारलेले ललित लेखन करू लागले आहेत. त्यांच्या लेखनात कोणते प्रवाह दिसतात. स्वत:च्या कार्याचे कोणत्या प्रकारचे मूल्यमापन त्यांच्या लेखनात दिसते त्याची नोंद घेणे जरूरीचे आहे. साहित्याच्या प्रांतात दलित, ग्रामीण, जन, आदिवासी, कामगार, स्त्रीवादी अशा बऱ्याच चळवळी मराठी मुलूखात गेलीकाही वर्षे चालू होत्या. त्यांची सामाजिक, राजकीय अंगाने समीक्षा करण्याची वेळ येऊन ठेपली होती. या सर्व मुद्यांचा एकतर विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते, प्राध्यापक, विद्यार्थी, पत्रकार, जाणकार नागरिक यांची वैचारिक चर्चेची वाद–विवादाची गरज भागवू शकेल असे एक व्यासपीठ निर्माण होणे जरूरीचे होते. समाज प्रबोधन पत्रिकेचे पुनरूज्जीवन हा याच दृष्टिने केलेला एक प्रयत्न आहे. समाज प्रबोधन संस्थेने पत्रिकेचे प्रकाशन

१९९२ पर्यंत याच हेतुने केले होते. आर्थिक अडचणींमुळे हे प्रकाशन संस्थेला थांबवावे लागले. पुढे समाज प्रबोधन संस्था व इंडियन असोसिएशन फॉर कल्चरल फ्रीडम यांच्या सक्रीय प्रोत्साहनामुळेच पत्रिकेचे पुनरूज्जीवन शक्य झाले.

समाजवादी, माक्सवादी, हिंदुत्ववादी, गांधीवादी यासारख्या विचार प्रणालींच्या किंवा पर्यावरणवादी, स्त्रीवादी, शेतकरीवादी यासारख्या विचारप्रवाहांनी प्रभावित झालेले लेखन पत्रिकेमध्ये प्रसिद्ध झाल्याचे दिसते. वाद–प्रतिवाद व्हावा, चर्चा व्हावी, लेखकाने आपल्या विचारांचे केलेले समर्थन व प्रतिपक्षाच्या विचारांचे खंडन करणारे लेखन पत्रिकेमधून छापण्याचा संपादकांनी प्रयत्न केल्याचे पत्रिकेच्या स्वरूपावरून स्पष्ट होते.

१९९० नंतरच्या देशाच्या विकासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. १९९१ साली नव्या नरसिंहराव सरकारने देशात जात व जमात याबाबत निर्माण झालेल्या कलहाला छेद देत नव्या आर्थिक धोरणांना चालना दिली. आणि पंडित नेहरू यांच्या काळात निर्माण झालेल्या मिश्र अर्थव्यवस्थेवर असणाऱ्या राज्याच्या प्रतिमानाला आव्हान दिले. त्यानंतरच्या काळात देशात मोठ्या प्रमाणात बदल झाले. या बदलाने अनेक नवे प्रश्न निर्माण केले. नव्या आर्थिक धोरणातून खाजगीकरण अर्थव्यवस्था जोडली जात आहे. आर्थिक विकासात नवे उद्योगधंदे उभे राहिले. या सर्व परिवर्तनामुळे अनेक लोकांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले. आत्महत्यांचे प्रमाण वाढले. थोडक्यात समाजाला मूळापासून हालवणारे हे मन्वंतर घडून आले. या बदलाकडे केवळ नकरात्मक दृष्टिकोनातून पाहता येणार नाही. कारण या बदलांना सामोरे जात, नव्या जगाकडे आपणास वाटचाल करावी लागणार आहे त्यासाठी पुन: पन्नाशीच्या दशकातील उपाय योजना उपयोगी असणार नाही. नवे प्रश्न, नव्या समस्या, नव्या उत्तरांची अपेक्षा करीत आहे. ‘समाज प्रबोधन पत्रिके’ने भारतीय समाजात होत असलेल्या परिवर्तनाची दखल घेतली. त्या काळात समाज प्रबोधन पत्रिकेने विवेकनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य व लोकशाही या मूल्यांच्या आधारे बिगर पक्षीय पातळीवर व्यापक प्रमाणावर वैचारिक जागृतीचे कार्य आपल्या परीने पार पाडले आहे.

समाज प्रबोधन पत्रिकेने वाङ्मयीन संस्कृतीची समृद्धी निर्माण करण्याचे काम केले.

प्रकाश कामतीकर म्हणतात, ''नाविन्य ही नियतकालिकांची प्रत्येक दशकागणिक गरज असते. हीच नियतकालिके भाषेतील ग्रंथसंपत्तीची पार्श्वभूमी तयार करीत असतात. ग्रंथ हे वैयक्तिक जीवन जगतात तर नियतकालिकांना समूह जीवन मान्य असते. आणि म्हणूनच ग्रंथरूप संचिताऐवजी नियतकालिकांच्या सततच्या बदलत्या रूपावर वाङ्मयीन संस्कृतीची समृद्धी अवलंबून असते.''[१०] पत्रिकेने समाजामध्ये होणाऱ्या बदलानूसार आपल्या स्वरूपामध्ये बदल करून त्या त्या वेळच्या समस्यांवर प्रकाश टाकण्याचे कार्य केल्याचे स्पष्ट होते.

जानेवारी २००२ मध्ये संपादक मंडळात पुन्हा बदल करण्यात आला. संपादक म्हणून राजेंद्र व्होरा, प्रा.सुहास पळशीकर, श्री. किशोर बेडकिहाळ, भास्कर भोळे, शांताराम पंदेरे, आनंद तेलतुंबडे, किसन चोपडे यांनी काम पाहिले. पत्रिकेमध्ये चांगल्या प्रकारचे लेख, परिक्षणे यावेत यासाठी हे संपादक मंडळ सातत्याने प्रयत्नशील होते. पत्रिकेमध्ये सातत्य जपण्यासाठी या संपादक मंडळाने प्रयत्न केले. पत्रिकेच्या भूमिकेशी एकनिष्ठ राहून पत्रिकेची उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

*** श्री.महेश गावसकर–**

२००५ मध्ये समाज प्रबोधन पत्रिकेची धूरा नव्या संपादक मंडळाकडे देण्यात आली. इकॉनॉमिक व पॉलियिकल वीकली या जगप्रसिद्ध इंग्रजी साप्ताहिकात काम केलेले अभ्यासक श्री. महेश गावसकर यांनी संपादक म्हणून काम पाहिले. संपादक मंडळात प्रा.बगाडे, संजय देशपांडे, अजय दांडेकर, प्रा. नीरज हातेकर यांच्यासारख्या तरूण व नामवंत अभ्यासकांचा समावेश केला होता. पत्रिकेचे प्रकाशन बेळगावहून होऊ लागले. अनेक विषयांवर जास्त अभ्यासपूर्ण व सखोल असे लेख प्रकाशित करण्यात आले. अनेक इंग्रजी लेखांचे मराठी अनुवाद प्रकाशित करण्यात आले. चांगल्या अभ्यासकांना प्रेरित करून त्यांच्याकडून लेख लिहून घेण्यात आले. दर्जेदार पुस्तक परीक्षणे, प्रकाशित झाली. स्वत: गावसकरांनी वेगवेगळ्या गावांना भेटी देऊन पत्रिकेला वर्गणीदार मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी शारिरीक कष्ट सोसले. पत्रिकेला एक प्रकारचे आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यात त्यांच्या प्रयत्नांचा वाटा मोठा आहे.

२००५ मध्ये नवीन संपादक म्हणून श्री. महेश गावसकर यांच्याकडे जबाबदारी

आल्यानंतर प्रत्येक अंकात इतर लेखांव्यतिरिक्त विशिष्य विषयसूत्र घेऊन त्याभोवती सात–आठ दीर्घ विश्लेषणात्मक लेख देण्याचा आराखडा राबवला. प्रादेशिक भाषांमध्ये सामाजिक शास्त्रे व मानव्य शास्त्र विषयक लिखाणाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न समाज प्रबोधन पत्रिकेने केला. समाज प्रबोधन पत्रिकेचा जुलै–सप्टेंबर २००७ चा अंक इतिहास लेखन मिमांसा या विषयावर होता व विषयांतर्गक प्रसिद्ध झालेले सातही लेख खंड १ मध्ये समाविष्ट आहेत. दुसऱ्या खंडात समाज प्रबोधन पत्रिकेच्या जुलै–सप्टेंबर २००६ व आक्टोबर–डिसेंबर २००८ मधील आंतरराष्ट्रीय राजकारणातील लेखांचे संकलन आहे. वरील अंकांची अनुक्रमे युरेशिया, पश्चिम आशिया व ऊर्जेचे भू–राजकारण आणि शीत युद्धोत्तर भारतीय परराष्ट्र दोरण अशी विषयसूत्रे होती. तिसऱ्या खंडात एप्रिल–जून २००६ च्या अंकातील माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान या विषयसूत्रावरील काही लेख व जुलै–सप्टेंबर २००८ अंकातील पायाभूत भौतिक सुविधा या विषयासंबंधीचे लेख एकत्रित करण्यात आले. वरील तीन खंड वेगवेगळ्या विषयांना वाहिलेले असले तरी ते आंतरविद्याशास्त्रीय दृष्टीतून परस्परपूरक आहेत.

*** श्री. अशोक चौसाळकर–**

२०११ साली पत्रिकेचे कामकाज नव्या संपादक मंडळाकडे संस्थेने सूपूर्द केले आहे. २०११ पासून डॉ. अशोक चौसाळकर यांनी संपादक म्हणून कार्यभार स्वीकारलेला आहे. संपादक मंडळात डॉ. माधव दातार, डॉ. हेमा मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. शैलेंद्र खरात, श्री. देवेंद्र गावंडे यांचा समावेश करण्यात आला. ‘समाज प्रबोधन पत्रिके’चा थोर वारसा जपण्याचा व समाजापुढे असणाऱ्या नव्या आव्हानांचा वेध घेण्याचा प्रयत्न पत्रिकेकडून होत आहे.

जानेवारी २०१२ मध्ये ‘समाज प्रबोधन पत्रिके’ने ५० व्या वर्षात प्रवेश केला. ५० वर्षाच्या कालखंडात पत्रिकेमध्ये महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांनी आपले कसदार लिखाण प्रकाशित करून समाज शिक्षणाच्या कामास मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. त्यामुळे अल्पावधीतच वैचारिक जगात चांगली प्रतिष्ठा प्राप्त झाली. ‘समाज प्रबोधन पत्रिका’ हे महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रात मान्यता पावलेले नियतकालिक आहे.

*** समाज प्रबोधन पत्रिकेची उल्लेखनीय कामगिरी–**

१९६५ नंतरच्या काळात पत्रिकेने वैशिष्ठ्यपूर्ण विशेषांक काढले. त्यामध्ये सोव्हिएत रशिया विशेषांक, जनता विजयानंतर, काश्मिर प्रश्न, डॉ. आंबेकडकर विशेषांक, भारतीय राजकारण विशेषांक, निवडणूक २००४, अस्वस्थांचा अविष्कार असे वेगवेगळ्या विषयांवर विशेषांक काढले. सातत्याने नव्या नव्या विशेषांकांची योजना आखणे, त्यासाठी लेखन मिळवणे, शक्य तितक्या परिपूर्ण स्वरूपात तो विशेषांक प्रसिद्ध करणे ही धडपड त्या सर्व विशेषांकांच्या स्वरूपावरून लक्षात येते. पत्रिकेच्या विशेषांकांचे स्वरूप साचेबंद नाही. विशेषांकासाठी निवडलेल्या विषयांवरूनही हे लक्षात येऊ शकेल. काश्मिर सारख्या एखाद्या गंभीर समस्येवर विशेषांक काढण्याची कल्पना तर अभिनवच म्हटली पाहिजे.

विशेषांकाच्या विषयाच्या निवडीप्रमाणेच विषयाची हाताळणीदेखील वेगळ्या प्रकारे केल्याचे दिसून येते. पत्रिकेच्या विशेषांकामधून झालेले लेखन त्या त्या विषयाचा समग्रपणे विचार करणारे अभ्यासपूर्ण व गंभीर असेच आहेत. त्या सर्व लेखनातील वस्तुनिष्ठता व शिस्त यामुळे आजही हे विशेषांक अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असेच आहेत. या विशेषांकांचे संकलन, संयोजन करताना संपादकांनी आपली मूळ भूमिका सोडलेली नाही. या सर्व विशेषांकांमधील निवडलेल्या विषयांवरील चर्चेत साहित्याचे स्वायत्त क्षेत्र आखून घेण्याचा व साहित्याचा साहित्य म्हणून साहित्य मूल्यांच्या आधारे विचार करण्याचा प्रयत्न स्पष्टपणे जाणवतो.

*** सोव्हिएत रशिया विशेषांक–**

सोव्हिएत रशिया हे जगातील आकाराने आणि सामर्थ्याने एक मोठ्यातले मोठे राष्ट्र आहे. जगाच्या राजकारणात आज सोव्हिएट रशिया ही एक बडी सत्ता आहे. ताश्कंद कराराच्या घटनेने सोव्हिएत रशिया राजकीय दृष्ट्या आपणास किती निकटवर्ती आहे. त्याचीही प्रचिती आपणास आली आहे. ही सर्व कारणे आहेतच की ज्यांच्यासाठी सोव्हिएत रशियाची वाचकांस ओळख व्हावी या हेतूने विशेषांक काढला.

आणखी महत्त्वाचे कारण–''शासनसंस्थेच्या पुढाकाराने आणि नियंत्रणाखाली एका अविकसनशील देशाची झपाट्याने आर्थिक, औद्योगिक व लष्करी वाढ घडवून आणावयाची

झाली, आणि अशा देशात लोकशाहीची परंपरा दृढ नसल्या म्हणजे कोणते तणाव निर्माण होतात आणि त्यांची सोडवणूक कशी केली जाते त्याचे दिग्दर्शन सोव्हिएत रशियाच्या उदाहरणाने घडते. त्यापेक्षाही प्राथमिक पातळीवर ज्या देशातील समाजघडी व शासन पुरते विस्कटले जाते व खिळखिळे होते तेथे पुन्हा एक खंबीर शासन निर्माण करावयाचे झाल्यास एकाधिकार हुकूमशाही कशी अपरिहार्य बनते याचा सोव्हिएत रशिया हा एक उत्तम वस्तूपाठ आहे. सोव्हिएत रशियाच्या इतिहासापासून भारतातील राज्यकर्त्या पक्षाला, शासनाला आणि विरोधी पक्षाला बराच बोध घेण्यासारखा आहे.''[११]

सोव्हिएत रशियाचा अभ्यास करण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे बेल्शेविक क्रांतीने साऱ्या जगातील श्रमिकांना दिलेले अभिवचन विज्ञानाच्या साहाय्याने निर्माण केलेल्या वैफल्याच्या अधिष्ठानावर शोषण रहित, समान व स्वतंत्र व्यक्तीचा समाज निर्माण करण्यासाठी सोव्हिएत रशियाने प्रस्थान ठेवले होते व आजही आपले ते अभिवचन सोव्हिएत रशिया विसरू शकत नाही.

ध्येय आणि व्यवहार यातील संबंध गुंतागुंतीचे आहेत. ''कोणत्याही समाजाचे तारू फार भरकटू नर देण्याचे कार्य बजावणारे सुकाणू म्हणजे त्या समाजाने अबोध पातळीवर स्वीकारलेले ध्येय असे म्हणता येईल. प्रत्यक्ष व्यवहाराला देशकालमान परिस्थितीच्या खूपच मर्यादा पडतात. तशा रशियाच्या गेल्या पन्नास वर्षांच्या जीवनालाही पडलेल्या आहेत. स्तालिन ही देखील अशीच एक मर्यादा. आणि तरीही या सर्व व्यवहारांच्या तडाख्यांनी हेलकावले भरकटले जात असतानाही सोव्हिएत रशियाला एका मार्गावर ठेवण्याचे कार्य श्रमिकांच्या राज्याच्या स्वप्नाने केले.''[१२] या अंकातील लेखांचा एकत्र परिणाम सोव्हिएत रशियाच्या यशापयशांचे, कामगिरीचे एक वस्तूनिष्ठ, चिकित्सक पण सहानुभूतीपूर्ण चित्र उभे केलेले आहे.

'सोव्हिएत रशियाची पन्नास वर्षे' या विशेषांकामध्ये मार्क्स, कामगार क्रांती आणि रशिया या विषयांवर प्रभाकर पाध्ये, दि.के. बेडेकर, अलेक्स इंकलेस यांनी विचार मांडले आहेत. राजकीय घडामोडीचा अभ्यासपूर्ण परामर्श वसंत पळशीकरांनी पाच लेख लिहून घेतला आहे. त्याचबरोबर चंद्रकांत वर्तक, प्रकाश कार्डिले यांचे लेख आहेत. रशियाच्या आर्थिक घडामोठीवर हेमलता राईरकर, वसंत देशपांडे, का.म.गावसकर, आनंद नाडकर्णी, शरद सप्रे, लता पाटणकर

यांनी लेख लिहिले आहेत.

खरे म्हणजे वस्तूचे मूल्य श्रमानेच ठरते. एखाद्या मूल्यांचे केवळ आणि सापेक्ष असे जे अंश असतात. त्यात काहीतरी अर्थपूर्ण नाते असावे लागते. मूल्य आणि किंमत यामध्ये असे नाते सिद्ध करण्यासाठी मार्क्स धडपडत होता, हे प्रभाकर पाध्ये यांनी मार्क्सचा मूल्यविचार या लेखामधून पटवून दिले आहे.

मार्क्सच्या समाज परिवर्तनासंबंधीची भूमिका दि.के.बेडेकर यांनी 'मार्क्सचा समाजपरिवर्तनाचा दृष्टिकोन' या लेखात मांडला आहे. या भूमिकेच्या दृष्टीने रशिया व चीन या देशांतील प्रत्यक्ष परिवर्तनाचे मूल्यमापन केले आहे. परिवर्तनाचे साध्य, मार्ग आणि प्रत्यक्ष परिवर्तनातून आलेले अनुभव यांची मीमांसा तीन भागात केली आहे.

*** जनता विजयानंतर –**

समाज प्रबोधन पत्रिकेमध्ये नेहमीच समाजातील बदलांचा, समस्यांचा, प्रश्नांचा उहापोह केलेला दिसतो. सोव्हिएत रशियाचा विशेषांक काढण्यामागे जी दूरदृष्टी होती तशीच दूरदृष्टी १९७७ ची जी अटीतटीची निवडणूक झाल्यानंतर जनता विजयानंतर हा विशेषांक काढण्यामागे होती. निवडणूकीसाठी जाहीरनामा तयार करून मतदारांना आपल्या पक्षाकडे कसे आकृष्ट करून घेता येईल. याकडे सर्व पक्षांचे लक्ष असते. म्हणून बनविण्यात येणारे जाहिरनामे जाणिवपूर्वक बनविण्याकडे अनेक पक्षांचा कल असतो. पक्षांचे कार्यक्रम काय होते, ते मतदारांना आपल्याकडे आकृष्ट करून घेण्यात किती यशस्वी ठरले. यासंबंदी पक्षाचे कार्यक्रम हा लेख पन्नालाला सुराणा यांनी लिहिला आहे.

जनता पक्षाचा राजीनामा समतोल कसा होता हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. भिन्न दृष्टीकोण, धोरणे, परंपरा व कार्यपद्धती असलेले संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल, समाजवादी हे चार पक्ष आणि चंद्रशेखर प्रभृती बंडखोर काँग्रेसवाल्यांचा गट अशा या पाच प्रवाहांचा मिळून जनता पक्ष बनला. ११ फेब्रुवारी १९७७ ला जनता पक्षाचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला. हा जाहिरनामा इतका विस्तृत समतोल आणि मुद्देसुद होता की जनता पक्षाने १९७७ च्या निवडणूकीत बाजी मारली. इंदिरा हुकूमशाहीला कंटाळलेल्या जागृत जनमताची साथ

जनता पक्षाला मिळाली.

१९७७ च्या निवडणूकीमागील वैचारिक पार्श्वभूमी काय होती याचा परामर्श अशोक चौसाळकरांनी घेतला आहे. ‘आर्थिक धोरण’, ‘जनता राज्य आणि मूस्लिम प्रश्न’ याबाबत जनता पक्षाचे काय धोरण होते. तसेच देशाच्या प्रगतीबरेबर समाजातील स्त्रियांचे स्थान, प्रगती याकडेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न इंदूमती केळकर यांनी केला आहे. युवाशक्तीची मदत घेऊन जनता पक्षाने पुढची झेप कशी घेतली याविषयी आपले मत पळशीकरांनी मांडले आहे. जनता पक्षाच्या विजयाने रंगमंच मोकळा झाला, लोकांचे मनोधैर्य उंचावले आहे. आत्मविश्वास परतला आहे आणि उत्साह उत्पन्न झाला आहे. हा विशेषांक असल्यामुळे त्यात विषयांची विविधता येऊ शकली नाही.

*** काश्मिर प्रश्न–**

समाज प्रबोधन पत्रिका १९९० पासून पुन्हा सुरू झाली. ज्या उद्देशाने ही पत्रिका सुरू झाली तो उद्देश समोर ठेऊन पुन्हा नव्या दमाने आपली वाटचाल सुरू केली. १२९ हा अंक पत्रिकेचा काश्मिर विषयक विशेषांक सादर केला. गेल्या काही वर्षामधील पत्रिकेचा हा पहिलाच विशेषांक आहे. काश्मिर प्रश्नाच्या गुंतागुंतीचा वाचकांना एकत्रितपणे आढावा घेणे शक्य व्हावे या हेतूने हा विशेषांक तयार केला असल्याचे संपादकांनी स्पष्ट केले आहे. काश्मिर प्रश्नाचा अभ्यास करून त्याविषयी मराठीत लेखन करणाऱ्या किंवा केलेल्या लेखकांची संख्या मर्यादित आहे. शिवाय मराठी लेखन वाचकांना तुलनेने सहजगत्या उपलब्ध होऊ शकते त्या मानाने इंग्रजीत या प्रश्नाविषयी जे विपूल लेखन होत आहे ते मराठी वाचकांना सहजगत्या उपलब्ध होत नाही. या विशेषांकामुळे इंग्रजीतील विविध लेख व ग्रंथ यांची माहिती वाचकांना मिळाली.

काश्मिर प्रश्नांमध्ये अनेक मुद्दे गुंतलेले आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण, भारतीय राष्ट्रवाद, संघराज्य आणि स्वायत्ता, प्रादेशिक अस्मिता सुरक्षा दले आणि मानवी अधिकार, पक्षीय राजकारण इत्यादी अनेक पैलूंचा काश्मिर विषयक विशेषांकात विचार मांडला आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये काश्मिर प्रश्नाने उग्ररूप धारण केले असून मनुष्य हानी आणि वित्तहानीचे प्रमाण अतोनात वाढले आहे. अशा वेळी काश्मिर विषयी विविध प्रकारची माहिती वाचकांपुढे ठेऊन सदर

प्रश्न योग्य त्या संदर्भात समजून घेण्यास वाचकांना उद्युक्त करावे या हेतूने हा विशेषांक काढल्याचे संपादकांनी नमूद केले आहे. काश्मिर विषयक विशेषांकात सर्वच बाबींचा ऊहापोह झालेला नाही. विशेषत: दहशतवाद्यांकडून होणारे अत्याचार, काश्मिरी अस्मितेचा प्रश्न आणि स्वयंनिर्णयाच्या मागणीमधील आंतरराष्ट्रीय गुंतागुंत हे विषय यायला हवे होते, परंतू त्यावर विचार मांडले गेले नसल्याचे स्पष्ट होते.

*** डॉ. आंबेडकर विशेषांक–**

अरूण शौरी यांचे डॉ.आंबेडकरांवरील 'वर्शिपिंग फॉल्स गॉडस' या पुस्तकात त्यांनी डॉ. आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व, नेतृत्व आणि विचार यावर आक्रस्ताळी आणि अनाठायी टीका केली होती. डॉ. य.दि.फडके यांनी शौरींच्या विखारी टीकेला संयत आणि अभ्यासपूर्ण प्रत्युत्तर देणारा लेख पत्रिकेमध्ये छापला. या लेखात मुख्यत: डॉ. आंबेडकरांच्या घटना परिषदेतील सहभागाचा ऊहापोह आहे. प्रस्तुतचा अंक डॉ. आंबेडकर विशेषांक म्हणून पत्रिकेने सादर केला. या विशेषांकाचा हेतू असा की, शौरींची टीका बुद्धिभेद करणारी आहे, पुराव्यानिशी आंबेडकरांवर टीका करण्याचा आव त्यांचे पुस्तक आणते. त्यातील उतारे विविध ठिकाणी प्रसिद्धही झाले अहोत. अशावेळी पत्रिकेच्या वाचकांना सलगपणे एकाच ठिकाणी विस्तृत माहिती देऊन शौरींच्या लिखाणातील कुटिल नीतीची जाणीव करून द्यावी यासाठी या विशेषांकाची योजना केल्याचे दिसून येते.

या विशेषांकामध्ये अरूण शौरी यांनी डॉ. आंबेडकरांवर केलेल्या आरोपांचे खंडन डॉ. य.दि.फडके यांनी केले आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत, हे त्यांनी आपल्या खंडनात स्पष्ट करून सांगितले आहे. अरूण शौरींच्या दहा आरोपांचे खंडन त्यांनी केले आहे. केवळ अस्पृश्य जातीत जन्म झाल्यामुळे आजही शौरींसारके बहुसंख्य सवर्ण हिंदूंचे प्रतिनिधी आंबेडकरांना उपराच मानतात. त्यांची कोंडी करणाऱ्या सवर्ण हिंदू नेत्यांचे मूल्यमापन करावयास शौरीसारखे लेखक धजावत नाहीत; अशी खंत डॉ. य.दि.फडके यांनी व्यक्त केली आहे.

डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे एकमेव जनक असल्याचे मिथक जनमानसात

रूजले असून डॉ. आंबेडकरांच्या मसुदा समितीत तयार केलेल्या ३१५ कलमांच्या मसुद्यातील केवळ अर्धा भाग नव्हे तर पंचमांश भाग १९३५ च्या कायद्यातून उचलला होता असे अरूण शौरींचे म्हणणे होते. ते पूर्णत: कसे चूकीचे आहे हे डॉ. य.दि.फडके यांनी पटवून दिले. भारतीय राज्यघटना तयार करताना ज्या आंबेडकरांनी आपल्या बिघडलेल्या तब्येतीची पर्वा न करता घटना पूर्ण कशी समर्पित भावनेने केली. ते डॉ. य.दि.फडके यांनी स्पष्ट करून सांगितले. समाज प्रबोधन पत्रिकेने डॉ. आंबेडकर विशेषांक काढून पार मोठे कार्य केले. अरूण शौरीसारखे मनात आकस ठेऊन पूर्ण परिस्थितीचा अभ्यास न करता आरोप करतात. अशा लोकांना दिलेले हे सडेतोड उत्तर आहे.

*** भारतीय राजकारण विशेषांक –**

१९९८ ची लोकसभा निवडणूक ही स्वातंत्र्योत्तर निवडणूकांच्या इतिहासातील वैशिष्टपूर्ण निवडणूक मानली जाते. १९७७ पर्यंत केंद्रात कॉंग्रेसची अनाभिषिक्त सत्ता होती. त्यामुळे तोवरच्या निवडणूका या कॉंग्रेसच्या विजयावर शिक्कामोर्तब होण्यासाठीच घेतल्या जात होत्या. इंदिरा गांधींनी आणिबाणी आणल्यानंतर सर्वप्रथम कॉंग्रेसेत्तर पक्षांच सरकार बनलं. भारताच्या राजकारणातील कॉंग्रेस विरोधातील ही पहिली लाट म्हणता येईल. त्यानंतर झालेल्या निवडणूकांमध्ये भारतीय मतदार कोणत्या ना कोणत्या लाटेवर कमी–जास्त प्रमाणात आरूढ झालेला दिसतो. १९८० मध्ये इंदिरा गांधींना अवमानित करणाऱ्यांच्या विरोधात; १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येच्या निषेदात, १९८८ मध्ये बोफोर्स आणि भ्रष्टाचाराच्या मुद्यावर, १९९१ मध्ये राजीव गांधीच्या हत्येच्या निषेर्धात आणि रामजन्मभूमीच्या मुद्यावर मतदारांनी आपला कौल दिलेला दिसतो. देशाच्या राजकारणात महत्त्वाचे सामाजिक बदल घडत होते. त्याचाही या मुद्दांना बढावा मिळण्यात कसा वाटा होता याबद्दल सविस्तर मांडणी सुहास कुलकर्णी यांनी १९९८ च्या लोकसभा निवडणूक निकालाच्या अन्वयार्थ स्पष्ट करताना मांडली आहे.

१९९८ ची निवडणूक अकाली असली तरी अटळ होती. १९९६ मध्ये संयुक्त आघाडीच्या सरकारला पाठिंबा देताना नरसिंहराव, शरद पवार, राजेश पायलट, अंतुले या कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी संसदेत ज्या आणाभाका दिल्या होत्या. त्यातून पुढील काळात कॉंग्रेस

संयुक्त यांची भाजपा विरोदी आघाडी बनेल याचे चित्र स्पष्ट झाले होते. १९९८ च्या निवडणूकीने आणि निवडणुकीनंतरच्या घडामोडींमुळे आगामी राजकारणाविषयची पुरेशी स्पष्टता आली आहे. स्त्री–पुरूष, तरूण–वृद्ध, सुशिक्षित अशिक्षित या भेदांपलीकडे जाऊन मतदारांनी आपले पक्ष निवडले आहेत. पक्ष निवडताना आपले आर्थिक सामाजिक हितसंबंध सुरक्षित कसे राहतील याची दक्षता मतदारांनी कशी घेतली यावर लक्ष वेधलेले दिसते.

१९९८ च्या निवडणूका त्यामुळेच फार काही सूचित करून जातात असे म्हणावेसे वाटते. निव्वळ स्थैर्यासाठी किंवा ऐक्यासाठी मतदारांनी मतदान केलेले नसून आपापले हितसंबंध रेटण्यासाठी नेमकेपणाने मतदान झालेले आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. उद्याच्या राजकारणात त्यामुळेच हितसबंधाचा संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या संघर्षाचे नियम, दिशा आणि गतीशास्त्र जे समजून घेईल तो उद्याच्या भारताचा नेता असेल, ही बाब अधोरेखित करणे हेच १९९८ च्या निवडणूकीचे योगदान असल्याचे सुहास कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

आपल्या देशातील राजकारण आणि राजकारणी यांच्या उल्लेखासरशी कुतूहल आणि कुचेष्टा या दोन रूपात बहुतेक वेळा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जातात. दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांमुळे राजकारणाविषयीच्या उथळ माहितीत बरीच भर पडताना दिसते. वारंवार येणाऱ्या निवडणूका, अस्थिर सरकारे, अविश्वासाचे ठराव यांच्यामुळे राजकारणाच्या सुत्राची जाणीव सहज होत नाही. मग फक्त राजकीय नेत्यांच्या पराकोटीच्या स्वार्थावर सगळे खापर फोडण्याचा मार्ग तेवढा शिल्लक उरतो. गेल्या १० वर्षामध्ये चार वेळा लोकसभेची निवडणूक झाली. एकदाही कोणात्या एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. एकदाच सरकाने पाच वर्षाची मुदत पूर्ण केली. या बाबी लक्षात घेतल्या तर काँग्रेस पक्षाची सद्दी असतानाच्या काळात आणि सद्याच्या परिस्थितीत राजकारणाचे स्वरूप खरच किती वेगवेगळे आहे हे जाणवते. काँग्रेसचे वर्चस्व आणि काँग्रेसच्या पश्चात काळातील स्थिती ही भारतीय राजकारणाच्या कथानकाची दोन प्रमुख अंगे दिसत असली तरी प्रत्यक्षात या कथानकात अनेक उपकथानके आहेत. लोकशाहीची स्वप्ने आणि वर्चस्वाचे वास्तव यात भारतीय राजकारण हेलकावे घेत राहिलेले दिसते. या हेलकाव्यांचा वेध घेत सध्याच्या

राजकारणाचे आकलन करून देण्याचा प्रयत्न सुहास पळशीकर यांनी केला आहे. सुहास पळशीकर म्हणतात, ''लोकशाहीच्या निव्वळ स्वप्नातील आकांक्षांच्या पलीकडे जाऊन धूरिणत्वाच्या प्रकल्पातील विसंवादावर आघात करणारे राजकारण उभे करावे लागेल. अशा राजकारणांसाठी आवश्यक अशी पक्षीय; आंदोलनात्मक आणि वैचारिक आयुधे कोठे आहेत या प्रश्नाने लोकशाहीचे समर्थक अंतर्मूख झाले तर तो कदाचित नव्या राजकारणाचा मूळ आरंभबिंदू ठरू शकेल.''[१३]

भारतीय राजकारण समजून घ्यायचे असेल तर या देशातील मध्यम वर्गाचे स्वरूप समजून घ्यावे लागेल. या वर्गाचे भारतीय समाजात नेमके कोणते स्थान आहे; त्यांची संस्कृती कोणत्या प्रकारची आहे व राजकारणात त्यांचा प्रभाव कसा पडतो आहे याची उत्तरे शोधल्याशिवाय आपल्या देशाच्या राजकारणाचा उलगडा होणार नाही.

भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात असलेले अर्थकारण व समाजकारण कळीच्या जागा अडवून बसलेला व स्वत:ची संस्कृती व जगण्याची तऱ्हा सर्व समाजाला आदर्श घ्यायला लावणारा मध्यम वर्ग राजकारणामध्ये हस्तक्षेप करणार हे क्रमप्राप्तच आहे. परंतू मध्यम वर्गाचा राजकारण आणि राज्यसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोण अंतविरोधाने भरलेला आहे. याची नोंद राजेंद्र व्होरा यांनी घेतलेली आहे. खाजगीकरणाच्या लाटेवर आरूढ झाल्यावर राज्यसंस्थेने आपले बस्तान गुंडाळावे असे त्याला वाटायला लागले. कमकुवत गटांना कल्याणाकारी योजनामार्फत विनाकारण मदत करू नये, असे त्यांचे मत असे. प्रत्येकाने आपआपली लायकी वाढवून विकास करून घ्यावा या मताचा पुरस्कार मध्यम वर्ग कसा करतो हे राजेंद्र व्होरा यांनी पटवून दिले आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षांचा राजकीय अनुभव, विविध राजकीय, सामाजिक चळवळी यामुळे भारतीय समाजात जागृती निर्माण झाली आहे. राजकीयदृष्ट्या जागृत व पुढारलेल्या जातींचे ध्रुवीकरण जवळजवळ पूर्ण झाले आहे. 'जमातवादाचा धोका आणि पुरोगामी चळवळ' या लेखांत श्री. किशोर बेडकीहाळ यांनी जमातवादाचे, त्याची कारणमिमांसा स्पष्ट केली आहे. जमातवादाचा धोका नेमका कशाला आहे? लोकशाहीची संकल्पना, संघराज्य कल्पना व

सेक्युलेरिझम या तीनही गोष्टींना जमातवादाचा आज तीव्र धोका असल्याचे स्पष्ट केले आहे. भारतातील जमातवाद प्रामुख्याने हिंदू–मुस्लिमांच्या द्वंद्वातून व ब्रिटिशांच्या फोडा व झोडाच्या नीतीतून निर्माण झाला आणि भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता काटेकोरपणे अंमलात आणली न गेल्यामुळे जमातवाद वाढला, फोफावला असल्याचे श्री. किशोर बेडकीहाळ यांनी स्पष्ट केले.

भारताने निवडलेल्या लोकशाही व्यवस्थेच्या प्रारूपात राजकारण दोन पातळ्यांवर आकार घेत असते. औपचारिक पातळीवरील निवडणूकीचे राजकारण इथला राजकीय अवकाश प्राधान्याने व्याप्त असले तरी ते लोकशाहीचा आशय सर्वस्वी व्यक्त करू शकत नाही. त्याच्या जोडीने अनौपचारिक पातळीवरील संघटनात्मक चळवळीचे राजकारण ताकदीने उभे राहणे गरजेचे असते. औपचारिक पातळीवरील संसदीय राजकारणाला निश्चित आशय व दिशा संघटनात्मक चळवणीच्या राजकरणातून मिळेल असा विश्वास या ना त्या पद्धतीने परिवर्तनवादी, मुक्तीचे राजकारण करू पाहणाऱ्या सर्व गटांनी बाळगला असल्याचे राजेश्वरी देशपांडे यांनी स्पष्ट केले आहे.

*** निवडणूक २००४: अस्वस्थांचा अविष्कार विशेषांक–**

२००४ च्या लोकसभा निवडणूकीत अटलबिहारी वाजपेयी यांना पराजयला सामोरे जावे लागले होते. या निवडणूकीमध्ये काँग्रेस शंभरचा आकडा पार करू शकणार नाही असे छातीठोकपणे सांगितले जात होते. प्रत्यक्षात त्यांनी १४५ च्या जागा मिळविल्या. भाजपाला मात्र १३८ जागाच मिळाल्या म्हणजे काँग्रेसच्या जागा वाढल्या व भाजपाच्या घटल्या असे चित्र निर्माण झाले. २००४ च्या निवडणूकीमध्ये जनतेने 'आम्हाला केंद्रात परिवर्तन हवे आहे' असा कौल दिला असे स्पष्ट होते.

आर्थिक सुधारणांच्या या विरोधात जनतेने कौल दिलेला नाही. जनतेला गोरगरिबांना डोळ्यासमोर ठेवून केलेले परिवर्तन हवे आहे. रस्ते, झोपडपट्ट्या सुधारणा, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्था या गोष्टी हव्या आहेत. राज्यपातळीवर परिवर्तन आणि संवेदनशील प्रशासन या त्यांच्या मागण्या हव्या अहेत. जनतेला केवळ उद्योग अभिमूख नव्हते तर सामाजिक व

लोककल्याणकारी कार्यक्रमांना प्राधान्य देणाऱ्या सुधारणा हव्या असल्याचे नमूद केले आहे. २००४ च्या १४ व्या लोकसभा निवडणूकीचे निकाल सर्वस्वी अनपेक्षित स्वरूपाचे लागले आहेत.

एका अर्थाने कॉंग्रेसपक्ष व त्यांचे सहकारी या निवडणूकीत अस्वस्थता वाहक म्हणून विजयी झाल्याचे दिसतात, मंडल, मंदिर, मार्केट या तिन्ही मुद्यांच्याद्वारे कॉंग्रेसने सत्ता काबिज केली. प्रस्थापित आर्थिक धोरणांविषयीची आपली अस्वस्थता मतदारांनी प्रादेशिक पक्षांविरोधात व्यक्त करून कॉंग्रेसच्या विजयास हातभार लावला याचे सविस्तर विवेचन २००४ च्या निवडणूकीवरील विशेषांकातून स्पष्ट होते.

*** रवीन्द्रनाथ टागोर विशेषांक:–**

थोर भारतीय कवी व विचारवंत गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोर यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'समाज प्रबोधन पत्रिकेने' 'रविन्द्रनाथ टागोर विशेषांक' काढला. कारण टागोर, गांधी व पं. नेहरू हे जगातील सर्व देशांत व भारतातही सर्वात लोकप्रिय असे भारतीय नेते होते. त्यांनी सर्वसमावेशक, सहिष्णू व विकसनशील अशा मानवतावादाचा पुरस्कार केला व धर्म, राष्ट्र,वंश,जात,लिंग व वर्ग या कारणांमुळे समाजात निर्माण होणाऱ्या अस्मितांच्या संघर्षाचे निराकरण करण्याचा मार्ग दाखवला. आजच्या संघर्षरत जगाला त्यांनी दाखवलेला हा पथ, परिचायक, ऐक्य विधायक व संकटमोचक मार्ग अनुकरणीय आहे.

या विशेषांकात प्रकाशित करण्याता आलेल्या लेखांचे तीन भागांमध्ये विभाजन केले आहे. त्यातील पहिल्या भागात टागोरांच्या वैचारिक योगदानाचा परामर्श घेण्यात आला आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या लेखात टागोरांच्या विचारधारेतील विविध पैलूंचे सविस्तर विवेचन केले आहे. डॉ. भारती पाटील यांनी टागोरांच्या राष्ट्रवाताबाबतच्या भूमिकेची मांडणी करून तिच्या समकालीन प्रस्तुततेची चर्चा केली आहे. अवनीश पाटील यांचे त्यांचे इतिहास विषयक तत्त्वज्ञान प्रस्तापित 'पॉझिटिव्हेस्ट' इतिहासशास्त्राच्या कसे विरोधात होते, याचे विवेचन केले अहे. टागोरांच्या 'स्वदेशी समाज' या लेखात त्यांनी स्वावलंबी समाजाची स्थापना करण्याची कल्पना मांडली आहे. त्याचे विवेचन त्यानंतरच्या लेखात करण्यात आले आहे.

दुसऱ्या भागात टागोरांच्या कादंबऱ्या, कथा व संगीत यांचा परामर्श घेण्यात आला आहे.

डॉ. माया पंडित यांनी 'घरे बैरे' या कादंबरीत आधुनिकता व परंपरा यांच्यातून वर्ण, वर्ग, लिंग व राष्ट्र याबाबत कसे तणाव निर्माण होतात, याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते, जहाल राष्ट्रवाद बंगालमध्ये मुस्लीम कुळे व अस्पृश्य नामशूद्र यांच्या विरोधात कसा जातो, हे त्यात दाखविले आहे. 'गोरा'या कादंबरीत स्वातंत्र्याची आस असणाऱ्या लोकांना धर्म, जात, वंश व राष्ट्र यांच्या चौकटी कशा प्रकारे दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात व गौरमोहन ज्यावेळी या चौकटीतून बाहेर येतो, तेव्हा त्यास व्यापक सत्याचे विश्वदर्शन कसे होते, याचे वर्णन करण्यात आले. या विभागात रवींद्रांची कथा व संगीत यांचा परामर्श घेणारे दोन लेख आहेत.

तिसऱ्या भागात टागोरांच्या तीन लेखांचा समावेश केला आहे. आपल्या 'आत्मपरिचय'या लेखात त्यांनी ब्राह्मोसमाज, हिंदुधर्म व भारताची राष्ट्रीयता यांचे विवेचन केले आहे. या लिखाणास बंगालमधील ब्राह्मोसमाजातील वैचारिक संघर्षाचा संदर्भ आहे. आपण ज्या समाजात व परंपरेत जन्मलो, तिचा त्याग करून, त्याच्या बाहेर राहून त्यांत आपणास सुधारणा करता येत नाही. कारण, त्या संस्कृतीतील परंपरेचे चिवट अनुबंध आपणास चिकटलेले असतात, असे टागोरांचे मत आहे. 'भारताचे नवजागरण व शिक्षण' या व्याख्यानात त्यांनी शिक्षणाच्या मुक्तिदायी स्वरूपाचे विवेचन केले आहे. आपल्या वयास ७० वर्षे पूर्ण झाल्यानंतर आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करणारे व्याख्यान टागोरांनी दिले. ते व्याख्यानही 'पत्रिके'मध्ये छापले आहे. त्यामुळे टागोरांच्या भाषेत टागोरांना समजून घेण्याचा त्यात प्रयत्न आहे.

टागोर हे थोर कवी, कादंबरीकार, नाटककार, गायक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रकार व विचारवंत होते. राममोहन रॉय, यांनी सुरू केलेल्या बंगालच्या नवजागरणचे ते मधुरतम् असे फळ होते. त्यांच्या साहित्यात वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत ही महाकाव्ये, अभिजात संस्कृत कवी आणि मध्ययुगातील भक्तिचळवळीतील संतकवी यांचे खोल असे प्रतिबिंब पडलेले दिसते. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीतून प्राप्त झालेली आधुनिकतेची जाणीव त्यांच्या मनात तीव्रतेने वसत होती. त्यामुळे आपल्या सांस्कृतिक परंपरांचा अभिमान बाळगत असताना त्यांचा प्रयत्न समन्वय करून अशी नवी संस्कृती निर्माण करण्याचा होता, ज्यात स्वातंत्र्य, स्त्रियांचा स्वयंनिर्णयाचा हक्क,नागरी अधिकार व बहुविधतेचा आदर यांचा समावेश करण्यात आला होता. माणासात

आत्म्यात सातत्याने उसळत असलेल्या स्वातंत्र्याच्या उर्मीना धर्म,जात, वंश, पंथ व राष्ट्र या नावाने निर्माण झालेल्या चौकटी दडपत असतात. या चौकटींचे उल्लंघन करून स्वातंत्र्याचे आकाश मुक्त केले पाहिजे, हा त्यांचा संदेश होता. त्यांच्या कवितेतून, नाटकातून व कादंबऱ्यातून त्यांनी हाच संदेश जगाला दिला.

प्रत्येक विकसनशील राष्ट्राला सम्यक् विकास साधण्यासाठी व प्रत्येक विकसित राष्ट्राला आपला साधलेला विकास चिरस्थायी करण्यासाठी स्वतंत्रपणे विचार करून, तो मांडू शकणारे तत्त्वचिंतक; तसेच त्यांनी मांडलेल्या विचारांचे प्रत्यक्ष जीवनात प्रकटीकरण करणाऱ्यांची वेळोवेळी गरज भासत असते. केवळ विचार मांडून उपयोग नाही आणि विचाराशिवाय केवळ कृतीही निष्फळ ठरते. रवींद्रनाथ टागोर हे असेच समन्वयी विचारवंत, तत्त्वचिंतक आणि कर्ते सुधारक होते. त्यांनी केवळ विचार मांडला नाही, तर तो प्रत्यक्ष अंमलात येण्यासाठी यंत्रणा ही उभी केली. गुरूदेवांच्या विचारांमधून भारतीयांना 'व्यापक राष्ट्रवाद, शिक्षण, जीवनपद्धती–उपासना पद्धती, धर्म तसेच अध्यात्माला नवे आयाम प्राप्त झाले.' अशा रवींद्रनाथ टागोरांच्या जीवनकार्याचा परिचय त्यांच्या विशेषांकातून वाचकांना करून देण्याचे बहुमोल कार्य 'पत्रिके'ने केले आहे. 'पत्रिके'ने ५० व्या वर्षाच्या वाटचालीत परीक्षणांबरोबरच विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. विशेषांकाच्या या विषयाच्या निवडीप्रकाणे विषयाची हाताळणीदेखील वेगळ्या प्रकारे केल्याचे दिसून येते.

*** 'समाज प्रबोधन पत्रिके'तील परीक्षणे–**

पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयाने एकोणिसाव्या शतकात आधूनिक मराठी साहित्याचा उदय झाला तेव्हा प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांबरोबरच पुस्तकांच्या गुणदोषांविषयीच्या लेखनाला सुरूवात झाली. हे लेखन तेव्हांच्या गंभीर नियतकालिकांमधून प्रसिद्ध होत असे. पुस्तकांविषयीचा अशा लेखनाला तेव्हा टीका म्हणत असत. पुढे काळाच्या ओघात टीका हा शब्द मागे पडून समीक्षा हा शब्द आला मग टीकाकाराचा समीक्षक झाला.

'समीक्षा'या सदराखाली आज विविध प्रकारचे लेखन येत असते. त्यामध्ये पुस्तक परीक्षणाचा समावेश होतो. आज पुस्तक परीक्षणाला कोणी फारसे प्रतिष्ठित मानत नाहीत.

समीक्षेच्या क्षेत्रात सुरूवातीची उमेदवारी करण्याचे क्षेत्र एवढेच अनेकदा समजूत असते. थोडी प्रतिष्ठा प्राप्त झाली की साहित्य सिद्धांताचा परिचय, समीक्षापर लेख असे लिहिण्याकडे अनेकांचा कल असतो. त्याची अनेक कारणे संभवतात. गंभीर साहित्याचर्चेकडे होणारी वाटचाल म्हणूनही हे घडणे संभवते. परंतु असे असली तरी पुस्तक परीक्षणाचे महत्त्व कमी होत नाही. पुस्तक परीक्षण हे क्षेत्रही तसेच बरेच व्यापक आहे. म्हणूनच पुस्तक परीक्षण नेमके कशाला म्हणावे हे नि:संदिग्धपणे सांगता येणे कठीण आहे.

पुस्तक परीक्षण म्हणजे एका अर्थाने परीक्षण कार्याची आवड–नावड असते, हे अगदी खरे. परंतु आवड–नावड केवळ मन:पूत नसते. त्यामागे परीक्षण कार्याची निर्णयशक्ती कार्य करीत असते. आणि निर्णय महटले की काही मूल्य–निकष किंवा कसोटीची आवश्यकता असते. याचा अर्थ परीक्षणातून व्यक्त होणारी ही आवड–नावड म्हणजे संस्कारसंपन्न मनाची आवड–निवड असावी अशी सर्वसामान्यपणे अपेक्षा असते. म्हणून परीक्षण कर्ता होण्यासाठी चांगली अभिरूची व निर्णयशक्ती असणारी, ज्या पुस्तकाचे परिक्षण करावयाचे त्या विषयातील जाणकार व अधिकारी असणारी अशी व्यक्तीच योग्य होय असे वारंवार सुचविले गेले आहे.

'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये कथा, कादंबरी, कविता, नायक ह्या ललित साहित्य प्रकाराची परीक्षणे झाली आहेत. कथा, कादंबरी, कविता, नाटक हे लिलत साहित्याचे प्रकार घेतले तर त्या त्या साहित्यकृतीच्या स्वरूपाचे भान परीक्षण कार्याला असावे लागते. ललित साहित्या व्यतिरिक्त चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक लेखसंग्रह अशा स्वरूपाच्या पुस्तकांवरही परीक्षणे झालेली आहेत.

एकोणिसाव्या शतकात पुस्तक परीक्षणांची सुरूवात झाली तेव्हा त्या काळातील नियतकालिकांना पुस्तकपरीक्षण महत्त्वाचे वाटत असे. 'पत्रिके'ने सुद्धा सुरूवातीपासून पुस्तक परीक्षणाला महत्त्व दिलेले दिसते. नव्या साहित्याविषयी माहिती देणे, त्या त्या साहित्याकडे वळविणे, त्या साहित्यातील गुण दोषांचे दिग्दर्शन करून आधूनिक साहित्याच्या निर्मितीला वळण लावणे हे गरजेचे होते. ही वाचकांची गरज 'पत्रिके'ने पूर्ण केली. तसेच जुन्या–अधूनिकपूर्ण साहित्याकडे नव्या दृष्टीने पाहण्यास वाचकांना शिकविले. 'पत्रिके'तील परीक्षणांमुळे वाचकांना

साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित करण्यासाठी साहाय्यक ठरली. अशा परीक्षणांमुळे नव्या पुस्तकांचा प्रकार होण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्यास मदत झाली.

या परीक्षणांचे आणखीही एक महत्त्व आहे. अशा पुस्तक परीक्षणांद्वारे पुस्तक प्रकाशित झालेल्या काळात ते वाचकांकडून कसे स्वीकारले गेले, त्याच्याविषयी कोणत्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या हे समजण्यास साहाय्य होते. अशा माहितीवरून समाजाच्या साहित्यविषयक अभिरूचीचा व त्यात झालेल्या बदलांचा आलेख सिद्ध करणे पुढील काळात शक्य होते. एकंदरीत पुस्तक परीक्षणांचे बरे–वाईट, तात्पुरते व दूरगामी परिणाम होतात हे निश्चित असे परिणाम म्हणजेच परीक्षणांचे फलित होय.

परीक्षण वस्तुनिष्ठ असावे अशी अपेक्षा असली तरी परीक्षणकर्त्याची साहित्यदृष्टी, आकलन क्षमता, व्यासंग व रसिकता या सर्वांचा प्रभाव परीक्षणांवर पडतो हे लक्षात घेऊन संपादकांनी काही महत्त्वाच्या साहित्यकृतीवर एकापेक्षा अधिक परीक्षण प्रसिद्ध केली आहेत. 'एकच प्याला', 'सांगत्ये ऐका', 'स्वातंत्र्यवीर सावरकर', 'साने गुरूजींची जीवनगाथा' इत्यादी साहित्यकृतीवरील परीक्षण पाहता येतील. एकाच पुस्तकावर लिहिली गेलेली ही परीक्षण बहुदा वेगवेगळे दृष्टिकोन प्रकट करणारे, वेगळे मूल्यमापन सुचविणारे, त्या पुस्तकावर वेगवेगळ्या बाजूंनी प्रकाश टाकणारे असे आहेत.

पुस्तक परीक्षणांच्या निमित्ताने निर्माण होणारे चर्चा विश्व साहित्याचे जग सजग व प्रभावी ठेवण्याचे कार्य करीत असते. मराठी साहित्याच्या इतिहासात अलीकडेपर्यंत झालेल्या पुस्तक परीक्षणांचे हे सर्वात महत्त्वाचे फलित आहे असे म्हणावेसे वाटते.

*** समाज प्रबोधन पत्रिकेची पन्नास वर्षे–**

जानेवारी २०१२ मध्ये समाज प्रबोधन पत्रिकेने ५० वर्षांचा टप्पा पूर्ण केला. ५० वर्षापूर्वी समाज प्रबोधन संस्थेने या नियतकालिकास प्रकाशित करावयास सुरूवात केली. साहित्यप्रेमी वाचकांना साहित्य व्यापाराचे अंतरंग उलगडून दाखविणारे, त्यांची वाङ्मयविषयक कुतूहलपूर्ती करणारे, त्यांच्या वाङ्मयविषयक जाणिवा विकसित करणारे, मुख्य विचारांचे व्यासपीठ असणारे नियकालिक म्हणजे 'समाज प्रबोधन पत्रिका'होय.

'पत्रिके'ची 'मुक्त विचारांचे व्यासपीठ' ही ओळख पन्नास वर्षांच्या कालावधीत पक्की होत गेली. वैचारिक नियतकालिक हा दर्जा अर्धशतक सांभाळणे ही जबाबदारी अतिशय अवघड आहे. ती 'पत्रिके'ने, संपादक वसंत पळशीकर, भा.शं भणगे, डॉ. स.ह.देशपांडे, सुहास पळशीकर, किशोर बेडकिहाळ, डॉ. राजेंद्र व्होरा, महेश गावसकर, डॉ. अशोक चौसाळकर यांनी प्रयत्नपूर्वक पार पाडली आहे. 'पत्रिके'ची मालकी: समाज प्रबोधन संस्था, पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, विश्वस्त: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री.जे.पी.नाईक, श्री.प्रभाकरपंत कोरेगांवकर होते.

ग्रंथवाचन माणसाची जडणघडण करते, ग्रंथसंग्रहामुळे त्याच्या समृद्धीत भर पडते ही जाणीव जोपासण्यासाठी 'पत्रिके'ने 'ग्रंथपरीक्षणे' सुरू केली.

जेव्हा 'पत्रिका' सुरू झाली तेव्हा समाज प्रबोधन संस्थेला ती वर्षभर तरी चालेल की नाही अशी शंका होती. 'पत्रिके'चे सुरूवातीचे अंक नियमितपणे निघाले नाहीत. पण १९६५ नंतर मात्र 'पत्रिके'मध्ये नियमितपणा आला. श्री.वसंत पळशीकरांनी 'पत्रिके'ला स्थैर्य प्राप्त मिळवून देण्यात सिंहाचा वाट उचलला. आणि ग.प्र.प्रधान यांनी प्रकाशक म्हणून जबाबदारी पेलली. सुरूवातीस वार्षिक वर्गणी तीन रूपये होती.

१९६० च्या दशकात मराठी नियतकालिके भरात होती. 'सत्यकथा'हे नववाङ्मयीन प्रवाहांचा पुरस्कार करणारे श्री. पु.भागवत, राम पटवर्धन संपादित मासिक प्रतिष्ठा पावलेले होते. गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकरांपासून जी.ए.कुलकर्णी, श्री.दा.पानवलकरांपर्यंत आणि दुर्गा भागवत इरावतीबाई पासून सरोजिनी वैद्य–विजया राजाध्यक्षापर्यंत त्या काळातील सगळे प्रतिभावंत आनंदाने व उत्साहाने त्यात लिहित होते. अभिरूचींचा नवा अवतार १९६६ मध्ये पुन्हा जन्माला आला होता. 'वीणा', 'वसंत', 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर', 'हंस', 'मोहिनी', 'नवल', 'वसुधा', 'सुदर्शन' या मासिकांचा वाचकवर्गही भरपूर होता. केवळ समीक्षणाला वाहिलेले 'आलोचना' हे मासिक नवनव्या प्रयोगांसह वसंत दावतर गांभीर्याने चालवीत होते. महाराष्ट्रातले सगळेच लेखक अहमहमिकेने या मासिकांतून लिहित होते. लघूनियतकालिकांचा उदय झाला होता. वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रेरणांनी व प्रवाहांनी तात्कालीन साहित्यविश्व गजबजून गेले होते.

अशा चैतन्यपूर्ण वातावरणात १९६२ साली ‘पत्रिके’चा जन्म झाला. तिचे लालनपालन व संगोपन समाज प्रबोधन संस्था, संपादक व त्यांच्या मित्रांनी कौतुकाने आणि आस्थेने केले. नियतकालिकांच्या निर्मितीमागील विषयात पुरेशी व्यापकता असावी लागते. लवचिकताही लागते. वाङ्मय व्यवहाराच्या वेगवेगळ्या अंगांची जाण असावी लागते आणि ती जाण निर्मितीच्या पातळीवर उतरावी लागते. मूळ उद्दिष्टे कायम राखून नवनवे बदल घडवावे लागतात. ते रूळवावे लागतात. वाचकांच्या अंगवळणी पाडावे लागतात. ‘पत्रिके’ने हे बऱ्याच प्रमाणात साध्य केले आहे असे आता पन्नास वर्षानंतर नि:संदिग्धपणे म्हणता येते.

‘पत्रिके’चे स्वरूप अधिकाधिक वेधक व आकर्षक बनावे अशी संपादकांची आरंभापासून आजतागायत धडपड चाललेली आढळते. आधी श्री.वसंत पळशीकर यांनी व नंतर श्री. अशोक चौसाळकर यांनी या दिशेने खूप प्रयत्न केले. ‘पत्रिका’हे मुक्त विचारांचे खुले व्यासपीठ आहे; कोणताही आवेश, अभिनिवेश नसणारे ते मासिक आहे. ते कोणत्यही वाङ्मयीन गटातटाचे वा विशिष्ट साहित्य प्रवाहाचे मासिक नाही. त्यामुळे गेल्या पाच दशकातील मराठीतील अनेक नव्या–जुन्या, निरनिराळ्या मतप्रणालीचाच प्रकृतिधर्माच्या लेखकांनी ‘समाज प्रबोधन पत्रिके’तून विपूल प्रमाणात लेखन केले आहे.

पन्नास वर्षांच्या कालावधीमध्ये ‘पत्रिके’ने समाजामध्ये वैचारिक परिवर्तन घडवून आणून समाजाच्या पर्यायाने देशाच्या परिवर्तनामध्ये हातभार लावला आहे. अनेक लेखक, समीक्षकांना घडविले आहे. समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय सूचविले आहेत. ‘पत्रिके’ने आपली जबाबदारी चोखपणे बजावली आहे.

‘समाज प्रबोधन पत्रिका’हे महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रात मान्यता पावलेले नियतकालिक आहे. ‘पत्रिके’ से हे स्थान प्राप्त करून देण्यास वसंत पळशीकर, भा.शं. भणगे, डॉ. स.ह. देशपांडे, डॉ. राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, रेखा इनामदार, किशोर बेडकिहाळ, भा.ल.भोळे, महेश गावसकर, अशोक चौसाळकर या आजी–माजी संपादकांचा मोठाच हातभार लागला. त्याचप्रमाणे ‘पत्रिके’साठी अव्वल दर्जाचे लेखन देणाऱ्या लेखकांमुळे ही ‘पत्रिका’ एक दर्जेदार नियतकालिक बनू शकले.

**निरीक्षणे:–**

- महाराष्ट्राच्या, भारताच्या ज्वलंत प्रश्नांचा ऊहापोह 'पत्रिके'तून करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला.
- ग्रंथ परिक्षणे, टिपणे या संदरांमुळे 'पत्रिके'ला समृद्ध व जीवंतपणा लाभला आहे.
- 'पत्रिके'तील लेखन समकालीन विषयांवर ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होते. काश्मीर प्रश्नाविषयचा विशेषांक, जनता पक्षाच्या विजयानंतरचा विशेषांक यावरून स्पष्ट होते.
- 'पत्रिका'ही एक सामूहिक निर्मिती आहे. संपादक, लेखक, चित्रकार, मुद्रक या सर्वांच्या सक्रीय सहभाग त्यामध्ये दिसतो.
- 'पत्रिके'ने हिंदू–मुस्लिम ऐक्य, राष्ट्रीय एकात्मता, सामजिक समता यासारख्या भारतीय समाजापुढील काही ज्वलंत व महत्त्वाच्या समस्यांवर भरर दिल्याचे दिसून येते.
- भारतीय समाजाच्या वाटचालीतून ज्या समस्या नजिकच्या भविष्य काळात उपस्थित होणार आहेत त्याकडे 'पत्रिके'ने लक्ष वेधे. त्या प्रश्नांचे स्वरूप विशद केले आणि त्यावरील उपाय ही सुचविले.
- परंतु वेगवेगळ्या शास्त्रांमध्ये ज्ञानात जी भर पडत आहे त्यामुळे माणूस व मानवी जीवन या विषयीच्या समजूतीत पडणारा फरक स्पष्य करणारे लेखन 'पत्रिके'त दिसत नाही.
- मराठीतील वाचकांना अनेक विषयांची महिती देऊन मूळ ग्रंथ वाचावयास प्रवृत्त केले. ग्रंथपरीक्षणामुळे वाचकांना मूळ ग्रंथ वाचण्याची प्रेरणा मिळाली.
- महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या भागांमध्ये अनेक संस्था, संघटना कार्यरत आहेत. त्यांच्या रचनात्मक कार्याची माहिती 'पत्रिके'ने उपलब्ध करून दिली.
- महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांनी आपले कसदार लेखन प्रकाशित करून समाज शिक्षणाच्या कामास मोठ्या प्रमाणावार हातभार लावला असल्याचे दिसते.

- समाजशीलता, समाजप्रबोधन, समाज परिवर्तन, सांस्कृतिक उपासना या गोष्टींना महत्त्व 'पत्रिके'च्या संपादकांनी, लेखकांनी आपल्या लेखनातून, विचारातून वेळोवेळी दिलेले दिसते.
- लोकशाही, नवमानवतावाद, या जीवनमूल्यांचा विचार 'पत्रिके'च्या विशेषांकातून झालेला दिसतो. महाराष्ट्र राज्य निर्मितीमागील व समाजपरिवर्तनातून भारताची प्रगती हा सामाजिक दृष्टीकोन ठेऊन लेख प्रसिद्ध केले.
- 'समाज प्रबोधन पत्रिके'तून जे विशेषांक प्रसिद्ध झाले त्या विशेषांकातून महाराष्ट्रात वेळोवेळी घडून आलेले बदल, सामाजिक प्रगती, विज्ञानाची, विकासासाठी झालेली मदत याची दखल घेतली आहे.
- समाजवादी, मार्क्सवादी, हिंदुत्ववादी, गांधीवादी यासारख्या विचार प्रणालींच्या किंवा पर्यावरणवादी, स्त्रीवादी, शेतकरी यासारख्या विचार प्रवाहांनी प्रभावित झालेले लेखन 'पत्रिके' मधून प्रसिद्ध झाले.
- अनेक नव्या प्रश्नांना तोंड फोडण्यात आले. याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. अरूण शौरी यांनी डॉ. आंबेडकर यांच्यावर केलेल्या टीकेचा प्रतिवाद डॉ. य.दि.फडके यांनी 'पत्रिके'च्या एका अंकात प्रदीर्घ असा टीकालेख लिहून गेला. असे, वैचारिक लेख छापून 'पत्रिके'ने विचारांचे खंडन–मंडन घडवून आणले.
- समाजवादी, मार्क्सवादी, हिंदुत्ववादी, गांधीवादी यासारख्या विचारप्रणालींच्या किंवा पर्यावरणवादी, स्त्रीवादी, शेतकरी यासारख्या विचारप्रवाहांनी प्रभावित झालेले लेखन 'पत्रिके'मधून प्रसिद्ध झाल्याचे दिसते.

थोडक्यात 'समाज प्रबोधनपत्रिके'ने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाच्या सर्वच घटकांवर, त्यावेळी निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर विचार प्रवर्तक लेखन छापून महाराष्ट्राची सांस्कृतिक उंची वाढविण्याचे मोलाचे कार्य केलेले आहे.

संदर्भः–


१. संपा.वसंत पळशीकर, निवेदन, अंक–१८, वर्ष–३,१९६७, (पृ.१).

२. देवदत्त दाभोळकर, ८,९, जोडअंक, सप्टें.डिसेंबर १९६५, वर्ष २ रे, (पृ.४).

३. दत्तू गोरे, अंक–५०, मार्च–एप्रिल १९७३, (पृ.४).

४. वसंत पळशीकर, सत्याग्रही सॉक्रिटिसचे वीरमरण, अक्षर मुद्रा, पुणे१९९६, (पृ.१).

५. संपा.किशोर बेडकिहाळ, निवडक वसंत पळशीकर, चौकटीबाहेरचे चिंतन, लोकवाङ्‌यसंग्रह, पहिली आवृत्ती, जुलै–२००९, (पृ.१९).

६. भास्कर लक्ष्मण भोळे, वसंतराव, मराठवाडा दिवाळी अंग, (पृ.९४).

७. डॉ. स.ह.देशपांडे, भालचंद्र शंकर भणगे, वर्ष–१७, अंक ८२, मार्च–एप्रिल१९८०, (पृ.७०).

८. डॉ. स.ह.देशपांडे, संपादकीय नीतीविषयी, वर्ष–१८, अंक–१००, जुलै–ऑगस्ट–१९८१, (पृ.१९६).

९. तत्रैव–पृ.१९६).

१०. प्रकाश कामतीकर, मराठी लघू अनियतकालिके, अंक–११३, (पृ.१८१).

११. सोविएत रशिया विशेषांक, वर्ष–५, अंक१९,२०, डिसें.जाने.फेब्रुवारी–मार्च–१९६९, (पृ.८).

१२. सोविएत रशिया विशेषांक वर्ष–५, अंक १९,२०, १९६८, (पृ.९).

१३. भारतीय राजकारण विशेषांक, वर्ष–३६, अंक १४३, (पृ.१०२).

# प्रकरण तिसरे

# ‘समाज प्रबोधन पत्रिके’ तील वैचारिक ग्रंथपरीक्षणे स्वरुप

# प्रकरण तिसरे

# 'समाज प्रबोधन पत्रिके'तील वैचारिक ग्रंथपरीक्षणे स्वरुप

**प्रस्ताविक :–**

कोणत्याही साहित्याचे स्वप्न स्पष्ट होण्यासाठी संकल्पना व सिद्धांत या दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या असतात. स्वरुप निश्चितीचा असा दृष्टीकोन पौरात्य आणि पाश्चात्य साहित्याभ्यासकांनी ग्राह्य धरला होता. आज आधुनिक काळातही तो अस्तित्वात आहे. एखाद्या साहित्याचे स्वरुप सांगणे म्हणजे नेमके काय करणे या संदर्भात वसंत पाटणकर लिहितात, ''एखादी गोष्ट काय आहे, ते सांगणे म्हणजेच तिचे स्वरुप, तिची प्रकृती स्पष्ट करणे होय. याचा अर्थ त्या विशिष्ट गोष्टीमध्ये कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो, या समाविष्ट होणाऱ्या घटकांचे स्वरुप काय आहे, हे घटक एकत्र कसे येतात, म्हणजेच त्यांची जुळणी वा बांधणी कोणत्या नियमांनी होते, या गोष्टीचे वर्णन करणे होय.''[१] म्हणजे साहित्याचे स्वरुप मांडणे म्हणजे त्यातील प्रमुख संकल्पना, घटक, संसा याविषयीचे आकलन करणे होय. 'समाज प्रबोधन पत्रिके'तील वैचारिक साहित्याचे स्वरुप कसे आहे हे या प्रकरणातून पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

वस्तुत: आधुनिक काळात विशेषत: अव्वल इंग्रजी काळापासून आजतागायत सर्वाधिक लेखन आणि तेही अवितरपणे कोणत्या वाङ्मय प्रकारात होत असेल तर ते निबंध अथवा ज्याला आपण वैचारिक गद्य किंवा वैचारिक साहित्य असे संबोधतो. वर्ण व्यवस्थेने लेखन–वाचनांपासून दूर ठेवलेले स्थर वैचारिक लेखनात स्वाभाविकच कालपरवापर्यंत भाग घेऊ शकलेले नव्हते. वंश, वर्णाने भारतीय पण भाषा संस्कृतीने युरोपिय अशा बुद्धिजीवी वर्गाचीच ती निर्मिती होती. जॉर्ज जार्विसच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन मराठी लेखकांनी गणित, शिल्पविद्या, सिद्ध पदार्थविज्ञान, शरीरवैद्यक, इतिहास, भूगोल वगैरे विषयांवरील इंग्रजी शालापयोगी पुस्तकांची मराठी भाषांतरे करुन मराठी वैचारिक लेखनाचा पाया भरला होता. हे वैचारिक लेखन सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचविण्याचे महत्वाचे कार्य 'समाज प्रबोधन पत्रिके' ने केले.

*** वैचारिक साहित्याची व्याख्या :–**

निबंध किंवा वैचारिक गद्य ही तर्कशुद्ध रितीने केलेली बुद्धीला आवाहन करणारे, आपली

मते ठामपणे प्रतिपादन करणारी साधारता या लक्षणाने युक्त अनुभव इतिहास, अवलोकन व वास्तव पृष्ठभूमीवर उभी असलेली रचना आहे. त्याला शीर्षक, मथळा, विशिष्ट प्रारंभ, मध्य आणि निर्णयात्मक अथवा निष्कर्षास शेवट असतो. सांगोपांग चर्चा, खंडणमंडणात्मकता, युक्तीवाद पूर्णता, तात्कालिकता, प्रासंगिकता, तात्विकता असे त्याचे स्वरुप असते. डॉ. निलकंठ शेरे यांनी वैचारिक साहित्याची व्याख्या करताना म्हटले आहे, ''ललित आणि वैचारिक साहित्यात पूर्णत: भेद असतो, वैचारिक साहित्यातील वस्तुनिष्ठता, वैचारिकता, वर्णनात्मकता ललित वाङ्मयात प्रत्ययास येतो. छरंतु ती भावनेवर आरुढ होऊन अवतरतो. वैचारिक साहित्याची निर्मिती, रचना ही तर्कानुमानाधिष्ठित असते. ती बुद्धिनिष्ठ, तर्कशुद्धतेकडे झुकलेली असते.''[२] गेल्या दोन शतकांमध्ये मराठी भाषेतील साहित्यात मोठ्या प्रमाणात वैचारिक लेखन होत आहे. त्यामुळेच या साहित्याची कक्षा विकसित होत असल्याचे दिसते.

इंग्रजांनी राबविलेल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची संधी देण्यात आली. त्यामुळे शिक्षणापासून वंचित असणारा अस्पृश्य वर्ग, स्त्रीया यांना शिक्षण मिळाले. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून प्रबोधन चळवळ तळागाळापर्यंत पोहचली. यामध्ये वर्तमान पत्रांचे योगदान महत्वाचे आहे. पाश्चात्य ज्ञानाच्या संस्कारातून सुसंस्कृत झालेल्या नवतरुणांनी वर्तमानपत्रांची सुरुवात केली. अग्रलेख, स्फूटलेखन, माहितीपर लेखन, वृत्तांत यांचे लेखन करुन नवीन संस्कृतीची मांडणी केली. त्याचबरोबर हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांवर प्रहार केले व समाज सुधारणेची भूमिका मांडली. इथेच खऱ्या अर्थाने वैचारिक साहित्याचा उदय झाला. सामाजिक सुधारणा, समाजप्रबोधन, समाज परिवर्तन करणे, सर्वांना शिक्षणाची संधी, समान अधिकार, स्त्रियांना समतेची वागणूक व धर्मप्राबल्य, कर्मकांड, अस्पृश्यता, जातिभेद, विषमता, अंधश्रद्धा या सामाजिक रुढीचा नायनाट करणे इ. मुख्य हेतू वैचारिक साहित्यामागे असल्याचे दिसून येते.

*** वैचारिक साहित्य :–**

मराठी साहित्यात वैचारिक लेखाचे योगदान महत्वपूर्ण आहे. साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नसते तर सामाजिकतेचे मोठे अवकाश साहित्याला असते. साहित्याचा मूलस्त्रोत जशी भाषा तशाचप्रकारे साहित्याचा उर्जास्त्रोत 'समाज' असतो. याविषयी वैचारिक साहित्याची भूमिका

महत्वाची आहे. साहित्याला मूल्यात्मता असते. वैचारिक साहित्याचे अंतिम मूल्य हे सामाजिक परिप्रेक्ष्यातील विविध प्रश्नांविषयी निर्णायक भूमिका होवून तद्‌विषयी प्रबोधन करणे हे आहे. त्यामुळे वैचारिक साहित्याला खूप मोठा सामाजिक संदर्भ आहे. त्यामुळे असे म्हणता येईल की, साहित्य आणि समाज यातील अनुबंध दृढ करण्याचे महत्वाचे कार्य वैचारिक साहित्याने केले.

वैचारिक साहित्याला सामाजिक व वाङ्मयीन असे दुहेरी मूल्य असते. मात्र यातील सामाजिक मूल्यास इथे प्राधान्य आहे. विचार हा वैचारिक साहित्याचा मूलघटक आहे. हा विचार समाजचिंतन करतो. समाजातील नानाविध प्रश्नांची मांडणी करतो. त्यांची उत्तरे शोधतो. समाजातील सद्य:स्थितीच्या विविध भेदांचा, आंतरविरोधाचा आढावा घेवून ऐतिहासिक संदर्भानुसार त्याचे पुनर्मूल्यांकन करुन समाज व्यवस्थेला प्रेरक आणि मानवी मूल्यांवर श्रद्धा असणारी वैचारिक मांडणी करतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, कोणतीही सामाजिक क्रांती यशस्वी होण्यासाठी वैचारिक क्रांती होणे गरजेचे आहे. ही वैचारिक क्रांती घडविण्याची प्रतिज्ञा वैचारिक साहित्याची असते. वैचारिकता ही मानवाला स्वअस्तित्वाची जाणीव करुन देते. त्याच्या वैयक्तिक सामाजिक जीवनात प्रबोधनाचे, उत्थानाचे बीज पेरते. यातून शोषकांची व्यवस्था मोडीत काढली जाते. मात्र वैचारिकता नसेल तर माणूस जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. वचािरिक दुर्बलता ही व्यक्तीबरोबरच संबंध समाजाला गुलामगिरीच्या अंधकारात गाडून टाकते.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्यता विषयक वैचारिकतेला शास्त्रीय दृष्टिकोनाची म्हणजे संशोधन प्रणालीची गरज भासली. म्हणूनच त्यांनी ‘हू वेअर द शूद्राज’ हा संशोधनपर ग्रंथ लिहिला आणि त्यातून दलितांना ऐतिहासिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. या ग्रंथात ते म्हणतात, “Owing to the loss of sacred thread shudras become socially degraded, fell below the rank of vaishyas and come to form forth varna.”

डॉ. आंबेडकर विदर्भ साहित्य संघातील भाषणात म्हणाले होते की, उदात्त जीवन मूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यातून अविष्कृत करा. डॉ. आंबेडकरांनी साहित्याला दिलेले हे ध्येय वैचारिक साहित्याची प्रतिज्ञा आहे. वैचारिक साहित्याची निर्मिती कारणपरत्वे घडते.

वैचारिक साहित्यात मूल्यात्मकतेचे 'विचारतत्व' महत्वाचे असते. हे विचारतत्व माणसाच्या जीवनात व्यवहाराला गतिमान करुन त्याच्या बौद्धिक, मानसिक, नैतिक विचार प्रक्रियेत परिवर्तन करुन वैचारिकतेचे नवे अधिष्ठान देते. त्यामुळे वैचारिक साहित्याला मानवी जीवनमूल्यांचेही अधिष्ठान प्राप्त होते.

ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी साहित्याचे दुहेरी मूल्य सांगितले आहे. साहित्य आणि सामाजिक संदर्भ या ग्रंथात ते लिहितात, ''साहित्याला समाजातील एक सर्जनशील कार्य व एक स्वतंत्र कलात्मक निर्मिती असे दुहेरी मूल्य आहे. समाजातील सर्जनशील कार्य म्हणून ही भूमिका बुद्धिवाद्यांची असते.''[3] वैचारिक साहित्यनिर्मिती अशाच विवेकी, विचारवंत, बुद्धिवाद्यांची असते. वैचारिक साहित्यात सुसूत्रता असते. वैचारिकतेत स्वमत मंडनार्थ चर्चा असते, विवेचन असते आणि परमताचे खंडन ही आवश्यक असते. मानवी बुद्धिला गतिमान करुन सामाजिक प्रश्नांची चर्चा करुन त्यावर विचारमंथन करण्याची भूमिका 'समाज प्रबोधन पत्रिके'ने घेतल्याचे दिसून येते.

*** वैचारिक साहित्य संकल्पना :–**

वैचारिक साहित्याला इंग्रजीत Nonfictitious असा शब्द प्रयोग केला जातो. Nonfictitious हे विशेषण Nonriction या नामापासून बनलेले आहे. World English Dictionary या शब्दकोशात Nonfiction चा अर्थ Prase literature that consist of factual Information'[4] असा दिला आहे. म्हणजेच काल्पनिकतेपेक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाचा आशय गद्यात्म शैलीत त्यात व्यक्त होतो ते 'साहित्य' होय. मराठीतील वैचारिक साहित्याचे स्वरुप इंग्रजीतील Nonfictitious literature सारखेच आहे. त्यामुळे वैचारिक साहित्याला इंग्रजीतील हीच संज्ञा वापरणे योग्य होईल.

'वैचारिक' हा शब्द 'विचार' या नामापासून बनलेले भाववाचक नाम आहे. प्रत्येक व्यक्ती विचार करतो. विचार क्षमता ही भाषिक क्षमतेएवढीच प्रबळ शक्ती असल्यामुळे मानवाला 'मनुष्यत्व' प्राप्त होण्यासाठी, माणूस म्हणून त्याला पूर्णत्व मिळण्यासाठी भाषेबरोबरच विचारही महत्वाचे कार्य करतो.

विचार हा मानवी जीवनाला उर्जा देणारा घटक आहे. मानवी विकास (मानसिक व बौद्धिक) विचारावर अवलंबून असू शकतो. त्यामुळे विचार हा महत्वाचा घटक आहे. यशवंत मनोहर 'विचारा'चे महत्व स्पष्ट करताना म्हणतात, 'विचार' हा कोणत्याही संस्कृतीच्या खोलीचा आणि उंचीचा मापदंड असतो. त्या संस्कृतीमधील भावनात्मक व्यवहार ही अधिक अर्थपूर्ण व सर्वस्पर्शी, अधिक उपकारक व प्रकाशतत्वस्पर्शी होण्यासाठी विचाराच्या कक्षा अधिकाधिक विस्तृत होणे आवश्यक असते. विचार हा मुळात असतो. या अनुभवातून निष्कर्ष निर्माण होतात, हेच होते की जे माणसाच्या विचारशक्तीचा विकास करतात.''[५] विचार हा मानवी जीवनात जसा विवेकशक्तीचा विकास करतो तसाच सृजनशक्तीचाही तो विकास करतो. ही सृजनात्मकता लिखित माध्यमातून अविष्कृत होऊन 'वैचारिक साहित्याची निर्मिती' करते. म्हणूनच 'विचार' हा वैचारिक साहित्याचा प्राण आहे.

विचार करणारा तो विचारवंत अशी ढोबच व्याख्या बऱ्याचवेळा केली जाते, मात्र प्रत्येक व्यक्ती विचार करतो तो काही विचारवंत असत नाही. 'विचारवंत' या शब्दाची व्याख्या करताना जनार्दन वाघमारे लिहितात, ''जो आपल्या बुद्धीचा अर्थात विचारशक्तीचा सृजनात्मक उपयोग करतो तो म्हणजे विचारवंत होय.''[६] म्हणजे नवनिर्माणक्षम प्रज्ञा ज्याच्याजवळ असते, तो म्हणजे विचारवंत होय. इंग्रजीत विचारवंत याला Thinker असा शब्दप्रयोग केला जातो. यालाच Man Thinking असेही म्हणतात. यावरुन विचारवंताला 'चिंतनशील मनुष्य' असेही म्हणता येईल.

विचारवंतांच्या विचारांचा परिप्रेक्ष्य हा समाजसापेक्ष असतो. व्यक्ती व समाज या घटकांतील सर्व व्यवस्थांचा अभ्यास तो करतो. त्यामुळेच विचारवंतांच्या व्यतिमत्वाला सामाजिक मूल्य प्राप्त होते. विचारवंतांवर फार मोठे सामाजिक दायित्व असते. जनार्दन वाघमारे याविषयी मार्मिक भाष्य करतात, ते म्हणतात, ''प्रगतिशील समाज हा कृतिप्रवण असतो आणि या सामाजिक कृतिप्रवणतेला विवेकशील विचारशक्ती देण्याचे कार्य विचारवंतालाच करावे लागते. समाजाला व समाजातील विविध संस्थांना योग्य अशा मार्गावर चालवण्याचे मार्गदर्शन विचारवंताकडून अपेक्षित असते. समाजजीवनाच्या गाड्याला कालसंगत व मूल्यसापेक्ष विचारांनी डोळस, विज्ञाननिष्ठ, विचारंचे वंगण पुरविण्याचे काम विचारवंतांनी करावे. सामाजिक

बांधिलकीच्या भावनेने विविध प्रश्नांची सत्यान्वेशी विश्लेषण करणारा, सामान्यजनांचा मार्गदर्शक बनविणारा खरा 'विचारवंत' होय.''[७] यावरुन विचारवंत ही संकल्पना अधिक स्पष्ट होते.

वैचारिकता ही बुद्धिजन्य स्वरुपाची कार्यशक्ती आहे. ही वैचारिकता तत्वचर्चेच्या विचारसूत्राच्या अनुरोधाने बोधाच्या किंवा प्रचाराच्या पातळीवर तसेच प्रत्यक्ष जीवनदर्शनातून, सामाजिक जीवनाच्या व्यापक परिप्रेक्ष्याच्या चिंतनातून आविष्कृत होत असते. वैचारिकता हा शब्द 'विचार' या नामापासून बनलेले भाववाचक नाम आहे. वैचारिकता ही संज्ञा समजून घेण्यासाठी कोशागत असणाऱ्या विविध अर्धछटा लक्षात घेणे उपयुक्त ठरेल. 'दि स्टुडंट संस्कृत इंग्लिश डिक्शनरी' मध्ये वा. शि. आपटे लिहितात, ''वैचारिकतेला चिंतनशीलतेची अर्थछटा असते. इंग्रजीत तिलाच Reflection, Delibration, thought consideration असे म्हणतात. यात विचारांची बैठक, त्यात सुसंगती व मूल्यमापन अभिप्रेत आहे. दुसरी अर्थछटा विचार हे साधन होऊन परीक्षण करणे याच्याशी निगडीत आहे. Examination, Discussion, Investigation, thrieat of case अशा इंग्रजी शब्दातून ती व्यक्त होते. याशिवाय बुद्धी व अभिरुची यांच्या संयोगातून झालेली निवड Selection वर्तणूकीच्या संदर्भातील संभ्रावस्था Doubt, Hesitation दूरदर्शित्व–चौकसपणा इत्यादी अर्थछया वैचारिकता या संज्ञेत येतात.''[८]

वैचारिकतेच्या वरील विविध अर्थछटा पाहता वैचारिकता ही बुद्धिजन्य व व्यापक पातळीवरील विचारांचा परिपाक ठरते.

वैचारिकतेसंबंधी डॉ. गंगाधर पानतावणे अत्यंत मार्मिक व सैद्धातिक मांडणी केलेली आहे. डॉ. पानतावणे म्हणतात, ''जग बदलण्याची, शोषकांच्या धारणांना उलथून टाकण्याची प्रतिज्ञा वैचारिकतेत असते. वैचारिकतेला समाजव्यवस्थेतील विसंगतीचा, अनुदारतेचा, आंतरविरोधाचा स्थितीशीलतेचा सतत शोध घ्यावा लागतो. समाज परिवर्तनाचा ध्यास घेणारी वैचारिकता इतिहासाचा अन्वय लावते, वर्तमानाची चिकित्सा करते आणि भविष्याचा कानोसा घेते. यातूनच नवसमाज रचनेला आरंभ होतो. विचार हे लिप्त असतात, अल्पित नसतात आणि म्हणूनच वैचारिकता ही सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि ऐतिहासिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेत गतिमान होण्याची गरज असते. वैज्ञानिकता हा वैचारिकतेचा एक आधार असतो. हीच वैज्ञानिकता

अंधश्रद्धा आणि लोकभ्रम निरस्त करुन मानवी संस्कृतीला नवे अधिष्ठान देते. शोषणाचे आणि दास्यवृत्तीचे बुरुज ढासळून टाकण्याची अंत:शक्ती या विज्ञाननिष्ठ वैचारिकतेत असते.''[९] डॉ. गंगाधर पानतावणे यांनी केलेली वैचारिकतेची मीमांसा वैचारिक साहित्याचे स्पष्ट करते.

*** वैचारिक साहित्याचे वर्गीकरण :–**

साहित्यनिर्मिती ही सृजनप्रक्रियेचा अविष्कार असते. कलावंतांच्या या सृजनशीलतेत अनेक घटकांचा सहभाग असतो. साहित्याचे वर्गीकरण हे त्यात अनुश्रुत असून त्याचा वाटा महत्वाचा आहे. वाङ्मय व्यवहारातील लेखक, वाचक, समीक्षक, प्रकाशक या प्रमुख घटकांना हे वर्गीकरण अभिप्रेत असते. वर्गीकरणाचे महत्व सांगताना मिलिंद मालशे म्हणतात, ''वर्गीकरण करणे म्हणजे केवळ यादी देणे नव्हे तर त्या यादी देण्यामागे जे तत्व असते. त्याचा विचार येथे अभिप्रेत आहे.''[१०] म्हणजे वर्गीकरण हे तात्विक मांडणी असते असे म्हणता येईल. साहित्याचे वर्गीकरण करण्यासाठी करार ही महत्वाची संकल्पना मांडली आहे. डॉ. मिलिंद मालशे त्यांनी साहित्याचे वर्गीकरण करताना 'सांगण्याचा करार' दाखविण्याचा करार व भावविण्याचा करार अशी विभागणी करुन त्यांनाच अनुक्रमे कथनात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म अशी नावे दिली. या करार व्यवस्थेत कथा, कादंबरी, नाटक, कविता या वाङ्मय प्रकारांची चर्चा केली. मात्र 'निबंध' या लेखन प्रकारासाठी मांडण्याचा करार हा चौथा करार मालशे सांगातात. हा चौथा करार पॉल हर्नडी या पाश्चात्य समीक्षकाने सर्वप्रथम मांडला. त्याने Beyond Genre (१९७२) या ग्रंथात बोधपर लिखाण, रुपकात्म लिखाण, निंबधपर लिखाण इत्यादीसाठी थिमॅडिक मोड म्हणजे आशयात्म करार सूचविला आणि यामध्ये वैचारिक, आत्मपर व भावनिक असे उपविभाग योजिले. म्हणजे वैचारिक साहित्य हे आशयात्म करारात अंतर्भूत असून आशय हे तत्व यात महत्वाचे असते. त्यामुळे वैचारिक साहित्याचे वर्गीकरण आशयनिष्ठ पद्धतीने करावे लागते. आशयाची विविधता धरुनही सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक असे वर्गीकरण होते. 'समाज प्रबोधन पत्रिके' च्या ग्रंथपरीक्षणातून जी वैचारिक ग्रंथ परीक्षणे झाली. त्यातील आशयाची विविधता धरुन ही सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक असे वर्गीकरण केले आहे.

१) सामजिक :–

समग्र वैचारिक साहित्याला सामाजिक परिप्रेक्ष्य असतो. मात्र इथे समाजव्यवस्थेतील जे विविध प्रश्न असतात त्या संदर्भातील विचार अभिप्रेत आहे. सामाजिक प्रश्न हे अत्यंत महत्वाचे असतात. मात्र त्यांचे स्वरुप अतिशय गुंतागुंतीचे असते. याविषयी जनार्दन वाघमारे लिहितात, ''सामाजिक प्रश्नांचे स्वरुप अतिशय क्लिष्ट व गुंतागुंतीचे असतात तसेच ते व्यमित्र्य असतात. विचारांच्या पातळीवर त्यांची आकलन होऊ शकेल, पण प्रत्यक्षात ते सोडवणे कठीण असते. त्यांना भावनिक स्वरुप प्राप्त झाले तर त्यांची गुंतागुंत अधिकच वाढते. भारतासारख्या बहुजातीय, बहुधर्मीय समाजात तर ते संघर्षाच्या पातळीवर तरंगत असतात.''[११] या निराशेच्या सुरातही आशेचा किरण म्हणजे विचार हा आहे. विचारांच्या पातळीवर आकलन होऊन त्यासाठीची कार्यभूमी तयार करण्याचे कार्य वैचारिक साहित्यच करु शकते. 'समाज प्रबोधन पत्रिके' ने वैचारिक साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न, समस्या सोडविण्याचे, त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न केला आहे. सामाजिक प्रश्न, समस्या सोडवताना कुटुंब, जात, स्त्री–पुरुष, संस्कृती, भाषा इ. सामाजिक संस्थांचा विचार केला आहे.

'जातिवाद आणि वर्गवाद' या नलिनी पंडित यांच्या पुस्तकाचे वसंत पळशीकर यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. जाती व वर्ग यांची उत्पत्ती व स्वरुप या संबंधीचे सैद्धान्तिक व ऐतिहासिक विवेचन पहिल्या भागात येते. दुसऱ्या भागात गेल्या शे–दिडशे वर्षाच्या काळातील महाराष्ट्रातील जातिवादी चळवळींचा परामर्श वर्गवादी दृष्टिकोनातून घेतला आहे.

महाराष्ट्रीय समाज जीवनाविषयीच्या त्यांच्या लेखनात याचा अधिक ठसठसीत असल्याचे प्रत्यय येतो. येथील व्यापारी, कारखानदार वर्ग हा परप्रांतीय आहे, त्यात अलीकडे महाराष्ट्रीय कारखानदारांची भर पडत आहे. ब्राह्मण, प्रभू इत्यादी पुढारलेल्या जमातींचे उच्च श्रेणीच्या नोकऱ्या व पांढरपेशा व्यवसाय यावर अव्वल इंग्रजी काळात प्रभूत्व प्रस्थापित झाले व ते अद्याप टिकून असले तरी, आता, ब्राह्मणेत्तर मराठा, माळी इत्यादी जातींमधील लोकांची संख्या या क्षेत्रात वाढत आहे. उच्चवर्गीय वर्गातही उच्च मध्यमवर्ग व कनिष्ठ मध्यम वर्ग असा वर्गभेद निर्माण झाला आहे. अशा प्रकारचे प्राथमिक पातळीवरील वर्णनात्मक प्रतिपादन त्यांनी केलेले आहे.

जातीय प्रतिष्ठा ही लोकांना आर्थिक हितसंबंधापेक्षा अधिक महत्वाची वाटतेही एक वस्तूस्थिती आहे. डॉ. आंबेडकरांसारख्या विद्वान विभूतींचे नेतृत्व ही जातीय प्रतिष्ठेच्या कल्पनेने ग्रस्त राहिले ही गोष्ट अत्यंत बोलकी असल्याचे पळशीकरांनी नमूद केले आहे.

'आजच्या कुटुंबपद्धतीतील स्थित्यंतरे' या परीक्षणामध्ये सुधा काळदाते यांनी आजच्या भारतीय समाजात कुटुंब संस्थेवर औद्योगिकीकरण, नागरीकरण, विज्ञान, नवविचार यांचा परिणाम किती झाला आहे, हा सामाजशास्त्रीय दृष्ट्या महत्वाचा विषय चर्चिला आहे. याची दोन कारणे आहेत एक म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण असलेली भारतीय एकत्र कुटुंब पद्धती खऱ्या अर्थाने आज किती प्रमाणात अस्तित्वात आहे. नजीकच्या भूतकाळात ती अस्तित्वात होती की नव्हती, आणि असलीच तर औद्योगिकीकरणामुळे तिच्याच होणारा बदल पाश्चात्य कुटुंबपद्धतीत झाला त्याच धर्तीवर होईल की निराळ्या स्वरुपात याबाबत समाजशास्त्रात एकमत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

एकत्र कुटुंबाबाबत आपापली मते स्पष्ट करताना या सर्वांनी एक गोष्ट मान्य केलेली दिसती. ती म्हणजे तीन पिढ्यांचे नातेवाईक वास्तव करीत असलेली पारंपारिक एकत्र कुटुंबपद्धती आज अभावाने आढळते. त्याचबरोबर पाश्चिमात्य कुटुंबाप्रमाणे संपूर्णत: विभक्त कुटुंबपद्धतीही भारतात अभावानेच आढळते. आज अभिप्रेत असलेले कुटुंब मध्यावस्थेत आहे.

'जातिव्यवस्थेवरील विवेचनाचे केवळ संकलन' या लेखामध्ये य. भा. दामले यांनी लेखकाने केवळ जातिव्यवस्थेवरच्या विवेचनावर भर दिल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. अर्थात लेखकाला जातिव्यवस्था व निरनिराळ्या विचारसरण्या ह्यांच्या परस्परसंबंधीची उकल करता आली असती. परंतु लेखकाने ते टाळलेले आहे. याकडे दामले यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. याउलट जातिव्यवस्थेचा उगम, त्यावेळची परिस्थिती, वरचढ जाती व ब्राह्मणांचा सामाजिक दर्जा इ. प्रश्नांविषयी विवेचन केले आहे. परंतु लेखकाने स्वत:चे विशेष मत प्रतिपादावयाचे नसून निव्वळ इतर लेखकांनी काय म्हटले आहे याचाच थोडक्यात परामर्श घेतल्याचे स्पष्ट होते.

भारतातील सवर्ण व दलित यांच्यातील संघर्षांना आज राजकिय परिणाम प्राप्त होत आहे. आज पुरोगामी महाराष्ट्र जातियतेचा प्रश्न पुन्हा एकदा महत्वाचा बनला आहे. त्यामुळेच या

समस्येविरुद्ध लढणाऱ्या कार्यकर्त्यांची जाणीव विकसित करण्याच्या संदर्भात जाती आणि वर्ग या पुस्तकाची कामगिरी महत्वपूर्ण असल्याचे रमेश पाध्ये यांनी 'जाती आणि वर्ग' या परीक्षणामध्ये नमूद केले आहे.

भारतातील जातीयतेच्या प्रश्नांची मार्क्सवादी पद्धतीने मांडरी करणारे दोन लेख या पुस्तकात अंतर्भूत करण्यात आले हे लेख मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांचे आहे. कॉम्रेड बी. टी. रणदिवे यांच्या मते भारतातील जातिव्यवस्था व ग्रामीण सरंजामदारी यांच्यातील संबंध घनिष्ट आहेत. येथील स्वातंत्र्य लढ्यातील बुद्धिजीवी वर्णाचे वर्गीय हितसंबंद सरंजामदारी व्यवस्थेत गुंतलेले असल्यामुळे त्यांनी ग्रामीण पुर्नरचनेच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करुन जातिव्यवस्थेवर हल्ला चढवला नाही. तसेच स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या भांडवलदारावर वर्गाने शेतकरी क्रांतीस सुरुंग लावल्यामुळे येथील भांडवलपूर्व उत्पादन संबंध व विचारसरणी असून ही टिकून आहे. स्वातंत्र्योत्तर काळात येथे तडजोडवादी भूमिकेचा पाठपुरावा केला नाही. त्यासाठी काही जाती–जमातींना थोड्याफार सवलती देऊन सत्ताधाऱ्यांनी निवडणूकीच्या राजकारणातील सोय पाहिली. यातून सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेला चालना मिळाली व सामाजिक जाणिवांचा अभाव उत्पन्न झाला.

थोडक्यात त्यांच्या मते, जातिव्यवस्थेच्या विरोधी सर्वकष स्वरुपाचा लढा येथे आजपर्यंत उभा राहिला नाही. परिणामी येथील सामाजिक संबंध बदलले नाहीत.

भारतीय कुटुंबव्यवस्था ही पितृप्रधान व्यवस्था आहे. यात पुरुषांचा अधिकार चालतो त्यामुळे कुटुंब व्यवस्थेचा महत्वाचा घटक असताना स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तिचे शोषण केले. ही विषमता दूर करण्याचा आग्रह वैचारिक साहित्यात धरला जातो. स्त्री सुद्धा एक सामाजिक घटक आहे. तिला स्वत:चे व्यक्तिमत्व, जाणिवा आहेत. स्वातंत्र्य, समता हे मूलभूत अधिकार स्त्रीला मिळालाच पाहिजे. अशा स्वरुपाची मांडणी सामाजिक आशयात समाविष्ट आहे. प्रभा तुळपुले यांनी 'स्त्रियांची मुक्ती' या परीक्षणातून स्त्रीला समजामध्ये असणाऱ्या दुय्यम स्थानाबद्दल विचार मांडले आहेत.

२१ व्या शतकातही भारतीय जातिसंस्था पाय रोवून उभी आहे. प्रतिगामी विचार सरणी

याला खतपाणी घातले आहे. त्यामुळे वैचारिक साहित्याची याविषयी भूमिका महत्वाची ठरते. समाज प्रबोधन पक्किेमध्ये वसंत पळशीकर आणि सुधा काळदाते यांनी जातिव्यवस्थेविषयी मार्मिक विवेचन केले आहे. जातिनिर्मूलनाच्या कृतिकार्यक्रमात वैचारिक साहित्याचे योगदान नाकारता येत नाही. समाजव्यवस्थेत विविध प्रश्नांमध्येच वंचित वर्गाच्या प्रश्नांविषयी विचारमंथन वैचारिक साहित्यात केले जाते. समाजात कष्टकरी, कामगार, मंजूर, गरीब, अनाथ बालके, निराश्रित वृद्ध या सर्व वंचित घटकांच्या विविध प्रश्नांची मांडणी करुन या वर्गामध्ये परिवर्तन प्रबोधन करण्याविषयीची भूमिका 'समाज प्रबोधनपत्रिके' ने पार पाडली आहे.

**२) धार्मिक :–**

धर्मचिंतन हे वैचारिक साहित्याचा गाभा आहे. प्राधान्याने धर्मविषयीच्या विचार मांडणीतूनच वैचारिक लेखनाचा प्रारंभ पाहायला मिळतो. पाश्चात्य व भारतीय पातळीवर आणि प्राचीन कालखंडातून ते आज एकविसाव्या शतकापर्यंत धर्मचिंतन चालू असून त्यावर वैचारिक लेखन होत आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत धर्मसंस्था प्रधान मानली गेली व आजही मानली जाते. मानवाने आपल्या उत्क्रांतीच्या काळात सामाजिक व्यवहार सुव्यवस्थित चालविण्यासाठी धर्मव्यवस्था निर्माण केली. मात्र पुढे यात प्रचंड बदल करुन धर्मव्यवस्थेचे रुपांतर शोषण व्यवस्थेत झाले आणि मानव निर्मित ही व्यवस्था मानवाच्या मानव्यास काळिमा फासण्यास तयार केली गेली.

सामान्य लोकांना धर्म नावाची व्यवस्था पाहिजे असते. ही गरज प्रतिगामी विचारवंत तर मोठ्या धिटाईने मांडतातच. पण तथागत बुद्धांपासून डॉ. आंबेडकरांपर्यंतचे पुरोगामी विचारांचे उद्‌गाते आणि प्रवर्तकही धर्म हा ग्राह्य धरला आहे. मात्र या गृहितकात दोघांमध्ये प्रचंड दरी असलेली दिसते. प्रतिगामी धर्मविचार करताना देवाचे अस्तित्व मान्य करतो. रुढी, प्रथा, परंपरांचा स्वीकार, कर्म, मोक्ष, स्वर्ग, नरक, चैतन्य, अत्मा, भूत, चमत्कार इ. विश्वास ठेवतो. तर याच्या अगदी उलट पुरोगामी विचारांमध्ये धर्माचे अस्तित्व मान्य करताना, देवाचे अस्तित्वास नकार, परंपरांना नकार, सर्व विषमता, जातिभेद, वंशभेद, स्त्री–पुरुष भेद यांना नकार देते आणि

मानवतावादी, स्वातंत्र्य, समता, बंधुता सांगणारा विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ धर्माची संकल्पना मांडतात.

धर्म ही संकल्पना भारतीय पातळीवर व्यामिश्र स्वरुपाची संकल्पना आहे. भारतात प्राधान्याने हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, जैन व बौद्ध धर्माचे लोक राहतात. वैचारिक साहित्याचा इतिहास पाहता हिंदुधर्म, मुस्लिम धर्म व बौद्ध धम्म या तीन धर्माविषयी विचारमंथन वैचारिक साहित्यात प्राधान्याने मांडले. हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. ब्राह्मण आणि पुरोहित वर्गाचे प्रचंड वर्चस्व या धर्मावर असून चातुवर्णव्यवस्था, अस्पृश्यता, जातिभेद, वंशभेद इत्यादी अनिष्ट प्रथा यात प्राधान्याने मांडल्या जातात. एकोणिसाव्या शतकातील वैचारिक लेखनाने उपरोक्त हिंदू धर्मामध्ये सुधारणा करुन अस्पृश्य, जातीभेद नष्ट करण्याचे प्रयत्न केले आणि धर्म प्राबल्य कमी करुन लोकशाहीची मांडणी केली.

मुस्लिम धर्माचिकित्सा करता त्यातील प्रथांच्या विरोधी ही भूमिका वैचारिक साहित्यात मांडणी केल्याचे दिसते. १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मप्रवर्तन करुन बौद्ध धम्म स्वीकारला यानंतर भारतात प्रचंड स्वरुपात बौद्ध धम्म चिंतनपर लेखन झाले. या सर्वच म्हणजे हिंदू, मुस्लिम व बौद्ध धर्माविषयीचे चिंतन हे ही धार्मिक आशयनिष्ठ वैचारिक साहित्यात समाविष्ट केले आहे.

अलीकडे धर्म ही संकल्पनाच नाकारली जाऊ लागली आहे. कारण सर्वच दु:ख आणि शोषणाचे मूळ धर्मात असल्याने जगातले सर्वच धर्म बरखास्त करा असाही सूर निघतो आहे. मात्र हे होणे मानवी जीवन अस्तित्वासाठी योग्य नाही. धर्म हा मानवी जीवनाला पोषकच असतो. त्यामुळे धर्मचिंतन हे वैचारिक साहित्याचे महत्वाचे आशयतत्व ठरते.

'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये हिंदू, मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन इ. धर्माविषयी विवेचन आढळते. 'हिंदू धर्मा' च्या इतिहासाचे वेगवेगळे पैलूवर प्रकाश टाकण्याचे काम गोपाळ राणे यांनी 'हिंदू धर्माच्या इतिहासाचे काही पैलू' या परीक्षणामध्ये केले आहे. त्यामध्ये त्यांनी दोन महत्वाचे दोन मुद्दे मांडले आहे. १) हिंदु धर्माची परंपरा वैदिक नसून ती मोहंजोदडो व हडप्पा येतील सिंधू संस्कृतीशी मिळती–जुळती आहे. तेव्हा हिंदू–धर्माच्या परंपरेचा उगम सिंधू संस्कृतीत किंवा

तत्पूर्व संस्कृतीत शोधणे भाग पडते. २) तसेच, वैदिक संस्कृती ही सिंधू संस्कृतीपासून सुरु झालेल्या हिंदू परंपरेच्या अखंड प्रवाहात आलेली पण परिणामकारक न ठरलेली एक लाट होती.

हिंदू धर्माचे सर्वात महत्वाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे मूर्तिपूजा. वैदिक लोक मूर्तिपूजक नव्हते तर निसर्गपूजक होते. या उलट आज उपलब्ध झालेल्या पुराव्यावरुन सिंधू संस्कृतीत मूर्तिपूजा होती असे निश्चित सांगता येते, असे सिंधू उत्खननात उपलब्ध झालेल्या खापरांच्या मुंद्रावर जी तीन तोंडाच्या देवाची मूर्ती उपलब्ध झाली. त्यावरुन स्पष्ट होत असल्याचे लेखकाने नमूद होते.

वैदिक संस्कृतीत आढळत नाही पर ती जी सिंधू संस्कृती आणि हिंदु धर्म यांना सांधते अशी दुसरी एक महत्वाची गोष्ट लेखकाने नजरेस आणली आहे ती म्हणजे सार्वजनिक पूजेची स्थाने–देवालये वैदिक धर्मात ज्याप्रमाणे मूर्तिपूजा नव्हती. त्याप्रमाणे सार्वजनिक पूजेचे–देवालयांचा अभाव होता. हिंदू धर्मात तसेच जैन व बौद्ध पंथीयात अशा प्रकारची सार्वजनिक पूजेची, प्रथा व स्थाने जी उपलब्ध आहे. त्यांचा उगम सिंधू संस्कृतीत आढळतो. तसेच तीर्थक्षेत्री सार्वजनिक स्नानाची प्रथा आज ची हिंदू समाजात आढळते तिच्या उगमाचे मोहंजोदडो येथे सापडलेल्या सार्वजनिक स्नानासाठी बांधलेल्या घाटावरुन अनुमान करतो.

लेखकांनी हिंदू धर्मातील एका महत्वाच्या विचारसरणीचा उल्लेख टाळला आहे, यावर राणे यांनी लक्षे वेधले आहे. डॉक्टर महाशयांनी हिंदू धर्मातील एका महत्वाच्या विचार सरणीचा उल्लेख टाळला आहे. तिचा हिंदू समाजावर दूरवर परिणाम झाला आहे. ते तत्वज्ञान म्हणजे 'पूर्वक्रमीविपाक' ह्या सिद्धांन्ताने हिंदू धर्म सनातन व चिरंतन केला, पण त्याचबरोबर अस्पृश्यताही चिरंतन केली. ह्यातील मेख अशी आहे की, फक्त अस्पृश्यता लादणाऱ्यांना आपण काही वाईट करीत आहोत असे वाटत नाही. तर त्यांच्यावर अन्याय होत आहे त्यांनाही आपण ही स्थिती निमूटपणे भोगणे ह्यात आपली मुक्ती आहे असे वाटते. त्या अन्यायविरुद्ध त्यांची मने बंड करुन उठली नाहीत. हिंदू समाज साचलेल्या डबक्याप्रमाणे बनला आहे. परिवर्तनशीलता नष्ट झाली आहे, तेव्हा डॉक्टर महाशयांनी जो विश्वास प्रकट केला आहे, त्या विश्वासाला काहीच आधार नसल्याचे श्री. राणे यांनी स्पष्ट केले आहे. 'इस्लामचा हिंदी अवतार' या परीक्षणामध्ये

पन्नालाल सुराणा आणि मोहन शाकिर यांनी इस्लाम धर्म अरब देशात कसा विकसित झाला, भारतात तो कसा आला, मध्ययुगात इस्लामची म्हणजे इस्लामी–धर्मगुरु वा नेत्यांची काय भूमिका होती, इंग्रज अमदानीत ती कशी राहिली व भारताच्या विभाजनात या भूमिकेचा वाटा किती व स्वातंत्र्योत्तर भारतात या मंडळींनी कुठला पवित्रा घेतला आहे, याची माहिती बऱ्याच विस्ताराने ग्रंथात दिली आहे, पण आधुनिकतेच्या दिशेने चाललेल्या संक्रमण प्रक्रियेचे काय? असा प्रश्न त्यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात उपस्थित केला आहे.

मुस्लिमांच्या विशिष्ट भूमिकेमुळे फाळणी होणे अटळ होते असे श्री. करंदीकरांचे मत आहे, असे या पुस्तकातील विवेचनावरुन दिसते. अरुण सारथी लिहितात, ''मुस्लिम अलगतावादाच्या चळवळीचे जनक सय्यद अहमंद मुस्लिम समाजाच्या दोन उणीवा म्हणजे शैक्षणिक मागासलेपणा आणि अल्पसंख्या लोकशाही प्रक्रियेमध्ये संख्येला महत्व असल्यामुळे हिंदूचे येथील राज्यकर्ते होतील आणि शिक्षणाच्या प्रसारामुळे सर्व जबाबदारीच्या जागा हिंदूचीच मक्तेदारी बनतील ही धास्ती सय्यद अहमद यांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेल्या अलीगढ चळवळीच्या मुळाशी होती.''[१२] यामुळे फाळणी अटळ झाली. एकमत असेही मांडले आहे की, काँग्रेसने जर १९४७ साली अधिक कणखरपणा दाखवला असता आणि सत्तेचा मोह बाजूला सारला असता तर, कदाचित स्वातंत्र्य थोडे लांबले असते पण फाळणी नक्की टळली असती. फाळणीची जबाबदारी कोणत्याही एका गटावर टाकता येत नाही. लीग, काँग्रेस व ब्रिटीश सत्ता हे तिघेही त्यात वाटेकरी आहेत. लीगचा वाटा सिंहाचा होता. ही गोष्ट अर्थातच स्पष्ट आहे. त्या सय्यद अहमद यांच्या प्रेरणेमुळे लीग फाळणीच्याबाबतीत आक्रमक, ठाम होती असे दिसते. पन्नालाला सुराणा यांनी भारताच्या फाळणीला जबाबदार असणाऱ्या घटकांवर प्रकाश टाकलेला आहे.

'मुस्लिम समाजमानस घडविणाऱ्या विचारधारा' (अ. भि. एहा) 'भारतातील मुस्लिम विचारप्रवाह' (वसंत पळशीकर) 'भारतीय मुसलमान : एक न सुटलेला प्रश्न' (रा. मि. जोशी) 'मुस्लिम प्रश्न रुळावर आणणारी मीमांसा' (भास्कर लक्ष्मण भोळे) इत्यादी परीक्षणामधून मुस्लिम विचाराधारा, मुस्लिम हा न सुटणारा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न किंवा त्याला दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. धर्मश्रद्धा हीच मुसलमानपणाची एकमेव कसोटी करण्याचा आग्रह

मुस्लिम राखतात तेव्हा राजकारण व संस्कृती या क्षेत्रात त्या गोष्टीचे सरळ सरळ पर्यवसान फुटीरवादी भूमिकेत होते, हे स्पष्ट केले आहे.

भारतातील मुस्लिम विचारप्रवाह कोणत्या दिशेने वाहत होते? त्या पाठीमागची कारणे काय आहेत. याची मीमांसा वसंत पळणीकर यांनी 'भारतातील मुस्लिम विचारप्रवाह' या परीक्षणात केला आहे. साम्राज्य गमावलेल्या मुस्लिम उच्चवर्गीय समाजापुढे आपले गेलेले राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थान परत कसे मिळवावे या स्वरुपाचे आव्हान होते. मुळात हे साम्राज्य आपण का गमावले या प्रश्नाचे उत्तरही प्रारंभीच्या काही व्यक्तींनी शोधावे हे स्वाभाविकच आहे.

ब्रिटीशांच्या राजवटीमुळे काही गोष्टी कायमच्या बदलल्या होत्या. उदाहरणार्थ, या पुढील काळात आपल्या हाती निर्विवाद राज्यकर्तेपण येणे शक्य नाही. आपण संख्येने अल्पसंख्य आहोत, या पुढच्या काळात शिक्षणाला नोकरी–चाकरीच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झालेले आहे, इत्यादी गोष्टी मुसलमान नेत्याच्या लक्षात आलेल्या होत्या. या परिस्थितीतही मुसलमानांना पूर्वीचे महत्वाचे स्थान कसे प्राप्त होऊ शकेल, केवळ अल्पसंख्यांक जमात म्हणून गौणत्व प्राप्त होण्यापासून तिला कसे वाचवता येईल ही सर्व नेत्यांची चिंता होती. आपल्या समाजाचा आर्थिक, नैतिक, सामाजिक व राजकीय अभ्युदय साधावा ही त्यांची प्रेरणा होती, असे असूनही धर्माविषयी त्यांना भूमिका घ्यावीच लागली, कारण धर्म ही सर्वसामान्य मुसलमान समाजाच्या जीवनातली एक मध्यवर्ती घटना होती, हा संबंध शाकीर यांना समजला, याचे कारण देताना वसंत पळशीकर म्हणतात, ''ते आपल्या पुरोगामित्वात मश्गुल होते. प्रसिद्ध स्तंभलेखक थॉमस एला ब्रॅडमनने एक महत्वाचा प्रश्न विचारला आहे.'' तो म्हणतो, ''हिंदू जेव्हा शेकडो मुसलमानांचे खून करतात तेव्हा अरबी प्रसारमाध्यमे अत्यंत दबलेल्या आवाजात भावनांची अभिव्यक्ती करतात परंतु इस्त्राइल जेव्हा डझनभर मुस्लिमांचा जीव घेतो, तेथे मुसलमान आणि यहुदीच्यामध्ये दोन्हीकडील कितीतरी लोक मारले जातात तेव्हा संपूर्ण मुस्लिम जगतात हंगामा होतो, असे का होते?''[१३] असा प्रश्न पडलेला आहे. रा. भि. जोशी यांना सुद्धा 'भारतीय मुसलमान : एक न सुटलेला प्रश्न वाटतो.' तो प्रश्न सोडविण्यासाठी, भारतातले मुसलमान आणि हिंदू ह्यांच्या परस्पर संबंधात जो

ताण आहे. तो नाहीसा व्हावा, भारतातल्या मुसलमानांनी भारताच्या जीवनप्रवाहाशी एकरुप व्हावे, इतरांनी विशेषत: हिंदूंनी ह्या प्रक्रियेत त्यांना मनापासून साहाय्य करावे. त्याविषयी तळमळ असणारे जे लोक महाराष्ट्रात आहेत. ह्यात श्रीपाद जोशी हे एक आहेत.

समीक्षक श्री. रा. भि. जोशी यांनी हिंदू आणि मुसलमान ह्यांच्या भूमिकांमधला फरक, त्यातले गुणदोष दाखविताना समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. 'भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील मुसलमानांचा वाटा' ह्या प्रकरणात राष्ट्रीय मुसलमानांच्या भूमिकेविषयी लिहिताना त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, ''मुस्लिम देशभक्तांची मूळ प्रेरणा धार्मिक होती, म्हणून त्यांची देशभक्ती हिणकस होती. किंबहुना ते खरे देशभक्तच नव्हते.'' असे म्हणणे कितपत न्याय होईल? ते देशभक्त नव्हते असे म्हणता येणार नाही. हे खरे पण त्यांच्या देशभक्तीचे स्वरुप थोडे निराळे होते. हिंदुस्थान त्यांना आपला देश वाटत होता. तो त्यांनी जिंकून घेतला होता म्हणून त्यांच्यावर त्यांचा मालकी हक्क होता. ह्या भावनेने आणि त्यांना फाळणी नको होती ती फाळणीमुळे इस्लाम प्रसाराचे क्षेत्र संकुचित होत होते म्हणून ! मुसलमानांनी आपल्या विचारसरणीमध्ये आणि करणींमध्ये बदल केल्याशिवाय त्यांच्या भवितव्याचा मार्ग सुकर होणार नाही, हे त्यांना कळत नाही आणि कळत नाही ह्याचे कारण धर्मनिष्ठ नागरिकत्वाच्या कल्पनेतून सूटायला ते तयार नाहीत. असे सांगितले आहे. मुसलमानांनी आपल्या विचार सरणीतून बाहेर यावे अशी आकांक्षा रा. श्री. जोग यांनी व्यक्त केली आहे.

'मुस्लिम प्रश्न रुळावर आणणारी मीमांसा' या लेखात भारतीय मुस्लिमांची समाज रचना आणि मानसिकता याची भास्कर लक्ष्मण भोळे यांनी मूलगामी चर्चा केली आहे. प्रा. बेन्नूर यांच्या मुख्य तक्रारीनुसार स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिम समाजाचा खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आणि समाज भूमिकेतून विचार झाला नाही. जो झाला तो फक्त दंगलीच्या अनुषंगाने किंवा निवडणूक प्रक्रियेतील एक घटक याच संदर्भात झाला आणि तो सुद्धा ठराविक व तांत्रिक पद्धतीनेच झाला. मुस्लिमांकडे बघण्याचा आपला या दृष्टीकोनात बदल करुन त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या असलेला मागासलेपणा समजातून घेतला जावा अशी आशा व्यक्त करतात.

'हिंदू समाजाची संरचना' या लेखात पां. वा. गाडगीळ यांनी बोस यांनी केवळ ऐतिहासिक

विवेचन केले नाही तर इंग्रजांनी आधुनिक आर्थिक तंत्र येथे आणल्यामुळे ही हजारो वर्षे टिकून राहिलेली घडी कशी विस्कटली हे दाखवून दिले आहे.

प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत चालत आलेल्या हिंदूसमाज रचना पद्धतीचा गौरव करताना बोस म्हणतात, ''राज्ये जन्मली व मेली, हिंदू समाजास अनेक अवस्थातून जावे लागले, पण हिंदू समाजास आपली संस्कृती टिकविता आली. वर्ण व्यवस्थेमुळे हे घडले. भारताच्या प्राचीन तत्वज्ञांनी सर्व समाजांना वर्णव्यवस्थेत समाविष्ट केले. अनेक समाज एकत्र आले असता त्यांना मूलभूत चार वर्णात घालून त्यांचा एक महासमाज बनवावा अशी ही पद्धत आहे. निरनिराळ्या लहान लहान समाजांच्या गरजा, त्यांच्या अंगचे गुण, त्यांची बुद्धिमत्ता या अनुसार ते ते समान काही कामे अंगावर घेऊन पिढ्या न पिढ्या करीत राहतात. अशा समाजाची व्यवस्था न विस्फटता पिढ्या न पिढ्या त्यांच्या रंक्षणाची व त्यांना अन्न, वस्त्र पुरविण्याची अंतिम जबाबदारी जर मोठ्या समाजाने घेतली तर असे लहान–लहान समाज एकमेकांशी सहकार करतील. या सहकारातून त्या नमलेल्या महासमाजात जे ऐक्य निर्माण होईल त्यामुळे टिकाऊ समाज निर्माण होईल. हे सहकार्य हा या व्यवस्थेचा एक मोठा लाभ आहेच. पण याशिवाय या व्यवस्थेत आणखी एक आवश्यक गुण आहे. एखाद्या समाजाची संस्कृती, चालरीत, जात काहीही असो, यात बिघाड न होता हिंदूंच्या महासमाजात सामील होणे हे लहान समाजास शक्य होई.''[१४]

श्री. बोस यांनी जाती अथवा वर्ण यावर भर दिला नसून सुतार, लोहार, कोष्टीकाम, बांधकाम वगैरे आर्थिक उत्पादनाची कामे आर्यानी समाजात वंशपरंपरेने वाटून दिली यामुळे खेडी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी कशी झाली आणि परचक्र शहरावर आली व शहरावरुन गेली तरी ही ग्रामीण, आर्थिक व सांस्कृतिक व्यवस्था टिकून राहिली ही गोष्ट बोस यांनी अभ्यासकांच्या नजरेस आणून दिल्याचे स्पष्ट केले आहे. पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षणात बारा बुलतेदारांमुळे ग्रामीण खेडी परकीय आक्रमणात आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकली, याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

'धर्मभावना आणि मानव विकास' या लेखात दि. के. बेडेकर यांनी झेहूनर यांच्या व्याख्यानाची ओसरती कल्पना देऊन दोन दृष्टीने व्याख्यानाचे महत्व स्पष्ट करुन सांगितले आहे.

१) धर्म विचाराची एक दिशा या व्याख्यानामध्ये अनुस्यूत आहे. मानवी एकात्मता साधेल कशी? हा धर्म विचारापुढील एकमेव प्रश्न असू शकतो, हा आग्रह माझ्या मते आवश्यक आहे. तसेच ख्रिस्ती व पौर्वात्य धर्मविचारांचे केलेले विश्लेषण उपयुक्त वाटते. २) धर्म विचारात ऐतिहासिक दृष्टीची गरज आहे. त्याप्रमाणे मानवी मनातील श्रेयाच्या मूल्याच्या व भवितव्याच्या कल्पनांमधील एक मूलभूत सातत्य व सूत्र ओळखण्याची गरज आहे, या दोन्ही अवधाने झेहूनर यांच्या मीमांसेने कसे राखलेले आहे, हेही अधोरेखित केले आहे.

तसेच 'धर्म आणि राजकीय, सामाजिक परिवर्तन' या लेखात दि. के. बेडेकर यांनी स्पेन्सरने धर्माबाबत केलेल्या विवेचनाचा परामर्श घेतला आहे. धर्माची तत्वे काही असोत, शेवटी धर्मभावना ही माणसांना एकत्र ठेवते, सामाजिक व राजकीय महत्वाकांक्षा पुऱ्या करण्यासाठी धार्मिक समूह झगडतात, या लढ्यात माणसे अतिशय स्वार्थी, क्रूर व आंधळी बनू शकतात हे वास्तव आपल्या समोर मांडले आहे. तसेच आशियाई देशांतील सात प्रमुख राष्ट्रांतील धर्म प्रबोधनाचा समाजजीवनाशी आलेला विविधांगी जो संबंध आहे. तो समजून घेण्यासाठी हा लेख उपयोगी आहे. तसेच भारतीय परंपरा, इंग्रज पूर्व प्रबोधन, इंग्रज काळातील प्रबोधन आणि आजचे धर्मासंबंधी वास्तव याचा सामाजिक, राजकीय संदर्भात अभ्यास करताना हा ग्रंथ उपयोगी असल्याचे बेडेकर नमूद करतात.

'नवबौद्धयानाच्या सम्यक आकलनाच्या दिशेने' या लेखात प्रदिप गोखले यांनी गेल ऑमवेट यांनी नवबौद्धयाना विषयीच्या त्यांच्या विविध भूमिका स्पष्ट केल्या आहेत. गेल ऑमवेट लिखित 'बुद्धिझम इन इंडिया', 'चॅलेंजिंग ब्रम्हॉनिझम अॅड कास्ट' या पुस्तकाचे स्वरुप बौद्ध धर्माच्या स्थापनेपासून भारतातील बौद्धधम्माच्या आंबेडकरी अविष्कारापर्यंत बौद्धधम्माचा साक्षेपी ऐतिहासिक आढावा असे असले तरी योगदानाच्या दृष्टिकोनातून या पुस्तकाचे दोन भाग पडत असल्याचे नमूद केले आहे. दुसऱ्या भागामध्ये लेखिकेने बौद्धधम्माच्या आंबेडकरी पुनर्मांडणीचे व पुनर्रुभारणीचे स्वत:चे आकलन व मूल्यांकन मांडले आहे. लेखिकेच्या स्वत:च्या भूमिकाचा अविष्कार या दृष्टीने ते महत्वाचे आहे.

आंबेडकरांनी बौद्धधम्माची जी मांडणी केली त्यात पारंपारिक बौद्धधम्मापेक्षा अनेक

बाबतीत वेगळा कसा आहे, हे गेल ऑमवेट यांनी कसे पटवून दिले आहे, हे बेडेकर यांनी सांगितले आहे. बौद्धधम्माच्या पुनर्मांडणीत आंबेडकरांनी टाकलेले कदाचित सर्वात क्रांतिकारक पाऊल जर कोणते असेल तर पारंपारिक कर्मसिद्धांत व पुनर्जन्म या कल्पनांना नकार देऊन या कल्पनांची त्यांनी केलेली सर्वस्वी वेगळी मांडणी पण The Budha and His Dhamma या पुस्तकात आढावा घेताना या मुद्द्यांची दखलच घेतली, नसल्याचे याकडे लक्ष वेधले आहे.

**३) शैक्षणिक :–**

वैचारिक साहित्यात शिक्षण विषयक विचारांना महत्वाचे स्थान आहे. भारतीय विचारवंतांमध्ये सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात मतभिन्नता असली तरी शैक्षणिक विचारांच्या बाबतीत प्रत्येकाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. पाश्चात्य देशामध्ये रुसो, पेस्टॉलॉजी, ड्युई, रसेल इ. विचारवंतांनी शिक्षण विषयक विचार मांडले. तर भारतात मा. फुले. डॉ. आंबेडकर, म. गांधी, स्वामी विवेकानंद, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी विचारवंतांनी शिक्षणासाठी मुलभूत विचारमंथन व कृतिकार्य केले.

भारतात प्राचीन कालखंडापासून शिक्षणासाठी आश्रमव्यवस्था होती. या आश्रमामध्ये फक्त धर्मग्रंथाचे वाचन, मनन, पाठांतर घेतले जात. सर्व समाजापासून दूर अरण्यात ही व्यवस्था होती. मात्र ही सर्व शिक्षण व्यवस्था विशिष्ट जातीसाठीच हा समाज निरपेक्ष, धार्मिक स्वरुपाची होती. अर्वाचीन कालखंडात इंग्रजी राजवटीमध्ये परंपरागत शिक्षण व्यवस्थेला बदलून नवीन शिक्षण व्यवस्था निर्माण केली. तिने धर्मनिरपेक्ष समाज सापेक्ष, मानवकेंद्री, तळागाळातील लोकांपर्यंत पाहचविण्याचे कार्य केले आहे. इंगजी राजवटीत आश्रम नाकारुन शाळा अस्तित्वात आल्या. सर्व सामाजातील, धर्मातील, जाती–जमातीतील सर्वच स्थरातील लोकांना शिक्षणासाठीची व्यवस्था केली.

भारतीय राज्यघटनेमध्ये शिक्षण हा मूलभूत अधिकार म्हणून मांडला. प्राचीन काळापासून आधुनिक कालखंडापर्यंत या सर्व शैक्षणिक संदर्भातील स्थित्यंतरांमध्ये विचारवंताचे योगदान महत्वाचे आहे. त्यांनी कृती व विचारांच्या माध्यामातून शिक्षणाची दारे सर्व सामाजाला खुली केली त्यामुळे शतकानुशतके अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या अस्पृश्य, कष्टकरी, कामगार,

शेतकरी, मजूर सर्व बहुजन समाज ज्ञानाच्या नव प्रकाशाने प्रज्वलित झाला. जोतिराव फुले यांनी बहुजन समाजाच्या शिक्षणाविषयी केलेले कार्य इतिहासात अजरामर झाले.

शिक्षणाचे महत्व सांगताना फुले म्हणतात, ''विद्येविना मती गेली, मतिविना नीती गेली, नितीविना गति गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' सर्व बहुजन समाजाच्या शोषणाचे मूळ अज्ञान आहे. हा शोध फुल्यांसारख्या सत्यशोधकाने घेतला व शिक्षणासाठी कृतिकार्यक्रम तयार केला. शाळांच्या माध्यमातून अस्पृश्य, स्त्रिया इ. उपेक्षित वर्गाला शिक्षणाचे बाळकडू त्यांनी पाजले. त्यामुळे पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा प्रज्ञावंत उदयास आला. फुल्यांची हीच भूमिका घेऊन डॉ. आंबेडकरांनी आपल्या संबंध तत्वज्ञानात शिक्षणाला आग्रक्रम दिला. 'शिका संघटित व्हा, आणि संघर्ष करा.' हा संदेश देताना शिक्षणाचा विचार प्रथमस्थानी मांडला आणि भारतीय संविधानामध्ये बहुजन समाजाला शिक्षणाचा कायदेशीर अधिकार देऊन एक ऐतिहासिक कार्य केले.

या दोन महान विचारवंतांच्या शैक्षणिक विचारावरच्या पायावरच वैचारिक साहित्यात शिक्षण विषयीचे चिंतन केले आहे. या चिंतनात शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मुलभूत अधिकार आहे, सामाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे, तळागाळातील उपेक्षित समाजापर्यंत शिक्षण व्यवस्था राबवून त्यांच्या उत्थानाचा मार्ग निर्माण करा, शासनाने यासाठी सतत प्रयत्नशील असावे, विशेष सवलती, शिष्यवृत्त्या, अनुदाने, आरक्षण इ. मार्गाच्याआधारे शिक्षणाची सुव्यवस्था निर्माण करावी. या मुलभूत भूमिकांचा आग्रह धरला जातो. एकोणिसाव्या शतकातील बदलते शैक्षणिक संदर्भ, तंत्रज्ञान, आयटीक्षेत्र, स्पर्धा, नोकऱ्यांचा अभाव, वाढती बेरोजगारी, शिक्षण क्षेत्रातील बेबंदशाही, ढासळती मूल्य व्यवस्था इ. गंभीर प्रश्नांचा आढावा वैचारिक साहित्यातील शिक्षणविषयक विचारात घेतला जातो.

'क्लाइबिंग ए वॉल ऑफ ग्लास' या लेखात श्री. वसंत पळशीकर यांनी शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांची गळती, नापासांचे प्रमाण याकडे लक्ष वेधले आहे. मॅट्रिकच्या परीक्षेत शंभरातील साठ मुलांची कत्तल केल्यावर वस्तूत: बाकीच्या चाळीसपैकी जवळपास सगळीच विना अपघात पदवी परीक्षा उत्तीर्ण व्हायला हवीत. पण तसे चित्र आपणास पाहायला मिळत नाही. चूक कोठे आहे?

म्हणजे शिक्षणच कॉलेजातून दिले जात नाही की परीक्षा पद्धतीत दोष आहे? या प्रश्नांचे विवेचन केले आहे.

तसेच विद्यापीठ समाजाचे काही देणे लागतो आणि समाजासाठीचे आपले कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने काही अभ्यासक्रम आखण्याची आवश्यकता आहे, ही मूळ बैठक आहे. आजच्या संदर्भात समाज–विकास कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन समाज विकास चळवळीत जबाबदारीची कामे अंगावर घेऊ शकतील अशी माणसे तयार करण्याच्या कामात विद्यापीठाने लक्ष घातले पाहिजे, ह्या महत्वाच्या सूचनेकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

समाजाला ज्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारातील कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपली शिक्षण व्यवस्था संघटीत केली गेलेली नाही आणि आजही त्या दिशेने तिचे झपाट्याने परिवर्तन होईल असे प्रयत्न नाहीत. त्याचप्रमाणे आजवरची आमच्या येथील शिक्षणाची सारी परंपराच समाज विन्मुखतेची आहे, किंबहुना बहुजन समाजापासून अंतर वाढविण्याचे शिक्षण हे एक साधन आहे असे दोन महत्वाचे मुद्दे पळशीकरांनी मांडले आहेत, हे जूनेच मुद्दे असले तरी अद्यापही त्या बाबतीत विशेष हालचाल न झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'कॉलेज व्यवस्थापन : एक शिफारस' या लेखात भा. शं. भणगे यांनी उच्च शिक्षणाची उद्दिष्टे सांगितली आहेत. 'सुविद्य समाज निर्माण करणे' हे महत्वाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले आहे. कॉलेजचे शिक्षण मूल्यांवर आधारलेले हवे, ही मूल्ये कोणते कॉलेज किती अंशाने पार पाडते त्यावर कॉलेजचे यश अवलंबून आहे. गांधीजी शिक्षण विषयक विचार मांडताना म्हणतात, ''आपले महाविद्यालय हे पुस्तकी शिक्षणाचे नव्हे तर स्वातंत्र्याचे मंदिर आहे, (विद्यार्थ्यांचे) चारित्र्य घडविणे हे आपल्या पुढचे कार्य आहे. जेवढे आपण विद्यार्थ्यांबाबत हे घडविण्यात यशस्वी होऊ तेवढेच आपण स्वराज्यासाठी तयार होत जाऊ. विद्यार्थ्यांबरोबर काम करणे हेच स्वराज्याला आकार देण्याचे एकमेव साधन आहे. आपण आपला पैसा आणि आपले हृदय ओतून आज आपण ज्यांचे उद्घाटक करीत आहोत अशा संस्था निर्माण केल्या पाहिजेत.''[१५] भा. शं. भणगे यांनी सांगितलेली शिक्षणाची उद्दिष्टे अशीच उच्च कोटीतील आहेत, समाजाला मार्गदर्शक आहेत.

कॉलेजच्या संघटनेत प्राचार्यांचे स्थान अतीच महत्वाचे आहे. व्यक्तिमत्वाचा ठसा संबंध संस्थेवर उमटलेला असतो. ह्या व्यक्तिमत्वाच्या वेगळेपणामुळेच प्रत्येक कॉलेजला वेगळेपणा येतो. नेतृत्व करण्यासाठी प्राचार्यांची नियुक्ती असते आणि त्याने नेतृत्व केले पाहिजे पण कसे? त्याच्यापाशी एक शैक्षणिक तत्वज्ञान असले पाहिजे. ह्या तत्वज्ञानामुळे तो सदैव प्रयोगशील राहिल. प्राचार्य आयरन ह्यांची कॉलेजविषयी आणि प्राचार्यांविषयी ही अपेक्षा रास्त असल्याचे प्राचार्य भणगे यांनी नमूद केले आहे.

प्राचार्य भा. शं. भणगे हे एक व्यासंगी विद्वान आणि समाजापुढील समस्यांचा अभ्यास करुन उपेक्षितांना दलितांना आणि स्त्रियांना न्याय मिळविण्यासाठी काय केले पाहिजे याचे सतत चिंतन करणारे विचारवंत होते. या लेखामधून त्यांच्या शिक्षणविषयी असणाऱ्या तळमळीचे दर्शन घडते.

'भारतातील विद्यापीठांचे स्वातंत्र्य' या लेखात देवदत्त दाभोलकर यांनी भारतातील विद्यापीठांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा भारतीय लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असणाऱ्या प्रश्नाबाबत मीमांसा केली आहे. लोकशाहीच्या विकासाचा समंजस विचार शासनाच्या व नेत्यांच्या मनात असेल तर विद्यापीठांचे स्वातंत्र्य खरोखर अधिक सुरक्षित व्हावयास पाहिजे, परंतु याउलट आता शासन ही जनतेचे प्रतिनिधी असल्यामुळे शासनाला विद्यापीठाच्या क्षेत्रात हवा तसा हस्तक्षेप करण्याला अधिकार आहे, अशा अजाण आत्मविश्वासाने शासन वागू लागले तर विद्यापीठांचे स्वातंत्र्य धोक्यातही येऊ शकते. परकीय सत्तेच्या आक्रमणापेक्षा हा धोका अधिक असतो, कारण स्वकीय शासनाच्या विरोधी उभे राहताना सर्व स्वकीयांची सहानुभूती मिळू शकेलच असे नाही.

विद्यापीठाच्या स्वातंत्र्यावर जर बाह्य दडपण नसेल तरच विद्यापीठे आपल्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र विचारांचे, मुक्त ज्ञानसाधनेचे वातावण ठेवू शकतील. पण यासाठी विद्यापीठांची स्वतःची अस्मिता प्रभावी असली पाहिजे.

तसेच 'संक्रमणावस्थेतील भारतीय विद्यापीठे' या लेखात अ.के.भागवत यांनी भारतीय विद्यापीठांना स्वायतत्तेची परंपरा नाही, या लेखकाच्या म्हणण्याशी आपण सहमत असल्याचे

म्हटले आहे. तसेच विद्यापीठाने भोवतालच्या समाजाशी आभिमुख राहिले पाहिजे व त्या दृष्टीने शासकीय सल्ला मानला पाहिजे, असे सांगितले आहे.

आजच्या लोकशाहीच्या नव्या संदर्भात समाजातील अत्यंत उपेक्षित व मुलभूत मानवी हक्कापासून दूर राहिलेल्या समाजाची विद्यापीठे किती प्रमाणात दखल होते? प्रयोगशीलतेला तिथे इतके कमी महत्व का? ह्या व अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे मात्र या पुस्तकातून मिळत नाही. अशी खंत समीक्षकाने व्यक्त केली. ती यथार्थ वाटते.

शिक्षणक्षेत्रातील महत्वाचे कोणते दोन प्रश्न आहेत याकडे पुन्हा देवदत्त दाभोलकर यांनी लक्ष वेधले आहे. महाविद्यालयीन शिक्षणक्रमातील पहिले वर्ष हे पदवी पूर्व वर्ष म्हणून संबोधले जाते. पुढील तीन वर्षाच्या पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा पाया म्हणून या वर्षाकडे पाहिले जावे ही कल्पना ह्या नामाभिधानात अनुस्यूत आहे. शालेय शिक्षणाच्या व महाविद्यालयीन शिक्षणाचा सांधा जोडणारे वर्ष म्हणूनही या वर्षाचे महत्व आहे. सांधा जोडणारे वर्ष या नात्याने या वर्षभरात शालेय शिक्षण पद्धती काही प्रमाणात चालू राहिल्या तरी महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीचा विद्यार्थ्याला सराव व्हावा अशी अपेक्षा राहते. शैक्षणिकदृष्ट्या पाठांतर वाईट आहे तरी सुद्धा ऐशी नव्वद टक्के निकालाची परंपरा राखण्यासाठी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष केले जाते. यावर देवदत्त दाभोलकर यांनी प्रकाश टाकला आहे.

'चौथ्या योजनेतील शिक्षण' मध्ये श्री. भणगे यांनी केवळ पैशाने कार्य होत नाही, आणि माणसाचे कष्ट आणि कल्पकता अधिक महत्वाची आहे ह्या मुद्यावर आता जोर दिला पाहिजे, हे नमूद केले आहे. त्याचबरोबर आमचे शैक्षणिक नियोजन परदेशी तज्ज्ञांवर, परदेशी कार्यक्रमावर बरेच अवलंबून आहे. त्याऐवजी शिक्षणात आता स्वदेशीची चळवळ सुरु झाली पाहिजे. आपल्या देशाच्या स्वतंत्र गरजा आहे, आमचे स्वतंत्र प्रश्न आहेत, त्यांच्याकडे शिक्षणात लक्ष वेधले पाहिजे. नाईक म्हणतात, ''शिक्षण क्षेत्रातील योजनाकार ह्या बाबतीत फारसे काही करु शकत नाहीत. परमेश्वरावर भरवसा टाकून सर्व काही उत्तम घडेल म्हणून वाट बघत बसावे. दुसरा भयावह पर्याय आहे, राजकारणात शिरावे आणि निर्णय घेण्याऱ्यांवर दडपण आणण्याचा प्रयत्न करावा, माझ्या स्वभावाला हे मानणारे नाही, ज्यांना ते करायचे असेल त्यांना मी शुभ

इच्छितो.''[१६] आजच्या शिक्षणाने राष्ट्रीय वृत्ती आणि राष्ट्रीय एकात्मता यांची जाणीव करुन दिली पाहिजे. समाज आणि शाळा जोडली पाहिजेत. शिक्षणातून विद्यार्थ्यांचे शील सवर्धन व्हावयास हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

'सुशिक्षित बेकारीची समस्या' या लेखात प्रकाश कर्डिले यांनी रोजगारीच्या मर्यादित संधी, वाढती लोकसंख्या आणि शिक्षणाचा प्रसार या तीन गोष्टीमुळे सुशिक्षित बेकारीची समस्या दिवसेंदिवस जास्त गंभीर व बिकट होत जाईल, या वास्तव परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

स्वातंत्र्य येऊन दोन दशकानंतर सुद्धा भारतातील शिक्षण पद्धतीत योग्य असा बदल झालेला नाही. वसाहतीच्या स्वरुपाची अर्थव्यवस्था असताना परकीय सरकारने जी शिक्षण पद्धती निर्माण केली ती एका स्वतंत्र व विकसनशील राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या गरजा पूर्ण करु शकत नाही. विशेषत: शिक्षणाच्या वरच्या स्तरांवर शिक्षण जास्त व्यवसायिक व व्यवहार्य करण्याची गरज आहे, ह्या दृष्टीने शिक्षणक्रमांमध्ये सर्व स्तरांवर कोणत्या ना कोणत्या प्रशिक्षणचा समावेश असावा असे मुद्दे लेखकांनी सुचविले आहेत.

'अध्यापनाचे आधुनिकीकरण' या लेखामध्ये भा. शं. भणगे यांनी विविध विषयांच्या अध्यापनाच्या प्रश्नाबरोबरच इतरही संबंधित विचार मांडले आहेत. प्रा. अ. भि. शहा यांनी विज्ञान आणि तंत्रविद्या यात फरक केला आहे. नव्या उत्पादन तंत्राला समाज शरण जाईल आणि स्वातंत्र्य समतेवर आधारलेला समाज आपण उभा करु शकणार नाही, या धोक्याची जाणीव करुन दिला आहे. शिक्षणाचा उपयोग जलद आर्थिक विकासासाठी करावयाचा अशी भूमिका घेतली म्हणजे हा धोका मोठा असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

अनेक विकसनशील देशांप्रमाणे भारतातील व सामाजिक विकाससाठी नियोजनपूर्वक प्रयत्न सुरु आहेत. त्या व्यापक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाचा एक भाग म्हणून शिक्षणातील परिवर्तनाला महत्व आहे. समाज घटकांच्या मूल्यांत आभिवृत्तीत व दृष्टिकोनात परिवर्तन घडवून आणणे हे प्रामुख्याने शिक्षणाचे कार्य आहे म्हणून राष्ट्रीय विकासात व नियोजन कार्यक्रमात शिक्षण तज्ज्ञांनी कोणती कामगिरी बजावावयाची आहे, हे ग्रिफिन, पारेख यांनी पुस्तकाच्या आरंभीच स्पष्ट केले आहे. अ. वि. अकोलकर यांनी शिक्षणातील नियोजनबद्ध परिवर्तनाची प्रक्रिया यामध्ये

लेखकाच्या हेतूबद्दल भाष्य केले आहे.

'भारतातील शिक्षणाची वाढ आणि राजकीय विकास' या लेखात ग. वि. अकोलकर यांनी लेखिकेने अनेक कारणाने गाजलेल्या लॉर्ड कर्सनच्या कारकीर्दीतील प्रमुख दोन कारणांचा उहापोह केला आहे. इतिहासमध्ये त्यांची कारकीर्द प्रमुख दोन कारणांनी गाजली ती म्हणजे शैक्षणिक धोरण व बंगालची फाळणी तसेच शिक्षण प्रसाराबरोबरच राजकीय चळवळी, राजकारण आणि राष्ट्रीयत्व यांचा विकास कसा झाला, याचा परस्परातील कार्यकारण भावाचा मागोवा घेत शिक्षणाचा इतिहास अद्यापि लिहिला गेला नव्हता. ती उणीव श्रीमती अपर्णा बसू यांच्या ग्रंथाने भरुन काढल्याचे स्पष्ट केले आहे.

कर्झनच्या विद्यापीठांबाबतच्या धोरणांना आजच्या परिस्थितीतही महत्व असल्याचे स्पष्ट केले आहे. कर्झनच्या काळात अनेक महाविद्यालयांना कोचिंग क्लासेसचे स्वरुप आले होते. अनेक अपक्व बुद्धीचे तरुण महाविद्यालयात शिकण्याच्या नव्हे तर नोकरीच्या इच्छेने गर्दी करीत होते. अध्यापन व परीक्षा यांचा दर्जा घसरला होता. अशा परिस्थितीमध्ये कर्झनने संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक विकासावर भर दिला होता, ही गोष्ट अधोरेखित केली आहे.

शिक्षण हे एक प्रभावी कारण होते, त्याकाळातील राजकीय, सामाजिक चळवळीचे नेतृत्व पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्यांनीच केले. इंग्रजी शिक्षणापासून त्यांना स्फूर्ती मिळाली होती. संघटनेची व लढ्याची नवी दृष्टी मिळाली होती आणि शिक्षणावर त्यांची मदार होती. बंगाल, मुंबई व मद्रास राज्यात शिक्षणाचा प्रसार राजकीय जागृतीस कसा कारणीभूत झाला, कोणत्या वर्गाच्या हाती शिक्षणाची व राजकीय चळवळीची सूत्रे होती, देशा भाषांतील वृत्तपत्रे, राष्ट्रीय, धार्मिक उत्सव यांचे साहाय्य राजकीय चळवळीला कसे मिळत होते याचा प्रपंच नावानिशीवार लेखिकेने केल्याचे स्पष्ट होते. बहुजन समाजातील जागृती, शिक्षणाचा प्रसार आणि भाषा–माध्यमातील बदल यामुळे महाराष्ट्र बंगालच्या नेतृत्वात झालेले बदल शिक्षणात मागे असलेली राज्ये शिक्षणप्रसार होताच कॉंग्रेसमध्ये अग्रेसर कशी झाली याबाबतचे लेखिकेचे विवेचन मार्मिक असल्याचे म्हटले आहे.

'भारतीय शिक्षणाची वाटचाल' या लेखात विद्या विद्वांस यांनी भारतात शिक्षणाची वाटचाल कशी झाली आणि त्या शिक्षणामुळे स्त्री जीवनात आणि एकूण समाजजीवनात कोणते

बदल झाले याबाबत भ. आ. कामत यांनी केलेली मांडणी कशी योग्य आहे, याचे मार्मिक विवेचन केले आहे.

विद्याप्रसारासाठी नव्हे तर इंग्रजी साम्राज्यवादी व्यूहाचा एक भाग म्हणून भारतात शिक्षणाला महत्व आले आणि भारतीयांच्या हिताचा झाला तर अनुषंगिक विचार होईल. राज्यकर्ते व आम जनता यांना सांधणारा दुवा म्हणून इंग्रजी जाणणारा वर्ग आवश्यक होता. नव्या ज्ञानप्रसारात अपरिहार्यपणे सत्ताधाऱ्यांना न रुचणारी अशी सामाजिक–राजकीय जागृती घडून आली. हा आपला झालेला नकळत फायदा झाला असे दिसते. अ. रा. कामत  यांनी भारतातील शिक्षणासंबंधी म्हणजे त्याचा प्रसार, दर्जा, तपशील, परिणाम, अडचणी, त्यांची कारणे, याचे ऐतिहासिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय संदर्भात केलेले विवेचन महत्वपूर्ण आहे.

'अध्ययनाचे स्वातंत्र्य' या लेखात ग. वि. अकोलकर यांनी प्रा. जॉन यांनी 'स्वायत्त महाविद्यालयाचे आव्हान' याविषयी जी मूलभूत चर्चा केली आहे त्यावर मार्मिक भाष्य केले आहे. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे व त्याचा दर्जा उंचावणे यासाठी महाविद्यालयांना स्वायत्ता द्यावी असे म्हटले आहे. स्वायत्त महाविद्यालयांच्या कल्पनेने मूळ धरावयाचे असेल तर प्रथम महाविद्यालय आणि विद्यापीठ यांच्या संबंधाच्या कल्पना आपल्याला नीट तपासून घेतल्या पाहिजेत असे म्हटले आहे. शिक्षणाविषयी ही व्ही. जॉन यांनी म्हटले आहे की, ''शिक्षण हे स्वभावत:च उत्कृष्टतेच्या शोधासाठी असते पण आपण समतेच्या उच्च ध्येयाशी जी आपली बांधिलकी स्वीकारली आहे, तिच्याशी हा शोध विसंगत नाही. अतिशय बुद्धिमान असे विद्यार्थी हुडकून काढणे, त्यांना उत्कृष्ट प्रशिक्षण देणे व बौद्धिक विकासासाठी जास्तीत जास्त सोयी उपलब्ध करुन देणे. यापुरतेच आपले शैक्षणिक प्रयत्न मर्यादित राहता कामा नयेत. प्रत्येक विद्यार्थ्याने जे काही उत्कृष्ट असेल ते प्रगट होण्याला वाव देण्यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. मठ्ठ, मध्यम व मेधावी असे त्यांचे सदैव वर्गीकरण केले जाऊ नये. तसेच अनेक तरुण–तरुणीतील कितीतरी सुप्त शक्तींचा शोध आपण घेऊ शकलो नाही, त्याची खंत प्रौढांनी सतत बाळगायला हवी.''[१७]

४) आर्थिक :–

वैचारिक साहित्यात आर्थिक विचार मांडले जातात मात्र त्यांना अर्थशास्त्रातील गणिती परवेश असत नाही तर मानवी जीवनातील आर्थिक व्यवस्थेचा सामाजिक परिप्रेक्ष्य महत्वाचा आहे. त्यामुळे सर्व वैचारिक लेखकांनी आर्थिकतेचा विचार समाज व्यवस्थेचा कणा म्हणूनच केला. पाश्चात्य जगात पॅरेटो, जॉन हॉब्सन, एस. सी. पंगू, कार्ल मार्क्स आणि भारतात दादाभाई नौरोजी, डॉ. बाबासहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार महत्वाचे आहेत.

अर्थव्यवस्थेची व्याख्या करताना, ''समाजातील सर्व आर्थिक व्यवहार संघटित करणाऱ्या संस्था, संघटना, परंपरा यांचा समुच्च म्हणजे अर्थव्यवस्था (Economical System) होय.''[१८] अशी केली जाते. या संघटनेमध्ये कारखाने, उद्योगधंदे, दुकाने इ. चा अंतर्भाव होतो. तसेच शेतकरी, कामगार, मजूर इ. लोकांच्या संघटनाही या व्यवहारात महत्वाच्या असतात.

भारतातील अर्थशास्त्र पाहिले तर त्यात प्रचंड प्रमाणात भेद दिसतो. या भेदामध्येच गरीब–श्रीमंत, मालक–मजूर, शोषक–शोषित, भांडवलदार–कामगार यांचा समावेश होतो. या भेदामागे आर्थिक व्यवस्था जबाबदार आहे आणि या विषममूलक आर्थिक व्यवस्थेला बदलण्याची त्याची पुनर्रचना करण्याची भूमिका वैचारिक साहित्यात मांडली जाते. मात्र धार्मिक, सामाजिक प्रश्नांचे स्वरुप गुंतागुंतीचे असते. तसेच आर्थिक विचारांचेही स्वरुप–व्यामिभ आहे. मात्र अशावाद व्यक्त करत त्यासाठीची कार्यभूमी तयार करण्याचे कार्य वैचारिक साहित्य करते.

भारतातील परंपरागत अर्थव्यवस्था जातधंदे, आलुतेदार, बलुतेदार, कारु, नारु, महारवतन यात विभागला होता. यातूनच दलित वर्गाचे शोषण मोठ्या प्रमाणात केले. त्याविरोधी प्रतिक्रिया प्रथम मा. फुले यांनी व्यक्त केली आणि सावकार, भट, पाटील, कुलकर्णी यांच्या शोषणाला प्रतिकार केला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भांडवलदार वर्ग, त्यांनी काढलेले कारखाने, उद्योगधंदे यांच्या माध्यमातून कष्टकरी कामगार, शेतकरी, मजूर यांचे शोषण केले गेले.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या आर्थिक तत्वज्ञानात याविषयी मुलभूत विचार मांडले. यानंतर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, स्वातंत्र्यानंतर आर्थिक क्षेत्रात खाजगीकरण, उदारमतवाद यांचे प्राबल्य वाढले. त्यातून होणारे शोषण राष्ट्र निर्मितीत यांचे योगदान व दुष्परिणाम यांचा आढावा

घेतला गेला. विविध कामगार संघटना, पक्ष, संस्था यांच्या माध्यमातून भांडवलदार वर्गाच्या शोषणाविरोधी कृतीकार्य केले आणि सर्व आर्थिक भेद मिटविण्यासाठी प्रयत्न केले गेले आणि आजही चालू आहेत.

वैचारिक साहित्यातील उपरोक्त विविध घटनांचा आढावा घेता आर्थिक विचाराच्या कक्षा सांगता येतात. त्यामध्ये पारंपारिक अर्थव्यवस्थेला नकार, आर्थिक संस्थामधील शोषण, आर्थिक संघटना म्हणजे कामगार, मजूर संघटना याविषयीचे प्रयत्न आणि आर्थिक भेद निर्मूलनासाठीच्या विविध विचारांचा समावेश केला जाऊ शकतो. वैचारिक साहित्याची भूमिका आर्थिक विकास करण्याची आहे. त्याचबरोबर आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा आग्रह धरते. यासाठी लोकशाही आर्थिक समाजवादाची प्रतिज्ञा वैचारिक साहित्यातील आर्थिक विचारांची आहे.

'भारतीय नियोजनापुढील पेच' या लेखात का. म. गावसकर यांनी प्रा. हेन्सन यांच्या 'प्रोसेस ऑफ प्लॅनिंग' या भारतीय नियोजनावरील टीकात्मक ग्रंथात चौथ्या योजनेवर येणाऱ्या संघटित राजकीय दडपणाचा परामर्श घेतला आहे. आपल्या देशातील राजकीय परिस्थितीमुळे नियोजनाची आखणीच आर्थिक विवेक आणि राजकीय समन्वय या दुहेरी पायावर झालेली आहे. त्यामुळे नियोजनाची दिशा आर्थिकदृष्ट्या सुयोग्य अशा कार्यक्रमापासून ढळण्याचा धोका दृष्टीआड करता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

नियोजनाचे आर्थिक यश मर्यादित करणाऱ्या मक्तेदारी भांडवल्यासारख्या हितसंबंधाच्या नियोजनाच्या स्वरूपावर जो प्रभाव पडतो त्याचा अनुल्लेख जाणवतो. अशा प्रभावाचा पुरावा कागदोपत्री नसल्याकारणाने याविषयी बोलता येत नाही असा जो युक्तिवाद प्रा.हॅन्सन यांनी केला आहे तो लंगडा असल्याचे नमूद केले आहे. तसेच केंद्र आणि राज्य सरकारांच्या संघर्षाचा मागोवा राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकांमधील चर्चेतून ते घेतात. साधारणपणे राज्यांना दीर्घमुदतीनंतर फलद्रूप होणाऱ्या पायाभूत विकास योजनांपेक्षा अल्पावधीत फलद्रूप होणाऱ्या आणि लोकांच्या निकडीच्या गरजा भागविणाऱ्या योजनांचे आकर्षण असणे स्वाभाविकच आहे.

गावसकर यांनी आपल्या समीक्षणामध्ये पॉल स्ट्रेटिन हे आर्थिक विकासक्रमाच्या एका विशिष्य मतप्रणालीचे प्रवर्तक असणाऱ्या पण आर्थिक विकास केवळ भांडवल गुंतवणीकीचे प्रमाण

अगर प्रगत तंत्र यासारख्या वरवरच्या उपाय योजनांवर अवलंबून नसून खोलवर जाणाऱ्या समाजव्यवस्था, जीवनमूल्ये आणि प्रेरणा व्यवस्था यासारख्या घटकांवर अवलंबून असतो असे ते मानतात; पण त्यांच्या या विचारांचे प्रतिबिंब या निबंधात आढळत नसल्याची खंत व्यक्त केली आहे. तसेच भारतीय नियोजन प्रामुख्याने भांडवल गुंतवणूक यांसारख्या साकलिक घटकांवर अवलंबून असल्याकारणाने विकास क्रमात महत्त्वाच्या ठरणाऱ्या आंशिक घटकांकडे दुर्लक्ष होते व त्यामुळे नियोजन आणि वस्तुस्थिती यांचा मेळ बसत नाही, अशी टीका साऱ्या निबंधातून केली आहे.

'भारतातील मक्तेदारीची परिस्थिती' या लेखात समीक्षक पन्नाला सुराणा यांनी एम.व्ही.जोशी यांच्या 'मोनॉपालीज इन इंडिया'या आर्थिक धोरणविषयक चर्चेत मोलाची भर घालणाऱ्या पुस्तकाचे समीक्षण केले आहे.

'मोनॉपली' हा शब्द दोन अर्थांनी वापरला जातो. अर्थशास्त्राच्या परिभाषेप्रमाणे एका वस्तूच्या बाजारपेठेत उत्पादक, विक्रेता किंवा ग्राहक यापैकी कोणातरी एका टोळीच्या हातात एकाधिकारी सत्ता असणे हा अर्थ होय. उत्पादन साधनांच्या मोठ्या समुच्चयावर मालकी हक्क असल्याने किंमती, उत्पन्न, वितरण व विविध अर्थव्यवहारांसाठी साधन सामग्रीची विल्हेवारी याबाबतच्या नाड्या काही जणांच्या हातात असणे अशा व्यापक अर्थानेही मोनॉपली हा शब्द वापरला जातो. अशा नाड्या ज्यांच्या हातात येतात त्यांची प्रेरणा केवळ वैयक्तिक नफ्याची असते तेव्हा आर्थिक विकास व न्याय्य वितरण या दोन्हीवर अनिष्ट परिणाम होतात, समाजाचे नुकसान होते. निर्णयशक्तीचे हे केंद्रीकरण हानिकारक ठरण्याची शक्यता आहे असे वाटणाऱ्या साम्यवादी, समाजवादी मंडळींना मालकी हक्क खाजगी व्यक्तीच्या हातून काढून समाजाचे प्रतिनिधी असलेल्या सरकारच्या हाती देणे, व निर्णय शक्ती केंद्रितच ठेऊन ती सरकारने किंवा केंद्रिय नियोजन मंडळाने समाजाच्या हितासाठी वापरणे हा सोयीस्कर मार्ग वाटतो. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात या दोन्ही दृष्टिकोनातून उपाययोजना झाली आहे. या दोहोंच्या अनुभवांचे सार काढीत विवेचन करणे ही ना म जोशींची खास शैली आहे. त्या खास शैलीबाबत नाम जोशी लिहितात, ''विकेंद्रित उद्योग आणि विशिष्ट कालावधी यांच्यात साधन सामग्रीची विल्हेवारी कशी व्हावी

याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या केंद्रीभूत संस्था या दोहोंचा समन्वय साधल्यानेच त्या त्या देशांच्या राजकीय व्यवस्थेने वांछनीय मानलेली उद्दिष्टे गाठता येतील अशा निष्कर्षावर भांडवलशाही आणि कम्युनिष्ट राष्ट्रे आलेली दिसतात.''[१९] या आधारशिलेवरून नाम जोशींनी भारतातील मक्तेदारी समस्येचे विवेचन केले आहे ते अचूक असल्याचे सुराणा यांनी आपल्या समीक्षणात म्हटले आहे.

'भारतीय नियोजन: तीन परीक्षणे' या लेखामध्ये का.म.गावस्कर यांनी भारतीय नियोजनासंर्भात गौतम माथूर, बी.आर. शेनॉय यांच्या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. गौतम माथूर यांचे नियोजन विषयक काही प्रश्नांचे तात्विक संशोधन करणारे हे पुस्तकाचे मार्मिक विवेचन केले आहे. चलन फुगवटा व त्याचबरोबर येणारी भाववाढ टाळून एका स्थिर, सरळ रेषेत जिची सातत्याने वाढ होत राहिल अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्य त्यांनी समोर ठेवले आहे.

त्यांनी अनुसरलेली विचारपद्धत अभिनव आहे. लोकसंख्येची वाढ आणि तंत्रविद्येच्या विकास या दोन बाबींच्या संबंधातील दीर्घकालीन प्रवृत्ती गृहीत धरून प्रतिव्यक्ती कमाल उपभोगाची पातळी गाठून, त्यापुढील काळातही उपभोगाचे भान कमाल राखणारी जी स्थिती तिला सुवर्ण स्थिती म्हटले आहे. ही कशी गाठावयाची यासाठी कोणत्या शर्ती पूर्ण पाहिजेत याचे संपूर्ण बौद्धिक आकलन झालेले नसले तरी त्या दृष्टीने शोध घेणाऱ्या दोन भिन्न विचारपद्धती विस्तारत आहेत.

पहिली पद्धत ही महालनोबीस यांनी आपल्या नियोजनाची तात्विक बैठक तयार करताना वापरलेली समग्रलक्षी पद्धत होय. त्या पद्धतीत समग्र राष्ट्रीय उत्पन्न समग्र बचत, समग्र भांडवल, उत्पादन प्रमाण यासारख्या समग्रलक्षी संकल्पनांचा उपयोग करून अर्थव्यवस्थेच्या भविष्यकालीन विकास मार्गाचा आलेख काढला जातो. पण भारतासारख्या अविकसित अवस्थेतून विकासाप्रत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेत भिन्न-भिन्न उत्पादन क्षेत्रे आणि त्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनवस्तू यात इतकी भिन्नता असते की सर्व क्षेत्रांचे समग्रीकरण करून त्यांचा विचार केल्यास विकास रोखणारे अनेक घटक स्पष्ट होत नाहीत. माथूर यांच्या मते अर्थव्यवस्थेच्या विकास क्षमतेची मर्यादा पैशाच्या उपलब्धतेवर अवलंबून नसते. काही साधनवस्तूंचा प्रत्यक्ष तुटवडा हा विकासक्षमता मर्यादित करीत असतो.

व्यावहारिकदृष्ट्या योजनेचा आकार निश्चित करण्याच्या दृष्टीने या विचार पद्धतीचे विशेष महत्व आहे. कारण आता भारतात असा समज दृढ होत आहे की उपलब्ध पैशाची मर्यादा ध्यानात ठेऊनच योजनेचा आकार निश्चित केला पाहिजे, पण ज्या देशात आधुनिक अर्थव्यवस्थेत न गुंतलेली मानवी श्रमशक्ती खूप मोठ्या प्रमाणात पडून आहे. त्या देशात योजनेच्या आकाराला साधन वस्तूच्या तुटवड्याचीच मर्यादा तेवढी खऱ्या अर्थाने पडणार आहे. हा तुटवडा दूर करण्यात आपणास यश आले तर पतनिर्मितीच्या साहाय्याने भांडवल गुंतवणूक वाढवून अधिक मोठी योजना आपणास पार पाडता येईल, असा विश्वास गावसकर यांनी व्यक्त केला आहे.

गौतम माथूर यांनी वास्तविक वेतनपातळी ठराविक पातळीवर राखून मागास अर्थव्यस्थेचा विकास सुवर्णस्थितीप्रत करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. यात त्यांच्या तात्विक संशोधनाचे महत्त्व आहे. त्यांचे संशोधन अशा प्रकारे समाजाच्या गरजांशी सहानुभूतीपूर्ण इमान राखणारे आहे. त्यांची समन्वयकारी विचारपद्धती आणि सामाजिक गरजांशी राखलेले इमान या दोन मुद्यांसाठी त्यांच्या या बौद्धिक संशोधनाचे खास महत्त्व स्पष्ट करून सांगितले आहे.

नियोजनाला लागलेले राजकीय ग्रहण या लेखामध्ये गावसकर यांनी योजना तयार केल्यानंतर ती राबवावी लागते. कागदावर योजना पूर्णपणे समाधानकारक आखता येणे पुरेसे नाही. योजनेच्या पुस्तकात प्रत्यक्ष सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक वास्तवात कार्यकारी असलेली वेगवेगळी दडपणे, अंतस्थ ताण वजा केलेले नसतात. योजना राबविण्यास सुरूवात केली की ही दडपणे, हे ताण प्रकट होतात व त्यांना तोंड देण्याखेरीज गत्यंतर नसते. भारतात प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत असताना योजनांची काय परवड झाली, ती का झाली यांचे डाव्या विचार सरणीच्या भूमिकेतून केलेले विवेचन 'पॉलिटिक्स ऑफ इंडियन इकॉनॉमी' या पुस्तकात केले आहे. सोळा लेखात नियोजनावर प्रभाव टाकणाऱ्या राजकीय शक्तीचा, घटकांचा परामर्श घेतला आहे. त्यात काँग्रेस पक्षाचे ध्येयधोरण, नियोजन मंडळाची संघटना, पंडित नेहरूंचे नेतृत्व आणि नियोजनाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद हे प्रमुख असल्याचे प्रतिपादन गावस्कर यांनी केले आहे.

योजनेची आखणी करताना किंवा अडचणी उद्‌भवल्यानंतर त्यामध्ये बदल करताना राजकीय पक्षाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडणे अपरिहार्य असते.काँग्रेस पक्षाचा असा प्रभाव महत्त्वाचा होता. कारण तोच पक्ष अबाधितपणे पंधरा–वीस वर्षे सत्तेवर टिकून राहिला होता. काँग्रेसपक्षाला लाभलेल्या सत्तेच्या या मक्तेदारीतून नियोजनाला मोठा धोका निर्माण झाला. सत्तेच्या स्वार्थासाठी लाभ उठविण्याच्या हेतूने प्रेरित झालेले लोक त्यात घुसले आणि त्यामुळे एकीकडे नियोजनाची दिशा समाजवादी उद्दिष्टांपासून ढळली तर, दुसरीकडून नियोजनाला प्रतिसाद मिळवून देण्यासाठी जे नैतिक वातावरण हवे असते तसे वातावरण काँग्रेसकडून तयार होणे सुतराम अशक्य झाले. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाने हे दुषित वातावरण नष्ट होईल असा आशावाद प्रकट करून लेखकाने आपली नेहरूभक्ती प्रकट केली होती. त्यातला राजकीय भाबडेपणा आज उघडा झाल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

तिसऱ्या योजनेच्या काळात चिनी आक्रमणापासून योजनेवर संकट परंपराच कोसळली. नेहरूंचा अंत हे त्यातलेच एक संकट. १९६४ नंतरच्या काळात काँग्रेसच्या केंद्रिय नेतृत्वाची राज्यांवरची पकड ढिली झाली आणि खुद्द काँग्रेसच्या केंद्रिय नेतृत्वातही ही योजनाविरोधी प्रवाद बळकट झाले हे नियोजनाच्या पिछेहाटीचे खरे कारण आहे. एरवी वाढता संरक्षण खर्च, परकीय मदतीतली घट व ती मिळण्याची अनिश्चितता, प्रतिकूल पीकपाणी या अडचणींवर लोकांचा पाठिंबा संघटित करून मात करणे अशक्य नव्हते, हे नियोजनाला लागलेले ग्रहण आणिते अद्यापी सुटलेले नाही, हे परीक्षणामध्ये लेखकाने स्पष्ट केले होते.

नियोजनाचे यश हे तिच्या टीकांकारावरही अवलंबून असते असे मत गावसकर यांनी ‘उजव्या भूमिकेतून केलेली साक्षेपी टीका’ या लेखामध्ये मांडले आहे. योजना राबवीत असताना तिच्यातील उणिवा, विसंगती स्पष्ट होत जातात. ती राबविताना राजकीय दडपणामुळे किंवा सत्ताधाऱ्यांच्या सत्ताकांक्षेमुळे आवाजवी पावले टाकली जाण्याचा धोका असतो. प्रशासन यंत्रणेकडून प्रमाद घडतात, नियोजनाची मूळ भूमिका, त्यातील कार्यक्रम आणि वरील प्रमाद यात योग्य तो भेद करून टीका करणारे टीकाकार नियोजन योग्य मार्गावर ठेवण्यास पार मोठी मदत करतात; अशी साक्षेपी व विवेचक टीका करण्यात प्रा.शेनॉय अग्रेसर असल्याचा निर्वाळा

समीक्षकाने दिला आहे. भारतीय नियोजनाच्या टीकेच्या संदर्भात प्रा.बी.आर. शेनॉय यांनी केलेले विवेचन महत्त्वाचे आहे, ते म्हणतात, ''प्रत्येक ग्राहकाची एक वैशिष्ट्यपूर्ण आवड आणि मागणी असते. ज्या देशात लक्षावधी ग्राहक आहेत त्या देशात असंख्य आणि विविध प्रकारच्या वस्तूचे उत्पादन आवश्यक असते. त्याशिवाय जनतेचे स्वास्थ्य हाच नियोजनाचा प्रधान हेतू असतो असा दावा मांडता येणार नाही. त्यासाठी मागणीपूर्ण करणाऱ्या उत्पादनाच्या विशिष्ट मार्गाचा वापर करण्यास पूर्ण मुभा असली पाहिजे. उदाहरणार्थ कपड्याची मागणी अगणित प्रकारच्या कापडातून आली पाहिजे व त्यासाठी प्रत्यक्ष ग्राहकांशी संबंध जोडून त्यांच्या बारिससारिक आवडीनिवडीकडे लक्ष पुरविले पाहिजे. ग्राहकांच्या समाधानाचा उच्चांक सरकारी नियोजनातून न साधना देशभर पसरलेल्या असंख्य आणि स्वतंत्र उत्पादकांकडून साधत असतो.''[२०] भारतीय नियोजनाचा भर काही निर्णायक महत्त्वाच्या कार्यक्रमांवर आहे. त्यांचे मूल्यमापन करताना नियोजनाचा अतिरेकी प्रकार मनात धरण्याचे कारण नाही. शेनॉय यांच्या मनात अर्थव्यवस्थेच्या साम्यवादी, अतिकेंद्रित नियोजनाची धास्ती आहे. पण ही धास्ती मनात धरून भारतीय नियोजनाचे मूल्यमापन केल्यास ते वस्तुनिष्ठ ठरणार नसल्याचा धोका त्यांनी स्पष्ट केला आहे.

'औद्योगिक अर्थपुरवठ्याचे बदलते स्वरूप'या लेखामध्ये का.म.गावसकर यांनी स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक क्षेत्रात जे काही महत्त्वाचे बदल झाले आहेत यापैकी उद्योगधंद्यांना आवश्यक असणाऱ्या भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या व्यवस्थेतील बदल हा एक आहे. पण याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. ब्रिटिश काळापासून चालत आलेले व्यवस्थापक, दलाल, व्यापारी बँक आणि भांडवलदार या संस्थांमार्फत हा अर्थपुरवठा होत असतो. अशी सर्वसामान्य कल्पना असते. वास्तविक या क्षेत्रात इंडस्ट्रियल फायनान्स, कॉर्पोरेशन, री–पायनान्स कॉर्पोरेशन यासारख्या ज्या नव्या संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत त्यामुळे या क्षेत्राचा चेहरा–मोहरा ओळखून येण्या इतका बदलला आहे असे गावसकर यांनी म्हटले आहे ते यथार्थ वाटते.

गुप्तांच्या संशोधनाचा रोख औद्योगिक अर्थ पुरवठ्याच्या रचनेवर आहे. या रचनेतील विविध घटक संस्था कोणत्या पद्धतीने कार्य करीत असतात. या ठराविक साच्याच्या प्रश्नाऐवजी एकंदर रचनेतील त्या त्या संस्थेने स्थान हा त्यांच्या संशोधनाचा केंद्र बिंदू आहे. आपल्या

संशोधनाविषयी पार्श्वभूमी मांडताना गुप्तांनी योजनाबद्ध विकासाच्या संदर्भात औद्योगिक अर्थ पुरवठ्याच्या गरजा आणि उपलब्ध सोयी यांतील तफावत भरून काढण्यासाठी अर्थपुरवठ्याच्या सरकारी संस्था कशा स्थापन झाल्या ते मांडले आहे.

गुप्तांचे हे पुस्तक या विषयांवरील जी तुरळक पुस्तके आहेत त्यात मोलाची भर घालणारे आहे हे नि:संशय सरळ आणि अर्थवाही शैलीत विषयाचे प्रतिपादन केल्यामुळे केवळ अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना नव्हे तर इतरांच्याही आवाक्यात हा विषय आला आहे. सद्यस्थितीचे निदान करता करताच भावी काळात घडू शकणाऱ्या बदलांचे स्वरूप आणि त्याची आपल्या आर्थिक, सामाजिक उद्दिष्टांची संगती यांचे दिग्दर्शन केले असते तर अधिक चांगले झाले असते. पंचवार्षिक योजनांच्या अपयशामागील अनेक कारणांपैकी, देशातील बचतीचा मूळ स्त्रोत आणि गुंतवणूक यांची सांगड घालण्यात आपल्याला आलेले अपयश, हे एक कारण आहे. व्यक्तिश: बचत करणारे आणि गुंतवणूक करणारे यांच्यामध्ये आयुर्विमा महामंडळ झाली युनिट ट्रस्ट यांसारख्या संस्था जसाजसा मजबूत दुवा निर्माण करतील तसतसे आपले नियोजन अधिकाधिक प्रभावी होत जाईल असे का.म.गावसकर यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

'जागतिक अर्थव्यवस्थेचे भवितव्य' या लेखात पां.वा.गाडगीळ यांनी जगाच्या आर्थिक परिस्थितीचे स्वरूप कसे घडवावे यासंबंधी अभ्यासूपूर्ण विवेचन केले आहे. १९७० ते १९९० हे दशक संयुक्त राष्ट्रसंघाने 'जागतिक विकासाचे दुसरे दशक' म्हणून जाहीर केले व त्याप्रमाणे जागतिक विकासाच्या आखणीत लि ऑन्टिव्ह यांनी सुरूवातही केली होती. पण १९७० पासून एक नवीन प्रश्न जगाचे लक्ष वेधून घेऊ लागला. आधूनिक औद्योगिक विकासाने हवा, पाणी, अन्नद्रव्ये प्रदूषित होऊ लागली व हे सर्वांगीण विषदपण आधूनिक औद्योगिक विकास अजिबातच थांबवू नये काय, असे प्रश्न विचारण्यात येऊ लागले. तसे विकसित राष्ट्रे व विकसन अलेले राष्ट्रे यामधील अंतर, कमी होण्याऐवजी वाढत आहे. यामुळे जगात सर्वत्र विकास होत असताना आर्थिक विषमता वाढतच जाईल. तेव्हा जगात नुकताच विकासाचा प्रयत्न करीत राहणे हे अपुरे असून आधुनिक औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण आणि विकसित झालेली व विकसित असणारी राष्ट्रे याजमधील वाढती विषमता या गोष्टी थांबल्या पाहिजेत अशी मागणी जगातील

विचारवंतांकडून होऊ लागली.

इ.स.२००० पर्यंत जगाच्या आर्थिक स्थितीचे संकल्पित चित्र कसे असेल हे सांगताना १९८० व १९९० या टप्प्यावर ते कसकसे उमटलेले दिसेल याचाही आकडेवार अंदाज लेखकाने मांडला आहे. जगाच्या आर्थिक रचनेचे हे प्रतिमान तयार करण्यासाठी लेखकांनी जगातील विविधता विषमता लक्षात घेऊन जगाचे विभाग पाडले अहेत व विभागावर विचार केला आहे.

एकंदर जगाचे विकसित प्रदेश व विकसन असलेले प्रदेश असे दोन विभाग कल्पिलेले असून आज या दोन विभागाच्या आर्थिक विकासात जे फार मोडे अंतर आहे ते अंतर कोणत्याही विभागाच्या विकास न थांबविता, कमी कमी करीत नेणे हे या सर्व अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. १)अन्नोत्पादन व शेती २) खनिज संपत्ती ३) उत्पादन खर्च आणि प्रदूषणाचे निवारण ४) भांडवल गुंतवणूक व औद्योगिकरण ५) विकासाला अनुकूल परिस्तिती या पाच बाबीसंबंधाने संभाव्य विकासाची हिशोबपूर्ण चर्चा या ग्रंथात केली आहे. यावर परीक्षणामध्ये प्रकाश टाकल्याचे दिसते.

आधुनिकीकरण (Modernization) ही सामाजिक परिवर्तनाची आभिनव प्रक्रिया प्रथमत: इंग्लड, फ्रान्स आदि पाश्चिमात्य देशात सोळाव्या शतकापासून सुरू झाली. पुढे पश्चिमी देशांचा व्यापारी संबंध व साम्राज्यवादी धोरण यामुळे पूर्वेकडील देशांशी संपर्क आल्यानंतर पौर्वात्य देशात ही प्रकिया एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत सुरू झाली. आधुनिकीकरण प्रकियेचा एक अविभाज्य भाग म्हणून 'आर्थिक विकास' या कल्पनेनेही सर्व राष्ट्रे प्रेरित झालेली आहेत.

आधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तन प्रक्रियेमध्ये आर्थिक विकास मूलभूत आहे, या गोष्टीकडे ए.क.पटवर्थन याकडे लक्ष वेधले आहे. आज सर्वच समाज एका किमान पातळीवरचा आर्थिक विकास साध्य करणे आणि या विकासाचे सतत एक चढते प्रमाण राखणे यासाठी जिद्दीने प्रयत्नशील असून आधुनिकतेच्या वाटेवर मागे-पुढे मार्गक्रमण करीत आहे. ए.क.पटवर्धन म्हणतात, ''आधुनिकीकरण या सामाजिक परिवर्तन प्रकियेमध्ये आर्थिक विकास मूलभूत आहे ही गोष्ट खरी, परंतु या प्रक्रियेमध्ये निव्वळ आर्थिक नव्हे तर सामाजिक जीवनाच्या सामाजिक,

राजकीय, तंत्रवैज्ञानिक, शैक्षणिक, धामिक व सांस्कृतिक या सर्वच अंगामधील परस्पर व्यापक सर्वांगिण प्रगतीची प्रक्रिया अभिप्रेत असून ध्येयांचे वाजवीकरण (Rationatizationof ends) हे या प्रक्रियेचे मूलभूत सूत्र आहे.''[२१] या दृष्टीने 'आर्थिक बाजू'या महत्त्वपूर्ण सामाजिक घटनेची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समग्रपणे चिकित्सा करण्याचे अत्यंत अवघड असे काम डॉ. पुंडलिक यांनी या ग्रंथामध्ये केले आहे. याबद्दलचे विवेचन ए.के.पटवर्धन यांनी केले आहे.

आर्थिक विकासाच्या सांस्कृतिक बाजूचा विचार करताना एखाद्या समाजाचा आर्थिक अता सर्वकष यामध्ये सांस्कृतिक मूल्यांचा वाटा किती या चर्चेच्या संदर्भात कोणत्याही समाजातील धर्म मूलत: पारलौकिक जीवनाचा विचार करत असल्याने इहवादी प्रेरणांच्या अभावामुळे समाजाच्या आर्थिक विकासाा प्रतिबंधक ठरतो. मात्र युरोपियन राष्ट्रे, चीन, जपान या देशात धार्मिक वा सांस्कृतिक मूल्यांना नवा आशय प्राप्त करून दिल्या गेल्यामुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान बनली.

प्रस्तुत ग्रंथ आर्थिक विकासाची समग्रतेने चिकित्सा करणारा असून प्रज्ञावंत व सामान्य वाचकांना आर्थिक विकासाच्या संदर्भात विविध प्रश्नांना सन्मुख बनण्यास व मार्गाचा शोध घेण्यास प्रवृत्त करील अशी आशा व्यक्त केली आहे.

'आर्थिक विकास आणि समाज परिवर्तन' या लेखात एकनाथ साखळकर यांनी क्रेटन लॅसी आर्थिक विकासाबरोबर समाज परिवर्तन कसे साध्य करता येईल याचा शोध घेतला आहे. भारतीय समाजात होणाऱ्या बदलांचा अभ्यास अनेक प्रकारे झाला आहे, होत आहे. भारतातील परंपरा या समाजपरिवर्तनाला खरोखर मारक आहेत का? या परंपरांचा पाया होणाऱ्या बदलांशी सुसंगत ठेवणे कितीसे शक्य होणार आहे?औद्योगिकरणासाठी आवश्यक असणारे संस्थात्मक बदल करणे परंपरांमुळे कठीण होत आहे का? या प्रश्नांची उत्तरे शोधूनही समाजपरिवर्तनाचा अभ्यास करता येईल, तसा प्रयत्न क्रेटन लॅसी यांनी केल्याचे समीक्षणात साखळकर यांनी स्पष्ट केले आहे.

क्रेटन लॅसीचा प्रयत्न सुत्य आहे कारण तो नवीन वळणाचा आहे. परंतु असा प्रयत्न एखाद्या भारतीय जिज्ञासूने केला असता तर तो जास्त परिणामकारक झाला असता. कारण

भारतीय नैतिकमूल्ये, धार्मिक विचार, त्यांतील काहींनी घेतलेले वाईट स्वरूप व त्यांनी सामाजिक प्रगतीमध्ये केलेले अडथळे या सर्वातील बारकावे अभारतीय अभ्यासूला जाणवणे थोडेसे कठीण असल्याचे मत व्यक्त केले आहे. साडेतीनशे पानांच्या या पुस्तकात त्यांच्या मूळ जिज्ञासेशी संबंध नसलेल्या गोष्टी लेखकाने नमूद केल्याचे साखळकर यांनी दाखवून दिले आहे. व्ही.के. कृष्णमेन यांचे एक वाक्य लॅसीने उद्धृत केले आहे, Social change are brought about by in situtional changes, by the approaches of individuals to issues by cioviction about the kind of society, we desire, and by the relationship between the masses of the people and those who are decision makers"[२२] हे क्रेटन लॅसी यांचे प्रतिपादन महत्त्वाचे आहे परंतु लॅसीनी केवळ धावता उल्लेख केला आहे.

एखाद्या समाजाने मान्य केलेल्या मूल्यांचा, नैतिक विचारांचा परिणाम आर्थिक प्रगतीवर होत असतो. तर आर्थिक प्रगती जून्या मूल्यांना नवीन अर्थ देण्यास व त्यानूसार लोकमत बदलण्यास जबाबदार ठरत असते. सामाजिक मूल्ये व आर्थिक प्रगती यांचे संबंध परस्परावलंबी स्वरूपाचे आहेत, समाज परिवर्तनाचा अभ्यास करण्याचा योग्य मार्ग म्हणजे सर्वसाधारण माणसाने आर्थिक प्रगतीसाठी सामाजिक मूल्यांबाबत घेतलेल्या दृष्टिकोणाचा अभ्यास होय.

'सामाजिक व आर्थिक प्रश्नांची चिकित्सा' या लेखामध्ये सुहास पुजारी यांनी आर्थिक आणि सामाजिक विषयाच्या कक्षा एकमेकीत कशा धुसर झालेल्या असतात याचा प्रत्यय देणारे 'काही आर्थिक आणि काही सामाजिक' ह्या स.ह. देशपांडे यांच्या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. मार्क्सवादाच्या कक्षा आर्थिक आणि सामाजिक विषयाशी निगडीत असलेल्या अनेक संकल्पनांना पूर्णपणे आपल्यात सामावून घेण्यास असमर्थ ठरल्या आहेत, असे धक्कादायक, साहसी निष्कर्ष लेखकाने या ग्रंथातून मांडल्याचे सांगितले आहे.

एकूणच स.ह. देशपांडे यांचा 'काही आर्थिक काही सामाजिक' हा ग्रंथ तात्विक साहित्याच्या दृष्टीने लक्षणीय ठरावा असा आहे. हे पुस्तक अनेकवेळा तत्त्वानुरोधाने वाचकाला पुनर्विचार करण्यास प्रवृत्त करते. यावरूनही या ग्रंथाची वैचारिक उंची लक्षात येऊ शकते. योग्य मांडणी आणि मुद्रण सुरेख, आशयघन मुखपृष्ठ यांमुळे ग्रंथांच्या सौंदर्यात भर पडली असल्याचा अभिप्राय नोंदवला आहे.

'आपल्या आर्थिक विकासाच्या समस्या' या लेखामध्ये पां.वा.गाडगीळ यांनी नी.वि.सोवनी यांच्या आपल्या आर्थिक विकासाची समस्या या ग्रंथाने आपली निराशा केल्याचे म्हटले आहे. भारताच्या आर्थिक समस्येचा विषय व सोवनी यांच्यासारख्या निष्णांत अर्थपंडित बोलणार तेव्हा चलनवाढ, महागाई, नियोजन इत्यादी विषयांवर बोलतील असे वाटत असताना मात्र पांडवांच्या मयसभेत दुर्योधनाची जी फजिती झाली तो अनुभव आल्याचे नमूद केले आहे. नियोजन का फसले याची कारणमीमांसा करताना नी.वि.सोवनी म्हणतात, ''देशात नियोजन अंमलात आणण्याला अवश्य अशी बौद्धिक समजून, भावनिक तळमळ व शारीरिक–सामुदायिक शिस्त कोणतीच नव्हती, नेहरूंसारख्या महाभागाला लोकसंख्या नियंत्रणाची गरज वाटण्याइतके भान नव्हते, यामुळे नियोजन फसले.''[२३] असे आपले मन मांडले आहे, ते योग्य वाटत नाही.

'नवी अर्थव्यवस्था, नवी दुखणी' या लेखामध्ये नव्या व्यवस्थेचा मंत्र सांगितला आहे. 'गतिमान फिरते रहा', 'स्वत:ला बांधून घेऊ नका'', 'त्याग वगैरे करण्याच्या फंदात पडू नका' आपण बदल पचवू शकतो हे शाबीत करण्यासाठी व्यवस्थित चालणाऱ्या उद्योगांना आणि चांगल्या जाणात्या या कर्मचाऱ्यांना आता वाऱ्यावर सोडून दिले जात आहे. या परिस्थितीत काम करणाऱ्या लोकांचे आपापसातले संबंधही तात्पुरते आणि तकलादू बनतात, ठराविक काळापुरते कामाच्या स्थळानुसार लोक एकत्र येतात आणि काम संपल्यावर पांगतात. त्यांच्यामध्ये परस्पर विश्वास फुलत नाही. दीर्घकालीन बांधिलकी आणि निष्ठा निर्माण होत नाही. संघटनेच्या औपचारिक नियमांमधील फटी सांधण्यासाठी या गोष्टीची फार आवश्यकता असते. आर्थिक बदलांचे वैयक्तिक जीवनावरील तसेच सामाजिक परिणाम यांचा एक चांगल्या आलेख या पुस्तकात पहायला मिळतो असे पां.म.जोशी यांनी म्हटले आहे.

'भांडवलशाहीच्या विरोधात' या लेखामध्ये माधव दातार यांनी आर्थिक लोकशाहीचा पर्याय भांडवली व्यवस्तेचा तुलनेत श्रेष्ठ ठरला तरी भांडवली व्यवस्थेकडून आर्थिक लोकशाहीकडे कशी वाटचाल करायाचा हा करा प्रश्न असल्याचे नमूद केले आहे. लेखकाने या प्रश्नाचा विचार विकसित भांडवली व्यवस्था, भूतपूर्व समाजवादी व्यवस्था व अविकसित देश अशा तीन पातळीवरून केल आहे. आर्थिक लोकशाही ही कल्पना मांडताना विकेंद्रीकरण व बाजारपेठांचे

अस्तित्व यामुळे शासकीय अधिकारांवर मर्यादा पडतील अशी लेखकाची भूमिका असल्याचे स्पष्ट केले आहे.

'मुक्त अर्थव्यवस्थेचे निर्भिड समर्थन' या लेखामध्ये सुधाकर देशमुख यांनी इंडिया अनबाईंड या गुरचरण दास यांच्या पुस्तकाचे मार्मिक समीक्षण केले नाही. १९९१ च्या नंतर भारतात मुक्त अथव्यवस्थेचे वारे वाहू लागले. समाजवादी विचारावर आधारित अर्थव्यवस्थेला वळण देऊन नवीन मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार हे मोठे स्थित्यंतर होते. गुरूचरण दास यांचे हे पुस्तक याचे स्वरूप आहे. समाजवादी अर्थव्यवस्थेतून मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्थित्यंतरांची नोंद त्यांनी ह्या पुस्तकांत घेतली आहे. एका अर्थाने हे पुस्तक गेल्या पन्नास वर्षाचा भारताचा आर्थिक आणि सामाजिक इतिहास आहे. लेखकाने त्याच्या अनुभवाच्या लोलकातून त्यांनी दिसलेली, वाटलेली, पटलेली स्थित्यंतरे आणि त्यांचे अन्वयार्थ मांडले आहेत.'

**५) राजकीय:–**

राजकीय विचार हा वैचारिक साहित्यातील महत्त्वाचा घटक आहे. असे म्हटले जाते की, राजकारण व समाजकारण यांचा संबंध परस्परपुरक आणि परस्परावलंबी असा दुहेरी असतो. त्यामुळे सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या वैचारिक साहित्यात राजकीय विचार मोठ्या प्रमाणात आहेत. भारताचा संबंध इतिहास सत्तासंघर्षाचा  इतिहास आहे. प्राचीन कालखंडात मानव समूह करून राहू लागला तेंव्हापासून राजकीय व्यवस्था त्याने निर्माण केली. पुढे प्रत्येक कालखंडात राजेशाही, धर्मशाही, ब्रिटिशशाही आणि आज लोकशाही असा प्रचंड इतिहास राजकीय विचारांना आहे. राजकारणामध्ये मुख्यत: दोन गट प्रत्येक कालखंडात आहेत. पहिला गट 'सत्ताक' व दुसरा गट 'विरोधक' यांचा आहे. या दोघांमध्ये संघर्ष सतत चालू असतो. तो संघर्ष जसा राजकारण युक्त असतो. तसाच सामाजिकही असतो.

वैचारिक साहित्यातील राजकीय विचारात उपरोक्त दोन्ही गटांचा विचार अभिप्रेत आहे. या राजकीय विचारांच्या कक्षा शासनसंस्था, प्रादेशिक पक्ष, राजकीय विचारप्रणाली व राजकीय सिद्धांत या विविध संदर्भात विचारात घेता येतात. शासनसंस्था म्हणजे सरकार राज्यांचा महत्त्वाचा घटक आहे. यामध्ये शासनविषयक, विधीविषयक, न्यायविषयक असे तीन विभाग

असतात. तसेच प्रादेशिक पक्ष हे शासन संस्थेत महत्त्वाचे कार्य करतात. वैचारिक साहित्यातून शासन संस्था व पक्षांना मार्गदर्शन केले जाते. याविषयी जे विविध प्रश्न निर्माण झाले असतील त्यांचे चिंतन येते. वैचारिक साहित्यातील राजकीय विचारात प्राधान्याने राजकीय सिद्धांतात तसेच राजकीय तव्वज्ञानाची मांडणी केली जाते. राजकीय सिद्धांतांची व्याख्या करताना जन्टे जेरमी म्हणतात, ''मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक अशा योग्य व्यवस्थेच्या तत्त्वांचा टीकात्मक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.''[२४] राजकीय सिद्धांताचा उद्देश राजकीय तत्त्वज्ञान, राजकीय विचारप्रणाली यांचे विश्लेषण, मूल्यमापन आणि स्पष्टीकरण करण्याचा असतो. राजकीय सिद्धांतामध्ये काही अभ्यासक्षेत्रे गृहित धरली जातात. त्यामध्ये विचारप्रणालीचा अभ्यास राजकीय व्यवस्थेचा अभ्यास. मूलभूत दस्ताऐवज आणि वाङ्मयाचा अभ्यास यांचा समावेश होतो. त्यामुळे वैचारिक साहित्यातील राजकीय विचारात सिद्धांतन हा अत्यंत महत्त्वाचे ठरते. याबरोबर राजकीय तत्त्वज्ञानाची मांडणी राजकीय विचारात होते. आदर्श समाज, आदर्श शासन संस्था यांच्यासाठी प्रयत्नांची मांडणी यात होते. राजकीय विचार, राजकीय अनुभव, गृहितप्रमाण, मते, माहिती व सामाजिकरण यांचे बुद्धीवादी एकत्रीकरण करून त्यांच्या परस्पर संबंधाचा विचार यात होतो. 'राजकीय तत्त्वज्ञान' ही मत्त्वाची संकल्पना आहे.

'महाराष्ट्रातील लोकशाही विचार' या लेखामध्ये वसंत पळशीकर यांनी मा.प.मंगूडकर यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्रातील लोकशाही विचार' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. सुरूवातीलाच लेखिकेची ग्रंथ लिहिण्यामागचरी भूमिका स्पष्ट केली आहे.' भारतातील लोकशाही विचारांचा अभ्यास करावयाचा झाला तर भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांतील राजकीय विचारांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे, अशा अभ्यासातून हिंदूस्थानातील राजकीय विचारांचेच समग्र चित्र उभे करण्यास महत्त्वाची मदत होईल.

लोकहितवादीपासून सुरूवात करून फुले, रानडे, टिळक, आगरकर, गोखले, आंबेडकर, गांधी व रॉय अशा एकूण नऊ व्यक्तीच्या विचारांचा आढावा प्राचार्य मंगूडकरांनी घेतला आहे. त्याशिवाय समाजवाद व स्थानिक स्वराज्य या विषयांवरही 'समारोपात' त्यांनी आपले विचार मांडले आहेत. महाराष्ट्रातील सर्व राजकीय विचार प्रवाहांचा विचार न करता त्यातून लोकशाही

विचारांचीच तेवढी निवड प्रा.मंगूडकरांनी केला आहे. महाराष्ट्रातील राजकीय विचारप्रवाह किंवा महाराष्ट्रीय राजकारणातील लोकशाही विचारांचा प्रवाह किंवा महाराष्ट्रातील लोकशाहीवादी पुढारी, अशा प्रकारचा कोणताही अभ्यास अर्थात योग्य आहे. नव्हे प्रा. मंगूडकर म्हणतात त्याप्रमाणे आवश्यक आहे. पण अभ्यास विषय हा मूलतःच प्रादेशिक आहे. 'लोकशाहीचा विचार' हा विषय त्या अर्थाने प्रादेशिक नाही. वसंत पळशीकरांनी आपल्या निवडीने आपल्या निरूपणाच्या अ–विवेचक पद्धतीने आणि प्रत्येक व्यक्तीच्या विचारांचा त्रुटित, अपूरा व सुटा विचार केल्याने राजकीय अभ्यासकांनी फार मोठी निराशा केली आहे. प्रा. मंगूडकरांकडून याहून पुष्कळच अधिकाची अपेक्षा होती, अशी टिप्पणी वसंत पळशीकरांनी केली आहे.

'भारतातील हिंसक जन आंदोलनाचे राजकारण' या लेखात संपा.एस.पी.अय्यर यांनी संपादित केलेल्या 'द पॉलिटिक्स ऑफ मास व्हायोलन्स इन इंडिया' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. या पुस्तकात नऊ लेखकांनी लिहिलेले बारा निबंध एकत्र करण्यात आलेले आहेत. एस पी.अय्यर यांनी म्हटल्याप्रमाणे सर्वच निबंधलेखकांना अशी भीती वाटते की, 'हिंसाचार व जनता कृतीचा मार्ग भारताला अराजकाच्या खाईत नेऊन लोटेल, हा त्यांच्यामधील समान विचारांचा धागा आहे. गांधीजींनी प्रथम व्यापक प्रमाणावरील जनआंदोलनावर भर दिला आणि हे हत्यार ब्रिटिशांच्या विरूद्ध पुनः पुन्हा वापरले. सनदशीर म्हणजे विधिमंडळ, प्रदेशाचा मार्ग गांधीजींनी कुचकामी मानला आणि प्रत्यक्ष जनता कृतीचे शस्त्र उपसले. अन्याय्य कायद्याचा भंग करणे आणि त्यासाठी पडतील ते आत्मक्लेश सहन करून प्रतिपक्षास आपल्या म्हणण्याची सत्यता पटवून देणे, प्रतिपक्षाचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे हे जनताकृती चे उद्दिष्ट त्यांनी मानले होते. स्वाभाविकच हिंसेला त्यांच्या विचारात व कृतीत स्थान नव्हते. कायद्यांचा भंग करावयाचा हा कृतीचा एक अंगभूत भाग असला तरी 'कायद्याचे राज्य' या गोष्टीचे महत्त्व त्यांना सर्वस्वी पटलेले होते. शासन हे श्रेष्ठतर नैतिक कायदा पाळण्यासाठी या भूमीवरचा मानवी कायदा मोडण्याची त्यांची भूमिक होती. प्रा.उषा मेहता यांनी आपल्या निबंधात स्पष्ट केले.

लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये निवडणूका व विधिमंडळे याच साधनांचा फक्त वापर करावा की लोकांना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठी आंदोलने, जनताकृती,

उपोषणे इत्यादी मार्गाचा वापर करण्याचा हक्क पोचतो की नाही, ते लोकशाही तत्त्वज्ञानात बसते की नाही, असा सैद्धांतिक भूमिकेतून केवळ पाहणे चुकीचे आहे. दुर्दैवाने या निबंध संग्रहातील कोणीच असा प्रश्न उपस्थित करून चर्चा केलेली नाही. वास्तविक आंदोलने, उपोषणे, जनताकृती, वा पार्लमेंटमधील अनपार्लमेंटरी वागणूक या सर्व मार्गाचे बाबतीत लक्ष्मर रेषेची कल्पना की जे रेषा ओलांडली असता हे सर्व मार्ग लोकशाही विघातक ठरतात. अत्यंत अर्थपूर्ण व महत्त्वाची आहे. लोकशाहित हे मार्ग कोणी चोखाळू नयेत अशी भूमिका घेता येईल, पण लोक व राजकीय पक्ष या मार्गाचा वारंवार आश्रय घेत आहेत अशा सामाजिक, राजकीय परिस्थितीत ती भूमिका अनुपयुक्त व व्यर्थ ठरते. पुन्हा दुर्दैवाने या संग्रहातील सर्वच लेखक अशी भूमिका घेतात असे विवेचन केले आहे.

लोकशाहीची उभारणी सत्तेचे शांततापूर्ण व सनदशीर हस्तांतर व कायद्याचे राज्य या दोन गोष्टींवर प्रामुख्याने झालेली असल्याने जी आंदोलने मग ती दिसायला शांततापूर्ण का असेनात ती लोकशाही विरोधी मानली पाहिजेत. खरे तर भारतीय माणसाला 'कायद्याचे राज्य'मानणारा शासनसंस्थेचा योग्य आदर करणारा नागरिक बनवायचे असेल, तर त्याला शिस्तबद्ध रीतीने, निर्भयपणे सत्तेपुढे उभे राहण्यास शिकवले पाहिजे. आणि ती शिकवण सर्वात प्रभावीपणे देण्याचा मार्ग 'सत्यागृही' भूमिकेतून विशिष्ट अन्याय कायद्याचा व धोरणाचा निषेध व भंग करणे हा आहे.

भारताने लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केला आहे. पण भारताची समाजव्यवस्था, संस्कृती आणि समाजरचना ही वेगवेगळ्या मूल्यांवर व तत्त्वांवर उभारलेली आहे. सामन्यत: असे म्हणता येईल की ही पारंपारिक समाजव्यवस्था लोकशाही राज्यपद्धतीला प्रतिकूल आहे. अलिकडील काही वर्षात भारतीय राजकारणाचा वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगवेगळ्या अंगांनी व वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला जात आहे हे सर्व अभ्यास अनुभवनिष्ठ आहेत, अशा अभ्यासामध्ये डॉ.एफ.जी.बेली यांचा 'पॉलिटिक्स अँड सोशल चेंज' हा ग्रंथ महत्त्वाचा असल्याचे वसंत पळशीकरांनी परीक्षणातून स्पष्ट केले आहे.

'भारतीय फाळणीचे गुन्हेगार' या राम मनोहर लोहिया यांच्या पुस्तकाचे देवदत्त दाभोळकर यांनी 'अजून उत्तर न मिळालेलया भारतापुढील एक यक्षप्रश्न' या लेखामध्ये परीक्षण

केले आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठापासून त्यांनी परीक्षणाला सुरूवात केली आहे. पुस्तकाच्या मुखपृष्ठांवर दूर अंतरावर चिंताग्रस्त नजरेने निरखून पाहणारे असे नेहरू व पटेल यांचे एकत्रित छायचित्र दिले आहे. मलपृष्ठांवर डॉ. लोहिया यांचे उद्गार देण्यात आलेले आहेत. त्यांचे छायाचित्रही अहे. कोठेतरी जाण्यासाठी धडपडणाऱ्या परंतू अस्थिर विमनस्क वृत्तीचा आलेक त्यांच्या मुद्रेवर आहे. पुस्तकातील निवेदनाचा भावनात्मक प्रहार नेहरू व पटेल यांना 'गुन्हेगार' ठरविण्याचा आहे. पुस्तकात दिलेल्या रेखाचित्रातून व त्यांच्या शीर्षकातूनही तसे सूचन आहे. पं.नेहरू यांच्या विषयी डॉ. लोहिया यांच्या मनात अत्यंत कडवट भावना होती. भारतीय क्रान्ती ज्या गतीने व ज्या दिशेने डॉ. लोहियांना पुढे जावी असे वाटत होते. त्यासाठी नेहरू बद्ध परिकर झाले नाहीत यातून आलेली निराशा या कडवटपणा मागे आहे की काय त्याचा शोध देवदत्त दाभोळकर यांनी घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसतो. भारताच्या फाळणीसाठी आठ गोष्टी कारणीभूत झाल्याचे लोहिया यांनी नमूद केले आहे. यापैकी हिंदू–मुसलमान दंग्यामुले उद्भवलेली परिस्थिती हे एक महत्त्वाचे कारण सांगितले आहे.

'भारतातील राजकारण (संशोधनाचे) एक निसरडे क्षेत्र' या लेखामध्ये वसंत पळशीकर यांनी अँजेला एस. बर्गर यांच्या 'ओपोझिशन इन ए डॉमिनंट पार्टी सिस्टिम'या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. निवडणुकीचे राजकारण हे व्यक्ती भोवतीचे प्रामुख्याने फिरते असे दिसून आल्यावर ते सूत्र पक्के हाती धरून राजकारणात घडत चाललेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास करावयास हवा होता. काल ज्या व्यक्ती वरचढ होते. त्यांना ज्यांनी शह दिला आहे. त्या व्यक्ती यांच्यात काही मूलभूत फरक आहे का आणि त्याचा दीर्घकालीन आर्थिक–सामाजिक बदलांशी संबंध आहे का या प्रश्नाचे उत्तर शोधन काढणे महत्वाचे आहे. दूरवर परिणाम करणारे दीर्घकालीन बदल कोणते आणि त्यांच्याशी संगती राखून विरोधीपक्ष राजकारण करीत आहे की नाही हे पाहणे उद्बोधक ठरले असते.

'भविष्यकालीन पाकिस्तानी परराष्ट्रनीतीचा संभाव्य आकृतिबंध' या लेखात वसंत पळशीकरांनी झुल्फिकार अली भुट्टो यांच्या पुस्तकाचे मार्मिक विवेचन केले आहे. हे पुस्तक म्हणजे त्यांचा जाहिरनामाच आहे असे म्हटले आहे. भावी काळात पाकिस्तानची परराष्ट्रनीती काय

असावी याबाबत त्यांनी केलेले विवेचन विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. भुट्टोंची भूमिका काहीही असो, भारत व पाकिस्तान यांच्यातील संबंध एक ना एक दिवस सलोख्याचे झाले पाहिजे. असे त्यांना वाटते. भुट्टोने आपल्या डोळ्यासमोर जे अंतिम चित्र ठेवले आहे ते भारत–पाक एकोप्याचेच आहे. ते लिहितात, ''भारत व पाकिस्तान यांच्यात इतक्या गोष्टी समान आहेत की या दोन राष्ट्रात कायम संघर्षाची स्थिती का असावी यांचे जगाला आश्चर्य वाटते. या दोन देशांतील गोरगरीब जनतेला राजकीय स्वातंत्र्यापासून जे फायदे व्हावयास हवे होते ते त्यांच्या पदरात पडलेले नाही. समजंसपणा, भौगोलिक साहचर्य, आंतरराष्ट्रीय घटना प्रवाह सर्व, या दोन राष्ट्रांनी सलोख्याने राहावे हेच सांगतात. पण तसे झालेले नाही. याची अनेक कारणे आहेत. इतिहासाचा वारसा, अंधश्रद्धा व पूर्वाश्रद्धा यांच्याशी संबद्ध अशी ती कारणे आहेत. या उपखंडातील हिंदूवर हजार वर्षे इस्लामचे, राजकीय प्रभूत्व होते. तर येथले मुसलमान दीडशे वर्ष परकीय अंमलाखाली राहिले. परकीय वर्चस्वाखाली राहिल्याने या उपखंडातील लोकांच्या मनात गंड उत्पन्न झालेले आहेत. स्वतंत्र राष्ट्रे म्हणून त्यांना अजून आपले पाय पक्के रोवायचे आहेत. आपल्या भूतकाळची मानगुटीवरील पकड सोडविण्याइतकी ताकद देणारा आत्मविश्वास त्यांना संपादन करावयाचा आहे.'' केवढी समतोल, समंजस व मार्मिक अशी ही वाक्ये आहेत. भूतकाळाची पकड ढिली करण्याऐवजी ती पक्की होईल अशा एकांतिक भूमिकेचा पुरस्कार भुट्टोंनी आपल्या पुस्तकात का करावा, अशा प्रश्न समीक्षकाने उपस्थित केला आहे.

'पाकिस्तानचे विघटन' या लेखात पां.वा.गाडगील यांनी 'पाकिस्तान' नावाचे एक राज्य स्थापन झाले पण पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांचे एक 'राष्ट्र' निर्माण झाले नाही; हा मुद्दा आपल्या विवेचनात स्पष्ट केला आहे. अयुब राजवटीचे सिंहावलोकन यात तपशीलाने करण्यात आले असून त्याची पार्श्वभूमी कळून येण्यासाठी पाकिस्तान निर्मितीपासूनचा संक्षिप्त इतिहास ही सांगितला आहे. पूर्व पाकिस्तानला पश्चिम पाकिस्तानने अंकित राष्ट्र, पिळवणूक करण्याचे राष्ट्र म्हणून वागविले. आणि पूर्व पाकिस्तानबद्दल पश्चिम पाकिस्तानी राज्यकर्त्यात तुच्छता बुद्धी होती, या गोष्टी लेखिकेने मांडलेल्या अनेक घटनांवरून जागोजाग लक्षात येतात. आणि यामुळे पाकिस्तानचे पश्चिम व पूर्व असे झालेले तुकडे अपरिहार्यपणे होणे असे अनुमान

लेखिकेने स्पष्ट शब्दांत मांडलेले नसले, तरी वाचकांच्या लक्षात सहजपणे येते याकडे गाडगीळांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे.

विलक्षण विषमता व व्यस्तपणा हे पाकिस्तानच्या पूर्व आणि पश्चिम विभागाचे ठळक वैशिष्ट्यच होय. अधिक लोकसंख्येला कमी साधने व संधी, आणि कमी लोकसंख्येला अधिक साधने व संधी अशी विषम व व्यस्त वाटणी पाकिस्तानच्या दोन विभागात होत होती. यामुळे पश्चिम पाकिस्तानची साम्राज्यसत्ता पूर्व पाकिस्तानचे शोषण करीत आहे अशी पूर्व पाकिस्तानची भावना आरंभापासून झाली असल्यास नवल वाटते. तथापि पश्चिम पाकिस्तानापासून पूर्व पाकिस्तान अपरिहार्यपणे कसे फुटून निघाले हे समजण्याला हा विद्धापूर्व ग्रंथ उपयुक्त आहे, असे म्हटले आहे.

'भारतातील राजकीय विचार' या लेखामध्ये पां. वा. गाडगीळ यांनी थोर भारतीयांचे राजकीय विचार वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ते केवळ राजकीय नव्हते, राजकारणांशी इंकन–जवळून संबंधित असणारे तत्वसानात्मक विचारही मांडले आहे. म. गांधी, रोजंद्रप्रसाद, जवाहरलाल नेहरु, सुभाषचंद्र गोखले, जीना, महमदी अली इ. सुमारे ६५ विद्वानांचे उतारे त्यांनी दिले आहेत. सर्वच उतारे उच्च तात्विक पाळवीवरचे विचार प्रदर्शन घडविणारे असून विचारशक्तीला झिणझिण्या आणायला लावणारी काही कठोर सत्ये ही यात आहेत.

'भारतातील सत्तांतर' या लेखामध्ये श्री. रा. टिकेकर यांनी भारतातील सत्तातंर होत असताना भारतीयांची मानसिकता काय होती? स्वराज्य उंबरठ्याजवळ आले असण्याची जाणीव आपल्या भारतीय पुढाऱ्यांपैकी पुष्कळांना नव्हते असे वाटते. हा सारा कारभार पहिला म्हणजे समजते की, राजव्यवहारात आपण नवशिके होते. आपल्या पुढाऱ्यांच्या मानाने ब्रिटिश मुत्सद्दी छान मुरलेले होते. असे वास्तव सत्य टिकेकर यांनी परीक्षणातून आपल्या समोर मांडले आहे.

'जागर' या प्रा. नरहर कुरुंदकरांच्या ग्रंथाचे नलिनी पंडित त्यांनी 'सेक्युलॅरिझम राष्ट्रवाद आणि लोकशाही' या लेखात परीक्षण केले आहे. धर्मनिरपेक्ष, लोकशाही, बुद्धिप्राधान्य आणि समाजवाद या निष्ठा मनाशी बाळगून निर्भयपणे व स्वतंत्रवृत्तीने भारतातील सामाजिक प्रवृत्तीच्या व प्रश्नांचा अभ्यास करणारे जे थोडे विचारवंत महाराष्ट्रात आहेत. त्याच्यामध्ये प्रा. कुरुंदकरांची

गणना केली जाते, असे कुरूंदकरांच्याबद्दल गौरवोद्‌गार पंडित यांनी काढले आहेत.

या ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात बुद्धिजीवी वर्गातील वैफल्य, राष्ट्रीय एकात्मता व इतिहासाचा अभ्यासक्रम, समाजवादी शक्तीची पिछेहाट, मार्क्सवाद तत्व आणि व्यवहार, विकेंद्रीकरण असे अनेक विषय कुरुंदरांनी हाताळलेले आहेत. दुसऱ्या भागात म. गांधी आणि जवाहरलाल नेहरु या राष्ट्रपुरुषांचे तत्वमान धोरण व कार्यक्रम यांचे विवेचन आहे. परंतु करुंदकरांचे महाराष्ट्राच्या विचारवंतामधील स्थान, मुस्लिम धर्म, इतिहास आणि परंपरा यांचा भारतीय राजकारणाच्या संदर्भात यांनी जो सखोल अभ्यास केला त्यामुळे त्यांना मिळालेला आहे. या संशोधनामुळे मुस्लिम जातीयवादाचे स्वरुपच त्याची कारणे त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात दृढ झालेले विचार मांडून जातीयवादांच्या निराकरणाचे उपाय ही त्यांनी सूचविले आहेत. मुस्लिम जातीयवादाचा उगम कसा झाला याविषयी विवेचन करताना प्रा. कुरुंदकर म्हणतात, ''मुस्लिम जातीयवादाचा उगम भीतीपोटी नाही, आपला धर्म हा एकमेवधर्म आहे. इतरांवर आपला धर्म लादणे हा अन्याय नव्हे, इतरांनी हा धर्म लादण्याचा प्रतिकार करणे हाच अन्याय आहे. आमच्या राज्यात आमच्याखेरीज इतर कोणालाच कोणतेच हक्क असू शकत नाहीत. कारण कोणी आमच्या बरोबरीचे नव्हतेच. इतरांच्या राज्यात मात्र आम्हाला केवळ समानतेने वागवून चालणार नाही, आम्हाला विशेषाधिकार असले पाहिजेत. कारण आम्ही सर्वधर्मनिष्ठ आहोत. या भूमिकेतून हा जातीयवाद निर्माण होतो. मुस्लिम जातीयवादाचा उगम हे त्यांच्या आक्रमक आकांक्षा, विस्तारवाद, स्वत:च्या परिपूर्ण श्रेष्ठत्वाची जाणीव यात होती. तडजोड करुन उदारपणे भीती दूर करता येते. आक्रमक अहंतेला औदार्य व तडजोड हे उत्तरच असू शकत नाही.''[२६] म्हणूनच संसदाने मुस्लिम लोकमताची तमा न बाळगता समान कायदा करुन मुस्लिम परंपरेत बळेच बदल घडवून आणला पाहिजे, असा त्यांच्या एकंदर विवेचनाचा रोख असल्याचे नालिनी पंडित यांनी म्हटले आहे. आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी मुस्लिम तत्वज्ञान, इतिहास व परंपरा यांचे बारकाईने अध्ययन करुन त्यांनी अनेक दाखले दिले आहेत यावरही प्रकाश टाकला आहे.

'भारतीय लोकशाहीला आव्हान अंधधर्मश्रद्धेचे की राजकारणी महत्त्वकांक्षेचे?' या लेखात वसंत पळशीकरांनी भारतीय लोकशाहीला अंधधर्मश्रद्धेचे गंभीर आव्हान असल्याचे जे

शहांच्या पुस्तकात विवेचन केलेले आहे ते समाधानकारक नसल्याचे म्हटले आहे. राजकारणी लोकांची महत्त्वकांक्षा यांचे आव्हान असल्याचे स्पष्ट केले आहे. भारत कधी काळी धर्माधिष्टित राज्य होईल असा धोका फारसा नाही. त्यांच्या 'हिंदू' राष्ट्रांच्या कल्पनेचा आशय सर्वस्वी राजकीय आहे, इतर धर्मीय लोकसमूहांना राजकीय, सामाजिक व आर्थिक सत्तास्थाने नाकारणारा आहे.

भारतीय लोकशाहीला आव्हान सामान्यजनांच्या अंधधर्मश्रद्धेतून उपस्थित झालेले नाही. राष्ट्राच्या संघटनेविषयी जमातनिष्ठ सिद्धांतप्रणाली फोफावत आहे. त्यांचा लोकशाहीला खरा धोका आहे. धार्मिकता नि गटाचे सभासदत्व जमातनिष्ठेशी राजकारणाचे सूत्रधार लोकांना जमातनिष्ठ बनविण्यासाठी धर्मश्रद्धा जागवीत आहेत; आणि सूक्ष्म व प्रगल्भ धर्मश्रद्धा माणसास जमातनिष्ठ बनवित नसल्याने सहाजिकच जमात निष्ठेस पोषक अशा फूट पाडणाऱ्या गोष्टीवरून व फूट फाडण्याच्या पद्धतीने लोकांच्या श्रद्धांना आवाहन केले जात आहे. पाकिस्तानचे राजकारण पाखंडी जिनांनी यशस्वी केले याचे मर्म शहांच्या नजरेतून सुटले आहे, वसंत पळशीकरांनी नजरेस आणून दिले आहे. राज्यकर्त्यांच्या महत्त्वकांक्षेचे खरे आवाहन भारतीय लोकशाहीला असल्याचे पळशीकर नमूद करतात.

'सूर्यास्त' या लेखात वसंत पळशीकर यांनी भारतावर दिडशे वर्षे राज्य करण्याच्या ब्रिटिश साम्राजचा सूर्यास्त कसा झाला, याच्या कारणांचा परामर्श घेण्याचा फ्रॉन्सिस जी हाचिन्स यांच्या 'दा शल्यूशन ऑफ परर्मनन्स' या पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले आहे. ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधी अस्ताला जाणार नाही, अशी ब्रिटिशांची श्रद्धा होती, आणि तसा त्यांचा हट्ट होता. ब्रिटिशांनी स्वतःची अशी आत्मवंचना कशी करून घेतली, ब्रिटिशांच्या या समजूतीमधील वेगवेगळे घटक कोणते, ते कोणकोणत्या कालखंडात उदयास आले व का आले, इत्यादी मुद्यांचा ऊहापोह केला आहे.

हिंदूस्थान ज्यांनी जिंकला ते ज्या इंग्लिश समाजातून आले होते त्या समाजास नीतीचे विशेष वावडे नव्हते. कामगिरी बजावल्याशी कारण अशी ज्यावेळी भूमिका होती. तत्कालीन हिंदूस्थानातील राजेरजवाड्यांच्या व्यवहाातल्या गैरकारभाराचा व मार्गाचा वापर जाणीवपूर्वक

करून घेऊन इंग्रजांनी हिंदुस्थान जिंकला. हे करीत असताना त्यापैकी बहुतेकांनी स्वत:चा स्वार्थ, ईस्ट इंडिया कंपनीचा स्वार्थ व इंग्लड देशाची प्रतिष्ठा, कीर्ती व स्वार्थ या तिन्हींची काळजी घेतली.

हिंदी राष्ट्रवादी भूमिकेला त्यांनी 'हिंदूस्थान' हे मुळी राष्ट्रच नाही; तो एक भूप्रदेश आहे, असे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. आणि ज्या अर्थी 'हिंदूस्थान'हे राष्ट्रच नाही त्या अर्थी राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचे तत्त्व हिंदुस्थानला लागूच पडत नाही, अशी भूमिका घेतली, हिंदूस्थानात शिक्षित, व्यावसायिक मध्यमवर्गाचा उदय झाला. राष्ट्रवादी आकांक्षा जागृत झाली, त्यावेळेपासून येथील ब्रिटिश प्रशासकांची पंचायत झाली. आणि दिडशे वर्षांच्या ब्रिटिश साम्राज्याचा अस्त झाला, असे पळशीकरांनी विवेचन केले आहे.

'राजकीय विचारांची मार्गदीपिका' या लेखात वसंत पळशीकरांनी इंग्रज राजवट येथे स्थिरावल्यापासून पुढच्या काळात हिंदूस्थानात झालेल्या राजकीय विचारांचा आढावा घेणाऱ्या 'इंडियन पोलिटिकल थिंकिंग' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे.

राजकीय विचार हा पोकळीत होत नसतो, त्या आधीचा विचार, तत्कालीन परिस्थिती व प्रश्न यांचा संदर्भ त्याला असतो. त्याशिवाय त्या व्यक्तीच्या कौटुंबिक व वर्गीय पार्श्वभूमी व बैठक आणि तिचा स्वभाव-प्रकृती यांनीही व्यक्तीचे विचार निश्चित होतात. तिसरे उद्दिष्ट्ये कोणती मूल्यनिष्ठेचे स्वरूप काय याचाही घनिष्ठ संबंध असतो. अण्णा दुराईंनी स्वीकारलेल्या पद्धतीत विचारांचे हे लागेबांधे लक्षात घेतलेले नाहीत; जणू ते नसतातच. केवळ तात्विक स्वरूपाच्या राज्यशास्त्रीय प्रश्नांचा विचार करताना ही एखादा विचार समजावून घेताना, त्या व्यक्तीने तो मांडला असेल त्याने केलेली शब्द योजना, त्याने काही मुद्द्यांवर दिलेला भर इत्यादी वैशिष्ट्ये लक्षात यावीत म्हणून लागेबांधे विचारात घेतले पाहिजेत ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे, जेथे सर्वस्वी व्यक्तिनिरपेक्ष अशा पातळीवरून विचार होत असेल तेथेच याची गरज पडत नाही. पण हिंदूस्थानातील राजकीय विचार हा विषय हा व्यक्ती व स्थळ-काळसापेक्ष असा असल्याने विचारांचे लागेबांधे लक्षात न घेता क्षम्य ठरू शकत नाही.

कम्युनिष्ट चिनने तिबेटचा घास गिळल्यापासूनच्या सुमारे वीस वर्षात तिबेट समाज रचना

व संस्कृती यात अमूलाग्र बदल घडून आला असणार. सामाजिक,सांस्कृतिक बदलांचा धर्मावर ही खोलवर आघात झालेला असणार. त्यामुळे 'रिलिजन ऑफ टिबेट' व 'पीपल ऑफ टिबेट' या दोन ग्रंथांची आज एका कालखंडातील चित्रण या स्वरूपाची ऐतिहासिक उपयुक्तता वसंत पळशीकर यांन 'तिबेट' या लेखात सांगितली आहे. 'टिबेट पास्ट अँड प्रेझेंट' या राजकीय इतिहासात्मक ग्रंथात भारतीयांना अधिक रस वाटावा हे स्वाभाविक आहे. या तिबेटविषयीच्या आपल्या अडाणीपणाने आपणास पहिला धक्का बसतो. आपल्यापैकी बहुतेकांना तिबेटला संपन्न व गतिमान राजकीय इतिहास होता हे माहित नसावे. आपल्या आसपाच्या प्रदेशावर स्वामित्व प्रस्थापित करण्याइतके, चीनची त्यावेळची राजधानी काबीज करण्याइतके तिबेट सातव्या–आठव्या शतकात बलिष्ठ राज्य होते. त्याच सुमारास बौद्ध धर्माचा प्रवेश तिबेटात झाला. तेथून पुढे मंगोलियात त्याचा प्रसार झाला व म्हणून मंगोल राज्य सत्तेचे पुढील काळात तिबेटला संरक्षण मिळाले. दलाईलामा या धर्मगुरू राजा अशा संमिश्र स्थानाची निर्मिती ही मंगोल सत्ताधिशाची करणी. अशा रीतीने प्राचीन काळापासून तिबेटला अखंड इतिहास आहे. त्यात चढउतार आहेत. भारत तिबेटच्या मदतीस का धाऊन गेला नाही याची कारणमीमांसा वसंत पळशीकरांनी या लेखात सांगितली आहे.

'पश्चिमबंगाली अराजकाची पार्श्वभूमी' या लेखात माधव लिमये यांनी पश्चिम बंकालमध्ये धुमसणारा असंतोष हा आजकालचा नसून त्याची मुळे कशी खोलवर रूजली आहेत, हे पटवून दिले आहे. थोर राष्ट्रभक्तांची आणि राष्ट्रभक्तीची महान परंपरा असलेला आणि एकेकाळी भारताचे नेतृत्व करणारा हा प्रांत ही आपल्यापुढील राष्ट्रापुढील एक मोठी समस्या होऊन बसली. पश्चिम बंगालमध्ये शांतता आणि सुव्यवस्था नावालाही राहिली नाही.

कलकत्ता ही सुरूवातीला ईस्ट इंडिया कंपनीची राजधानी हाती. राजधानी दिल्ला हलविली गेल्याने बंगालचे महत्व कमी झाले. उद्योगधंद्यांच्या बाबतीतही एकेकाळी अग्रेसर असलेला प्रांत स्वातंत्र्योत्तर काळात मागे पडत गेला. बंगाल आज जे विचार व्यक्त करतो तो उद्या भारतभर मान्यता पावतो असे ना. गोखल्यांनी शिफारस पत्र दिलेल्या बंगालची अस्मिता यामुळे दुखावली गेली व तीच या असंतोषाच्या मुळाशी आहे. यातच सशस्त्र क्रांतिकारकांची परंपरा असलेल्या

बंगाल गांधी प्रणित काँग्रेसशी संपुर्ण असा कधीच समरस झाला नाही. इतर राज्यांच्या मानाने डाव्या गटाचे नेहमीच प्राबल्य राहिले. यात भर म्हणून जातीय दंगली व निर्वासितांचे लोंढे आणि केंद्रसरकारकडून आपली उपेक्षा होती ही काँग्रेससकट सगळ्या पक्षांची भावना यात बंगालमधील असंतोषाचे मूळ असून पश्चिम बंगालची भौगोलिक परिस्थिती या असंतोषाचा वणवा पेटविण्यास अनुकूल असल्याचे लेखकाने पहिल्या दोन प्रकरणात दाखवून दिले आहे. बंगालमध्ये अराजक निर्माण होण्यामागच्या कारणांची मिमांसा लिमये यांनी परीक्षणात केली आहे.

'नेपाळी राजकारण' या लेखात दिनकर साक्रीकर ऋषिकेश शहा यांच्या 'नेपाली पॉलिटिक्स रिट्रॉस्पेक्ट अँड प्रॉस्पेक्ट'या महत्त्वाच्या अभ्यासनीय ग्रंथातील नेपाळच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाची सखोल व मर्मस्पर्शी चर्चा केली आहे. या ग्रंथाचा प्रपंच करण्याचे दोन उद्देश लेखकाने सांगितले आहेत. नेपाळसंबंधी सर्वसामान्य जिज्ञासा पूर्ण करणे आणि विचारशील वाचकांना नेपाळच्या आजच्या प्रवृत्ती व आकांक्ष यासंबंधी जाणीव करून देणे. नेपाळचे प्रश्न व भवितव्य यांचे त्यांना काही आकलन व्हावे असा लेखकाचा हेतू असल्याचे परीक्षणात स्पष्ट केले आहे.

ऋषिकेश सहा यांचे नेपाळच्या अंतर्गत राजकारणाचे विवेचन वास्तवनिष्ठ आणि प्रांजल आहे त्याला त्यांनी पाश्चात्य राज्यशास्त्राज्ञांच्या विद्वतेची जी झालर लावली आहे ती शोभिवंत असली तरी अनावश्यक वाटते. तांत्रिक परिभाषेच्या अभिरिकी शैलीतील भाषाविलास सोडला तर त्यांचे निष्कर्ष सहज व स्पष्ट आहेत. राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता अभंग राखण्यासाठी व राष्ट्रीयत्वाचा विकास होण्यासाठी आर्थिक व सामाजिक विषमता सहायतेच्या मर्यादित आणली गेली पाहिजे. जनसामान्यांना सत्तेत सहभागीत्व मिळेल अशी म्हणजे लोकशाहीप्रधान व्यवस्था पुन्हा प्रस्थापित केली पाहिजे. अंतर्गत स्थैर्यासाठी हे परिवर्तन आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य आहे. कारण अंतर्गत स्थैर्यावरच नेपाळचे स्वतंत्र अस्तित्व ही अवलंबून आहे.

'भूतान : ड्रॅगन किंग्ड्म इन क्राइसिस' या लेखात भूतानच्या राजसत्तेवरील संकट आणि भूतानच्या जनजीवनाविषयी माहिती सांगितली आहे. या ग्रंथाचा विषय भूतानमधील लोकजीवन व विकासकार्य हा नसून भूतानचा पंतप्रधान जिग्मय दोर्जी यांचा ५ एप्रिल १९६४ रोजी जो खून

झाला त्याची पार्श्वभूमी सांगणे आणि त्याचे धागेदोरे उलघडणे हा आहे. यामुळे एखाद्या गूढ रहस्यकथेचे आकर्षण लेखकाच्या लेखनात आले आहे, असा अभिप्राय पां.वा.गाडगीळ यांनी नोंदवला आहे, तो पुस्तकाला न्याय देणारा आहे.

'अरुंधती रॉय यांचे राजकीय निबंध' या लेखात सुधाकर देशमुख यांनी अरुंधती रॉय यांनी लिहिलेल्या 'The Algebra of Infinite Justice' या ग्रंथाचे मार्मीक परीक्षण केले आहे. पोखरणमधील भारताची अण्वस्त्र चाचणी, नर्मदा बचाव आंदोलन, जागतिकीकरण आणि खाजगीकरण अफगाणिस्तान युद्ध आणि अमेरिका अशा विविध विषयांवर लेखन या ग्रंतात आहे. पण मूलत: ह्या सर्व बाबींचा होणारा सामान्य माणसावरचा परिणाम त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांचे वाढते दारिद्रय त्यांना अस्वस्थ करते. सहाही निबंधात ही चिंता व त्यावरील त्याची भूमिका पहावयास मिळते.

प्रस्तुत लेखन हे प्रस्थापितांच्या धोरणाला असहमती दर्शविणारे लेखन आहे असे लेखन हे नेहमीच सतीचे वाण असते. कारण कोणत्याही राजकीय, सामाजिक, आर्थिक शक्तींना आपल्या विरोधात लिहिलेले बोललेले आवडत नाही. मग ती शक्ती हुकूमशाहीची असो की लोकशाहीचा बुरखा पांघरलेली व्यक्तीची असो. प्रस्थापिताविरोधी असहमती दर्शविणारे नाराजी दाखविणारे लेखन हे एक प्रकारचे आव्हान असे.

अरुंधती रॉय यांच्या लेखनाविषयी बोलताना सुधाकर देशमुख म्हणतात, ''त्यांच्या संवेदनशील कविमनाला जे हृदयाला भिडले ते त्यांच्या लेखणीतून साकार झाले. मांडणीची शैली अप्रतिम आहे. काव्यमय शैलीत लिहिलेले राजकीय लेख असे त्या लेखांचे वर्णन केल्यास वावगे होणार नाही. आपली भूमिका यथातथ्य मांडणे, आपल्याला जे भावते तेच करणे हा स्वत:चा धर्म त्या समजतात. प्रसिद्धीकरता लोकानुनय करणारी भूमिका घ्यावी किंवा त्याहीपेक्षा कोणतीच बाजू न होता स्वस्थ बसून राहावे हे त्यांना अनैतिक वाटते Neutralty is immorality ह्यावर त्यांचा विश्वास आहे.

पोखरणच्या अण्वस्त्र चाचणीनंतर त्यांनी find of Imagination हा भारताच्या अण्वस्त्र–धोरणविरोधी भूमिका होणारा लेख लिहिला. अण्वस्त्रे ही लोकशाही विरोधी, राष्ट्रविरोधी

आणि मानवतेविरोधी आहेत अशी सडेतोड भूमिका त्या घेतात, अणुयुद्धांचा, अणुचाचण्यांचा सर्व– सामान्यांच्या जीवनावर होणारा परिणाम त्यांना अण्वस्त्र विरोधी भूमिका घेण्यास भाग पाडतो. दारिद्रय, शिक्षण, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा न पुरवू शकणाऱ्या भारतासारख्या राष्ट्राने अणुबॉम्बवर कोट्यावधी रुपये खर्च करणे त्यांना अस्वस्थ करते.''

जागतिकीकरणाच्या नावाखाली पाश्चिमात्य राष्ट्रे नववसाहतवाद आणत आहेत की काय अशी साधारभीती सामान्यांप्रमाणे अर्थ तज्ज्ञांनाही वाटत आहे. हा नवीन अर्थकारणातून आलेला नववसाहतवाद अधिक चिंतनीय आहे. जागतिकीकरणही आपल्या सर्वांच्या जीवनक्रमावर बहुमुखी परिणाम घडवून आणणारी प्रक्रिया आहे. मुठभर लोकांना मिळणारा फायदा सोडला तर मध्यमवर्ग आणि गरीब जनता दारिद्रय रेषेकडे वाटचाल करीत आहे. उद्याचे स्वप्न पहात आजची भूक विसरता येत नाही. भारतासारख्या देशाला जागतिकीकरण मानवणार नाही असा रॉय यांचा कयास असल्याचे देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

रॉय यांच्या या सर्व लेखात त्यांनी न मांडलेला पण जाणवणारी एक विशेष बाब म्हणजे हे सर्व प्रश्न आधुनिक काळातील मूल्य व्यवस्थेच्या मर्यादा सांगणारे आहेत, असे सुधारक देशमुख यांना वाटते ते म्हणतात, 'जास्तीत जास्त लोकांच्या कल्याणाची किंमत काही मुठभरांनी का चुकती करावी हा मानवी हक्कांचा प्रश्न या निमित्ताने आपल्यासमोर उभा ठाकतो. आधुनिक काळातून आधुनिकत्तेतर काळात प्रवेश करतानाच्या संक्रमणकाळातील हे प्रश्न नाहीत ना असे देशमुख यांना वाटते.' अरूंधती रॉय यांच्या लेखनातून सामान्य लोकांप्रती असणारा जिव्हाळा प्रतीत होतो, हे सुधाकर देशमुख अधोरेखित करतात.

### ६) सांस्कृतिक :–

'संस्कृती' ही मानवी समाज व्यवस्थेतील महत्वाची संस्था आहे. समाज जसा विकसनशील आणि विस्तारशील असतो त्याच पद्धतीने संस्कृतीचे स्वरुपही विकसनशील व विस्तारशील असते. एडवर्ड टायलरने संस्कृतीची व्याख्या करताना म्हटले आहे की, समाजाचा सदस्य या नात्याने समाजात राहून माणसाने हस्तगत केलेले ज्ञान, विज्ञान आणि कला, यांच्या जोरावर परिस्थितीशी समायोजन करुन मिळविलेले कौशल्य व क्षमता तसेच नितिमत्ता, कायदा,

रुढी ह्यांना अनुसरुन केले जाणारे वर्तन या सर्वांचा संच म्हणजे संस्कृती होय. संस्कृतीचे दोन भाग पडतात. पहिला भाग भौतिक संस्कृतीचा असून त्यात मनुष्याने निर्माण केलेल्या विविध साधनांचा उदा. अवजारे, यंत्र इत्यादी यांचा समावेश होतो. दुसरा भाग अभौतिक संस्कृतीचा असतो. त्यात तत्वज्ञान, धर्म, कला, वाङ्मय इत्यादीचा समावेश होतो. भौतिक संस्कृती ही साधनरुप, तर अभौतिक संस्कृती 'साध्यरुप' असते. त्यामुळे संस्कृतीचे दोन्ही विभाग मानवी जीवनात महत्वाचे असतात. 'भाव मानवी जीवन अथवा संस्कृतीच्या जडणघडणीत अभौतिक संस्कृतीचा वाटा मोठा असतो. साहित्याचा वाटाही त्यात महत्वाचा आहे. वैचारिक साहित्य समाजसापेक्ष असल्याने संस्कृतीविचार यात महत्वाचे आहे.'

वैचारिक साहित्याची भूमिका आधुनिक संस्कृती विचाराची आहे. एकोणिसाव्या शतकापासून विचारवंतांनी परंपरागत संस्कृती विचारातील विषमता, जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रियांची दयनीय स्थिती, अंधश्रद्धाचे साम्राज्य कर्मकांडंचे प्राबल्य, ब्राह्मण, पुरोहित वर्गाचे वर्चस्व धर्मशाही यांच्याविषयी कडक प्रहार केले आणि आधुनिक सांस्कृतिक विचारांची बैठक किंवा मांडणी समाजात करण्याचे प्रयत्न केले. यामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, विज्ञाननिष्ठा, स्त्री पुरुष समानता, स्त्री व अस्पृश्यवर्गाला शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, बुद्धिप्रामाण्यवादी विचार, घटनात्मक अधिकार, लोकशाही जीवनमूल्यांचा विचार इ. चा समावेश होतो. उपरोक्त आधुनिक सांस्कृतिक विचारांची कार्यभूमी वैचारिक साहित्यात आहे.

'दलित मुक्ति लढा आणि दलित साहित्य' या लेखात दया पवार यांनी वामन इंगळे यांच्या दलित मुक्ति लढा आणि दलित साहित्य या पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले आहे. आजवरच्या दलित मुक्तिलढ्यातूनच आजच्या दलित साहित्याचा जन्म झाला. त्यामुळे दलित साहित्याबरोबर दलित मुक्ति लढ्याची चर्चा केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र दिला. त्यांच्यातील स्वाभिमान जागृत केला. जागृत झालेला युवक लिहू लागला. त्यांच्या लिहिण्याला बळ मिळाले ते डॉ. आंबेडकरांनी सुरु केलेल्या चळवळीतून. डॉ. भालचंद्र फडके लिहितात, ''दलित साहित्याला बळ मिळाले ते आंबेडकरांनी सुरु केलेल्या दलित चळवळीतून. या चळवळींना डॉ. आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान होते

आणि या चळवळीने दलित लेखकांच्या प्रकृतिधर्माची (Sensibility) जडण–घडण होते.''[२७] दलित साहित्य हे क्रांतिकारी आंबेडकरी विचारांचे अपत्य आहे.

'दलित साहित्याची भूमिका' सांगताना एस. डी. इनामदार यांनी प्रा. यशवंत मनोहर यांचे सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाच्या चिंतनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे. ज्या गौतम बुद्धाने सर्वांना सुख लाभेल असे नवे मानवी संबंध निर्मिणारे ऐहिक नीतिशास्त्र बुद्धाने मांडले.बुद्धविचार हा मानवी मनाचा अनुभव व सर्वसुखवादाचे नीतिशास्त्र आहे. बुद्धाने ईश्वराला खालसा करुन नीतीला तिथे स्थापित केले. समाजातील आर्थिक–सामाजिक–विषमता नष्ट करण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांवर आधिष्ठित अशी समतेची नवी अर्थ व्यवस्था व समाज रचना निर्माण करण्यात अवैदिक बुद्धीविचार हा निश्चित प्रेरक होऊ शकतो. 'दलितांच्या दु:खाची माऊली' असलेला व मरणासन्न उजेडाला फाशीच्या तत्वावरुन सोडविणारा 'बुद्ध' हा भगवान नसून युगप्रवर्तक व क्रांतिकारक महापुरुष आहे, हे भावसत्य कवी मनोहरांना जाणवते पण पुढे बुद्धांच्या अनुयायांनी त्याला भगवान बुद्ध करुन त्याची विभूतीपूजा मांडून त्याचा पराभव केला, हे शल्य प्रा. यशवंत मनोहर यांच्या जिव्हारी लागते हे स्पष्ट केले आहे. तसेच दलितांच्या ललित साहित्याने आता प्रस्थापितांचे साहित्यशास्त्र नाकारले पाहिजे. प्रचलित प्रस्थापित समीक्षकांकडून आपल्याला मानमान्यता मिळेल, आपल्या साहित्याचे मूल्यमापन यथार्थ होईल, याची वाट पहात दलित लेखकांनी थांबू नये. त्यांनी दलितांचे सौंदर्यशास्त्र निर्माण केले पाहिजे असे मार्गदर्शन दलित लेखकांनी त्यांनी केले असलचे एस.की. इनामदार यांनी परीक्षणात विवरून सांगितले आहे.

दलित साहित्य चळवळीतील संवाद आणि विसंवाद या लेखात भास्कर लक्ष्मण भोळे यांनी दलित साहित्य चळवळीच्या संदर्भात एक मध्यवर्ती व्यक्तिमत्व असलेले रा. पानतापणे यांच्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त झालेल्या त्यांच्या चिंतनशील व्यक्तिमत्वाची ओळख करुन दिली आहे. पानतावणे यांच्या मते, विद्रोह हा व्यक्ती वा समाजापुरता न राहता सर्व प्रकारच्या शोषकांच्या विरुद्ध उभा राहतो आणि तो केवळ शाब्दिक वा वरवरचा असेल तर त्याचा पराभव अटळ होऊन बसतो. प्रस्थापित चौकटीला आव्हानित करणारी प्रबळ पर्यायी वैचारिकता अंगी असल्याशिवाय कोणतीच विद्रोही चळवळ यशस्वी होऊ शकत नसते, हे तितकेच खरे आहे.

चळवळीची वैचारिकता हा मानवी चेतनेचा अविष्कार असावी. चळवळीच्या वैचारिकतेचे प्रयोजन सांगताना प्रा. मनोहर जाधव म्हणतात, ''वैचारिकतेला समाजव्यवस्थेतील अनुदारतेचा, अंतर्विरोधाचा आणि स्थितीशीलतेचा सतत शोध घ्यावा लागतो. समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेली वैचारिकता, इतिहासाचा अन्वय लावते, वर्तमानाची चिकित्सा करते आणि भविष्याचा कानोसा घेते, यातूनच नव समाज रचनेला आरंभ होतो.''२८ जग बदलण्यासाठी लागणाऱ्या ऐतिहासिक प्रेरकशक्तीच्या स्वरुपात प्रा. पानतावणे आंबेडकरी विचाराकडे पाहतात. प्रा. पानतावणे व प्रा. मनोहर यांना दलित साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर एकत्र आणून एकच हार गळ्यात घातला. त्यावेळी प्रा. पानतावणे म्हणतात, त्याचप्रमाणे 'विविध दिशांना आपली तोंड घेऊन बसलेल्यात संवाद घडवून आणण्याची ही अपूर्वाई लक्षणीय नक्कीच होती पण प्रत्यक्षात मात्र हा संवाद त्या एका संमेलनापुरताही दिसला नाही. नंतर तर नाहीच नाही.' अशा प्रकारे भोळे यांनी दलित साहित्य चळवळीतील प्रा. पानतावणे व प्रा. मनोहर जाधव यांच्यातील विसंवादाबरोबरच दलित साहित्य चलवळीतील विसंवादावर प्रकाश टाकला आहे.

'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' या परीक्षणामध्ये मिलिंद स. मालशे यांनी मर्ढेकरांचे मराठी सौंदर्यशास्त्र व साहित्यशास्त्र या क्षेत्रांमध्ये स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले असले तरी मर्ढेकरांच्या सौंदर्यविचाराची तत्वज्ञानातील जातकुळी कोणती? असा प्रश्न उपस्थित केला आहे. कलेच्या माध्यमाचा विचार करताना मर्ढेकर साहित्यिकांच्या चष्म्यातून इतर कलांकडे पाहतात, तर त्यांचे लयतत्वाचे नियम दृष्यकलांच्या ओझ्याने वाकलेले आहे, असे निष्कर्ष काढताना रानड्यांनी मर्ढेकरांच्या काही मतांची जी छाननी केलेली आहे ती थोडक्यात पण अतिशय धारदारपणे श्री. मालशे यांनी केलेली आहे.

केशव सुतांच्या काव्यातील सृष्टी : विवाद्य अन्वयार्थ या परीक्षणात गो. मा. पवार यांनी दि. के. बेडेकर यांनी केशवसुतांच्या रोमॉटिसिझमचे त्यांच्या जाणीव विश्वाचे स्वरुप स्पष्ट करुन दाखविले आहे. त्याचबराबेर एकाच केंद्रिय कल्पनेत वा कल्पना व्यूहात या जाणिव विश्वाचे दर्शन होणे हे बेडेकरांचे उद्दिष्ट असल्याचे म्हटले आहे. कवी, वास्तव आणि कविता यांच्या संबंधी केशवसूतांची एक दृढ व नवीन भूमिका होती. ही त्यांची भूमिका म्हणजेच त्यांची सम्यक काव्यदृष्टी

असे म्हटले आहे. बेडेकरांच्यामते केशवसुतांची काव्यदृष्टी ही जीवन दृष्टीच होय. या काव्यदृष्टीचे विवेचन गो. मा. पवार यांनी केले आहे. गो. मा. पवार यांच्या मते बेडेकरांनी केशवसुतांच्या तत्वसानाचा व्यूह रचण्याचा अपूरा व सदोष आहे, गोष्ट ही की केशवसुतांच्या रोमॅंटिसिझमचे, त्यांच्या प्रभावी जाणिवांचे मर्म बेडेकरांना समजले आहे याचे प्रत्यंतर आपल्याला येते.

'एका अवलियाचं हृदगत : चर्चबेल' या लेखात विश्वास पाटील यांनी कवी ग्रेस यांच्या चर्चबेल या ललित निबंधामधून त्यांच्या विधानांना वैश्विक सत्याचा अन् सार्वजनिक अनुभूतीचा कसा सहज सुंदर स्पर्श झालेला आहे. याचे मार्मिक विवेचन केले आहे. कवी ग्रेसच्या 'चर्चबेल'चं विवेचन करताना विश्वास पाटील म्हणतात, 'माझ्याजवळ फक्त दोनच शब्द आहेत. १) प्रीती आणि २) एकान्त–ग्रेसने प्रितीचा विचार करताना बालकवीप्रमाणेच उदात्त, पवित्र, मंगल अशरीरी, इंद्रिंयेतर, प्रीतीचा विचार गुंफला आहे. ग्रेसला ही प्रीती अगदी क्रूर आणि हिस्त्र पशूंच्या डोळ्यांतही दिसते. ज्यांच्या प्राक्तनाशी आपले जीवन निगडीत आहे. त्यांना आपण काय देऊ शकतो? फक्त प्रेम!! आणि ते दिल्यावर दु:खाचा स्वातांत्र्याचा प्रश्नच मिटतो. सारांश काय तर एका व्यक्तिमत्वाने शब्दांच्या साहाय्याने घेतलेल्या आपल्या एका असाधारण अनुभवाचा शोध म्हणजे ललित गद्य होय. ग्रेसचे हे वैभव, प्रगल्भ काव्यात्मकता व संकल्प वैचारिकतेच्या सुखद प्रत्ययाने समर्थ व डोळस बनलं आहे, हे खरं त्याचं यश आहे.' असे पाटील म्हणतात ते यथार्थ वाटते. चर्चबेल विषयी रमेश नारायण म्हणतात, 'चर्चबेल म्हणजे निर्मात्याने विश्वसत्तेशी केलेला संवाद आहे.' ''ग्रेस संपूर्ण विश्वाचे प्रतिनिधी बनून अंतिम सत्तेशी संवाद साधतात.'' असे जेव्हा डॉ. दं. भि. कुलकर्णी म्हणतात त्यावेळी त्यांना हेच सुचवायचे असते की, ''ग्रेस हे अस्तित्वादात, ह्या पार्थिवतेत अड्कू इच्छित नाहीत. या बाहेरील चैतन्यवादाशी ते नाते जोडू इच्छितात, म्हणून ते या पार्थिवतेचे अस्त आहेत.''

'वेदनेचा वेध' या लेखात निलिमा भावे यांनी 'म. ग. नातू' यांनी लिहिलेल्या वेदनेचा वेध एक खानोलकरांची कादंबरी–एक आकलन या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. नातू यांनी खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा निव्वळ, निर्मल आस्वाद घेत असताना आशयाच्या बाबतीत ते बुद्धिप्रामाण्यवाद आणि स्त्री जातीचा कळवळा या दोन अंशातून नातूंनी कादंबऱ्या वाचल्या आहेत.

खानोलकरांच्या कादंबरी विश्वाचे अवगाहन करुन त्यातही काही निष्कर्ष काढ्ले आहेत. खानोलकरांच्या कादंबऱ्यात दु:खाच्या अनेक छ्टा दिसतात. त्याविषयी नातू म्हणतात, ''ही दु:खे निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत व म्हणून ती परिहार्य आहेत, हे ही खानोलकर मोठ्या कलात्मकतेने आपल्याला सुचवित असल्याचे जाणवते.''[२९] बहरु पाहणारी एक वेल सर्पिणीसारखी पुत्कारली या आणि अशाच इतर खानोलकरी प्रतिमांचा एक विद्ग्ध आणि तरल रसिकतेने आस्वाद घेणाऱ्या नातूंनीच खानोलकरांच्या कादंबऱ्यातील आशयच इतकी बोजक, ऐहिक निरुपण करावं याचे मात्र लेखिकेला आश्चर्य वाट्ते.

'टीकाविवेक' या लेखात म. द. हातकणंगलेकर यांनी 'टीकविवेक' ली. के. क्षीरसागर यांच्या ग्रंथातील महत्वाचा भाग म्हणजे सौंदर्यवाद व गूढ्वाद याविषयी मार्मिक विवेचन केले आहे. सौंदर्यवादी प्रवृत्तीवर आयविंग बॉबिट यांनी घेतलेल्या आरोपांचा सारांश दिला आहे. क्षीरसागरांच्यामते बॉबिट्चा मुख्य आक्षेप पूजनाच्या अतिरेकावर व पूजनाला जीवनात केंद्रस्थान देण्यावर आहे.

गूढ्वाद हा या ग्रंथाचा प्रमुख विषय. गूढ्वाद ही सौंदर्यवादाची परिणत अवस्था ही क्षीरसागरांची भूमिका आहे. या वादाचे अगर दृष्टीचे स्वरुप क्षीरसागरांनी कसे स्पष्ट केले आहे ते त्यांच्याच शब्दात मांड्तात, ते असे, 'व्यक्ती अगर वस्तू यांच्यापलिकडील दर्शन मानणारी व चितारणारी एक साहित्यदृष्टी आहे ती दृष्टी दृष्ट्याची भावना अगर मन:स्थिती हे अंतिम सत्य मानीत नाही, तर वस्तूचे व्यक्तिनिष्ठ परंतु गूढ आणि आपरदर्शन हे अंतिम मानते. अर्थात हे दर्शन अनिर्वचनीय अथवा शब्दातीत असते. गूढ्वादी वाङ्मय हा एक शैलीचा प्रकार नव्हे अपार अनुभवातून चिंतनात नकळत येवून जाणारी ही एक भूमिका आहे. गूढ गुंजन हे दर्शनिक सिद्धांतावर आधारलेले नसते. वेदान्तपर कविता ही गूढ्गुंजनात्मक कविता नव्हे, साक्षात्कार, सायुजता हे परमार्थसाधनाच्या क्षेत्रातील शब्द गूढ गुंजनात असणार नाहीत.'

पाश्चात्य टीकविचारांची नुसती ओळखच नव्हे, तर स्वतंत्र बुद्धीने मूल्यमापन करणारा, स्वत:च्या वाङ्मयीन व अवाङ्मयीन दैवतांचा व्यासंगपूर्ण व शैलीदार प्रचार करणाऱ्या व अर्वाचीन मराठी साहित्याचे विचार प्रवर्तक समालोचन मांड्णारा हा ग्रंथ लिहिल्याबद्दल प्रा. क्षीरसागरांचे

कृतज्ञतापूर्वक आभार मानले कारण त्यांच्या लिखाणामुळे साहित्यातील गूढ्वाद नेमका समजण्यास वाचकांना मदत होईल.

'साक्षेपी साहित्यप्रत्यय' या लेखात दिलीप धोंगडे यांनी भास्कर लक्ष्मण भोळे यांच्या 'साहित्यप्रत्यय' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. प्रस्तुत ग्रंथाची मांडणी दोन भागात केलेली असून पहिल्या भागाला साहित्याची तत्वचर्चा आहे. ही तत्वचर्चा काही चर्चासत्रांच्या निमित्ताने लिहिलेले लेख तर प्रसंगोपात विशिष्ट संदर्भात केलेली साहित्य विषयक तात्विक मांडणी या स्वरुपात घडून आलेली आहे. दुसऱ्या भागात काही महत्वाच्या पुस्तकांची वेळोवेळी केलेली समीक्षा एकत्रित केली आहे.

डॉ. भोळ्यांना सामाजिक शास्त्रांची दृष्टी लाभलेली असल्याने त्यांच्या समीक्षेतून सामाजिक गतिशास्त्र व सूक्ष्म चिकित्सा याचे दर्शन त्यांच्या 'साहित्यप्रत्यय' या पुस्तकातून येत असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच डॉ. भोळे यांची भाषाही त्यांच्या समीक्षेइतकतीच प्रगल्भ आहे. तत्सम संस्कृत शब्द आणि मराठी शब्द तसेच त्यांनी खास घडवलेले सामाजिक शब्द एकमेकांशेजारी येऊन ध्वनिवलयांबरोबर अर्थवलयही साकारतात. एवढा प्रचंड व्यासंग व सामग्री हाताशी असलेला, समीक्षक, तुच्छतावादी, सबझूटवादी होण्याचा धोका अधिक असतो. पण भोळ्यांच्या समाजहितैषी वृत्तीपोटी आंतरिक तळमळीने एका विशिष्ट शैलीरुप धारण केले आहे असा मार्मिक अभिप्राय धोंगडे यांनी परीक्षणामध्ये नोंदविला आहे.

'मराठी साहित्याची जीवनवादी समीक्षा' या लेखात उपेक्षित वर्गाची संस्कृती, त्यांचे शिक्षण, त्यांचे साहित्य हे ज्यांच्या चिंतनाचे विषय आहेत त्या डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या 'साहित्य चिंतन' या पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले आहे. एकूण दहा लेखापैकी शेवटचा लेख परीक्षणात्मक आहे. बाकी नऊ लेख हे परिवर्तनशील साहित्याच्या स्वरुपाचे विश्लेषण करणारे आहेत. आजच्या समाजव्यवस्था आणि साहित्याचे दायित्व हा या पुस्तकातील पहिला लेख. प्रत्येक काळातील विचारवंतांनी साहित्यकाराला काही प्रश्न विचारलेले आहेत. समाजातील सर्वात संवेदनक्षम म्हणून घेणारा लेखक हा आपल्या समाजव्यवस्थेपासून अलिप्त राहून जगू शकतो काय? या अशा अलिप्ततेतून निर्माण होणाऱ्या साहित्याचे मोल ते काय? आणि त्या

सोबतच व्यवस्थेच्या प्रश्नात लेखकाने आपल्या साहित्यकृतीला किती प्रमाणात गुंतवून ठेवावे असे प्रश्न उपस्थित केले आहेत. परिवर्तनाशी बांधिलकी पत्करलेल्या एका संवेदनशील अभ्यासकाचे हे चिंतन आहे आणि त्यामुळेच या चिंतनाला एक वेगळे परिमाण लाभले असल्याचे सूर्यनारायण रणसुभे यांनी म्हटले आहे. लेखक समाजापासून फटकून राहू शकत नाही. समाजाचे प्रतिबिंब साहित्यत पडतेच. साहित्य आणि समाज यांचे एक अतूट नाते यावर परीक्षणात प्रकाश टाकला आहे.

'पहाटपाणी' या प्रा. सौ. सरोजिनी वैद्य यांच्या ललित लेख संग्रहाचे परीक्षण 'पहाटपाणी' लेखात शशिकांत लोखंडे यांनी केले आहे. ते म्हणतात, ''निसर्ग, जीवन आणि साहित्य या संदर्भातले हे चिंतन जीवनाचा विचार करण्याची पद्धतच बदलून टाकते.हे चिंतन वैचारिक म्हणून व्यक्त होऊन थांबत नाही, तर ते व्यक्तिमत्वही व्यक्त करु पाहते. 'पहाटपाणी'तील दृष्टी जीवनाच्या अनाकलनीय चैतन्याने न्हाऊन निघत असलेल्या व्यक्तिमत्वाच्या रहस्यांचा शोध घेत आहे. सर्व निबंधांचा प्राण गांभीर्य आहे. आपले व्यक्तिमत्व आणि वास्तव यातील घडामोडीचा अर्थ लावू पाहते असे करीत असतानाही लेखिका जीवनातील वास्तवावर कुठेच प्रकट भाष्य करीत नाही. जीवनातून काही शोधून जीवनाचे सामायिक तत्व मांडत नाही. जीवनाची तार्किक वैशिष्ट्ये मांडत नाही. कोणताही निष्कर्ष काढत नाही. जीवनाची जी ओढ आहे, माणसे समजून घेण्याची जी आस आहे त्यातून लेखिकेला गंभीरपणे सर्व गोष्टीचा नीट विचार करावासा वाटतो म्हणून सर्व निबंधाचा प्राण गांभीर्य असल्याचे लोखंडे यांनी नमूद केले आहे.''

'साहित्यातील अश्लीलता : खऱ्या समस्येचा केवळ एक मुखवटा' या लेखात म. द. हातकणंगलेकर यांनी कलावंताचे स्वातंत्र्य आणि समाजाचे स्वास्थ्य या साहित्यातील अश्लीलतेच्या प्रनाच्या दोन प्रमुख बाजूंचे विवेचन केले आहे. लेखकांनी या विषयासंबंधी जे निष्कर्ष काढले आहेत. त्यांचा सर्वसाधारण रोख असा की, अरलीलतेचा प्रश्न सोडवताना कायद्याच्या जरबेपेक्षा कला साहित्याकडे पाहण्याचा योग्य आणि उदार दृष्टीकोन लोकांच्या मनात रुजविता आला आणि त्यांच्या अभिरुचीला योग्य मार्गदर्शन मिळाले तर त्याचाच अधिक उपयोग होईल. भारतात अश्लीलतेविरुद्ध जे काहूर माजवले जाते. त्यांच्या मुळाशी भारतीय मनातील

दुभंगलेपण अगर दांभिकता आहे, असे हातकणंगलेकर अश्लीलतेच्या विचारासंबंधीचे स्वरुप मार्मिक विवेचन करतात. व्यक्तीनिष्ठ कलामूल्ये आणि समाजातील नीतिकल्पना यातील विसंवादातून अश्लीलतेची जाणीव निर्माण होते.

'गतिमानी की मनमानी' या लेखात श्रीकृष्ण दातार यांनी द. ग. गोडसे यांच्या 'गतिमानी' पुस्तकाचे परिक्षण केले आहे. दातार म्हणतात की, गोडसेंनी या पुस्तकात उत्कट उर्मी, ज्वलंत प्रेरणा, जीवनदायी अंत:प्रवाह अशी विशेषणे वापरुन विशिष्ट काळात, विशिष्ट भूप्रदेशातील कला, भाषा, रेषा, स्वर युगधर्मास अनुसरुन बलशाही व आशयघन बनतात हे प्रमेय सिद्ध करण्याची श्री. गोडशांचा आटापिटा मला निरर्थक वाटतो. त्याचबरोबर तर्कमानी, गणितमानी रेषा म्हणजे सांकेतिक अवस्थेतील रेषा व उलट उदयकालीन भावगर्भ गतिमान रेषा, यावर आधारित हस्ताक्षराचा विचार हे अशाच पद्धतीने पोकळ अनुमनावर रचलेले मनोरे आहेत. शब्दजंजाला खेरीज त्यात काही हाती लागत नाही हे दातार यांनी उदाहरणासह पटवून दिले आहे.

'एका गूढरम्य सौंदर्याचा काव्यवेध' या लेखात ह.म.घोडके यांनी द.ग.गोडसे यांच्या 'मातावल' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. आदिवासींच्या चालीरिती, धर्मश्रद्धा एकूणच संस्कृतीविषयक बाबीविषयी सर्वसामान्यांना कुतूहल वाटते. त्या कुतूहलापोटी 'मातावळ' पुस्तक लिहिले गेले. श्री. गोडशांना आदिवासींच्या शिल्पांतील बाक वळणांनी झपाटले आहे. त्या शिल्पांच्या पाठीमागे असलेल्या प्रेरणा, शास्त्राधार आणि लोकगीतांची असलेली पुष्टी घ्या सर्वांचा विचार ते सूक्ष्मपणे जाणकरीने व विशेष म्हणजे रसिकल्या अंत:करणाने करतात. आदिवासींना सरळ रेषा त्या निर्जिव व कृत्रिम वाटतात. बाक वळणे मात्र त्यांना स्वयंप्रवाही, ओघवान आणि जीवनदायी वाटतात. त्या शिल्पामध्ये असलेली बाकदार वळणे त्याचा लय, ताल आणि नाद ह्यांची द्योतक आहेत, असे गोडसे यांना वाटते याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

'इरावतीबाईंचे संस्कृतिविषयक लेखन' या लेखात गो. के. भट यांनी इरावतीबार्संच्या संसकृतिविषय विचारांचा परामर्श घेतला आहे. इरावतीबाईंच्या मराठी संस्कृतीविषयक लेखनाचे वेगळे वैशिष्ट्य नमूद केले आहे. ते म्हणजे त्यांचे हे लेखन केवळ तत्वमंथन आणि सिद्धांत निरुपण या स्वरुपाचे नाही, त्यामागे प्रचंड परिश्रम असलेले सर्वेक्षण व संशोधन आहे. नरहर कुरुंदकरांनी

इरावतींच्या लिखाणाबाबत असे म्हटले आहे की, ''इरावतीबाईंच्यावर उदारमतवादाचा जो पगडा होता त्याचा परिणाम त्यांच्या लिखाणावर दिसून येतो. त्या आग्रहाने कशाच्या विरुद्ध उभ्या राहू शकत नाहीत. मनाच्या या घडणीमुळे त्यांच्या लिखाणाची विविधता वाढली आहे. पण ते लिखाण काहूर आणि करुणा यांच्या काठावर थांबणारे आहे. पलीकडच्या काठावर जाण्याची प्रेरणा देणारे नाही''[३०] रामायण–महाभारताची वाङ्मयीन तुलना, रामाच्या दक्षिणेतील प्रवासाचा तपशील, लंकेचे संभाव्य स्थान, अशी जी अभ्यासस्थळे आहेत त्यांचा विचार करताना बाईच्या मधला बुद्धिवादी अभ्यासक, वाङ्मयीन समीक्षक किंवा तटस्थ संशोधक जागृत असतो. परंतु घटना आणि व्यक्ती यांचे विवेचन करताना बाईंचे स्वत:चे व्यक्तिमत्व अधिक डोकावते असा अनुभव येतो असा भट यांनी अभिप्राय नोंदविला आहे.

'भारतीय वैद्यकशास्त्र आणि धर्मेतिहास' या लेकात विजयकुमार गांगडा यांनी भारतीय वैद्यकशास्त्राचा इतिहास किमान ऋग्वेदाइतका जुना कसा आहे, हे पटवून देणाऱ्या डॉ. थिटे यांच्या पुस्तकाचे परिक्षण केले आहे. वैदिक साहित्य, महाकाव्ये, पुराणे, अभिजान संस्कृत साहित्य इत्यादीमध्ये अनेक वैद्यकिय संदर्भ असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर बौद्ध साहित्यातही वैद्यकिय विचार आल्याचा उल्लेख केला आहे. भारतीय वैद्यकशास्त्र किंवा आयुर्वेद यांची निर्मिती आणि विकास एकाच व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने केली नसून अनेक पिढ्यांच्या कर्तृत्वाचा तो परिणाम असल्याचे नमूद केले आहे.

डॉ. थिटे यांनी संस्कृतमधील आयुर्वेदिय ग्रंथामध्ये आढळणाऱ्या विविध लोकभ्रम, अंधश्रद्धांवर टाकलेला प्रकाश हा ग्रंथातील सर्वात महत्वाचा भाग असल्याचे म्हटले आहे. या ग्रंथाचे महत्व असे की त्यात प्राचीन भारतीय समाजाच्या विचारसरणीवर एका वेगळ्या क्षेत्राच्या अभ्यासाने प्रकाश टाकला आहे.

'अब्राम्हणी साहित्यातील एक महत्वपूर्ण भर' या लेखात नीरज साळूंखे यांच्या दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र या पुस्तकांमुळे बहुजनांची संस्कृती हराप्पा संस्कृती सिंधू संस्कृती यांचे पदर हळूहळू उकलून आमची भाषा, कला, संस्कृती, वंश, कुळचिन्ह ठळकपणे समोर आले. 'निर्ऋती' या कृषक संस्कृतीच्या भूमी देवतेची ओळख करुन दिली आहे. त्याची पार्श्वभूमी स्पष्ट

करुन सांगितली आहे. नीरज साळुंखे यांनी मूळनिवासी हराप्पांजनांच्या इहितासाच्या संदर्भात एक मुलभूत मुद्दा सांगितला आहे. मुळ निवासी भारतीयांना स्वत:चा इतिहास लिहिण्याचा कोणताच शास्त्रीय मार्ग शिल्लक ठेवला नव्हता. निर्ऋती एक प्रमुख जलदेवता होती. जलदेवता साती आसरासाठी परडी सोडली जाते. ज्या जागेवर ही 'परडी' भरायची ती जागा सारवून किंवा पुसून घेतली जाते. त्यावर पिठाने प्रथम वर्तुळ काढले जाते. त्या वर्तुळात अधिक चिन्ह काढले जाते. आणि नंतर पाच दगड ठेवले जातात. 'परडी' हा एक प्रकार निर्ऋतीसाठी द्यावच्या बळी प्रथेचा अवशेष आहे. अशा प्रकारे ज्याला आपण अंधश्रद्धा म्हणून हिणवतो, तो सारा प्रकार आपल्याला पूर्व संस्कृतीचा ओळख करुन देणारा आहे.

'भारतीय संगीत : स्वरुप आणि प्रयोजन' या लेखात शुभांगी बहुलीकर यांनी श्री. कृष्णचंद्र झाने यांच्या 'भारतीय संगीत : स्वरुप आणि प्रयोजन' या पुस्तकातील संगीत विषयक प्राचीन संस्कृत आणि आधुनिक ग्रंथामधून संगीताच्या स्वरुपाविषयी आणि आधुनिक ग्रंथामधून संगीताच्या स्वरुपाविषयी आणि प्रयोजनासंबंधी जी मते व्यक्त झालेली आहेत, त्याचा मागोवा घेऊन त्यांची चर्चा केली आहे. संगीतकलेचे आशय दृष्य ध्वनीच अर्थातच सांगितिक ध्वनीचे आहे. तिला दीर्घकालीन परंपरा लाभलेली आहे, पण परिभाषा प्राचीन ग्रंथात लाभलेली नाही, ती परिभाषा कशी करता येईल, याचा विचार लेखकाने योग्यप्रकारे केला आहे. भारतीय अभिजात संगीताचे डॉ. वामनराव देशपांडे यांना अभिप्रेत असलेले घटक स्वर, लय, बंदिश आणि स्वरात्रित भावना हेच लेखकालाही योग्य वाटतात. त्यामुळे लेखकाने त्याचे समर्थन केल्याचे शुभांगी बहुलीकर यांनी म्हटले आहे.

'संगीताचा न संपणारा शोध' या लेखात वि. रा. आठवले यांनी वामनराव देशपांडे यांच्या 'आलापिनी' या पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले आहे. संगीताच्या तालमीला वामनराव देशपांडे यांनी सुरुवात केल्यापासून वेगवेगळ्या कलावंताशी सहवास झाला, त्यांच्या स्वत:च्या सांगीतिक सौंदर्यदृष्टीवर त्यांचा प्रभाव पडला, त्यांच्याबद्दल वेळोवेळी त्यांनी जे लिखाण केले, त्या लेखांचा एकत्रित संग्रह म्हणजे आलापिनी सौंदर्याचा शोध घेण्याची एक विशिष्ट दृष्टी ठेवून, सहवासात आलेल्या कलावंताच्या कलागुणांची भावुकतेने आणि आपुलकीने चर्चा करणारे हे पुस्तक आहे.

कलावंतांच्या व्यक्तिगत आठवणी यात असल्या तरी त्या आठवणीतून कलावंताच्या सांगीतिक जीवनावर त्यांच्या सांगीतिक कलामूल्यांवर प्रकाश पडेल, अशा दृष्टीने वामनरावांनी ठेवली आहे म्हणून संगीत रसिक वाचकांना खूप आकर्षण आणि विचार करायला प्रेरक होईल, असे आठवले यांनी म्हटले आहे. अत्यंतिक गुरुभक्ती, आदर्श वाटणाऱ्या कलावंताविषयी नितांत आदर, समकालिनाविषयी वाटणारा स्नेहभाव व पुढील पिढीबद्दल प्रेम अशा वेगवेगळ्या भूमिकेतून हे लिखाण झाले आहे. वामनरावांचे हे पुस्तक आलापिनी हे नाव सार्थ करणारे आहे. कारण राग विस्तारात नाही तरी आलाप हे भावना उद्‌दीपित करण्यासाठीच असतात. वामनरावांच्या सौंदर्यदृष्टीचा आणि विचारांचा ‘अर्क’च जणूकाही या पुस्तकात लेखत रुपाने ठेवला आहे, असे आठवले यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

‘महाराष्ट्र आणि भारतीय संगीत’ या लेखात अशोक रानडे यांनी महाराष्ट्रातील कलावंतांनी भारतीय संगीतात काय भर घातली यांचे मूल्यमापनात्मक वर्णन केले आहे. ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर, किराणा या घराण्यांची माहिती व मूल्यमापन, सुगम संगीताचे मराठी अवतार, महाराष्ट्रीयांचे संगीत संशोधन, महाराष्ट्रातील नाट्यसंगीत, आद्य संगीत प्रचारक पंडित विष्णू दिगंबर याविषयी सखोल माहिती दिली आहे, या पुस्तकाचा सर्वात मोठा दोष म्हणून माहितीतला अपूरापणा असल्याचा निर्देश अशोक रानडे यांनी केला आहे.

‘डॉ. श्री. व्यं. केतकर यांचे वाङ्मयविषयक लेख’ या लेखात पां. वा. गाडगीळ यांनी त्यांच्या वाङ्मय विषयक लेखांचे मार्मिक परीक्षण केले. त्याचबरोबर त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठीच्या वैचारिक जगात जे भूकंप केले त्यावरुन केतकरांच्या बौद्धिक व कलात्मकतेचे थोरवी स्पष्ट होते. केतकरांच्या कादंबऱ्याविषयी व दि. कुलकर्णी म्हणतात, ‘‘केतकरांच्या कादंबऱ्या म्हणजे देव न मानणाऱ्या पण श्रेष्ठ नितिमूल्ये पाळणाऱ्या एका सरळ आणि प्रामाणिक अंत:करण प्रवृत्तीच्या, समाजशास्त्राच्या दिव्यचक्षूत पडलेले समाजाचे प्रतिबिंब आणि त्यावरील उघडे भाष्य होय.’’[३१]

प्रसंग रुपाने जे वृत्तपत्रीय लेखन वा. रा. सोनार यांच्याहातून घडले, त्याचा संग्रह म्हणजे ‘मरुद्‌गान’ या सर्व लेखनाला जीवनानुभवांना स्पंदनांचे रुप लाभल्याचे वि. भा. देशपांडे यांनी

'मरुदंगान' या परीक्षणामध्ये स्पष्ट केले आहे. जीवनानुभवांचा तळ शोधणारे लेखन कृत्रिम शब्दांमध्ये फार काळ अड्कून राहूच शकत नाही. विशुद्ध अनुभवांचे चित्रण करीत असताना त्या भाषेला एक सहज ओघवतं रुप प्राप्त होते तसे ते सोनारांच्या लेखनाला लाभलेले आहे, असे मरूदंगान बद्दल देशपांडे यांनी म्हटले आहे.

'तितिक्षा' या परीक्षणामध्ये शामला वनारसे यांनी मुलं बहिरे आहे हे लक्षात आल्यापासून त्याच्या बौद्धिक विकासक्रमातील प्रत्येक पाऊल कसे उचलावे हे साध्या संवादांच्या प्रसंगांच्या आधारे सांगितले आहे. बहिऱ्या मुलाच्या अनुभवाचे स्वरुप, त्याच्या सामाजिक व्यवहारातील अड्चणी त्यांचा दुरावा, त्याला मनातले सांगता येत नसल्याने वाटणारे वैफल्य, चीड या सर्व गोष्टी समजावून घेणे हेच बहिऱ्या मुलांच्या पालकात्वाचा पाया असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

'ललित लेणी' या लेखात संभाजी कदम यांनी डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या एकूण आठ निबंधाचे मार्मिक परीक्षण केले आहे. यातील 'कृष्ण', 'पावित्र्य आणि स्त्री पुरुष संबंध', 'दिल्ली', 'अथयोगानुशासनम्' मधील चिंतनाचा ओघ अत्यंत लयबद्ध भावना–विचार–कल्पना यांचा एकजीव येथे झालेला दिसतो. लोहियांच्या निबंधात सामाजिक चिंतन प्रामुख्याने आहे. कोणताही विषय हाताळताना त्याचा सामाजिक पाया ते प्रथम तपासतात. 'पावित्र्य आणि स्त्री पुरुष संबंध' या निबंधात योनि शुचितेच्या तत्वाचा समाजाने अतिरेक केल्यामुळे स्त्रीच्या नशीबी कायमची सामाजिक गुलामी कशी आली या मुद्यावर त्यांनी भर दिला आहे. गुलामीत दड्पली गेलेली स्त्री स्वतंत्र झाल्याशिवाय समाजामध्ये जिवंतपणा येणार नाही, हा त्यातील महत्वाचा विचार समाज तेजस्वी व्हायचा तर त्याचे मातृत्व, पितृत्व करणाऱ्या शक्तीसुद्धा तेजस्वी व्हायला हव्यात. नुसते पित्याने पराक्रमी होणे आणि मातेने मानसिक दुर्बलता भोगणे याने समाज शक्तिमान होणे कठीण.

'मराठी विचारवंताचे आत्मसंशोधन व समर्थन' या लेखात म. दा. हातकणंगलेकर यांनी परिवर्तनामध्ये विचारवंताचे योगदान स्पष्ट केले आहे. विचारवंतांच्या विचारांचा परिप्रेक्ष्य हा समाजसापेक्ष असतो. व्यक्ती व समाज या घटकांतील सर्व व्यवस्थांचा अभ्यास तो करतो, त्यामुळेच विचारवंताच्या व्यक्तिमत्वाला सामाजिक मूल्य प्राप्त होते.

समाज परिवर्तनाच्या अग्रस्थानी विचारवंतांनी राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे कारण विचारवंतांचे सामाजिक स्थान हे मार्गदर्शक ताऱ्याप्रमाणे आहे असे त्यांना वाटते. मधु पानवलकर यांना विचारवंत हा समाज, शासन यांची सद्सद् विवेकबुद्धी जागृत राखणारा भविष्य काळाचा वेध घेऊन दूरगामी विचार समाजाला देणारा, नित्य बदलत जाणाऱ्या परिस्थितीचे अनुसंधान राखून, त्या परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने नव्या कल्पना समाजाला व शासनाला देणारा घटक असला पाहिजे असे वाटते. ज्या समाजात मोठी स्थित्यंतरे चालू आहेत व कसोटी पाहणारी संक्रमणावस्था मार्गी लागली आहे, अशा समाजात व काळात विचारवंतांनी आपली भूमिका ही महत्वाची व निर्णायक समजली पाहिजे. किंबहुना विचारवंतांच्या निखालस व विधायक कर्तृत्वाचा काळ तो हाच.

'मानवाचे भवितव्य' या लेखात ल. ब. हरोळीकर यांनी 'आरनॉल्ड टॉयन्बी' यांच्या 'सरव्हायव्हिंग द फ्यूचर' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. मानवाचे भवितव्य कसे धोक्यात आले आहे ते स्पष्ट करतात. आधुनिक मानवी जीवन एखाद्या दोरावरुन वाटचाल करण्यासारखे अस्थिर, दोलायमान झाले आहे. अशा–निराशा, भले–बुरे, शुद्ध–शांतता, बुद्धिभावना, आदर्शवास्तव यांमधील विग्रहामुळे आजचा मानव चिंताव्यग्र, अस्वस्थ, कातर झाला आहे. येत्या काही वर्षात मानवापुढे काय वाढून ठेवले आहे, त्याचे भवितव्य काय आहे, मानवी मूल्यांचे जतन व संवर्धन करणे यापुढे मानवाला शक्य होईल काय? या चिंतेने तो विकल झालेला आहे. विवेक व सुविचार यांची सर्वत्र पिछेहाट होताना दिसत आहे. मानवी जीवनाला स्थैर्य व प्रतिष्ठा देणाऱ्या कुटुंबासारख्या सामाजिक संस्थांची पडझड झालेली आहे. सामाजिक–परिवर्तनाच्या प्रचंड वेगामुळे मानवजातीचा तोल सुटत आहे. तंत्रविज्ञानामुळे मानवजातीचा स्वाभाविक निसर्गपरिसर नाहीसा होत आहे आणि त्याऐवजी त्यानेच निर्मिलेल्या कृत्रिम अस्वाभाविक परिस्थीच्या पिंजऱ्यामध्येच अडकून पडलेला दिसतो. मानवी जीवनाची वाटचाल दिशाहीन झालेली दिसत आहे. विचारी मानव आज भांबावून गेला आहे आणि काय करावे व काय करु नये याचा विवेक करणे त्याला कठीण झाले आहे.

पहिल्या संवादात आधुनिक मानवाच्या जीवन हेतुंचा विचार मांडला आहे. औद्योगिक

क्रांती व तंत्रविज्ञान यामुळे जुन्या मध्ययुगीन शेतीप्रधान ग्रामीण समाजाचे रूपांतर आता विशाल, शहरी, औद्योगिक समाजात होत आहे. समाजाचा आकार व परिवर्तनाची गती झपाट्याने वाढत आहे. या नव्या संदर्भात मानवी जीवनाचे प्रधान हेतू काय असावे हे पुन्हा एकदा स्पष्ट होणे आवश्यक आहे. आजच्या मानवाचे ध्येय काय असावे, त्याने कोणती जीवनमूल्ये मानावीत? टीयन्बी यांच्या मते, आधूनिक मानवाने प्रेम, सामंजस्य आणि नवनिर्माण हेच प्रधान जीवन हेतू मानणे इष्ट होईल. त्याचसाठी त्याने आपली बुद्धी व शक्ती वापरावी. त्यातच त्याच्या जीवनाचे साफल्य होईल. प्राचीन काळापासून मानव आपल्या बुद्धीकौशल्याने आपल्या निसर्गपरिसरामध्ये अनुकूल बदल घडवून आणीत आहे. ही प्रक्रिया आजही जोमाने चालली आहे. तथापि काही परिस्थितीमध्ये नवनिर्माण ही दिशाहीन व मानवहिताविरोधी ठरू शकते. यासाठी निर्माण शक्तीला विवेकाची जोड मिळाली पाहिजे अशा प्रकारे हरोलीकर यांनी टॉयन्वी यांचे मानवाच्या भवितव्याविषयीचे मूलगामी विचार स्पष्ट केले आहेत.

अशा प्रकारे 'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, अर्थविषयक, सांस्कृति, वैचारिक ग्रंथपरीक्षणांचे स्वरूप विविधांगी असल्याचे दिसते. विचारधनाची सुसंगत मांडणी वैचारिक साहित्य करीत असते. वैचारिक साहित्यात विचाराला मोठे प्राधान्य असते. वैचारिक साहित्य पद्यापेक्षा गद्यात अभिव्यक्त होत असल्यामुळे काव्यमय भाषेचा डौल त्यात तितकासा दिसत नाही. 'समाज प्रबोधन पत्रिके' ने या वैचारिक ग्रंथ परीक्षणाच्या माध्यमातून समाजात विचारांची बिजे पेरली आहेत. समाजाला–वाचकाला विचार प्रवण करून कृतीप्रवण व्हायला ही वैचारिकता नक्कीच मार्गदर्शक ठरेल असे वाटते.

**निरीक्षणे–**

- सामाजिक समस्यांची उकल हा हेतू वैचारिक साहित्याचा असल्याचा स्पष्ट होतो. समाजामध्ये सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात विविध समस्या निर्माण होत असतात. त्याविषयी समाजात संभ्रमावस्था असते. त्यावेळी या समस्यांची उकल करून त्यांच्या निर्मूलनाची वैचारिक पाश्वभूमी निर्माण करण्याचा 'पत्रिके'चा हेतू स्पष्ट दिसतो.

- वैचारिक ग्रंथपरिक्षणातून समाजचिंतन, जाणीव जागृती, विचार जागृती प्रामुख्याने जाणवते.
- वैचारिक ग्रंथपरिक्षणामध्ये प्रबोधन आणि सामाजिक सुधारणा यांना प्राधान्य असल्याचे दिसते.
- वैचारिक साहित्यातील सामाजिक आशयनिष्ठ या प्रकारात सामाजिक प्रश्नांविषयी मांडणी केल्याचे दिसते. त्यामध्ये कुटुंब, संस्था, जातिसंस्था, वंचित वर्ग इ. घटकांचा विचार केला आहे.
- धर्मचिंतन हे वैचारिक साहित्याचा गाभा आहे. हिंदू–मुस्लिम ऐक्य, मुस्लिम समाजाची फुटीरतावादी वृत्ती, मुस्लिम धर्मचिकित्सा यांच्या अनुषंगाने विचार मांडले आहेत.
- वैचारिक साहित्याची भूमिका आर्थिक विकास करण्याची आहे.त्याचबरोबर आर्थिक समता, प्रस्थापित व्हावी हा हेतू स्पष्ट होतो.
- वैचारिक साहित्य समाजसापेक्ष असल्याने सांस्कृतिक विचार महत्त्वाचे मानले गेले. त्यामध्ये साहित्यविषयक, कला, संगीत विषयक परीक्षणे अहोत. उदा. इरावती कर्वे,द.ग.गोडसे
- मुस्लिम समाजमानस घडविण्याऱ्या कोणत्या विचारधारा आहेत त्याविषयी अ.भि.शहा,वसंत पळशीकर, रा.भि.जोशी, भास्कर भोळे यांनी विचार मांडून त्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या असलेल्या मागसलेपणा समाजवून घेण्याचा प्रयत्न दिसतो.
- आजच्या शिक्षणाने राष्ट्रीय वृत्ती आणि राष्ट्रीय एकात्मता याची जाणीव करून दिली पाहिजे याविषयीचे विचार ‘पत्रिके’मध्ये मांडलेले आहेत.
- लोकशाहीच्या विकासासाठी विद्यापीठांचे स्वातंत्र्य आणि प्राचार्यांचे नेतृत्व अत्यंत महत्वाचे असल्याचे वसंत पळशीकर, भा.शं.भणगे यांनी म्हटले आहे.
- विषमतामूलक आर्थिक व्यवस्थेला बदलण्याची, त्याची पुनर्रचना करण्याची भूमिका वैचारिक साहित्यात मांडली असल्याचे दिसते.

- भारतीय नियोजनासंदर्भात का.म.गावस्कर यांनी मांडलेले विचार भारतीय नियोजनाला दिशा देणार आहेत. नियोजनावर प्रभाव टाकणाऱ्या राजकीय शक्तीच्या, घटकांचा त्यांनी परामर्श घेतला आहे.
- राजकीय विचार हा वैचारिक साहित्यातील महत्त्वाचा घटक आहे.भारतीय लोकशाहीला अंधधर्मश्रद्धेचे आव्हान नसून राजकारण्यांच्या महत्त्वकांक्षेचे असल्याचे वसंत पळशीकरांनी स्पष्ट केले आहे.
- सांस्कृतिक परीक्षणात दलित साहित्य, आदिवासी साहित्य, भारतीय संगीताचे स्वरूप, वैदिकशास्त्र याविषयी विवेचन आढळते. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र, केशवसुतांची काव्यदृषी याविषयी श्री. मिलिंद मालशे आणि गो.मा.पवार यांनी मार्मिक भाष्य केले आहे.
- वैचारिकतेतून सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादीमध्ये बदल घडवून त्या व्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर दिसतो.

ललित साहित्य कृतींवरील मार्मिक, चिकित्सक परीक्षणांप्रमाणेच वैचारक ग्रंथावरील विस्तृत परीक्षणेही प्रसिद्ध झाली आहेत. काही परीक्षणे अत्यंत सखोल आणि परखड आहेत. प्रामाणिक आणि सुस्पष्ट आहेत. साहजिकच अभ्यासकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत. विविध वैचारिक ग्रंथांची परीक्षणे करणता परीक्षकांनी काही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या आहेत. त्या अशा वैचारिक ग्रंथामधील विवेचनामागे असलेली साहित्यविषयक नि:संदिग्ध भूमिका, विवेचनातील अंतर्गत शिस्त व सुसंगती, अभ्यासपूर्णता, नवे विचार व नव्या उपपत्ती, उचित परिभाषा या गोष्टी समोर ठेऊन त्या त्या ग्रंथाचे स्वरूप समाजवून घेत त्याच्या ग्रंथाचे योग्य व वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची एकेक परीक्षण पद्धती 'पत्रिके'तील परीक्षणकर्त्यांनी निर्माण केलेली दिसते. वैचारिक ग्रंथाच्या तसेच संपादित ग्रंथांच्या परीक्षणांबाबतीत हे स्पष्टपणे जाणवते. या परीक्षणपद्धती मूल्याधिष्ठित आणि वस्तुनिष्ठ असल्यामुळे त्या त्या स्वरूपाच्या कोणत्याही वैचारिक ग्रंथांचे मूल्यमापन करण्यास उपयुक्त ठरतील अशा आहेत. अशा परीक्षण पद्धती निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य 'पत्रिके'केतील परीक्षण कर्त्यांनी केले असल्याचे दिसते.

**संदर्भसूची:–**


| | | |
|---|---|---|
| १. | वसंत पाटणकर: | 'साहित्यशास्त्र'स्वरूप आणि समस्या, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्र.आ.२००६, प्र.कृ.८. |
| २. | डॉ. निळकंड शेरे: | 'डॉ. आंबेडकर आणि दलित वैचरिक साहित्य', सुविधा प्रकाशन, पुणे प्र.आ.२००५, पृ.क्र.३०. |
| ३. | रा.ग.जाधव: | साहित्य आणि सामाजिक संदर्भ, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, तृतीय आवृत्ती–२००३, पृ.क्र.१. |
| ४. | ENCARTA | World English Dictionary Machmillan Publication, India, First Ed. 1999, Page, 1287. |
| ५. | यशवंत मनोहर: | 'निबंधाकार डॉ. आंबडेकर' संघामित्र बुद्धाहाऊस प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१९८८, प्र.क्र.२. |
| ६. | जनार्दन वाघमारे: | 'समाजपरिवर्तनाच्या दिशा' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९५, पृ.क्र.४७. |
| ७. | जनार्दन वाघमारे: | तत्रैव,पृ.क्र.४७–४८. |
| ८. | वा.शि.आपटे | 'दि स्टुडंट संस्कृत–इंग्लिश डिक्शनरी मोतीलाल बनारसीदार प्रकाशन, दिल्ली. दु.आ.१९७०,प्र.क्र.५०८. |
| ९. | मनोहर जाधव(संपा.) | 'साहित्य: शोध आणि संवाद' सुविधा प्रकाशन, पुणे,प्र.आ.२०००,पृ.क्र.१२०–२१. |
| १०. | श्री.पु.भागवत व इतर (संपा.) | 'साहित्य, अध्यापन आणि प्रकार' मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८९, पृ.क्र.१५१. |
| ११. | जनार्दन वाघमारे: | उनि,प्र.कृ.४. |
| १२. | अरूण सारथी: | भारतीय लोकशाही: शोध आणि आव्हाने, रविराज प्रकाशन, पुणे, २००८, प्र.कृ.५७. |

१३. डॉ. राजेखान शानेदिवाण: भारतीय मुसलमान: वर्तमान आणि भविष्य. निर्मिती विचारमंच कोल्हापूर, प्र.आ.२००८, प्र.कृ.५०.

१४. निर्मलकुमार बोस: द.स्ट्रक्चर ऑफ हिंदू सोसायटी, ओरिएंट लॉगमन, प्र.क्र.१६५.

१५. प्रा.रमेश पानसे: नयी तालीम, गांधीप्रणित शिक्षण विषयक प्रयोगाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ.२००७, प्र.कृ.६५.

१६. जे.पी.नाईक: 'एज्युकेशन इन दि फोर्थ प्लॅन' नचिकेत पब्लिकेशन्स, १९६८, प्र.कृ.१०४.

१७. व्ही.व्ही.जॉन: फ्रीडम टू लर्न, विकास, न्यू दिल्ली, प्र.कृ.१७.

१८. स.मा.गर्गे(संपा.): समाज विज्ञान कोश, खंड–१, समाज विज्ञान कोश मंडळ, पुणे, प्र.आ. १९९६, प्र.कृ.८८.

१९. एम.व्ही.नामजोशी: मोनॉपलीज इन इंडिया, ललवाणी पब्लिशिंग हाऊस, मुंबर्स,१९६६, प्र.कृ.७.

२०. बी.आर.शेनॉय: इंडियन इकॉनॉमिक पॉलिसी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८, प्र.कृ.३९.

२१. ए.के.पटवर्धन: आर्थिक विकासाच्या सामजिक बाजू अंक १०६, १०७, १०९, जुलै–डिसेंबर, समाज प्रबोधन पत्रिका, १९८२ प्र.कृ.२७९.

२२. क्रेटन लॅसी: इंडियन इनसाईटस्: पब्लिक इश्युज इन प्रायव्हेट परस्पेक्टिव्हज ओरिएंट लॉगमन, लि. नवी दिल्ली, १९७२, प्र.कृ.३२८.

२३. नी.वि.सोवनी: 'आपल्या आर्थिक विकासाची समस्या' नागपूर विद्यापीठ, नागपूर, प्र.कृ.६३.

२४. शांताराम मोगले: राजकीय संकल्पना, सिद्धांत आणि संस्था, विद्याभारतीय प्रकाशन, लातूर, प्र.आ.१९९७, प्र.कृ.१.

२५. झुल्फिकार आणि भुट्टो: द मिथ ऑफ इंडिपेडन्स ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६९, प्र.कृ.१६२.

२६. नरहर कुरूंदकर: 'जागर'देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६९, प्र.कृ.२५०.

२७. डॉ.भालचंद्र फडके: डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.१९८९, प्र.कृ.९६.

२८. प्रा.मनोहर जाधव (संपा.): 'साहित्य', शोध आणि संवाद' सुविधा प्रकाशन, पुणे २०००, प्र.कृ.१२०.

२९. म.गं.नातू: 'वेदनेचा वेध' अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र.कृ.१४०.

३०. डॉ.उषा कोटबागी: इरावती कर्वे: व्यक्ति आणि वाङ्मय, पद्मगंधा प्रकाशन, प्र.आ.२००५, प्र.कृ.५५.

३१. व.दि.कुलकर्णी: सरस्वतीच्या सान्निध्यात, पद्मगंधा प्रकाशन, प्र.आ.२००७,प्र.कृ.५१.

# प्रकरण चौथे

# ‘समाज प्रबोधन पत्रिके’तील वाङ्मय प्रकार निहाय ग्रंथपरिक्षणे स्वरुप

# प्रकरण चौथे

## 'समाज प्रबोधन पत्रिके'तील वाङ्मय प्रकार निहाय ग्रंथपरिक्षणे स्वरुप

या प्रकरणामध्ये 'समाज प्रबोधन पत्रिके' मधून कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मचरित्र, प्रवासवर्णन इत्यादी वाङ्मय प्रकारांमध्ये जी ग्रंथपरीक्षणे झाली त्याचा आढावा घेतला आहे. एखाद्या महत्वाच्या पुस्तकाचा परिचय करुन देणारी, त्यांच्या गुणदोषाची चर्चा करणारी, त्यांच्या वाङ्मयीन गुणांचा आस्वाद होणारी परीक्षणे मराठीत प्रारंभापासूनच केली जात होती. तीच परंपरा 'समाज प्रबोधनपत्रिके' ने पुढे चालू ठेवली आहे.

*** कविता संग्रहावरील परीक्षणे :–**

निरनिराळ्या प्रकृति वैशिष्ट्यांच्या कविता संग्रहांचे एकत्रित समालोचन 'पत्रिके' मध्ये पाहायला मिळते. रसिक–वाचक ह्यांच्या दृष्टीने आवश्यक अशीच घटना आहे. त्यामुळे केवळ कवीच्याच नव्हे तर वाचकांच्याही कवितेच्या स्वरुपासंबंधीच्या काव्यानिर्मिती संबंधीच्या कल्पना स्पष्ट होतात. कवीची काव्यलेखनामागील भूमिका आणि त्यांच्या कवितेचे स्वरुप त्यांच्या कवितेवरुन आजमावण्याचा प्रयत्न होतो. बहुविध काव्यविशेषांच्या एकत्रित आकलनाने कवीच्या काव्यविषयक समजूतीचे प्रत्यंतर 'समाज प्रबोधन पत्रिके' ने वाचकांना दिले.

*** बोरकरांच्या काव्यातील एकसंघता :–**

बा. म. बोरकरांच्या 'चैत्रपुनव' या कवितासंग्रहाचे परीक्षण गो. ग. कुलकर्णी यांनी केले आहे. बोरकरांच्या कवितेची जडणघडण ही खास तिची आहे. रसिकांच्या अपेक्षा, तक्रारी किंवा बदलत्या काळातील काव्याभिरुची ध्यानात वागवून बोरकरांची कविता आपले अंगोपांग घडवित नाही. आपल्याच नादात मश्गुल होऊन ती अवतरते म्हणूनच की काय तिचे असे वेगळे व्यक्तिमत्व आपणाला जाणवते. विशेषत: गेल्या सुमारे तीस–चाळीस वर्षातल्या मराठी कवितेत दृष्टीस पडणाऱ्या विविध प्रवृत्ती आणि रसिक–वाचक ह्यांची बदलत गेलेली काव्याभिरुची ह्यांच्या पार्श्वभूमीवर बोरकरांच्या कवितेचे साकल्याने अवलोकन करुन तिच्या व्यतिमत्वातील एकसंघता वाचकांच्या नजरेस कुलकर्णी आणून देतात.

बोरकरांची कविता ही द्वितीय महायुद्ध पूर्वकालीन मराठी कवितेचे प्रतिनिधित्व करते.

त्यामुळे त्यांच्या कवितेमधून जीवनावरील उदात्त मूल्य कल्पनांवरील अढळ श्रद्धा तिच्यातून व्यक्त होते. दिव्यत्वाची प्रचिती देणारी काही पूजास्ताने तिच्यासमोर होती आणि त्यामुळे ती विनम्रभावाने कर जुळवीत असे. तरुवेली, निर्झरा, चंद्र–तारका, उषासंध्या ह्यांच्या आठवाने किंवा त्यांच्या दृश्यमानतेमुळे ती धुंद होऊ शकत असे. त्या धुंदीतच मी निसर्गाची रमणीय शब्दचित्रे रेखाटत असे 'चैत्रपुनव' मधील कविता ह्याच स्वभाव वैशिष्ट्यांचा सुखद प्रत्यय देते. निसर्गाच्या रुपरसगंधाची, त्याच्या विविध रंगाची शब्दचित्रे रेखाटण्यात बोरकरांची प्रतिभा मन:पूर्वकतेने समरसून जाते. उपमा–रुपकादी अलंकरण, चेतणीकरण, तृप्ततेचा–कृतार्थतेचा किंवा जीवास भागली पराणी लागल्याचा भावस्पर्श ह्यासारख्या धाग्यांनी ही साधलेली असते. त्यामुळे बोरकरांची निसर्ग कविता रुपाने देखणी अशी कवितांतून व्यक्त झाली आहे, असे निरीक्षण गो. ग. कुलकर्णी नोंदविले आहे.

बोरकरांच्या संतृप्त मनोभूमीतून आस्तिक्य बुद्धीचा, लौकिकातीताबद्दलच्या श्रद्धाशीलतेचा कौभ फुटलेला दिसतो. थोडक्यात 'चैत्रपुनव' मधील साऱ्या कवितांकडे साकल याने पाहिल्यास त्यात गहिरी निसर्गप्रीती, प्रसन्न आशावाद आणि जीवन विकास श्रद्धाशीलता ह्यांचे अंत:प्रवाह खळाळत असल्याचे आढळून येत असल्याचे सांगितले आहे. बोरकरांची कविता वाचीत असताना येणारा हा प्रत्यय आणखी बारकाईने तपासण्याची निकड अधोरेखित केली आहे. विशेषत: नवकवितेने निर्माण केलेल्या विशिष्ट वातावरणाने तर बोरकरांच्या कवितेची संघटना सूत्रे अधिक खोलात जाऊन न्याहाळण्याची जाणीव तीव्र तर होते असे स्पष्ट करुन सांगितले आहे. बोरकरांच्या कवितेतील शब्दार्थ हे स्थिर वाव्यार्थ असतात. बोरकरांच्या कवितेतील निसर्ग, प्रीती, आदर्श, श्रद्धा यांच्या वास्तवाची जाणीव भावना विचाराच्या ठराविक स्थिर आशयातून व्यक्त होते. ''बाल कवीप्रमाणे निसर्गाला स्वत:चे अस्तित्व स्वत:साठी असते आणि त्यांच्या कोमल भावनेचे आपण फक्त साक्षीदार व्हावयाचे असते अशी बोरकरांची भावना नाही''[१]

बोरकरांची जीवन जाणीव भावना–विचाराच्या ठराविक आशयाला ओलाडून त्यांच्या गतिमानतेपर्यंत, त्यातील सूक्ष्म, तरल संवेदनापर्यंत पोहोचू शकते असे मात्र सतत वाटत राहते. त्यामुळे त्यांच्या कविता सृष्टीत भावस्पंदनाची कोवळीक आणि ताजेपणा प्रत्ययाला येत नसावा

मात्र ‘चैत्रपुनव’ मध्ये जी आशय अभिव्यक्ती आढळते तिच्यात एक चांगल्या प्रकारचा सुसंगती प्रतीते असे परीक्षणात्मक आभिप्रायात म्हटले आहे. बोरकरांच्या कवितेविषयी सरदेसाई लिहितात, ‘‘ही कविता खास बोरकरी शैलीची आहे. हे एक उत्कृष्ट ‘लरिक’ आहे. यात बोरकरांची गेय काव्यशैली, पारलौकिकाची काव्यात्म ओढ, रचनेतील गोडवा, कलंदरवृत्ती, गूढता, लय सर्व काही आहे.’’[२] ही कविता स्वत:शी प्रामाणिक असल्याचा सुखद अनुभव देते म्हणूनच ती सुसह्य, नव्हे प्रसन्न ही वाटते.

*** सामाजिक विषमता आणि क्रांतिकारी साम्यवादी विचार :–**

‘सूर्याला साक्षी ठेवून’ ह्या शिवराम देवलकरांच्या कवितासंग्रहाचे गो. ग. कुलकर्णी यांनी परीक्षण केले आहे. देवलकरांची कविता सामाजिक विषमता आणि क्रांतिकारक साम्यवादी विचार व्यक्त करणारी आहे. त्यातल्या आकलनात भाव आवेशातही एक प्रकारचा नवथरपणा आढळतो असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. त्याचबरोबर देवलकरांची कविता पौंगडावस्था सुलभ नूतन पण खऱ्या उत्साहाने भरलेली आणि भारलेली असल्याचे त्यांनी सांगीतले आहे.

बहुतेक ह्या नवोत्साहामुळेच देवलकरांनी कवितेसंबंधीची काही भाबड्या कल्पना करुन घेतल्या आहेत असे त्यांना वाटते. तारुण्यात प्रत्येक माणूस कवी असतो, असे देवलकरांना वाटते. साहित्याला ते समाजाचा आरसा मानतात आणि सर्वसामान्य लोकांविषयी आपुलकी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्धांचा संताप काव्यामध्ये आणणे हे कधी वास्तववादी व प्रागतिक असल्याचे ते गमक सांगतात. देवलकरांच्या आजुबाजूच्या सामाजिक अन्यायाचा आणि सामान्य जनांबद्दल त्यांना वाटणाऱ्या आपुलकीचा जो अविष्कार त्यांच्या कवितेत झालेला आढळतो. तो बराचसा विचाराच्या पातळीवर झालेला आहे, हे मत उद्‌धृत करतात. तसेच देवलकरांच्या काव्यविष्कारात उपरेपणा येतो  आणि त्यांचा आवेश उसना वाटतो. कारण त्यांच्या काव्याशयाचा उगम खास त्यांच्या अशा जीवनानुभूतीत होत नाही. आपुलकी, संतापाचे स्वत:चे असे ताणे–बाणे न्याहाळण्याचा आणि त्याचीच केवळ अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न करताना ते आढळत नाहीत. तर आपुलकी–संतापाच्या आशयाचे बहुपरिचित साचेच शब्दबद्ध करताना ते दिसतात, याची परखड नोंद कुलकर्णी यांनी घेतली आहे.

देवलकरांची काव्याभिव्यक्तीदेखील काही मोहांना कशी पडलेली आहे. 'माझी गिरणी' त्यांना एखाद्या लठ्ठ बाईसारखी वाटते. पुढे ही उपमा 'चार चाळी' मध्ये फतकल मारुत बसते, 'कौलारी पदर सावरणे', इत्यादीतून विस्तारली जाते. आता चखटीतपणाशिवाय या कल्पना विस्ताराला कोणता भावस्पर्श झालेला आहे? असा प्रश्न उपस्थित करुन देवलकरांची कविता काव्याभिव्यक्ती मोहाला पशी पडल्याचे नमूद केले आहे.

युद्धोत्तर साहित्यात स्त्री लेखिकांनी घातलेली भर लक्षणीय आहे. लेखन पूर्व आणि लेखन गर्भ आत्मनिष्ठेच्या मर्ढेकरप्रणीत सिद्धांतामुळे साहित्यासंबंधीचा लेखक–लेखिकांचा दृष्टीकोन बदलू लागला. स्वानुभूतीशी अविचल इमला राखण्याचा प्रयत्न होऊ लागला. त्यातून अभिव्यक्तीतली उत्कटता आणि अनुभवाची सलगता निर्माण होऊ लागली. स्त्रिया जेव्हा आपल्या अशा भावना, विविध भावावस्था कवितेत व्यक्त करू लागल्या. तेव्हा मराठी कवितेत एक वेगळीच रंगत, एक वेगळीच खुमारी येऊ लागली. अलीकडे दलित साहित्य जसे मराठी साहित्याची खुलावट वृद्धिंगत करीत आहे, तसे स्त्रियांच्या लेखनानेही मराठीच्या साहित्यकक्षा विकास पावत आहेत, असे विवेचन करुन 'अंजली ठकार' यांच्या 'तुलसीदल' या कवितासंग्रहाचे मार्मिक परीक्षण केले आहे.

'तुलसीदल' मध्ये अंजली ठकार यांची कविता त्यांच्या जीवनाबरोबर कशी वाढत, विकसत गेली. तारुण्य सुलभ कल्पना आणि त्यांची तत्सदृश अभिव्यक्ती त्यांच्या पहिल्या–वहिल्या प्रीती कवितात आढळते. पुढे हळूहळू एका बाजूने त्यात वयपरत्वे आशयाची विविधता, तर दुसऱ्या बाजूने ती प्रौढ–गंभीर रुपधारण कशी करते. ठकार यांची कविता स्वानुभूतीशी प्रामाणिक असल्याचे गो. ग. कुलकर्णी नमूद करतात.

लाजऱ्या–बुजऱ्या प्रीतीच्या भावावस्था येथे आपातन निसर्गाच्या प्रतिमांतून व्यक्त होतात. त्यांची मनस्थिती,

'मेघ मौनाचा झरेना, घट तृप्तीचा भरेना

ओठी चातकी तहान... चोच वासली मिटेना' अशी झालेली आहे. ठकारांच्या उदास मनस्थितीचे घटक शोधत असताना कुलकर्णी यांना वाटते की, एका विशिष्ट नियत

जीवनगतीपुढे मनावाला शरण जावे लागते. ह्या हतबलतेमुळे त्यांचे मन उदास झाले असावे, मात्र जीवनाच्या व्यर्थतेतून किंवा कवयित्रीच्या व्यक्तिगत दु:ख, अपयशातूनही उदासीनता निर्माण झाली नाही, असे निरीणण त्यांनी नोंदवले आहे.

'तुलसीदल' मधील प्रियेचं मन हे स्त्रीमन आहे. म्हणून त्या मनाला स्त्रीत्वाच्या जशा मर्यादा आहेत. तद्वतच भावाकुल होऊन बोलण्याची सवय आहे. स्वत:च्या मनामधील चित्र ती फार स्पष्टपणानं आणि तरीही समजूतदारपणानं कोणासाठी तरी रेखाटत असते. आपल्याच मनातील आंदोलनावरती आरुढ होऊन आपल्याच विषमतेचा प्रत्यय घेत असते. 'तुलसीदल' मधील कविता एकाचवेळी मनोगत आणि संवाद ही आहे याची नोंद कुलकर्णी परीक्षणात करतात.

ना. धों. महानोरांची कविता अर्वाचीन मराठी निसर्ग कवितेहून वेगळी कशी आहे, हे गो. ग. कुलकर्णी यांनी आपल्या परीक्षणातून स्पष्ट केले आहे. महानोरांची कविता ही एक निखळ निसर्ग कविता आहे. विविध निसर्गानुभव आणि निसर्गाच्या संदर्भातील कवीचे भावानुभव येथे विशुद्ध स्वरुपात अभिव्यक्त होतात, असे म्हटले आहे.

'वही'तली ना. धों. महानोरांची कविता ही बरीचशी 'रानातली कविता'च आहे. पण ती येथे अधिक नीरस, अधिक पारदर्शक होऊ लागली आहे. तसतसे त्यांच्या संदर्भातील कवीचे निसर्गानुभव त्यांच्या निकटंत्वाची, एकत्वाची जाण होऊन उतरु लागली आहेत. त्यातच स्त्रीसंबंधीचे विविध भावाविष्कार येऊन मिसळतात. या साऱ्यांचे एकात्म संघटन 'वही'तल्या निसर्गानुभवांत अधिक प्रमाणात प्रतीत होत असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

महानोरांचे स्त्रीबद्दलचे आकर्षण वाढल्याची साक्ष 'वही'तील जवळ जवळ सारी कविता देते. ह्या आकर्षणाच्या, प्रेमभावनेच्या अभिव्यक्तीसाठी त्यांनी लावणीचा थाट आणि घाट नवलचा असल्याचे परीक्षणातून स्पष्ट केले.

''देहाला डसले जहर तयाची लहर पेटती ओठी
हा बहर कहर अंगात विकावी रान पाखरांसाठी''

किंवा

''मी ज्वार नवतिचा भार अंग जरतार

ऐन हुरड्यात तुम्ही नका जाऊ साजणा हिवाळी रात''

या सारख्या कवितेतून लावणींचा वास, त्यातून निर्माण होणारा खटकेबाजपणा आणि संभोगसूचक भावनांची मुक्त उधळण यांचे दिलखुलास वर्णन प्रत्ययास येते, पण त्याचेबरोबर महानोरांच्या लावणीवजा कवितेत लावणीचा रांगडेपणा, तिच्यातला अभिरुचीहीन उत्तान शृंगार येत नाही, असे ते सांगतात.

निसर्ग; प्रेमभाव आणि लावणीचा बाज ह्यांच्या हृदयगम मीलनाने ह्या कवितांना एक निराळे लावण्य प्राप्त झाले आहे. महानोरांच्या कवितेविषयी डॉ. दादा मोरे लिहितात, ''महानोरांचा विशेष म्हणजे महानोरांना स्त्री रुपात निसर्गरुप दिसते तर कधी स्त्री निसर्गरुपात दिसते. स्त्री आणि निसर्ग यांचे अभिनव? हा महानोरांच्या कवितेचा खास वेगळेपणा आहे.''[३]

'कळपाकळपांनी मेढ्यांचे वाडे शेतावर' ह्या कवितेत त्यांनी धनगरी वस्ती, त्यांची वासना, त्यांची मेंढरे, कुत्री ह्यांचे चित्र रेखाटले आहे. पण इतर कवितातल्याप्रमाणे धनगरी वस्तीचा हा अनुभव अविकृत स्वरुपात प्रकट होत नाही, हे अधोरेखित करतात. महानोरांच्या आदिम काव्य प्रकृतीला समाजजीवनाची निरावरण रुपे टिपता येतील का नाही, हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. यथावकाश कदाचित ते होईलही. पण जर ते झाले तर महानोर एक नदी कविता मराठीला देऊ शकतील, असा आशावाद कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. 'वही' या संग्रहातील कवितांविषयी डॉ. नागनाथ हेगे लिहितात. ''या संग्रहातील महानोरांची कविता केवळ निसर्गचित्राचे निव्वळ वर्णन म्हणून आपल्यापुढे येत नाही, तर तो एक ऋशशश्रळपस म्हणून अगदी सहजतेने, स्वाभाविकतेने साकारते! के ऋशशश्रळपस आणि ही सहजताच या कवितेचे खरे सामर्थ्य आहे असे मला वाटते.''[४] अर्वाचीन मराठी निसर्ग कवितेने केलेल्या सजावटीचा प्रभाव पडू न दिल्यामुळे आणि आपल्या भावभावनांना काही एक सांस्कृतिक दृष्टिकोनाचा रंग देण्याचा मोह आवरल्यामुळे महानोरांची निसर्ग कविता मराठीत एक आगळी रुपवती म्हणून वावरते, हे मत उद्घृत करतात.

*** नवकवितेतील दुर्बोधता :–**

मर्ढेकरांपासूनच आधुनिक मराठी नवकविता तिच्यातील दुर्बोधतेमुळे टीका विषय झाली. कवितेसंबंधीच्या आपल्या साऱ्या समजूती मर्ढेकरांनी आपल्या कवितांनी उद्धवस्त केल्या. परंतु अलिकडे मर्ढेकरप्रणित काव्यविचार स्थिरपद होऊ लागल्यामुळे नवकवितेच्या विरोधकांचा सूर काहीसा बोथट झाला आहे. तरीही सध्याची कविता दुर्बोधतेच्या आरोपातून मुक्त झाली आहे असे नाही. दुर्बोधतेचे जणू एक नवे रुप होऊन ती अवतरते आहे. काव्यातल्या अत्याधुनिक दुर्बोधतेचा उगम मुक्तछंदाने निर्माण केलेल्या विमुक्ततेत नाही. मुक्तछंदाने भावाभिव्यक्तीला बहिर्गत रचनेचा मोकळेपणा प्राप्त करुन दिला आहे हे विवरण कुलकर्णी यांनी सांगितले आहे. श्री. गो. ग. कुलकर्णी यांनी अनिरुद्ध अनंत कुलकर्णी यांचा 'डिसेंबर आणि इतर कविता', गोविंद कुलकर्णी यांचा 'अनिमिष' आणि गुरुनाथ धुरी यांच्या 'ग्लोरिया' या तीन संग्रहातील कवितेच्या आकलनासाठी तिच्याकडे ह्या नव्या काव्यदृष्टीने पाहिले पाहिजे, असे मत उद्घृत केले आहे.

अनिरुद्ध कुलकर्णीच्या 'डिसेंबर' मधील कवितांचे परीक्षण करताना श्री. कुलकर्णी यांनी त्यातील दुर्बोधतेवर प्रकाश टाकला आहे. 'डिसेंबर' मधील कविता वाचताना डोक्याला खूप ताण पडतो. सहजासहजी तर ह्या कवितेतील संदर्भ निरनिराळ्या ज्ञानक्षेत्रातील अनेकविध संदंर्भ ह्या कवितेच्या पृष्ठभागावर आढळतात आणि तिच्या अंतरंगात प्रवेश करु पाहणाऱ्या आपल्या मनाला अडथळा आणतात, उदाहरणादाखल श्री. गो. ग. कुलकर्णी यांनी 'पाथॅनॉनचे खांब, पर्विजने केलेली चूक, बिभितकांची झाडे' इत्यादीसारख्या जवळजवळ प्रत्येक कवितेत आढळणाऱ्या संदर्भावर नजर फिरविली म्हणजे ह्या कवितेच्या प्राथमिक दुर्बोधतेची आपणास ज्ञात होतात आणि ही दुर्बोधतेची धाटणी नवी नाही. मर्ढेकरांनी दाखवून दिलेल्या दिशेनेच तिची वाटचाल होत आहे म्हणजे 'डिसेंबर' मधल्या कवितेतील अपरिचित संदर्भाच्या वापराबद्दल आपणाला तक्रार करण्याचे कारण नाही. ही कविता आपल्या बहुश्रृत्तेला जबर आव्हान देते असे विवेचन करतात.

'डिसेंबरा'तली सारी कविता जीवनाच्या व्यर्थतेचा प्रत्यय देणारी आहे. 'डिसेंबरा'मधील दुर्बोधता बरीचशी व्याज दुर्बोधता वाटू लागते. याचे कारण म्हणजे ह्या कवितेच्या बुडाशी असणारी चिंतनशीलता फार सामान्य दर्जाची आहे हे होय. खरे तर समग्र अस्तित्वातले वैय्यर्थ आणि

त्यातून निष्पन्न होणारा वैफल्यातला अटळपणा यांची जाणीव परिपक्क मनोपिंडाची अनुभवावस्था असते. ह्या कवितांतून मनोपिंडाच्या असल्या परिपक्कतेचा, गाढ चिंतनशीलतेचा प्रत्यय येत नाही. तर केवळ व्यर्थता–वैफलयाच्या अनुभवावस्थेचे निर्देशन होत आहे, अशी त्यांनी मीमांसा केली आहे.

गोविंद कुलकर्णी यांच्या 'अनिमिष' ह्या संग्रहातील कवितांचे वैशिष्ट्य सांगताना गो. ग. कुलकर्णी लिहितात, 'गोविंद कुलकर्णींच्या 'अनिमिष' ह्या संग्रातील कविता वाचनाता जाणिवेचा सलगतेचा आपणास अनुभव येतो.' जणू हे लहान लहान कविताखंड एकाच दीर्घक कवितेचे विभाग आहेत असे वाटावे इतके ते एकमेकांशी संलग्न आहेत. सारी कविता साकल्याने लक्षात घेता तिला एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व लाभले आहे. ते बरेचसे एकसंघ आहे अशी आपली प्राथमिक प्रतिक्रिया होते. ह्या प्रतिक्रियेचे आणखी एक अंग परीक्षणात श्री. गो. ग. कुलकर्णी यांनी उलगडून दाखलवले आहे. ते म्हणजे कवीच्या जीवनानुभवाच्या जाणीवेत एक प्रकारची निर्व्याज–निरागसता आहे. आपल्याच अशा जीवनजाणिवेत हा कवी लीन, पूर्णपणे लीन होऊन गेल्यासारखा दिसतो. जणू आपल्या अवतीभोवतीच्या साहित्यात व्यक्त होणाऱ्या जाणीवांची त्याला दखलच नाही. म्हणूनच की काय ह्या कवितेंचा तोंडावळा दुसऱ्या कोणत्या तरी प्रसिद्ध कवितेच्या तोंडावळ्याशी मिळता–जुळता वाटत नाही. तसा प्रयत्नदेखील करताना ही कविता आढळत नाही. म्हणूनच तिच्यातल्या जाणीवेचा चेहरा ठसठसीतपणे आपल्या नजरेत भरतो, असे परीक्षणात्मक अभिप्रायात नमूद केले आहे.

श्री. कुलकर्णींच्या मते अभिव्यक्तीच्या बाबतीतसुद्धा गोविंद कुलकर्णी आपले वेगळेपण जपतात. निसर्ग प्रतिमांच्या भाषेत ह्या कवितेतील जाणिवा व्यक्त होतात. तरी भाषेच्या आणि निसर्गाच्या मोहातही कविता गुंतून पडलेली नाही. आपल्या लक्षात येण्याजोगे शब्दाचे व्यास येथे साधले जात नाहीत. शब्दरुपे ही आपले लक्ष खेचून घेण्याच्या प्रयत्नात नाहीत. निसर्गाच्या देखणेपणाची, त्याच्या रंगगंधाची कविला भुरळ पडलेली दिसत नाही, केवळ निसर्ग दृश्ये अशी येथे रेखाटली गेली नाहीत कारण निसर्गात रममाण होण्याची, निसर्ग सानिध्यात स्वत:चे देहभान विसरण्याची ह्या कवीची प्रकृतीच नसल्याचे श्री. कुलकर्णी यांना वाटते. निसर्ग येथे अवतरतो ते

कवीच्या जीवन जाणीवेचे रंग घेऊन. आपल्या रंगाने कवीची जीवन–जाणीव रंगविण्यासाठी नव्हे. ह्या कवितेतील शब्दरचना आणि निसर्गप्रतिमा 'वेधक' जाणीवेशी एकरुप झाल्यासारख्या वाटतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे.

कवीची चिंतनशीलता कवीच्या आर्ततेचा एक भाग आहे. वैचारिकतेचा आकार त्या कविता खंडांना प्राप्त झाला नाही, असे मत श्री. कुलकर्णी यांनी मांडले आहे.

'थेंब। थेंबाजवळ। तसे हे जगणे,

ही वर्तुळ, एक। एकात एक...

हे हात रिते, हे मन रिते... रिते रितेच

तरीही तोच आरसा। तीच चौकट।

तेच आपण... तीच टिकटिक' इ. कविता खंडांना चिंतनशीलतेचा स्पर्श झाल्यासारखा वाटत असला तरी खरे म्हणजे कविमनाच्या आर्ततेचाच तो एक अपरिहार्य भाग असल्याचे म्हटले आहे.

'अनिमिष' मधील कविता अनंताच्या व्यापकतेची जाणीव व्यक्त करते खरी, पण ह्या व्यापकतेचा गाभा व्याकुळ आर्ततेने भरलेला आहे आणि ही व्याकूळ आर्तताही संवेदनाच्या पातळीवरली आहे. 'अनिमिष' मधल्या कवितेला चिंतनाचा जाणवेल असा आकार प्राप्त झालेला नाही किंवा तिच्यातल्या जाणिवेने संवेदनेची पातळी टिकवून धरली आहे, हे फारसे महत्वाचे नाही, ते केवळ तिचे स्वरुप निदर्शक आहे, पण ज्या पातळीवर ती स्थिरावलेली आहे ती तिला आपातत: प्राप्त झालेली आहे हेच तिच्या पुढील वाटचालीच्या संदर्भात महत्वाचे ठरते. हे त्यांचे परीक्षण रसिक–वाचकांसाठी दिशादर्शक असे आहे.

'काळोख : काळोख्यासारखा' अशी एक कविता आहे. इथे काळोख्याचे अर्थ काळोख म्हणून तर बदलत असतात. कवी फ. मुं. शिंदे लिहितात, ''या काळोख्याचा, व्यक्तिमत्वाचा कणा दु:खाचा असतो. इथे जाणवतो अबोल दु:खाचा, अर्थात हे दु:ख जखमेच्या उघडेपणाची आयुष्य वेदना देतं. रितेपण, एकाकी अवस्था, भिजून गेलेल्या भावना ही दु:खाची गतिचक्रे आहेत. काळोखाला हा ही एक अर्थ असू शकतो.''[५]

गुरुनाथ धुरींच्या 'ग्लोरिया' ह्या संग्रहात केलेली कविता वैशिष्टपूर्ण आहे. धुरींच्या कवितेतील चिंतनशीलता 'सवर्था शून्यमनस्क' आहे. माणसाचे जीवन म्हणजे 'क्षणभराचं जिवंतपण आणि पुन्हा। काळोखाचं अपारपण' हे 'एक जीवन्मृत अस्तित्व पाय ओढीत भटकत' आहे. धुरींच्या प्रणयभाव व्यक्त करु पाहणाऱ्या कवितेत उद्धास्त बाग आयुष्याचं अंधारकाव्य, तू–मी पेटलेल्या चिता। आणि पतझडीचा करकरीत नाद ऐकू येतो. जीवनाचे निराधार पोरकेपण, त्याची आकारहीनता त्यांना पदोपदी जाणवते आणि माझ्यातून मृत्यूच मृत्यू वाहतोय यासारखी मृत्यूची जाणीव त्यांच्या बऱ्याच कवितांना स्पर्श करुन जाते, असे मत मांडले आहे.

आधुनिक समीक्षापद्धतीत आस्वादक समीक्षा पद्धती ही तिच्या काही वैशिष्ट्यांमुळे महत्वाची समीक्षा पद्धती म्हणून ओळखली जाते. सामान्यपणे ही समीक्षापद्धती अनेकार्थता या कलाभूलम्यांचा अविष्कार करताना दिसते. त्यामुळे एखाद्या कलाकृतीचा अर्थ विविध पातळ्यांवर लावणे शक्य होते. अशाप्रकारे ही पद्धती सौंदर्यदर्शनावर भर देणारी असल्यामुळे ती सहाजिकच रसिकांची अभिरुची प्रगल्भ करण्यास साहाय्यभूत ठरते. या वैशिष्ट्यांचे मनोहरी दर्शन गुरुनाथ धुरी यांच्या 'ग्लोरिया' या कवितेत घडते, हे दाखवून दिले आहे.

विशेष लक्षणीय गोष्ट म्हणजे धुरींचे जीवनचिंतन येथे भावविवश होऊन प्रकट होत नाही. मराठीतील बरीचशी भावकविता ही भावविव्हल होत जाते ती आपल्या पोटी उद्‌बोधकता घेऊन येत असते म्हणून उद्‌बोदकतेमुळे भावकवितेत अभिनिवेशाचे, स्पष्टीकरणाचे विचार उत्पन्न होतात. 'ग्लोरिया'तला जीवनचिंतन ह्या दृष्टीने अविकृत आहे. त्याला कसल्याही जीवनभाष्याचे आवरण घालण्याचा प्रयत्न होत नाही. आपल्या स्खलनाची आणि विजयाची कारणमीमांसा कवी करीत नाही, तसेच एकटेपणाच्या दु:खाने उसळलेल्या आकांताच्या दोषांचे परिणामही विशद करुन सांगण्याचा अविर्भाव नाही. कवीचे जीवनचिंतन एखाद्या विरक्त संन्यासासारखे आहे, जणू सर्व जीवनव्यवहारापुढे ते निमूटपणे भिक्षापात्र पुढे करते, पण आपली ओळख मात्र देत नाही, असे मत उद्‌घृन करतात.

अलिकडली कविता विविध भावावस्थांचे अधिकाधिक विशुद्ध स्वरुपात चित्रण करते. तिच्यातली भावविवशता झापट्याने कमी होऊ लागल्याने भावावस्थांची निखळ रुपे तिच्यात

आधिकाधिक दृष्टीस पडू लागली आहेत. ही नवी कविता प्राधान्याने संवेदनांच्या पातळीवर स्थिरावत असल्याने तिला शक्य होत असावे. ‘ग्लोरिया’तील जीवनजाणीवमात्र संवेदनारुपातून व्यक्त होताना दिसत नाही. येथे संवेदनांची एवढी सबद्ध व्यामित रुपे आढळतात की त्यांना बऱ्याच कवितांतून प्रतीकरुप प्राप्त होते. धुरींची कविता केवळ संवेदनांचे, केवळ भावावस्थांचे निरनिराळ्या प्रतिमारुपांतून चित्रण करताना दिसत नाही, असे कुलकर्णी नमूद करतात. कारण ती तिची प्रकृती नसावी, ‘ग्लोरिया’ तील कवितेने बाग, गुलाब, पक्षी, समुद्र, सोनेरी पाखरे, आकाश यासारख्या केवळ निसर्ग घटकांतूनच नव्हे तर बैरागी, कुंडलिनी, संन्यस्त, पादुका, दिंडी, यात्रा यासारख्या गतकालीन संदर्भातूनही प्रतिकात्मकता साधली आहे. संवेदना, भावना, चिंतनशीलता यांचे संश्लिष्ट, एकसंघ रुप ह्या प्रतिकात्मकतेतून अभिव्यक्त होताना दिसते, असे परीक्षणात्मक अभिप्रायात सांगितले आहे.

*** कथात्म पातळीवरील अभिव्यक्ती :–**

श्री. गो. ग. कुलकर्णी यांनी धुरींच्या कवितेतील प्रतिकात्मकतेच्या दृंश्य अंगावर म्हणजे कथात्म पातळीवरील अभिव्यक्तीवर प्रकाश टाकला आहे. मात्र कथात्म पातळीचे स्वरुप अगदी भिन्न असल्याचे म्हटले आहे. निरनिराळ्या घटनांच्या साखळीची अपेक्षा करणारी जिज्ञासा जशी ही कथात्मकता जागृत करीत नाही, तसेच आकर्षक सुरुवात करण्यासाठी म्हणून ह्या कथान्मकतेचा उपयोग करुन घेतला जात नाही. कवितेच्या संघटनेतील कथात्म पातळीमुळे अभिव्यक्तीचे केंद्र स्वत: कवी वाहत नाही. कवितेतील जाणीव हेच जणू ते केंद्र ठरते म्हणजे कवितेतील जाणीव कवीची स्वत:ची असूनही जणू ती स्वत: निरपेक्ष स्वरुपात उतरते. कवीच्या आत्मानुभूतीला एक प्रकारचा त्रयस्थ आकार देण्यात कवितेची कथात्मकता अनिशय उपकारक ठरत असल्याचे श्री. गो. ग. कुलकर्णी यांनी परिक्षणात नमूद केले आहे. त्याचबरोबर जीवन जाणीव स्वरुपात व्यक्त होण्यास ती अधिकाधिक अविकृत रुपात प्रकट होण्यास कवितेची कथात्मक पातळी उपकारक ठरते. ‘ग्लोरिया’ बद्दल कवी फ. मुं. शिंदे लिहितात, ‘‘धुरींच अनुभवविश्वच इतके संपन्न आणि भिन्नरुपी आहे की त्यातून येणारी ‘ग्लोरिया’ नामक संग्रहित कविता पारंपारिक घाटाची उरत नाही. ‘गोष्ट’ भावनेतून मिळोला तिचा घाट मात्र सुस्त

अजगरासारखा आहे. कधीच आणि कुठेही भावविवश न होणारा. हे सौख्य धुरींच आहे, नवीन आहे.''[६]

'डिसेंबर', 'अनिमिष' 'ग्लोरिया' ह्या संग्रहातील कविता काही प्रश्न उपस्थित करते याचाही आढावा श्री. कुलकर्णी यांनी घेतला आहे. शब्दांच्या तार्किक अनुक्रमांतून सुबोध आशयाची छंदोबद्ध मांडणी म्हणजे कविता नव्हे. उद्बोधकता, आदर्शोन्मुखता ही तिची कार्ये नव्हेत, तर नवकवितेने आपल्या चांगलेच लक्षात आणून दिले आहे. सध्याची बरीच नवकविता केवळ संवेदनांच्या पातळीवर स्थिरावताना दिसते. तेव्हा भावना–विचार ह्यांच्यापूर्वी मानसिक संवेदनांच्या स्थितीचे चित्रण करणे हे कवितेचे स्वरुप आहे काय? तेच खरे जीवनदर्शन होते काय? निखळ संवेदनारुप पाहणे, तीच टिकवून धरणे, त्यांचे विचार भावनांत संक्रमण–संकलन होऊ न देणे ही कवीची कुवत म्हणजेच कलात्म असे समजायचे काय? खास कवीच्याच असा शब्दार्थ, जाणीवा ह्यांच्या विश्वातून निष्पन्न झाल्यामुळे कवितेत जी खरीखरी गुढता, सखोलता, सश्लिष्टता येते आणि त्यातून जी अनाकलनीयता निर्माण होते. त्याबाबत कवीला कितपत जबाबदार धरता येईल? कवीला त्यासंबंधीच्या विवरणाची मागणी केली तर कदाचित काही कवी ती पुरवतीलही पण त्यातून आशयाची संश्लिष्टता आणि भाषेचे गतिमान बहुमुखी स्वरुप सुबोध, होईलच याची खात्री देता येईल काय? असे प्रश्न कुलकर्णी उपस्थित केले आहेत. त्यांचे हे परीक्षण रसिक–वाचकांसाठी दिशादर्शक असे आहे.

'आंधळ्या वेदनेचा प्रखर स्वर' या परीक्षणात वसंत जाधव यांनी राम गोसावी यांच्या 'डोळे' या कवितासंग्रहाचे परीक्षण केले आहे. जीवनामधल्या वेदनेच्या प्रखर प्रेरणा घेऊन यातील कविता उभी राहते. तो स्वर या कवितेच्या सामर्थ्याचा भाग आहे. खवळलेल्या अंधारलाटांनी भयग्रस्त झालेल्या कविमनाची ही गाथा आहे. विश्वाच्या दृश्यात्मक स्वरुपाशी, नियतीच्या क्रूर आघातामुळे संबंध तुटलेल्या मनाची व्यथा इथे शब्दबद्ध होत आहे. म्हणून वसंत जाधव यांना ह्या कविता म्हणजे 'आंधळ्या वेदनेचा' प्रखर स्वर वाटतो.

जीवनाचा चैतन्यमय व प्रकाशमय किनाराच हरवला आहे. त्याचा शोध हा कविमनाचा ध्यास आहे. डोळ्यामधले निळेपक्षी हरवतात. त्यामुळे सूर्याच्या दिशेने होणारी मार्गक्रमणा थांबते

आणि जीवनाभोवती साचलेपणा, थिटेपणा, अपमान, चीड, वैताग या सर्व गोष्टी फेर धरतात. सामान्य माणूस डगमगला असता कविमन ही डगमगते. सर्व संपले आहे, याची जाणीव होते, जीवन संपविण्याची इच्छाही होते, पण तिच्या सहवासाचे आणि जीवनाचे लागेबांधे त्यांनी अस्तिक मन सावरते आणि जीवन साफल्याचा विचार करु लागते. कवितेलाही मग स्वाभाविकच महत्व प्राप्त होते, कारण तीतून मनाची तगमग व्यक्त करता येते. त्या कलानंदातून कवीला एक आत्मिकशांती मिळते आणि मग कवी ''अंधाराच्या थेंबामध्ये बसतो कोरित भावफुलांची नाजूकलेणी'' ही भावफुलांची नाजूक लेणी असली तरी अथांग वेदनेनी बहरलेली आहेत. याची जाणीव होते आणि वाचक अधिक गंभीर व अंतर्मुख होतो. 'अंधाराचा थेंब' किंवा यासारख्या कितीतरी प्रतिमा ह्या अनुभवाच्या सच्चेपणातूनच निर्माण होतात. 'तळ्यात अंधार । अंधारात तळ। तळ्यात निळं मेलेलं कमळ' या ओळी मनाच्या निराशेला सहज प्रकट करतात. 'माझ्याही क्षितिजावर उमटेल कधी हरवलेली सोनपहाट' अशी आशा मनी बांधून जगू लागते.

साधे निवेदन पुष्कळदा त्यातील खरेपणामुळे वास्तवतेच्या प्रखर स्पर्शामुळे केवळ चटका लावणारे ठरते. 'तिमिर का दाटला, चाललो एकला शून्यभावे' हा अंधाराचा एकाकी प्रवास तो डोळ्यापुढे उभा करतो. आपल्या अंधारमय जीवनात रुजून येणारा चैतन्यमय प्रकाशाचा थाट आणि त्यातून वाट गवसल्याचा आनंद तो अत्यंत योग्य शब्दात व्यक्त करत असण्याचे वसंत जाधव यांनी स्पष्ट केले आहे. अशा अंधाराच्या ठायी आपल्या प्रकाशगर्म अस्थी बुद्धाच्या स्तूपासारखा जपून ठेवण्याची शक्ती असल्याची जाणीव होते. जीवनाच्या स्वरुप चिंतनाला, जीवनाच्या हाती लागणाऱ्या अर्थाला शब्दबद्ध करण्यात, जीवनाच्या वास्तवाचे व संभाव्य वास्तवाचे चित्र रेखाटण्यात व्यक्तित्व विकासाची, सर्जनाची एक आगळी धुंदी आहे, असे होत असताना आपले स्वरुप बदलत आहे. चिंतनाने जीवनाचा अर्थ विवेकाच्या दिशा उजळून निघत आहेत, त्यातून व्यक्तिमत्व रूप होत आहे.

या खडतर जीवनप्रकाशान सहधर्मचारिणीविषयीची कृतज्ञताही अत्यंत तरल रुपात व्यक्त झाली आहे. त्याकडे वाचकांचे लक्ष जाधव यांनी वेधले आहे. 'माझ्या उद्‌ध्वस्त समाधीवर पसरावी तुझी सावली' ही कल्पना कविता वाचनात क्षणभर थांबवते कवि जीवनात प्रिया ही एक

सर्वाथानेच आधारचेतना आहे. कारण तिचे स्थान 'माझिया आकाशी तुझाच प्रकाश' असे आहे, कारण या सर्व बाजूंनी कोंडी झालेल्या आयुष्यात 'आता तूच काठी तूच दिवा। तूझा समर्थ हात हाती हवा' अशी प्रेममय मागणी, आळवणी आहे.

अंधाराच्या डोहातील काळोखाची गाणी गात असतानाच प्रकाशाची वाट गवसली आहे. कविता प्रकाशोन्मुख झाली आहे. ती आज प्रकाशवेळी आहे. वेदनांच्या प्रखर प्रकाशात ती वाटचाल करते आहे म्हणून कलात्मकतेच्या मार्गापासून ती न ढळता अधिक सुंदर रुपात यापुढे अवतरेल अशी आशा परीक्षणात श्री. जाधव यांनी व्यक्त केली आहे.

*** स्वातंत्र्य चिंतन :-**

'बंधमुक्त जीवाचे स्वातंत्र्यचिंतन' या परीक्षणामध्ये कवी फ. मुं. शिंदे यांच्या 'वृंदगान' या कवितासंग्रहाचे मार्मिक विवेचन भास्कर लक्ष्मण भोळे यांनी केले आहे. फ. मुं. शिंदे यांचा 'वृंदगान' हा तिसरा कविता संग्रह पहिल्या जुलूस संग्राच्या तुलनेत फार पुढची मजल नि:संशय मारलेली आहे. शिंद्यांच्या कवितेचे संकीर्ण व प्रथगात्म स्वरुप जाऊन तिला एकदिशात्मक व एकसंघ स्वरुप तर आलेले आहेच, शिवाय शब्दजंजालापलिकडे जाणारी व नेणारी वैचारिकता त्यांच्या कवितेला आज लाभलेली दिसते. स्वातंत्र्य चिंतन हा 'वृंदगान'चा केंद्रबिंदू असून कवितांमधील इतर सर्व विचारसत्रेही त्यांच्या सभोवती फिरणारी अशी आहेत. सर्वांगीण गतिरुद्धता, कुंठितपणा, मेंदूत पेटलेली युद्धे, आत्मविस्मृत कर्तृत्वशून्यता व पौरुषविहीनता, बहुरुपी रात्र, सत्तेचे नकली व पोकळ स्वरुप, स्वरुप रुप स्वातंत्र्य वगैरे सारे उल्लेख आलटून-पालटून या कवितेत येतात ते अंतिमत: स्वातंत्र्य विचाराच्याच संदर्भात येतात असे भोळे 'वृंदगान' चे विवेचन करतात. तसेच संग्रहाच्या मलपृष्ठावर दिलेले प्रसिद्ध महानुभाव पंडित केशिराज बाससंकलित 'दृष्टान्तपाठा'तील अवतरण ही एकूण कवितेचा आशय अधिक सधन करणारा आहे. याकडेही श्री. भोळे यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे.

शिद्यांचे वृंदगान सुरु होते तेच गोठलेपणाच्या विष्णण उद्‌गारांमधून! अभिसरणशून्य अशा या समाजातील परिवर्तनाचे सारे प्रयत्न हे कवीला, मृताला सजीव करणाऱ्या संजीवनीच्या पडताळा घेणारे प्रयोग करतात. गोठलेपणाची व गतिहीनतेची ही भावना 'कालोलयात काळोख'

मिसळून पडतील पुन्हा आंधळे नेमके खंदकातच, इथले एकूण एक तसचं राहणार, फार तर चढेल कालांतराने... शेवाळ... हाडामांसाच्या गोळ्यावर... युगांचा थर इत्यादी ओळींमधून ही व्यक्त होते. या अचल जगाचे चिंतनही तितकेच कुंठित झाले असल्याची व्यथा कवीने कशी मांडली आहे यावरही श्री. भोळे यांनी प्रकाश टाकला आहे. या जगातल्या माणसाला प्रश्न जे पडतात ते सगळे सनातन! माणूस का जन्मतो? का जगतो? व का मरतो? अशा स्वरुपाचे, भौतिक जगातील विक्राळ समस्या त्याच्यासाठी कधी प्रश्नरुप होतच नाहीत. नवे प्रश्न उभे करण्याऐवजी या जून्याच प्रश्नांची नवनवी उत्तरे शोधून तो स्वत:च्या बुद्धिवैभवाची पाठ थोपटून होत असते, उत्तरांमधील हे नवेपणही तसे फसवेच असते असा कविचा अभिप्राय आहे. एकूण या चिंतनाचा सारांश काय? तर शेवटच्या कवितेत कवी सांगतो त्याप्रमाणे ‘मानव मर्त्य आहे.’ वर्तमान जीवनापासूनची ही पराङ्मुखता!

इहवादी दृष्टीच्या विचारी माणसाला मात्र भोवतालची ही परिस्थिती अस्वस्थ करते ही अस्वस्थता व्यक्त करणाऱ्या कवितांमधून कवी या व्याकूळ चिंतकांचा प्रतिनिधी म्हणून बोलत असल्याचे नमूद केले आहे. त्याची कवटी हे विचारसंगराचे कुरुक्षेत्र बनते. देशादेशांमधील युद्धांपेक्षाही मेंदूत चाललेली ही युद्धे अधिक भयंकर व अनंत वाटू लागतात. पृथ्वीचा नकाशा ‘मानवी’ चेहऱ्यासारखा व्हावा ही त्यांची तळमळच कधी आत्मविस्मृतीचे रुप घेऊन ‘वृंदगाना’त व्यक्त होताना दिसते तर कधी आत्मविष्काराचे रुप घेऊन ‘इच्छा’ सारख्या कवितेतून साकार होते.

तळागाळातल्या दृष्टीतून राजसलांची निरनिराळी रुपे कवीने शब्दबद्ध केली आहेत. ‘सिंहास’ शीर्षकांत गीत एक काव्य चतुष्टक या संग्रहात आहे. त्यातील पहिली कविता ‘हा देश प्रचंड’ या ओळीने सुरु होते आणि पुढे वृथाआत्मगौरवाच्या भरात इथल्या ‘प्रचंड’ दु:खदैन्याचे व ‘प्रचंड’ जनसंख्येचेही गौरवीकरण उपहासपूर्ण शब्दांत केलेले आहे. कडव्या वा अतिरेकी राष्ट्रभावनेपोटी असे गौरवीकरण अनेकदा घडत असते हे खरे आहे. अशा या ‘प्रचंड’ देशातील सिंहासन म्हणजे सामान्य नागरिकांना वितळवून केली गेलेली मूस आहे, असे कवी शेवटी म्हणतो. स्वतंत्र आकाशासाठी स्वतंत्र अवकाशात, स्वतंत्र जमिनीवर सर्वत्र वावरणाऱ्या व नागरिक

म्हणवणाऱ्या गुलामांच्या अंगावरचे तळ म्हणजे 'सिंहासन' हे तो दुसऱ्या कवितेत सांगतो. वैफलयाची, गरजपूर्तीची, दारिद्रय निर्मूलनाची स्वप्ने, जन दैन्याच्या धास्तीपोटी, जनतेच्या तोंडावर फेकणारे हे सिंहासन वस्तुत: अंगूर अशी कापूसवात असल्याचे तिसरी कविता म्हणते आणि अखेरच्या कवितेत पीडित, दारिद्री व गुलाम यांच्याशी गरजेपोटी नाते संदर्भ जुळवण्याचा खटाटोप करणारे सिंहासन आत्ममनातल्या कण्वमुनीसारखे आहे म्हणजे त्यांचे जनतेशी रक्तमांसाचे नातेच नाही; असे मत उद्‌घृत केले आहे.

स्वातंत्र्य हे कुणी कुणाला देण्याची वा घेण्याची चीजच नव्हे ती प्रत्येकाला स्वत:साठी मिळवावी लागते. हे सार्वकालिक सत्य कवीने जागोजाग सूचित केले आहे. त्याचबरोबर मलपृष्ठावर जो 'भिंग रुटीचा दृष्टान्त दिला आहे.' त्यामागचे सूत्रही असेच आहे की, एका स्वातंत्र्यावाचून बाकी सगळ्या गोष्टी जीव परस्परांना देऊ घेऊ शकतात. स्वातंत्र्य मात्र फक्त परमेश्वरच देऊ शकतो. कीटक मृगन्याय तसा जुनाच आहे. भिंगरुटीने घरात आणून ठेवलेल्या कीटकांच्या मनात भयाने भिंगरुटीचे सतत चिंतन चालल्यामुळे त्या चिंतनाच्या क्रमात त्यालाही पंख फुटून तो भृंगीसदृश होतो, या कविकल्पनेवर हा दृष्टान्त आधारित आहे. परमेश्वराचे अहोरात्र चिंतन मनुष्याला ईश्वररुप देईल असे चक्रधरांनी चांगदेवास एलामुखी दिलेल्या या दृष्टान्तांमधून सूचित केले आहे. निरीश्वरवाद्यांना जरी यातली परमेश्वराची भूमिका अमान्य असली तरी या दृष्टान्तातील एक सत्य नाकारता येणार नाही की, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्वत:लाच स्वातंत्र्यरुप दिल्यावाचून गत्यंतर नाही. स्वातंत्र्य हे बाह्य अलंकरण कधीच असू शकत नाही. तर अस्तित्वाचाच तो एक अविभाज्य आकार असावा लागतो. कवीलाही त्या दृष्टान्ताचा एवढाच संदर्भ अभिप्रेत असावा असा तर्क भा. ल. भोळे यांनी आपल्या परीक्षणात्मक अभिप्रायात काढला आहे.

परीक्षणाच्या शेवटी भोळे यांनी पुस्तकाच्या निर्मितीबद्दल व त्यातील चित्रांबद्दल लिहिले आहे. या पन्नासपानी संग्रहात एकवीस कविता आणि मुखपृष्ठासह एकतीस चित्रे असून सर्वांनी भ. मा. परसावळे, भाऊ समर्थ, धर्मराज भोईर, प्रकाश कामतीकर, एस. टी. चौधरी, रमेश दिक्षीत, चित्तरंजन हेळेकर वगैरे आजच्या पिढीच्या प्रातिनिधीक चित्रकारांनी ती काढलेली आहेत.

‘वृंदगान’ या समूहसूचक संकल्पनेचे बरेच अविष्कार या कविता संग्रहात आहेत. कवितेच्या आशयाची चपखल जुळणारी व समर्थक अशी चित्रे ‘गर्म’, ‘ग्रहण’, ‘पंजे’ ‘वृंदगान’ ‘पुतळे’ आणि निष्कर्ष या कवितांनाही लाभलेली आहे. काव्यसंग्रहाची निर्मिती व बांधणी नजरेत भरणारी आहे.

*** घायाळपंखी गाणे :–**

दलित कवितेची ‘उत्थानगुंफा’ अशा समर्पक शीर्षकाखाली भास्कर लक्ष्मण भोळे यांनी यशवंत मनोहर यांच्या ‘उत्थानगुंफा’ या कवितासंग्रहाचे मार्मिक परीक्षण केले आहे. तापलेल्या माळरानावर उदासवाणे हिंडताना पेटून फुललेल्या फळस–फुलांचे अग्निनर्तन डोळ्यांना वेगळाच आल्हाद देते. यशवंत मनोहरांची कविता वाचताना थेट असाच अनुभव येतो असे भोळे म्हणतात ते त्यांच्या कवितेला न्याय देणारे आहे. ईश्वरशाही, अध्यात्म व कर्मविपाक सिद्धांत यांच्या बलावर या समाजात युगानयुगे सुरु असलेल्या शोषणाचा ज्यांनी मृत्यूलेख लिहिला त्या आंबेडकरांना आणि केशवसुत नामक आदि विद्रोहाला एका आत्मविश्वस्त व अशरण कवीने अर्पण केलेली ही क्रांति कविता आजच्या दलित कवितेला अनेक नवी परिमाणे प्राप्त करुन देणारी आहे.

अर्वाचीन–प्राचीन कवितेपेक्षा मनोहरांची कविता सर्वस्वी निराळी असल्याचे स्पष्ट केले आहे. कणाहीन वांझोटी गाणी प्रसवणारे राजकवी, साजिऱ्या–गोजिऱ्या शब्द विभ्रमांचे गेरे मालून कवितांना नटवणारे कलाकवी, रंजक गूढगुंजन वा तत्वावंडबर यांनी कवनांना उगाच भारदस्त करणारे पंडित कवी या सर्वसाधारणपणे मराठी भाषेतील प्रचलित प्रकारांपेक्षा या कवितेची जातकुळी मुळातच निराळी आहे. मनोहरांच्या कवितेला स्वप्नरंजन, शब्दचमत्कृती, साजशृंगार यांचा सोसच नाही. शब्दांची पूजा करण्यापेक्षा माणसांची आरती करण्याकडे तिची ओढ आहे. साधी–सोपी, उघडी–नागडी, आशयाला सरळ हात घालणारी लखलखाट, कड्कडाट करणारी अशी ही मराठमोळी कविता आहे. निरर्थक शब्दांची केवळ नादमाधुर्यासाठी उधळण ती करीत नाही, तरी तिच्या गंध सदृश्य रचनांनाही स्वत:ची अशी लय आहे. नक्षीकाम–आतषबाजी तीत नसूनही तिचे रुपडे लोभस आहे. मनोरंजन वा काव्यशास्त्र विनोद हे तिचे कार्यच नाही. कवीच्याच शब्दांत सांगावयाचे तर ही कविता एक घायालपंखी गाणे आहे.

या कवितेला शब्दांचे देणे अमाप लाभलेले आहे. त्या शब्दांच्या माध्यमातून संस्कृनिष्ठांचे विषावत कार्पण्य, लफ्फेदार अध्यात्माचा अमानुष चक्रव्यूह यांना पेटवणारी मशाल होऊ इच्छिणारी ही कविता सर्वार्थानी विद्रोहाची कविता आहे. पण ती केवळ विध्वंसक नाही तिला काहीतरी क्रांतिकारी निर्मायिचे आहे आणि निर्मून टिकवायचे आहे. यशवंत मनोहरांच्या कवितेत काय आहे, त्याची ओळख करुन देताना भोळे लिहितात, ''या कवितेच्या मुळाशी दलित जीवनाची एक जागती जीवघेणी जाणीव आहे. उभ्या आयुष्यावर निखारे पसरवणाऱ्या धगधगत्या आठवणींचे उरात उसळणारे ज्वालामुखी गावकुसाबाहेर बालपणापासून वाट्याला आलेले नरकवत जिणे, या समाजापासून व संस्कृतीपासून दुरावले गेल्याची भावना, अथांग, दैन्य, दुःख व कारुण्य, काळजाला घरे पाडणारे भोवतालचे वास्तव्य किडलेली मानवता व सडलेल्या संघटना परिवर्तनाच्या प्रयत्नांचे झालेले होत असलेले दारुण पराभव या सर्वांचे रसायन या कवितेत आढळत.'' असे भोळे स्पष्ट करतात.

यशवंत मनोहरांच्या कवितेचे वैशिष्ट्य सांगताना भा. ल. भोळे लिहितात– ''एका विशिष्ट जातीधर्माधिष्ठित दलितांच्या दुःख उद्रेकांना शब्दबद्ध करुनही कविता थांबत नाही. तिथेच थाबंली असती तर आजच्या बव्हंश दलित कवितेहून ती फारशी निराळी ठरली नसती. जन्मसिद्धं विषम जातिव्यवस्थेतून येणारे गौणत्व आणि भोग किंवा जागोजाग होणाऱ्या अत्याचारास विविधाविष्कार यांना आपल्या देश्य व सतेज भाषाशैलीने मराठी सारस्वतांच्या क्षेत्रात दलित कवितेनेच प्रथम आणले हे तिचे कार्य ऐतिहासिक मोलाचे आहे. यशवंत मनोहरांची कविता पूर्वास्पृश्यांच्या जीवनभोगाच्या पातळीवरुन सर्वसाधारण सामान्य माणसाच्या भोगाच्या पातळीवर येऊन ती पोहचते. ज्यांना ज्यांना या समाजातल्या क्रूर व्यवस्थेने बळीचे बकरे केले त्या सर्वांची ती उद्‌गार होते. माणूस या विस्तृत मध्यबिंदूच्या ठिकाणी शौर्य, निर्भयता, इहवाद, विश्वास, मानवकेंद्रित्व इत्यादी गुणांचा जागर केल्यावासूचन या व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याऱ्या प्रखर प्रेरणा निर्माण होणारच नाहीत आणि अशा समूह परिवर्तनावाचून वर्तमान समाजातील कोणताही व्याधी निपटून निघणार नाही; हे मनोहरांचे निदान त्यांना इतर कवीपेक्षा अधिक युगसापेक्ष ठरवते, हे मत उद्‌धृत करतात.''

संग्रहाच्या अखेरीस कवीला चार्वाक, बुद्ध, फुले, मार्क्स, केशवसुत आणि आंबेडकर यांना उद्देशून लिहिलेल्या कविता आहेत. या थोरांबरोबच मानवेंद्रनाथ रॉय, लोहिया, गॉर्की, मायकोव्हस्की अशी काही अग्रणीची नावे या कवितेतून अधुन–मधून भेटतात, त्यातून मनोहराची व्यापक सहिष्णू दृष्टी दिसत असल्याचे भोळे यांनी स्पष्ट केले आहे. वरील सर्व क्रांतिकारकांच्या सामाजिक, सांस्कृतिक विचारांनीच मुख्यत्वे मनोहर प्रभावित झालेले दिसतात. प्रा. रा. ग. जाधव लिहितात. ''उत्थान गुंफेतील कविमन तर असे उत्कट, जिवंत व विचारदक्ष नि भावनादक्ष आहे की त्याने रुपास आणलेली काव्यात्मचित्रे अंतचक्षू चक्रावून सोडतात. विद्रोहाचा युरोपिया पटो न पटो, इथे एका प्रतिभावंत मनाचा जिवंत अनुभव मिळतो; मराठी मीमांसक काव्य या उत्थान गुंफेने समृद्ध केले आहे आणि प्रज्ञा व प्रतिभा यांचे द्वदात्वात्मक नाते काव्यात्म उंची कोठवर गाठू शकते याचे ज्ञानेश्वरांनंतर पुन्हा एकदा प्रत्यंतर घडविले आहे.''[७]

यशवंत मनोहरांच्या कवितेकडून अपेक्षा व्यक्त करताना भा. ल. भोळे लिहितात, ''वर्तमान क्रांतिगर्भ परिस्थितीचा गर्भपात टाकून खऱ्या मानवी समाजाचा जन्म जर सुखरुप व्हायचा असेल तर यशवंत मनोहरांना आपल्या या सूर्यायणाच्या कवितेला व्यापक अर्थाने मार्क्स, बुद्ध, फुले यांच्या समग्र विचारांच्या प्रेरणांची चेतना घ्यावी लागेल. तरच या कवितेची हाक त्यांनी अपेक्षिल्याप्रमाणे 'शेकोट्यांच्या पेटत्या बनांची ठरेल' अन्यथा ती पळसफुलाप्रमाणेच काही काळ रसरसून धगधगेल आणि मोसम संपताच मातीमोल ठरेल अशी भीती वाटते. ती खरी ठरो. त्यांची कविता दलित कवितेची आणि दलित समाजाचे उत्थान गुंफा ठरो.'' दलित कविता जगण्याचे सगळे संदर्भ टिपत पुढे येत असल्याचे दिसते. दलित जीवनातील वास्तवाला जाऊन ती भिडते आहे. बदलत्या समाजातील समस्याचे पडसाद त्यात उमटताना दिसतात. मनोहरांची कविता प्रतिनिधीक वाटते. डॉ. सदा कऱ्हाडे लिहितात, ''आवर्त फोडून पुन्हा नवे बख घेऊन दलित कविता वाटचाल करीत आहे. जगण्याचे संदर्भ बदलतात तेव्हा नव्या समस्या, नवे ताणतणाव निर्माण होतात. याची स्पंदने साहित्यातून उमटतातच. दलित जीवनाचे वास्तव बदलले, नामांतराचा प्रश्न, राखीव जागांचा प्रश्न इत्यादीसाठी प्रासंगिक आंदोलने झाली. त्याचे पडसाद दलित कवितेत उमटले आहेत.''[८]

*** स्त्री समीक्षक :–**

'समाज प्रबोधन पत्रिके' ने प्रबोधन करता–करता समता हे मूल्य जपलेले दिसते. 'पत्रिके' मध्ये स्त्री समीक्षकांना स्थान दिल्याचे दिसते. मालती किर्लोस्कर आणि ज्योति लांजेवार यांनी अनुक्रमे 'पाथेय' आणि 'भावगंधा' या कवितासंग्रहाचे मार्मिक परीक्षणे कली आहेत. पुरुष समीक्षकांच्या तुलनेत त्यांची संख्या कमी असली तरी बरोबरीची आहे.

मालती किर्लोस्कर यांनी श्री. श्रीपाद जोशी यांच्या 'पाथेय' या काव्यसंग्रहाचे परीक्षण केले आहे. कोणत्याही कलावंताची आपल्या कला निर्मितीमागे काही विशिष्ट प्रेरणा असते तिला एक निश्चित जीवनध्येय असते. त्याबद्दल आपले हद्‌गत सांगताना कवी म्हणतो, ''कविता ही तुमची आमची । ठेव सर्वांची'' या आत्मीय भावनेमुळे या कवितांतून आपल्या मित्र सुहद्–आप्तांच्या मनातील भाव–शब्द–सूर–मन ही होतात–होतील अशी त्यांची श्रद्धा असल्याचे म्हटले आहे. आपली कविता–दुहिता ही रसिकांची स्नुषा आहे, या शब्दांनी कवीने रसिकांचाही गौरव केला आहे. अनेक धर्मातील उदार श्रेष्ठ ग्रंथांच्या आणि संतपंत यांच्या परस्वरांचा आढख या कवितेतून होत असल्याने ती कर्मप्रेरक व मार्गदर्शक आहे, असा कवीला आत्मविश्वास वाटतो. या कवीचे मन विनीत आणि आदर्शावर प्रेम करणारे आहे. ते कवि विशिष्ट जीवनमूल्ये मानणारे, समाजाची बांधिलकी स्वीकारणारे आहे. याचा सुखद प्रत्यय अनेकवार वाचकाला येतो. कवी म्हणतो, ''दानव, मानव, देव असावा।

रक्षण सर्वांचे करण्याला।
करील जो हालहाल पान।
नमेल त्या पुढती ही मान॥''

मानवाची सारी धडपड सुखासाठी चालते ते सुख मिळविताना अनेक प्रकारच्या विसंगती विरोध त्यांच्याशी त्याला लढा द्यावा लागतो. कवीला याची यथोचित जाणीव आहे, हे पुढील काव्यपंक्ती वाचताना सहजध्यानी येते. तो म्हणतो,

''अंधारातुनि प्रकाशाकडे।
जाण्यास्तव मी सदा धडपडे।

तरीही विनंती एक तुजकडे।

प्रकाश कधि मज पूण न दिसू दे।''

या ओळीमधून मालती किर्लोस्कर सूचित करतात की, जीवनाला पूर्णत्वाच्या वरदानापेक्षा अपूर्णत्वाचा आशीर्वादच लाभावा ही त्याची अपेक्षा त्याच्या विकासोन्मुखतेची द्योतक आहे. प्रीती आणि निसर्ग हे सर्वच कलावंतांचे विशेष जिव्हाळ्याचे विषय असतात. त्या जिव्हाळ्याच्या पोटीच कवीला 'रानफुलांचे गाऱ्हाणे' ऐकू येते, परोपकारी 'वृक्षाचे निमंत्रण' साद घातले. महाराष्ट्राच्या रुक्ष, शुष्क खडकापासून प्रेमाचे निर्झर वाहत असल्याने 'तेच मला आवडते' हे तो अगदी आग्रहाने बोलून दाखवतो, त्याच्या प्रेमकवितांची संख्या मर्यादित असली तरी 'तुटली तार सतारी'ची अशी एखादी कविता मनात घर करुन राहते.

श्रीपाद जोशी यांच्या समाजाभिमुख, वास्तव जीवनदर्शी कवितांचा खोलवर ठसा किर्लोस्कर यांच्या मनावर उमटला आहे. जीवनाच्या गुंतागुंतीचे, त्यात ठायी–ठायी आढळणाऱ्या विषमतेचे कवीला केवळ भानच आहे असे नव्हे, तर त्याबद्दल त्याचे मन सदैव विचारशील आहे. दंभ, अन्याय, दैन्य, दारिद्रय याविरुद्ध ते मन बंड करु इच्छिते. हे विशेष आहे. हे मन प्रसंगी लहान–सहान सुखदु:खांनी मोहोरते, व्याकुळ होते. लूत भरलेली वा वासवदत्ता कुत्री खंदकात शेवटचे दिसली किंवा झाडूवालीचा 'पाटीमधला बाळ कोवळा' त्यांच्या दृष्टीस पडला की ते त्याच्या सहानुभूतीचे व काव्याचे विषय बनतात. त्याचबरोबर अन्याय दूर करण्याबाबत आपली असणारी असमर्थता त्याला बोचत राहते, असे परीक्षणात्मक अभिप्रायात मालती किर्लोस्कर सांगतात.

'सत्य आणि सत्ता' आणि 'हे युग आहे रांगेचे' या दोन कविता महत्वपूर्ण आहेत. सत्याच्या चिरंजीव सामर्थ्याबद्दल कवीचा विश्वास पहिलीतून प्रकट होतो तर संगदेवतेने आजच्या जगाचा सारा जीवनव्यवहाराच कसा आपादमस्तक व्यापून राहिला आहे, याचे भेदक व यथार्थ वर्णन कवी दुसरीत करतो.

''जन्मापासून मरणापर्यंत।

मरणानंतर सरणापर्यंत।

सर्वत्र रांगाच रांगा.''

या उद्‌गारात सामान्य माणसाच्या मना दाटणारा जसा उपरोध आहे, तसाच उद्वेगही आहे. आगतिकता आहे तशीच कटुताही आहे. जीवनव्यवहारातील अनेकविध स्वरुपाची कुरुपता, दु:खे पाहून संवेदनशील कवीचे मन अंतर्मुख होते. कवीच्या विमनस्क व भांवलेली स्थिती आहे. तो दु:खाचा नैसर्गिक परिणाम आहे. कवीला कोणकोणते प्रश्न पडले त्याबद्दल मालती किर्लोस्कर लिहितात, 'मी कोठून आलो? कोठे जाणार? या सगळ्या मानवी जीविताचा, विश्वाच्या अफाट पसाऱ्याचा अर्थ काय? मानवाची सारी धडपड कशासाठी? देव म्हणजे कोण? तो कशासाठी हवा? असे अनेक मूलभूत प्रश्न त्याच्या मनात गर्दी करु लागतात आणि त्यातूनच 'सदा मला मी शोधित असतो। थांग परिमज गवसत नाही.' अशी काहीशी विमनस्क व भांबावलेली कवीची स्थिती होते. ती त्याने अगदी मोकळ्या मनाने सांगितलेली आहे. कवीचा हा अनुभव सर्वस्पर्शी आहे.'

ह्या संग्रहातील कवितांतून निसर्गाचे मनोहारी चित्रण, उत्तुंग कल्पनाविलास वा प्रेमाची सूक्ष्म सहज–सुंदर स्पंदने, काव्यालंकार अशा गोष्टी विरलत्वाने आढळत असल्यातरी कवीच्या मनाचे ह्या संग्रहात उमटलेले प्रतिबिंब आकर्षक आहे. हे मन प्रगल्भ, सहानुभूतिसंपन्न आहे, प्रांजल आहे. अशा मनाने रसिकाला दिलेले हे साधेसुधे पण निरामय जीवनाला उपकारक पाथेय आहे. उपदेश, प्रचार असा कसलाही अवास्तव तिखटमसाला त्यात असल्याने ते रुचकर वाटते, असे म्हटले आहे.

'भावगंधा' हा संग्रह म्हणजे कवीच्या अंत:करणातील विविध भावनांचा प्रामाणिक व सरळ अविष्कार आहे. बसाखेत्रे वनवासी भागात जन्मलेले, वाढलेले तेथील लोकांची सुख दु:खे पाहिलेले व स्वत:च्या जीवनातही अनुभवलेले अशा या अनुभवातून साकार झालेले पुष्प म्हणजे 'भावगंधा' असे ज्योती लांजेवार यांनी परीक्षण करताना मार्मीकपणे विचार मांडले आहेत.

प्रस्तुत संग्रहातील काव्यात विषय विविध आहेत. सूर उमेदिचा आहे. आजच्या काव्यात आढळणारी निराशा, विफलता ह्यात नाही. जे सुचले, जसे सुचले तसेच कवीने लिहिले आहे. अनुभूतीशी प्रामाणिक राहून काव्यलेखन केले असले तर कलाकृती श्रेष्ठ ठरते, या कसाला हा

संग्रह उतरला आहे. कवी आदिवासीत राहिला, जगाला समरसला आहे, स्वतःच्या वेदना जाग्या करीत दुसऱ्याच्या वेदना शमविणारा, मानवी मूल्यांसाठी झगडणारा जागृत आदिवासी त्यांनी पाहिला आहे. तो त्यांच्या मनात ठसला आहे. त्याचे चित्रण अतिशय मोजक्या व समर्पक शब्दांत त्यांनी केलय–

''एक गोड भगत आदिवासी
लोखंडी काट्याच्या साखळीने रक्तबंबाळ
करीत आपल्याच उघड्या शरीराला।
दुसऱ्याचा रोग बरा करण्यासाठी
स्वतःच वेदना झेलीत!''

श्री. बसाखेत्रे हे जीवनाच्या अधिक जवळ गेले आहेत. त्यांच्या कविता जीवनसंघर्षाचे दर्शन घडविणाऱ्याच नाहीत तर त्या संघर्षाची ग्वाही देणाऱ्या आहेत. हे ज्योती लांजेवार पटवून देतात. त्यांच्यात शब्दांत –

''अंधाराच्या कुशीत
रडून रडून रात्र ओली होते
अन थरकाप सुटतो मातीला
तुझ्या स्वप्नांची आत्महत्या बघून''

या सडलेल्या, कुजलेल्या समाजव्यवस्थेतून आपलं स्वप्नचित्र साकारण्याचा प्रयत्न कवी करत असतो. तेच चित्र बसाखेत्रे यांच्या 'भावगंधा' त ज्योती लांजेवार यांना दिसते.

'मर्तिक' या चंद्रकांत खोत यांच्या काव्य संग्रहाचे दि. के. बेडेकर यांनी परीक्षण केले आहे. 'हिवाळ्यातील रात्रीचा अर्थ' ह्या कवितेत कवी म्हणतो,

''असंदर्भ क्षणांचे थवे बनून कातडीवर चिघळतात
कोसळलेल्या पावसासारखे संदर्भ धुवून निघतात
बेसावध प्रकाशझोत हवे नकोचे अंधांतर होतात
म्हणजे तेथे सावधानता गर्भपाताचे नमूने

हिवाळ्यातील रात्रीचा असा अर्थ

सोलत जातो अगोदरच्च्या पिढीचे बंद खोलत जातो.''

'अगोदरच्च्या पिढीचे बंद' कवीच्या मनाने तोडून टाकले आहेत आणि असे पूर्वापार घडत आले आहे. नाहीतर माणूस दहलक्ष वर्षापूर्वी होता तिथे व तसाच थिजून राहिला असता. कवीच्या मनाचे दुसरे एक रुप 'बेचाळीस फिनिक्स हराकिटी' या कवितेत दि. के. बेडेकर यांना दिसले. बेचाळीस पिढ्यांची गणना आपल्या परंपरेत मानली जाते. कधी व का ते मला नीट माहित नाही. या गणनेचा संदर्भ या ठिकाणी असावा/फिनिक्स पक्षी आत्महत्या (हाराकिरी) करतो व आपल्या चितेतून पुन्हा नवा जन्म घेतो. माणूसही असाच पिढ्यान् पिढ्या आत्महत्या करीत बेचाळीस जन्म घेत राहतो. पण या माणसात कवी हा वेगळाच असतो, असे या कवीला आत्मकौतुकाने म्हणायचे आहे. कवीला स्वत:चे शरीर नसते. बॅटरी, सेल नसताना सुंता कलेले जननेंद्रिय नसते वगैरे अनेक गोष्टी या ठिकाणी कवीने सांगितलेल्या आहेत. यातून अर्थ निघतो तो असा काहीतरी की, 'कवीला माहित असते फक्त कयामत की रात आणि बेचालिस फिनिक्स हाराकिरी' या दोनच कवितांच्या संदर्भावरुन उमगते की कवीला असा एक 'मूड ' आहे. तोच तो 'मूड' या संग्रहातील साऱ्या कवितांमधून ताणलेला आहे. 'ईश्वर दोन मूडस' या कवितेत ही भूमिका थोडी स्पष्ट झाली आहे ती अशी –

'... तू असणारच कुठे?

तुझे अस्तित्व तूच नाकारलेस,

विश्वामित्री हाताने

तूझे अस्तित्व तूच झुगारलेस

नास्तिक होऊन... तूच' या कवितेत असा भास होतो की कवी ईश्वराला काही म्हणत आहे पण तो भास आहे. कवी स्वत:लाच म्हणत आहे माणसाने स्वत:च्या अस्तित्वाला नाकारले आहे. ही कवीची जाणीव म्हणजे एक दारुण स्मशान जाणीव आहे. हेच खरे मर्तिक! ही जाणीव कवीच्या साऱ्या कवितांतून सावध आणि बेसावध घोटाळत आहे. पण त्या जाणिवेत खंत नाही व मूल्याचे भान ही नाही व संदर्भही नाही, असे परखड परीक्षण बेडेकर यांनी केले आहे.

खोतांच्या कवितांची मग्नता किंवा 'मूड' तात्पर्याच्या मागे धावण्याचा नाही. तो साऱ्या तात्पर्यांनाच झिडकारण्याचा मूड आहे, असे मत दि. के. बेडेकर यांनी व्यक्त केले आहे. खोत यांच्या कवितेबद्दल अतिशय परखड मत बेडेकर यांनी मांडले आहेत. कवितेच्या माध्यमाबद्दल एक गैरसमज बाळगून कविता रचत आहेत. कविता म्हणजे काही निबंध नाही हे खरे पण कविता म्हणजे असंदर्भ क्षणांची माळ ही नाही. 'रस्ते' या शब्दांशी 'सस्ते' हा शब्द तसेच 'वस्त्रांचे माग, वस्त्रे महाग' ते अर्थहीन पण जोडून देतात. केवळ नादसाधर्म्याने सुचलेला शब्द असा उगीच कवितेत येतो. नुसता शब्दच 'मुड' ला आकार देतो, एकेक सुटी प्रतिमा 'मूड'ला स्थिर करते. असा खोत यांचा ग्रह झालेला दिसतो. तो चूकीचा ग्रह आहे, असे बेडेकर यांनी ठामपणे नमूद केले आहे. नवकवितेमध्ये प्रयोगशीलतेच्या नावाखाली अशा चूका नवकविंच्या काव्यात आढळतात, ते वास्तव आहे.

काव्यसमीक्षा ही गोष्टच अशी आहे की, तेथे न्यायाचा प्रश्न नसतो. हृदयसंवादाचा असतो. तेव्हा खोतांच्या कवितांमधील शब्दांनी, प्रतिमांनी व मुडस्नी, बेडेकरांच्या मनात काय व कसे येत गेले तेवढे त्यांनी सांगितले आहे. ते त्यांनी परखडपणे व जिव्हाळ्याने सांगितले आहे. नव्या जाणिवांचा, अवघड शोधांचा, निर्भय आत्मकौतुकाचा आणि बेबंद अवडंबराचा हा एक काळ आहे. एक नवे प्रबोधन साऱ्या जगातील तरुण पिढीच्या रक्तात जागे होत आहे. त्या जागृतीची चाहूल मराठी नवसाहित्यातही लागत आहे. पण ही चाहूल का हूल आहे असा संभ्रम पडावा अशी ही निर्मिती या आरंभ काळात घडत आहे, खोत यांनी निर्मिलेली कविता चाहूल आणि हूल यांच्या सीमरेषेवर नांदणारी आहे, असे स्पष्ट मत बेडेकर यांनी नोंदवले आहे. डॉ. वसंत बिरादार 'मर्तिक' बद्दल लिहितात, ''चंद्रकांत खोत यांच्या 'मर्तिक' मध्ये या पिढीच्या कवितेची अनेक वैशिष्ट्ये प्रतीत होतात. अभद्र विषयांचे अर्वाच्य अविष्कार अनुभव घेण्याची वेगळी प्रद्धती व तिची धीट भाषेत अभिव्यक्ती, विषमतेबरोबरच अर्थशून्यतेची जाणीव व त्यापोटी येणारी चीड बीभत्सपणाबरोबरच दुसरीकडे भावुक हळूवारपणा या वैशिष्ट्याबरोबरच 'मार्तिक'चे मर्यादित भावविश्व व ठराविक आवर्तने जाणवू लागतात.''[९]

*** क्रांतिकारी कार्यकर्त्यांची कविता :–**

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे अंतरंग तपासून पाहताना देवानंद सोनटक्के यांना सुर्व्यांची कविता साधी, सोपी, अनंलंकृत वाटते. सुर्व्यांच्या कवितेत ही सुबोधता कशी आली? कारण तिची अभिव्यक्ती सरळ आहे. तिची भाषाही काव्यभाषा नाही, तर बोल भाषा आहे. ती प्रतिमा अलकारांनी सजलेली नाही, ती कामगारांची आहे. ही कारण तर खरी आहेतच पण तिचे हे सोपेपण तिच्या आशयाच्या कुशीतून स्वाभाविकपणे जन्मलेले आहे आणि हा आशय वास्तववादी आहे. हे वास्तव जीवघेणे आणि वेदनापूर्वी आहे, आणि हे वास्तव कधी सुखद आणि कधी आशावादी ही आहे. कामगार जीवनाचे वास्तव त्यांच्याही वाट्याला आले. पण ह्या वास्तवाने सुर्वे वाकले नाहीत, दबले नाहीत, मोडले तर नाहीच नाही. त्यांच्या कवितेत या असल्या दु:खाबद्दल तक्रार नाही आणि दु:खाचे प्रदर्शनही नाही, कारण काव्यविषयी नाराजी नाही. मात्र कपट करुनही भाकरी दुरापास्त कशी होते याचे रास्त व जागरुक भान मात्र रेखांकित झाले पाहिजे, ही त्यांची भूमिका देवानंद सोनटक्के यांनी स्पष्ट करुन सांगितली आहे.

''पण कुणी सांगेल काय? ह्या शतकात चंद्र महागला होता।
कलकत्याच्या रस्त्यावर घोडा होऊन माझा आत्मा बग्गी ओढत होता।
पण एवढे पुरे, आपण ही आता धुरकटलेले चष्मे बदलून घ्यावेत।
आपण या शतकात जन्माने; आपलेही हिशेब चुकते करावेत।''

सुर्व्यांच्या 'जाहीरनामा' मधील ह्या ओळी किती साध्या आणि सोप्या आहेत. कुठे तक्रार नाही की सजावट नाही. कवी नारायण सुर्वे हे समूहगर्भ आत्मनिष्ठा आणि अभिव्यक्ती गर्भ समूहनिष्ठा जोपासतात आणि मग असल्या कवितेला मौलिकता, महात्मता प्राप्त होत असते. सुर्व्यांच्या कविता या पदाला पोचल्या आहेत. अशा निष्ठांमुळेच तर त्यांचा 'जाहीरनामा' हा काव्यात्म होतो आणि आपल्या एखाद्या सामाजिक कार्यकत्यांचे प्रेमपत्रही जाहीरनाम्यासारखे होत असते.

''सर्वकाही नाकारुन माझे शब्द केव्हाच निघालेत।
अजून तुझी आवराआवर झाली की नाही?।

ते रुद्राक्ष, पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव।

कालच म्हणालीस, कुणीही भले केले नाही।''

आजच्या सामाजिक कवितांहून सुर्व्यांची ही कविता वेगळी आहे. ती विद्रोही आहे. पण आक्रमक नाही. ती ईश्वर–धर्म–परंपरा नाकारणारी आहे. पण त्यांना शिव्या देणारी नाही. ती वास्तववादी असून घटनाप्रदान नाही आणि कामगारांची असून प्रचारी नाही. घोषवाक्यांची नही, असे नारायण सुर्वे यांच्या 'जाहीरनामा' मधील कवितांचे वेगळेपण देवानंद सोनटक्के यांनी आपल्या परीक्षणात टिपले आहे.

नारायण सुर्वे यांच्या कवितेमधून सामर्थ्यावर असणारा त्यांचा विश्वास प्रकट होतो. याकडेही सोनटक्के यांनी लक्ष वेधले आहे.

'त्याच वस्तीतून आपला सूर्य येईल।

तोवर मला गातच राहिले पाहिजे

नगरवेशीत अडखळतील ऋतू।

तोवर प्रिये जागत राहिले पाहिजे।'

सूर्व्यांची कविता किती आरक्त आहे, कधी ना कधी हे जक आपल्या अंतर्मनातल्या जगासारखे, मार्क्स एंजलसचे स्वप्न पूर्ण करील याची त्यांना खात्री आहे. एवढ्या दुर्दम्य आशावादाची भाषा सुर्व्यांची कविता बोलू शकते याचे कारण सांगताना देवानंद सोनटक्के लिहितात, 'ती एका ध्येयवेड्या, स्पप्नवेड्या कवीची कविता नसून ती क्रांतिकारी अशा कार्यकर्त्याची कविता आहे. या आशावादाचे आणखी एक कारण आहे,'सुर्व्यांच्या आंतरिक वास्तवाला साहित्य आणि जीवन यांनी घडवलेले आहे. साहित्यातील विचारवंतांच्या प्रेमाने त्या वास्तवाला घडवलेले आहे, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. नारायण सुर्वे यांच्या कवितेविषयी लिहिताना त्यांनी सुर्व्यांच्या कवितेचे वेगळे सांस्कृतिक पर्यावरण विशेषत्वाने नोंदवले आहे. सुर्व्यांच्या कवितेतील मानव्यनिष्ठा आशय–अभिव्यक्तिचा कमालीचा संयम व साक्षेप वस्तुनिष्ठतेचा आत्मप्रत्यय यांचा ते उल्लेख करतात.

*** भाव कविता :–**

'कालस्वर' या शंकर वैद्य यांच्या कविता संग्रहाचे प्रभाकर श्रीधर नेरूरकर यांन केलेले परीक्षण मार्मिक आहे. आजची नवी कविता शंकर वैद्यांच्या या कवितेच्या रूपाने पुन: माहेरवाशीण तर झाली नाही ना?हा कालस्वर कोणता आहे? म्हणजे त्यांचा ताल, त्यांची लय प्रचलित काव्यप्रवाहांची तुलना करता कालबाह्य ठरतात. याउलट ही कविता भावनिष्ठ व आत्मनिष्ठ स्वरूपाची आहे व म्हणूनच तिला अठराव्या–एकोणिसाव्या शतकातील आंग्लकविताप्रमाणे (चेस्ट) कविता म्हणता येतील इतकी नितळ व निर्मख नाही. ते सोज्वळ व घरंदाज घराण्यातील स्त्री–पुरूषांप्रमाणे सभ्य व सौम्य प्रकृकतीचे आहे.

१९५१ पासून १९६९ पर्यंतच्या एकूण बासष्ट कवितांचा संग्रह 'कालस्वरात' झाला आहे. त्यांच्या कवितांचा हा 'कालस्वर' बेताल नाही व बकाल नाही. तो मराठी कवितेच्या युग अंगाने सुस्वर आहे, सुबोध व संपन्न आहे. याचे स्पष्ट कारण असे आहे, की शंकर वैद्य हे जीवनातले भावानुभव तेवढेच टिपतात. त्यामुळे त्यांची कविता नेमकी व नेकीने भावकविता होऊन राहते. त्यांच्या आंतरिक संवेदनांची स्पंदने तिरकी, तिरसट न बनता सरळ एकेरी भावमार्गावरून 'बनट्रॅक्ट' मनाने स्फुरण पावतात व मग अर्थ शब्दांच्या सुसंवादी मागोवा काढीत काव्यबद्ध होतात.

या कवितांतून कवीला सापडतो तो धागा 'जन्माच्या बीजा'चा असतो. आदी बिंदूतून जन्म वेचीत व गुंफीत कवी येतो व आपल्या जन्माची शय्या व सोबतीला मन 'तू' ला देतो, कवीची 'तू' ही भूतकाळची निसटूनिया गेलेली, छायामय झालेली 'वेळा'च असते. त्या गूढ कामिनीला विवस्त्र करणाऱ्या निऱ्यांस झटू न घेता ओढून क्षणांची निरीनिरी उकलते. आणि तरीही कुणीतरी गूढ क्षणांची वस्त्रे 'तू' ला पुरवीत असतो. 'ही' 'तू' वेगवेगळ्या स्वरूपात कवीच्या जीवनात वेगवेगळे 'कालस्वरा' स्वरूपात कवीच्या जीवनात वेगवेगळे 'कालस्वर' निर्माण करीत असते.

दीर्घपदी काव्यरचनेचा एक प्रयोगही शंकर वैद्य यांनी केला आहे. 'बादली', 'खाष्ट म्हातारा','कळून कलस' या कवितांतून तात्त्विक आत्मचिंतन व आत्मकथन ते करतात. कवी

जेव्हा कालप्रवाहाला शरण जाऊन सामाजिक व राजकीय वास्तव आपल्या कवितांतून प्रकट करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांची कविता कंटाळी, कृत्रिम होते, असे परखड शब्दात आपले मत नेरूरकर मांडतात.

*** चिंतनात्मकता :–**

आरती प्रभू यांच्या 'नक्षत्रांचे देणे' या कविता संग्रहाचे मुकुल बोरसे यांनी परीक्षण केले आहे. आरती प्रभूंच्या श्वासनि:श्वासांचा ठेवा म्हणून, त्यांच्या इतर संग्रहाप्रमाणेच, 'नक्षत्रांचे देणे' या कवितासंग्रहाकडे बोरसे पाहतात, कोणतीच आणि कोणाचीही कविता चिंतनाशिवाय स्वत: मोठी होऊ शकत नाही. हे चिंतन बेगडी असून चालत नाही. चिंतनाची मूलभूत प्रवृत्तीच व्यक्त व्हायला हवी. ती तशी होताना किती तरी नवनव्या दिशांनी धावत असते आणि नवनव्या रूपांना स्वभावत: च जन्म देत असते.

मुकुल बोरसे लिहितात की चिंतनाचे स्वरूप या ठिकाणी अंर्तबाह्य असे आहे. म्हणजे असं की सूर आणि घंटाध्वनी एकत्रित आहेत. 'तो कुणी माठ्यातला' ही एकाचवेळी समरूपाची जाणीव असते. दोन असले तरी 'मी' च ठरतात आणि उरतात. अंतर्बाह्य चिंतनाचं एकजीव मिश्रण म्हणजे आरती प्रभू. अंतर्बाह्य चिंतनामुळं असं झालं की आरती प्रभूंचा कोणताही अनुभव असो तो काव्यरुप पावताना फक्त कविता म्हणूनच जन्माला आला. मग तो–

'उजाडणारा प्रत्येक दिवस आकाशाचा गर्भपात
जीवने असतात अनेकदा आत्महत्याच्या अफवा

या स्वरुपाचा असो किंवा–

हजार मोरांचेच पिसारे अंधारावर आले,
वेढून आले तिच्याच देहा तिच्याच देही मिटले'

असा असो. आरती प्रभू चिंतनाचीच एक बृहत् प्रतिमा जन्माला घालू पाहतात. त्यामध्ये वेदनांचे, दु:खाचे, शोकांचे उदासीन आणि मुख्य म्हणजे मृत्यूच्या अपूर्व प्रश्न जाणिवांचे विविध क्षण आहेत. या सर्वाभोवती काळाची जाणीव परीज्ञ करुन उभी आहे. याच परिघांवरील कितीतरी प्रश्न होवून आरभी प्रभू हा कवी जगला आणि याच परिघावरील प्रश्नांना कवटाळूक मेला. त्याची

कविता म्हणजे त्याचे श्वासनि:श्वास ते या साठी. रोचना भडकमर आरती प्रभूबद्दल लिहितात, ''आरती प्रभूंच्या कवितेतून प्रत्ययास येणारा हा अनुभव बहुविध व वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा अनुभव भावपूर्ण व संयत असून अंतर्मनाचे पापुद्रे अलगदपणे उलगडणारा आहे. भावनेच्या भरात वाहून जाणे त्यांच्या कवितेस मानवत नाही.''[१०]

*** कथासंग्रह परीक्षणे :–**

कथा हा लोकप्रिय, रसिकप्रिय व वाङ्मय प्रकार मानला जातो. मानवी भावभावना, मनोविकार, भावसंघर्ष, यांचे समग्रतेने दर्शन या कथा संग्रहाच्या परीक्षणात आढळते. त्यामध्ये कथा संग्रहातील विविध कथा, त्यांची शीर्षक व समर्पकता, कथानक–आशय, विषय, पात्ररचना यासंबंधी साधक–बाधक चर्चा केल्याचे दिसून येते. 'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये जी ग्रंथपरिक्षणे झाली त्यामध्ये विविध कथासंग्रहांना स्थान देण्यात आले. काही कथा संग्रहांचे परीक्षण स्त्री समीक्षकांनीही केल्याचे दिसून येते. त्यामध्ये मोहिनी वर्दे, मंगल दाभाडे, शकुंतला आठवले, प्रतिभा पोरे, शकुंतला जोग यांचा समावेश आहे.

*** भाषेचा नेमकेपणा :–**

'माळ' या विद्याधर पुंडलिक यांच्या कथा संग्रहाचे परीक्षण करताना मोहिनी वर्दे यांनी पुंडलिक जुन्या प्रेरणेतून लिहितात असा अभिप्राय नोंदवतात. त्याचबरोबर त्यांची कथा नव्या पद्धतीने रंग, रुप, आकार घेत जाते. तिच्या प्रकटीकरणात तिचे आधुनिकत्व जाणवते, ते प्रामुख्याने तिच्या भाषेमुळे. पुंडलिकाच्या भाषेचे काही विशेषांचीही त्या नोंद घेतात. त्यांची भाषा, सहज, रोजच्या बोलण्यातली, वरवरची सोपी वाटणारी पण नेमकेपणाने व्यक्त होणारी आहे. मुख्य म्हणजे कथेतील अनुभव व्यक्त होत असताना तिच्या सूत्रामध्ये विक्षेप न आणणारी अशी आहे. त्या त्यांच्या सहज ओघवत्या भाषेमुळेच त्यांची कथा वाचताना आपल्या प्रत्यक्ष परिचयाच्या जीवनाविषयी वाचत आहोत असे वाचकाला वाटते, असे मोहिनी वर्दे नमूद करतात. मोहिनी वर्दे पुंडलिकांच्या कथेचे वैशिष्ट्य नमूद करतात– पुंडलिकांचा अनुभव हा त्यांचा नसून आपलाच आहे, असे वाटायला लावण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे.

पुंडलिकांच्या 'माल' ह्या कथा संग्रहातील पुष्कळशा कथामधून एक तात्पर्यात्मक अनुभव

आपल्याला जाणवतो. ह्या अर्थाने त्यांची कथा पूर्वीच्या लघूकथेशी निगडित आहे. ती एका उत्कृष्ट बिंदूंच्या भोवती आकारत जाते. 'जेव्हा पहाट होते', 'अपार', 'माल' ह्या कथांतील सूक्ष्म तरल अनुभवाने विलक्षण भावनिक परिणाम साधल्याचे त्यांनी नमूद केले आहे. मनुष्याचे एकटेपण ह्या कथातून भावरुप झाले आहे. ह्या तीनही कथांतील एकटेपण जीवनाला शरण्य असे या परीक्षणात्मक अभिप्रायात म्हणतात.

*** मृत्यूचा संदर्भ :–**

मोहिनी वर्दे यांनी पुंडलिकांच्या कथांच्या परीक्षणात पुंडलिकांच्या ह्या कथासंग्रहातील अनेक कथांतून कोणत्या ना कोणत्या प्रकारे मृत्यूचा संदर्भ येतो यावर लक्ष केंद्रित केले आहे. 'अपार' या कथेत प्रत्यक्ष मृत्यूचे प्रसंग आहेत तर 'माल', 'लांडगा आरे रे!' 'बोलावणं' या कथांतून मृत्यूचे वेगवेगळ्या दर्शन बिंदूतून प्रकटीकरण होते, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे.

चोहीबाजूंनी जिवंतपणाने उफाळणाऱ्या मानवी संबंधाच्या तांडवात मनुष्य किती एकाकी असतो त्यांच्या लहान मुलांवरील कथांतूनही याची प्रचीती येते. बालपणापासून वृद्धांपर्यंत हे एकाकीपण मनुष्याला घेरुन टाकते. ही जीवनाबद्दलची अपरिहार्य जाणीव पुंडलिकांच्या बहुतेक कथांची बैठक असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे. मृत्यूसमान भीषण अनुभवाच्या आजकालच्या पुष्कळशा कथेमध्ये त्यांचे उग्र आविष्करण दिसते. एखाद्या रसायनाचा विषारी अर्क पिळून घ्यावा तशी कथा मनाला तीव्र संवेदनांचे हादरे देत देत शेवटी बधिर करते. परंतु पुंडलिकांच्या कथेचे वेगळेपण नमूद करताना वर्दे लिहितात. ''पुंडलिकांची कथा अशा वेळी मंद आवर्तने घेते. त्याच्या आशयाची जात सौम्य आहे. पात्रांचे आणि शैलीचे एक मार्दव वाचकाला त्यातून जाणवते.''

*** नाट्यगुण :–**

वर्देनी पुंडलिकांच्या एका मौलिक विशेषांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. ते म्हणजे कथांतील 'नाट्यगुण', 'बोलवण', 'बंट्या', 'अपार' ह्या कथांतील भावनाट्य उत्कटतेने व्यक्त होते. भावगर्भ अनुभवातील नाट्य ते जितक्या समर्थपणे व्यक्त करतात तितके प्रभावी विचार नाट्यदेखील त्यांच्या काही कथांतून प्रगट होते. जीवनातील सारा बहार जळून गेल्यामुळे पति

निधनानंतर दु:खनिरपेक्ष जीवन जगू पाहणाऱ्या वत्सलेच्या जीवनात एक स्थित्यंतर घडते. दिवंगत पतीचे एक नवे रुप आकाराला येते. तिचे व्यक्तिगत दु:ख आणि ते नवे रुप ह्यातील द्वंद्व ह्या कथेत गडद होते. पुंडलिकांच्या इतर कथासंग्रहाप्रमाणे ह्याही कथासंग्रहात लहान मुलांचे भावजीवन त्यांच्या कुतूहलाचा विषय होतो. ह्या मुलांच्या विश्वातील त्यांना अनाकलनीय असणाऱ्या प्रश्नांनी ही मुले बेचैन होतात. त्यांच्या चिमुकल्या भावविश्वात हे प्रश्न त्यांच्या एऱ्हवीच्या आनंदाला निकराने येऊन भिडतात आणि भयमिश्रित सुखदु:खे नाट्यरुप घेतात. पुंडलिकांच्या 'माळ' या कथासंग्रहाबद्दल आपला अभिप्राय नोंदवताना लिहितात की, एकूण खेळकर, मिश्किल, खोचक, बालिश, प्रौढ, गंभीर, विद्युत जड उपरोधिक अशा अनेक तपमानांनी युक्त अशी पुंडकिलकांची कथा आहे. एका परीने कथालेखकाची अनुभव घेण्याची व अनुभव व्यक्त करण्याची पद्धतच परीक्षणकाराने वेचली आहे हे यावरुन स्पष्ट होते.

*** बाहुले :–**

'बाहुले' या प्रा. सुधाकर देशपांडे यांच्या कथासंग्रहाचे मंगल दाभाडे यांनी परीक्षण केले आहे. 'या कथा भूगर्भातून अलौकिक तेज घेऊन येणाऱ्या खनिज अगर रत्नांच्या नाहीत की तरल स्वप्नांचे हळवे पंख लेवून निळ्या आकाशात गिरक्या घेत फिरणाऱ्याही नाहीत, तर याच जमिनीत रुजलेल्या, जीवनरस शोषत फुललेल्या या जमिनीला हदरा बसताच पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडणाऱ्या, कोणीतरी कळ दाबताच हसणाऱ्या–रडणाऱ्या, मान टाकणाऱ्या सामान्य माणसांच्या–बाहुल्यांच्या आहेत.' असा अभिप्राय नोंदवला आहे.

मानवी जीवन दिसताना जरी साधे, सोपे व एकरेषीय दिसत असले तरी प्रत्यक्षात ते गुंतागुंतीचे, दुर्बोध व कमालीचे वक्र असते. माणूस हा नियतीच्या हातातला कठपुतळी बाहुलाच असतो. ती जशी नाचवेल तसे त्याला नाचावे लागते. मनावाचा मेंदू हा सतत विश्वरचनेचे संदर्भ शोधण्यासाठी तगमगत असतात. त्यातून निरनिराळे जीवनविषयक तत्वज्ञान उदयास येते. त्यातूनच माणूस आपल्या जीवनाला निरनिराळे अर्थ देण्याच्या प्रयत्नात असतो. यातूनच आलेले कल्पनेचे एक म्हणजे नियतिवाद मराठी कथाही या वावटळीत सापडली आहे. प्रा. सुधाकर देशपांडे यांच्या कथेतूनही जणू ही नियती पाठपुरावा करीत आली आहे, असे निरीक्षण मंगल

दाभाडे यांनी नोंदवले आहे.

प्रा. सुधाकर देशपांडे यांच्या कथेमधूनही नियती पाठपुरावा करीत आली आहे, असे वाटत असले तरी ह्या कथाकाराच्या स्निग्ध, विलक्षण, शांत व संयमी दृष्टिकोनाच्या व भाषाशैलीच्या संस्कारामुळे तिचे ते पाशवी स्वरुप गळून पडते व अत्यंत स्वाभाविक, सहाजिक असे जीवनाचे अस्तित्व या कथांमधून जाणवू लागते, असे मंगल दाभाडे यांनी परीक्षणात म्हटले आहे ते यथार्थ वाटते.

*** मानवी मनाची जीवनाची गुंतागुंत :–**

'बाहुले' या कथासंग्रहातील कथा आपल्या जीवनात व मनात काय घडले होते? काय घडणे संभाव्य होते? याचा शोध घेताना दिसतात. तसेच काही गोष्टी निर्भीडपणे आत्मनिवेदनातून पुढे आल्या असल्याचे मंगल दाभाडे यांनी सूचित केले आहे. या जगात वावरणाऱ्या कथानायकाचे मन एका अर्थाने चिरतरुण आहे. इथे उपस्थित झालेले प्रश्न बालमनाचे अगर वृद्ध मनाचे असून बहुतेक सगळे प्रश्न ऐन कारुण्यातील आहेत. याकडे परीक्षणामध्ये दाभाडे यांनी लक्ष वेधले आहे. ह्या संदर्भात त्यांनी 'धुके', 'ताजमहलाचा खर्च' व 'वटवाघूळ' या कथा विचारात घेतल्या आहेत. तसेच याच कथांमध्ये काहीसे उत्कट, अपरिपक्व व अस्फुट असे प्रेमाचे रुप आहे. ह्या प्रेमाचा स्वीकर वास्तवात नसतोच आणि हे प्रेम अलौकिक अगर अशरीर असते असेही नाही. तारुण्य सुलभ अशा आकर्षणातून निर्माण होणारे पण सुकुमार, वेडे, काहीसे हळवे असे ते रुप आहे. पण ह्या प्रेमाचे दुसरे रुप, दुसरे टोक 'इंद्रनाळ' व 'बाईलवेडा'या कथांमध्ये दिसते. थोडक्यात प्रा. सुधाकर देशपांडे यांच्या कथा मनाचा तळ शोधण्याचा, समजून घेण्याचा व हाती लागलेले पुसट सत्य मांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या आहेत, हे मंगल दाभाडे याच्या परीक्षणातून स्पष्ट होते. मानवी मनाची व जीवनाची गुंतागुंत, अनाकलनीयता यांना कोठेतरी अनाहूत स्पर्श करण्याचे सामर्थ्य प्रा. देशपांडे यांच्या कथामध्ये असल्याचे परीक्षणामध्ये म्हटले आहे. लेखकाने हे सामर्थ्य ओळखावे आणि या पद्धतीने अनुभव पारखण्याची व चिंतनाची प्रक्रिया पुढे चालवावी अशी अपेक्षा दाभाडे यांनी व्यक्त केली. प्रा. सुधाकर देशपांडे यांचा हा कथासंग्रह काही उमेदवारीच्या तर काही परिपक्वतेच्या, काही नवखेपणाच्या तर काही परंपरानिष्ठेच्या खुणा घेऊन आलेला हा कथासंग्रह

असल्याचे नमूद केले आहे.

*** कथालेखनामागील भूमिकेचा शोध :–**

'एरिअल आणि पोरक पाखरु' या अनिल डांगे यांच्या कथासंग्रहाचे शकुंतला आठवले यांनी परीक्षण केले आहे. कथाकार आणि कथा या दोन्हींच्या अनुषंगाने त्यांनी परीक्षण केले आहे. डांग्यांच्या कथालेखनामागील भूमिका विशद करताना त्यांनी जॉनपॉल सार्डच्या Nausea या कादंबरीतील अवतरण दिले आहे. ते असे–

> Every Exist is born
> Without reasons, prolongs
> Itself out of weakness
> And dies by chance.

या अवतरणावरुन डांग्यांची कथालेखनामागील भूमिका विशद केली आहे. Bates ने म्हटले आहे की, "for in the final analysis it is not the writer that is important, but the man, net the technicat but the character" बेट्सला अपेक्षित असणाऱ्या लेखकामागील व्यक्तीचे दर्शन या अवतरणापासून घडू लागते.

शकुंतला आठवले यांनी आपल्या परीक्षणात डाग्यांनी 'अस्तित्वाचा शब्द', 'अंधक', 'अंतरिक्षातील रॉबिन्सन क्रुसो', 'साधुवाण्याची नाव' आदी कथामधून या विश्वाच्या अफाट पसाऱ्यात मानवाचे अर्थहीन निर्हेतुक–अपघात अस्तित्व स्वत:चे स्वातंत्र्य राबवीत कसे एकटे जगत आहे. याचाच वेध आणि शोध डाग्यांनी कसा घेतला आहे, हे स्पष्ट करुन दाखविले आहे. तसेच मानवी जीवनातील अर्थशून्यता हीच एक समस्या झाल्याने तिचा जणू वेध आणि शोध घेत मानवतेचे 'पोरक पाखरु' फिरत आहे आणि त्या कथांच्या 'एरिअल' मधून संवेदना पकडणाचा प्रयत्न करीत आहे.

अनिल डांगेच्या कथा निवडीच्या संदर्भात शकुंतला आठवले परीक्षणात लिहितात, 'कथांची निवड डाग्यांच्या विकसित विचारशक्तीचा आणि स्वदनांचा आलेख काढता येईल' अशा रीतीने केलेली, असून त्याच क्रमाने कथांची मांडणी केली आहे. त्यामुळे या चौदा कथा लक्षवेधी ठरल्याचा अभिप्राय परिक्षणामध्ये नोंदवला आहे. डाग्यांच्या खास कथामध्ये आयुष्यातल्या प्रत्येक

क्षण शेवटी 'इन्फिनिटा' ला समांतर होत जाणारा शिल्लक राहतोय. तो फक्त अर्थशून्य पोकळक्षचा बुडबुडा असे अस्तित्ववादी भाष्य करताना 'फॉसिलस' 'सूर्य, काच आणि यंत्र' आदि कथामधून मिळत असले तरी साधुवाण्याच्या रुपात मात्र डाग्यांनी शाश्वत, अस्सल मानवी जिद्द दाखविली आहे. तो शरण जात नाही. सुकाणू मोडलेल्या नावेतीलही पाचोळा वाचवू पाहतो आणि माझं दु:ख हा सुद्धा माझ्या स्वातंत्र्याचाच भाग. माझा कलावंतही स्वतंत्र आहे. तिची नियती तिच्याबरोबर असे तत्वज्ञान बोलतो.

शकुंतला आठवले यांनी आपल्या परीक्षणात डाग्यांच्या अखेरी जशा वाचकांच्या विचारशक्ती गुदमरुन टाकतात, तशाच त्यातील प्रतिमाही भेदक असतात असे म्हटले आहे. त्यांचे प्रत्यंतर 'अंधक' मध्ये काचेरी चिमण्यांच घरटं निरर्थक शोभेच्या मानवी संबंधातील वैयर्थ्य सांगते लावसटव गूढ टेकडी त्यांच्या तुटक, संदिग्ध पत्नीची सूचक आहे. पुराण कथांच्या संदर्भानाही डाग्यांनी वेगळे आशय कसे दिले आहे, हे स्पष्ट केले आहे.

डाग्यांची भाषा अजून साचेबंद झालेली नाही. काटेकोर, अर्थाची अनेक वलये निर्मिणारी त्यांची भाषा तरलपणे वावरचे आणि 'मिथून शिल्प' मध्ये तर कथा आणि काव्य यांच्यातील सीमारेषा कशी विरळ होत गेली आहे, हे दाखवून दिले आहे. 'एरिअल आणि पोरकं पाखरुं' केवळ वाचायची बाब नसून भोगण्याची बाब आहे. वाचनाअखेरी अनुभव येतो. 'साधुवाण्याच्या नावे'तील महर्षीसारख्या! 'महर्षीच्या' दिव्य दृष्टीला आदि साक्षात्कारापेक्षांही महान असे काहीतरी यातून जाणवले त्याचे प्रेणित, भाष्यकार ओठ नुकतेच थरथरत राहिले; आदिमतेकडे झुकणाऱ्या या लेखकाच्या संज्ञा 'एरिअल' मधून जाणून घेणे हा अनुभवच सर्वात अर्थपूर्ण असल्याचा अभिप्राय परीक्षणाच्या शेवटी शकुंतला आठवले यांनी नोंदवला आहे.

*** प्रौढ मनाच्या कथा:–**

'अंधारवाटा' या शांताराम यांच्या कथासंग्रहाचे 'प्रौढ मनाच्या कथा' या शीर्षकाच्या आधारे परीक्षण केले आहे. उत्कटतेचे, आवेगाचे वळसे पचवून एका संथ स्थिर व संयमी वळणावर पोहोचलेल्या प्रौढ मनाच्या या कथा आहेत, असे म्हटले आहे. शांताराम हे कसलेले लघूकथा लेखक आहेत आणि आधुनिक कथेतील त्यांचे स्थानही सर्वमान्य आहे. तरीही हा

कथासंग्रह त्यांच्या स्वत:च्या कथांत आणि एकूण कथा प्रवाहात वैशिष्ट्यपूर्ण ठरावा, यात शंका नाही, भाषा प्रभूत्व, सफाई, काटकसर व औचित्य ही त्यांच्या साऱ्याच कथांची वैशिष्ट्ये आहेत. पण या कथा संग्रहात ती अधिक आत्मविश्वासाने प्रकटतात, असे प्रतिभा पोरे यांनी म्हटले आहे. त्या दृष्टीने 'खेळणे', 'रती', 'अंधारवाटा' व 'सत्यभामा' या कथांतील संवादाचे नेमकेपण आणि औचित्य उल्लेखनीय असल्याचे आपल्या परीक्षणात नमूद केले आहे. तसेच त्यांनी एकूण भाषा शैलीच अतिशय अनलकृत, संथपणाने पुढे सरकत जाते ही रेंगाळणारी शैली एकूण कथानुभवात अडथळा तर आणत नाही ना, अशी शंका मात्र काही मनात डोकावून जाते, असे पोरे यांनी म्हटले आहे.

*** प्रतिक प्रतिमांवर लक्ष केंद्रित :–**

जी. ए. कुलकर्णी यांच्या 'रमलखुणा' या कथासंग्रहाचे शकुंतला जोग यांनी परिक्षण केले आहे. 'रमलखुणा' हा जी. ए. कुलकर्णी यांचा मिथिक कथांचा संग्रह. या दोनच दीर्घकथा आहेत. (प्रवासी, एस्किलर) जी. ए. च्या कलाकृती नेहमीच अंधाऱ्या गुढ आणि झापटून टाकणाऱ्या असतात. जी ए. च्या संवेदना किंवा जाणिवेच्या मुळाशी नेहमी जीवनाच्या शोकात्मकतेची दु:खमयतेची जाणीव असल्याचे नमूद केले आहे.

रमलाचा ध्यास, वेध घेत वणवणत जाणाऱ्या माणसाच्या कथा रमलखुणामध्ये आहेत आणि आम्रफलांप्रमाणे कथेला ठायी ठायी लटकलेल्या प्रतिमा हे जी. ऐ. चं खास वैशिष्ट्य शकुंतला जोग यांनी नमूद केले आहे.

शकुंतला जोग यांनी जी. ऐ.च्या रुपककथामध्ये अनिमा, अनिमस आणि प्रवासाचे आदिबंध कसे पुनरावृत्त होतात त्याचा साक्षेपाने वेध घेतला आहे. त्यांच्या कथेतील आदिबंधात्मक आशयाचे नवचिंतनात्मक अंग भावप्रधान अंगाहून अधिक प्रभावीपणे प्रकटले आहे. त्यामुळे त्या कथा वाचकाला जाणीवपूर्वक सून्न करतात पण भावविश्व नव्हे. त्यांनी 'एस्किलर' कथेतील वीर नायकाचा व प्रवासाचा आदिबंध लक्षात घेताना पाचांच्या कृतिउक्तीचा, घटनांचा अर्थ लावला आहे. त्यांची आदिबंधाच्या उभारणीतील मौलिकता स्पष्ट केली आहे.

जी. ऐ. च्या रुपक कथांचे अर्थ लावण्याचा प्रयत्न जोग करतात. जी. ए. कुलकर्णीच्या

'प्रवासी' या कथेतील प्रतीक–प्रतिमांवर लक्ष केंद्रित करुन त्यांचा अर्थ लावतात. त्यातून वीर नायकाचा आदिबंध कसा अविष्कृत होतो हे दाखवितात. त्याची संघटना, त्यांचे स्वरुप व कथात्मकार्य, त्यातील नवे परिणाम–कतेची अन्यूनतिरिक्त बांधणी, सौंदर्य यांचीही उकल करतात.

*** अदृश्य नियती :–**

'काजळमाया' या जी. ए. कुलकर्णी यांच्या कथासंग्रहाचे चंद्रकांत बांदिवडेकर यांनी परीक्षण केले आहे. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी कथेतील अनुभव, त्याचे व्यामिश्र सूचक आकार, घटना, घटनांची विविध आकार धारण करणारी गुंफण, भिन्न परस्परविरोधी प्रेरणांच्या ओढाताणीतून चित्रित केलेली पात्र, यातून निर्माण होणारे अनुभवविश्व, तसेच लेखकाची अनुभव घेण्याची पद्धती व अविष्कार या घटकांच्या सहाय्याने व या क्रमाने ते जी. एं. च्या कथांचा अभ्यास करतात. जी. एं. च्या अनुभव घेण्याच्या पद्धतीमध्ये एक गरगरणारा भोवरा आहे व त्यामुळेच अनुभव घटना, पात्रे यांना ठराविक आकार प्राप्त होतात व हीच या कथाकराची मोठी मर्यादा असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

लेखकाची कलाविषयक व जीवनविषयक काही गंभीर मूल्यधारणा असणे आवश्यक आहे, असा चंद्रकांत बांदिवडेकर यांचा कटाक्ष दिसतो मानवी दु:खाची अगम्यता, अथांगता व नियतीची प्रखर अनाकलनीयता यांच्या चिंतनातून जी. एं. ची गंभीर जीवन जाणीव साकारते व साहित्यात प्रकटे, असे त्यांना वाटते. या जीवन जाणिवेचे विविध अविष्कार साकारणाऱ्या कथांतील पात्रे, त्यांच्या या कृतिउक्ती व नातेसंबंध तसेच त्यांच्या चित्रणाची विविधता यांची चिकित्सा बांदिवडेकरांनी केली आहे. या कथांतील दु:खांच्या एके कपटी समीक्षकाने समजावून दिल्या आहेत. त्यातून त्यांना त्या पात्रांविषयी वाटणारा जिव्हाळाच सूचित होतो.

जी. ए. कुलकर्णी यांची कथा मराठी कथा साहित्यात अगदी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण वाटते. जीवनाचा निरर्थकपणा, शून्यता आणि विसंगतीयुक्तता इतक्या सातत्याने आणि एवढ्या ताकदीने यापूर्वी कुणीही आपल्या कथांतून व्यक्त केली नव्हती. माणसाच्या जबरदस्त कर्तुत्वशक्तीची सूत्रे शेवटी अदृश्य नियतीच्या हाती आहेत आणि नियतीच्या या कळसूत्री बाहुल्यांचा आपल्या विषयीचा अहंकार, बौद्धिक गर्व, कर्तृत्वाची घमेंड इत्यादी गोष्टी पाहिल्या की विदारक

हास्यास्पदता वाटते जी. एं. च्या सामाजिक वास्तवाचा आधार असलेल्या कथांत जीवनाचे एक विरुप, विकलांग कुजून जाणारे रुप प्रभावीपणे मांडले जाते. ''जी.ए. चे सारे कथा विश्व पाहताना जी भावना आपल्या मनात साकारते ती जाणिवाच्या अमाप समृद्धीची आणि वैफल्याची. पिकून तयार झालेली फळे टचकन उकलावीत तशा कृती पक्व वाटतात. अतिशयाची, अतिरिक्ततेची एक भावना त्यांच्यामध्ये नेहमीच जाणवते.''[११] असा मार्मिक अभिप्राय गो. मा. पवार यांनी नोंदवला आहे. जी. एं. च्या कथांना स्वतंत्र असे व्यक्तित्व नसते. त्याचे कारण आहे, एकदा सर्व सूत्रे नियतीच्या हाती आहेत असे मत निश्चितपणे स्वीकारले की माणसे 'कळसूत्र' बनतात.

'काजळमाया'त जी. एं. च्या कथांचे अत्यंत सशक्त असे एक आगळे दालन आहे. जी. एं. च्या जीवनविषयक अर्थाच्या सशक्त अभिव्यक्तीला ह्या कथांचे स्वरुप अधिक सुसंगत वाटते. जी. एंच्या कथांच्या रचनेत त्यांच्या बौद्धिक सामर्थ्याबरोबरच त्यांच्या कल्पना शक्तीच्या प्रचंड आवाक्याची प्रचीती येत राहते. त्यांची कथा फारशी सरळ व नुसती घटना बहुल नसते. आचवल जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेविषयी लिहितात, ''जी. ए. संपूर्ण भावानुभव प्रतिमेत परिवर्तित करण्याचा प्रयत्न करतात, यावर लक्ष केंद्रित केले आहे. एक प्रधान प्रतिमा कथेच्या सूत्रात प्रथम गुंफून कथेमधल्या भावाशयाशी तिची हलके हलके स्थापना करतात व त्या प्रतिमेला घनता आणण्यासाठी इतर प्रतिमांचे साहाय्य घेतात. अशा रीतीने भावानुभवाला लाभणारे एकात्म प्रतिमारुप हेच जी. एं. च्या कथा घाटाचे वैशिष्ट्य होय असे ते सांगतात.''[१२] जी. एं. च्या कथा वाचताना वेगळ्या जगात गेल्यासारखे वाटते. 'काजळमाया' वरील परीक्षणात चंद्रकांत बांदिवडेकर यांनी आशयाची वैविध्यपूर्णता, मौलिकता व भाषा याचे एकरुपत्व यांवर लक्ष केंद्रित केलेले दिसते.

*** नियती-अशुभ-अमंगळ :-**

'राखीपाखरु' या चिं. त्र्य. खानोलकर यांच्या कथासंग्रहाचे चद्रकांत बांदिवडेकर यांनी परीक्षण केले आहे. 'सनई' 'नतंर आलेल्या', 'राखीपाखरु' यामध्येही माणसाच्या मनाचा तरलस्पर्शी वेध घेऊ पाहणारी दृष्टी असल्याचे नमूद`कले आहे. 'राखीपाखरु' मध्ये ही तशीच किंवा अधिक कसदार झालेली आढळेल का हा प्रश्न मनात परीक्षण करताना होता असेही नमूद

केले आहे. पण खानोलकर अधिक प्रभावीपणे, अधिक प्रगल्भपणे त्या कथाविश्वात वावरले आहेत याची सुखद जाणीव झाली. प्रगल्भपणा येतो तेव्हा आधीचा आवेश, चमक, भडकपणा, मुखरपणा, सजावट इत्यादी वरकरणी वाचकाला भुलवणाऱ्या खुणा अस्पष्ट होतात, तसे काहीसे या कथासंग्रहात झाले असल्याचे बांदिवडेकर यांनी सांगितले आहे.

खानोलकरांच्या जवळ–जवळ सर्वच कथा वाङ्मयात आढळणारी नियती या कथासंग्रहात प्रमुखशक्ती म्हणून अस्तित्वात आहे. या नियतीचे स्वरुप 'अशुभ', 'अमंगल', 'असत' असे आहे. ती एक भयानक खेळ खेळणारी नटी आहे. ती अनेक रुपाने येते. तिच्याशी सामना देऊ पाहणारी माणसे दुर्बल आहेत. ती किंचित ताठ उभी राहू पाहतात तोच कोलमडून पडतात. नियतीशी दोन हात करण्याची क्षमता खानोलकरांच्या पात्रांत नाही, असे चंद्रकांत बांदिवडेकर यांनी म्हटले आहे. खानोलकरांच्या कथांतून व्यक्त झालेली धर्मविषयक जाणीव त्यांनी तपासली आहे. खानोलकरांनी सामन्यत: या धर्माच्या रूढ किंवा सांकेतिक कल्पनांचाच स्वीकार केला आहे. ईश्वर, देव, ब्रह्मदेव, मूळपुरूष, सर्पाच्या रूपाने येणारा राखणदार, सबंध, भूत, प्राक्तन इत्यादि कल्पना त्यांच्या कथात ज्या येतात त्या त्यांच्या भोवती हिंदू समाजात असणाऱ्या परंपरागत संस्कारांचे कवच घेऊनच. त्यांच्याकडे संशयाने, अविश्वासाने किंवा प्रश्नार्थकतेने खानोलकर फारसे पाहताना आढळत नाहीत. जीवनातले महत्वाचे नैतिक प्रश्नही खानोलकर व्यापक अर्थाने आध्यात्मिक वृत्तीतून उभे करीत नाहीत. हे नैतिक प्रश्न येतात ते माणसांबद्दल असलेल्या प्रचंड कणवेच्या–कळकवळ्याच्या दृष्टीतून. याचा अधिक विचार व्हायला पाहिजे, अशी अपेक्षा बांदिवडेकर परीक्षणात व्यक्त करतात. खानोलकराविषयी आपले मत व्यक्त करताना ते लिहितात, 'राखीपाखरु'तले खानोलकर अधिक प्रौढ झालेले वाटतात. अधिक संमिश्र स्वरुपाच्या अनुभवविश्वाला सहज भारदस्तपण पेलताना दिसतात. कथेच्या आशयाचा सारा आवाका झेपविणारे रुप सहजपणे कथेला देतात. खानोलकरांच्या कथांचे नाते जेव्हा समकालीन सामाजिक, राजकिय, नैतिक विचारांच्या सुदृढ पात्राशी जमेल तेव्हा ते भारतातले श्रेष्ठ कथाकार सहजपणे ठरतील; ही योग्यता निश्चितच त्याच्या लेखनीत आहे.

'कॉग्ज' या शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांच्या कथा संग्रहाचे परीक्षण, चंद्रकांत बोदिवडेकर

यांनी केले आहे. शरच्चंद्र चिरमुल्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजाणताच निश्चित झालेला दिसतो. ‘श्री शिल्लक’ मध्ये त्यांची दृष्टी पुष्कळशी मोकळी वाटली होती. ती ‘कौग्ज’ मध्ये वाटत नाही, असे नमूद करतात. त्यांच्या पात्रांच्या संवेदना उत्कट होत्या. परिचित जीवनात सामान्यत: न घडणाऱ्या थोड्याशा नाट्यपूर्ण घटना या पात्रांच्या जीवनात घडायच्या. त्यांची पात्रे नियतीने दिलेल्या दु:खाचा घोट निमूटपणे घ्यायची, असह्यपणे तफडफडायची, पण आक्रमक प्रतिक्रिया करण्याची शक्ती ती पात्रे कधीच दाखवत नसत. निसटून गेलेले श्रेय, अपूर्ण राहिलेल्या इच्छा व आकांक्षा, अटळ वेदनेची कळ चिरमुल्यांच्या पात्राचा स्थायीभाव असायचा. पण ‘कॉग्ज’ मध्ये भावना, संवेदना, जीवनदृष्टी यातला ताजेपणा व मोकळेपणा क्षीण झाल्याचे स्पष्ट केले आहे.

मराठी साहित्यात अलीकडे जोरदारपणे ठसा उमटविणाऱ्या अस्तित्ववादी मनोवृत्तीचा व दृष्टिकोनाचा चिरमुल्यांचा जीवनदृष्टीवर परिणाम झालेला आहे. मात्र या दृष्टीमुळे अनुभवांत जो वेगळेपणा व वैविध्य यायला हवे, मानसिक वृत्तीच्या एकाग्रपणातून उत्कटता व गहिरेपणा यायला हवा, जीवनाचे स्वरुप समजून घेण्याच्या प्रयत्नांतून गंभीरपणा यायला हवा; तो न येता एक साचा बनायला लागला आहे, ही गंभीर परिस्थिती असल्याची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. ‘चिरमुल्यांच्या ‘कौग्ज’ मध्ये आजच्या जीवनात ‘मिसफिटा’ झालेल्या माणसांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे कार्य केले गेले आहे, पण आंतरिक दु:खाला अभिव्यक्ती देण्याच्याऐवजी अशा माणसाच्या जीवनाचा बाह्य आलेख काही घटनांच्या आधारे वचकांपुढे काढून ठेवण्याकडे चिरमुल्यांचा कल अधिक दिसतो.’ असे आपले मत उद्‌घृत केले आहे.

चिरमुल्यांच्या कथांचे संदर्भ व्यापक असले तरी त्यांच्या कथा मानवी जीवनाचे काही आगळे रुप दर्शवून जाणिवेच्या कक्षा वाढवतात, असे वाटत नाही. पुष्कळशा कथा वैयक्तिक जीवनाबद्दल दु:ख क्लेशकारक असे काही सांगतात. त्यांना वैश्किवतेची पातळी लाभत नाही, असे म्हटले आहे. ‘कॉग्ज’ मधील ‘नवस’ ही कथा संग्रहातील सर्वात बांधेसुद आणि यशस्वी कथा असल्याचे बादिवडेकर यांनी म्हटले आहे.

*** निराशाजनक शेवट :–**

‘सूड’ या बाबूराव बागूल यांच्या सत्तरपानी दीर्घकथेचे अ. ना. पेंडणेकर यांनी परीक्षण

केले आहे. 'सूड' ही दीर्घकथा प्रारंभी लोकविलक्षण कथावस्तुमुळे अस्वस्थ करते आणि शेवटी निराशा पदरी टाकते, असे परखड शब्दांत त्यांनी आपले मत मांडले आहे. कथेच्या प्रारंभीची तडफड लेखकाने पुरती पारखून न घेताच लेखन केल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

'जानकी' ह्या जगावेगळ्या स्त्रीचीही कथा. मुरलीच्या जन्माला आलेली. दारिद्रयाला आणि लैंगिक अत्याचाराला विटलेली. देव, देह, देश आणि समाज या सर्वावरच चिडलेली जानकी पुरुषवेश धारण करुन साधू बनते. पण आपले स्त्रीत्व तिला विसरता येत नाही. स्त्रियांचे देहधर्म, पुरुषी नजरा यामुळे संतापाने ती पापी नजरांच्या पुरुषांना ठार मारते. ती दोघा साधूंच्या सहवासात येते. त्यातील एकजण स्त्रीद्वेष्टा असतो तर दुसरा साधू–स्वामीजी निरागस, उदार, सुजान असा पुरुष असतो. तो तिचे प्रसन्न, निर्मख कौतुक करतो. मृत्युपूर्वी मिळालेले हे मीलनसूख अलौकिक सूख वाटते, असा कथेचा सारांश सांगून पेंडणेकर परीक्षण करतात. अ. ना. पेंडणेकरांच्या मते लेखकाला समाज, धर्म, देश यांनी न जखडलेल्या अशा स्त्री–पुरुषांच्या आदिम मीलनसुखाचा जयजयकार करायचा आहे. त्यासाठी त्याने धर्मरुढीमुळे मुरळी झालेल्या, दारिद्रयाने लैंगिक जीवन उद्ध्वस्त झालेला एका संवेदनाक्षम स्त्रीची मुख्य पात्रांच्या ठिकाणी योजना केली आहे. तिने आरंभी समाजाविरुद्ध बंड करावे हे स्वाभाविक वाटावे असे चित्रण झाले आहे. याचे प्रमुख कारण ह्या संदर्भातले प्रसंग साधूवेषात हिंडत राहून असणाऱ्या जानकीच्या मनात मधून मधून येतात. ह्या गतकाळातील तुकड्यांचा आणि चालू जीवनातील प्रसंगाचा नेहमीच अपरिहार्य संबंध प्रस्थापित होत नाही. आलटून–पालटून प्रसंगकथन ही करामत तिच्या मनातील ताण समर्थपणे तोलून धरु शकत नाही, असे विवेचन केले आहे.

जगावेगळ्या निश्चयाच्या, तो निश्चय कृतीत आणलेल्या स्त्रीच्या जोडीला तसाच जगावेगळा स्वामी असणे जणू अटळ होते. स्त्री पुरुषातील भेदही ठाऊन नसलेले स्वामीजी खरे योगी पाहून तिला आधार वाटतो. धर्म, देव, देशापेक्षाही माणूस महान आहे, असा स्वामीजी संदेश देतात. यापूर्वीच तिला स्वामीजींनी केलेली मंगल, सुंदर आनंददायक स्तुती ऐकून हजार जन्म स्त्री होऊन ती ऐकावी, त्यांचे कवटाळणे, अनुभवावे असे वाटू लागलेले होते. स्वामीजींची भूमिका वास्तवतेपासून दूरची; तसेच ती ढोंगी वाटते, कधी सगळे प्रसंगच विनोदी वाटू लागतात; असा

आपला अभिप्राय मांडताना नोंदवतात. शरद पाटील 'सूड' विषयी लिहितात, ''बाबूरावांनी 'सूड' मध्ये रोमँटीक सांकृत्यायन आणले आहे, जानकीमधील स्त्री पुरुषांच्या प्रतिमा संदर्भातील द्वैत शमवायचे स्वामींचे प्रयत्न पारंपारीक असल्याचे म्हटले आहे.''[१३]

*** लक्षवेधक कथा :–**

'विदेही' या विजया राजाध्यक्ष यांच्या कथा संग्रहाचे ल. ग. जोग यांनी परीक्षण केले आहे. 'विदेही' हा एक लक्ष वेधक कथा संग्रह आहे. 'विदेही' या पहिल्या कथेच्या अनुरोधाने 'विदेही' हे नाव संग्रहाला मिळाले. ति कथा तेवढीच महत्वाची असल्याचे नमूद केले आहे. 'विदेही' ही कथा 'ती'च्या दुसऱ्या बाळंतपणापूर्वीची व थोडी नंतरची येणारी कथा म्हणजे विदेही, असे या कथेचे वस्तुनिष्ठ वर्णन न करता विस्तृत असा आशय परीक्षणात जोग यांनी दिला आहे.

सर्वसाधारणपणे सर्वच कथामथून स्त्री–पुरुष संबंधाचा, त्यातील स्वप्नाळू हळवेपणाचा, विकृतीचा, समस्यांचा वेध परीक्षणात जोग घेताना दिसतात. एकाच कथा–संग्रहातल्या समागमसंदर्भी अनुभवसृष्टीत येणारी समान उक्ती हे लेखिकेचे अपयश ही जोग यांनी नोंदविले आहे. हा संग्रह कदाचित लैंगिक विकृतीचे दर्शन घडविणारा संग्रह असे म्हटले नाही. कारण त्यातील 'जनन–मरण', 'सुरक्षित', 'सावली', 'दोन वर्षे', 'अंकुश' हे कथापंचक असे विधान करू देणार नाही याची जाणीव जोग यांना असल्याचे स्पष्ट होते.

*** सामान्य, बाळबोध, सरळसोट कथा :–**

'प्राजक्त' ह्या प्रा. सौ. मुमताज रहिमतपुरे यांच्या कथासंग्रहाचे भा. रा. बापट यांनी परीक्षण केले आहे. मुस्लिम समाजातील स्त्रीने लिहिलेल्या कथा ही संज्ञा लागू पडेल असे वाटत नाही, असे परखड मत बापट यांनी मांडले आहे.

संग्रहातील सर्वच कथा सामान्य, सरलसोट, बालबोध आहेत. त्यांत माणूस चंद्रावर गेला तेव्हा चंद्राला काय वाटले हे सांगणारी शाळेतील हस्तलिखितात बरी दिसेल अशी कथा आहे. तांब्या भरलेला आहे या समजूतीने तो उचलावा व तो रिकामा निघाला म्हणजे ती संवेदना होते. तशीच संवेदना 'प्राजक्त' हा संग्रह वाचून संपल्यावर होते, असे परखड मत व्यक्त केले आहे. स्त्री कथाकारांच्या कथालेखनातील प्रयोगशीलता, त्यांची बदलेली जीवनदृष्टी आणि नवी सौंदर्यमूल्ये

ठळकपणे अधोरेखित करण्याचा तसेच या स्त्री कथाकरांनी पारंपारिक नैतिकतावादी दृष्टिकोनाची केलेली उलटतपासणी उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

'भा. रा. बापट' यांनी 'वामन अ. जोशी' यांच्या 'सॉरी रॉंग नंबर' या कथासंग्रहाचे परीक्षण केले आहे. या संग्रहातील कथा सुमार असल्या तरी या तरुणांच्या जिद्दीचे कौतुक करावेसे वाटते, असे म्हटले आहे. या कथा संग्रहातील कथा 'इति श्री' वाचकाच्या मनात कसलीच सहानुभूती निर्माण करु शकत नाही. सामान्यपणे या संग्रहातील कथा मोठी उंची गाठू शकत नसल्या तरी एकेका गोष्टीबद्दल लिहिताना 'प्रभावी', 'अंतर्मनाचा वेध घेणारी', 'स्त्री जीवनातील व्यथा, वेदना, समस्या' यांना वाचा फोडणारी असे प्रस्तावनाकरांनी लिहिले आहे, ते स्वाभाविक असल्याचे परीक्षणात म्हटले आहे.

*** आशयाचे वैविध्य :–**

'रक्तपंख' या वसंत चिंचोळकर यांच्या पहिल्याच कथा संग्रहाचे नागनाथ कोत्तापल्ले यांनी परीक्षण केले आहे. कोत्तापल्ले यांना प्रथम जाणवले ते म्हणजे आशयाचे वैविध्य. अर्थात प्रेम जाणिव हा या जाणिवांचा प्रथम घटक. परंतु प्रेमाचे भरीव स्वरुप या ठिकाणी व्यक्त होत नाही हे त्यांचे वैशिष्ट्य कोत्तापल्ले यांनी नमूद केले आहे. श्री. चिंचाळकरांच्या सर्वच कथामधून मानवी भावभावनांचे अतिशय लहान–सहान पदर दिसतात. मानवी जीवनाचे मोठे सूक्ष्म आकलन येते.

मानवी जीवनातील अनाकलनीय नाती शोधणे अंतर्मनाचा तळ शोधणे हे जसे श्री. चिंचाळकरांच्या प्रतिभेचे धर्म आहेत. तसेच चिंचाळकर त्या त्या व्यक्तीच्या भावास्थितीला काव्यान्मकतेची उब देतात. पुष्कळदा वातावरण आणि भावतरंग सर्वच ते काव्यात्म पातळीवर नेतात म्हणूनच त्यांची कथा काव्यात्म झाल्याचा निर्वाळा कोत्तापल्ले देतात.

*** जीवनाचे चिंतनात्मक स्वरूप :–**

श्री. प्रकाश कामतीकरांच्या 'शब्दुली' या पहिल्याच कथासंग्रहाचे नागनाथ कोत्तापल्ले यांनी परीक्षण केले आहे. अशाय आणि आकृतिबंधाच्या संदर्भातील प्रयोगामुळे त्यांच्या कता समृद्ध झाल्या आहेत. जीवानतील भीषणता तशीच तरल कोमल अनुभवांची अभिव्यक्ती त्यांच्या कथा करतात. त्यांची कथा रुपाची फारशी चिंता न करता ललित गद्याच्या प्रातांत सहज विहार करते.

श्री. प्रकाश कामतीकरांच्या कथांचे वैशिष्ट्य सांगताना कोत्तापल्ले म्हणतात, ''यंत्र युगातील मानवी भावभावनांना प्राप्त झालेले हेतुहीनत्व आजच्या जीवनाचे संदर्भ जेव्हा ही कथा घेऊन येते तेव्हा ती अधिक भेदक झाल्याचे कोत्तापल्ले सांगतात.''

कामतीकर जसे कवी, कथाकार आहेत त्याप्रमाणे चित्रकारही आहेत. चित्रनिर्मितीचा क्षण पेलणाऱ्या काही कथा या संग्रहात आहेत. चित्र निर्मितीचा क्षणच इथे अनुभवविश्व होतो आहे, असे अनुभव मराठीत व्यक्त होत आहे. या संदर्भात त्यांनी 'अपूरा', 'एका थिजलेल्या रात्री', 'कैफ' या कथांचा उल्लेख केला आहे. एकंदरीत जीवनाचे 'चिंतनात्मक स्वरुप' व्यक्त करणाऱ्या कथा हे जसे कामतीकरांचे सामर्थ्यस्थान तसेच तरल धुक्यासम अनुभव तेवढ्याच समर्थपणे पकडणे हे ही त्यांचे सामर्थ्य आहे, असे परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

पुष्कळदा कामतीकर खोट्या काव्यात्मकतेच्या आहारी जाऊन शब्दावर शब्द रचत जातात. मग ती कथा बांधेसूद न होता उगीचच लांबत जाते. 'संथ सरकणारं' ही कथा खोट्या काव्यात्मकतेबरोबरच कधी कधी स्वप्न रंजनाच्या प्रातांत जाऊन वास्तवापासून दूर जाते.

*** कोकणातल्या जीवनाचे दशावतार :–**

अ. ना. पेंडणेकर यांच्या 'शेलूक' या कथा संग्रहाचे सुभाव भेडे यांनी परीक्षण केले आहे. मराठी साहित्यात दक्षिण कोकण प्रदेशाने स्वत:चे असे एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. पेंडणेकर ज्या परिघात जन्मले, राहिले व वावरलेल्या परिघातील माणसांची, भावभावनांशी जवळून ओळख करुन देणाऱ्या कथा, 'शेलूक' मध्ये आहेत. निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या या प्रदेशातील माणसे सागराच्या सानिध्यामुळे जितकी बेफिकीर आहेत. तितकीच हळवी, भोळीभाबडी आहेत. स्वभावातील बेरकीपणा, अपार दारिद्रयातून जन्मलेला अंधश्रद्धा, पिसाट वासना, भुताखेतावर विश्वासही ही त्यांची आणखी काही वैशिष्ट्ये श्री. पेंडणेकरांनी टिपताना कोठेही आक्रस्ताळीपणा, भडपणा दाखविलेला नाही आणि म्हणूनच त्यांच्या कथा वाचताना मन सुन्न होत नाही; चक्रावून जात नाही, असे परीक्षणात म्हटले आहे.

'शेलूक' मधील कता वाचणे हा एक सुखद, हुरहूर लावणारा अनुभव असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. साऱ्या कथा कोकणी, तांबड मातीतल्या आहेत. साऱ्या कथांतून माशांची

हिंवसाण देखलत राहते आणि सागराच्या गाजेचा ध्वनी उमटत राहतो. पेंडणेकरांची लेखणी संयत असल्याचा निर्वाळा परीक्षणात दिला आहे. जगावेगळी व्यक्तिचित्रे, विकृत प्रेमभावना, वखवखलेली वासना हे आजकालच्या लोकप्रिय लेखनविशेष त्यांच्या संयमी लेखणीला पेलणार नाहीत. त्यांच्या कथा वेगळ्या पडतात व म्हणून लक्षणीय वाटतात. पेंडणेकरांचे हे संयतपण म्हणून त्यांना भावते कोकणातल्या जीवनाचे दशावतार त्यांच्या कथात पाहायला मिळतात. कोकणी माणसाच्या महावराप्रियतेचे, बिलंदरपणाचे, भाबडेपणाचे दर्शन घडवितात.

*** कांदबरी परीक्षणे :–**

कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर वाढत जाणारा व सतत बदलत जाणारा असा वाङ्मय प्रकार आज सर्वाधिक वाचकप्रिय होत असलेला दिसून येतो. 'समाज प्रबोधन पत्रिके'ने कादंबरी या वाङ्मय प्रकाराची दखल घेतली असल्याचे दिसून येते. कथा, नाटक, कविता, आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारापेक्षा 'कादंबरी' या वाङ्मय प्रकारातील परीक्षणे अधिक असल्याचे दिसून येतो.

*** चरित्रात्मक कादंबरी :–**

चरित्रात्मक कादंबरी हा इतर वाङ्मय प्रकाराप्रमाणेच एक वाङ्मय प्रकार आहे. या लेखनामध्ये चरित्र आणि कादंबरी या दोन्ही वाङ्मय प्रकारांचा समन्वय साधलेला दिसून येतो. चरित्रात्मक कादंबरीमध्ये एका समकालीन व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवून लेखन केले जाते. चरित्रकाराप्रमाणेच कादंबरीकारानेही व्यक्तीची योग्य माहिती मिळविणे महत्वाचे असते. अशा माहितीसाठी साहित्यिक कोणत्या माध्यामाचा उपयोग करीत असतो त्या संदर्भात प्रभाकर बापट म्हणतात, ''समकालीन व्यक्ती लेखकाला जास्त जवळच्या असतात व वाटतात या व्यक्ती लेखकाच्या किमापक्षी आजच्या पिढीतील वृद्धांच्या जास्त परिचयाच्या असतात. त्यामुळे त्यांच्या जीवनाविषयी व स्वभावधर्मासंबंधी विश्वसनीय माहिती सहज प्राप्त असते. तसेच वृत्तपत्रीय प्रसिद्धी किंवा टीका, खाजगी काव्य व्यवहार, आठवणी, आख्यायिका, आत्मसमर्थनपर लेख इत्यादीमुळे अशा व्यक्तींचे व्यक्तीत्वही स्पष्ट झालेले दिसते.''[१४]

चरित्रकाराप्रमाणेच कादंबरीकारालाही उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग लेखनासाठी करतात विश्वसनीय माहितीमध्ये कल्पकतेचे प्रमाण विचारपूर्वक ठरवावे लागते.

'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये चरित्रात्मक कादंबरीवरती परीक्षणे झाली आहेत. राजकीय व सामाजिक जागृतीच्या उद्देशाने समाजाला या महान व्यक्तींच्या कार्याची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने म. गांधी 'पुत्र मानवाचा–मृणालिनी देसाई', ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील 'मोगरा फुलला–गो. नी. दांडेकर', ज्या काळात संततिनियमनाचे नाव घेणेसुद्धा शिष्ट समाजात शक्य नव्हते, अशा काळात धैर्याने व निर्भयपणे, दूरदृष्टी ठेवून संततिनियमनाचा पुरस्कार करणारा आद्य प्रणेता आणि प्रखर बुद्धी प्रामाण्यवादी म्हणून सारा भारत आज कै. र. धो. कर्वेना ओळखते त्यांच्या जीवनावर लिहिलेली 'रघुनाथाची बखर–श्री. ज. जोशी' या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. समाजसेवक, संत आणि सामाजिक राजकीय क्षेत्रात सर्वोत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तिविषयी केलेले कांदबरीलेखन केवळ माहितीपर व जंत्रीवजा न होता चिकित्सक संशोधनातूनही लिहिले गेले आहे. कादंबरीकाराने एखाद्या चरित्र विषयाची लेखनासाठी निवड केली आणि लेखन करताना जरित्र नायकाच्या सामाजिक कर्तृत्वाचाच आढावा घेतला तर चरित्र नायकाचे भावजीवन, त्याच्या आंतरमनातील गुंतागुंत, भावआंदोलने व्यक्तज होत नाहीत. मृणालिनी देसाई यांनी म. गांधी यांच्या जीवनावर लिहिलेली 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी, गो. नी. दांडेकरांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारीत लिहिलेली 'मोगरा फुलला' ही कादंबरी. श्री. ज. जोशी यांनी र. धो. कर्वे यांच्या जीवनावर लिहिलेली 'रघुनाथाची बखर' ही कादंबरी, ह्या कादंबऱ्या अशाच आहेत. चरित्र नायकांच्या जीवनावरील अनाकलनीय जागांर प्रकाश टाकणे आणि याद्वारे व्यक्तित्वाचे नवदर्शन घडविणे हे प्रतिभावंत लेखकाचे काम असते. ''कादंबरीकार हा आपल्या लेखनातून सत्याचा भावनात्मक प्रत्यय घडवित असतो. तसे करताना तो कधी तपशीलचा उपयोग करील, कधी तो प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचा आधार घेईल, तर कधी तो खुशाल त्यासाठी काल्पनिक प्रसंग व पात्रेही वापरील, ही सवलत चरित्रकाराला घेता येणार नाही.''[१५] चरित्रात्मक कादंबरी लिहिताना लेखकाला रसाळपणा व सत्यदर्शन यांची योग्य सांगड घालावी लागते. चरित्रात्मक कादंबरी लेखनाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन जबाबदारीने लेखन केले नाही तर कादंबरी फसण्याची शक्यता असते. श्री.ज.जोशी यांनी लिहिलेली 'रघूनाथाची बखर' ही अशीच फसलेली विकृत व खोटे चित्रण करणारी कादंबरी असल्याचे कृष्णाबाई मोटे यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

*** रघुनाथाची बखर: विकृत व खोटे चित्रण :–**

रघुनाथांनी मनुष्याची मूलभूत असलेली कामवासना, त्यांनी वैयक्तिक व सामाजिक जीवनात उद्‌भवणारे निरनिराळे प्रश्न, त्यांचे स्वरूप, स्त्री–पुरूषातील लैंगिक संबंध इत्यादि प्रश्नांवर समाज स्वास्थ्यातून व पुस्तकातून लिहिले पण ते लिहिताना त्यांची भाषा, विधाने सारी शास्त्रीय अभ्यासकाच्या अलिप्ततेने केलेली असत. मनुष्याच्या लैंगिक शरीर प्रकृतीची छाननी करत असता, ते तो सारा प्रयत्न बुद्धिप्रामाण्याच्या कठोर प्रकाशातून नीट सुलाखून बघूनच मग ते विधान करीत. पण कादंबरी लिहिताना लेखक लैंगिकतेने लेखणी वासनामय होऊन वर्ण्यविषय मोठ्या चविष्टपणे चघळीत असल्याचे, मोटे यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

व्यक्तिचित्रण करताना लेखकाचा तोल फार सुटला आहे, असे त्यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

ही कादंबरी असली तरी चरित्रात्मक कादंबरी आहे असे लेखकाने स्वत:च सांगितले आहे. अर्थात अशा चरित्रात्मक कादंबरीत प्रत्यक्ष मानवी जीवनाला न उलगडलले प्रसंग, कल्पना सामर्थ्याने उलगडून दाखविणे, वर्ण्य जीवनाचे सारे धागेदोरे नीट उकळून वाचताना ते जीवन आपल्याला कळले आहे, उकलले आहे हे समाधान देणे, हेच खरोखर प्रतिभाशाली लेखक आपल्या 'कल्पिता' वरून दाखवित असतो. पण हे या कादंबरीच झालेच नाही. 'रघुनाथाची बखर' ही सारी कादंबरी अशा खोट्या, बेजबाबदार चित्रणाने पार नासून गेली असल्याचा अभिप्राय परखड शब्दात नोंदविला आहे.

म.वा.धोंड यांनीही 'रघुनाथाची बखर' या कादंबरीतील अनेक दोष व उणिवा स्पष्ट करून दाखविले आहेत. ते लिहितात, ''श्री.ज.जोशी यांना आपल्या श्रमाच्या अपुरेपणाची खंत नसली तरी जाण असावी, असे कादंबरीच्या नावावरून वाटते, ही चरित्रात्मक कादंबरी असली तरी मुद्दामच तिला 'बखर' म्हटले आहे. बखरीमध्ये सत्य आणि कल्पित यांचे मिश्रण असते. ही कादंबरी आहे, 'चरित्र' नाही याचे कृपया भान ठेवावे अशी ताकीद ते याकरिताच देत असावेत. ही चरित्रात्मक कादंबरी असली तरी ती कादंबरी आहे, चरित्र नाही, असे म्हणणे म्हणजे तिच्यात तिचा आत्माच नाही असे म्हणण्याजोगे आहे.'' [१६]

*** आंतरिक व्यक्तिमत्वाचा वेध :–**

'मोगरा फुलला' चा चरित्रात्मक कादंबरीचे अतिशय मार्मिक परीक्षण चंद्रकांत बांदिवडेकर यांनी केले आहे. गो. नी. दांडेकरांचा अंतरात्मा भारतीय संस्कृतीशी पूर्णपणे समरस झालेला आहे. भारतीय परंपरांचे धवल रुप ते अधिक आस्थेने पाहतात. महाराष्ट्रातील महान व्यक्तित्त्वांचा समर्पित निष्ठेने ते वेध घेण्याचा प्रयत्न करतात. सहाजिकच जून्या काळातील महान मूल्यांचा उत्कर्ष ज्या व्यक्तिमत्वाच्या ठिकाणी झालेला आहे. अशा व्यक्तिमत्वांशी त्यांचा हार्दिक संवादच होतो. एवढेच नव्हे तर ते त्यांच्याशी पूर्णपणे तन्मय ही होऊ शकतात. अशी मूल्ये बदलत्या काळातही जपणारी व त्यासाठी जीवन वेचणारी पात्रे गो. नी. च्या कलाकृतीचा विषय होतात. या घटनेचे काही मुलभूत दोष आहेत व काही फायदाही आहेत. एक मोठा फायदा असा की कादंबरी रुपात जीवनानुभव अविदकृत करताना एक प्रकारचा भारावलेपणा येतो, तन्मयता येते, उत्कटता येते. सामान्य वाचक अशा लेखनात चटकन समरस होतो. निखळ भारतीय कादंबरी असं ज्या कादंबरीचं वर्णन सार्थपणं करता येईल अशी गो. नी. ची एक महत्वाची यशस्वी कादबंरी 'मोगरा फुलला'.

'मोगरा फुलला' ही कादंबरी म्हणजे भारतीय जीवनमूल्यांनी संस्कारित झालेली दृष्टी नेमकी कशी असू शकते याचं चित्मिकदर्शन घडविणारी आहे, असे सांगितले आहे. सामाजिक व लौकिकदृष्ट्या अपार दु:ख भोगत राहणारी परंतु त्यांच्या स्वत:च्या दृष्टीने आनंदाच्या डोहात सतत डुंबत राहणारी अशी ही जगावेळी मुल गो. नी. नीं सह्दयत्वानं जिवंतपणे उभी केली आहेत. या कादंबरीतील अनुभवाला आत्मनंदाचा स्पर्श झाला आहे. मान–अपमान, दारिद्रय, भौतिक गरजा याविषयीची वृत्तीच वेगळी आहे. अनेक भावपूर्ण प्रसंगाचं रेखाटन करताना गो. नी. चैतन्यशक्तीनं भारल्यासारखे वाटतात. त्यांच्या शैलीतला रसाळ वक्तृत्वावेश त्यांना साहाय्य करतो, हे दाखवून दिले आहे. ज्ञानेश्वरांच्या प्रवचनप्रसंगी साहित्यानुभव आणि प्रवचन यातले अंतर कादंबरीकार विसरुन जाण्याची भीती समीक्षकाच्या मनात होती, पण गो. नी. नीं त्या प्रवचनांचा भावपूर्ण संदर्भ उत्तम तऱ्हेने निर्मिलेला आहे. ही प्रवचने म्हणजे ज्ञानेश्वरांच्या जीवित कार्याचा सर्वात महत्वाचा भाग. तो टाळणंही कठीण आणि हाताळणे ही कठीण, पण गो. नी. नीं

ती किमया यशस्वीपणे साधली आहे, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे.

ज्ञानेश्वरांच्या चरित्राचे निवेदन करणारी ही कादंबरी नसून त्यांच्या आंतरिक व्यक्तित्वाचा वेध घेणारी व भारतीयत्वाने अथपासून इतिपर्यंत ओतप्रोत भरलेली ही यशस्वी कलाकृती आहे. भावावेशात लिहूनही कलात्मक भान यात फारसे कुठे सुटलेले नाही, असे कांदबरीच्या संदर्भात दाखवून दिले आहे. या कादंबरीच्या वातावरण निर्मितीसाठी व ज्ञानेश्वरकालीन काळ विश्वसनीयरित्या उभा करण्यासाठी गो. नी. नीं खूपच कौशल्य दाखविले असल्याचे परीक्षणात म्हटले आहे. गो. नी. संतवाङ्मयाचे श्रद्धाळू अभ्यासक आहेत व त्यांना या कादंबरीच्या रुपाने त्यांच्या व्यक्तित्वाला साजेशा विषय मिळाला म्हणून ही कादंबरी खूप रसाळ आणि प्रभावपूर्ण झाल्याचे बांदिवडेकर यांनी नमूद केले आहे.

*** ठिसूळ कथानक :–**

'पुत्र मानवाचा' या मृणालिनी देसाई लिखित चरित्रात्मक कादंबरीचे श्री. ज. जोशी यांनी परीक्षण केले आहे. 'पुत्र मानवाचा' ही कादंबरी प्रथम पुरुषी आहे. त्यातला 'मी' बॅरिस्टर होवून सतरा–अठरा साली भारतात परत आलेला असतो. 'मी'चे घराणे, त्यातील घरंदाज वातावरण, राजेशाही राहाणी याबाबत परीक्षणात सांगितले आहे. श्रीमंत वकिलांच्या घरचे एकाकी जीवन कादंबरीत छानदारपणे चित्रित जाले आहे. अशा गृहिणीच्या जीवनातील कारुण्य लेखिकेने बरोबर पकडले आहे. कथा भागाविषयीचे औत्सुक्य कादंबरीच्या पहिल्या काही पृष्ठातच संपते. पुढे मग कथासूत्र बाजूला पडून गांधींच्या विविध चळवळींचे नुसते वर्णन सुरु होते. नायक हा प्रत्येक चळवळीचा सारथी आहे. लहान मुलाला जागेतील दुकानातून हिंडवावे त्याप्रमाणे चंपारण्यापासून गांधीच्या प्रत्येक चळवळीत नायकाला हिंडवले आहे. कादंबरीचे कथानक संपूर्णतया ठिसून पायावर उभे आहे. गांधी चरित्राला जोडलेले हे कतानक नाटकी पद्धतीने आणि ठिगळवजा झाले आहे, असे स्पष्ट करुन कादंबरीच्या खुरटेपणाचीही मीमांसा केली आहे.

कादंबरीतील बरीच वर्णने उत्तम आहेत. लेखिकेच्या शक्तीची आणि श्रमाची त्यावरुन कल्पना येते. नौखालीच्या पदयात्रिक्च्या वेळची गांधींची एकाकी. काहीच करुण अवस्था दिसत नाही. गांधीजींनी आजन्म सत्याचे प्रयोग केले. लैगिक जीवनाबद्दल त्यांची ठाम मते होती व तसेच

त्यांचे आचरण होते. आपली मते, आपले अनुभव त्यांनी कधीही लपवून ठेवली नाहीत. त्या लोकविलक्षण मतांचा लेखिकेने स्पर्शही केला नाही, याकडे जोशी यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. गांधीजींच्या महात्म्याला लोकमानसात किंचितही तडा जाऊ नये व याबद्दल लेखिका दृढ असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे. लैंगिक भागामुळे त्यांचे माहात्म्य डांगळले जाईल अशी भीती त्यांना वाटत असावी. लेखिकेने सरळ गांधी चरित्र लिहिले असते तर उत्तम ग्रंथ निर्माण झाला असता असे परखड मत श्री. जोशी यांनी व्यक्त केले आहे. गांधीजींचा जीवनपट उलगडताना त्यांच्या मनातील स्थित्यंतरे घटनांचा कार्यकारण जुळवून केलेल्या मांडणीतून प्रकट झाली पाहिजेत. परंतु हे काही या कादंबरीत झाले नाही. डॉ. विभा शहा लिहितात, ''महात्मा गांधीचे फुलत जाणारे राजकीय व्यक्तिमत्व दाखविताना तय व्यक्तिमत्वाची खाजगी व सामाजिक जीवनाची दुसरी बाजू मात्र लेखिकेने पुरेशा उठावदारपणे दाखविलेली नाही.''[१७]

*** ग्रामीण कादंबरी :–**

ग्रामीण जीवनातील आज निर्माण झालेले बहुसंख्य प्रश्न जातिव्यवस्थेने जसे निर्माण केले आहेत. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेनेही निर्माण केले आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीने याचे भान जेवढे बाळगावे, तेवढे बाळगले तर एक व्यापक संघर्षाचे भक्कम व्यासपीठ म्हणून ग्रामीण साहित्य चळवळ ओळखली जाईल. पण सध्या तरी ही जाणीव ग्रामीण साहित्यात अत्यल्प आहे, असेच म्हणावे लागते. अलिकडच्या कालखंडातील आनंद यादव, रा. रं. बोराडे यांचे लेखन ही जाणीव प्रकट करु लागले आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' व रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबऱ्यांचे परीक्षण मीनाक्षी रायकर यांनी केले आहे.

*** 'गोतावळा'फसलेली कादंबरी :–**

आनंद यादव यांच्या 'गोतावळा' चे विश्लेषण करताना रायकर यांनी प्रथमच हे स्पष्ट केले आहे की, जमेच्या बाजूला टाकण्यासारख्या अनेक गोष्टी 'गोतावळा' मध्ये असूनही कादंबरी म्हणून 'गोतावळा' ही काहीशी फसलेली आहे. ती सुरु झाली आहे घटनाप्रधान कादंबरी म्हणून. पुढे तिची परिणती व्यक्तिरेखाप्रधान कादंबरीमध्ये होते. ते व्यक्तिरेखाटन चांगले झाले आहे. परंतु कादंबरीचे ते स्वरुप लेखकाला अभिप्रेत नव्हते, असे शीर्षकावरुन तरी वाटते. नारबासह साऱ्या

गोतावळ्याचे संक्रमणकालामधील चित्रण इतकाच हेतू असेल तर तो बहुतांशी साध्य झाला आहे पण मग या प्रकाराला कादंबरी म्हणायचे की माळावरील विविध घटनांचा नारबाचा कच्चा दुवाने जोडलेला संग्रह हे ठरवावे लागेल.

मानसी रायकर यांना 'गोतावळा' म्हणजे 'इंजान' या कथेचे दीर्घीकरण वाटते. 'नारबा शेतमजूर आणि त्याचा मालक सोनावणे' यांच्यामधील एकतर्फी संघर्षाचे हे चित्रीकरण आहे. नारबा चा मालक हा अत्यंत व्यवहारी आहे. जनावरांपासून माणसांपर्यंत सर्वांकडेच तो उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहतो. ज्या वस्तूंची जरुरी संपली तिची किंमत त्याच्या लेखी शून्य. त्याच्या उलट नारबाचे महालिंग्या बैलापासून मल्यापर्यंत सर्वांशीच नाते तो त्याचा गोतावळा, त्याच्यातल्या प्रत्येकाशीच त्याच्या मनात नाजूक तंतू गोफ विणतात. नारबा हा एक अडाणी शेतमजूर असला तरी त्याचे मन विलक्षण संवेदनाक्षम आहे. त्यामुळेच मालावरती वर्षभराच्या कालावधीत घडणाऱ्या घटनांचे त्याने केलेले हे निवेदन शेवटी उत्कट परिणाम घडवते. निवेदनाची आणखी एक जमेची बाजू म्हणजे प्रसंगाची व जनावरांची वर्णनेही सांगितली आहेत. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' ही निसर्ग-प्राणि सृष्टीशी सख्य जोडणाऱ्या नारबा या सालगड्याच्या एकाकी जीवनाची हृदयस्पर्शी कहाणी तिच्यावर यांत्रिकीकरणामुळे होणाऱ्या कृषि संस्कृतीतील एका युगान्ताची छाया पसरली आहे. निसर्ग आणि माणूस यांच्या आदिम पातळीवर गुंफलेल्या निरागस भावविश्वाचे उमलते-कोमजते चित्र येथे आहे. कृषिकेंद्रित वास्तव अस्सल कलात्मकतेने व बोलीच्या लयीने यादवांनी या कादंबरीतून अविष्कृत केले आहे.''[१८]

निवेदनांसाठी ग्रामीण भाषेचा वापर व ग्रामीण निवेदक हा समान दुवा सोडल्यास 'गोतावळा' व 'पाचोळा' यांचा एकत्र विचार करणे चूकच होईल. या दोन्ही कादंबऱ्याची जातकुळी एक नाही. 'गोतावळा' मधील कथावस्तुही अस्सल ग्रामीण आहे तर रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' ची कथावस्तू एका सामान्य कुटुंबाची होणारी परवडही काही फक्त ग्रामीण भागातच घडू शकेल अशी नव्हे. एवढे मात्र खरे की निवेदिका ही एक ग्रामीण स्त्री असल्याने तिची असहाय्यता व अगतिकता अधिक तीव्रपणे जाणवते कांदबरीचे शीर्षकच कांदबरीचे कथानक सांगून जाते. कथानक तसे अगदी साधे व एकपदरी आहे. ही पारबती नामक स्त्रीच्या संसाराची कहाणी. तिनेच

सांगितलेली. नवऱ्याच्या हेकोड्या स्वभावापायी निर्माण झालेल्या पिता–पुत्रांच्या संघर्षामुळे पार्वती खचून जाते. या कादंबरी पार्वतीची व्यक्तिरेखा मनावर स्पष्टपणे असते. त्याचबरोबर तिची आगतिकता, तिचा कमालीचा सोशीकपणा व नवरा आणि मुलगा या दोघांना आनंदी ठेवण्यासाठी तिची विलक्षण कुतरओढ, त्याचबरोबर असा विचार येतो की, खरेच अगदी सामान्य दुबळ्या माणसांची कोठेही जराशाच वावटळीने ही अशीच परफट होईल ती अशीच पाचोळ्यावाणी उडून जातील. कादंबरीतील कथावस्तूही अशा प्रकारे वाचकाला पटेल अशा रीतीने मांडणे हे कादंबरीच्या कलात्मक श्रेष्ठतेचे द्योतक मानावे लागेल.

निवेदनाच्याबाबतीतला एक प्रश्न परीक्षणात रायकर यांनी मांडला आहे. 'पाचोळा' व 'गोतावळा' ह्या दोन्हीच्याही बाबतीत उभा राहतो. दोन्हतही नागरी भाषेतील संभाषणाचे कथन करण्याचे प्रसंग आहेत व तिथे नागरी भाषा जशीच्या तशी राखण्यात आली आहे. उदा. 'गोतावळा' मधील शहरी पाव्हण्यांच्याच भाषेत नारबासारखा एखादा माणूस करील काय? ही कथन निवेदनाच्या सच्चेपणाला थोडी बाधा आणतात. निवेदनासाठी ग्रामीण भाषेचा वापर व ग्रामीण निवेदक हा समान दुवा 'गोतावळा' व 'पाचोळा' या कादंबऱ्याबध्ये असल्याचे रायकर यांनी नमूद केले आहे. या दोन्ही गोष्टींशिवाय या दोन्ही कादंबरीत समान दुवे नाहीत.

*** आदिवासीवरील दोन कादंबऱ्या :–**

डॉ. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' आणि प्रा. सुरेश द्वादशीवार यांची 'हाकुमी' या आदिवासी वरील दोन महत्वाच्या कादंबऱ्यांचे प्रमोट मुनघाटे यांनी परीक्षण केले आहे. आदिवासींचे निसर्गनिष्ट जीवन, त्यांची सांस्कृतिक प्रथगात्मता, लैंगिक व नैतिक स्वातंत्र्य, नागर संस्कृतीशी संघर्ष, त्यांचे अनुकूल–प्रतिकूल परिणाम, आदिवासी क्षेत्रातील नक्षलवादी चळवळीची समस्या, या साऱ्यांचे प्रत्यंतर या दोन्ही कादंबऱ्यामधून घडते.

'झेलझपाट' ही डॉ. मधुकर वाकोडे यांची अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील कोरकू जमातीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या कादंबरीत सूक्ष्म निरीक्षणातून आलेले व्यक्तिदर्शन आणि निवेदनातून भावनात्मक प्रत्यय पुरेपुर येतो. कोरकूंचे निसर्ग निवड जीवन, बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत नागर समाजाशी येणारा संबंध, सहंकारी व सरकारी योजनांचे

प्रयोग हे कादंबरीतील मुख्य प्रतिपाद्य विषय असून या सर्वांचा अविष्कार ‘डाक्यूमेटरीवजा’ न घेता कथात्मक अनुभवात व्यक्त करण्यात लेखक कसा यशस्वी झाला आहे ते स्पष्ट केले आहे.

‘हाकुमी’ ही प्रा. सुरेश द्वादशीवार यांची गडचिरोली जिल्ह्यातील ‘माडिया गोंड’ समाजाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली कादंबरी. डॉ. कन्ना मडाबी हा या कादंबरीचा नायक. कन्ना हा आदिवासी संस्कृतीच्या प्रथगात्मकतेची जाणीव झालेला नवयुवक आहे. तो पुण्यासारख्या नागर संस्कृतीतील कार्यकर्त्यांची उपरी संवेदनशीलता ओळखतो. तथाकथित नागर संस्कृतीच्या, सामाजिक नितिमूल्यांच्या तुलनेत आदिवासी मूल्यव्यवस्ता त्याला अधिक निकोप वाटते. म्हणून आदिवासी व आधुनिक सुधारणांच्या संघर्षत आदिवासींची जीवनमूल्ये संपुष्टात येऊ नये असे त्याला वाटते, असे डॉ. कन्नाच्या व्यक्तिमत्वाचे विशेष मुनघाटे यांनी टिपले आहेत. ‘हाकुमी’ म्हणजे आदिवासीचं ‘तुतारी’ सारखं फुंकून वाजवायचे एक वाद्य. अनिताच्या लग्नाच्या प्रस्तावाला अमान्य करुन तिला निरोप देताना कन्ना भेट म्हणून अनिताला ते वाद्य देतो. कादंबरीच्या मुखपृष्ठावर एक माडिया ते फुंकताना चित्रित केले आहे. त्यातून कादंबरीचा केंद्रीभूत आशयच प्रकट होतो, असे मुनघाटे नमूद करतात.

‘झेलझपाट’ आणि ‘हाकूमी’ या दोन्ही कादंबऱ्यामध्ये आदिवासींच्या परिसराची विशिष्टता व्यक्त झाली आहे. त्या परिसराशी नैसर्गिकरित्या तेथील आदिवासी जीवनाच्या सर्व पातळीवर एकरुप झालेले आहेत. त्यांचे धार्मिक संस्कार, लैंगिक जीवन, जेवणा–राहण्याच्यापद्धती आणि नितिमूल्ये उत्क्रांत झालेली आहेत. ‘झेलझपाट’ या कादंबरीविषयी डॉ. श्रीकांत तिकडे यांनी लिहिले आहे की, ‘‘मेळघाटातील कोरक या आदिम जमातीचे व्यक्तिगत व सामाजिक जीवन चित्रित करणारी ‘झेलझपाट’ ही मधुकर वाकोंडे यांची लक्षणीय कादंबरी आहे. या कादंबरीतील आदिम संस्कृतीदर्शन कौतुकास्पद आहे.’’[१९] असा दाखला मराठीतील समीक्षक श्री. डॉ. श्रीकांत तिडक यांनी दिला आहे. तर शंकर सारडा यांनी ‘झेलझपाट’ बद्दल आपला अभिप्राय नोंदवताना म्हटले आहे की, ‘‘कोरकू या आदिवासी जमातीच्या पार्श्वभूमीवरील ‘झेलझपाट’ ही कादंबरी म्हणजे कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे एक अत्यंत प्रामाणिक व विश्वासार्ह दर्शन आहे. पारंपारीक आदिवासी जीवनशैलीला स्वार्थी व लाबाड

व्यापाऱ्यांची लुबाडण्याची वृत्ती या सर्वांमुळे निर्माण झालेला धोका आजमितीचे कालचे परिमाण कसे उद्ध्वस्त करत आहे, याचे एक सर्वकष चित्र 'झेलझपाट' मधून वाचकांच्या मन:पटलासमोर उभे राहते.''[२०]

'झेलझपाट' व 'हाकुमी' या कादंबऱ्या वाङ्मयीन रुपांच्या दृष्टीने यशस्वी कादंबऱ्या असूनही 'आदीवासींच्या' संदर्भातील अनेक वास्तववादी पैलू लेखकांनी कौशल्याने कादंबरीत कोरलेले आहे, हे परीक्षणामध्ये स्पष्ट करुन सांगितले आहे.

**वसंत पळशीकर–पाच कादंबऱ्या :–**

'समाज प्रबोधन पत्रिके' चे दीर्घकाळ असलेले संपादक श्री. वसंत पळशीकर यांनी समाज प्रबोधन पत्रिकेला खऱ्या अर्थाने स्थैर्य प्राप्त करुन दिले. त्यांनी वेळोवेळी 'पत्रिके' मध्ये लिखाण करुन 'पत्रिके'ला वैचारिक नियतकालिकाचा दर्जा प्राप्त करुन दिला. त्यांना एकाचवेळी 'पुत्र' (मनोहर शहाणे), 'अदेशी' (सुभाष भेंडे), 'ऑक्टोपस' (श्री. ना. पेंडसे), 'अरे संसार संसार' (प्रभाकर पेंढारकर), 'मी, मी, मी नटराज' (ए. वि. जोशी) या पाच कादंबऱ्यांचे परीक्षण परखड शब्दांत केले आहे. या पाचही कादंबऱ्या त्यांना खोट्या वाटतात. कारण कादंबरीकरांनी त्या आपणास हव्या तशा रचल्या आहेत, असा स्पष्ट शब्दात आपला अभिप्राय नोंदवला आहे. पळशीकरांच्या मते, साहित्य बाह्य घटना व प्रक्रिया संबंधीच्या त्यांच्या भूमिका आणि त्यांच्या कादंबऱ्यांतही कृत्रिमता यांचा अंगभूत संबंध आहे. वास्तवापासून दूर पळण्याची प्रवृत्ती दोन्हीकडे समान आहे.

वसंत पळशीकरांनी या पाचही कादंबऱ्यांचे अतिशय परखड शब्दांत परीक्षण केले आहे. या पाच पैकी चार कादंबऱ्या प्रथम पुरुषी निवेदनाच्या स्वरुपात लिहिलेल्या आहेत आणि आपापल्या परीने हे चारही नायक उरबडवेपणा करतात. 'जगात खऱ्याचा कोणी वाली नाही' असे सांगतात. त्यांच्यावर हा प्रसंग येतो, त्याला तेच कारण आहेत. पण आपली जबाबदारी ते टाळू पाहतात. ही खास मध्यमवर्गीय ब्राम्हणी पराभूत मनोवृत्ती आहे. वास्तवात आधार नसलेले खोट्या विफलतेत लोळण्यात आनंद मानवणारी आणि आपला उरबडवेपणा हेच आपल्या श्रेष्ठत्वाचे, संवेदनशीलतेचे यमक मानणारी. नायकाची मने अशी नाहीत. ती त्यांना जन्माला घालणाऱ्या

कादंबरीकरांची आहेत. या कादंबऱ्यांमधून एक रोगट मन वेगवेगळ्या रुपात प्रकट होत राहते, असे कादंबरीच्या स्वरुपाबद्दल मौलिक स्वरुपाचे विवेचन केले आहे. त्यातून त्यांनी कादंबरीकाराच्या भूमिकेचा शोध घेतला आहे. कादंबरीकारांची भूमिका कोणती असायला हवी याबाबत वा. ल. कुलकर्णी लिहितात, ''हल्लीचा कादंबरी लेखक जगातील माणसे अशा प्रकारची आहेत हे सांगण्यात भूषण मानतो. घटनेपेक्षा माणसाला जास्त महत्व प्राप्त झाले आहे आणि म्हणूनच कथानकापेक्षा पात्रांचे स्वभावचित्रण हे कादंबरीचे मुख्य अंग ठरत आहे. मनुष्याच्या अन्त:करणातील सूक्ष्म व्यापार, कलान्मकतेने वर्णन करण्यात कादंबरीकारांना मानसशास्त्राची कितीतरी मदत होत आहे. आधुनिक कादंबरीकराची भूमिका न्यायाधीशाची नसून संशोधकाची आहे.''[२१]

'सुभाष भेंडे' यांच्या 'अदेशी' या कादंबरीच्या परीक्षणात पळशीकर म्हणतात, कादंबरीतले महेशचे वर्णन हे आचरट, अथळ व मूर्ख माणसाचे वर्णन आहे. महेशसारख्या तरुण कादंबारीचा नायक होऊ शकत नाही. सामाजिक समस्यात्मक कादंबरी महेशसारख्या भोवती उभारता येत नाही. कारण त्याची समस्या ही सामाजिक नाहीच एखादा कादंबरीकार अशा व्यक्तिमत्वाचे चित्रण केल्यास अशा व्यक्तिमत्वाची उकल काही होते का हे पाहण्यासाठी करेल. भेन्डे यांच्या कादंबरीत तसा प्रयत्न नाही, त्यांचा तो हेतूही नाही, असे म्हटले आहे.

मनोहर शहाणे यांच्या 'पुत्र' कादंबरीचे परीक्षण करताना पळशीकर असे नमूद करतात की, अंगारेश्वराच्या पुजारी–मालकाचा मुलगा अच्युत, मनोहर शहाणे यांच्या 'पुत्र' कादंबरीचा नायक आहे. कादंबरीचा विषय काय आहे? बापामुळे अच्युतची झालेली एका विशिष्ट प्रकारची घडण हाच विषय होऊ शकतो. एरवी 'पुत्र' ला अर्थपूर्ण कथानक नाही.

या कादंबरीत अंगारेश्वराचे मंदिर हे फोर मोठी जागा व्यापते. त्यांची वास्तविक आवश्यकता आहे का? देवाचा पुजारी हा क्षीण कामवासनेचा असावा, किंवा पुजाऱ्याने वस्तुत: असा संग करणेच पाप होय असे काही अच्युतच्या मनावर संस्कार आहेत असे मानले तरच त्याचा बाप पुजारी असणे आणि ते देऊळ कादंबरीत मध्यवर्ती असणे अर्थपूर्ण ठरते. पण हे संस्कार होऊन अच्युत आपल्या बापाकडे पहातीय, बापाची कामवासना आणि त्याचा पेशा

यातल्या विरोधाने तो सतत पोखरला जातोय असे काही या कादंबरीत सूचित होत नाही; शिवलिंग अंगारेश्वर–अंगार–कामवासना असे काही प्रतीक कादंबरीकारास अभिप्रेत असेल तर कादंबरीकाराचा फार मोठा उथळपण आहे. फक्त एक हिंदी सिनेमातच शोभून दिसणारा. किंबहूना बाप पुजारी असणे याला काहीच महत्व नाही. त्यात जोडीला तो स्वार्थी असतो, आपल्या भावाला तो घराबाहेर काढण्याचा हलकटपणा करतो इत्यादी अनेक गोष्टीही प्रधान विषयाच्या दृष्टीने आवश्यकता नाही. ह्या सर्व फापटपसाऱ्यात मुख्य विषय हातळण्यात लेखकास सवडच झालेली नाही, असे स्पष्ट करुन सांगितले आहे.

कादंबरीतून त्याचे जे व्यक्तिमत्व समोर येऊ पाहते ते शहाणेच्या लादलेल्या व्यक्तिमत्वाच्या ओझ्याखाली गुदमरुन जाते. त्याचे बोलणे, त्याचे विचार हे सुसंगपणे, सलगपणे त्याच्या व्यक्तिमत्वातून स्फूरत नाहीत. शहाणे तशी योजना करतात. कादंबरीत सर्वदूर हा कृत्रिमपणा, ही बनावटता भरलेली आहे. अच्युत चे विक्षिप्त बोलणे, हा विचित्रपणाचा हव्यासच कादंबरीचा विषय खाऊन टाकतो असे नमूद केले आहे.

'ऑक्टोपस' ही पेंडसेंची कादंबरी धंदेवाईक गल्लाभरु नाटककाराने बेतलेली भडक, सनसनाटी कथा असल्याचे पळशीकर परीक्षणात सांगतात. छेंडसे यांची 'ऑक्टोपस' कांदबरीकार म्हणून त्यांचा कधीच अस्त झाल्याचे सूचविते. पेडशांना अंथरुणात पडल्या पडल्या दिसलेल्या मिनी मोडक या मुलीची ही कथा आहे. म्हटल तर सेक्सच्या ऑक्टोपस स्वरुपाविषयी ही कादंबरी आहे. मिनी मोडकचे व्यक्तिमत्व कसे आहे? ते सोयीनुसार कधी लफडेबाज आणि कधी भाबडी, गोड आहे. सोय पेंडशांची त्या–त्या प्रसंगापुरतीची कारण कादंबरीत वाफ जिवंतपणे वावरत नाहीत. ती कुठपुतळ्यासारखी आहेत.

बेलगाम कामवासना ही ऑक्टोपससारखी जीवघेणी आहे. यात शंका नाही. ती माणसाचा नाश करुनच थांबते. पण अशा वासनेने ही पात्रे ग्रासलेली आहेत काय? खुद्द मिनी देखील एक साइडशो म्हणून मजा करीत असावी तशी दाखविलेली आहे. आपण पोखरले जातोय, खलास होतोय याचे भान तिला असल्याचे दाखविले नाही किंवा तसे घटनांचे चित्रणही नाही. कादंबरीत फक्त हिंदळेकर स्वत:चा नाश करुन घेतो पण त्यालाही सेक्सचा ऑक्टोपस कारणीभूत आहे असे

नाही. मिनीसाठी उल्लू बनण्याची ती योग्य शिक्षा आहे. त्यात शोकात्म असे काहीच पळशीकरांना वाटत नाही. श्री. ना. पेंडसे यांच्या 'ऑक्टोपस' या कादंबरीविषयी चंद्रकांत बोदिवडेकर लिहितात, '''ऑक्टोपस' मध्ये त्यांनी आणखी एक आव्हान स्वीकारल आहे. पेंडसे कामवृत्तीचं चित्रण करु शकत नाहीत असा आरोप आहे काय? मग पेंडसे कामवृत्तीला केंद्रस्थानी 'ऑक्टोपस' लिहून दाखवतात. मात्र ही कादंबरी ज्या तऱ्हेने त्यांनी लिहिली आहे. त्यामुळे कामवृत्तीच्या सामर्थ्यशाली अनुभवाचं वा त्यातल्या वैविध्यपूर्ण अंगाचं चित्रण न होता ही कादंबरी म्हणजे कामवृत्तीवर आधारलेली 'रहस्यकथा' आहे.''[२२] बेलगाम कामवासना 'ऑक्टोपस' मधून चित्रित व्हायला हवी होती मात्र ती रहस्यकथेप्रमाणे वाचकांसमोर आली आहे.

प्रभाकर पेंढारकर यांच्या 'अरे, संसार संसार' या कादंबरीचे परीक्षण वसंत पळशीकर यांनी केले आहे. 'अरे, संसार संसार' ही कादंबरी उत्तरोत्तर जास्त–जास्त काळवंडत जाणारी एक संसारी, कनिष्ट मध्यमवर्गीय साध्या कारकुनांची कथा आहे. खास मुंबईसारख्या मोठ्या व बकाल शहरामध्ये घडणारी पण प्रभाकर पेंढारकर यांनी ती अतिगडद करुन सांगण्याचा मोह आवरला नाही.व त्यामुळे तिची सगळी शोकात्मता त्यांनी घालवून टाकली आहे, असे मत परीक्षणात्मक अभिप्रायात नोंदवले आहे.

'अरे, संसार संसार' या कादंबरी संदर्भात वसंत पळशीकरांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. 'मी' एवढ्या चटकन का पिचतो? त्याचा स्वभाव लक्षात घेता त्याला चार–सहा महिन्यांची तरतूद करणे अशक्य वाटण्याचे कारण काय? त्याच्या घरी कोणी येत–जात कसे नाही? 'मी' चा संसार उजाड होण्यास असलीच तर 'मी' ची दुर्बलता व अदूर दृष्टी कारणीभूत आहे. याच परिस्थितीतून मार्ग काढणारे अनेक आहे. याला अनेक वाटा उघड्या असूनही ही त्या चोखाळत नाही. असे असेल तर त्याच्याबद्दल सहानुभूती बाळगून परिस्थितीला दोष का द्यावा?

'मी, मी, मी नटराज' ही ए. वी. जोशी यांची कादंबरी म्हणजे प्रदीर्घ स्वगत आहे. ते एका दमात एकावेळी नायक गजानन–राजन–नटराज स्वत:शी म्हणतो असे नाही. हे स्वगत त्याचे अखंड चालूच आहे. घटना घडताहेत आणि स्वगतही. पण कादंबरी कृत्रिमपणे आधीच्या स्वगतातून पुढे स्वगत निर्माण होते असे दाखविले आहे. याचा एक अर्थ असा करता येईल की

कादंबरीतल्या अखेरीच्या प्रसंगानंतर नायक हे आपले स्वगत सलग लिहून काढतो पण एकंदरीत या रचनेची अनिवार्यता ठसत नाही कृत्रिम वाटते.

'मी, मी, मी नटराज' या कदंबरीच्या संदर्भातही वसंत पळशीकर यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. मुळातच गजाननाचा राजन बनविण्याची गरज काय? असा कोणी एखादा नट झाला असेलही पण जोशी काही त्यांचे चरित्र लिहित नाहीत. गजाननला गजानन ठेवूनच कादंबरीचा मूळ विषय त्यांना अधिक समर्थपणे हाताळता आला असता. मुद्दा असा आहे की, भौतिक सुखांची रेलचेल असावी इतक्या वरपर्यंत या नव्या दुनियेत चढण्याची किमया एकतर निर्ढावल्याशिवाय जमतच नाही किंवा प्रामाणिकपणे पुरता उसवून नव्याने टाके पडण्याची क्रिया घडूनच ते जमू शकते. गजाननचा राजन होताना यापैकी काहीतरी झाले असले तरी त्याचे स्वगत आपोआपच खोटे ठरते. आपल्या डोळ्यात धूळफेकण्यासाठीच तो हे करीत असला पाहिजे. अर्थात नटराज खोटा नाही. कादंबरी खोटी आहे, असे पळशीकरांनी स्पष्ट केले आहे.

'निर्मला देशपांडे' यांच्या 'टिकली एवढं तळ' या कादंबरीचे इरावती कुलकर्णी यांनी परीक्षण केले आहे. निर्मला देशपांडे यांची ही पहिलीच कादंबरी असून एखाद्या सराईत लेखिकेने लिहावी अशी लिहिली आहे. विषय नेहमीचा असूनही मानसिक संघर्षाबद्दल केलेले अतिशय हळूवार चिंतन या कादंबरीला बऱ्याच वरच्या पातळीवर नेऊन ठेवते, असे परीक्षणात इरावती कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

कादंबरीचा विषय साचेबंद असूनही तो मानसिक पातळीवरच्या घटनांवर बेतला असल्यामुळे हाताळावयास अतिशय अवघड. त्यामुळे लेखिकेला आपले लिखाणाचे सर्व कसब पणाला लावावे लागले आहे आणि त्यात ती यशस्वी ही झाली आहे. या कादंबरीतील लेखिकेची भाषा प्रवाही व सहज-सुंदर आहे. संस्कारीत मनाच्या स्त्रीचे चिंतन विलक्षण मनोज्ञ आहे. कादंबरीच्या अखेरीस निशिकांतच्या मृत्यूची बातमी सांगताना, आपल्या पत्नीला तो ज्या तऱ्हेने सावरु पाहतो त्यातून लेखिकेने अतिशय सूचकपणे, कौशल्याने उभी केली आहे, आणि हेच या कादंबरीचे यश आहे, हे परीक्षणातून प्रतीत होते.

*** नियतीची अटळता :–**

चि. त्र्यं. खानोलकरांच्या ‘भागधेय’ आणि ‘अगोचर’ या दोन कादेव यांचे शकुंतला जोग यांनी परीक्षण केले आहे. नियतीची अटलता ही खानोलकरांची वाहणारी जखम आहे. ती जास्त–जास्त चिघळत खानोलकरांच्या प्रत्येक कलाकृतीमध्ये वाहत असते. अगोचरमध्ये सत् असत् दोन्हीचा नारा आहे तर भागधेयमध्ये सत्चीच केविलवाणी फरपट आहे. जिन्यापेक्षा नाश बरा. त्यामुळेच भागधेयमधील नियतीचं तांडवं जास्त भेदक भिडणारं वाटत, असे आपले मत उद्घृत केले आहे.

अगोचरचा शेवट फक्त खिलवणारा तसाच विचारांना चालना देणारा आहे. अगोचरसारखी भागश्रेय झपाटून टाकणारी कादंबरी नाही, असेही शकुंतला जोग यांनी परीक्षणात नमूद कले आहे. ते का ते स्पष्ट करुन दाखविले आहे. ‘भागधेय’ मध्ये ‘तुझा पराभव अटळ आहे’ हे सामंताचे उद्गार फार बटबटीत असल्यामुळे कादंबरीचा शेवट त्यांना दुबळा वाटतो. खानोलकरांनी ‘अगोचर’ मधील कुठल्याचं पात्राचे सब्लिशन केले नाही, म्हणून ती जास्त रसरसीत, जिवंत वाटतात. खानोलकर हे इथल्या मातीशी पूर्णपणे इमान राखणारे साहित्यिक असल्यामुळेच कोकणातल्या अल्पसंख्यांकांची, मुसलमानांची रया, दैना त्यांना दिसली, असे शकुंतला जोग यांनी म्हटले आहे. ‘भागधेय’ मध्ये कोकणातल्या अल्पसंख्यांकाचे प्रश्न किती भीषण आहेत याकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे.

माणसाचा अंतिम एकाकीकपणा हे या सृष्टीतील एकमेव सत्य. ते मात्र खानोलकरांनी कौशल्यानं दाखवलय. खानोलकरांनी कादंबऱ्यामध्ये जे विश्व साकारलय ते अतिरेकी आहे हे सारे वाचकाला पटते. विश्वसनीय वाटते. याला कारण खानोलकरांची अलौकिक प्रतिमा. या अतिरेकी विश्वाचा भेदक, जिवंत दर्शन घडविण्याची ताकद त्यांच्या शब्दकलेत आहे. त्यांची भाषा अलंकारीक जरुर आहे. पण अलंकारांचे ओझं तिला झालेल नाही. खानोलकरांनीच म्हटल्याप्रमाणेच काचेवरुन गळणाऱ्या थेंबाप्रमाणे ती अलगत आपल्या जाणिवेला स्पर्शून बाजूला होते किंवा कधी कधी हसनच्या बायकोच्या धारदार हट्टी नजरेप्रमाणे किंवा अहमदंनियाच्या कुऱ्हाडीप्रमाणे वाचकांच्या मनात रुतूनही बसते.

चि. त्र्य. खानोलकरांच्या 'चानी' या कादंबरीचे म. गं. नातू यांनी परीक्षण केले आहे. खानोलकरांच्या कादंबऱ्यात कलात्मकतेबरोबरच सामज प्रबोधनाचे सामर्थ्यही असते. 'चानी'त त्यांच्या ह्या दोन्ही वैशिष्ट्यांचा पुरेपुर प्रत्यय येतो. अंधश्रद्धा, नीती, अनितीच्या चुकीच्या कल्पना, कार्यकारण भावाचे अज्ञान इत्यादीवर प्रखर प्रकाशझोत टाकून ते वाचकांना अंतर्मूख करतात. परंतु सौंदर्याचे श्रेष्ठ वरदान लाभलेली त्यांची गुणसंपन्न चानी जशी उपेक्षित राहिलेली दिसते समीक्षकांनाही तिची जिव्हाळ्याने दखल घेतली नसल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

'चानी', 'खार' हे लेखकाचे आवडते प्रतीक जिव्हारी भिडणारे, अर्थाची अनेक वाक्ये सामावून घेणारे, नावातच निरागसता, चापल्य व आकर्षकता, गर्भित असलेले चानी पुढील पात्रांनी आकर्षक हालचाली करीत फळ खाणारी, कोणाचेही भक्ष्य होऊ शकणारी पण त्याची मुळीच जाणीव नसल्यामुळे नि:शंकपणे बागडणारी खार त्यांच्या कादंबऱ्यात अनेकदा आढळते.

'चानी'सारख्या कलाकृती मुख्यत: साहित्यकृती, जीवननिरपेक्ष असूच शकत नाही. वाङ्मयकृती निर्मिणाऱ्या कलावंताच्या सौंदर्यदृटीस त्याच्या जीवनदृष्टीमुळे वजन प्राप्त होते. केवळ आकृतिबंधाने किंवा रसोत्कटतेने नव्हे तर जीवन सापेक्षतेमुळे वाङ्मय कृती श्रेष्ठ ठरु शकते. अशी कलाकृती आपल्या मानवी जीवनाकडे व त्यातील समस्यांकडे नेऊन विचारप्रवण करते. खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा हाच विशेष नातू यांनी परीक्षणात टिपला आहे. चानीच्या बाबतीत लहानग्या दिनूला जे प्रश्न पडतात ते धर्म, संस्कृती यांच्या हजारो वर्षाच्या ज्ञानाचे गोठोडे पाठाशी असलेल्या असंख्य लोकांना पडत नाहीत. ह्या कठोर सत्याची प्रतीती प्रस्तुत व कादंबरीतून येते. अंधश्रद्धेपायी उभा गाव निरपराध असाहाय्य व छोट्या चानीवर सर्वसामर्थ्यानिशी तुटून पडू शकतो, तिला तुडवू शकतो. या घटनेतून आपल्या विवेकशक्तीला केवढी घोर निद्रा लागलेली आहे हेच खानोलकर आपल्याला दाखवितात.

*** जगणे आणि मरणे :–**

चिं. त्र्य. खानोलकार यांच्या 'गणुराया आणि चानी' या कादंबरीचे 'जगणे आणि मरणे' असे शीर्षक देऊन सुधीर बेडेकर यांनी परीक्षण केले आहे. 'गणुराय' हा मोकळा माणूस आहे. त्याचा काही सुद्धा नियम नाही, नेम नाही. त्याच्या पायाखाली वाळवंट आहे. चौकटीतील त्याला

काहीच नको आहे. सगळ कोरे हवयं त्याचे नियम त्याचे स्वत:चेच आहेत. समाजातले संकेत, रीतिरिवाज एवढेच नव्हे तर स्फुट दु:खाच्या व श्रेयाच्या कल्पनाही तो नाकारतो, अशा गुणरायाच्या जगण्यावर बेडेकर यांनी प्रकाश टाकला आहे.

खानोलकरांनी संघटनात्मक कौशल्य व दुसरीकडे प्रतिभा व भाषेची ताकद यांनी कथानकाला लांबी, रुंदी व खोली आणली आहे. पायाखालती लहानसे वर्तूळ असणारा खोत व अफाट निरर्थ भोगणारा गणुराया, त्याचे वडील, त्यांच्या फालतू चूका, हेवेदावे आणि बेबीचे समंजस आई वडिल, परागंदा झालेला मुक्त लखू आणि जिन्याखाली 'आमचे हे असेच' म्हणणारा केशव, यातल्या विरोधामुळे बांधणीची व्यापकता व पोत चांगला झाला आहे, हे या कादंबरीच्या संदर्भात दाखवून दिले आहे.

कथानकाची ही बांधणी व तिची गतिमान अलगद पेलू शकण्याइतका खानोलकरांच्या प्रतिभा समर्थ आहेत, असा विचार मांडला आहे. खानोलकरांच्यात घटनाक्रमांच्या पलीकडचे कथानक वाचकांपर्यंत जिवंतपणे व कलात्मकतेने भिडण्याची शक्ती आहे असे निरीक्षण नोंदविले आहे.

'चानी' चे परीक्षण करताना सुधीर बेडेकर लिहितात की, गणुरायापेक्षाही समर्थपणे खानोलकरांनी येथे प्रतिमा व भाषा वापरली आहे. रामाची कोंडी, चानीच्या झोपडीतली चित्रकला, परीकथा, गंगारामची आरोळी वगैरे विलक्षण आहे. केवळ लहान मुलाच्या तोंडून गोष्ट सांगण्याने काही साधले नसते. या प्रतिमा–प्रतिकांमुळेच कांदबरीला अस्तित्वाच्या तळापर्यंत जाण्याची ताकद आली आहे. भरघोस आणि जिवंत अनुभवावर चढलेली पुढे सोलवटून टाकणारी, प्रवाही भाषा येथे पाहायला मिळते. दोन्ही वाचून मन उद्विग्न होते, जीवनाकडे पाहण्याची एक जिवंत पण निरागस व आर्तदृष्टी दोन्हीत जाणवते पण तरी गणुरायाचा पराभव होतो. तसा 'चानी'चा होता नाही. ती बेदरकारपणे जगते आणि मरते. जगालाच पराभूत करणारे समृद्ध जीवन जगून मरते. गणुरायामध्ये शहरी जीवनातला खोटेपणा तर चानीत परंपरागत खेड्यातल्या जीवनातला आंधळेपणा आहे, हे त्यांचे परीक्षण रसिक–वाचकांसाठी दिशादर्शक असे आहे.

*** सामाजिक व सांस्कृतिक पडझड :–**

भालचंद्र नेमाडे यांच्या 'बिढार' आणि 'जरीला' या कादंबऱ्यांचे अनुक्रमे उत्तम क्षीरसागर आणि चंद्रकांत बांदिवडेकर यांनी परीक्षण केले आहे. 'बिढार' या कांदबरीचे परीक्षण करताना उत्तम क्षीरसागर नमूद करतात की, 'सार्वत्रिक पडझडीच्या पंचनामातला सामान्य माणूस बिढार मध्ये आहे. ही कादंबरी मराठी कादंबरी विश्वात एक अशी भर घालेल की ज्यामुळे वाङ्मय प्रकारची कक्षा विस्तारण्यास मदत होईल. व्यक्ती, समाज, संस्कृती आदींचे परस्पर संबंध तपासणारी ही कादंबरी आहे. 'बिढार' कादंबरी फक्त मानवी संबंधाच्या गुंतागुंतीची कादंबरी आहे असे नव्हे तर मानव आणि त्याने निर्माण केलेल्या संस्कृती, समाज आदि बाबींच्या संबंधाचा पण त्यात वेध घेतल्याचे नमूद करतात.'

'बिढार' ही चालू काळाची कादंबरी आहे. चालू काळातील जगण्याच्या विविध पद्धती, एकेका पद्धतीचे विविध पदर आणि मग त्यातून प्रतीत होणारी सामाजिक, सांस्कृतिक भयावह पडझड यांचे समर्थ चित्रण या कादंबरीत सापडते. या कादंबरीचा नायक ह्या पडझडीच्या प्रवाहात वाहन जाण्याचे नाकारतो. तो संवेदनाक्षम आहे. त्याने अत्यंत जाणीवपूर्वक चिक्कार वाचलेले आहे. तो अनेक मूलभूत गोष्टीवर विचार करतो आहे. माणूस, समाज, संस्कृती समजून घेण्यासाठी व योग्य दिशेने जाण्यासाठी धडपडतो आहे. एकांत त्याने भोगलाय, दारिद्र्य उपभोगलयं, मृत्यूच्या जवळ जावून आलाय. प्रवाहात न वाहत जाण्याचे वैयक्तिक परिणाम त्याला माहित आहेत. तरीसुद्धा तडजोड स्वीकारुन सार्वत्रिक पडझडीत सामील होण्याचे तो नाकारतो या बाबतीत तो अत्यंत जागरुक आहे. जगण्याला मानवी संदर्भात अर्थ प्राप्त करुन देवून सामाजिक, सांस्कृतिक बाबींचे कायम भान ठेवून जगणे ही कशी तारेवरची कसरत आहे हे कादंबरीतील चांगदेवच्या आयुष्यातील पाच–सहा वर्षांचे जगणे पाहिले म्हणजे लक्षात येते, चांगदेवचे हे सशक्त जगणेच कादंबरीला सामर्थ्य मिळवून देते.

मानवाने अत्यंत प्रयत्नाने आपल्या सर्व सामर्थ्याचा वापर करुन संस्कृती उभी केली आहे. ती समजून घेणे, तिच्यात आवश्यक बदल करऱ्यासाठी आपल्या आयुष्याची एक सुसंगत रचना करणे प्रत्येकाची जबाबदारी ठरते आणि तसा मानवी आयुष्याला या संदर्भातच अर्थ असतो.

'बिढार' कादंबरीत वरील जाणिवा जागृत करण्याचे सामर्थ्य असल्याचे क्षीरसागर यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

चालू युगात एका विशिष्ट सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीत खेडे, नगर, महानगर, यातून विशी ते पंचविशीच्या चांगदेव, भय, राग, तिरस्कार, वासना, उत्सुकता, स्वाभिमान, स्वधिक्कार, एकटेपणा, उन्माद, कर्तृत्वशक्ती, असहाय्यता, अनुभव, भावना, संवेदना, विचार, आठवणी, बुद्धी, हक्काची जाणीव... एवढ्या गोष्टी आरमारी काफील्यासारख्या आपल्या शरीरात घेऊन चांगले जगण्याची धडपड करतो आहे. त्यात नुसते जगणे वगैरे नसून चांगले जगण्याची धडपड आहे, ही गोष्ट अत्यंत महत्वाची. तसेच या कादंबरीत ज्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक समस्या येतात, त्या चांगदेवच्या जगण्याच्या अनुषंगानेच येतात आणि म्हणूनच त्यांना महत्व प्राप्त होते, असे सांगतात.

माणसाचे माणूसपण असे यांत्रिक होणे नाकारण्यात आहे आणि हे जपणे चांगदेव अत्यंत मोलाचे समजतो. यंत्र म्हणून गुलाम म्हणून जगण्याचे नाकारणारा, सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा जागृत ठेवणारा, स्वत:च्या जीवनाबद्दल मानवी संदर्भात विचार करणारा, कायम विकसत जाणारा सामान्य आदर्श माणूस चांगदेवाच्या रुपाने नेमडेंनी साकार करुन भोवतालच्या खऱ्या, एकांगी अनुभव विश्वावर आधारित साहित्यविश्वात एक जबरदस्त प्रचंड विचारानुभव उभा केला आहे. तो जगातील अभिजात वाङ्मयाशी नाते सांगणारा नक्कीच ठरेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

*** प्राध्यापकांच्या जीवनातले अनेकपदरी ताण :–**

भालचंद्र नेमाडे यांच्या 'जरीला' या कादंबरीचे मार्मिक परीक्षण चंद्रकांत बांदिवडेकर यांनी केले आहे. नेमाड्यांचा 'जरीला' म्हणजे सामान्य माणसातल्या जाणीवांचे, समजूतदार जीवनविषयक तत्वज्ञानाचे, अतिरेकीपणा टाळून जीवन शांतपणे व स्वस्थपणे जगू इच्छिणाराचं मोठं मुग्ध करुन टाकणार विश्व आहे. बुद्धिवादी उच्चभ्रूंच्या जीवनविषयक अतिरेकी कल्पनांवर धारणांवर, पोकळपणावर आणि रितेपणावर अप्रत्यक्षपणे नेमाडे कसा प्रहार करतात, हे बांदिवडेकर स्पष्ट करतात. जीवनविषयक अतिरेकी कल्पनांचं मूळ किंवा उगमस्थान स्वत:च

शिक्षित मनच आहे. ही भूमिका घेऊन स्वतःच्या हरण्यातून, पलायनातूनच सामान्य माणसाची जीवनदृष्टी कशी अधिक ग्राह्य आहे, अधिक स्वस्थ आहे हे सुचवतात. म्हणूनच या कादंबरीतल्या ताणांना एक संतुलित डौल प्राप्त झाला आहे. हरिश्चंद्र थोरात लिहितात, 'कादंबरी' या साहित्य प्रकारांमध्ये वास्तव आणि कल्पितता यांच्यातील सुक्ष्म ताण आणि या दोन ध्रुवांमध्ये साधलेला तोल अभिप्रेत असतो. हे ताण आणि ताल घालवेल तर कादंबरी नीट उभीच राहू शकत नाही.''[२३] नेमाड्यांनी प्राध्यापकाचे एक सजीव वास्तव मोठ्या प्रत्ययकारी रीतीने साकार केले आहे. प्राध्यापकांच्या जीवनातले अनेकपदरी ताण या कादंबरीत समर्थपणे उभे केले आहेत. जीवनातल्या मुलभूत प्रश्नांशी भिडणारी वयस्क कादंबरी म्हणून 'जरीला' बांदिवडेकर यांना महत्वाची वाटते तर प्रा. वि. शं. चौघुले या कादंबरीविषयी लिहितात, ''चांगदेवचे लौकिक जीवन त्याचे वैयक्तिक जीवन अधिक गडद बनविते. त्याच्या वैयक्तिक जीवनाला अपरिहार्य आकार देते. आपल्या स्वतःच्या दृष्टिकोणातून चांगदेव भोवतालच्या लोकांची संस्कृतिविहीन स्थिती माहित असूनही त्यांच्यात मिसळते आहे. पण रंगावर पांढऱ्या रंगाचा ठिपका उठून दिसावा तसा सभोवतालच्या मूल्यहिन प्रवाहपतित समाजात चांगदेव आपल्या मूल्य निवडेमुळे आणि वेगळेपणामुळे उठून दिसतो. की मूल्ये त्याने काही फॅड म्हणून जोपासलेली नाहीत. त्याच्या सुसंस्कृत मनाची ती अपरिहार्य प्रतिक्रिया आहे.''[२४]

*** जीवनाचे तात्त्विक दर्शन :–**

'अधोलोक' या वसंत आबाजी डहाके यांच्या कादंबरीचे चंद्रकान्त बांदिवडेकर यांनी परीक्षण केले आहे. डहाक्यांची कादंबरी 'अधोलोक' मराठी कादंबरीत वेगळी वाटते आणि तिचे हे वेगळेपणच तिचे वैशिष्ट्य असल्याचे बांदिवडेकेर नमूद करतात. पण या अनुभवाला माणसांच्या भावनांचा, सामान्य वास्तवात आढळणाऱ्या, वृत्तीचा व प्रवृत्तींचा आधार असायला हवा होता, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला आहे.

डहाक्यांच्या कादंबरीतील काही विसंगतीकडे बांदिवडेकर आपले लक्ष वेधतात. डहाक्यांचा नायक ठरल्याप्रमाणे गोष्टी घडविण्याच्या वाल्गना करतो तर दुसऱ्या बाजूला असेही म्हणतो, 'मी तर यंत्रच आहे हे मी ओळखले होते. ते कळण्याअगोदर मी स्वैर किंवा अयांत्रिक

वागत असतो. तसं काही वेळा वाटल तरी ही ती पूर्व नियोजित रचनाच होती. हे जेव्हा कळलं तेव्हा भयापासून मुक्त झाल्याचे समाधान मला झालं. शेवटी आपण यंत्र आहोत हे कळण म्हणजे ज्ञान. के ज्ञान एकदा झाले की मी उद्या कसं वागणार हे निश्चित झालेच.' डहाक्यांच्या 'अधोलोक' मध्ये बुद्धी, भावना व कल्पना यांना सम्यक्‌पणे अनुभव ग्रहण करण्यासाठी आव्हान मिळत नाही. डहाक्यांच्या या कादंबरीत मुख्य आशय घटक सूचित करण्यासाठी प्रतीकांचा वापर झाला असला तरी त्यांच्या एकूण शैलीत प्रतिमांचा जिवंत डवरलेपणा फारच कमी. डहाके आपला अनुभव ज्या तऱ्हेने मांडत आहेत तो जाणात्या वाचकाला त्यांचा वाटत नाही, असे स्पष्ट मत बांदिवडेकर व्यक्त करतात. डहाक्यांची कादंबरी जागतिक श्रेष्ठ कलाकृतीचे संदर्भ जागे करत असली तरी त्यांची महात्मता अधोलोकला येत नाही, असा परखड शब्दांत त्यांनी आपला प्रतिवाद केला आहे.

अच्युत बर्वे यांच्या 'कॅलिडोस्कोप' या कादंबरीचे गौतम सात्विक यांनी 'कॅलिदोस्पोपिक' नसलेली कादंबरी असे परीक्षण केले आहे. 'कॅलिदोस्कोप' ह्या कादंबरीचे नाव चुकले लेखकाचा आत्मविश्वासही चूकीचा आहे, असे परखड मत व्यक्त केले आहे.

*** फसलेली कादंबरी :–**

'कॅलिडोस्कोप' चा नायक (वकिल व लेखक) एकनाथ पांडुरंग रहाळकर, त्यांच्या मृत्यूच्या निमित्ताने त्याआधी अनेक संबंधित माणसे त्यांच्याविषयी माहिती देतात. त्या सर्वांच्या माहितीतून त्या माणसाचे जे चित्र दिसते ते एकच आहे. म्हातरपणापर्यंत आणि मृत्यूच्या आधी चार दिवसांपर्यंत लाजलज्ञा सोडून बायकांचा भोग घेणारा सुशिक्षित माणूस. त्यांचे दुसरे कोणतेच रुप जितके जाणवत नाही बायांचा भोग घेणारा हा लेखक एका तरुणीकडे जातो आणि ती त्याच्या मुलीच्या शाळेतील मैत्रिण होती हे कळून शुद्धीवर येतो आणि तिला न भोगता परततो. हा तथाकथित निष्णात वकील हाताखालचा वकील तयार करुन त्याला पायावर उभा करतो. एवढे दोन प्रसंग सोडले तर ह्या रहाळकरांमध्ये दुसरा लक्षात राहण्यासारख्या गुण आढळत नाही. जी एक उलट तपासणी दिली आहे ती ही वेश्यापूत्रीची असून तिची लफडी आधीच मिळवून ह्या वकिलाने तिच्या तोंडावर फेकली ह्या पलिकडे त्याचे कौशल्य नाही. म्हणून 'कॉलेडोस्कोप' हे

जबरदस्त नाव ह्या कादंबरीला न शोभणारे आहे. लेखक आत्मविश्वासपूर्वक म्हणतो, ''माझ्या मते 'कॅलिडोस्कोप' चे नाण खणखणीत आहे. राणी छाप रुपयासारखं.'' हेही अनुभवास येत नाही. म्हणून गौतम सात्विक यांना ही फसलेली कादंबरी वाटते.

*** उगवती पिढी :-**

डॉ. भा. ल. पाटील यांच्या 'उगवतीचे रंग' या कादंबरीचे परीक्षण 'उगवती पिढी' असे सुभाष भेंडे यांनी केले आहे. उगवत्या पिढीच्या अध:पाताचे, व्यथा-वेदनांचे चित्रण डॉ. भा. ल. पाटील यांनी 'उगवतीचे रंग' या कादंबरीत केले आहे. मुंबईसारख्या घाई गर्दीच्या शहरात पोराबाळांच्या उद्योगामागे कुटुंबप्रमुखाला ऊर फुटेपर्यंत धावावे लागते. त्याच्या मनात असूनही त्यांच्या पाल्यांकडे लक्ष देता येत नाही. मुलाला फीसाठी, पॉकिटमनीसाठी पैसे दिले की आपली जबाबदारी संपली असा सोयीस्कर समज तो करून घेतो, कोवळ्या वयात हातात पैसे खेळू लागले, कुणाचा वचक वाटेनासा झाला म्हणजे मुले बहकतात. स्वच्छंदी व बेहोश जीवनाची त्यांना चटक लागते आणि हॉटेल, मद्य, हाताश अशी ही चढती भाजणी सुरू होते आणि पौगंडावस्थेततल्या मुलाशी शारीरिक संबंध येणे येथे तीस पूर्णविराम मिळतो. आजची तरूण पिढी का बिघडत गेली. त्या पिढीमागच्या कारणांचा शोध या कादंबरीत घेतानाचे परीक्षणावरुन स्पष्ट होते.

*** एकेरी उत्तराचा अट्टहास :-**

'जन हे वोळतु जेथे' या शरचंद्र मुक्तिबोध यांच्या कादंबरीचे सीताराम रायकर यांनी 'एकेरी उत्तरचा अट्टहास' असा उल्लेख केला आहे. परीक्षणाच्या सुरूवातीलाच मुक्तिबोधांचे कादंबरी विषयीचे मत व्यक्त केले आहे ते असे, व्यक्ती आणि समाजासह समग्र जीवनासंबंधी सांगण्याचा हा प्रयत्न आहे. जीवनाचे निरीक्षण तसेच परीक्षण ही आहे. जेथे दु:ख आहे तेथे अपूर्वत्व आहे म्हणूनच दु:खाला महत्वाचे स्थान मिळाले आहे. काही माणसाला पतनाकडे ओढीत नेतात व काही प्रकाशाच्या वाट दाखवितात. मानवी दु:खाची चौकशी करण्यासाठी ही कादंबरी या मुक्तीबोधांच्या मताच्या आधारेच सीताराम रायकर यांनी परीक्षण केल्याचे दिसुन येते.

'विश्वास' या कादंबरी त्रयीचा 'नायक' नाही. यांत जीवनातील दु:खाचे केलेले निरीक्षण

आणि परीक्षण आहे व या दु:खाचे चित्रण या व्यक्ती व प्रसंगाद्वारे केलेले आहे हे समर्थन मान्य करूनही या कादंबरीमध्ये निरनिराळ्या दुय्यम पात्रांना व त्यांच्या पूर्वे तिहासाला क्वचित प्रसंगी हा पूर्वेतिहास निव्वळ किस्सेवजा होतो दिलेले महत्व अवास्तव असल्याचे रायकर यांनी स्पष्ट केले आहे. ‘जन हे वोलतु जेथे’ च्या शेवटी विश्वासाने घेतलला निर्णय या कादंबरीच्या एका सुत्राशी विश्वासाला आपल्या भूमिकेचे भान येणे, त्याचे जीवनातील इजिशिएशना होणे, सुसंगत आहे. पण विश्वासाला मिळालेले उत्तर हे मानवी दु:खावरचे एकच उत्तर आहे हे असे ते भासवू पाहतात. त्यामुळे हे उत्तर वाचकावर लादल्यासारखे रायकर यांना वाटते.

सदाशिवरावांच्या माणुसकी, मुक्या प्राण्यांवर प्रेम इत्यादी गोष्टी किंवा बापूंचा चांगूलपणा, नानांच्या हारा दिसलेला निर्हेतुक कलाविष्कार ही मूल्ये हि लेखकाला मान्य असावे, पण समाजाशी एकरून होवूनच माणसाला आपला आनंद सापडेल हे प्रेमच वाचकाच्या मनावर ठसविण्याच्या, ह्या ज्ञानाचा ‘एकच एक संस्कार’वाचकांच्या मनावर करण्याच्या अट्टाहासामुळे कृत्रिमता निर्माण होते त्यामुळे ही कादंबरी संपविल्यावर असमाधान वाटत राहते असा अभिप्राय रायकर यांनी नोंदवले आहे.

*** अनुभवाच्या दोन परिसीमा :–**

व.ह.पिटके यांच्या ‘शिदोरी’ या कादंबरीचे महेश पदकी यांना परीक्षण केले आहे. परीक्षणाच्या सरुवातीलाच पदकी यांनी ललित कृतीबद्दल विचार करताना काही पथ्यं बाळगावी लागतात, याविषयी विवेचन केले आहे. वाचकाने ललित कृतीचा विचार करताना स्वत:च्या अनुमतीच्या किंवा सर्व सामान्य जीवनाच्या दर्शनाची अपेक्षा करू नये काव्य, कादंबरी या सारख्या साहित्य प्रकारांना ‘निर्मिती’ म्हटले जाते ते यासाठीच लेखकाचा लेखक या व्यक्तीचा त्यानं अनुभवलेल्या किंवा त्याला दिसलेल्या जगाचं इतरांना दर्शन घडविण्याचा तो एक प्रयत्न किंवा प्रयोग असतो. तो कितपत स्वयंपूर्ण, सुसंगत आणि परिणामकारक झाला आहे तेवढंच पाहावं. त्याचप्रमाणे हे ही लक्षात ठेवावं की माण, मग ती प्रत्यक्षातही असोत किंवा साहित्य विश्वातली असोत. माणसांसारखी वागतात, यंत्र सारखी किंवा एखाद्या गणिताच्या प्रेमयासारखी तार्किक  वागत नसतात.

'शिदोरी' या कादंबरीतील नायकाच्या अनुभवाला स्वभावत:च दोन परिसीमा असल्याचे परीक्षणात पदकी यांनी नमुद केले आहे. एक त्या परिसराची आणि दुसरी त्या तरूणाच्या व्यक्तिमत्वाची या दोन्हींतून कोणताही एक घटक वजा केल्यास या प्रकारचा अनुभव अशक्य वाटावा इतका ताकतीनं इतक्या अपरणिार्यपणे तो व्यक्त केला आहे. अनुभवाच्या दोन परिसीमा म्हणजे एका आडवाटेच्या साखर कारखान्याच्या आणि वासुच्या व्यक्तिमत्वाची या दोन्ही परिसीमा मोठ्या ताकदीने उभ्या केल्या असल्याचे पदकी यांनी म्हटले आहे.

*** ख्रिस्ती समाजातील सामाजिक व आर्थिक समस्या :–**

'काळा सूर्य' या अनिल दहिवाडकर यांच्या कादंबरीचे सदाशिव जनार्दन कोडोलीकर यांनी परीक्षण केले आहे. कोडोलीकर यांनी श्री. अनिल दहिवाडकर यांच्या 'काळा सुर्य'या कादंबरीचे परीक्षण करताना वाङ्मयीन दृष्टिकोणातून आणि त्यांनी जे राजकीय, सामाजिक, आथिक व धार्मिक विचार व्यक्त केले आहेत, त्याचा परामर्श घेतला आहे.

कादंबरीतील कथानकास या कादंबरीत गौण स्थान असून ख्रिस्ती समाजातील सामाजिक व आर्थिक समस्यांनाच लेखकाने प्राधान्य दिल्याचे परीक्षणात नमूद केले आहे. त्यामूळेच कादंबरीचे व त्यात व्यक्त केलेल्या विचारांचे परीक्षण व्हावे या हेतूने कोडोलीकर यांनी परीक्षण केले आहे. ख्रिस्ती समाजासाठी हौसिंग सोसायटी, ख्रिस्ती समाजासाठी विधानसभेकरीता व लोकसभेकरीता राखीव मतदारसंघ, ख्रिस्ती समाजासाठी आर्थिक सवलती नोकऱ्यामध्ये सवलती इत्यादी राजकीय विचारणे या कादंबरीत व्यक्त झालेचे दिसते, त्यामुळे या कादंबरीस नितांत महत्व प्राप्त झालेले आहे.

अनिल दहिवाडकर यांच्याजवळ प्रतिभा आहे. कथा विषय त्यांनी चांगला निवडला आहे. यासंबंधीचे विवेचन प्रा. हातकणंगलेकर यांनी प्रस्तावनेत केल्याचे दिसते. परंतु कादंबरीची रचना श्री. अनिल दहिवाडकर यांना योग्य प्रकारे करता आलेली नाही त्यांनी कादंबरी तंत्राचा, साहित्यशास्त्राचा, आदर्श करणे आवश्यक आहे. श्री. अनिल दहिवाडकर यांनी आपल्या प्रतिमेचे विलास अधिक अभ्यासपूर्वक रीतीने व्यक्त करावेत. (चातुर्य मोठे रचनेत आहे. या विचारांचेही त्यांनी नित्य स्मरण ठेवावे अशी निकड त्यांनी अधोरेखित केली आहे.

*** असंख्य कथानक :–**

किरण नगरकर यांच्या 'सात सक्क त्रेचाळीस' या कादंबरीचे भास्कर भोळे यांनी परीक्षण कले आहे. कादंबरी वाचताना असंख्य कथानकाच्या गुतावलयात वाय हरतीव व शोधीत बसणे, नंतर या खटाटोपाची व्यर्थता प्रचीत होत जाणे आणि त्याही नंतर या कादंबरीच्यावर यांना जाणवणाऱ्या आगळेपणाच्या बुडाशी असलेला 'फॅशनचा भान स्पष्टपणे प्रतीत होते असे मी मोठे स्पष्ट करतात. संज्ञा प्रवाहांच्या स्वरूपात मांडल्या गेलेल्या काही कथानकांसाठी हे तंत्र यापूवी अनेकदा वापरले गेले आहे. 'सात सक्क' च यातील वैशिष्ट्य फार तर एवढे म्हणता येईल की या तंत्राचा फाजील अतिरेक तीत होऊन सुद्धा कादंबरीची गतिमानता उणावलेली नाही. याचे श्रेय्य श्री. भोळे यांनी नगरकारांच्या शब्दांचा ताजेपणा, शैलीचा, स्वैरपणा आणि अनुभवविश्वाचे वैचित्र्य यांना दिले आहे.

अनेक समकालिन कादंबऱ्यापेक्षा 'सात सक्क' ही उजवी व लक्षणीय आहे ही बाब वादातीत तिच्या भाषेत अर्थवाहित्व आहे. लवचिकता आहे, अस्सल ओबडबोधडपणा असूनही लेखकाच्या मनातले नेमकेपणी व्यक्त करण्याची क्षमता असल्याचे श्री. भोळे यांनी परीक्षणात नमुद केले आहे. तथाकथित सम्यपणाच्या दांभिक आच्छादनासाठी निष्कारण आरिष्ट समजल्या जाणाऱ्या नागड्या सत्यांना लपविण्याचा वृथा प्रयत्न करण्यासऐवजी त्यांना जी बेधडक सामोरी गेली आहे, असे भोले त्यांना वाटते हे सर्व खरे असले तरी ही कादंबरी त्यांना आधुनिक वाटत नाही. कारण केवळ कापका, काम्युशी नामे सरंक्षण वा त्यांना अनुसरणे हे कादंबरीच्या आधुनिकतेचे कारण असु शकत नाही. डॉ. पंडित टापरे यांनी 'सात सक्क त्रेचाळीस' या कादंबरीची वैशिष्ट्ये सांगितली आहेत ते लिहितात, ''जीवनात संवाद (Communication) न साधणे, आंतर राष्ट्रीय संस्कृतीचे दर्शन, जीवनातील असुरक्षितत, एकलेपणा, तुटलेपणा याचे प्रत्ययकारी चित्रण, कामवासनाविषयी ओढ, अस्तित्वावादी सूर, संस्कृतिटीका, मृत्यूचे आगळभान, देश व धर्म या संकल्पनाचे नवे आद्य ही वैशिष्ट्ये जशी या कादंबरीत जाणवतात तशीच संबंधीची अन्वर्यक शीर्षकही वैशिष्ट्येही जाणवतात.''[२५]

*** विचारसरणीची तपासणी :–**

सदा कऱ्हाडे यांच्या एका अस्पृश्याची डायरी या पुस्तकाचे सुधीर जोगळेकर यांनी परीक्षण केले आहे या कादंबरीमध्ये सदा कऱ्हाडे यांनी एका समाजाच्या घडणीचे विवरण करण्याचा प्रयत्न केल्याचे नमुद केले आहे. शिवाय कथेच्या ओघात त्यांनी आपले दृष्टिकोन चपखलपणे बसवलेत. त्यांनी मांडलेली विचारसरही तपासून पाहण्यासाठी हे परीक्षण असल्याचे परीक्षणात नमुद केले आहे. एका गरीब ब्राह्मणाच्या पोराची दुरावस्था कऱ्हाडे यांनी समर्थपणे रंगविली आहे. 'एका स्पृश्याची डायरी' तान गरीब ब्राह्मण बाप सुद्धा स्वत:ला गरीब अस्पृश्यांपेक्षा वरचा अन् 'वेगळा' मानतो. आर्थिक उत्पादनाच्या उतरंडीत कोणतेही सत्तेचे स्थान नसताना तो असे अन्वाय करू शकतो. याचाच अर्थ अस्पृश्यतेचा प्रश्न निव्वळ आर्थिक अन्वाय दूर केल्याने नाहिसा होणार नाही. जसे स्पृश्य गरीब असला तरी प्रचलित रचनेत त्याला एक वेगळे स्थान असते, तसेच अस्पृश्य श्रीमंत असला तरी त्याला स्पृश्य श्रीमंतांच्यातच नव्हे तर स्पृश्य गरीबांमध्येही मानाचे स्थान नसते. कऱ्हाडे स्वत: लिहितात, ''काळ्या माणसाने पांढरे कपडे घातले तरी त्याचा वर्ण बदलत नाही, कामगार शिकला तरी पांढरपेशा होत नाही, अन् एखादा अस्पृश्य सरकारी सवलत घेऊन  वरचढला तरी तो प्रतिष्ठित होत नाही.'' हे समाजातील वास्तव सत्य येथे नमुद केले आहे, या सर्वाचा स्पष्ट अर्थ असा होतो की, आर्थिक अन्यायाचा व अस्पृश्यतेचा प्रश्न एकच नाही हे दोन्ही प्रश्न वेगळे आहेत. याचा अर्थ एवढाच की त्यापैकी कोणत्याही एकाचे अस्तित्व नाकरणे हे धोकादायक आहे हे प्रश्नच वेगवेगळे सुटु शकतील असा अर्थ नाही ही दोन्ही एकाच प्रस्थापितांची अंगे आहेत. नवनवी रचना आणू बघणाऱ्यांना ह्या दोन्ही व इतर अनुषंगिक बाबींवर एकच सर्व लढा द्यावा लागेल.

'अजून उजाडायचं आहे' या माधव कोंडविलकर यांच्या पुस्तकाचे देवीदास मुळे यांनी परीक्षण केले आहे. प्रथमच त्यांनी या पुस्तकाचे वैशिष्ट्य नमुद कले आहे, ते म्हणजे हे आत्म कथनपर किंवा चरित्रपट पुस्तक नाही. मराठी कादंबरीच्या प्रकारात याचा समावेश करता येईल ऐवजी उंची या पुस्तकाने गाठली आहे मुळे यांनी जरी या पुस्तकाचा कादंबरीच्या प्रकारात समावेश केला असला तर कादंबरीच्या वर्गात बसविण्यास समीक्षक तयार होतील किंवा नाही

याबाबत ते शासंक आहेत.

कोकणातल्या चांभार जमातीचे खडतर जीवन पातेपिल वलीच्या देवजी चांभाराराया रूपाने साकार केले आहे संपूर्ण कादंबरी ही देवजी व त्याचे कुटुंब यांच्यावरच जास्त प्रकाश टाकते. पुस्तकाची भाषा अर्थात चांभाराची बोली भाषाच वापरली आहे. या वर्गाच्या भाषेशी जुळवुन घेतल्याशिवाय त्यांच्या जीवन सुत्रांशी एकरूप होता येणे शक्यच नाही. आपले पांढरपेशी नीतिअनीती, शिष्ट–अशिष्ट संकेत बाजूस ठेवूनच हे वाचावे लागते, असे मूळे सूचित करतात. चामडं मिळविण्यासाठी महारांचा खुशामत, चामडं कमावीत असताना होणारे हाल हे सारे वाचून तर मन सुन्न होते. चांभार जमातीतील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्यावर देखील परीक्षणात भरपूर प्रकाश टाकला आहे. सामाजिक बांधिलकी असणाऱ्या वाचकाने हे पुस्तक नक्की वाचावे असेही सूचित करतात. आजवर मराठी सहित्यात जी काही चित्रणे आली तरी सगळी मध्यम–वर्गाच्याच जीवनाच्या विविध पैलूंची होती. शतकानुशतके उपेक्षितलेल्या गावकुसाशी राहून जीव कंठणाऱ्या समाजाची सुखदु:खे क्वचितच साकारली देविदास मुळे यांनी 'अजुन उजाडायचं आहे' या पुस्तकाचे परीक्षण करून चांभार जमातीचे दु:ख माधव कोंडविलकर यांनी किती हृदयस्पर्शी रितीने मांडले आहेत ते नमुद केले आहे.

किरण नगरकर यांच्या 'सात सक्कं त्रेचाळीस' या कादंबरीबद्दल आपला अभिप्राय नांदवताना भा.ल.भोळे म्हणतात की ही कादंबरी असंख्य कथानकाच्या गोतावळ्यात काय हरवीत व शोधीत बसते.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार जीवन प्रवाहाबरोबर वाढत जाणारा व सतत बदलत जाणारा आहे. कादंबरीच्या बदलत्या स्वरूपाचे वेगवेगळे पैलू परीक्षणातून स्पष्ट होतात.

*** आत्मचरित्र परीक्षणे:–**

'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये कथा, कादंबरी, कविता, नाटक या वाङ्मय प्रकाराबरोबरच आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारातील अनेक आत्मचरित्रांची परीक्षणे 'पत्रिके' मध्ये झाली आहे. सर्वात ठळक जाणवणारी गोष्ट म्हणजे स्त्री आत्मचरित्रांची परीक्षणे खूप आहेत. आत्मचरित्रकार स्व:चे जीवन मागे वळून न्याहाळण्याचा प्रयत्न करीत असतानाच स्वत:च्या

आयुष्याचे ‘स्व’ चे एक सुसंगत असे चित्र साकार करण्याची धडपड करीत असतो म्हणजेच ‘स्वज–व्यक्तिमत्वाचा’ शोध किंवा आत्मबोच हा आत्मचरित्राचा एक महत्वाचा पैलू आहे, असे दिसते. आत्मशोध म्हणजे ‘स्वत:चा शोध’, ‘स्व’ चा शोध असा त्याचा अर्थ होता. आत्मचिरलेखनात आत्मशोधाची जाणीव महत्वाची मानली जाते. Autobiography या इंग्रजी शब्दाचा अर्थही स्वत:च स्वत:च्या जीवनाचा काढलेला आलेख असा होतो. Encyclopedia Britanica मध्ये “Autobiography the account of an indiriducte human life written by the subject himself”[२६] अशी व्याख्या आहे. आत्मचरित्र व्यक्तिच्या जीवनाच्या वाटचालीचा आलेखच यातुन अपेक्षिलेला असतो.

स्वचा शोध घेणे, कोहं असा प्रश्न विचारणे ही मानवी मनाची एक मूलभूत प्रेरणा आहे. कारण माणूसपण आणि विशेषत: बाई माणूसपण घडत जाते, ते आपसूकपणे येत नाही. जन्मत: असत नाही. स्त्रीला तसे घडविले जाते त्यातूनच स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाची आणि आत्मचरित्राची घडण होत गेल्याचे दिसते. महाराष्ट्रात स्त्रियांच्या आत्मकथनांची सलग परंपरा आपल्याला एकोणिसाव्या शतकापासुन दिसते. ती आजतागायत अलिकडच्या दलित स्त्री आत्मकथनापर्यंत दिसते. ‘पत्रिके’ मध्ये त्याला काळातील आत्मचरित्रावरती परीक्षणे झाल्याचे दिसते. ‘हे मीच सांगितले पाहिजे’ (शीलवती केतकर) ‘एका रणरागिणीची हकीकत’ (पार्वतीबाई मोरा, ‘सांगते ऐका’ (हंसा वाडकर) ‘जेव्हा माणूस जागा होतो’ (गोदावरीबाई परूळेकर), ‘स्नेहांकिता’ (स्नेहप्रभा प्रधान), ‘आहे मनोहर तरी’ (सुनीताबाई देशपांडे), ‘कोसबाडच्या टेकडीवरून’ (अनुताई वाघ) इत्यादी आत्मचरित्रेवर परीक्षणे झाली आहे. स्त्री आत्मचरित्रकारांची ‘पत्रिके’ ने दखल घेतल्याचे  दिसते. त्या त्या काळात प्रसिद्ध दिसतो. त्याकाळातील सामाजिक राजकीय, सांस्कृतिक जीवन आपल्याला समजते. डॉ. आनंद यादव लिहितात, ‘‘आत्मचरित्राला सामाजिक इतिहासाच्या संदर्भात मूल्य प्राप्त झालेले असते. मानवी मनाचा एखाद्या समाजकाळाचा किंवा एकुण समाजाचा इतिहास समजून घेण्यासाठी आत्मचरित्रे ही उत्तम साधने असतात. आत्मचरित्रातील प्रत्येक मानवी मन हे आपल्या वर्तनाने व स्पंदनाने कमी–अधिक प्रमाणात त्या काळाचा इतिहास विशद करत असते. त्या समाजाचे आंतरिक ताणतणाव, इतर सुत्रे त्यामध्ये

प्रतिबिंबित झालेली असतात.''[२७] त्याचाच प्रत्यय या आत्मचरित्रातुन येते. आत्मचरित्र हा व्यक्तिच्या जीवनातील भूतकाळ असतो. तर समाजाच्या दृष्टिने तो इतिहास ठरतो.

*** केतकरांच्या व्यक्तिमत्वाचा शोध:–**

'हे मीच सांगितलं पाहिजे' या शीलवती केतकर यांच्या आत्मचरित्राचे वसंत पळशीकर यांनी परीक्षण केले. त्यामागे हेतू असा की, शीलवतीबाईच्या लहान मोठ्या जीवन प्रसंगातुन केतकरांचे व्यक्तिमत्व जिवंत होऊन आपल्याला समोर उभे राहिल अशी अपेक्षा होती पण शीलवतीबाईचे पुस्तक आपल्याला केतकरांबद्दल खूप माहिती देऊन जाते, पण केतकर जिवंत होऊन आपणास भेटत नाहीत. केतकरांच्या आयुष्यात महाराष्ट्राने त्यांच्या गुणांचे चीज केले नाही ही वस्तुस्थिती पळशीकरांनी मान्य केली. त्याची बोच शीलवतीबाईंना असावी हे ही स्वाभाविकमानेल परंतु केतकरांचे शुद्र टीकाकार आपल्याला मरणानेच मेले आहेत, त्यांना पुन्हा झोडपण्याचे शीलवतीबाईना कारण नव्हते त्यासाठी त्यांनी स्वत:ची पायरी सोडणे योग्य वाटले नाही असे परीक्षणात्मक अभिप्रायात नमूद केले आहे.

ज्ञानकोशाचे इतके प्रचंड काम केतकरांनी पार पाडले ते निष्ठावंत सहकाऱ्यांच्या सहकार्याने, इतके मोठे प्रकाशन त्यांनी यशस्वीपणे केले ही गोष्ट विसरून चालणार नाही याचा अर्थ धंदा करण्याची हातोटीही केतकरांनी साध्य केली होती, हे शीलवतीबाईंच्या या पुस्तकावरुन सिद्ध होते. या सर्व गोष्टी लक्षात घेता, शीलवतीबाईनी प्रसन्न मनाने त्यांनी भोगलेले केतकर सर्व अंगांनी उभे केले असते तर केतकरांचे मोठेपण मराठी माणसांच्या मनावर अधिक समर्थपणे ठसले असते, असे पळशीकरांच्या मनाला सतत वाटत राहते. केतकरांच्या व्यक्तिमत्वाला शीलवतीबाईंनीच न्याय दिला नाही त्यांची केतकरांवरची निष्ठा जरी निर्विवाद असली तर या एकनिष्ठेसाठी त्यांनी स्वत:ही खूप मनस्ताप सहन केला आणि केतकरांनाही जबर किंमत मनस्तापाच्या रूपात द्यायला लावली, असे तर नाही? असा प्रश्न पळशीकरांच्या मनात येतो.

केतकरांसारख्या ध्येयवेड्या माणसाची पत्नी होऊन राहणे हे अवघड आहे, पण (स्मृतिचित्रे' लिहिताना लक्ष्मीबाई टिळक यांनी सहजीवनातला तणावाचा पैलू सहजपणे सांगितला. टिळकांच्या ध्येयवेड्या विक्षिप्तपणाचे वैचारीक समर्थन करण्याची गरज लक्ष्मीबाईना

वाटली नाही. त्याला वाचकही फाजील महत्व देणार नाहीत, हा आत्मविश्वास त्यांना होता. शीलवतीबाईच्या ठिकाणी नाही, असे पळशीकरांना वाटते, केतकरांचे व्यक्तिमत्व इतके मोठे की या निवेदनातील न्यून्यांवर मात करून ते आपल्याला येऊन भिडते. केतकरांनी एवढे कार्य करूनही महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाची पातळी फारशी का उंचावली नाही? जवळपास ४५–५० वर्षापूर्वी सामकोशाचे सर्व खेळ प्रकाशित झाले. विविध विषयात विशेषत: भौतिक व सामाजक शास्त्रांच्या क्षेत्रात उच्च दर्जाचे लेखन करणाऱ्या लेखकांची परंपरा ज्ञानकोशातून का निर्माण झाली नाही? असे प्रश्न उपस्थित करून पळशीकरांनी मराठी समजाचे वैचारिक जीवन जस जसे विविधांगी व जोमदार बनेल, तसे तशी केतकरांच्या कार्याची दखल घेतली जाईल. त्याचे कार्य व लेखन एका जिवंत परंपरेत समाविष्ट होईल, अशी आशा व्यक्त केली आहे.

*** तीव्र,तीक्ष्ण, स्त्रीमनाच्या हंसाबाई:–**

'सांगत्ये ऐका' या आत्मचरित्राचे प्रभा तुळपुले यांनी (स्त्रीची खरी प्रकृती? असा प्रश्न उपस्थित करून परीक्षण केले आहे तर सुमित्रा भावे यांनी 'तीव्र, तीक्ष्ण, स्त्री मनाच्या हंसाबाई असे परीक्षणात म्हटले आहे हे या बाईच्या आयुष्यातील कित्येक निर्णय असेच बेडखोरीचे म्हणून केवळ प्रतिक्रियात्मक आहेत. राग, सूड आणि अहंकार यासारख्या भावनांच्या आहारी जाऊन तिने मोठे निर्णय घेतले आहे. नवऱ्याने उगीचच वर्तनाचा संशय घेऊन कातडीपट्ट्याने बडविल्या सरशी स्वैरलैगिंग उपभोगाचा निर्णय तिने घेऊन टाकला. 'हिला गाणी कशी काय जमणार? असा केशवराव भोळ्यांनी संशय व्यक्त केला. चिडलेल्या हंसाने त्यानंतर साधी ओवीसुद्धा म्हटली नाही नेहमी प्लेबॅक मागितला मतवाल्या हंसाने नवरा, मुलगी आणि घर ही असेच बेदकारपणे सोडले, 'सांगत्ये ऐका' च्या रंजकतेला हंसाचे हे मतवाले व्यक्तिमत्व मूळ कारण असल्याचे मत तुळपुले यांनी नोंदवले आहे.

प्रभा तुळपुले यांनी पुस्तकात रंजकतेपेक्षा वेगळे काहीतरी जाणवते ते म्हणजे हंसा अधूनमधून सुस्पष्टपणे आपल्या काळजाला हात घालते कारण मतवाली हंसा वाडकर ही अखेर नव्हे अथपासून इतिपर्यंत बाई आहे. काही प्रमाणात तुम्हाला आम्हाला भेटणाऱ्या सामान्य स्त्री सारखीच एक स्त्री आहे. हंसाबाईचे आयुष्य अनुभव संपन्न आहे हा अनुभव आगळा म्हणून मनाला

आकर्षितोच पण त्याहून विलोभनीय आहे ती पुस्तकाची मांडणी ना खेद ना खंत अशी एक वृत्ती उदासीन नसून ही एक तटस्थ पविण त्यात आहे असे तुळपुले यांना वाटते सांगितलेले लिहिलेले सर्वच काही कामात पातळी गाठेलच असे नाही. परंतु 'सांगते ऐका' च्या बाबतीत ही उंची बऱ्याच प्रमाणात गाठलेली आहे त्यात शंकाच नाही. या दृष्टिने प्रा.वा.ल.कुलकर्णी लिहितात, ''बरेचसे 'अबोल' असेलेले हंसाबाईचे आत्मचरित्र अत्यंत 'बोलके' झाले आहे आणि हे बोलेके होणे हे चांगल्या नि श्रेष्ठ आत्मचरित्राचे खास वैशिष्ट्ये आहे. आत्मचरित्रात वारंवार डोकावू पाहणारा 'स्व' हा अलिप्त राहू शकला तरच हे 'बोलके' पण अधिक कलात्म होण्याची शक्यता असते. 'सांगत्ये ऐका' त हे बरेच साध्य झाले आहे.''[२८]

'सांगते ऐका' हे मराठीतील पारंपारिक आत्मचरित्रापेक्षा वेगळ्या प्रकृतीचे आत्मचरित्र आहे. वास्तविक 'सांगते ऐका' मधील सत्य कथनातून हंसाबाईचे आत्मदर्शन घडलेले आहेत. तरीही जे घडते ते अर्धे अपुरे असे वाटते अभिनेत्री आणि एक स्त्री या दोन्ही दृष्टीनी हे दर्शन घडत असले तरी हंसा वाडकरांना समजून घेताना बरेच काही अपुरे वाटते. पण एक गोष्ट नाकारता येत नाही ते म्हणजे त्यांनी आपले आत्मकथन मोकळेपणाने व्यक्त केलेले आहे त्यामुळे एका स्त्रीचे आत्मकथन म्हणून ते मराठी वाङ्मयात अनुभवांची भर घालते.

*** मैत्रीची हकीकत:–**

'स्नेहांकिता' या स्नेहप्रभा प्रधान यांच्या आत्मचरित्रकाचे ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी परीक्षण केले आहे सुप्रसिद्ध तज्ञ आणि गर्भधारणा शास्त्रज्ञ डॉ. शिरोडकर हे बाईंच्या जीवनात अशा एका परिस्थितीत डोकावून गेले की त्यातून प्रगाढ मैत्रीची निष्पत्ती होणे साहजिकच होते. या मैत्रीची ही हकीकत आहे. स्नेहप्रभाबाई आणि डॉक्टर शिराडकर यांचा प्रेमसंबंध विवाहबाह्य होता, दोघांच्या भावजीवनातील त्याचे महत्व उत्तरोत्तर वाढत गेले. प्रसंगोपात काही चढउतार, रूसवेफुगवे, अंतराय आले देखील, परंतु मुलत: या स्नेहसंबंधीची स्निग्धता टिकुन राहिली. 'स्नेहांकिता' हि प्रामुख्याने याच संबंधाची कहाणी आहे आणि ती नि:संशय सुरस आहे. डॉक्टरांच्या पत्नीला या प्रकरणाचा सुगावा लागणे आणि तिने या संबंधात व्यत्यय आणणे हे काही अनपेक्षित नव्हते. स्नेहप्रभाबाईच्या लेखणीने हा त्रिकोण एकंदरी फारच समंजसपणे वाचकांच्या डोळ्यापुढे मांडलेला

आहे. शिरोडकर हे स्वत: जागतिक ख्यातीचे विद्या विशारद बाईच्या या जीवनात डॉक्टर म्हणून प्रवेश करून पितृसदृश्य प्रियकराचे स्थान त्यांनी प्राप्त करून घेतले यात त्यांचे किंवा बाईचे काही चूकले नाही. पाश्चात्य देशात घटस्फोटाने हे प्रश्न सोडविण्याची प्रथा आहे. बाईना घटस्फोटाचा अनुभव अपरिचित नव्हता, परंतु त्यांचे अस्सल भारतीय संस्कार आणि त्यांच्या मनाची मुलभूत ऋजुता हा त्रिकोण धसमुसळेपणाने मोडू देण्याच्या आठ येत नाही, असे ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी म्हटले आहे. समाजातील परंपरागत सांकेतिक चौकटी मोडून अनेक स्तरांवरून डॉक्टरांना पाहणाऱ्या स्नेहप्रभाबाईची जीवनातील अनुभवाची विविधता आणि ती मांडण्याचे धाडस व कौशल्यही त्या दाखवतात. मन हलके होण्यासाठी लिहिल्या गेलेल्या मनोगतातुन सोशीक स्त्रीच शेवटी दिसते असे वाटते.

*** कामगार कार्यकर्तीचे आत्मचरित्र:–**

'एका रणरागिणीची हकीकत' या पार्वतीबाई मोर यांच्या आत्मचरित्राचे वसंत चिंचाळकर यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांमध्ये हंसा वाडकरांचे 'सांगत्ये ऐका' दुर्गाबाई खोटे यांची 'आत्मकथा' स्नेहप्रभा प्रधानांचे (स्नेहांकिता' सिनेमा व्यवसायाविषयी असणाऱ्या सर्वसामन्य माणसांच्या आकर्षणामुळे वाचकांना परिचयाची झाली, परंतु ह्याच काळात प्रसिद्ध झालेले एका सामान्य कामगार कार्यकर्तीचे आत्मचरित्र तेवढे उपेक्षित राहिले त्याचे कारण वसंत चिंचाळकर सांगतात की, ही स्त्री जन्माने ना अस्पृश्य आहे ना उच्चवर्णीय आहे, ती आहे वर्णविद्रोही, वर्णविद्रोहासाठी असणारी ही मराठी मध्यमवर्गीय रसिकांची समंजस भूमिका वर्गविद्रोहाचा उठाव करण्याबाबत सहानुभूतिपूर्वक असलेच असे नाही. त्यातही असा ठराव करणारी व्यक्ती स्त्री आणि त्यातही स्पृश्य मागासवर्गीय असेल तर उपेक्षेला अधिकच धार चढू शकते.

श्री.पद्माकर चितळे यांनी त्यांच्या या आत्मचरित्रेचे शब्दांकन केले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंड, त्याकाळातील स्वदेशीचे आंदोलन, स्वातंत्र्याचा लढा, टिळकांविषयाचा लोकमानसात असलेला अपार आदर, गांधीजीचे सत्याग्रह, रशियन क्रांतीचा भारतीय कामगार जीवनावर होणारा परिणाम ह्यांचे चित्र पाहयला मिळते ह्या साऱ्या कालखंडाची प्रत्यक्ष साक्षीदार आणि नायिका

पार्वतीबाई भोर आहेत.

पार्वतीबाईना समतेवर आधारलेला समाज पाहायचा होता, एक सुंदर आदर्श समाज तो पाहता यावा किंबहुना आपल्या छोट्याशा सामर्थ्यानिशी का असेना पण घडविता याचा यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कामगार चळवळीला वाहून घेतले. ह्या देशातील समाजव्यवस्था, न्यायव्यवस्था आजची आणि कालची आर्थिक विषमता, भांडवलदारांची अरेरावी, पोलिसांची मग्रुरी, लोकशाही समाजव्यवस्थेने बळकट केलेली नोकरशाही आणि सत्तांधता त्यांनी सामान्य माणसांसाठी कितीतरी प्रश्नचिन्हे निर्माण केली आहेत. साधन हीन माणूस त्यामुळे अधिकाधिक दयनीय होतो. त्यांच्या मुक्तीचा लढा म्हणजे साम्यवादी आंदोलने त्याचा एक भाग म्हणजे गिरणी कामगारांचे संघटन. अविश्रांत श्रम आणि पराकोटीची निष्ठा यामुळे मुंबईच्या गिरणी कामगारांच्या युनियनच्या कार्यवाहीची धुरा त्यांना सांभाळावी लागली. ते करत असताना त्यांना अनेकाविध दिव्यातून जावे लागले. काही गोष्टी त्यांच्या तळमनात घर करून आहेत. आज समाज बदलला स्त्री जागृत झाली पण सामान्य स्त्रीची, कामगार स्त्रीची हालअपेष्टा काही संपली नाही, कमावती स्त्री, तिची सुखदु:खे वृत्तपत्रांतून आणि मासिकांतून यावर चर्चा घडते ती असते मध्यमवर्गीय मिळवत्या स्त्रीची पण बिडी कामगार आणि गिरणी कामगार असलेली कमावती स्त्री कुठे दिसत नाही? असे असंख्य प्रश्न भोरबाईंच्या तळमनात घर करून असल्याचे चिंचाळकर सांगतात, भोरबाईचे आत्मकथन वाचताना त्यांचे हे जीवनकार्य केवळ 'सावित्रीबाई फुजे पुरस्कार' मिळविण्यासाठी योग्यच नव्हे तर चिरकालासाठी अनेक उपेक्षित स्त्री–पुरूषांना प्रेरणादांयी ठरावे असेच आहे, असा मार्मिक अभिप्राय चिंचाळकरांनी नोंदवला आहे.

*** चिंतनापेक्षा वर्णनच जास्त:–**

अनुताई वाघ यांच्या 'कोसबाडच्या टेकडीवरून' या आत्मचरित्राचे शरद कुलकर्णी यांनी परीक्षण केले आहे. वयाच्या १३ व्या वर्षी वैधत्व प्राप्त झालेल्या अनुताई आपल्या कामात पूर्ण समरस झाल्या म्हणूनच त्यांना इतके उत्तुंग यश प्राप्त झाल्याचे कुलकर्णी नमुद करतात. ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ ही एक अपूर्ण जोडी होती. ताराबाई मोडक वैयक्तिक आयुष्यात खूप कष्टी,दु:खी होत्या तरी दोघांनी मिळून आदिवासी शिक्षणाचा प्रयोग कोसवाडला चालू केला.

बालवाडी हे नावच नव्हे तर ती पद्धतीही ताराबाई अनुताई त्यांची महाराष्ट्राला देणगी आहे अशा शब्दात कुलकर्णी यांनी त्यांच्या संयुक्त कार्याचा गौरव केला आहे.

अनुताईच्या आठवणतीत मात्र चिंतनापेक्षा वर्णनच जास्त आहे ताराबाईंनी यासर्व प्रयोगाचे विश्लेषण केले असते तर ते आणि अनुताईचे हे पुस्तक परस्परपुरक आणि फार उपयोगी ठरले असते. तसेच बालशिक्षणावरून ही मंडळी प्रौढ शिक्षणाकडे वळली हे खरे परंतू बाल शिक्षणावर व औपचारिक शिक्षणावर भर दिल्यामुळे जाणीव जागृतीचे कार्य मात्र फारसे झाले नाही, ग्राम बाल शिक्षा केंद्राचे कार्य बोर्डाला चालू असतानाच गोदावरी परूळेकरांनी त्याच भागात राजकीय सामाजिक जागृतीचे कार्य वावटळी सारखे पसरवले या कार्याची दखल ताराबाई आणि अनुताईनी घेतल्याचे दिसत नाही तसेच ताराबाई अनुताईच्या कार्याची दखल गोदावरीबाईनी घेतल्याचे दिसत नाही. याकडेही शरद कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे. अनुताई वाघ यांच्या व्यक्तिमत्वावरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. अनुताईचे शिस्तीचे परंतू अत्यंत प्रेमळ व्यक्तिमत्व स्पष्ट होते. आपल्या सर्व कामाचे श्रेय त्या उदरपणे इतरांना देतात आणि असे करताना बऱ्याचदा स्वत:वर अन्याय देखील करतात. कोणाला दोष देणे अनुताईंच्या स्वभावात नाही. अनुताईचा सहवास ही एक अतिशय सुखद गोष्ट आहे. ज्यांना हा अनुभव प्रत्यक्ष मिळाला नाही त्यांना तो पुस्तक वाचताना काही अंशी मिळेल, अशी भावना शरद कुलकर्णी व्यक्त करतात.

*** वारली आदिवासींची जाग:–**

‘जेव्हा माणूस जागा होतो’ या आत्मचरित्राचे दि.के. बेडेकर आणि प्रभा तुळपुले यांनी परीक्षण केले आहे. ‘जेव्हा माणूस जागा होतो’ हे पुस्तक जसे कॉ. शामराव आणि गोदावरीबाई यांचे आत्मचरित्र आहे तसेच ते ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलसरी, कोसबाड या भागातील अमानुष जीवन जगणाऱ्या वारली आदीवासीचे चरित्र आहे, खूप कमी आकलन मोजक्या शब्दांपलिकडे भाषा न येणाऱ्या आदिवासीमध्ये मार्क्सवादी, रशियन राज्यक्रांती समजून घेण्यापर्यंतची ताकद त्यांच्या लढण्याच्या गनिमी काव्याची पद्धत, क्षमता हे सारे गोदावरीबाई आणि वारली आदिवासी मधील सापेक्षतेचे मूर्त रूप आहे, असे तुळपुळे यांना वाटते.

या ग्रंथातून वारली आदिवासी शेतकऱ्यांच्या दु:ख, व्यथा, वेदनांचे नेमके मूळ काय

आहे? हे लेखिकेने हेरूनच नाहीसे करण्याचे काम वर्ग लढ्यांच्या माध्यमातुन केले असे दि.के. बेडेकर यांनी नमुद केले आहे. तर डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर आपला अभिप्राय नोंदवताना लिहितात, ''वारली आदिवासींच्या दु:खाचे वर्गीय कारण या ग्रंथात लेखिकेने शोधले आहे. यासाठीच त्यांनी मध्यमवर्गीय बुद्धि वादी पुरोगामी विचारवंतानी आणि प्रसार माध्यमांची सहानुभूती मिळवली हे त्यांचे सामर्थ्य व बळ होते.''[२९] प्रभा तुळपुले लिहितात, ''हे पुस्तक वाचल्यावर लक्षात येते की चांगल्या प्रेरणेचे एखाद्या माणसाच्या मनातलं ऐक सुक्त बीज केवढं रूप धारण करत तेच मनामनात पडून जेव्हा माणूस जागा होता तेव्हा क्रांती घडून येते, हीच क्रांती पुढे पिढ्यांना जगण्याचं बळ देते. जुन्याला गाडुन त्यावर नवा इतिहास रचते.''

*** निर्मळ, निर्लेप आणि स्पष्ट आत्मचिंतन:–**

'आहे मनोहर तरी' या सुनिताबाई देशपांडे यांच्या आत्मचरित्राचे विभा सारंग यांनी परीक्षण केले आहे. मुलत: 'आहे मनोहर तरी' हे पुस्तकच वादास्पद ठरेल. कारण एखाद्या प्रतिभाशाही लेखकाचे पाय शेवटी मातीचेच आहेत व त्याच्या व्यवहार शून्यतेमुळे एका स्वाभिमानी व कर्तृत्ववान स्त्रीच्या मनाची, बायको म्हणून झालेली कुतरओढ आहे व म्हणूनच हे पुस्तक स्त्रियांना भावल्याचे दिसुन येते, असे परीक्षणात सारंग म्हणतात, 'आहे मनोहर तरी' या पुस्तकाबद्दल डॉ. रमेश धोंगडे लिहितात, ''आहे मनोहर तरी'' या वैचारीक संरचनेत भाई हा व्यावहारीक पातळीवरचा घटक महत्वाचा आहे. सुनिताबाईंनी याचा वापर चातुर्याने केला आहे. वरवर तर हे आत्मचरित्र एका 'अहंवादी' स्त्रीच्या बंडखोर, फटकळ, समाज पराङ:मुख स्वकेंद्री, अलिप्त आणि एकाकी अशा व्यक्तिमत्वाचे वाटते, पण तात्कालिक व्यावहारीक यशासाठी ते प्रामुख्याने पु.ल.देशपांडे या प्रस्थापित व्यक्तिमत्वाभोवती फिरत राहते.''[३०]

मराठी साहित्यातील आत्मकथनाला–आत्मचरित्राला दीड शतकांची परंपरा आहे. अनेक आत्मचरित्र ही आयुष्याच्या मावळतीला लिहिली गेलेली आहेत. आपल्या जीवनातल्या घटना कलात्मक रीतीने शब्दबद्ध करणे हाच अनेकदा अशा प्रकारच्या लेखनामागचा हेतू असतो. केवळ स्मृतीवर भरवसा ठेवुन अशा प्रकारचे लेखन करावे लागत असल्यामुळे अनेकदा विसंवादही घडू शकतो. खरेतर आत्मचरित्र म्हणजे स्वत:च्या आयुष्याकडे येस्थपणे, तटस्थपणे पाहणे परंतु

आत्मसमर्थन आणि आत्मप्रौढी ही माणसांची सहजप्रवृत्ती आहे. त्यामुळे मराठीतील बरीचशी आत्मकथने एकांगी झाली आहेत. 'आहे मनोहर तरी' हे आत्मचरित्र नाही असे लेखिकेने म्हटले असले तरी स्मृतीच्या हिंदोळ्यावर झुलत राहणाऱ्या स्वत:च्या आयुष्याविषयीचे हे एक प्रकारचे मनोगतच आहे. पण त्याला आत्मसमर्थनाचा अथवा आत्मप्रौढीचा स्पर्श नाही. निर्मख, निर्लेप आणि स्वच्छ असे आत्मचिंतन असे म्हणावे लागेल. दुसऱ्याच्या आयुष्याला चांगल्या वाईटाच्या तागडीत घालुन तोलणे सोपे असते पण स्वत:चे आयुष्य मूल्यमापनासाठी तागडीत ठेवून मोजमाप करायला एक प्रकारचे नैतिक धारिष्ट लागते. ते लेखिकेकडे आहे, असे सुमित्रा भावे यांनी नमूद केले आहे.

'आहे मनोहर तरी' (१९९०) हे सुनिता देशपांडे यांचे आत्मकथनपर लेखन आहे त्याला त्या आत्मचरित्र म्हणत नाहीत. या संदर्भात डॉ. महालक्ष्मी मोराळे लिहितात ''आयुष्यात भेटलेली अनेक माणेस यात नाहीत'' असे सुनिताबाई म्हणतात, पुन्हा जी यात आहेत तीही त्यांनी प्रसंगापुरतीच चितारलेली आहेत. त्यांचे ही हे संपूर्ण चित्र नाही.'' सुनिताबाईच्या या कथनावरून ही कलाकृती 'आत्मचरित्र' नाही हे परस्पर सिद्ध होते.''[३१] स्वत: सुनिताबाई यांनी आपल्या या लेखनकृती विषयी म्हटले आहे की, आठवणींच्या प्रदेशातील ही स्वैर भटकंती आहे. यातील 'स्वैर' आणि 'भटकंती' हे दोन्ही ही शब्द महत्वाचे आहेत. कारण हे शब्द या लेखनकृतीला आत्मचरित्र या लेखन प्रकारापासुन दूर करतात आणि कादंबरी च्या प्रदेशात नेऊन ठेवतात.

*** 'निरोप घेता' योग्य शिर्षक:–**

'निरोप घेता' या ना.भि.परूळेकर यांच्या आत्मचरित्राचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. मराठी दैनिक वृत्तपत्रांचे स्वरूप व आशय बदलून टाकुन दैनिकाचे संपादन, संचालन व व्यवस्थापन यात आपल्या असामान्य कर्तृत्वाच्या बळावर क्रांती करून टाकणारे श्री. नारायण भिकाजी उर्फ नानासाहेब परूळेकर यांच्या आत्मचरित्राचे मार्मिक परीक्षण आहे. परूळेकर यांनी हे आत्मचरित्राचे मार्मिक परिक्षण आहे. परुळेकर यांनी हे आत्मचरित्र शेवटच्या दुखण्यात बहुधा मृत्यू दिसू लागला तेव्हा 'माझ्या मागून येणाऱ्या प्रयत्नवादी मनाला मार्ग दाखविता आला तर पहावा' आणि 'जीवनात संस्काराचे धागे मला लहानपणापासून कसे लाभले आणि पुढे ते वाढले तर

जीवनात त्याचा कसा परिणाम होऊ शकतो?' हा हेतू मनात ठेवून आत्मचरित्र लिहिले असल्याचे पां. वा. गाडगीळ यांनी नमूद केले आहे. त्याचबराबेर आत्मचरित्राचे 'निरोप घेता' या शीर्षकही सार्थ असल्याचे म्हटले आहे. आत्मचरित्रकाराचा जीवनविषयक दृष्टिकोन हे निवडलेल्या तपशिलाचे एकात्म संघटन करणारे सूत्र असते. या संदर्भात प्रा. अ.म. जोशी लिहितात, ''आयुष्याच्या अखेरच्या स्मृतिरुपी चांदण्यात गतजीवनाचा जो काय स्थूल देखावा दिसेल तो पाहून समाधान पावण्याचा सर्वात सोपा व उत्तम मार्ग म्हणजे आत्मचरित्र लिहिणे होय.''[३२]

नानासाहेब परुळेकरांचा पूर्वजन्म व पुनर्जन्म यांवर विश्वास असून माणूस पूर्व जन्मातून जे संस्कार घेऊन येतो ते या जन्मा सुधारुन पुढील जन्मात न्यायचे असे नानासाहेबांचे मत होय. ज्योतिषांवर त्यांची श्रद्धा आहे, ईश्वरांवर त्यांची नितांत श्रद्धा व भक्ती असून आयुष्यात त्यांचा हा भाविकपणा सतत टिकला, महान संकटातही या श्रद्धेने त्यांना सामर्थ्य दिले. प्रतिकूल परिस्थितीशी याच बलावर मोठ्या धैर्याने व कर्तृत्वाने त्यांनी झुंज दिली, यश मिळविले, असे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहे, त्यावर परिक्षणात गाडगीळ यांनी प्रकाश टाकला आहे. नि:स्पृहता, निर्भयता हा परुळेकरांचा मोठा गुण, भाषांवार प्रांत रचनेस त्यांनी अगदी अतिरेकी विचरोध केला. अखिल भारतीय वृत्तपत्र सृष्टीत केवळ आपल्या कर्तबगारीने त्यांनी प्रतिष्ठा मिळविली. त्यांच्यात मानवता हा गुण श्रेष्ठ प्रतीचा होता असे म्हटले आहे.

'श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस' ह्या मराठीतील प्रथम श्रेणीच्या कादंबरीकाराच्या आत्मचरित्राचे सुभाष भेंडे यांनी परीक्षण करुन एका समर्थ लेखकाची जडणघडण वाचकांपुढे उभी केली आहे. अलीकडच्या काळातील हे महत्वाचे पुस्तक आहे. पेडशांची साहित्यविषयीची निष्ठा अस्सल आहे. प्रतिकूल पिरिस्थितीशी प्राणपणाने झगडत असताना लेखक हीच त्यांनी जीवनानिष्ठा मनाली. आपल्या साहित्याची कठोर चिकित्सा करणारे पेंडसे आपल्या स्वभावातील विसंगतीही तटस्थपणे टिपतात. हे या आत्मचरित्राचे वेगळेपण भेंडे यांनी टिपले आहे.

*** निर्मळ आणि तर्ककठोर अप्पासाहेब पटवर्धन:–**

'माझी जीवनयात्रा' या अप्पासाहेब पटवर्धन यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण करताना राजा मंगळवेढेकर 'निर्मल आणि तर्क कठोर' असे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य नमूद करतात. पोझ

घेऊन केलेल्या घाटदार लेखनापेक्षा नितल, प्रांजल आणि अकृत्रिम लेखनात थेट हृदयाला जाऊन भिडण्याचे जे एक विलक्षण सामर्थ्य असते ते आप्पांच्या जीवनयात्रेत आढळते, असा अभिप्राय मंगळवेढेकर नोंदवतात. तसेच अप्पासाहेब पटवर्धनांच्या 'जीवनयात्रेची गांधीजींच्या' 'सत्याचे प्रयोग' याच्याशी तुलना केली आहे. गांधीजींची सत्यनिष्ठा, प्रांजलपणा हा जसा शब्दांशब्दांतून जाणवतो, तसाच अप्पांच्या शब्दांतूनही अनुभवाला येतो. 'कोकणचे गांधी' हे नाव सार्थक वाटते.

गांधीजींच्या सत्यनिष्ठा, प्रांजलपणा हा जसा शब्दांशब्दांतून जाणवतो. तसाच आप्पांच्या शब्दांतूनही अनुभवाला येतो. त्यांनी ऐके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे अशा तऱ्हेने माझ्या जीवनाचा ओहोळ गांधींच्या गंगेला मिळाला आणि ते गांधीमय झाले होते हे ही खरेच. गांधीजींच्या प्रमाणेच आप्पाही कर्मवीर व प्रयोगवीर होते. अनेक तऱ्हेचे प्रयोग त्यांनी आयुष्यभर केले. जीवनाच्या सर्व अंगात ही प्रयोगदृष्टी होती असे आढळते. सत्यनिष्ठेसाठी ही प्रयोगदृष्टी होती असे आढळते. सत्यनिष्ठेसाठी ही प्रयोगनिष्ठाही आवश्यक असते. सत्यासाठी निर्भयपणाही आवश्यक असतो. तो अप्पांचा निर्भयपणाही अनेक प्रसंगांतून व्यक्त झालेला आहे. असे परीक्षणात सांगितले आहे. 'अप्पांच्या या जीवनयात्रेने' आधुनिक महाराष्ट्रातील, तसेच भारतातील विधायक आणि राजकीय घडामोडींचा आलेखच नजरेपुढे येतो. एका सेवारत जीवनाची घडण कसकशी होत गेली, त्याचा हा अस्सल अनुबोधपटच आहे! असे आप्पांच्या जीवनाबद्दल मत राजा मंगळवेढेकर यांनी व्यक्त केले आहे.

'कोठे आणि कधीतरी' या डॉ. सुधीर फडके यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण ग. वि. अकोलकर यांनी केले आहे. त्यांनी आत्मचरित्र लिहावे यासाठी साहित्यिक मित्र डॉ. अ. वा. वर्टी व कवी कुसुमाग्रज यांनी निकड लावली असली आणि प्रा. गं. बा. सरदार व प्रा. दि. के. बेडेकर यांनी टीकाकारांच्या नजरेतून त्याकडे पाहिले असले तरी ह्या बाह्य प्रेरणांमागे लेखकाची स्वत:ची अशी एक प्रेरणा व दृष्टी असल्याचे अकोलकर यांनी नमूद केले आहे. डॉ. फडके यांची आत्मकथा रंजक झाली ती त्यांच्या या मनुष्य स्वभावाचे रहस्य उलगडून दाखविण्याच्या प्रयत्नामूळे व कौशल्यामूळे आणि ती उद्‌बोधक वाटते ती तिच्यातील सामाजिक आशयामुळे व त्यांच्या

चिंतनशीलतेमूळे, असे प्रतिपादले आहे.

आपल्या अनुभवातील ‘सामाजिक आशय’ शोधण्याच्या व वाचकांपुढे मोडण्याच्या प्रेरणांतून ही आत्मकता लिहिली गेली असल्याने त्या बाबतीतल्या लेखकाच्या निरीक्षण चिंतनाचा उल्लेख अकोलकर करतात. या संदर्भात लेखकाने वरचेवर दिलेल्या एका टीपेची दखल त्यांनी घेतली आहे. ‘आज ज्या शब्दांत मी हे मांडीत आहे.’ त्याच तऱ्हेच्या शब्दांत त्यावेळी ते जाणवले असेल असे मी म्हणत नाही! अन्तर्मनात त्याकाळी जाऊन दंडलेल्या अनुभवबीजांना लेखक आता व्यक्त स्वरुप देत आहे. त्या अनुभवांचा अर्थ आता लावीत आहे. आत्मचरित्रकार स्मरणाला जाणिवेत जागृत करुन जीवनदर्शन घडविण्याची भूमिका बाळगत असतो. त्यांच्या जीवनातील नानाविध प्रसंग, घटना, व्यक्ती यांच्या संदर्भात त्याने यापूर्वी स्वत:ला कधी पाहिलेले नसतेच. त्यामुळे आत्मशोधाच्या प्रक्रियेतून गवसणारी स्वत:ची प्रतिमा त्याला स्वत:देखील अभिनव दर्शन घडविते. म्हणनू द. भि. कुलकर्णी लिहितात, ‘‘आत्मचरित्रकार स्वत:च्या आयुष्याचा स्मृतिरुप भाषिक आलेख काढीत नसतो, तो एक लौकिक आयुष्य लौकिक भिन्न पातळीवर नव्याने जगत असतो. पहिल्या आयुष्यात तो अनुभव घेणारा असतो, दुसऱ्या आयुष्यात तो अनुभवाचा घटक होऊन तय अनुभवाला समृद्ध करीत असतो. अशा ‘मी’ युक्त समग्र आयुष्याचा समग्र शब्दार्थमय प्रत्यय घेणारा, अर्थातच ‘मी’च असतो. पण आता तो मी निर्माता निर्मितीविषय आणि आस्वाद असा तिन्ही झालेला असतो. आत्मचरित्राचे लेखन फिकट प्रतिकृती नसते, कोमट पुननिर्मिती नसते, तजेलदार नवनिर्मिती असते म्हणूनच खऱ्या आत्मचरित्रकाराला भाषेचे नवनिर्माणक्षम तेज लाभलेले असते.’’[३३]

सर्व आत्मचरित्रात सामाजिकतेचा धागा अनुस्थूत आहे. त्यामुळे वाचक व्यक्तिविषयक घटनांत गुंतून न पडता व्यापक, उच्च स्तरावर जातो, हे त्या आत्मचरित्राचे मोठे वैशिष्ट्य असल्याचे अकोलकर सांगतात. डॉ. फडके यांचे चिंतन एकाच विशाल कल्पनेभोवती आहे आणि तो केंद्रबिंदू म्हणजे ‘मानवता’ वा ‘माणुसकी’ त्याला प्रसंगीच्या उद्गारांना जिव्हाळ्याच्या अनुभवाची पार्श्वभूमी असल्याने ते विचार रुक्ष, व्यापक विधाने वाटत नाहीत. त्याला जीवनमाढ्याचे स्वरुप आले आहे, असे अकोलकर यांना वाटते. डॉक्टरांवर सुसंस्कार करणाऱ्या

व जीवनाला सुयोग्य वळण लावणाऱ्या व्यक्तींचा ऋणनिर्देश अत्यंत कृतज्ञभावाने व काहीवेळा उत्कट भावभक्तीने डॉ. फडके यांनी केला आहे. विशाल मनावतेच्या उदरात दंडलेली अज्ञान कर्तृत्वाची व सोज्वळ संस्कृतीची ही शिल्पे या शब्दांत त्यांनी गौरव केला आहे. आपल्या कविमनाचा अनेकवार उल्लेख करुनही आत्मचरित्राचे लेखन भावविशतेने लेखकाने होऊ दिले नाही आणि आत्मचरित्राला 'कोठे आणि कधीतरी' हे गोविंदाग्रजांच्या काव्यपंक्तीतील शब्दांचे शीर्षक देऊन आपली लीनता व नम्रताच व्यक्त केली आहे, असे अकोलकर यांनी म्हटले आहे.

*** जातिवंत सोंगाडे:–**

'रामनगरी' या रामनगरकर यांच्या आत्मचरित्राचे वसंत चिंचोळकर यांनी परीक्षण केले आहे. परीक्षणात ते लिहितात, ''खरे सांगायचे म्हणजे 'रामनगरी' वाचताना मी हसण्यापेक्षा अधिक उन्मलत गेलो. वाटले राम नगरकर जातिवंत (सोंगाडे) असावेत, नव्हे ते तसे आहेतच. त्यांनी आपला सोगाड्यांचा धंदा चोख बजावला. पोटासाठी वेगवेगळे व्यवसाय करणारी मंडळी आपले सत्व गमावीत असते. श्री. नगरकरांना स्वत:ची जात ही चालनी वाटली आणि तिला काही दलालांच्या माध्यामने बाजारात आणली. त्यांनी स्वत:पुरते असे केले असते तर ठीक. पण त्यांनी त्यांच्या जातीचाच उच्छाद मांडला. सर्वसामान्यत: न्हावी जात म्हणजे टवाळखोरांसाठी पर्वणीच असते. 'रामनगरी' नुसतीच कलाकृती राहत नाही, तर आधीच अपसमज असलेल्या त्यांच्या जातीविषयी अधिक गैरसमज पसरविऱ्यास कारणीभूत ठरल्याची खंत चिंचाळकर व्यक्त करतात. खऱ्या खोट्या कहाण्यांची फक्त त्यांच्याच अनुभवास येऊ शकणाऱ्या जीवनाच्या अनुभवाची सार्वत्रिकता सिद्ध करण्याचा ते प्रयत्न करतात. हा अतिशय हीन प्रयत्न चिंचाळकर यांना वाटतो. नगर जिल्ह्यातील एका खेड्यात आणि फक्त त्यांच्या कुटुंबाच्या संदर्भात घडत ते त्यांच्या संपूर्ण जातीचे कसे चित्र घेऊ शकेल? असा प्रश्न विचारतात तो विचार करायला लावणारा आहे.''

संपूर्ण 'रामनगरी'त श्री. नगरकर सेवादलाचे कार्यकर्ते असल्याचे अनेकदा लिहितात. आज समाजवादी राजकारणात आघाडीवर असलेल्या मान्यवरांची नावेही त्यात आहे. सेवादलात राहून आणि सामजवादी चळवळीशी संबंध जोडूनही 'जात' विसरता येत नसेल तर त्या समाजवादाला कोणते नाव द्यायचे की ज्या समाजवादी मंडळीत श्री. नगरकरांचा फेरा होता त्यांना

'जात' ही हेतुपुरसर जगवायची आहे? नगरकरांच्या तल्लख बुद्धीला या कोड्याचे निश्चित उत्तर सापडले असेल का? 'रामनगरी'चे परीक्षण करण्याचा हेतू स्पष्ट करताना चिंचाळकर लिहितात की, नगरकरांनी 'रामनगरी'च्या निमित्ताने नुसती टवाळखोरीच केली असती तर 'रामनगरी' वर लिहिण्याचा मला मोह झाला नसता. सोबत त्यांनी त्यांच्या समाजाचे जे हलाखीचे, अज्ञानाचे, अंधश्रद्धेचे चित्र उभे केले ते मननीय आहे. त्यांनी ज्या हवालदिलपणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेली त्यांच्या समाजाची टवाळी, विनोद तर निर्माण करीत नाहीच. पण त्यांच्या पिसाटपणाचे आणि अंगभंग भिनलेल्या 'सोंगाड्या'रुपाचे अतिशय विद्रूप आणि उग्ररुप दाखवते. हा क्रूरपणा 'मनाचा मोठेपणा' म्हणून कसा गौरविला जाऊ शकतो? आजच्या सामाजिक स्थित्यंतराच्या पार्श्वभूमीवर वाङ्मयाच्या नावाखाली, विनोदाची भूक भागवायला अशी जातिविरोधी पुस्तके निघणे, प्रकाशित होणे ही समाजाची गरज आहे की प्रकाशकाची? त्यातून एकसंघ समाजव्यवस्थेच्या दिशेने आम्ही वाटचाल करणार आहोत का? असा प्रश्न उपस्तित करुन वाचकाला विचार करायला चिंचाळकर प्रवृत्त करतात. एकंदरीत रामनगरकर यांच्या 'रामनगरी' बद्दल वसंत चिंचाळकरांच्या मनात शाशंकता दिसते. नगरकरांनी 'जातीला' केंद्रबिंदू केल्याचे त्यांना रुचले नाही. हे परिक्षणावरुन स्पष्ट दिसते 'रामनगरी' या रामनगरकरांच्या आत्मकथनाकडे प्रा. शैलेश त्रिभूवन वेगळ्या दृष्टिकोनातून पाहताना दिसतात ते लिहितात. ''एकंदरीत 'रामनगरी' वाचली आणि तिचा रामनगरकरांनी केलेला एकपात्री अभिनयाचा हास्य पुरक अविष्कार पाहीला तर त्याबद्दल भावनाविवश अभिप्राय लिहिताना केलेवर प्रेम करणारे, कलेसाठी संपूर्ण आयुष्य झोकून देणारे आणि केवळ कलेसाठी जगणारे रामसारखे जातिवंत कलावंत त्या काळात होते. ती कलावंत मंडळी आणि त्यांची कला आता पाहायला, वाचायला मिळत नाही.''[३४]

*** अन्याय व जातिभेदावर घणाघाती घाव:–**

'जग बदल घालुनि घाव' या एकनाथ आवाड यांच्या आत्मकथनाचे परिक्षण राजेंद्र मुंढे यांनी केले आहे. हे आत्मकथन म्हणजे अन्यार्य व जातिभेदावर घणाघाती घाव असल्याचे मुंढे यांनी म्हटले आहे. ज्या महाराष्ट्रामध्ये म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर समाजसुधारकांनी सामाजिक विषमता, जातीय अस्पृश्यतेविरुद्ध संघर्ष केला त्या महाराष्ट्रामध्ये

अद्यापही जातीयता, अस्पृश्यता असल्याचे स्पष्ट दिसते. परन्तु त्याचे स्वरुप भिन्न आहे. त्या संघर्षाने नवा चेहरा धारण केला आहे आणि अशा या संघर्षात लढणाऱ्या झुंझार कार्यकर्त्याने म्हणजे एकनाथ आवाड याने लिहिलेल्या आत्मकथनाचे राजेंद्र मुंढे यांनी परीक्षण करुन ते लक्षणीय असल्याचे नमूद केले आहे. मातंग समाजातील गरीब आई वडिलांच्या पोटी जन्म घेतलेल्या आवाडांनी पोतराजाच्या वाट्याला येणारी विषन्नता सहन करुन बचत गटांच्या माध्यमातून 'अनिक' नावाची मुंबईच्या मोठ्या उद्योजकाची कंपनी विकत घेईपर्यंतची कहाणी या आत्मकथनामधून सांगितली असल्याचे नमूद केले आहे.

या आत्मकथनात आवाडांच्या साठ वर्षाच्या आयुष्याचा लेखाजोखा येतो. या आत्मकथनाचा महत्वाचा भाग जातिअंताच्या लढाईचा आहे, ती लढाई आवाडांनी मोठ्या हिमतीने कशी पार पाडली यावर राजेंद्र मुंढे यांनी प्रकाश टाकला आहे. एकेकाळी त्यांना मारण्यास उठलेले गाव त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन बदलले आणि गावाचे पुढारपण त्यांना देवू केले. गावापासून सुरु झालेले हे 'जग' बदल याचे समर अखेर गावातील लोकांच्या अतूट विश्वासाने सार्थ होते. म्हणूनच या आत्मकथनाचे शीर्षक या अर्थाने सूचक ठरते. मागांची बोलीभाषा या निवेदनातून आली असून ती वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे मुंढे नमूद करतात ते लिहितात, ''आवाडाचं हे पुस्तक आपल्या वाट्याला आलेल्या दु:खाच्या चिखलातून बाहेर कसे पडायचे, न्याय कसा मिळवायचा, स्वत:साठी संधीची नि प्रगतीची कवाड कशी खुली करायची अणि पिढ्यान् पिढ्यांची गुलामगिरी कशी भिरकावून द्यायची याचे एक शास्त्रच आपल्यापुढे मांडते.'' याचे विवेचन करतात.

आवाडांच्या 'जग बदल घालुनि घाव' या आत्मकथनाचे परीक्षण करताना मुंढे यांनी दिलेले शीषर्क 'अन्याय व जातीभेदावर घणाघाती घाव' परीक्षणाला न्याय देणारे आहे. त्यातून आत्मकथनाचा गाभा लक्षात येतो. ही आत्मकथा एका व्यक्तीची नसून ती एका समाजाची आहे. तिच्यातून एका जातीचे जगणे स्पष्ट होत आहे. ही आत्मकथा समाजाचे प्रातिनिधीक रुप आहे. अशाच भावनेने प्रेरित होऊन त्या आत्मकथनाचे परीक्षण मुंढे यांनी केले असल्याचे स्पष्ट होते. दलित आत्मकथेतील अनुभवाबद्दल डॉ. शरण कुमार लिंबाळे लिहितात, ''दलित आत्मकथेतील

अनुभव हे प्रामुख्याने जातिविशिष्ट असे आहेत. जातिव्यवस्थेमुळे होणाऱ्या अन्यायाचे विदारक वर्णन ह्या आत्मकथामध्ये वाचायला मिळते. दारिद्रयामुळे होणारी तडफड प्रकट होताना दिसते. भूक आणि तहान भागवण्याचा संघर्ष एकीकडे तीव्र झालेला असतो. त्याचवेळी अंधश्रद्धा, अज्ञान, निरक्षरता, व्यसन आणि कर्ज अशा कशाळ विळख्यात ही जमात उद्ध्वस्त होताना दिसते.''[३५]

'सत्वाचे मोल जोखणारे आत्मकथन', 'आपुलाचि वाद आपणांसी' या चंद्रकांत वानखडे यांच्या आत्मकथनाचे प्रमोद मुनघाटे यांनी परीक्षण केले आहे. 'चंद्रकांत वानखडे या शेतमजूर, शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भात प्रदीर्घकाळ कार्य करणाऱ्या विदर्भातील कार्यकर्त्यांचे हे आत्मकथन शेती, सामाजिक समस्या, चळवळी, राजकारण आणि ग्रामीण व्यवस्था या संबंधातील प्रस्थापित समज–गैरसमजांना प्रथमच आव्हान देणारे ठरले असल्याचे त्यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात नमूद केले आहे.'

*** सत्वाचे मोल जपणारे आत्मकथन:–**

'आपुलाचि वाद आपणांशी' या आत्मकथनात स्वत:च्या आयुष्यालाच प्रयोगशाळा मानून जगलेल्या चंद्रकांत वानखडे यांनी महाराष्ट्रातील साठोत्तरी सामाजिक चळवळींचे अत्यंत परखड मूल्यमापन केल्याचे मुनघाटे यांनी नमूद केले आहे. तसेच फुले–आंबेडकरांच्या विचारांचा आदर्श मानून प्रामाणिकपणे आयुष्य झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांना फुले–आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या संघटनांचे प्रत्यक्षात कसे विदारक अनुभव येतात, याचा नमुना याच पुस्तकात मराठवाडा नामांतरण आंदोलनाच्या निमित्ताने सांगितला आहे. आणीबाणीच्या काळातील एस.एम.जोशींचा लेखकाला लाभलेला सहवास हा त्यांच्या आयुष्यातील महत्वाचा भाग आहे. कारण, जीवनात काही मूल्ये स्वीकारुन जगताना, अनपेक्षित कटू प्रसंगांना सामोरे जातानाही 'स्वभाविक' कसे राहायचे याचे संस्कार एस.एम. यांच्या सहवासातूनच झाले असल्याचे स्पष्ट होते.

चंद्रकांत वानखडे यांचे मेटीखेड्यातील काम. त्यासाठी त्यांच्या पत्नी मायाने त्यांना दिलेली मोलाची साथ, यावर परीक्षणात मुनघाटे यांनी प्रकाश टाकला आहे. एकंदरीत 'आपुलाची वाद आपणांशी' हे सत्वाचे मोल जोखणारे आत्मकथन आहे पण, अध्यात्मिक क्षेत्रातील साधक जसे जाणीवपूर्वक आपले सत्व पणास लावण्यासाठी समाजापासून पलायन करुन वैयक्तिक

पातळीवर ‘ज्ञानी’ बनतात, तसे येथे नाही. चंद्रकांत वानखडे आपल्या भोवतीच्या बऱ्यावाईट समाजाच्या वर्तमान मूल्यव्यवस्थेतच आपले सत्व अजाणता पणाला लावतो, त्यातूनच सामाजासाठी काही केल्याचे जे समाधान मिळते, तीच आपल्या आयुष्याची कमाई मानतो, यातच त्याचे मोठेपण आहे, असे मानतो, असा मार्मिक अभिप्राय प्रमोद मुनघाटे परीक्षणात नमूद करतात. आत्मचरित्रातील नायक आपणांस माणूस म्हणून समजून घ्यावा लागतो. त्याला समजून घेण्याची आणि विशद करण्याची भूमिकाच आत्मचरित्राची समीक्षा करणाऱ्या समीक्षकावर येऊन पडते. प्रबोद मुनघाटे यांनी उत्तमरित्या पार पाडली आहे. आनंद यादव लिहितात, ‘‘आत्मचरित्राची समीक्षा ही एका प्रत्यक्षातील व्यक्तीच्या वैशिष्ट्यांची आणि तिच्या भोवतालच्या सर्व प्रकारच्या परिस्थितीची दृष्टात्मक प्रक्रिया होऊन आकाराला आलेल्या व्यक्तीच्या जीवनाची समीक्षा असते. मानवी मूल्यात्मकता हा त्या समीक्षेचा प्रमुख निकष असतो.’’[३६] प्रमोद मुनघाटे यांनी केलेले हे परीक्षण वाचक वर्गाला दिशादर्शक ठरणारे आहे.

**नाट्यसमीक्षा** :–

इ.स. १९०२ पासून नाटकासंबंधी विविध प्रकारचे लेखन वृत्तपत्रातून प्रकाशित होऊ लागले. अनेक नियतकालिकांनी नाटकाचा विचार केला आहे. ‘केसरी’ आणि ‘निबंधमाला’ या नियतकालिकांप्रमाणे आगरकरांनीही आपल्या ‘सुधारक’ या वृत्तपत्रात रंगभूमी आणि नाट्यवाङ्मयाची दखल गेतलेली आहे. शंकर बापूजी मुजूमदार यांनी ‘रंगभूमी’ मासिक काढून नाट्यचळवळीचा प्रचार केला. मराठी नाट्यपरिषदेचे पहिले चिटणीस अनंत वामन बरवे यांनी ‘नाट्यकला’ नावाचे मासिक चालविले होते. या सर्व नियतकालिकांनी मराठी नाट्यसमीक्षेस हातभार लावलेला आहे. नाटक हे करमणूकीचे तसेच समाजशिक्षणाचे व समाजविकासाचे महत्वाचे साधन आहे. Drama is a Magic instrument of human dream. ही रोमॉरोलॉ यांची व्याख्या लागू पडेल अशी नाटके देवल, कोल्हटकर, गडकरी, वरेरकर यांची काही नाटके वगळता अभावानेच सापडतील. ‘सामज प्रबोधन पत्रिके’ मध्ये वाङ्मयप्रकारातील कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र इत्यादी वाङ्मय प्रकारांवर परिक्षणे झाली. त्यामुळे वाचकांमध्ये साहित्याबद्दल एक गोडी निर्माण झाली. ‘पत्रिके’ने नाटक या वाङ्मय प्रकाराचीही

दखल घेतल्याचे दिसते. परंतु तुलनेने प्रमाण अल्प जरी असले तरी त्या काळातील महत्वाच्या नाटकांची नोंद 'पत्रिके'मध्ये प्र. ना. परांजपे यांनी 'बाकी इतिहास' 'बादल सरकार' 'चांगुणा' (रुपांतर आरती हवालदार) 'वीज म्हणाली धरतीला' (वि. वा. शिरवाडकर) 'खोट नाटक' (श्री वृंदावन दंडवते) या नाटकांचे परीक्षण केले आहे. तर मंगेश पत्की यांनी 'मला काही सांगायचयं', 'घरात फुलला पारिजात' (वसंत कानेटकर) 'असं झालं आणि उजाडलं', 'संभूसाच्या चाळीत' (श्री. ना. पेंडसे), 'नटसम्राट' (वि. वा. शिरवाडकर) आणि 'शांतता कोर्ट चालू आहे' (विजय तेंडूलकर) यांच्या नाटकांचे परीक्षण केले आहे. 'उद्ध्वस्त धर्मशाळा' या गो. पू. देशपांडे यांच्या नाटकाचे ह. म. घोडके यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. नाट्यपरिक्षण ही साधी व सोपी गोष्ट नाही. कारण परीक्षकाला विशिष्ट मनोरचना, चटकदार भाषाशैली, नाट्यशास्त्राच्या दंडकांचा निदान कामचलाऊ अभ्यास असणे आवश्यक आहे. नाट्यपरीक्षणाविषयी डॉ. चंद्रकांत धांडे लिहितात, ''नाट्यपरीक्षकाला नाट्यनियम, परिस्थिती आणि वैशिष्ट्ये यांचे भान असणे अत्यंत आवश्यक असते. नाट्यपरीक्षक हा एका बाजूने नट व नाटककार आणि दुसऱ्या बाजूने प्रेक्षक व वाचक यांच्यातील अदृश्य दुवा असतो.''[३७]

*** बेलवलकर दुहेरी व्यक्तिमत्व:–**

'नटसम्राट' या वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकाचे मंगेश पत्की यांनी परीक्षण केले आहे. एकेकाळी नाट्यश्रेष्ट म्हणून गाजलेल्या परंतु केवळ वयपरत्वे म्हातारपण आल्यावर गणपतराव बेलवणकर या वृद्ध व्यक्तीवर कुणावरही ओढवू नयेत असे काही अप्रिय व कारुण्यपूर्ण प्रसंग ओढवतात. पत्नीच्या निधनामुळे त्यांच्या मनाचा तोल ढळून ते भ्रमिष्टासारखे वागतात आणि अत्यंतिक भावना वेगाच्या परिणामी त्यांचा अंत होतो. मंगेश पत्की 'नटसम्राट'चे परीक्षण करताना अनेक प्रश्न उपस्थित करतात ते म्हणजे या नाटकाला 'नटसम्राट' नाव का दिले जावे? अशा गोष्टी घडल्यावर म्हातारी माणसे संतापणे आणि त्यातला एखादा क्रोध, अवमान आणि दु:ख अनावर होऊन मरणे सहाजिक असणे. त्यासाठी तो पूर्वायुष्टात नटश्रेष्ठ असणे आवश्यक होते का? का तो केवळ अपघात होता? नाटकात जे संघर्ष दाखविले गेले आहेत त्यात 'नटसम्राटा'च्या स्वभावांतर्गत असा संघर्ष येतोच कुठे? असे प्रश्न उपस्थित करुन मंगेश पत्की

यांनी ‘नटसम्राट’ चे परीक्षण केले आहे.

नाटकाचे पुस्तक वाचल्यावर दोन गोष्टी ठळकपणे जाणवतात. त्यातली पहिली म्हणजे गणपतरावांचे पूर्वायुष्यात नटसम्राट असणे हा अपघात नसून नाटककाराने हेतूपूर्वक या व्यक्तीची योजना केली आहे. प्रत्यक्ष प्रयोगात मात्र प्रयोगात मात्र ती पूर्णपणे सफल झालेली आढळत नाही. दीडशेच्यावर प्रयोग होऊनही या नाटकाचे खरेखुरे रसग्रहण झालेच नाही. नाटक वेगळ्याच कारणासाठी गाजले आणि वेगळ्याच कारणासाठी त्याच्यावर टीकाही झाली.

‘नटसम्राट’ वाचताना कोणता परिणाम वाचकांवर होतो. तर ‘नटसम्राट’ वाचताना ही गोष्ट लक्षात येते की, गणपतराव बेलवणकर ही दुहेरी व्यक्तिमत्व असल्याचे जाणवते आपले वय झाल्यामुळे आपण नव्या पिढीपासून आपल्याच हाडामासांच्या मुलांपासून वेगळे पडतो. त्यांच्या जीवनातून खड्यासारखे वगळले जातो हे गणपतराव व त्यांच्या पत्नी कावेरी या दोषांनाही कळते आपली पोर चांगली आहेत. पण आपले म्हातरपण वाईट आहे अशी ती परस्परांशी बोलतातही. हे कडू सत्य ज्या सहजपणाने आणि सोशिकपणाने कावेरी पचवते तेवढे गणपतरावांना, एकेकाळच्या नटश्रेष्ठांना पचवता येत नाही. ते उफाळून उठतात. कोणाचाीही चूक नसताना निर्माण झालेल्या परिस्थितीच्या दगडी भिंतीवर थाडथाड डोके आपटतात. भिंत अभेद्य राहते. नटश्रेष्ठही अभेद्य राहतात. परंतु गणपतराव हा म्हातारा माणूस मात्र डोकं फुटून रक्तबंबाळ होऊन मरतो. प्रत्यक्ष नाट्यवस्तूत त्याचा दोन पातळ्यांवरचा हा संघर्ष नाटककारांनी अत्यंत सार्थपणे कसा चित्रित केला आहे, यावर पत्की यांनी प्रकाश टाकला आहे.

‘नटसम्राटा’बद्दल आपला परीक्षणात्मक अभिप्राय नोंदवताना पत्की लिहितात की, ‘‘नाटक वाचताना ते गणपतराव यासाठी ओलांडलेल्या एकेकाळच्या नटश्रेष्ठाच्या अखेरच्या दिवसाचे एक मोठ्या नेमकेपणाने बेतलेले हे नाटक झपाट्याने मोडू पाहणाऱ्या आपल्या कुटुंब संस्थेवर, दोन पिढ्यांतील दुरावत जाणाऱ्या अंतरावर आणि माणसाच्या अंतिम दुबळेपणावर मोठे समर्पक भाष्य करणारी कलाकृती असल्याचे जाणवते आणि वाटते या गुणांवरच त्याचे कौतुक व्हायला हवे होते.’’ परंतु असे होत नाही. नाटक गणपतरावांच्या नटश्रेष्ठाची शोकांतिका मांडते. मंगेश पत्की यांनी नाटकाचे वाङ्मयीन परीक्षण आणि प्रयोग परीक्षण केले आहे. ‘नटसम्राट’बद्दल

आपला अभिप्राय नोंदवताना डॉ. व. दि कुलकर्णी लिहितात, ''नाटक आणि प्रत्यक्ष जीवन यांतील कलात्मक अंतर त्यांनी पुसून टाकले होते आपले सारे जन्मभराचे मुखवट्यांचे जग, मुखवटे न चढवता ते उभारीत होते. आपल्या साऱ्या ट्रॅजिक हीरोंना त्यांच्या वेदना व्यथांसह त्यांच्या मृत्यूसह... एकाच क्षणी ते प्रत्यक्षात आणीत होते. नाटकच जीवनाहून कसे महान असते, ते राजाला दाखवीत आपल्या आपल्या साऱ्या थोर आणि आवडत्या भूमिका एकवटून अखेरचे करुण-गंभीर नाटक उभारीत अप्पासाहेबांनी जगाची ही रंगभूमी सोडली. अप्पासाहेबांना ही विलक्षण भूमिका देण्यामधील या नाटकातील निर्मिती कल्पनेची अपूर्वता आढळते.''[३८] तर नाटकाच्या यशापयशाची चर्चा करताना प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे लिहितात, ''नटसम्राट' या नाटकाने नाट्यसंहिता आणि प्रायोगिकता या दोन्ही संदर्भात यश मिळविले आहे. एका श्रेष्ठनटाची कौटुंबिक पातळीवर जीवनात झालेली शोकांतिका ही फार उत्कटतेने साकार झालेली आहे. पण नाटकाने मात्र घर नि थिएटर यांची गल्लत केल्याने त्याची शोकांतिका झाली आहे.''[३९] मंगेश पत्की यांना 'नटसम्राट' ही आजच्या काळात ढासळत चाललेल्या कौटुंबिक स्थितीचे चित्रण करणारी कलाकृती वाटते. तर व. दि. कुलकर्णी यांना गणपतराव या नटश्रेष्ठांची शोकांतिका वाटते.

*** कु.बेणारेचा नाटकी आक्रोश:-**

'शांतता कोर्ट चालू आहे!' या विजय तेंडूलकर यांच्या नाटकाचे मंगेश पत्की यांनी परीक्षण केले आहे. या नाटकाचे परीक्षण करताना ते 'कु. बेणारेचा नाटकी आक्रोश टिपतात.' अभिरुप न्यायसभेचा कार्यक्रम करणारी एक संस्था एका आडगावी कार्यक्रमासाठी आलेली आहे. कार्यक्रम सुरु व्हायला अजून बराच अवकाश आहे. वेळ घालवण्यासाठी आणि तालीमही व्हावी म्हणून मंडळी आपल्यातल्याच एका व्यक्तीवर खटला गुदरतात. तो खोटाच आहे असे भासवतात आणि काही काल्पनिक तर काही अर्धवट खरे पुरावे गोळा करुनच त्या व्यक्तीची ससेहोलपट करतात. तिला रक्तबंबाळ करतात. नाटकाचे कथानक हे एवढेच आहे. ते तेवढेच आणि तितकच राहिल असतं तर नाटक वेगळच झाल असतं. कदाचित अधिक चांगलं झालं असते, असे पत्की यांना वाटते.

कु. बेणारे ही तुमच्या-आमच्यारखी बेरकी आहे, मतलबी आहे. 'शहाणपणा मिरवणारी'

ही आहे. तिचा शेवटचा आक्रोश अवश्य करावा, कुणीही आक्रोश करावा असा क्षण मोठ्या कलात्मकतेने नाटककाराने तेथे उभा केला आहे, पण तो आक्रोश, त्याचा सूर वेगळा असायला पाहिजे होता. स्वत:चा निष्पापणा आणि जगाचा, समाजाचा क्रूरपणा या ऐवजी केवळ गंमत, तालीम व टाईमपास म्हणून चाललेल्या खेळात त्या खेळाचे नियम न पाळता इतरांनी जे तिला एकटीला कोंडीत पकडल त्या विरुद्ध असायला हवा होता अथवा आपल्या वागणूकीचं व्यवस्थित समर्थन करणारे, तथाकथित समाजाची आपल्याकडे बघण्याची दृष्टी कशी चूकीची आहे, कशी मूर्खपणाची आहे ते समर्थपणे प्रस्थापित करणारे वक्तव्य हवं होतं. म्हणजे 'खेळा' वरच नाटक संपल असत. आज आहे तसा बराचसा नाटकी मेलोड्रॅमाटिक आणि चूकीनं परिणामकारक वाटणारा शेवट टळला असता. त्याक्षणीचं तिचं 'फुटणं' त्या प्रकारान फुटणे, अस्वाभाविक वा अयोग्य वाटल असते, असे परखड मत मांडले आहे. तेंडूलकरी नाटक हे स्त्रीकेंद्री नाटक आहेच पण ते स्त्रीच्या परात्म जीवनाचे दु:खसुवत आहे. कुटुंबाच्या रुढ चौकटीतली स्त्रीची घुसमट, तिची क्लेशकथा, तिच्या जाणिवेला फुटणारे स्वत्व कोंब आणि तिची पराभूतता यांचा अत्यंत वेधक आणि प्रखर असा शोध त्यांचे नाट्यबंध घेताना दिसतात.

*** वैचारिकता:–**

'उद्ध्वस्त धर्मशाळा' या गो. पु. देशपांडे यांच्या नाटकाचे परीक्षण ह. म. घोडके यांनी केले आहे. 'नटसम्राट' 'हिमालयाची सावली', 'विषवृक्षाची छाया' असल्या लोकप्रिय नाटकांच्या प्रकृती धर्माशी 'उद्ध्वस्त धर्मशाळे'चे नाते असून ही ते नाटक लोकप्रिय झाले नसल्याची खंत धोडके व्यक्त करतात. ते लोकप्रिय न होण्यास त्यातील वैचारिकता असल्याचे ते नमूद करतात. हे नाटक रंगभूमीवर यशस्वी होऱ्यासाठी नाटककाराने नाट्यलेखकाने काही खास प्रयत्न केले नसल्यामुळे तेथे ही ते नाटक यशस्वी ठरले नाही. परंतु हे नाटक वाचल्यानंतर त्यामध्ये जो एक विलक्षण थरारक अनुभव अनुभवण्याजोगा आहे, हे नाटक पूर्ण वाचल्यानंतर कोणताही विचारी माणूस सुन्न होऊन नाटकातील शोकांतिकेचा विचार करु लागतो, असे म्हटले आहे.

'उद्ध्वस्त धर्मशाळा' या नाटकाच्या रुपाने एक काळीज जाळणारा प्रश्न निर्माण होतो तो असा सामान्य कुवतीच्या ह्या भारतीय समाजात श्री. वि. या सारखे थोर नेते किती दिवस मरत

राहणार आहेत? श्री. वि. सारख्यांचे मरण जर धीरोदात्त मानावयाचे, तर श्री. वि. ज्या समाजाचा घटक आहे तो मुर्दाड मानावयाचा का? श्री. वि. चे मरण ही या समाजाची बदनामी ठरत नाही काय? 'उद्ध्वस्त धर्मशाळेच्या निमित्ताने भारतीय समाजाच्या शतकानुशतकांच्या दोषांवर प्रकाश टाकला गेला आहे.' श्री. वि. सारखी माणसे भारताच्या सर्व भागात मिळतील पण ह्या धगधगत्या अंगारावरचे थंड राखेचे पुंजहे जमा होतात व अशा एका फुलून आलेल्या निखाऱ्याला नि:स्तेज, कलाहीन करुन टाळतात. जोपर्यंत भारतीय समाजजीवन उथळ, थिटे, लाजार आहे तोपर्यंत श्री. वि. सारख्यांची शोकांतिका अटळ आहे, असा परखड शब्दांत प्रतिवाद केला आहे.

या नाटकाला रुढार्थाने सांगता येईल अशी कथा फारशी दिसत नाही. एका विचारवंताची निस्सीम तत्वनिष्ठेमुळे झालेली शोकांतिका रंगवण्यात कथानकाची तशी तितकीशी गरज नाही. तीन पिढ्यांना ह्या तत्वनिष्ठेच्या हव्यासापायी भोगाव्या लागणाऱ्या यातना कथानकात दाखवलेल्या आहेत. मूळची शोकांतिका जास्त गडद वाटावी म्हणून तिला विफल प्रेमाची किंचित झालर दिलेली आहे. आजच्या समाजजीवनाची लक्तरे श्री. देशपांडे यांनी उत्कृष्टपणे वेशीवर टांगली आहेत, असा अभिप्राय धोंडके नोंदवितात. या नाटकाबद्दल मकरंद साठे लिहितात, ''एका व्यक्तीची समूहानं केलेली शिकार/हत्या हा मराठी नाटकांत वारंवार आलेला विषय 'शांतता' पासून 'वासनाकांड' पर्यंतची अनेक उदाहणे आहेत. पण 'सूर्य पाहिलेला माणूस' आणि 'उद्ध्वस्त धर्मशाळा' मध्ये ही लढाई केवळ एक व्यक्तिगत पातळीवरचं बंड करु पाहणारी व्यक्ति विरुद्ध समाज एवढ्यापूरती मर्यादित नाही. त्याला तत्वचिंतनाची राजकीय विचार सरणीची बैठक आहे. सॉक्रेटिस आणि श्रीधर केवळ बंड करु इच्छिणारी व्यक्तिमत्व नव्हेत तर ती क्रांती करु पाहणारी माणसे आहेत. असा हा फरक सॉक्रेटिस नंतर अडीच हजार वर्षात मानवी व्यवहाराला, राकारणाला, विचारधारांना जे व्यमित्र स्वरुप आलं आहे, त्याचं दर्शन ही नाटकातून घडते पण मूळ लढा तोच आहे. 'उद्ध्वस्त धर्मशाळा' इतक्या विविध पातळींवर राजकीय आणि सामाजिक दर्शन घडविणारं नाटक विरळ!''[४०]

'उद्ध्वस्त धर्मशाळेची तुलना' 'नटसम्राट'या नाटकाशी धोंडके करतात. गणपतराव बेलवणकरांची उंची, भव्यदिव्य मोठेपण श्री. विला लाभले नाही. पण श्री. वि. ची. अत्यंतिक

तत्वनिष्ठा त्या तत्वनिष्ठेसाठी जीवनातून उठून जाण्याची त्याची तयारी, तडजोड न स्वीकारण्याची जिद्द बेलवणकरांपेक्षा जास्त भेदक असल्याचे ते स्पष्ट करतात. जोपर्यंत भारतीय समाजजीवन उथळ, थिटे, लाचार आहे तोपर्यंत श्री. वि. सारख्यांची शोकांतिका अटख आहे. 'उद्ध्वस्त धर्मशाळेबद्दल' आपले मत व्यक्त करताना वसंत आबाजी डहाके लिहितात, ''स्वातंत्र्योत्तर भारतातील तीव्र संवेदनशीलतेच्या, आणि दृष्टेपणाच्या पराभवाची मीमांसा या नाटकात केलेली आहे. देशपांडे यांच्या नाटकाचे स्वरुप विचार–नाटकाचे आहे. स्थितीशील, जाणिवांशी समांतर असणाऱ्या कलावंतांची कला निर्जीव, तंत्रप्रधान व कसबी होत जाते. तर क्रांतिकारी अशा गतिशील जाणिवेशी एकरुप होणाऱ्या कलावंतांची कला चैतन्ययुक्त व जिवंत पोत धारण करते.''[४१] एखाद्या विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी कार्यकर्त्याने थोडेसे खाली आले पाहिजे का? तत्वांना थोडीसी मूरड घातल्याशिवाय ते तत्वज्ञान जनमाणसामध्ये पोहोचू शकणार नाही काय? हे तत्वज्ञानातील जूनेच प्रश्न नाट्यरुपाने पहिल्यांदाच निर्माण केले गेले आहेत, असे धोडके यांनी नमूद केले आहे.

*** चांगुणा: यशस्वी रूपांतर:–**

'चांगुणा' या आरती हवालदार यांच्या रुपांतरीत नाटकाचे प्र. ना. परांजपे यांनी 'चांगुणा:यशस्वी रुपांतर' असे शीर्षक देऊन परीक्षण केले आहे. सुप्रसिद्ध स्पॅनिश कवी व नाटककार लॉकी यांच्या 'यर्मा' या काव्यात्म शोकनाट्याचा मराठी अवतार म्हणजे चांगुणा. मुलासाठी व्याकुळ झालेल्या पण वतीच्या असमर्थतेमुळे वांझपणा वाट्याला आलेल्या स्त्रीची शोकांतिका म्हणजे हे नाटक आत्मसन्मानाने जगू पाहणाऱ्या या मनस्वी स्त्रीला अपत्य प्राप्तीसाठी अन्य पुरुषांशी संबंध जुळवणे किंवा दारुण अपेक्षाभंगानंतरही मूर्दाडपणाने जगत राहणे ह्यापैकी कुठलाही पर्याय पटत नाही. त्यामुळे काव्यात्म व अतिशय तीव्र संवेदनशक्ती असलेल्या यमीला आत्मनाशाशिवाय दुसरा इलाजच उरत नाही. नाटकाच्या शेवटी ती आपल्या पतीचा गळा दाबून खून करते. पण हा विनाश तिच्या पतीचा नाही किंवा तिच्या कल्पनाविश्वातल्या अपत्याचा नाही. तो तिचा स्वत:चा विनाश आहे, असे परांजपे यांनी परीक्षणात नमूद केले आहे. 'यर्मा' चे मराठीकरण करण्यासाठी आरती हवालदारांनी कोणते बदल केले परांजपे स्पष्ट करुन दाखविले

आहेत. प्रतिमा, प्रतिके, दृष्टांत, उपमा इ. सर्व गोष्टीमध्ये आवश्यकते बद्दल त्यांनी घडवून आणल्यामुळे 'यर्मा'चे मराठीकरण सर्वकष झाल्याचे म्हटले आहे.

श्री. वृंदावन दंडवते यांच्या 'खोट नाटकं' या नाटकाचे परीक्षण प्रभाकर नारायण परांजपे यांनी केले. दंडवते यांच्या नाटकात परंपरेपेक्षा वेगळी वाट शोधत असल्याचे दिसते त्यांच्या नाटकांत संवादापेक्षाही रंगभूमीच्या इतर अधिक मुलभूत घटकांचा प्रभावी उपयोग करुन घेतल्यामुळे 'शब्दापलीकडील नाटक' अशा शब्दांत परांजपे त्यांच्या नाटकाचे परीक्षण करतात. संवादापेक्षा वक्तृत्व, हुंकार, आरोळ्या, मंत्रघोष, मुलांची बडबड गीते व खेळ, मूक हालचाली, शब्दांची व वाक्यांची पुनरुक्ती इत्यादीवर भर असल्याचे स्पष्ट करतात. वरील सर्व घटकांच्या सामन्यविरोधीतत्वांच्या आधारे केलेल्या संरचनेतून नाट्यानुभव साकार करतात, यात त्यांच्या नाटकांचे वेगळेपण असल्याचे जाणवते, असे नमूद करतात.

दंडवते यांनी छोट्या–मोठ्या दृश्यांची गुंफण करुन वास्तववादी परंपरेची बंधने झुगारुन नाट्यरचना कमालीची लवचिक बनवतात, त्यासाठी त्यांनी तमाशासारख्या लोककलांच्या रचना वैशिष्ट्यांचाही उपयोग केल्यामुळे परांजपे त्यांच्या नाटकाचे वर्णन/Avant grade असे करतात.

*** लहान आशय सूत्रः–**

'बाकी इतिहास' या बादल सरकार यांच्या नाटकाचे प्र. ना. परांजपे यांनी परीक्षण केले आहे. मराठी रंगभूमीवर बादल सरकार यांचे स्थान किती भक्कम आहे. याबद्दल परांजपे परीक्षणामध्ये सविस्तर चर्चा करतात. बादल सरकार ही आधुनिक भारतीय रंगभूमीवरची नवी शक्ती आहे. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगांमध्ये विसाव्या शतकाची, विशेषतः युद्धोत्तर काळाची जाणीव प्रकर्षाने व प्रभावीपणाने व्यक्त करणारे एका हाताच्या बोटांवर मोजता येणारे जे भारतीय नाटककार आहेत त्यात सरकारांचा समावेश ते करतात.

इतक्या अल्पावधीत सरकारांनी मराठी रंगभूमीवर हे जे स्थान मिळविले, त्याला त्यांच्या नाटकांच्या अविष्कार पद्धतीतील संपूर्ण असांकेतिक, नाविन्य, प्रयोजकता या गोष्टीकारणीभूत आहेत. 'बाकी इतिहास' त्यांच्या या वैशिष्ट्यांचा प्रभावी प्रत्यय येत असल्याचे ते नमूद करतात. 'बाकी इतिहासा'चे आशयसूत्र फार लहान आहे. सीतानाथ या नावाचा एक माणूस इतिहासाच्या

दोन रुपापैकी एक रुप समाजाच्या व राष्ट्राच्या पातळीवरील इतिहास म्हणजे कौर्य, यातना व मृत्यू याचा इतिहास, हे रुप असह्य होऊन आत्महत्या करतो. सर्वसामान्य माणूस व्यक्तिगत इतिहासाच्या जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी, लग्न अशा घटनांनी विणलेल्या इतिहासाच्या या दुसऱ्या रुपाचे, आक्राळ–विक्राळ दर्शन सहसा होत नाही. तो हा इतिहास वाचतो; पण त्याच्या काळजाला तो भिडत नाही. म्हणूनच दु:ख, दैन्य, जुलूम, छळ, पिळवणूक व मृत्यू यांच्या अंधारग्रहांमध्ये तो मजे जगत असतो. इतिहासाच्या दोन रुपांतील विरोध व त्यांच्या दाढेत असूनही अज्ञानामुळे खुशीत जगणारा माणूस हा 'बाकी इतिहास' चा विषय आहे. 'बाकी इतिहासा'चे नाट्यमाध्यमातून दर्शन घडवून प्रेक्षकाला विचार–प्रवृत्त करणे, त्याच्या आत्मसंतुष्टपणाला गदागदा हलविणे हा उद्देशही या नाटकाच्या विषयात अंतर्भूत असल्याचे स्पष्ट होते. सरकारांची नाट्यरचना फार कौशल्यापूर्ण व प्रयोजक असते. म्हणूनच बांदल सरकार ही भारतीय रंगभूमीवरची नवी शक्ती आहे, हे अधोरेखित केले आहे.

'उजळल्या दिशा' या डॉ. सदानंद मोरे लिखित नाटकाचे श्रीपात भालचंद्र जोशी यांनी परीक्षण केले आहे. एखाद्या 'नाट्यप्रयोगाचे' मूल्य हे त्याचे सहिता मूल्या व प्रयोग मूल्य या दोन्ही पातळ्यावर मिळूनच सिद्ध होत असते. हे तर खरेच आहे पण प्रयोगक्षम कलाविष्कार हा शेवटी केवळ प्रयोगासाठी प्रयोग नूसन कुठला तरी जीवनाकारच त्यातून व्यक्त होऊ पाहात असतो. जीवनाकाराचे हे व्यक्त होणे. रंगभूमीवर शब्द माध्यमासोबतच शब्देतर अशा रंगाभाषेतूनही घडत असते आणि शब्दावीणही ते संवादित होत असतेच. मात्र जे संवादित होत असते तो अर्थ शब्द शरीर ही होऊन येतो. तो शब्द हा विशिब्दच सामाजिक–सांस्कृतिक संदर्भ घेवून येत असल्याने व ते संदर्भ सामाजिक असल्याने त्यांच्याशी पर्यायाने त्या नाट्यकृतीशी कर्तव्य असणारी प्रत्यक्ष लोकसंख्या ही नाट्यगृहातील प्रेक्षकांपेक्षा कितीतरी मोठी असते. विशेषत: हे संदर्भ जेव्हा समकालीन समाजातील संवेदनशील अशा विषयाच्या संबंधातील ताणेबाणे विणणारे, ताणतणाव व्यक्त करणारे असतात तेव्हा त्यांची चर्चा प्रयोगाच्या, रंगभाषेच्या पातळीवर कमी संहितेच्याच पातळीवर अधिक घडत जाते. त्यामुळे त्या प्रयोगाकडे, त्यातील कलाविष्काराकडे, अभिनयाकडे, दिग्दर्शनाकडे, त्यातल्या तंत्राच्या बारकाव्याकडे व त्यांनी साकारलेल्या नाट्यानुभवाकडे म्हणावे

तितके लक्ष दिले नसल्याचे नमूद केले आहे.

*** स्थितीवादाचा पुरस्कार करणारे नायक:–**

'उजळल्या दिशा' त्या नाट्यकृतीच्या रंगभाषेने लेखकाच्या भाषेवर, चिंतनावर, विषयांवर व त्यांच्या विचारव्यूहावर मात केलेली आहे. विचार प्रधान नाटक, चर्चाप्रधान नाटक, राजकीय नाटक अशा विविध विशेषभांती या नाटकाकडे बघितले आहे. विशेषत: डॉ. श्रीराम लागू सारख्या केवळ नटश्रेष्ठानेच नव्हे तर विचारवंत नठश्रेष्ठाने 'एक अतिशय महत्वाचा विचार नाटककार पाहतोय' असे म्हटल्याने व 'उद्ध्वस्त धर्मशाळा' नंतर गेल्या पंचवीस वर्षात असा प्रयत्न कुणी केला नव्हता. असे म्हटल्याने ह्या नाटकाच्या पुढच्या दिशा एकदम अकारण उजळून गेल्या. त्या प्रकाशाने अनेकांचे डोळे दिपून गेले. श्रीपाद जोशी यांचे मन मात्र असे डोळे दिपवून घेण्यासारखे काहीही विचारप्रवर्तक वा महत्वाचे या नाटकात फारसे नसून जे काही तसे वाटण्यासारखे आहे तो केवळ त्याचा आभास आहे, हे पुरेसे चर्चा नाटक नाही. विचार नाटक ही नाही, राजकीय नाटक तर नाहीच नाही.

श्रीपाद जोशी यांच्या मते या नाटकातील नाटक पुरेसा 'रोमँटिक' ही नाही. तर अतिशय कृत्रिम, अवास्तव व ज्याला समकालीन दलित वास्तवात कोणतच अस्तित्व प्रत्यक्षात नाही वा संभवत नाही. परंतु दलितेत्तरांना मात्र जसा तो असावा असे वाटते तसा दलित प्राध्याक नागसेन सोनसळे जन्माला घालून खुद्द लेखकाच त्यांच्या तोंडून लेखकाला जे म्हणायचे आहेते त्यांच्या विविध भाषणांतून, संभाषणातून, मुलाखतीमधून, चर्चेतून म्हणवून घेतो आहे. हा नायकच त्यामुळे प्रत्यक्ष दलित वास्तवातील पात्र असण्यापेक्षा सदानंद मोरे सारख्या दलितेतरांना जो दलित जसा हवा आहे तसे घडविले गेलेले पात्र झाले आहे, असे परखड मत मांडले आहे.

पूर्णत: काल्पनिक पातळीवरचा त्यांच्या दलित नायकाला व त्याच्या वैचारिक पातळीला दलित वास्तवाचा आधार नसल्याने मुळात ते वास्तववादी नाटकच ठरत नाही. दलित वास्तवाचे हे आजचे चित्र आहे अथवा असावे असे वाटायला लावणारे हे नाटक तद्दन खोटे व भ्रामक वास्तव उभारणारे नाटक झाले आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेला बौद्ध धर्माधरित संकल्पनांच्या निमित्ताने बळ पुरवणे, धर्म निरपेक्षतेच्या जागी धर्माधिष्ठित संकल्पनेचे राजकारण,

पुरस्कारण घटनेच्या कार्याला गौणत्व बहाल करणे, सामाजिक न्यायाच्या संकल्पनांना व त्यासाठीचा संघर्ष, क्षोम, ह्याऐवजी शांत रसात बुडालेला तथाकथित उन्नत, अध्यात्मिक दलित उभारणे असा काहीसा आजच्या सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांना बळ देणारा, छुपा अजेंडा या नाटकाच्या तळाशी वावरत असल्याने सामाजिक भान असणाऱ्या सुज्ञ प्रेक्षकास, वाचकास ह्या नाटकाच्या निमित्ताने जाणवत, असल्याचे म्हटले आहे. त्या अर्थाने हे नाटक स्थितीवादाचा पुरस्कार करणारे व आंबेडकरी तत्वज्ञानाचा मुख्य भागा जवळून आंबेडकरांच्या जीवित कार्यातील अनुषंगिक कार्याला 'लार्जर दॅन लाईफ' करुन मांडणारे व त्यांच्या साऱ्याच मुख्य कार्याला गौणत्व बहाल करण्याचा संदेश देणारे नाटक तेवढे झालेले आहे, असे परखड मत श्रीपाद जोशी यांनी मांडले आहे, तर डॉ. अनिल सपकाळ 'उजळल्या दिशा' या नाटकाबद्दल अभिप्राय व्यक्त करताना लिहितात, '''उजळल्या दिशा' या नाटकामधले महत्वाचे वैशिष्ट्ये हे बौद्ध जीवनाविषयक दृष्टिकोनाला दिलेले नाट्यमयरुप होय. हे रुप अतिशय प्रभावीपणे मांडलेले आहे. दलित नाटककारांच्या नाटकांमध्ये बौद्ध दर्शनाचा जो विचार प्राधान्याने प्रकटत नाही, तो डॉ. सदानंद मोरे नेमकेपणाने आपल्या नाटकात मांडतात.''[४२] अनिल सपकाळ आणि श्रीपाद जोशी यांच्या 'उजळल्या दिशा' बद्दलच्या अभिप्रायात जमीन–अस्मानाचे अंतर जाणवते.

**प्रवासवर्णने :–**

कथा, काव्य, नाटक, कादंबऱ्यांच्या गोतावळ्यात ललित लेखन होत आहे. ललित लेखनांत आणखी एक मोडणारा साहित्य प्रकार म्हणजे प्रवासवर्णन. मराठीत प्रवासवर्णनाची परंपरा बरीज जुनी असली तरी हा वाङ्मयप्रकार रा. भि. जोशी, पु. ल. देशपांडे, गाडगीळ, दळवी आदींनी विशेष सिद्ध केला. तरीही मराठीतील यशस्वी प्रवासवर्णनाच्या पुस्तकांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी भरेल. ह्याला कारण म्हणजे एकतर हा दुर्मिळ वाङ्मय प्रकार. मराठी माणसाच्या नशिबी प्रवास हा बेतातच. तशात परदेश वगैरे म्हटलं की औरच! प्रवास करणं जितके सोप त्याहून तो अनुभवण कठीण आणि तो अनुभव शब्दांकित करणं त्याहून अवघड. च्वास वर्णन ही एक कलाकृती आहे परंतु ती कलाकृती बनण्यासाठी काही अडर्ची येतात. याबाबत गंगाधर गाडगीळ लिहितात, ''प्रवासवर्णन ही संपूर्णतया एक कलाकृती स्वत:चा असा

एक घाट असतो तिच्यातील घटनांच्या अनुक्रमात संगमी व अपरिहार्यता असते. तीत कोणत्या अनुभवांचा समावेश करावयाचा या बाबतीत लेखकाला पूर्ण स्वातंत्र्य असते आणि या स्वातंत्र्याचा उपयोग कलात्मकता साधण्यासाठी तो करीत असतो. प्रवासवर्णनात तसे नसते. प्रवासवर्णनात तसे नसते. प्रवासात ज्या अनुक्रमाने घटना घडतात. त्यात कलात्मक संगती असेलच अशी शाश्वती नसते. खरे म्हणजे तशी संगती नसण्याचीच शक्यता अधिक असते. त्याचप्रमाणे प्रवासात आलेला प्रत्येक अनुभव अर्थपूर्ण नसतो किंवा एखाद्यावेळी एखादी अर्थपूर्ण घटना प्रवासत घडतेही, पण तिच्यातील अर्थ प्रतीत व्हावा असे लेखकाचे व्यक्तिमत्व नसते आणि तरी अशा अनुभवाची व तपशिलांची नोंद प्रवासवर्णनात करावी लागते.''[४३] लेखक ज्या स्थळांना भेटी देतो त्यापेक्षा वेगळे वर्णन लेखक करत असतो. आपल्या मनाला जे हवे ते मांडत असतो.

मराठी माणसाच्या तोकड्या अनुभवविश्वाबद्दल नहमी तक्रार केली जाते. काही अंशी ती तक्रार रास्तही आहे. आहे त्यात समाधान मानणे, अथवा नाविन्याकडे जाणूनबुजून डोळेझाक करण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे तो स्वत:भोवती, स्वत: बनविलेल्या वर्तुळाच्या परिघात फिरत असतो. नव काही बघावं, नव्याच्या ध्यासाने झपाटून जावं असं क्वचित घडत असतं. त्यामुळे खूपदा त्याच त्याच साहित्य प्रकारात तो फिरत असतो. मराठीमध्ये यशस्वी प्रवासवर्णनाच्या पुस्तकांची संख्या हाताच्या बोटावर मनोजण्याइतकी भरते. त्याला ही वृत्ती कारणीभूत दिसते. 'समाज प्रबोधन पत्रिके' मध्येही परीक्षणामध्ये प्रवास वर्णनांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहे.

*** सामाजिक व राजकीय समस्यांची माहिती:–**

'पूर्वाचलाची मुशाफरी' या श्रीपाद जोशी यांच्या प्रवासवर्णनाचे कुसूम पटवर्धन यांनी परीक्षण केले आहे. या प्रवासवर्णनामुळे आसामची व मणिपूरची भाषा, तेतील साहित्य व साहित्यिक याबद्दल बरीच कल्पना येते. तसेच आसाममधील परप्रांतीयांबद्दलचे प्रश्न, तेथील भाषिक दंगली, गारो, मिझो, नाग इ. टोळीवाल्यांमुळे तेथे निर्माण झालेले अनेक राजकीय प्रश्न यांची माहिती आली आहे. त्याचबराबेर पुराणातील व्यक्तीचे उल्लेख गंमतीचे वाटतात. तसेच नागांचा ज्वलंत प्रश्न, काछार जिल्ह्यातील भाषेची गुंतागुंत, बंगाली–आसामी तेढ अशा अनेक

राजकीय, प्रश्नांवर लेखकांने थोफार प्रकाश टाकला आहे. त्यामुळे हे केवळ प्रवासवर्णन नसून सामाजिक व राजकीय समस्यांची माहिती आहे. या प्रवासवर्णनातून मिळत असल्याचे पटवर्धन यांनी म्हटले आहे.

श्री. जोशी यांचा प्रवासवर्णन लिहिण्याचा मुख्य उद्देश लोकांच्यात मिसळण्याचा असल्यामुळे या मुशाफिरीमध्ये निसर्गवर्णनाचा अभाव असल्याचे त्या नमूद करतात. प्रवासवर्णनात लेखकाच्या व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया यांच्यावर परीक्षणात प्रकाश टाकला आहे. कोहिमाच्या स्मशनभूमीबद्दलची लेखकाची प्रतिक्रिया अतिराष्ट्रीयवादाची वाटली. For your tomorrow we gane our today अशा वृत्तीने जे तरुण इंग्रज अधिकारी धारातीर्थी पडले त्यांच्याबद्दलची श्री. जोशी यांनी इतकेच वाटावे– हे शूर सैनिक कुणासाठी मेले? भारतमातेसाठी की इंग्रजांचे साम्राज्य टिकावे म्हणून? वास्तविक कुणाही शूरांचे हौतात्म्य आदरणीय नाही काय? असा प्रश्न पटवर्धन उपस्थित करतात. या प्रवासवर्णनात तेथील लोकांचे काही फोटो, काही रेखाचित्रे असती तर तेथील लोकांची शारीरिक वैशिष्ट्ये, कपडे, घरे यांची जास्त कल्पना आली असती, पण त्याच्याअभावी हे प्रवासवर्णन केवळ वर्तमानपत्री लेखांचे संकलन इतकेच या पुस्तकाचे स्वरुप राहिले आहे, असे परखड मत व्यक्त केले आहे.

*** श्रीकैलास ते सिंधूसागर:–**

'अठरा लक्ष पावलं' या दि. वा. मोकाशी यांच्या प्रवासवर्णनाचे वसंत पळशीकर यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. १९६८ साली 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. ग. माजगांवकर यांनी परदेशातून अन्नधान्याची आयात ताबडतोब बंद करावी, या कल्पनेचा प्रचार करण्यासाठी एक पदयात्रा संघटित केली होती. वेरुळच्या लेण्यापासून पदयात्रेची सुरुवात जाली होती अणि मुंबईच्या अरबीसमुद्रात तिची सांगता झाली. या पदयात्रेत तटस्थ निरीक्षक म्हणून मराठीतील एक ज्येष्ठ कथा लेखक दि. बा. मोकाशी सामील झाले होते. अशी प्राथमिक पण महत्वाची माहिती पळशीकर देतात. परीक्षणात 'श्रीकैलास ते सिंधू सागर' हे शीर्षक दिले आहे ते यथार्थ वाटते. परीक्षणाला न्याय देणारे आहे.

पदयात्रेचे एक 'आंतरिक जीवन' असते. मोकाशीचे पुस्तक या आंतरिक जीवनाबद्दल

आहे व त्याचा प्रत्यय आणून देण्यात ते यशस्वी झाले आहे. कारण ते आपल्या स्वत:च्या अनुभवाशी प्रामाणिक व आत्मनिष्ठ राहिले आहेत. म्हणून त्यांना हे यश मिळाले असल्याचे पळशीकर नमूद करतात. मोकाशींच्या पदयात्रा वृत्तांतात निसर्गाची रेखीव वर्णने आहेत, ती मोठी मनोहारी आहेत. गावागावांचे वेगळेपणही त्यांनी चांगले सांगितले आहे. पदयात्रिक अन्नाबबातीतले परावलंबित्व हे विषय घेऊन दर गावात जातात, पण त्या त्या पदयात्रेला एक मात्र त्या चिंतेची फिकीर करायला वेळ नसे. हा या प्रवासवर्णनातील उपरोध चिंतनीय असल्याचे पळशीकर यांनी म्हटले आहे.

'लागेबांधे' या बाबा भांड यांच्या प्रवासवर्णनाचे संध्या कागलकर यांनी परीक्षण केले आहे. औरंगाबाद सारख्या शहरापासून चार हात दूर असलेल्या खेड्यातील ह्या सोळा वर्षाच्या शाळकरी पोराला ध्यानीमनी नसतानाही परदेशी जाण्याची संधी मिळकते. ज्याने अजून मोटार, रेल्वेने प्रवास केला नाही, तो पोरगा चक्क विमानातून कैरो, रोम, अथेन्स, पॅरिस, लंडन–न्यूयॉर्क, कॅनडातील टोरन्टो, कैलागिरी, अमेरिका, जपान, हाँगकाँग, बँकाकला प्रवास करुन येतो आणि त्या प्रवासात भेटलेल्या व्यक्तींच्या लागेबांध्याविषयी प्रवासवर्णनात विचार व्यक्त करतो, यावर कागलकर प्रकाश टाकतात.

१९६९ साल कॅनडातील युवक मेळावा आणि अमेरिकेतील जागतिक स्काऊट–गाईड जांबोरी. एकाचवेळी दोन मेळावे. भारतातून पाच निवडक पोरांची निवड केली जाते. त्यात १९६६ साली राष्ट्रपतीपदक मिळविलेला बाबा भांड ही असतो आणि ह्या पाचाच्या तुकडीचे नेतृत्वही भांडनेच केलेले असते, या सर्वाबद्दल सविस्तर माहिती त्या प्रवासवर्णनातून मिळते. संध्या कागलकर परीक्षणात लिहितात की, ह्या साऱ्या प्रवासातील विविध अनुभवाने बाबांचे बाल काहीसं गोंधळलं असेल पण पाश्चिमात्य आत्यंतिक समृद्धीत दिपूनही गेलं नाही. सगळ्या नोंदी बाबाने अलिप्तपणे केल्यात. वेळोवेळी प्रकट चिंतनही आढळत, पौर्वात्य आणि पश्चिमात्य संस्कृतीत जमीन–आसमानाचा फरक आहे. आध्यात्मिक श्रद्धांचा आणि परंपरांचा मांगल्यदायक वारसा सांगणारी भारतीय संस्कृती आणि आत्यंतिक समृद्धीकडे माणसाचं माणूसपण हरवत जाणाऱ्या यांत्रिक आधुनिक संस्कृतीमधील फरक जागोजाग आढळत असतो. हे सगळं लिखाण प्रवासातील

रुक्ष टिपण न बनता एका संवेदनशील मनानं टिपलेल्या अनुभवांची नोंद बनलं आहे. कौलगीरीतील मेळ्याव्यात आणि आयडोहातील तांबोरीत जगातील विविध देशांची भिन्न संस्कृती–भाषेंची मुल–मुली आलेली. काही दिवस एकत्र राहतात. स्वत:ला विसरुन जातात. कॅम्प संपतो, शिल्लक राहतात फक्त गोड आठवणी आणि ह्या गोड आठवणी लागेबांध्याचा स्थायीभाव बनल्या असल्याचे परीक्षणात म्हटले आहे.

'भमरागडची भ्रमणगाथा' आणि 'पूर्वारण्यातील वडनावळ' या अनिल थाते यांच्या पुस्तकांचे परीक्षण भा. रा. बापट यांनी केले आहे. १९७० च्या नोव्हेंबर मध्ये श्री. म. जोशी यांच्याबरोबर लेखकाने जो दौरा केला त्यावेळच्या अनुभवांचे वर्णन 'पूर्णारण्यातील वडवानळ' या पुस्तकात केले आहे. त्यानंतर चार महिन्यांनी साहस यानातून भमरागडला गेले होते तंचे सहप्रवासी होते बाबा आमटे. ते पुस्तक म्हणजे 'भमरागडची भ्रमणगाथा'.

'वडवानळ' मधील भाषा साधी, निवेदन सरळ आणि रंजकही असल्याचे परीक्षणात म्हटले आहे. त्यातील विषय आकर्षक व व्यग्र करणारा असल्यामुळे इतर गोष्टीकडे लक्ष जात नाही, तर विषय चांगला असूनही भाषा व विनेदन पद्धती उबग आणणारी क्वचित किळसवाणी असल्यामुळे 'भमरागडची भ्रमणगाथा' हे पुस्तक कंटाळवाणे झाल्याचा अभिप्राय बापट यांनी नोंदवला आहे. हे पुस्तक आपल्या माहितीत पुष्कळ भर घालणारे आहे, असे म्हटले आहे. महाराष्ट्र आंध्र आणि मध्यप्रदेश जेथे एकत्र मिळतात तेथील अत्यंत घनदाट जंगलाचा, आदिवासी भाग असलेला भाग म्हणजे भमरागड. येथील माहिती वाचकाला मिळते.

*** बिहारची दयनीय स्थिती:–**

'पूर्णिया' या अनिल अवचट यांच्या पुस्तकाचे परिक्षण वसंत पळशीकर यांनी केले आहे. या पुस्तकामध्ये बिहारमधील दारिद्रय, तेथल्या जीवनातील लाचारी व गुलामगिरी, तेथील मध्ययुगीन संस्कृती अवचटांनी त्यातले, भीषण नाट्य जीवंत साकार केल्याचे पळशीकरांनी म्हटले आहे. एस. एम. जोशी यांच्याबरोबरच्या प्रवासातल्या अनुभव–निरीक्षणांचे टिपण असे या पुस्तकातील एक ते सात या प्रकरणांचे स्वरुप आहे तर आठ, नऊही प्रकरणे चिंतनात्मक असल्याचे नमूद केले आहे.

'मला बिहार पाहून गलबलून आले' असे अवचटांनी म्हटले आहे. संवेदनाशील मनाचा कोणताही तरुण असाच गलबलून जावा असेच भेसूर तिथल्या सामान्य माणसाचे जीवन आहे. अवचटांच्या मनाचा व लेखनाचा एक विशेष पळशीकरांनी नोंदवला आहे. तो म्हणजे संकुचित सांप्रदायिकतेपासून ते मुक्त आहेत. सामाजाचे परिवर्तन करावयास निघालेल्या सामजवादी राजकारणी पुढाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे मानस व व्यवहार मध्ययुगीन कसे राहिले याचे विदारक दर्शन ते सहजपणे घडवितात आणि क्रांतीच्या आड केवळ धनिक, सरंजामदार व जमिनदारच येत नाहीत तर मध्ययुगीन समाजाला बदल म्हणणारे राजकारणी ही येतात, हे स्पष्ट करणारे हे पुस्तक आहे, असे पळशीकर म्हणतात. प्रवास वर्णनात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे अनेक कंगोरे व्यक्त व्हायला वाव आहे. 'पूर्णिया' मध्ये अनिल अवचटांच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे दिसतात. परीक्षणात पळशीकर यांनी 'मध्ययुगीन वैभव व गुलामी आणि क्रांती' असे शीर्षक देऊन 'पूर्णिया'चे परिक्षण केले आहे ते सार्थ वाटते. त्याचाच प्रत्यय परीक्षणात येतो.

**'समाज प्रबोधन पत्रिके'तील वाङ्मयप्रकार निहाय ग्रंथपरीक्षणे या प्रकरणाच्या विवेचनावरुन पुढील निरीक्षणे मांडता येतील.**

- गेल्या सुमारे चाळीस वर्षातल्या मराठी कवितेत दृष्टीस पडणाऱ्या विविध प्रवृत्ती आणि रसिक–वाचक ह्यांची बदलत गलेली अभिरुची यांचा उलगडा काव्यपरीक्षणातून आपणास होतो.
- मराठी काव्यप्रवाहाला वेगवेगळ्या प्रकारे भिडणाचा प्रयत्न या काव्य परीक्षणात समीक्षकांनी केलेला दिसतो.
- काव्यपरीक्षणामध्ये समीक्षकांनी कवितेतील दुबोधनेवर प्रकाश टाकल्याचे दिसते, तसेच परीक्षणामध्ये कवितेतील चिंतनशीलता अधोरेखित केल्याचे दिसते. (ग्लोरिया–गुरुनाथ धुरी)
- 'शांतारामांच्या' कथांचा लेखक केंद्री अभ्यास करताना प्रतिभा पोरे यांनी त्यांच्या कथेतील अनुभवविश्वाची विस्तृत चर्चा करुन अनन्यसाधारणता स्वरुप मांडले आहे. स्त्रीपुरुषसंबंधाकडे पाहण्याची लेखकाची वेगळी मर्मदृष्टी असल्याचे नमूद केले आहे.

- कथालेखक हे केंद्र मानून जी कथासमीक्षा आली आहे, त्यात लेखकाची अनुभव घेण्याची व मांडण्याची पद्धती, लेखकाची वृत्ती या गोष्टींचा समीक्षकांनी परामर्श घेतलेला दिसतो. (जी. ए. कुलकर्णी)
- 'काजळमाया' वरील परीक्षणात चंद्रकांत बांदिवडेकर मात्र आशयाची वैविध्यपूर्णता, मौलिकता व भाषा यांचे एकरुपत्व यावर लक्ष केंद्रित करतात. त्या संदर्भात घटनांची हिस्तरीय रचना, पात्रांची शोकात्म व्यक्तीमत्वे, कथांची रुपकात्म रचना या घटकांची चर्चा करतात.
- 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार विस्तृत कालअवकाश, व्यमित्र आशयसूत्र व एखाद्या पोटसमूह –संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर घडणारा वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकारांचे विस्तृत रुप हे विस्तृत रचनाही आढळते. साहजिकच तिच्या रुपरचेनेप्रमाणे तिची विस्तृत समीक्ष 'पत्रिके'तील परीणामध्ये दिसते.
- भालचंद्र नेमाडे 'बिढार', 'जरीला' या कांदबऱ्यावरची परीक्षणे जीवनाच्या मूलभूत प्रश्नांशी भिडणाऱ्या कांदबऱ्या म्हणून झाल्याचे दिसते.
- वसंत पळशीकर पाच कांदबऱ्यांचे परीक्षण वाचकांना दिशादर्शक ठरणारे आहे. 'पुत्र', 'अदेशी', 'ऑक्टोपस', 'अरे संसार, संसार', 'मी, मी, मी नटराज' या पाच कादंबऱ्यांचे परीक्षण परखड शब्दांत केले आहे.
- 'पत्रिके'मध्ये आत्मचरित्रावतरी जी परीक्षणे झाली आहेत. त्यामध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची दखल घेतल्याचे दिसते. या आत्मचरित्रातून त्या कळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन आपल्याला समजते.
- आत्मचरित्र समीक्षा यावरील परीक्षणात व्यक्ती हा केंद्रबिंदू, समाजस्थिती, स्वजाणिवेचा स्त्री आत्मचरित्रातील अनुक्रम अशी वैशिष्ट्ये आढळतात.
- 'पत्रिके'ने 'नाटक' या वाङ्मय प्रकाराचीही दखल घेतल्याचे दिसते. तुलनेने हे प्रमाण अल्प असले तरी त्या त्या काळातील महत्वाच्या नाटकांची नोंद घेतल्याचे दिसते.
- प्रवासवर्णनावरती ही 'पत्रिके'मध्ये अल्प परीक्षणे आहेत. पण हीच परीक्षणे वाचकांच्या

ज्ञानानमध्ये भर घालणारी आहेत. त्या–त्या ठिकाणची सामाजिक, राजकिय, धार्मिक, सांस्कृतिक माहिती देणारी आहेत. वाचकांमध्ये कुतूहल निर्माण करणारी आहेत.

- ‘पूर्णाचलाची मुशाफरी’ या श्रीपाद जोशी यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनाचे कुसूम पटवर्धनांनी केलेले परीक्षण आसाम, मणिपूरची भाषा, तेथील साहित्य आणि साहित्यिकांची माहिती करुन देण्यास उपयुक्त ठरते.

**संदर्भ ग्रंथ–**


१) मराठी भाषा आणि शैली, संपा. डॉ. रमेश धोंगडे/ डॉ. अश्विनी धोंगडे, मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि., तृ. आ. १९९३. पृ. क्र. ६८.

२) बा. भ. बोरकर व्यक्ती आणि वाङ्मय, ले. मनोहर हि. सरदेसाई, गोमंतम कराठी आकादमी, पणजी, प. आ. १९९२. पृ. क्र. २०२.

३) साहित्यरुप, डॉ. दादा मोरे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १०६.

४) साहित्य शोध आणि आस्वाद, डॉ. नागनाथ हेगे, प्रतिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १५०.

५) कालमान, फ. मु. शिंदे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९८६, पृ. क्र. ९६.

६) ततैव, पृ. क्र. ९६.

७) निलीपहाट, रा. ग. जाधव, श्रीविद्या प्रकाशन, चतुर्थावृत्ती– १९९५, पृ. क्र. १३५.

८) दलित साहित्य चिकित्सा, सदा कऱ्हाडे, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. ७२.

९) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, इ.स. १८१८ ते १९९९, डॉ. वसंत बिरादार, कैलास पब्लिकेशन्स, पृ. क्र. ३६७.

१०) आर्वाचिन मराठी कवींच्या काव्याचा शोध, रोचना भडकमकर, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १५३.

११) निवडक मराठी समीक्षा, संपा–गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर, पृ. क्र. २१८.

१२) विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, संपा. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००४, पृ. क्र. ८६

१३) अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, शरद पाटील, सुगावा प्रकाशन, १९८८, पृ. क्र. २०.

१४) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, संपा–बापट प्रभाकर, गोडबोले नारायण, व्हीनस प्रकाशन, पुणे, तृ. आ. १९७३, पृ. क्र. १७८.

१५) 'तिसऱ्यांदा रणांगण' डॉ. कुलकर्णी द. भि., विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९७६, पृ. क्र. ४१.

१६) 'जाळ्यांतील चंद्र' म. वा. धोंड, राजहंस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९४, पृ. क्र. ९१.

१७) मराठी ऐतिहासिक कादंबरी:एक अभ्यास, डॉ. विभा. शहा, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र. आ. १९९९, पृ. क्र. २२५.

१८) मराठी विश्वकोश (खंड–१४), मंचकर र. बा. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पृ. क्र. ६७.

१९) साहित्य संवाद– संपा–प्रा. शैलेंद्र त्रिभुवन के. एस. पब्लिकेशन्स, पुणे, प्रकाशन वर्ष २००६, पृ. क्र. १९४.

२०) 'कोरकू पार्श्वभूमीवरील चूटपूट लावणारी हळूवार प्रेमकथा' शेखर सारडा, ग्रंथ विशेष, मेहता ग्रंथ जगत, मेहता प. हाऊस, पुणे, १९९०, पृ. क्र. २४.

२१) वाङ्मयातील वादस्थळे, वा. ल. कुर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ., पृ. क्र. १३०.

२२) मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा, चंद्रकांत बांदिवडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आर. १९९६, पृ. क्र. १०२.

२३) कथनात्मक साहित्य आणि समीक्षा, हरिश्चंद्र थोरात, शब्द पब्लिकेशन्स, प्र.आर. २०११, पृ. क्र. २३५.

२४) आस्वाद आणि आलेख, प्रा. वि. शं. चौघुले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १३४.

२५) कांदबरी संवाद : डॉ. पंडित टापरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५, पृ. क्र. ९९.

26) Encyclopedia Britanica, rol 2, London, 1764, Pg. 845.

२७) आत्मचरि मीमींसा : आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९९८, पृ. क्र. ११४.

२८) साहित्य शोध आणि आस्वाद, डॉ. नागनाथ हेगे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १४६.

२९) आदिवासी साहित्य : एक अभ्यास, वाल्हेकर ज्ञानेश्वर, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००९, पृ. क्र. ९९.

३०) शैली वैज्ञानिक समीक्षा, डॉ. रमेश धोंगडे, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे, पृ. क्र. २२७.

३१) आत्मचरित्रात्मक कादंबरी : वाङ्मयप्रकार व वाङ्मयचर्चा, डॉ. महालक्ष्मी मोराळे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१०, पृ. क्र. १५९.

३२) चरित्र–आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास, जोशी अ. म. स्नेहसवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ. आ. १९९९, पृ. क्र. १०२.

३३) पस्तुरी, कुलकर्णी द. भि. पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२, पृ. क्र. १३६.

३४) साहित्यसंवाद : संपा. प्रा. शैलेश त्रिभुवन, के. एस. पब्लिकेशन्स, पुणे, प्रकाशन– २००६, पृ. क्र. २७९.

३५) दलित आत्मकथा एक आफलन, डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे, प्रकाशन, २००८, पृ. क्र. १२६.

३६) आत्मचरित्र मीमांसा, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९९९, पृ. क्र. १३९.

३७) मराठी नाट्यसमीक्षा : डॉ. चंद्रकांत धाडे, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००६, पृ. क्र. ३९६.

३८) नाटक : रंगविष्कार आणि रंगास्वाद, डॉ. व. दि. कुलकर्णी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ., पृ. क्र. ११०.

३९) ‘नटसम्राट’ आस्वाद नि समीक्षा, प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. २००२, पृ. क्र. ३०.

४०) मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : एक सामाजिक, राजकीय इतिहास, खंड दुसरा, मकरंद साठे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २०११, पृ. क्र. ११०७.

४१) मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. क्र. १६५.

४२) समीक्षा : पहिली खेप, डॉ. अनिल सपकाळ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००८, पृ. क्र. १४५.

४३) साहित्याचे मानदंड : गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६२, पृ. क्र. १७५.

# प्रकरण पाचवे

# ‘समाज प्रबोधन पत्रिके’तील चरित्र ग्रंथावरील परीक्षणे स्वरूप

## प्रकरण पाचवे

# 'समाज प्रबोधन पत्रिके'तील चरित्र ग्रंथावरील परीक्षणे स्वरूप

### प्रस्तावना –

अर्वाचीन मराठी वाङ्मयविस्तार पाहता मराठी चरित्रवाङ्मय संख्यात्मक दृष्ट्या कमी आढळत असले तरी, हा जिवंत माणसाशी प्रत्यक्ष संबंध असणारा महत्त्वाचा लेखनप्रकार आहे. 'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये चरित्र ग्रंथावरील परीक्षणे संख्येने कमी असली तरी समाजाच्या प्रबोधनाला हातभार लावणारी आहेत. समाजाला प्रेरक ठरणारी व्यक्तिमत्वे 'पत्रिके'ने समाजापुढे आणली. सर्व वाङ्मयाचे मूळ या 'माणसात' आहे. चरित्रकृतीतून चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वाचे सजीवदर्शन  घडविण्याचा प्रयत्न चरित्रकार करत असतात. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्वाचा संदर्भासह शोध घेत स्वत:ला झालेले त्याचे आकलन कलात्मकरितीने शब्दांकित करण्याचे आव्हान चरित्रकाराने स्वीकारलेले दिसते. याचाच प्रत्यय 'पत्रिके'त झालेल्या चरित्र ग्रंथावरील परीक्षणावरून येते.

प्रसिद्ध व्यक्तिंची चरित्रे व चरित्र विषय लेखांची दखल 'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये घेतलेली दिसते. समाज सुधारणा, इतिहास, राजकरणातील मान्यवर व्यक्तिंचे जीवन व कार्यकर्तृत्वाची माहिती समाजासमोर चरित्रलेखनाच्या स्वरूपात मांडली.

अर्वाचीन काळात म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या अगदी सुरूवातीसच मराठीत मुद्रणाचा आरंभ झाला. १८१८ ला पेशवाईच्या अखेरीस इंग्रजांच्या शासनास मराठी प्रांतात सुरूवात झाली. तोवर इंग्रजी वाङ्मयाचा परिचय आपल्या मंडळींना झाला. तोवर पद्यातच रचना होत होत्या; त्या गद्यात करण्याचा विचार प्रामुख्याने यामुळेच केला गेला. १८३२ मध्ये 'दर्पण' च्या निमित्ताने वृत्तपत्रांस प्रारंभ झाला. नंतर 'शतपत्रे' आली व मुंबई विद्यापीठातून पहिले पदवीधर जसे बाहेर पडले, तसे १८६० नंतरच्या काळात मराठी गद्याबरोबरच मराठीतल्या या चरित्रलेखनास नव्याने सुरूवात झाली.

जुन्या काळी चरित्रवाङ्मय पद्यात होते. आधुनिक काळात ते गद्यारूपात आले. समाजास

बोधाच्या निमित्ताने नव्याने जाणवलेले ज्ञान द्यावे, हा विचार सुरू झाला. सत्याचे नवे रूप समजू लागले. चरित्राचा संबंध व्यक्तिजीवनाशी व त्यात प्रत्यक्ष घडलेल्या घटना–प्रसंगाशी म्हणजे सत्याशी असतो व इतिहासातही अनेक व्यक्तिजीवनांविषयीची नोंद असल्याने, प्रारंभापासून चरित्राचा संबंध इतिहासाशी जोडला गेला होता. कथा, कविता, कादंबरी, नाटक या ललित वाङ्मयाचा विकास जसा झाला, तसा तितक्या जोमाने चरित्रलेखनाचा विकास झाला नाही. चरित्रलेखनास वाङ्मयात फारसे स्थानही दिले जात नसे. परिणामत: एकोणिसाव्या शतकात, अखेरचा दहावीस वर्षांचा काळ सोडल्यास मराठी गद्यचरित्र लेखनाकडे म्हणावे तसे लक्ष दिले गेले नाही.

काहीएक वाङ्मयीन मूल्यांचा विचार लक्षात घेऊन मराठीत चरित्रलेखनाचा पहिला प्रयत्न 'मालाकार' विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केला असे दिसते. त्यांनी लिहिलेले 'डॉ. जॉन्सन' चे चरित्र या लेखन प्रकाराच्या प्रयोजनांच्या उद्दिष्टांचा विचार देते. पण तेव्हाही 'वाङ्मयीन' दृष्टीने सैद्धांतिक विचार फारसा केला गेल्याचे दिसत नाही. १९८५ च्या 'मासिकमनोरंजन' च्या लेखात रा.कृ.लागू यांनी काही स्फूट लेखन केल्याचे दिसते, पण फारसा भरीव प्रयत्न झाल्याचे आढळत नाही. 'इतिहास म्हणजे थोर पुरूषांची चरित्रे' या सूत्र–संकल्पनेत अडकलेल्या या वाङ्मय प्रकाशाकडे ना धड इतिहासाने लक्ष दिले ना वाङ्मय विवेचकांनी. चरित्रलेखन हा इतिहासलेखनाचा एक प्रकार व ती इतिहासाची सामग्री मानण्याकडची प्रवृत्ती हे कारण प्रारंभी असावे आणि म्हणूनच कदाचित त्यात 'लालित्य' न येऊ देण्याकडेही लेखकांचा–इतिहास संशोधक चरित्रकारांचा कल असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाङ्मयाची जाण असणारा चाणाक्ष आणि चोखंदळ वाचक किंवा वाङ्मयाचा अभ्यासक जेव्हा एखादा चरित्रग्रंथ वाचण्यासाठी हाती घेतो, तेव्हा हे चरित्र कोणाचे आहे याचबरोबर ते कोणी लिहिले आहे, याचाही विचार त्यांच्या मनात येतो. यामुळेच चरित्रकार हाच येथे चरित्रनायकाची निवड करणारा असल्याने, तो येथे कर्ता असतो. चरित्रनायकाविषयी उपलब्ध संशोधनांती मिळविलेल्या माहितीच्या आधारे सत्याचा शोध घेत घेत त्याचे न्याय्य व्यक्तिमत्त्व समजून उकलणारा व त्यांची सुसंगत व कलात्मक मांडणी करणारा चरित्रकार जेव्हा वाचकांना भावतो,

तेव्हा तो चरित्रग्रंथ 'दर्जाचा ठरतो, उत्तम ठरतो' चरित्रग्रंथाकडे वाचकांचा पाहण्याचा दृष्टिकोण काय असतो या संदर्भात जयंत वष्ट लिहितात, ''ऐतिहासिक संदर्भांबरोबरच साहित्याच्या अंगाने यातील काही चरित्रांतून व्यक्तिमत्वाचा शोध घेतलेला दिसतो. इतिहास आणि साहित्य या दोन ज्ञान शाखांच्या साहाय्याने हा वाङ्मय प्रकार विकसत असल्याने याकडे पाहण्याचा वाचकांचा दृष्टिकोण अन्य ललित वाङ्मयाच्यापेक्षा वेगळा असतो. येथे केवळ मनोरंजनाची अपेक्षा नसते तर व्यक्तिमत्त्वाच्या परिचयाबरोबर त्या काळाचे चित्रही तो पाहात असातो.''[१]

चरित्रात एका व्यक्तीच्या जीवनाचा वा जीवन खंडाचा कालानुसार वृत्तान्त कलात्मकतेने रेखाटत ते व्यक्तिमत्व उलगडण्याचा प्रयत्न चरित्रकार करतो व हा वृत्तांत सत्य, वास्तव आणि प्रत्यक्ष घटनांवर वा त्याविषयीच्या संशोधनावर आधारलेला असतो, अशी एक स्वरूप निर्देशन करणारी आटोपशीर व्याख्या होऊ शकते. चरित्र हा जसा व्यक्तिजीवनाचा इतिहास आहे, तसेच त्यातून सिद्ध होणारे चरित्रही एक वाङ्मयीन क्रांती आहे, हे आता लक्षात आले. परिणामी चरित्रनायकाच्या आयुष्यातील घटना-घडामोडी रेखाटताना त्याचे यथार्थ स्वभावदर्शन घडविण्याकडे चरित्रकाराचा कल होऊ लागला. ही सुरूवात लिंटन स्ट्रॅचीच्या काळापासून झालेली दिसते.

चरित्र ह्या शब्दाचा इंग्रजी पर्यायी शब्द म्हणजे Bigoraphy हा होय. Biosgraphy ह्या शब्दाची व्युत्पत्ती ग्रीक शब्द Bios म्हणजे life आणि graphier म्हणजे to write अशा दोन शब्दांच्या मिश्रणाने झालेला असून त्याचा अर्थ जीवन (चरित्र) लिहिणे असा आहे.

एममंड ग्रॉसने 'जीवनाच्या विविध प्रसंगातून आत्म्याचे वास्तव चित्रण म्हणजे चरित्र होय. ' असे म्हटले आहे. प्रा. जान्हवी संत लिहितात,''चरित्रकार कित्येकवेळा विभूतिपूजक बनणं शक्य असतं. चरित्रकार ज्या व्यक्तीला आपला चरित्रनायक बनवतो त्या चरित्रनायकात अनेक गुण पाहतो. आपला चरित्रनायक आदर्श ठरावा, यासाठी तो जीवनप्रसंगाची 'निवड' करतो. संपूर्ण चरित्र नव्हे, 'निवडक चरित्र!''[२]

ऑक्सफोर्डच्या कोशात चरित्राची व्याख्या, "the history of the life of an individual as a form of literature" अशी व्याख्या केली आहे. म्हणजे चरित्र हा एका

व्यक्तिच्या जीवनाचा इतिहासच होय. प्रा. आ.म.जोशी लिहितात, ''इतिहास या वाङ्मय प्रकारात जसे, एखाद्या राष्ट्राच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, वैचारिक इत्यादी सर्व प्रकारच्या प्रगतीचे वर्णन येते, तसे चरित्रात एका व्यक्तीच्या सर्वंगीण विकासाचे वर्णन येते.''[३]

## * संतचरित्रे –

'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये जी चरित्र ग्रंथावरील परीक्षणे आहेत त्यामध्ये 'संतचरित्रे' आहेत. येथे चरित्रनायकांचे दर्शन अलौकिक रूपात व श्रद्धा–भक्तिरूपात घडले जाते. एकदा चरित्रनायकाचे अलौकिकत्व स्वीकारले, की त्याचा 'माणूस' म्हणून विचार होऊच शकत नाही. भक्तांना आणि अभ्यासकांनाही ते अवघडच जाते. या लेखनात समाजभावनेचा, तसेच समूहमनाचा सश्रद्ध विचार चरित्रकार करताना दिसतात. 'पत्रिके'मध्ये गो.नी.दांडेकर यांनी लिहिलेल्या 'श्री.गाडगे महाराज' या ग्रंथाचे एस.एस. भोसले यांनी परीक्षण केले आहे तर स.ज.कोडोलीकर यांनी लिहिलेल्या 'लोकशंकर–श्रीशंकर' या ग्रंथाचे परीक्षण के.वा.आपटे यांनी केले आहे. श्री. आपटे यांनी या पुस्तकाचे परीक्षण करताना आद्य जगद्गुरू श्री.शंकराचार्य यांची जीवन, कार्य, तत्त्वज्ञान याचा संक्षिप्तपणे आढावा घेतला आहे. हे पुस्तक विद्यार्थी व सामान्य वाचक यांना उपयोगी असल्याचे नमूद केले आहे.

संतांनी आपल्या लेखणी–वाणीतून समाजाचे प्रबोधन केले. ते प्रबोधन पुढील काळात सर्वांनाच मार्गदर्शक ठरले. हे प्रबोधन करीत असताना त्या संतांना समाजाच्या रोषास, संघर्षास सामोरे जावे लागले होते. प्रा. श.तु. भगत लिहितात,'' प्रबोधनाचे दुसरे अंग म्हणजे प्रचलित मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार होय. मूल्यविषयक जून्या रूढ कल्पना व वैचारिक धारणा बदलत्या परिस्थितीत काहीशा निरूपयोगी किंवा जाचक होण्याची शक्यता असते. त्यासाठी विचारवंतांना नव्या मूल्यव्यवस्थेची गरज जाणवते. परंपरा आणि नवता यांच्यातील संघर्ष प्रबोधन काळात अपरिहार्य असतो. ज्ञानदेवांना, नाथांना व तुकोबांना अशाच संघर्षास सामोरे जावे लागले.''[४] वेदांतावर मराठीत ग्रंथरचना केली म्हणून एकनाथांना त्या काळच्या पंडितांचा रोष पत्करावा लागला.

संत वाङ्मयाचे सुप्रसिद्ध अभ्यासक प्रा.डॉ.शं.दा.पेंडसे यांनी लिहिलेल्या 'भागवतोत्तम

संत एकनाथ' या पुस्तकाचे वि.रा.करंदीकर यांनी परीक्षण केले आहे. भागवतधर्माचा प्रसार करण्याच्यादृष्टीने एकनाथांनी केलेल्या कामगिरीचे स्वरूप स्पष्ट करणे, असेच या पुस्तकाचे स्वरूप असल्याचे वि.रा.करंदीकर यांनी स्पष्ट केले आहे. भागवतावर टीका लिहिण्यास नाथ का प्रवृत्त झाले हे स्पष्ट करताना त्यांच्या काळात जुलमाने फसवून भोळ्या लोकांना बाटवण्याचा मुसलमानांचा उद्योग फार जोरात होता याचा उल्लेख करून 'सत्ता व संपत्तीचा अनावर लोभ, उच्च वर्णियांची कनिष्ठ वर्णियांविषयी तुच्छता, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता यांमुळे लोक परधर्मात जातात, हे सर्व दोष समजावून काढून टाकण्याकरिता नाथांनी भागवत धर्माचा अधिक प्रसार करण्याचे ठरविले आणि अंत:करणपूर्वक ठेवलेली उत्कृष्ट निष्ठा हीच भक्ती अशी सुलभ–सोपी कल्पना नामदेवांनी जनतेपुढे मांडली. ''इंद्रियाचे व्यापार अवघेचि तोडून प्रेमरस गोडी मानणारे नामदेव हे प्रेमभक्तीचे आद्य प्रवर्तक आहेत म्हणून 'भक्त शिरोमणी', 'भला भक्तराज' आणि 'पंढरी रायाचा प्रेम भंडारी' ही ज्ञानदेवांनी नामदेवांना दिलेली बिरूदे सार्थ वाटतात.''[५] असे भगत म्हणतात ते योग्य वाटते.

*** कर्मयोगामधील सामाजिक आशय:–**

श्री.गो.नी.दांडेकर यांनी लिहिलेल्या 'श्रीगाडगे महाराज' या चरित्रग्रंथाचे मार्मिक परिक्षण एस.एस.भोसले यांनी केले आहे. प्रख्यात साहित्यिक गो.नी.दांडेकर यांनी लिहिलेले 'श्रीगाडगे महाराज' हे एक रसाळ चरित्र आहे. दांडेकरांची दृष्टी श्री गाडगेबाबांच्या संदर्भात अपरंपार श्रद्धेने व्यापून उरणारी आहे. 'श्रीगाडगे महाराज' च्या लेखनामागे कमी–अधिक प्रमाणात अंधपणात जमा व्हावी अशी अवीट श्रद्धेची उत्कट भावनाच अधिकतर दिसते. 'श्रीगाडगे महाराज' मध्ये अपार श्रद्धेचा हा जागर सतत जागता आहे. मात्र चरित्रलेखक श्रद्धेने चरित्र विषयात विलीन झालले असले, माऊली गाडगेबाबांसमोर घालुनी नमस्कार दक्षस्थितीत उभे असले तरी अद्भूतरम्य चमत्कारनुसारिणी असे त्यांनी चरित्राचे स्वरूप होऊ दिले नाही. किंवा चरित्रलेखनाच्या वाङ्मयीन मूल्यांना फार धाब्यावर बसविण्याचा अट्टहासही बाळगलेला नाही, असे म्हटले आहे.

श्रीगाडगे बाबा हे अवतारी सत्पुरूष होते ही दांडेकरांची मनोमन धारणा होती, या अवतारी सत्पुरूषाजवळ 'बोध' घेण्याजोगे खूपसे होते–आहे अशी चरित्रलेखकाची तळमळीची

भावना आहे. ही भावना चरित्रलेखकाने आपल्या चरित्रलेखनात पुरेपुर उपजिली आहे. त्यामध्ये श्रद्धेच्या भावाचे दर्शन आहे. आणि समाजाच्या कर्तव्याचा निर्देश आहे. ''बाबा हे एक अमर्याद, अपार व्यक्तिमत्व होते. त्यांना संपूर्णपणे जाणून त्यांचे यथार्थ चित्रण करण्यास तेवढाच मेधावी पुरूष हवा. ती मेधा तर कपि मजपाशी नाही'' एका बाजूला विनम्र भावना. गाडगे महाराजांचे संपूर्ण जीवन म्हणजे धगधगत्या अग्निकुंडाची कहाणी' हे त्या भावनेपुढे दुसऱ्या बाजूला असलेले आव्हान आणि या पार्श्वभूमीवर गाडगेबाबांच्या अमर्याद कर्तृत्वाचा अपार कष्ट घेऊन दांडेकरांनी घेतलेला मानवी परामर्श हे 'श्रीगाडगे महाराज' चरित्राचे यत्नबळ आहे. यामध्ये जाणवणारा विशेष हा की, गाडगेबाबंच्या कर्मयोगामधील सामाजिक आशय दांडेकरांनी नेमकेपणाने टिपला असल्याने श्री. भोसले यांनी परीक्षणात विवरून सांगितले आहे.

चरित्राच्या अखेरी अखेरीस दांडेकर सांगतात; 'प्रचंड धर्मशाला बांधल्या, आंधळ्या पांगळ्यांसाठी सदावर्ते चालविली. निराश्रितांस वस्त्रे-पात्रे वाटली. बिन पाण्या देशी पाणपोयी चालविल्या, अनाथ वृद्धांसाठी झोपड्या बांधून मरेपर्यंत त्यांस सांभाळले, कसायांच्या हातून गाई सोडविल्या. गोरक्षणे काढली. दुष्काळग्रस्तास अन्न पुरविले, गरिबांची लग्न लावून दिली. निरक्षरांसाठी शाळा, प्रशाला सुरू केल्या. हजारो लाखो मद्यप्यांना व्यसनमुक्त केले....... त्यांचे उजाडलेले संसार पुन्हा मार्गी लावले...... हे जे गाडगेबाबांनी केले त्याचे चित्रण दांडेकरांनी 'श्री गाडगेमहाराज' मध्ये केले. पण जे केले त्या संदर्भात काय चालू आहे आणि काय होणे इष्ट आहे याचे गाडगेबाबांनी उभ्य केलेल्या संस्था युगाच्या अनुषंगाने ते रेखाटन मात्र करीत नाहीत. श्रीगाडगेबाबांच्या एकूण कार्याचे तो अविभाज्य भाग असूनही त्यास दांडेकर बगल देतात. कर्त्याधर्त्या माणसाला अनुयायी कोणते लाभले, ते संस्था 'संस्था' म्हणून चालवितात की त्यांची 'संस्थाने' बनवू पाहतात आणि त्या समाजाची त्याकडे पाहण्याची दृष्टी कोणती आहे. यासारख्या अनेक घटकांवर प्रकाश टाकला आहे. या भाग्यवंत कार्यकर्त्याने नुसते करून चालत नाही, तर ते जनमाणसात रूजवावे लागते. जे विसराळू समाजमनाला जाग आणण्यास कारण ठरते. दांडेकरांनी पूर्वार्धाचा सोगा चांगला धरून ठेवला आहे. पण उत्तरार्धाच्या पदराचा स्पर्श मात्र टाळला आहे. त्यामुळे चरित्राची परिपूर्णता बरीचशी उणावली असल्याचे परखड मत परीक्षणात्मक अभिप्रायात

सौम्य शब्दांत मांडले आहे.

श्रीगाडगे बाबांच्या ठायी मंत्र–तंत्र, गंडे–दोरे, भस्म,अंगारे, नमस्कार–चमत्कार इत्यादी बुवाबाजीच्या पलीकडे असलेल्या जितेंद्रिय नि:स्पृह कार्यकर्त्याचे तेजोनिधी रूप होते. त्याचे उभे उपयोजन अवघ्या जनता–जनार्दनासाठी करणे हा गाडगेबाबांचा ध्यास होता. दांडेकरांनी आपल्या चरित्रग्रंथामधून तो आकारीत करण्याचा आटोकाट प्रयत्न केल्या असल्याचे श्री. भोसले यांनी सांगितले आहे. 'श्रीगाडगे महाराज' चरित्र लेखनाचा प्रयत्न क्षीण नाही तो चांगलाच व्यापक आहे. पुढीलांना मार्गदर्शक ठरू शकेल असे त्याचे सर्वसमावेशक रूप निश्चितच आहे. चरित्रलेखकानेही 'निर्गुडीची त्रिदले' असे म्हटले असले तरी त्यामधील त्याचा विनम्रभाव, अती आदराची कोमल दृष्टी, समाजशील भावना मातीतून कोंब उगवावेत इतक्या नैसर्गिकपणे गाडगेबाबांच्या अनंतस्पर्शी गुणांची उकल करून दाखविण्यात चरित्रलेखक यशस्वी झाल्याचे भोसले स्पष्ट करतात. श्रीगाडगेमहराज हे एक अपार व्यक्तिमत्व होते. या व्यक्तिमत्वाच्या ठायी चरित्रलेखकाचा श्रद्धेचा भाव ध्यानात येतो. चरित्रविषयीच्या संदर्भात काही चमत्कारांचे वर्णन यावे हे अपरिहार्य तसे ते ठरते. 'श्री. गाडगेमहाराज' मध्ये आले आहे. अर्थात चमत्कारांची संगती उकलून दाखविलेली नाही. 'श्री. गाडगेमहाराज' हे अवतारी पुरुष हे चरित्र लेखकाचे त्यावरील उत्तर आहे. त्यामुळे चरित्रलेखनाच्या शास्त्रीयतेला थोडाफार बाध येतो. तो चूकत नाही, असे परखड मत भोसले यांनी मांडले आहे. ''श्री संत गाडगेबाब त्याच नि तसल्याच जातीचे नि मातीचे चालू घडीचे महान क्रांतिकारक 'साधू' आहेत. पण त्यांना कोणीही साधू, संत, महाराज म्हटलेले खपत नाही.''[६] हे श्री. केशव सीताराम ठाकरे यांनीही आपल्या चरित्रात नमूद केले आहे.

*** ऐतिहासिक चरित्र –**

महाराष्ट्राची प्रेरणा व मराठा समाजाचा आदर्श या रुपातच मराठी माणूस शिवछत्रपतीकडे पाहतो. त्यांच्याविषयी काही वेगळे लिहिले गेले, तर महाराष्ट्रात संतापाची लाट पसरते व तीव्र आंदोलनामुळे अवघड परिस्थिती निर्माण होते. महाराजांची अनेक अभ्यासपूर्ण चरित्र याही काळात लिहिली गेली आहेत. पण औरंगजेबाचे एकही चरित्र लिहिले गेले नव्हते. पण रवींद्र गोडबोले यांनी 'औरंगजेब : शक्यता आणि शोकान्तिका' हे चरित्र लिहिले आणि ती कमी पूर्ण

केली. काही काही विषय मराठी माणसाला अतिशय अप्रिय वाटत आलेले आहेत. अशाच एका अप्रिय विषयाला रवींद्र गोडबोले यांनी आपल्या 'औरंगजेब : शक्यता आणि शोकान्तिका' या चरित्रात हात घातला आहे. या चरित्रग्रंथाचा चरित्रनायक औरंगजेब आहे. हा मराठी माणसाच्या दृष्टीने खलनायक आहे आणि तो केवळ अप्रियच नव्हे तर शत्रूस्थानी आहे. या माणसाने शिवाजी महाराजांशी सतत वैगर केले. त्यांच्या विनाशाचे रत्न केले आणि संभाजी राजांना अत्यंत क्रूरपणे, हालहाल करुन मारले हे मराठी माणूस आजही विसरलेला नाही. अशा खलनायकाचे चरित्र गोडबोले यांनी लिहिले आणि म. डी. माटे यांनी त्यांचे मार्मिक परीक्षण केले.

*** औरंगजेब–प्रेरणा, भूमिका, बलस्थाने:–**

वास्तविक औरंगजेबाचा महाराष्ट्राशी जितका निकटचा संबंध आला तितका दुसऱ्या कोणत्याही दिल्लीच्या इस्लामी सत्तेचा आला नाही. याला अपवाद फक्त एकच तो म्हणजे महमद तुघालकाचा. पण तो दख्खनमध्ये वीस वर्षे असला तरी दिल्लीला परत गेला. दिल्लीचे साम्राज्य दख्खनवर प्रस्थापित करण्याचे अपूरे स्वप्न सोडून औरंगजेब १६३८नंतर बराच काळ शहाजहानचा दख्खनवरील सुभेदार होता. सतराव्या शतकाची शेवटची दोन दशके आणि अठराव्या शतकाचे पहिले दशक महाराष्ट्राचे राजकारण, महाराष्ट्राचा इतिहास या एका माणसाभोवती फिरत राहिला. त्यांच्या सेनापतीचे प्रयत्न सतत जारी असले तरी यशापयशाचे चक्र सतत फिरत राहिले. राजकारणाचे सूत्र त्याच्याच हातात राहिले. इतका सततचा संबंध असणाऱ्या माणसाचे चरित्र, व्यक्तिमत्व समजून घेईल आणि समजावून सांगेल असे एकही पुस्तक एकाही मराठी लेखकाने, संशोधकाने लिहिलेले नाही, अशी खंत माटे यांनी परीक्षणात व्यक्त केली आहे.

औरंगजेबाचा जास्त खोलात परिचय करुन द्यावा, त्याच्या प्रेरणा, त्याची उद्दिष्टे जाणून घ्यावीत त्याच्या बलस्थानाची आणि मर्यादांचे आकलन करुन घ्यावे असे एकही मराठी इतिहासकाराला वाटलेले नाही, याबाबत श्री. माटे यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. वास्तविक जो उपक्रम रुढ अर्थाने इतिहास संशोधक असणाऱ्यांनी करायला हवा होतो, ती असे संशोधक नसणाऱ्या रवींद्र गोडबोले यांनी सुरु केला आहे. या तमोयुगाची समीक्षा करण्याच्या उपक्रमात विवेचनासाठी त्यांनी जो पहिला विषय निवडला आहे. तो एकाच अर्थाने तमोयुगाचा प्रातिनिधीक

असा औरंगजेब कट्टर धर्मप्रिय, किंवा धर्मवेडा, हिंदूचा द्वेष, त्याची मानहानी, इस्लामविजय यांचे मूर्तरुप म्हणजे आलमगिर! त्याचे चरित्र सांगून, त्याच्या कारकीर्दीचा परिणाम, त्याचा अर्थ समजावून घेऊन त्यातून भारताच्या आजच्या वास्तवाचं आकलन करुन घेण्याची गोडबोले यांची भूमिका अतिशय स्वागतार्ह असल्याचा अभिप्राय श्री. माटे यांनी दिला आहे.

गोडबोले यांच्या ग्रंथाचे साधारणपणे दोन भाग पडतात. त्यातील मोठा भाग हा चरित्र कथनाचा आहे, आणि दुसरा लेखकाने केलेल्या औरंगजेबाच्या मूल्यमापनाचा. चरित्रकथनात त्याच्या राज्यरोहणापासून चरित्र कथनात मृत्यूपर्यंत घडत गेलेल्या घटनांची नोंद आहे. चरित्रनायकाविषयी आपली भूमिका लेखकाने मनोगतात सांगितली आहे. 'एक सम्राट म्हणून औरंगजेब तत्कालीन हिंदुस्थानातील सर्वात सामर्थ्यवान पुरूष होता. आपल्या सामर्थ्याचा वापर करण्याच्या हरतऱ्हेच्या शक्यता त्याला प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी उपलब्ध होत्या. त्यावर मर्यादा असलीच तर ती इस्लामच्या उपदेशाचे कठोर आचरण करण्याची होती, आणि ही मर्यादा त्यानेच स्वत:वर लादून घेतली होती. त्या एकाच मर्यादामुळे अनेक शक्यतांचा संकोच झाला इतकेच नव्हेर तर अनेक शोकांतिकांना सुरूवात झाली. या शोकांतिका औरंगजेबाच्या वैयक्तिक आणि राजकीय आयुष्यापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत तर त्याच्या काळ्या सावल्या संपूर्ण हिंदूस्थानच्या इतिहासावर पसरल्या गेल्या असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे.

शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या तावडीतून आग्राहून सुटका करून घेतली; या अपयशाचा औरंगजेबावर मोठा परिणाम झाला, तो अधिक दैववादी बनला आणि त्याची धार्मिक असहिष्णुता वाढत गेली असे मत लेखकाने व्यक्त केले आहे. शिवाजीची भूमिका स्वधर्म व स्वसंस्कृती यांच्या रक्षणाची होती. म्हणजे औरंगजेब–शिवाजी संघर्ष प्रामुख्याने धार्मिक–सांस्कृतिक होता असे एकूण प्रतिपादनाचे सूत्र असल्याचे श्री. माटे स्पष्ट करून सांगतात. सतराव्या शतकातील आर्थिक, सामाजिक परिस्थितीकडे लेखकाचे दुर्लक्ष झालेले नाही. विशेषत: तंत्रज्ञानातील स्थितीशीलता व तिचा समाजावर झालेला परिणाम यांचे लेखकाने केलेले विवेचन लक्षणीय आहे. औरंगजेबाचे हे चरित्र म्हणजे त्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे असे लेखक म्हणतात. गोडबोले यांना वर्तमानाचे तीव्र भान आहे आणि औरंगजेबाच्या धर्मनिष्ठेच्या आजच्या

भारतावर होत असलेल्या परिणामाचे त्यांनी परखड विवेचन केले असल्याचे श्री.माटे यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

औरंगजेबाच्या शोकांतिकेबद्दल डॉ. जदूनाथ सरकार लिहितात, ''औरंगजेबाचे जीवन म्हणजे एक दीर्घकालीन शोकान्तिका होती. एखाद्या एकाकी माणसाने अदृश्य परंतु अटळ नियतीविरूद्ध हताशपणे दिलेल्या संघर्षाची कथा होती. एक प्रचंड मानवी प्रयत्न तत्कालीन निरनिराळ्या प्रवाहांमुळे कसा हतबल झाला याची ती कहाणी होती. पन्नास वर्षाच्या दीर्घ आणि कष्टप्रद राजवटीचा शेवट प्रचंड अपयशातून घडून आला. आणि तरीसुद्धा हा बादशहा बुद्धिमत्ता, चरित्र आणि दीर्घोद्योग ह्या गुणात आशियातील सर्वश्रेष्ठ सम्राट होता. इतिहासातील हा महान शोकान्तिका एखाद्या निर्दोष नाटकाप्रमाणे जीवनाच्या रंगभूमीवर क्रमाक्रमाने घडत गेली.''[७] श्री. माटे यांनी रवींद्र गोडबोले यांनी लिहिलेल्या 'औरंगजेब: शक्यता आणि शोकान्तिका' या चरित्रग्रंथाचे केलेल्या परीक्षण वाचकांना या ऐतिहासिक चरित्रनायकाकहे पाहण्याची नवी दृष्टी देते.

*** राजकारणी आणि क्रांतिकारक यांची चरित्रे:–**

स्वातंत्र्यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या राजकीय नेत्यांची प्रेरणादायी व वाचनीय चरित्रे यांची परीक्षणे 'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये झालेली दिसतात. बी.आर. नंदा यांनी लिहिलेल्या गोखले चरित्राचे व.भ.कर्णिक यांनी परीक्षण केले आहे. गोखले यांचे चरित्र सांगता–सांगता नेमस्त पक्ष आणि इंग्रज राज्य यांच्यातील संबंधाचाही लेखकाने ऊहापोह केल्यामुळे गोखलेकालीन भारतीय राजकारणावरही चांगला प्रकाश पडतो. हे अर्थात अटल होते, कारण गोखले यांचे संबंध जीवन राजकारणमय होते. त्यांच्या जीवनाचा पट उलगडायचा म्हणजे तत्कालीन राजकारणाची कथा सांगायची असाच त्याचा अर्थ होता,असे कर्णिकांचे स्पष्ट मत आहे मवाळ म्हणून त्यांची हेटाळणी करणाऱ्या जहाल जवळही आधिक परिणामकारक असा कार्यक्रम नव्हता असे श्री.नंदा यांचे मत आहे. टिळक व गोखले यांच्या भूमिकेची तुलना करून ते त्यांचा हा मुद्दा सप्रमाण सिद्ध करतात. पहिल्या महायुद्धांच्या अंतानंतर इंग्रज सरकारने जो सुधारणांचा मसुदा तयार केला त्याच्याशी टिळकांनी स्वीकारलेले प्रतियोगी सहकाराचे धोरण गोखले यांच्या धोरणांशी बरेचसे मिळते–जुळते होते. सकल्पित सुधारणांचे कायद्यामध्ये रूपांतर होण्यापूर्वीच गोखले यांचे

देहावसान झाले व टिळकही सुधारणा कायद्याची अंमलबजावणी झालेली पहायला जगले नाहीत. आणि नंतर सुरू झालेल्या गांधीयुगात जहाल टिळकांचे बहुतेक सारे अनुयायी मवाळ ठरले अशी इतिहासाची साक्ष आहे. या घटनेवरूनही टिळक-गोखले कालीन जहाल-मवाळांमध्ये तत्त्वांचा फरक नव्हता हा श्री.नंदा यांनी उपस्थित केलेला मुद्दा चांगला सिद्ध होतो.

लॉर्ड हार्डींग हा त्यातल्या त्यात भारतीयाबद्दल सहानुभूती बाळगणारा व्हाईसरॉय १९१२ च्या एका पात्रात श्री.गोखले यांच्याबद्दल लिहितो, ''भारतातील इतर कुणाही माणसापेक्षा मला गोखलेबद्दल अधिक अविश्वास वाटतो. कारण आपल्या चुकांसाठी तो टपून बसलेला आहे आणि धीराचा खेळ कसा खेळावा हे जाणणारा तो एकटाच भारतीय आहे,'' इंग्रजी लोकशाहीच्या दरबारात भारताचा वकील म्हणून त्यांनी जे काम केले त्याने त्यांचा वैयक्तिक नावलौकिक तर वाढलाच पण भारताचे नावही उजळू लागले. या कामाने त्यांनी भारताला अनेक मित्रही मिळवून दिले. या कामाचे चरित्रामध्ये विस्तृत व सुरेख वर्णन असल्याचे कर्णिक यांनी परीक्षणात नमूद केले आहे. भारताच्या राजकीय जडणघडणीत नामदार गोखले स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. वसंत पळशीकर, ''आधुनिक भारताच्या प्रारंभकालीन राजकीय जडणघडणीत, उपक्रमांना नामदार गोखले यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. विधायक स्वरूपाच्या आधुनिक भारतीय प्रबोधन युगाचे ते प्रणेते नसले तरी महत्त्वाचे पाईक, प्रतिनिधी आणि प्रवक्ते आहेत.''[८]

गोखले आदि नेमस्त पुढाऱ्यांना इंग्रजी लोकशाहीबद्दल जे प्रेम व आदर वाटत होता तो भारताच्या प्रश्नांचा ती सहानुभूतीपूर्वक विचार करील या केवळ स्वार्थी हेतूने नव्हता. त्यांना लोकशाहीबद्दल जिव्हाळा होता व पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल प्रेम होते. प्रचलित जगात त्याचे उत्कृष्ट दर्शन इंग्रजी समाजात घडते म्हणून त्या समाजाबद्दल त्यांना आपलेपणा वाटे. स्वातंत्र्य व समतावादी आणि लोकशाही मूल्ये मानणारा तसला समाज भारतामध्ये निर्माण व्हावा अशी त्यांची उत्कट इच्छा होती म्हणूनच इंग्लंडबरोबर जुळलेले नाते तुटू नये असे त्यांना वाटत असे. त्यांच्या या भूमिकेचा जहाल मंडळींनी विपर्यास केला. हा प्रचार काही काळ प्रभावी ठरला. गोखले राजकारण व समाजकारण शिकले ते न्या. रानडे यांच्या पायाशी बसून पुढे ते अनेक क्षेत्रात आपल्या बुद्धीने व कर्तबगारीने चमकले पण रानडे यांचे ऋण ते कधीही विसरले नाहीत ही

गुरुशिष्य परंपरा व प्रत्येक प्रश्नांचा साद्यंत अभ्यास करण्याची पद्धत पुढे विलीन झाली. गांधी गोखले यांना गुरु मानत. पण गांधी युगात तर विद्या आणि अभ्यास यांचे महत्व फारच कमी झाले. नेमस्त पुढाऱ्यांच्या युगात यांचे महत्व फारच कमी झाले.

श्री. नंदा यांनी गोखले चरित्रमध्ये गोखले यांच्या लहानपणापासून तो अगदी शेवटच्या क्षणापर्यंतचा जीवनपट यथातथ्य उभा केला आहे. त्यामध्ये त्यांच्या मानहानीचे तसेच त्यांच्या विजयाचे ही वर्णन कसे केले आहे, यावर श्री. कर्णिक यांनी प्रकाश टाकला आहे. १८९७ मधील माफी प्रकरण हा त्यांच्या विरोधकांनी त्यांनी सार्वजनिक जीवनातून हाकलून लावण्याचा चंग बांधला होता. हळव्या स्वभावाच्या गोखले यांना त्या लोकनिंदेमुळे फार मनस्ताप सहन करावा लागला होता. पण या प्रसंगातून बाहेर पडून ते कायदेमंडळात शिरले. तेव्हापासून त्यांचे तेज वाढतच गेले. ना. ह. कुलकर्णी लिहितात, ''गोखले यांनी खरे धैर्य दाखविले ते या प्रकरणानंतरही सार्वजनिक कार्याला पुन्हा जोमाने वाहून घेण्यात त्यांचा स्वभाव लक्षात घेता त्यासाठी त्यांना फार कष्ट पडले असावेत. पण या क्षमायाचनेची भरपाई केवळ देशसेवेला तनमनधनाने वाहून घेण्यानेच होणार आहे आणि तशी सेवा करणे हेच आपले जीवित कार्य असा त्यांनी दृढनिश्चय केला. विषण्ण मनाने केलेल्या या उदात्त निश्चयात गोखलांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासावर फार मोठा प्रकाश पडतो.''[१] टिळकपंथीय जहालांच्या विरोधाला व निंदेला त्यांना जन्मभर तोंड द्यावे लागले. ते राष्ट्रसभेचे अध्यक्ष झाले. पण तेथेही त्यांना जहालांचा विरोध झाला आणि तीन वर्षानंतर राष्ट्रसभेतच मवाळ व जहाल अशी फूट पडली. ही फूट गोखले यांना आपल्या आयुष्यात साधता आली नाही. त्यामुळे जहालांचा त्यांच्यावरील रोष शेवटपर्यंत कायम राहिला. ते मेल्यानंतर मात्र टिळकांनी त्यांना आपल्या गौरवपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली. या सर्व घटनांचे श्री. नंदा यांनी केलेले वर्णन वस्तुनिष्ठ व मनोवेधक असल्याचे श्री. कर्णिक यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

राजकारणाचे क्षेत्र त्यांनी निवडले ते मानमरावर्तीच्या लोभाने नव्हे तर देशांवरील उत्कट प्रेमांमुळे. राजकारणात त्यांनी खोल अभ्यासाची व निरपेक्ष सेवेची परंपरा निर्माण केली. सामान्य जनता त्याकाली राजकारणात नव्हती. तिला राजकारणात ओढण्यासाठी व तिच्या हितसासाठी

राजकारण चालावे म्हणून त्यांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला. ते राष्ट्रवादी होते, पण त्यांचा राष्ट्रवाद निधर्मी, विवेकवादी व मानण्यावर निष्ठा ठेवणारा होता. गोखले यांच्या गुणवैशिष्ट्यांची या परीक्षणात चांगली माहिती मिळते.

*** गांधी चरित्रातील उणीव:–**

'मेकिंग ऑफ द महात्मा' या चंद्रन डी. एस. देवनसेन यांनी लिहिलेल्या चरित्राचे अ. के. भागवत यांनी परीक्षण केले आहे. डॉ. देवनसेन यांनी गांधीजींच्या पहिल्या ४० वर्षासंबंधीच्या ह्या ग्रंथात हे वेगवेगळे वृत्तांत तपशीलवार देण्याचा उपक्रम केला आहे. भिन्न–भिन्न सामाजिक, राजकीय वा सांस्कृतिक परिसर नोंदण्याची त्यांची प्रयत्नशीलता मोठी दिसते. पण अनेक वेळा ती इतिहासाची नीरस जंत्री होते व त्यातून स्वभाव व व्यक्तिमत्वाच्या पैलूवर पडलेला प्रकाश अंधूक व अस्पष्ट वाटतो, असे श्री. भगवत यांनी परीक्षणात आपले मत मांडले आहे, ते योग्य वाटते. मात्र ह्या प्रदीर्घ तपशीलातून काही वेळा मनोरंजन तर काही वेळा मोठे उद्बोधक पैलू ध्यानात येतात, घटनांवर वेगळा प्रकाश पडतो. ह्या दृष्टीने काठेवाडीतील सुधारणेच्या चळवळी, जैनांचा तेथील समाज व सांस्कृतिक जीवनावर पडलेला त्यांचा प्रभाव, ख्रिस्ति धर्माची गांधीजींशी काडेवडामध्ये झालेली ओळख व नंतर आफ्रिकेत आलेला संबंध ह्याबद्दलची माहिती उद्बोधक असल्याचे भागवत यांनी परीक्षणात म्हटले आहे.

श्री.भागवत यांनी परीक्षणात एका उणीवेकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. मा. गांधीच्या आजवर लिहिलेल्या बहुसंख्य चरित्रात एक उणीव आढळते ती म्हणजे त्यांच्या बालपणातील व आफ्रिकेतील वृत्तांतात त्यांनी स्वत:च्या आत्मवृत्तांत लिहिलेल्या हकीकतीवर दिलेला भर. ह्यातील वृतांत जसाच्या तसा देऊन स्वतंत्र निष्कर्ष अथवा संशोधन करण्याचे चरित्रकार टाळतात. वास्तविक आत्मवृत्त हे विश्लेषण व चिकित्सेशिवाय मान्य करणे हे चुकीचे होय. हे आता एरिकसनसारख्या मनोविकलन शास्त्रज्ञानी प्रस्थापित केले असल्याचे भागवत सांगतात. एक अर्थाने आत्मवृत्त हे अडचणीचे ठरते आणि दुसऱ्या दृष्टीने सहाय्यकसुद्धा असते व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचा काळ जर समजून घ्यायचा तर केवळ आत्मवृत्तातील वर्णिलेली परिस्थिती, मन:स्थिती आणि निष्कर्ष यावर भर न देता वस्तुनिष्ठ दृष्टीने वेगवेगळ्या वृत्तांताचा विचार करणे

आवश्यक असल्याचे मत भागवत यांनी मांडले आहे.

*** नवतरूणांसाठी उपयुक्त चरित्र:–**

'गांधी: ए लाईफ' या कृष्णा कृपलानी यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाचे अ.के.भागवत यांनी परीक्षण केले आहे. हे चरित्र नवतरूणांसाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ह्या तरून पिढीला गांधीजींच्या कार्याच्या महत्तेची फारशी ओळख नाही. त्यामुळे अशा सरळ, सुलभ आणि सुरस इंग्रजी चरित्राची आवश्यकता होती. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा आणि कार्याचा हा केवळ परिचय आहे. चरित्रकाराला काही नव्या घटना व साधनसामग्री सापडली आहे असे नव्हे, त्याला गांधी कार्य वा व्यक्तिमत्व यांवर स्वत: असे खास भाष्य करावयाचे नाही. अथवा नवी संगती–उपपत्तीही लावायची नाही. गांधीवरच्या प्रेमादराने प्रेरित होऊन त्यांनी ही कहाणी मोठी रंगवून सांगितली असल्याचे भागवत यांनी स्पष्ट करून सांगितले आहे. लेखकाने ह्या चरित्रात पूर्वीच्या चरित्रकारांचा उपयोग किती कौशल्याने केला आहे हे जाणकार गांधी अभ्यासकाला पदोपदी जाणवते. आणि पुन: प्रत्ययाचा आनंद घेता येतो, हे सर्वसूरींचे ऋण प्रामाणिकपणे मान्य करून त्यांच्या चरित्रग्रंथातील अवतरणे चपखलपणे देण्याचा उपक्रम ह्या ग्रंथात ठायी ठायी दिसतो. विशेषत: गांधीजींचे पहिले चरित्रकार रेव्ह. जोसेफ डोक यांनी १९०९ साली लिहिलेल्या चरित्राचा, मिसेस पोलाक यांनी वर्णिलेल्या गांधीस्मृतींचा (१९३१) यथायोग्य गौरव या चरित्रात दिसतो. तसाच सार्थ गौरव रोमा रोलॉ ह्यांनी १९२४ साली लिहिलेल्या महत्त्वपूर्ण चरित्रग्रंथाचा हे मुद्दाम उल्लेखनीय यासाठी की, ह्या जुन्या प्रमाणभूत अशा ग्रंथाचा विशेषत: गांधीजींच्या आफ्रिकेतील कार्यासाठी आधार होण्यास, मध्यंतरी अनेक वर्षे चरित्रकार विसरले होते आणि केवळ गांधीजींच्या आत्मकथेवर आधारून त्यांनी चरित्रलिखाणाचा प्रयत्न केला होता. परंतु आत्मचरित्रात गांधीजी स्वत:कडे काही एका विशिष्ट नीतीवादी, बोधवादी दृष्टीने पाहून स्वत:बद्दल थोडी अधिक कठोर भूमिका घेतात. हे आता मान्य झाले आहे. केवळ आत्मचरित्रकार भर दिलेली चरित्रे आता अपुरी, एकांगी भासतात तसे ह्यात झालेले दिसत नाही, असे भागवत यांनी परीक्षणात नमूद केले आहे. म्हणजे फक्त आत्मचरित्राचा आधार चरित्र लेखनासाठी पुरेसा नाही. पण एक गोष्ट मात्र जाणवते. भाष्य करायचे नाही आणि घटना व कार्य सरळ सरळ सांगायचे असे

कितीही म्हटले तरी त्यात मूल्यांकन येतेच आणि हे मूल्यांकन न पुरेशा साधकबाधक तत्त्वचर्चेशिवाय आले तर ते अपुरे, असमाधानकारक होते. उदाहरणार्थ गांधीजींच्या 'हिंद स्वराज्य' (१९७८) या ग्रंथात अगदी टोकाला जाऊन केलेला यंत्रनिषेध व सर्व पाश्चात्य संस्कृतीच्या विरूद्ध सोडलेले अस्त्र समर्थनीय कसे ठरते? आधुनिक मनाच्या कृपलांनी गांधीजींचे ह्या पुस्तकातील विवेचन वादपटुतेने आलेले काहीसे ओबडधोबड आणि बरेचसे स्वमताबद्दल अत्याग्रही भासते. पण 'सुदैवाने त्यांचे जीवन त्यांच्या शब्दांपेक्षा श्रेष्ठ होते, 'कृती उक्तीपेक्षा सरस होती आणि ते जगले तर्ककर्कशतेपेक्षाही रचनात्मक व विधायक दृष्टीने.'' अशी लेखकाने पुस्ती जोडली आहे याकडेही भागवत वाचकांचे लक्ष वेधतात. नवथर वाचकाला गांधी चरित्रात रस उत्पन्न करण्याचे कार्य मात्र हे चरित्र चांगल्या तऱ्हेने करते हे त्याचे यश आणि प्रगत अभ्यासकापुढे प्रश्नचिन्ह निर्माण करणे असा मार्मिक अभिप्राय नोंदवला आहे.

*** धोपट चरित्र:–**

'इन फ्रीडम्स क्रेस्ट' या एन.जी.जोग यांनी लिहिलेल्या चरित्राचे वसंत पळशीकर यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. श्री.एन.जी.जोग यांनी नेताजींचे लिहिलेले चरित्र साधे, सरळ आहे. सुभाषबाबूंच्या चाहत्यापैकी ते एक असावेत ही गोष्ट लपून राहत नाही. हा त्यांच्या लेखनाचा मोठा गुण म्हटला पाहिजे. नेताजींच्या व्यक्तिमत्वाची उकल करणारे, त्यांच्या विचाराचे विश्लेषण करणारे व त्यांच्या भूमिकेची व कार्याची चिकित्सा करणारे चरित्र लिहिले जाणे आज आवश्यक आहे. त्यादृष्टीने पाहिल्यास मात्र जोग यांच्या चरित्राने समाधान होत नाही. त्यांचे चरित्र धोपट असल्याचा मार्मिक अभिप्राय वसंत पळशीकर यांनी परीक्षणात नोंदवला आहे.

वास्तविक पाहता चिकित्सिक लेखनास नेताजींचे व्यक्तिमत्व, विचार व कार्य फार अनुकूल आहे. राजेंद्र प्रसादांप्रमाणे त्यांनी गांधीचा केवळ अनुनय केला नाही. काँग्रेसमध्ये गांधीचा प्रभाव सर्वकष होता त्या काळात त्यांनी गांधीचे नेतृत्व झुगारून देण्याचा निकराचा प्रयत्न केला. गांधींचा विरोध असतानाही त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक दुसऱ्यांदा लढविली, व ते त्यात यशस्वी झाले. पण यशस्वी होऊनही त्यांना स्पेशल पराभव पत्करावा लागला. केवढे मोठे नाट्य या घटनेत दडलेले आहे. विश्लेषणास किती अर्थपूर्ण संधी आहे! पण जोगांना संधीचा

पुरेपुर लाभ उठवता आलेला नाही, असे परखड मत पळशीकर मांडतात. ते जाणकार वाचक संशोधकांनाही जाणवते.

हिटलरच्या जर्मनीशी, समाजवादी जपानशी हात मिळवणी करून आझाद हिंद फौजेची उभारणी त्यांनी केली. ही देखील एक अत्यंत वादग्रस्त कृती होती. नेताजींचे हेतू शुद्ध होते याविषयी निदान भारतीयांना शंका नाही. पण फॅसिस्ट सत्तांशी हातमिळवणी करून आपणास स्वातंत्र्य हस्तगत करता येईल असे त्यांना वाटू शकले यातच नेताजींच्या व्यक्तिमत्वातले न्यून प्रकट होते. त्याची चिकित्सा केल्याशिवाय नेताजींच्या व्यक्तिमत्वाची उकल होऊ शकत नाही, असे वसंत पळशीकरांना वाटते. देशमंधू चित्तरंजन दासांच्या अकाली मृत्यूमुळे १९२५ साली अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे बंगाल काँग्रेसमधील दास गटाचे नेतृत्व चालून आले. दासांना गांधींचे सत्याग्रहाचे, आत्मक्लेशाच्या विचारावर आधारलेले राजकारण पूर्णपणे कधीच मान्य नव्हते. ब्रिटिशांच्या विरोधात लढण्यात वापरावयाचे तो इतर डावपेचांवरील एक डावपेच म्हणून त्यांची मर्यादित मान्यता होती. तर काहीही करून ब्रिटिशांना हुसकावून लावण्याची कल्पना गांधींच्या स्वराज्याच्या व्याख्येत बसत नव्हती. त्याचप्रमाणे ब्रिटिश सत्तेविरूद्धचा लढा राष्ट्रातल्या सर्व गटांना, थरांना बरोबर घेऊन लढावयाचा आहे अशीही गांधींची भूमिका होती. सुभाष बाबूंना या दोन्ही भूमिका अमान्य होत्या. डावे–उजवे अशी काँग्रेसमध्ये फूट पडली. तरी त्यांना चालणार होती, इतकेच नाही तर तसा त्यांना निकराने प्रयत्ने केला ही गोष्ट जोग यांच्या चरित्रावरून स्पष्ट होते, हे पळशीकर आवर्जून सांगतात. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या, आत्मक्लेशाच्या विरोधात जाऊन स्वत:चे नवे डावपेच निर्माण करणाऱ्या नेताजींच्या या व्यक्तिमत्वातील वेगळेपणावर, पैलूवर पळशीकर यांनी प्रकाश टाकला आहे.

१९२७–२८ ते १९३९ या कालखंडात डावी, जहाल भूमिका घेऊन सुभाषबाबूंनी केलेले राजकारण अखेर फसले याची कबूली जोगांनी दिली आहे. त्याचा दोष सर्वस्वी गांधींना देता येत नाही. याचे भान त्यांनी सांभाळले आहे. पण सुभाषबाबूंच्या पदरात पुरेपूर माप मात्र टाकलेले नाही; हे परीक्षणात वसंत पळशीकर यांनी दाखवून दिले आहे. ज्या तरून रक्ताच्या जोरावर ते जहाल राजकारण खेळले. ते तरूण स्वत: किती बेभरवशाचे होते, त्याचा प्रत्यय

स्वातंत्र्योत्तर काळातल्या बेजबाबदार डाव्या राजकारणाने आणून दिल्याचा मार्मिक उल्लेक जोगांच्या लेखनात येतो, हेही पळशीकरांनी अधोरेखित केले आहे.

नेताजी वृत्तीने फॅसिस्ट नव्हते, ते जर्मनीचे वा जपान्यांचे हस्तक कधी बनले नाहीत, यासाठी जोग पुरावा सादर करतात, पण जर्मनी व जपान या राष्ट्रातील फॅसिस्ट सत्तांचा १९३३ नंतरच्या काळातील सत्तापिपासू अमानुष व्यवहार इतका स्पष्ट व जगजाहिर असतानाही त्यांच्या मदतनीने भारतास स्वातंत्र्य मिळेल असा भ्रम नेताजींचे व्हावा, यामध्ये त्यांच्यातील न्यूनता उघडी पडते. याचे विवेचन जोगांच्या लेखनात आले नसल्याची खंत पळशीकरांनी व्यक्त केली आहे. वसंत पळशीकर या चरित्राचे परीक्षण करताना असे मत व्यक्त करतात की, जोगांचे लेखन वस्तुनिष्ठतेच्या कसोटीला फार मोठ्या अंशाने उतरते हा त्यांच्या पुस्तकाचा विशेष गुण आहे, पण असेही वाटते, की नेताजी विषयीच्या त्यांच्या प्रेमादराने त्यांच्या चरित्राला मर्यादा पडली असावी. कारण अपरिहार्य असे दोषदिग्दर्शन, उणिवांची कबूली त्यांनी टाळलेली नसली तरी त्यांच्यामागे जाऊन नेताजींच्या व्यक्तिमत्वाची, वैचारिक भूमिकेची कार्यपद्धतीची परखड चिकित्सा त्यांना आपल्या भावनेच्या पोटी केली नाही.

*** बापटांची राजकीय कारकिर्द:–**

श्री.शं.नवरे यांनी लिहिलेल्या 'पांडूरंग महादेव बापट' या चरित्रग्रंथाचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. बापटांचे सुमारे ७० वर्षाचे आयुष्य स्वातंत्र्य लढ्यात, अन्यायाविरूद्ध लढ्यात, राजकीय तुरूंगवासात, समाजसेवेत त्यांनी वेचले. या सर्व तुरूंगवासाची बेरीज वीस वर्षाहून अधिक असेल. पोलिसांच्या तगाद्यातून मुक्त झाल्यावर बापटांनी संसाराकडे लक्ष न घालता पारनेरासच अस्पृश्यांना शिकविणे व स्वत: हाती झाडू घेऊन ग्राम सफाई करणे हे काम सुरू केले. पुढील आयुष्यातही बापटांनी अनेक स्थित्यंतरे अनुभवली. पण जेथे असतील तेते सकाळी डोकीस टापशी बांधून अंगणाची, सडकेची, गटारांची, संडासांची झाडलोट व साफसफाई करणे हा नित्यक्रम तुरूंगात व बाहेर कधीच खंडित केली नाही. १९२१ ते १९३१ हा काळ मुळशी सत्याग्रह चळवळ व तीनदा मिळून आठ वर्षे तुरूंगवासात गेली. तुरूंगातून सुटल्यावर त्यांना महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष करण्यात आले. त्यानंतर राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल

बापटांना सात वर्षांची कैद झाली. १९३७ साली सुटल्यावर बापट निझाम हैदराबाद संस्थान सत्याग्रहात सामील झाले व दोन वर्षे तुरूंगात गेले. स्वातंत्र्योत्तर काळात भाववाढ विरोधी आंदोलनात बापटांनी दीड महिना कैद भोगली. संयुक्त महाराष्ट्र चळवळ व गोवा मुक्तिसंग्राम यात बापटांनी धडाडीने भाग घेतला, या बापटांच्या राजकीय चळवळीतील सहभागाचा, तळमळीचा, धडपडीचा आलेख गाडगीळ यांनी आपल्या परीक्षणामधून वाचकांसमोर मांडला आहे.

उत्कट देशभक्ती व मानवनिष्ठा हे बापटांच्या भावनेचे वैशिष्ट्य गाडगीळांनी टिपले आहे. या वैशिष्ट्यापोटीच संसाराची व शरीरसुखाची पर्वा न करता आयुष्यभर कष्ट सोसले. बापट हे अतिशय बुद्धिमान होते. मराठी, इंग्रजी, संस्कृत व हिंदी याचरही भाषांवर त्यांचे सारखेच प्रभूत्व होते. या चारही भाषेत त्यांनी केलेले काव्य भावपूर्ण, प्रसादपूर्ण व वाङ्मयदृष्ट्या उच्च दर्जाचे झाले आहे. पण विवेचकता हा गुण बापटांच्या ठिकाणी नाही. त्यांनी भाग घेतलेल्या साऱ्या चळवळी वादग्रस्त होत्या. ‘सेनापती’ पदवीला ते कधीच पात्र नव्हते, व्यावहारिक चिकित्सा, लढ्यातील डावपेच, धीर, दूरदृष्टी यातले कोणतेच गुण त्यांच्या ठिकाणी नव्हते व ते आपल्या अंगी असल्याचा आवही त्यांनी कधी आणला नाही. अतिशय संयमी, निर्व्यसनी, प्रेमळ, शुद्धचारित्र्याचे ते होते. त्यांच्या काळातील तरूणांना निष्ठायुक्त व कष्टयुक्त समाजसेवेचा व अत्यंत निर्मल चारित्र्याचा आदर्श बापटांच्या रूपाने मिळाली हीच बापटांची थोरवी. बापट हे राजकीय व सामाजिक संत होते. त्यांच्या थोरवीचा समकालीन जनमनावर जरूर तो चांगला परिणाम झाल्याचे गाडगीळ यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

अशा या थोर सत्पुरूषाचे संपूर्ण, भावपूर्ण व यथासांग चरित्र श्रीपाद शंकर नवरे यांनी फार परिश्रमाने व उत्कृष्य भाषेत लिहून मराठी चरित्र वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. बापटांच्या काळातल्या महाराष्ट्रातील महत्त्वाच्या चळवळीचा इतिहास या चरित्रग्रंथात वाचावयास मिळतो. याशिवाय बापटांचे वाङ्मय यांचे कौटुंबिक जीवन, बापटांचा स्वभाव व व्यक्तिमत्व याविषयी गाडगीळ यांनी रसाळपणे व विस्ताराने लिहिले असून हे परीक्षण वाचकांना महाराष्ट्रातील अनेक चळवळीविषयी माहिती देतोच पण बापटांच्या वादळी व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवते. तसेच त्यांची देशभक्ती व मानवनिष्ठा या बापटांच्या वैशिष्ट्यांची माहिती देते.

*** बापटांचे व्यक्तिमत्व:–**

श्रीपात शंकर नवरे यांनी लिहिलेल्या 'सेनापती' याच चरित्रग्रंथाचे ना.ग.जोशी यांनीही परीक्षण केले आहे. ना.ग.जोशी यांनी नवरे यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाचे परीक्षण करताना सेनापतींचे जीवन हा एक अखंड संग्राम होता, असा अभिप्राय व्यक्त केला आहे. सशस्त्र क्रांतीच्या प्रयोगापासून तो नि:शस्त्र सत्याग्रहाच्या आंदोलनापर्यंतचे सर्व संघर्ष मार्ग त्यांनी धुंडाळले पण हे सर्व करताना हरिशरण वृत्ती प्रधान होती. त्यांनी पुढारीपण केले, पण पुढारी राहण्याचा हव्यास धरला नाही. सर्व कार्य निष्काम वृत्तीने, अलिप्ततेच्या भावनेने केले. लेखन केले त्यातही कलादृष्टीचा बडेजाव केला नाही. चळवळी केल्या पण त्यात अडकून बसले नाहीत. अखेरच्या क्षणापर्यंत त्यांची 'स्व'तंत्र वृत्ती कायम होती. जून्या वीर वृत्तीचाच हा आधुनिक आविष्कार होता, असे अत्यंत कमी शब्दात बापटांच्या व्यक्तिमत्वाच्या विशेषांचे जोशी यांनी वाचकांना ओळख करून दिली. थोडक्यात पण अचूक वैशिष्ट्यांचा आढावा जोशींनी परीक्षणात घेतल्याचे दिसते.

*** यशस्वी चरित्र:–**

राजा मंगळवेढेकर यांनी लिहिलेल्या'कोकणचे गांधी' या चरित्राचे भा.रा.बापट यांनी परीक्षण केले आहे. 'कोकणचे गांधी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या अप्पा पटवर्धन यांचे हे चरित्र विद्यार्थ्यांसाडी लिहिले असून ते लिहिताना मंगळवेढेकर यांनी जागोजागी अप्पा पटवर्धनांच्या 'माझी जीवनयात्रा' या आत्मचरित्राचा उपयोग करून घेतल्याचे बापट यांनी नमूद केले अहे. महात्मा गांधींजींच्या नावावरून पटवर्धनांना 'कोकणचे गांधी' असे विशेषण मिळाले. महात्माजींच्या सांगण्यावरून दोन वेळा तरी पटवर्धनांना त्यांच्याजवळ कायमचे जवळ राहण्याची संधी आली होती. दुसऱ्यावेळी तर गांधीजींच्या जवळपास त्यांना स्वत:चे चिटणीस म्हणून राहावयास सांगितले होते. पण आपल्या कोकणची–रत्नागिरीची सेवा करण्यासाठी त्यांनी गांधींना नकार दिला. त्यात त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व निश्चितच दिसते.

ईश्वरभक्तीने महात्माजींच्या जीवनावरील बराच भाग व्यापलेला आहे. अप्पा पटवर्धनांची दृष्टी जास्त प्रमाणात विज्ञानाकडे झुकलेली आहे, असे निरीक्षण बापटांनी नोंदवले आहे. ते समर्पक वाटते ७७ वर्षांचे जीवन केवळ ९०–९२ पृष्ठांत बसवताना काही गोष्टींचा ओझरता उल्लेख

होणे अपरिहार्य आहे. चरित्र कित्येक ठिकाणी चांगलेच हृदयस्पर्शी झालेले आहे. पुस्तक वाचून झाल्यावर, चरित्र नायकाचे ठसठशीत व्यक्तीमत्व मनात राहून जाचे हेच त्याचे यश असल्याचे बापटांनी सांगितले आहे.

*** विस्तृत चरित्र: साने गुरूजी:–**

राजा मंगळवेढेकर यांनी 'साने गुरूजींची जीवनगाथा' हे चरित्र विस्तृत लिहिले असून ग.प्र.प्रधान यांनी त्याचे मार्मिक परीक्षण केले आहे. साने गुरूजी हा एक जगावेगळा माणूस होता. त्यांचे पन्नास वर्षांचे आयुष्य अनेक समर प्रसंगांनी व्यापून टाकले होते. उत्कटता हे साने गुरूजींच्या भावजीवनाचे वैशिष्ट्य होते आणि या उत्कटतेचे पर्यवसाना समर्पण वृत्तीत झाले होते. त्यांच्या जीवनाच्या भव्यतेचे आणि उदात्ततेचे दर्शन घडविणारे आणि त्यांच्या मनोवृत्तीचे विश्लेषण करणारे सुंदर लेख आचार्य अत्रे व नानासाहेब गोरे यांनी लिहिले आहेत. पण आजवर त्यांचे विस्तृत चरित्र लिहिले गेले नव्हते. ती कमतरता राजा मंगळवेढेकर यांच्या या चरित्राने भरून काढली, असे प्रधान यांनी परीक्षणात नमूद केले आहे, ते योग्यच वाटते.

ज्या व्यक्तीचे चरित्र लिहावयाचे त्या व्यक्तीच्या जीवनाबद्दल आत्मियता असणारा आणि त्याचबरोबर चरित्रनायकाबद्दल केवळ भावुक निष्ठा नसणारा लेखक असला तरच ते चरित्रलेखन यशस्वी होऊ शकते. साने गुरूजींच्या मृत्यूनंतर लागलीच काही दिवसांनी मंगळवेढेकरांनी चरित्र लिहिले असते तर ते कमालीचे भावुक व विभूतिपूजक झाले असते. परंतु मध्यंतरी अनेक वर्षे गेली. मंगळवेढेकरांनी जीवनाचे विविध अनुभव घेतले. खूप सोसले. खूप कष्ट केले आणि साहित्य साधनाही सतत चालू ठेवली. आपल्या समाजजीवनातील आणि राजकारणातील विविध स्थित्यंतरांमुले मंगळवेढेकर चिकित्सक बनले, असे प्रधान यांना वाटते.

चारशे पानांच्या या जीवनगाथेचे चार खंड आहेत आणि प्रत्येक खंडात साने गुरूजींच्या जीवनातील एकेक अवस्थेचे चित्रण केलेले आहे. प्रथम खंडात १८९९ ते १९२४ या साने गुरूजींच्या आयुष्यातील पहिल्या पंचवीस वर्षांची हकीकत आहे. पहिल्या खंडात जीवनस्पर्शी शिक्षक साने सर यांची ओळक मोठ्या बहारीने करून दिलेली आहे. अंमळनेरमधील हायस्कूलमध्ये १९२४ च्या जूनमध्ये शिक्षक म्हणून दाखल झाले आणि त्यांच्या मनाला साफल्य

व समाधान देणारे क्षण त्यांना गवसले, खानदेशातील साध्यासुध्या मुलांत साने गुरूजी रमून गेले. छात्रालयातील विद्यार्थ्यांवर त्यांनी आईची माया केली. कित्येकदा साने गुरूजींबद्दल प्रेम व आदर असणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांची कशी पंचायत होत असे त्या सगळ्या गोष्टींचे तपशिलवार वर्णन मंगळवेढेकरांनी गुरूजींच्या जीवनातील या पर्वाचे जिवंत चैतन्यपूर्ण दर्शन घडविले आहे. जीवनगाथेतील हा सर्वोत्कृष्ट खंड असल्याचे प्रधान यांनी परीक्षणात्मक अभिप्रायत मत नोंदविले आहे, ते समर्पक वाटते. साने गुरूजींचे संपूर्ण जीवन कारूण्याने भरलेले होते, याचे यथार्थ दर्शन या परीक्षणातून घडते असे वाटते.

अमळनेरला शिक्षण म्हणून काम करताना साने गुरूजींना अपार आनंद लाभला हे खरे. परंतु पराक्रमाची, त्यागाची नवी क्षितिजे शोधण्याचे त्यांच्या मनाला वेड होते. १९३० साल उजाडले आणि देशातील वातावरण नव्या चैतन्याने भरून गेले. १९३० साली गुरूजींनी राजकीय चळवळीत प्रवेश केला आणि आयुष्याच्या अखेरीपर्यंत हे वेड त्यांनी सोडले नाही. त्यांच्या राजकीय जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. राजकारणात मतभेद झाल्यावर काही जुने मित्र सोडावे लागतात आणि काही नवे मित्र जोडले जातात; ही प्रक्रिया मनाला तीव्र यातना देणारी असते. साने गुरूजींच्या संवेदनशील मनाला या यातना किती तीव्रतेने सोसाव्या लागल्या असतील याचा प्रयत्य वाचकांस यावयास हवा होता. परंतु तसा तो येत नसल्याची खंत प्रधान यांनी व्यक्त केली आहे.

चतुर्थ खंडातील ‘मंदिर प्रवेश’ हे प्रकरण या जीवनगाथेतील एक ठसठशीत सौंदर्यस्थळ आहे. अस्पृश्यता नष्ट व्हावी याबाबतची साने गुरूजींच्या मनातील तीव्रता, माणुसकीची भावना जागृत व्हावी यासाठी त्यांनी केलेला जिवाचा आटापिटा तत्कालीन राजकीय पुढाऱ्यांपैकी काहींचा अहंकारीपणा आणि काहींचा दांभिकपणा, सनातन्यांचा दुरागृह या सर्व गोष्टींच्या चित्रणातून मंगळवेढेकरांनी तो समर प्रसंग अतिशय प्रभावीपणे रेखाटला आहे. त्यावेळच्या वातावरणाची नेमकी कल्पना हा भाग वाचताना येतो आणि साने गुरूजींच्या व्यक्तिमत्वातील एका पैलूचे मनोज्ञ दर्शन कसे घडते यावरही प्रधान यांनी परीक्षणात प्रकाश टाकल्याचे दिसते. त्याबद्दल प्रधान यांनी त्यांना नि:संकोचपणे श्रेय दिले आहे.

सौंदर्यस्थळे या जीवनगाथेत विखुरलेली असली तरी काही प्रसंगांचे केवळ वर्णन वा निवेदन आलेले आहे, असेही मत प्रधान यांनी व्यक्त केले आहे. साने गुरूजींनी स्वत:च्या जीवनाची ज्या रीतीने अखेरी केली त्याबाबत लिहिताना लेखकाने गुरूजींच्या मनाच्या गाभ्याला हात घालायला हवा होता. परंतु मंगळवेढेकरांनी ते केलेले नाही, अशी खंत प्रधान यांनी व्यक्त केली आहे, ती यथार्थ वाटते. साने गुरूजींच्या जीवनाची अखेर मनाला चटका लावणारी अशी होती. साने गुरूजींनी जे साहित्य लिहिले ते त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग होता. आदर्शबद्दलच्या ओढीमुळे, जीवनातील दुष्टपणा, विसंगती जाणवत असूनही साने गुरूजी अनेकदा त्यांच्याकडे डोळे झाक करीत आणि आभासमय सृष्टीत स्वत:ला गुरफटून टाकीत. या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांच्या कादंबऱ्यातील बहुतेक व्यक्तिरेखा जिवंत होऊ शकल्या नाहीत. बोधवादी साहित्यातही वास्तवता असू शकते पण गुरूजींना ते जमले नसल्याचे प्रधान यांनी स्पष्ट शब्दात आपले मत व्यक्त केले आहे.

आधुनिक काळात जी चरित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यांच्यामध्ये मनोविश्लेषण करण्याचा सतत प्रयत्न असतो. मूर्तिभंजनाच्या प्रवृत्तीतून हे केले जाते, असे मानणे योग्य नाही. केवळ विभूतिपूजन किंवा मूर्तिभंजन हे वास्तवाचा विपर्यास करणारे ठरते. राजाभाऊ मंगळवेढेकरांनी सत्य कोठे दडवले नाही, आणि अतिरंजिततेची ऊब चरित्र लेखनाला येऊ नये, यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. आजकाल पौराणिक, ऐतिहासिक व काही राजकीय कादंबऱ्यातून ज्या रीतीने नायकाला सर्वगुण संपन्न केले जाते, त्या प्रमादाने मंगळवेढेकरांनी लिहिलेली ही जीवनगाथा डागाळलेली नाही. साने गुरूजींबद्दल मंगळवेढेकरांच्या मनात नितांत आदर व प्रेम असूनही साने गुरूजी शेवटी माणुसच होते, या सत्याचा विसर त्यांना पडलेला नाही; त्यामुळे साने गुरूजींच्या जीवनातील अपूर्णतेचे सूचक चित्रण विविध प्रसंगातून त्यांनी केलेले आहे. या अपूर्णतेचे समर्थन तर त्यांनी कटाक्षाने टाळले असल्याचे म्हटले आहे.

*** मातृत्वभाव प्रमुख:–**

राजा मंगळवेढेकर यांनी लिहिलेल्या 'साने गुरूजींची जीवनगाथा' या चरित्राचे ना.ग.जोशी यांनी परीक्षण केले आहे. साने गुरूजींच्या व्यक्तिमत्वात मातृत्वभाव प्रमुख होता. पण तो

आदिमातेच्या सर्वकष मातृत्वाच्या संस्कारांचा परिपाक होता. केवळ लाडकूपणाने शेळ्यामेंढ्यांची पिलेच वाढविणारा तो वात्सल्यभाव नसून 'वाघबच्चे फाकंड' तयार करणारा चिवट, निर्मितीक्षम मातृभाव होता. अनेकविध कार्याच्याद्वारे त्यांनी आपले मानवतेचे प्रेमच अविष्कृत केले.त्यात मृदू प्रकृतीची साहित्य निर्मिती होती. कठोर संघर्षाला प्रवृत्त करणारी दाहक वक्तृत्वे होती आणि दलित पतितांच्या वरील अन्याय दूर करण्यासाठी प्राणपणाला लावून पत्करलेले प्रायोपवेशनही होते. साहित्यिक-सामाजिक समन्वयासाठी केलेल्या चळवळी व स्थापलेल्या संस्थाही त्या वात्सल्यभावातच समावून गेल्या होत्या. त्यांच्यावर नव्या समतावादी मूल्यांचा जसा गाढ परिणाम घडलेला होता, तशीच त्यांच्यात जुन्या भारतीय संस्कृतीतील रक्षणीय मूल्यांविषयी आपुलकी ही होती. मृत्यूला सुंदर कल्पून आनंदयात्रेला निघावे तशा ममत्वाने त्यांनी मृत्यूला सवंगडी मानले. अनेकवेळा त्याला भेटायचा आवेग मनात उसळे आणि शेवटी त्यांनी धीरत्व धरून मृत्यूचे स्वागत केले. त्यामुळेच 'साने गुरूजी' हे नाव मराठी मनात अजुनही घुमत राहिले आहे, हे मतप्रदर्शन जोशी यांनी केले आहे.

*** अपूर्ण चरित्र-नाथ पै:-**

वासू देशपांडे यांनी लिहिलेल्या 'लोकशाहीचा कैवारी' या चरित्रग्रंथाचे देवदत्त दाभोलकर यांनी परीक्षण केले आहे. यातून नाथ पै यांच्या संपूर्ण जीवनाचे किंवा विचारांचे दर्शन होत नाही. ते झाले पाहिजे अशी उत्कंठा मात्र या ग्रंथाच्या वाचनाने जरूर निर्माण होते. वासू देशपांडे यांनी सुरूवातीलाच सांगितले आहे की, नाथांनी माझ्यावर माया केली व ती त्यांच्यावर भक्ती केली. या भावनेतूनच देशपांडे यांनी नाथांचे चरित्र लिहिल्याचे दाभोळकर यांनी म्हटले आहे. त्यातील ऋजुता, सौंदर्य, भक्तिभाव विलोभनीय आहेत. निवेदनातील या बाळबोध, प्रांजळ, निरागस वृत्तीमुळेच एरवी ज्या ठिकाणी निवेदकांच्या अहंकाराचा वास आला असता तेथे प्रेमळ भाबडेपणाच्या कौतुकाखेरीज अन्य भावना वाचकांच्या मनात येत नाहीत. या चरित्रग्रंथातील हा भाबडेपणा कसा होता हे पटवून देताना दाभोळकर समर्पक उदाहरण देतात. ते लिहितात, 'पेंद्याने श्रीकृष्णाचे चरित्र लिहिले असते तर ते असेच झाले असते. हा या चरित्रग्रंथाचा गौरव आहे. त्याचप्रमाणे या चरित्राची ती मर्यादाही आहे. यामुळे ज्या ठिकाणी वासू देशपांडे यांचा प्रत्यक्ष संबंध

आला नाही तेथील माहिती अपुरी पडते, आंतरराष्ट्रीय युवक संघटनेतील नाथ पै यांचे कार्य, दिल्लीतील कार्याचा तपशील, सेनापती बापट यांच्या उपोषणाच्यावेळी झालेले अंतर्गत वादंग, समाजवादी पक्षातील वैचारिक संघर्षात नाथ पै यांनी घेतलेली भूमिका याविषयी सविस्तर माहिती आपल्याला या चरित्रग्रंथात मिळत नाही ही खंत परीक्षणात दाभोळकर व्यक्त करतात. दाभोळकर सूचित करतात, की क्रिस्टलसहच्या नाथांच्या कौटुंबिक जीवनाचेहही समर्थ चित्रण कोणीतरी केव्हातरी करावयास हवे, त्यामुळे नाथ पै यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूवर प्रकाश पडेल.

*** गुण–दोषयुक्त परीक्षण:–**

वि.ह.कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'अच्युत बलवंत कोल्हटकर! व्यक्ति आणि वाङ्मय' या चरित्रग्रंथाचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. परीक्षणाच्या सुरूवातीसच गाडगीळ यांनी या ग्रंथातील दोष सांगितला आहे, तो म्हणजे पुस्तक विस्कळीतपणे लिहिले व रचलेले आहे. गाडगीळ यांनी जसे दोष दाखविले आहेत त्याचप्रमाणे नि:संकोचपणे त्याचे कौतुकही केले आहे. अच्युतराव १ ऑगस्ट १८७९ च्या दिवशी जन्मले व १५ जून १९३१ या दिवशी वारले. अवघे ५१–५२ वर्षांचे हे आयुष्य. त्यातच देशभक्तीसाठी तुरुंगवास भोगण्यात तीन–चार वर्षे गेली. त्यांचे 'संदेश' पत्र उत्कृष्ट चालले व गरजले. असे फक्त सहा–सात वर्षेच तो काळ अनुभवलेली व 'संदेश' वाचलेली पिढी आता बहुतेक संपत आली आहे. प्रा. कुलकर्णी यांनी हा चरित्र ग्रंथ लिहिला नसता तर मराठी वृत्तपत्र साहित्यातले एकेकाळी आपल्या तेज:पुज लेखणीने सर्व महाराष्ट्राचे डोळे दिपवून टाकणारे हे दालन कायमचे अज्ञातच राहिले असते.

अच्युतरावांच्या मृत्यूनंतरच्या पन्नास वर्षात मराठी साहित्य कितीतरी विविधांगांनी चरित्र प्रफुल्ल झाले असता अच्युतराव कोल्हटकरांचे चरित्र कोणीही लिहिले नाही, हे काही मराठी साहित्यिकांना शोभले नाही. दीर्घ परिश्रमाने अच्युतरावांचे हे विस्तृत चरित्र मराठी वाचकांस सादर केले हे प्रा. कुलकर्णी यांचे चालू पिढीवर उपकार आहेत, असे गाडगीळ म्हणतात ते योग्यच आहे. १९१४ साली टिळक तुरुंगातून सुटले व त्यांनी स्वराज्याची चळवळ हळूहळू सुरु केली. 'केसरी' फक्त साप्ताहिक असल्याने 'केसरी'तून या चळवळीचा प्रचार जो गंभीर भाषेत चाले तो सामान्य लोकांपर्यंत पोचत नसे. वृत्तपत्रे तपशीलवार वाचणे, ती विकत घेणे ही तेव्हा रुढीच नव्हती. अशा

स्थितीत टिळकांच्या चळवळीचा प्रचार करण्यासाठी १९१५ साली मुंबईत 'संदेश' दैनिक अवतरले. तेव्हा मजूर, हमाल, शेतकरी, शाळामास्तर, शाळेतील मुले हे सर्वजण 'संदेश' विकत घेऊन वाचू लागले. सोपे शब्द, छोटी वाक्ये, मधून मधून द्विरूक्ती, सोपा अवखळ विनोद, अशा भाषेत टिळकांचे राजकारण अच्युतराव रकाने–रकाने अग्रलेख लिहून वाचकांना समजून सांगत. राजकारणाचे गंभीर विचार सामान्य लोकांना गोडीने वाचायला लावण्याची जादू त्यापूर्वी अथवा त्यानंतरही अच्युतरावांच्या इतकी कोणीच केली नाही, या अच्युतरावांच्या कार्याचा गौरव गाडगीळ यांनी आपल्या परीक्षणातून वाचकांना करुन दिला आहे.

'वत्सलावहिनींची पत्रे' हा 'संदेश' मधील वाङ्मयप्रकार मराठी वाङ्मयात आजही अद्वितीय असून लोकांना त्या पत्रांनी कित वेड लावले होते. प्रा. कुलकर्णी यांनी 'वत्सलावहिनींची पत्रे' या प्रकरणातून या वाङ्मय प्रकाराचे रसग्रहण फार चांगल्या प्रकारे केले आहे, असे गाडगीळ यांनी नमूद केले आहे. राजकारणात गांधीचा प्रवेश झाल्यावर टिळक व गांधी यांची तुलना स्वाभाविकपणे होऊ लागली. त्याकाळी गांधींची थोरवी अच्युतरावांनी जेवढी ओळखली तेवढी वृत्तपत्रसृष्टीत तरी इतर कोणीच ओळखली नव्हती. प्रा. कुलकर्णी यांनी अच्युतरावांचे या संबंधातले पुष्कळ उतारे दिले असून आजच्या वाचकाला टिळक व गांधी यांचे संबंधाने कलेली ही तौलनिक चर्चा विशेष उद्बोधक आहे. 'संदेश' मध्ये नुसते राजकारण येत नव्हते. ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक अशा सर्व विषयांवर स्वत: अच्युतराव विद्वत्तापूर्ण व पल्लेदार भाषेत लेखन करीत. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा प्रयत्नांचा गौरव करणारे पहिले ब्राह्मणी पत्रकार अच्युतराव हेच होते. अच्युतराव कोल्हटकरांचे हे चरित्र ही निकडीची गरज होती. ही गरज उत्तमपणे भागविल्याबद्दल प्रा. कुलकर्णी यांना पां. वा. गाडगीळ यांनी धन्यवाद दिले आहेत.

*** कार्य–कर्तृत्वावर प्रकाश:–**

'गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर' या धनंजय कीर यांनी लिहिलेल्या चरित्र ग्रंथाचे अनंत काणेकर यांनी परीक्षण केले आहे. गुरुवर्य ज्या काळात जन्मले आणि त्यांनी आपले अध्ययन, अध्यापन आणि वाङ्मयसेवेचे कार्य केले – १८६० ते १९३४ हा काळ भारताच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासांला अत्यंत महत्वाचा काळ होय. रानडे, गोखले, टिळक,

कर्वे, वि. रा. शिंदे यांच्या ऐन कर्तृत्वाचा आणि 'महाराष्ट्राच्या थंड झालेल्या गोळ्यात सामाजिक राजकीय नवचैतन्य ओतून' त्याला पुन्हा उभा करण्याचा काळ होता. या पुनरुत्थानात गुरुवर्य केळूसकरांचा हर्विभागही महत्वाचा आहे. विस्मृतीच्या गर्तेतून तो पुन्हा प्रकाशात आणण्याचे महत्कार्य या आत्मचरित्र–चरित्राने केले आहे, असे मार्मिक परीक्षण अनंत काणेकर करतात. शूद्र जातीत जन्म आणि घरची गरीबी यांच्यामुळे ज्ञानप्राप्तीची अनिवार पिपासा असलेल्या केळूसकरांना काय हालअपेष्टा सोसाव्या लागल्या आणि किती परिश्रम करावे लागले याचे सुरेख मराठीत रेखाटलेले चित्र या ग्रंथात असल्याचे अनंत काणेकर त्यावर प्रकाश टाकतात.

केळूसकरांचा व्यासंग दांडगा होताच, पण त्यांचे मराठी, इंग्रजी, संस्कृत वाचन जबरदस्त होते. १९९८ साली त्यांनी गौतम बुद्धाचे चरित्र त्यांनी प्रसिद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यापासूनच स्फूर्ती घेतली. बाबासाहेबही केळूसकरांना मानीत. १८९६ साली त्यांचे तुकारामबाबांचे चरित्र बाहेर आले. त्यांनी लिहिलेल्या २०–२२ पुस्तकात 'सात उपनिषदांचे भाषांतर' आणि 'क्षत्रिय कुलवतंस छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र'हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. या चरित्राचे त्या सालचे ख्यातनाम इंग्रजी प्राध्यापक ताकाखाव यांनी इंग्रजी भाषांतर केले आहे. या चरित्रात पुराव्यानिशी गुरूवर्य केळूसकरांनी दाखवून दिले आहे की शिवाजी महाराजांचे स्वप्न केवळ स्वतंत्र महाराष्ट्राचे नव्हते तर स्वतंत्र भारताचे होते. कीर म्हणतात त्याप्रमाणे हे केवळ विचारंवत किंवा लेखकच नव्हते तर न्यायमूर्ती रानडे इत्यादींनी प्रशंसिलेले इतिहासकार, समाजसुधारक आणि कामगारांचे कैवारीही होते. त्यांच्या कार्याचे मोल पुन्हा एकदा समाजाला पटवून देणे आवश्यक आहे. हे 'आत्मचरित्र  चरित्र' ते कर्य करील ही आशा मनात ठेवत अनंत काणेकर परीक्षणात त्यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकतात.

*** क्रांतिकारकांची चरित्रे:–**

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांची चरित्रांची 'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये दखल घेतल्याचे दिसते. स्वातंत्र्यवीर मृत्युंजय सावरकर यांच्या साहित्य, राजकारण, समाजकारण, अस्पृश्योद्धार या सर्व पैलूंविषयी व त्यामगच्या 'हे सारे केवळ स्वातंत्र्यासाठीचे साधन' मानणाऱ्या त्यांच्या वृत्तीविषयीची चरित्र धनंजय कीर यांनी लिहले. संशोधकीय वृत्ती सांभाळत सत्यास बाध न

येऊ देता सावरकरांची स्वभाव–वर्तन वैशिष्ट्यै साधार नोंदवणारे कीर सावरकरांक्ष समरसचा साधता साधता तटस्थताही कशी सांभाळतात, हे वसंत पळशीकरांनी आपल्या परीक्षणातून दाखवून दिले आहे. विसाव्या शतकातील क्रांतिकारकांचे मुकुटमणी, राष्ट्रभक्तीचे एक प्रमुख अग्रणी या शब्दांत श्री. धनंजय कीर यांनी सावरकरांविषयी आपली भावना प्रस्तावनेत व्यक्त केली आहे.

अगदी बालवयातच सावरकरांच्या ठिकाणी स्वातंत्र्याची आस निर्माण झाली, सशस्त्र क्रांतिवादी विचारांची पेरणी बालवयातच झाली असे दाखविण्याचा मोह कीर यांना झाला तर ते त्यांच्या सावरकरभक्तीस साजेसे असले तरी चरित्रकाराच्या भूमिकेस न शोभणारे असे आहे, असे स्पष्ट मत वसंत पळशीकरांनी व्यक्त केले आहे. तर जयंत वष्ट लिहितात, ''डॉ. धनंजय कीर हे इतिहासकार वा न्यायाधीशाच्या भूमिकेतून आपल्या चरित्र नायकाचा विचार करत नाहीत, तर एका रसज्ञ चरित्रकाराच्या साक्षेपी भूमिकेतूनच आपल्या चरित्र नायकाकडे पाहताना दिसतात. इतिहासकाराची जिज्ञासू संशोधक वृत्ती आणि न्यायाधीशाचा निर्भीडपणा न सोडता पण तटस्थता सांभाळत चरित्र नायकाशी तादात्मय पावण्याची क्षमता कीरांच्यात निश्चितपणे आहे.''[१०]

वयाच्या अकराव्या वर्षापासून ते पंधराव्या वर्षापर्यंतच्या या महत्त्वाच्या काळाची कीर यांनी पार बोळवण करून टाकली आहे. या काळात घडलेल्या काही घटना त्यांनी बालवयात घुसडल्या आहेत व काही उपेक्षिल्या आहेत. नाशिकला आल्यानंतरचा त्यांचा पहिला एकलकोंडेपणाचा काळ. सावरकरांचे व्यक्तिमत्व, त्यांचे चरित्र, त्याची विचारसरणी या दृष्टीने महत्त्वाचे काय व बिन महत्त्वाचे काय याचा नीरक्षीरविवेक कीर यांना अजिबातच नाही. कीर यांचे श्रेय इतकेच की सावरकरांच्या संपूर्ण आयुष्याचे स्थूल, सदोष पण सलग चरित्र त्यांनी तूर्त उपलब्ध करून ठेवले आहे. सावरकरांच्या श्रद्धाशील अनुयायांनाच ते विशेषकरून उपयोगाचे आहे. सावरकरांच्या अभ्यासकांना या चरित्रावर कोणत्याही प्रकारे विसंबता येणार नाही, असे परखड मत पळशीकरांनी मांडले आहे.

वसंत पळशीकर यांच्या मते, सावरकर हा केवढा आकर्षक चरित्र विषय आहे. सावरकर या नावाची ब्रिटिश सरकारने एवढी दहशत घेतली होती की २५–२५ वर्षाच्या या दोन जन्मठेपीच्या शिक्षा त्यांना दिल्या गेल्या. सावरकरांना जबर शासन करावयाचे आधी ठरवले,

आणि मग कोणत्याही कायद्याखाली पकडता येईल, पकडणे सोयीचे जाईल याची चर्चा झाली. सावरकरांच्या प्रकरणी सरकारने आपल्या न्यायबुद्धीला व कायद्याच्या राज्याला फाटा दिला. अवघ्या २७ वर्षाचा सुकुमार तरूण सत्य कादंबरीपेक्षा सावरकरांच्या रूपाने अद्‌भूत ठरलेले आपण पाहतो. 'अभिनव भारताच्या उभारणीच्या काळातच सावरकरांनी दाखविलेले लेखन कर्तृत्व ही नेत्रोदीपक आहे. या पूर्वचरित्राशी तुलना केली म्हणजे त्यांचे उत्तर आयुष्य हा कमालीचा मोठा अपेक्षाभंग ठरतो. अंदमानाच्या कारागृहामधील सक्त शरीरश्रम, एकांतातला बंदिवास आणि हवामान यांच्या आघाताखाली सावरकर मोडले असे म्हणजे शरीर आत्म्यापेक्षा बलवत्तर ठरले असे म्हणावे लागेल. हे स्पष्टीकरण अति सोपे होईल. १९०० ते १९१० या दहा वर्षात सावरकरांच्या नेतृत्वाला इतक्या झपाट्याने यश येत गेले, त्यांची अहंता इतकी सरसर वाढत गेली की, स्वप्न आणि सत्य यातला फरक त्यांना करता येईनासा झाला, आणि सत्तावनच्या स्वातंत्र्य युद्धाच्या हीरक महोत्सवाच्या आधीच म्हणजे १९१७ च्या आतच आपण दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धात भारत मातेस स्वतंत्र करणार असे त्यांच्या मनाने घेतले.'या धूंदीचा कोष स्वत:भोवती त्यांनी विणून घेतला आणि अवघ्या सहा महिन्यांच्या काळात ते अंदमानाच्या कोठडीत बंद झाले. भव्यदिव्य सोनेरी स्वप्नांचा चक्काचूर झाला. ब्रिटिश सत्तेचे दमन यंत्र किती निर्दय, प्रभावी व भक्कम आहे याची त्यांना प्रथमच अनुभूती आली.

सावरकरांच्या व्यक्तिमत्वाला हा ताण सहन झाला नाही. त्या ताणाखाली त्यांच्या स्वभावातले उमदेपण गेले, त्यांना एक खुरटेपण आले. साऱ्या देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाचे राजकारण खेळणाऱ्या सावरकरांनी अंदमानात हिंदू संघटनेचे व शुद्धीचे डबक्यातले राजकारण करावे, आणि त्यातही त्यांचे तारतम्य सुटावे हे त्याचे लक्षण आहे. सावरकरांचे पुढील आयुष्य हे एक शोकात्म नाट्य आहे, आणिते शोकात्म अशासाठी की त्यांची बीजे त्यांच्या पूर्व चरित्रात व व्यक्तिमत्वात आहे. सावरकरांचे चरित्र लिहावयाचे म्हणजे या शोकनाट्याची उकल करावयाची, त्यांच्या जीवनातले हे शोकात्म नाट्य अविष्कृत करणारा चरित्रकार सावरकरांना लाभावा, असे मत प्रदर्शन करून सावरकरांच्या जीवनातले ते शोकात्म दर्शन घडावे असे म्हटले आहे. धनंजय कीर यांच्या चरित्रग्रंथाचे परीक्षण करताना वसंत पळशीकरांची भूमिका आणि कीर यांची भूमिका

यामध्ये तफावत आढळते. धनंजय कीर यांनी या चरित्रग्रंथाबद्दल आपली भूमिका मांडताना म्हटले आहे, ''वीरश्रेष्ठ सावरकरांच्या जीवनकार्याचे, वाङ्मयाचे त्यांनी चालविलेल्या राजकीय नि सामाजिक, क्रांतिकारक नि भाषाविषयक विविध चळवळीचे हे साकल्याने घडविलेले एकसंघ असे दर्शन आहे. त्यांच्या स्फोटक नि रोमांचकारी ज्वलंत नि महाकाव्य सदृश्य चरित्राचे वास्तव सत्यदर्शन घडविण्याचा मी प्रयत्न केला आहे.''[११] हा कीर यांचा प्रयत्न वसंत पळशीकरांना अपूरा वाटतो. तर अ.स.भिडे यांनी म्हटले आहे, ''कीरांनी त्या हिऱ्याचे पैलू हाताळले, उजळले, प्रकाशमान केले. सवंग लोकप्रियतेला बळी न पडता मार्मिक भाष्यकार नि भविष्यदृष्ये असे धनंजय कीर सर्वजनांना गवसले.''[१२] असे त्यांना नि:संकोचपणे श्रेय दिले आहे.

*** वास्तवता:–**

द.न.गोखले यांनी लिहिलेल्या 'क्रांतिवीर बाबाराव सावरकर' या चरित्रग्रंथाचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. लेखक हा संशोधक विद्वान व विवेचक चरित्रकार आहेच, पण शिवाय तो बाबांचा व सावरकर संप्रदायाचा निष्ठावंत भक्त आहे. म्हणून त्यांचे लिखान अनेक जागी प्रेमादराने उचंबळून आलेले आढळते. बत्तीस–चौतीस वर्षापूर्वी लिहिलेल्या त्यांच्या भाषाशैलीत लेखकाने बदल केलेला नाही. पण गाडगीळांना हे अयोग वाटले नाही. नाशिकला बाबा अखेरच्या दुखण्यात व्याधीचे असह्य दु:ख सोसावे लागत असतानाही स्वत:वर केलेल्या टिपणावरून लेखकास आठवणी सांगत होते व लेखक तासचे तास व असे कित्येक दिवस बाबांच्या अंथरूणाजवळ बसून बाबांच्या यातना दिसत असतानाही टिपण करून घेत होते. त्या काळात बाबांच्या यातना व टिपणे सांगताना दिसलेली उत्कटता रोज रोज दीर्घकाळ पाहिल्याने लेखकाचे अंत:करण हेलावले व लेखन शैलीत भरतीच्या सागरासारखे उचंबळून आले हे स्वाभाविक झाले, असे सांगितले आहे. गोखले यांना सावरकर जसे भावले तसे त्यांनी शब्दात त्यांना मांडले. जसे त्यांचा सावरकरांचे चरित्र लिहावे वाटते, तसेच लिहिले. या ठिकाणी डॉ. व.दि.कुलकर्णी यांच्या मते देणे योग्य ठरावे. ते म्हणतात, ''पण मला का असे वाटते, हे सांगणे....... अवघड असते. आणि अनेकांना असे वाटले असूनही मला असे (वेगळे) वाटते, हे सांगणे त्याहूनही अवघड असते. ह्या सगळ्याचा विचार करून द.न.गोखले माहितीच्या आधरे

निर्णय घेतात आणि चरित्रविषय झालेली जी व्यक्ती आहे, तिचे मूल्यमापन करतात. ही अवघड प्रक्रिया आणखी अवघड का होते? कारण त्यांनी निवडेल्या ज्या चरित्रविषयक व्यक्ती आहेत, त्या एकाहून एक आपल्या प्रज्ञेला आणि प्रतिभेस आव्हान देणाऱ्या आहेत.''[१३] लेखकाने निवेदनावरच न विसंबता शेकडो कागदपत्रे व अनेक ग्रंथ वाचून शेकडो समकालीनांशी बोलून पूर्ण पडताळल्याने हे चरित्र लिहिले असल्याने या ग्रंथाची विश्वसनियता व परिणामारकता आज टिकून असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायत नमूद केले आहे.

बाबाराव सावरकर १३ जून १८८९ रोजी जन्मले व १६ मार्च १९४५ रोजी मृत्यू पावले. मरणापूर्वी दीड वर्षे ते अंथरूणास खिळून होते व त्यांचे दुखणे यातनादायी होते. जन्मभर काही ना काही दुखणे त्यांना त्रास देत होतेच. लहानपणापासून त्यांना योगसाधनेचे वेड होते, पण त्याने प्रकृती सुधारण्यात त्यांना यश आले नाही. संसाराचा व दोन बंधूंना वाढविण्याचा भार त्यांच्यावर पडला. वडिलार्जित सुखवस्तू परिस्थिती नाहीशी होऊन दारिद्र्य आले. पण बाबांनी दोघा भावांच्या शिक्षणासाठी व संवर्धनासाठी जिवापाड कष्ट केले. काळजी वाहिली व योजना आखल्या व तडीस नेल्या. वास्तविक दारिद्र्य, दुखणी व कौटुंबिक काळज्या एवढ्या ओझ्यांनी बाबा पूर्ण खचून जायला पाहिजे होते. पण याच बाबांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी दारूगोळा, पिस्तुले व विविध शस्त्रास्त्रे जमविणे, भावडांना व पत्नीला गुप्त कटात गावणे, शेकडो तरूणांना देशभक्तीची प्रेरणा देऊन त्यांच्या संस्था स्थापून त्यांना प्राणर्पणास सिद्ध करणे, त्यासाठी बंधूसह उघड्या डोळ्यांनी जन्मठेपेची व अंदमान तुरूंगाची शिक्षा ओढवून घेणे, भावावरही तेच संकट ओढवलेले पाहणे, वर्षोगणती खडतर तुरूंगवास भोगल्यानंतरही सतत वीस वर्षे पुन्हा हिंदु संघटनेत अहोरात्र काम करत राहणे हे बाबारावांचे चरित्र व चारित्र्य अद्‌भूतापेक्षाही भव्य आहे. त्या ग्रंथातील सर्व प्रकरणे अशा भव्य व दिव्य कथांनी खच्चून भरलेली आहेत; असे गाडगीळांनी सांगितले आहे, ते आजच्या तरूण पिढीला सावरकरांचे हे चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्व प्रेरणादायी ठरणारे आहे. चरित्रकार आणि चरित्रनायक यांच्यातील अतूट नातेसंबंध येथे स्पष्ट होतो. गोखले आणि सावरकर यांच्यात घरोबा होता. म्हणूनच सावरकरांनी त्यांना आपले इत्यंभूत आत्मवृत्त सांगितले. क्रांतिकारकांच्या पद्धतीनुसार बाबाही सगळे वृत कधीच कोणाला सांगत नसत. गोखले म्हणतात, ''पण दैवाचे

फासे कसे पडले कोणास ठाऊक, त्यांनी आत्मवृत्त सांगण्याचे नुसते मान्यच केले नाही तर मृत्युशय्येवरील अनंत हाल एकीकडे सोशीत त्यांनी मला दिलेले आश्वासन पूर्णही केले.''[१४] असे लेखकाने निवेदनात नमूद केले आहे. जी भावना गोखले यांच्या मनात सावरकरांबद्दल होती तीच उत्कट भावना गाडगीळांच्या मनात असल्याचे परीक्षणावरून दिसते. परीक्षणात्मक अभिप्रायात पां.वा.गाडगीळ लिहितात, ''ज्या काळी सर्व बाजूंनी गडद अंधार होता, त्या काळी स्वत:च्या लाडक्या भावंडांच्या ही देहांची पणती पेटवून बाबांनी वर्तमान व भावी पिढ्यांना प्रकाश दिला त्या बाबारावांना प्रणिपात.''

अशाप्रकारे बाबाराव सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचे वेगवेगळे पैलू वसंत पळशीकर आणि पो.वा.गाडगीळ यांनी आपआपल्या दृष्टीकोनातून उलगडून दाखविले आहेत. वसंत पळशीकरांना मात्र धनंजय कीर यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथापेक्षा सावरकरांच्या जीवनातले शोकात्म नाट्याचे दर्शन घडविणारा अजून एखादा चरित्रकार निर्माण व्हायला पाहिजे असे वाटते. तर गाडगीळ हे द.न.गोखले यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाबद्दल संतूष्ट आहेत. ज्या बाबाराव सावरकरांनी आपल्या तनमनधनाने या भारतमातेस स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्राणांची बाजी लावली, त्याबद्दल कृतज्ञता ते परीक्षणात व्यक्त करतात.

*** जिज्ञासा जागृती:–**

वसंत भगवंत कर्णिक यांनी लिहिलेल्या 'एम.एन.रॉय' या इंग्रजी चरित्राचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. भारतातील जगप्रसिद्ध क्रांतिकारक एम.एन.रॉय याचे विस्तृत इंग्रजी चरित्र रॉय यांचे निष्ठावंत अनुयायी, सहकारी व समविचारी विद्वान वसंत भगवंत कर्णिक यांनी लिहिले आहे. रॉय यांचे जीवन अनेक धाडसी घडामोडींनी खच्चून भरलेले असून ७१ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी जगभर क्रांतीसाठी पायपीट केली, जीव नेहमी धोक्यात घातला, वाचन, चिंतन व लेखन अफाट केले. मेक्सिको, चीन, भारत अशा दूरदूरच्या प्रचंड देशात क्रांतिकारी उलाढाली केल्या आणि वैचारिक स्वरूपाचे वाङ्मय केवढ्या तरी मोठ्या प्रमाणात पुढील पिढीसाठी निर्माण करून ठेवले आहे. अशा या मानवेन्द्रनाथ रॉय यांचे विस्तर्ण चरित्र कोणीतरी माहितगार व संशोधक विद्वानाने लिहायला हवे होते, ते काम कर्णिक यांनी पूर्ण केले, असे गाडगीळ यांनी

म्हटले आहे.

रॉय यांचा जन्म बंगालमधील चोवीस परगणा जिल्ह्यात आवॉलिया या गावी १८८७ साली झाला. तेव्हापासून जानेवारी १९५४ मध्ये त्यांना मृत्यू येईपर्यंत अविश्रांत धडपडीत व जीव धोक्यात घालून त्यांनी आपले आयुष्य वेचले. रॉय यांचे मूळ नाव नरेन भट्टाचार्य. याचा पूर्वायुष्यातील पुष्कळसा भाग दहशतवादी क्रांतिकार्यात गेला. पण त्या मार्गावर त्याचा विश्वास पुढील काळात राहिला नाही, अशा स्थितीत अमेरिकेत असता भट्टाचार्य यांनी आपला जुना इतिहास व जुने नावही पुसून टाकून दहशतवादाकडे पाठ फिरविली व माक्सवादी मानवेन्द्रनाथ रॉय या नावाने प्रवेश केला, या त्यांच्या आयुष्यातील घडामोडींवर गाडगीळ यांनी प्रकाश टाकला आहे.

जर्मनीकडून शस्त्रे मिळविण्याच्या कामी नरेन व त्यांचे सहकारी यांना शेवटी अपयश आले. त्यामुळे नरेनचा जर्मनीवरील विश्वास उडाला व त्याचबरोबर स्वातंत्र्य प्राप्तीचा मार्ग म्हणून शस्त्रसाधना वरचाही विश्वास उडाला. शस्त्रे मिळाली तरी ती वापरण्याचे कौशल्य व ती वापरण्याची वैचारिक भूमिका या गोष्टी महत्त्वाच्या आहेत ही गोष्ट युरोपात फिरत असता समाजवादी वाङ्मय वाचून नरेनच्या लक्षात आली तेव्हा त्याच्या डोक्यातून धर्मविचार, संकुचित राष्ट्रविचार हे नाहीसे झाले व नरेन भट्टाचार्य सोशॉलिस्ट झाला. त्याने मानवेन्द्रनाथ रॉय हे नाव धारण केले. या सर्व हकीकतीवर गाडगीळ यांनी प्रकाश टाकला आहे. त्याबाबत सविस्तर विवेचन केले आहे.

रॉय हे १९१७ च्या मे पासून १९१९ च्या डिसेंबर पर्यंत मेक्सिकोत होते. हा काळ त्यांच्या आयुष्यात अपवादात्मक इतका चांगला गेला. समाजवादी विचारांचा थोर लेखक लोकांच्या मनावर छाप पाडणारा नेता आणि संकटप्रसंगी सरकारला व लोकांना धीर देऊन संयम शिकविणारा मुत्सद्दी अशी कीर्ति रॉय यांना मेक्सिकोतील अवघ्या एकतीस महिन्याच्या कारकीर्दीत मिळाली. एवढे मोठे कर्तृत्व व एवढा मोठा सन्मान तोही भारतापासून अतिशय दूर अशा एका आधुनिक व विस्तर्ण देशात ज्यांच्या वाट्याला आला असे एम.एन.रॉय हे पहिले भारतीय होत. त्यांच्यामुळे भारताच्या कीर्तीत निश्चित मोठी भर पडली, असल्याचे गाडगील यांनी

नमूद केले आहे.

मेक्सिकोत तेलखाणीच्या क्षेत्रात संपाची जी लाट उसळली त्यामुळे अमेरिकन आक्रमणाची भीती उद्‌भवली त्यावेळी रॉय यांनी इतर सोशॅलिस्ट पुढाऱ्यांच्या साहाय्याने कामगारांना संयमाचे आवाहन करून संपाची लाट शमविली. रॉय यांच्या या निर्धारी आवाहनामुळे मेक्सिकन सरकारचे व मेक्सिकन सोशॅलिस्य चळवळीवरचे संकट टळले आणि समाजवादी विचारवंत व दूरदृष्टीचा खंबीर मुत्सद्दी म्हणून रॉय यांनी मेक्सिकोत कीर्तिशिखर गाठले. भारताच्या दृष्टीने ही घटना अपूर्व होती. तशीत रॉय यांच्याबरोबरच भारताचाही लौकिक वाढविणारी होती, असे गाडगीळ यांनी नमूद करून त्यावर प्रकाश टाकला आहे.

भारतात परतल्यानंतर गांधी, नेहरू, काँग्रेस, सोशॅलिस्य यांजवर रॉय यांनी जी टीका केली ती पुरेशा जबाबदारीने केलीच नाही. आणि मी इतक्या हालअपेष्टा भोगल्या तरी हे पुढारी मला पुरेसा मान देत नाहीत अशी उलट कडवट टीका रॉयनी केली. भारतीय जनतेत त्यांनी आपली चळवळ व विचारसरणी रूजविता आली नाही आणि याचे कारण त्यांची विद्ववत्ता ग्रंथगत होती. त्यांची मते पार वेगाने पालटत गेली. त्यांच्या वेगाने रॉय यांच्या अनुयायांना व विरोधकांना धावता आले नाही, असे परखड मत गाडगीळ यांनी मांडले आहे.

कर्णिक यांनी चरित्रलेखनाची कामगिरी मात्र उत्तम प्रकारे बजावली असल्याचे गाडगीळ यांनी परीक्षणात नमूद केले आहे. रॉय यांचे राजकीय चरित्र ही मर्यादा स्वीकारून त्यासाठी झाडून सारे अवश्य ते ते साहित्य कर्णिकांनी व्यवस्थित व सोलीवपणे मांडले आहे. चरित्र विषयाबद्दल सहानुभूती व आदर या पलिकडे अतिगौरव त्यांनी मांडला नाही. रॉय यांच्या चूकाही बिनचूकपणे व फालतू विशेषणे न वापरता दाखविल्या आहेत. वाचकांना रॉयबद्दल प्रतिकूल, अनुकूल कसेही मत बनविता यावे इतके समग्र साह्यि कर्णिकांनी दीर्घ मेहनत व दीर्घ अभ्यास करून पुरविले आहे. भाषा अर्थपूर्ण सुटसुटीत, सुबोध अशीच आहे. या परीक्षणामुळे वाचकांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन हा चरित्रग्रंथ वाचला जाईल असे वाटते.

*** सामाजिक कार्यकर्ते चरित्र:–**

सन १८७३ ते १८९४ या दोन वर्षात महाराष्ट्रात वैचारिक मंथन झाले आहे. हे वैचारिक

मंथन म्हणजे सामाजिक समता प्रत्यक्षात उतरवून सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा ज्ञान–विज्ञान आणि लोकशाही युगातील एक मूठभर लोकांनी स्वत:च्या सद्सद्विवेकबुद्धी नुसार प्रांजळपणे चालविलेला प्रयत्न आहे. 'समाज प्रबोधन पत्रिके'ची मूळात स्थापनाच समाजामध्ये वैचारिक प्रबोदन घडवून आणण्यासाठी झाली. ज्या समाजसुधारकांनी आपल्या अथक प्रयत्नांनी समाजामध्ये समता हे मूल्य रूजविण्यासाठी प्राणांची आहूती दिली. तनमनधन तारूण्य कुर्बान केले, त्या समाज सुधारकांच्या कार्याचा गौरव किंवा त्यांच्या कार्याची दखल 'पत्रिके' ने घेतल्याचे दिसते. प्रा.मो.नि.ठोके लिहितात, ''सामाजिक आणि धार्मिक सुधारणा करणाऱ्या महान विभूतींची एक उज्जवल परंपराच देशात निर्माण झाली. दुष्ट प्रथा, परंपरा आणि लोकभ्रमांना घालवून देऊन या देशातील माणसामध्ये वैचारिक सातत्य निर्माण करण्याचा आणि तद्नुषंगाने सामाजिक समता प्रस्थापित करण्याच फार मोठा प्रयत्न या समाजसुधारकांनी केला.''[१५] अशा समाज सुधारकांची चरित्रे 'पत्रिके'तून वाचकांसमोर ठेऊन त्यांच्या कार्याची, व्यक्तिमत्वाची ओळख करून दिली.

*** सर्वोत्तम चरित्र:–**

धनंजय कीर यांनी 'राजर्षी शाहू छत्रपती' हे चरित्र लिहिले असून त्या चरित्रग्रंथाचे पां.वा गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. १८५६ ते १९५६ च्या दशकात महाराष्ट्रात ही जी राजकीय व सामाजिक जागृती व चळवळ बऱ्याच अंशी सारख्याच वेगाने व व्यापकतेने झाली त्याचे श्रेय या कालखंडात निर्माण झालेल्या अनेक थोर पुढाऱ्यांना दिले पाहिजे. शाहू महाराजांचे व्यक्तित्व, कर्तृत्व, जीवन, बुद्धिमत्ता, धाडस, दूरदृष्टी, महत्त्वकांक्षा इत्यादि सर्व काही भव्य, दिव्य, दांडगे असून कीर यांच्या या जाड्याजुड्या ग्रंथाच्या अठ्ठावीस प्रकरणांत, पानापानातून स्वच्छ आरशातल्या शाहू राजांचे हे सर्व गुण उठावदारपणे प्रतिबिंबित करण्यात कीर यशस्वी झाल्याचे पां.वा.गाडगीळ नमूद करतात. शाहूराजे जे हे आद्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशातले, कोल्हापूरचे राज्य छत्रपती राजाराम यांची पत्नी ताराबाई यांनी स्थापले. ब्रिटिश अंमलात मांडलिक राजे या नात्याने कोणत्याही संस्थानिकाच्या कर्तबगारीस मुळीच वाव नव्हता. या सर्व संस्थानिकांस ब्रिटिश आधिकाऱ्यांची आर्जवे करूनच आयुष्य कंठावे लागे. ते दुर्दैव शाहू राजांनाही सोसावे लागले. शाहू अठ्ठावीस वर्षेच राज्यावर होते. २० व्या वर्षी अधिकारप्राप्ती झाल्याने

शिक्षणाची व अनुभवाची शिदोरी ही फारशी नव्हतीच. शाहू वयाच्या अठ्ठेचाळीसावे वर्षी वारले. यावरून त्यांना कर्तबगारीचे आयुष्य फारसे लाभले नाही. हेही उघड दिसते. पण एवढ्या अल्पायुष्यात आपल्या उपजत बुद्धीने समाजक्रांतीचा एवढा वैचारिक प्रचार व व्यावहारिक प्रसार या राजाने केला आणि त्यामुळे प्रक्षुब्ध वादाची एवढी प्रचंड वादळे या राजाने उठविली की लोकांचा आवडता असूनही वादग्रस्त म्हणून गाजलेला व गरजलेला राजा ब्रिटिश अंमलात तरी दुसरा झालाच नाही, याबद्दलची सविस्तर माहिती गाडगीळ यांनी परीक्षणात दिली आहे.

अनियंत्रित राजा या नात्याने त्यांच्या स्वभावात थोडीशी दांडगाई वृत्तीही होती. गरिबांबद्दल कळकळ व त्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न हा शाहूच्या जीवनाचा स्थायीभाव होता. राज्यावर आल्या दिवसापासून अस्पृश्यता निवारणाचे कंकण शाहूंनी आपल्या हाती बांधले होते. गंगाराम कांबळे नावाच्या एका अस्पृश्य नोकराने स्पृश्यांच्या विहिरीचे पाणी काढले म्हणून काही मराठी मंडळींनी त्याला चाबकाने फटके मारले. शाहूंना हे कळताच त्यांना 'या मराठ्यांना पकडून आणून चाबकाने फोडून काढले, त्यात न्याय होता तरी अनियंत्रित दांडगाई होतीच. सरकारी नोकऱ्यात ब्राह्मणेतरांना व अस्पृश्यांना मोठ्या प्रमाणात प्रवेश देणे व त्यासाठी सर्व समाजात शिक्षण प्रसार करणे हे कार्य शाहूंनी धडाक्याने चालविले. या संदर्भात एस.एस. भोसले लिहितात, ''राजर्षींनी समाजाची जुनी व कालबाह्य झालेली घडी संपूर्णतया बदलण्यासाठी शिक्षणाची दीर्घ पल्ल्याची वाटचाल आरंभिली. त्यामागे दम खाण्याची वृत्ती आहे. समाज जादूच्या कांडीने बदलत नसतो. तर मन, श्रम आणि बुद्धी यांच्या प्रज्ञा प्रतीत्ती नि प्रबोध इत्यांदींनी पालटत असतो, त्यासाठी उताविळ निखालस कुचकामाची असते. प्रबळ इच्छाशक्तीच्या रंगेल शाहू छत्रपतींनी दमदारपणे शिक्षण विषयक चळवळ चालविली. त्यामागे सर्वकष विषमतेच्या, दारिद्र्याच्या व अज्ञानाच्या सर्वगामी युद्धातील शिक्षण हे प्रबल, प्रभावी आणि प्रखर हत्यार आहे, ही दृष्टी होय, ह्या दृष्टीमुळे आधुनिक महाराष्ट्राची उभारणी झाली.''[१६]

शाहूराजांनी बहुजन समाजाला शिक्षण व नोकऱ्या देऊन या क्षेत्रातील ब्राह्मणी मक्तेदारीवर गदा आणली. कुलकर्ण्यांची ग्रामीण पिळवणूकीची सत्ता काढली. आणि ब्राह्मणेतरांना व अस्पृश्यांनाही वेदोक्त संस्काराचा व वेदाध्ययन करून वेदोक्त संस्कार करण्याचा अधिकार आहे हे

शाहूंनी प्रचाराने शिकवून कृतीने रूढ केले. यामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणी पुढारी भडकले. ब्राह्मणी वृत्तपत्रांनी शाहूविरूद्ध खोटानाटा प्रचार केला व शिकलेल्या ब्राह्मणेतरांना 'जसास तसे' वर्तन केल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळ भडकली, या सर्व चळवळींचे तत्कालीन स्वरूप कीर यांनी ग्रंथात सुसंगतीने व विस्ताराने दिले असून ही या ग्रंथाची मोठी कामगिरी असल्याचा अभिप्राय परीक्षणात नोंदवला आहे.

ख्रिश्चन मिशनरी दलितांची देवा करीत याबद्दल शाहूंनी त्यांना धन्यवाद दिले. पण ख्रिस्त धर्मप्रसाराचा पुरस्कार शाहूंनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे कधी केला नाही. उलट हिंदू बहुजन समाजात वेदाची प्रतिष्ठा वाढावी आणि आपणास वेदाधिकार आहे याबद्दल हिंदुमागास अभिमान वाटावा असा त्यांचा प्रयत्न होता. वेदांच्या छायेकाली हिंदू समाजात समता स्थापने, शिक्षण व बौद्धिक व भौतिक उत्कर्षाची संधी देणे, अस्पृश्यांचे वेगाने निर्मुलन करून सामाजिक उन्नतीच्या वरच्या खालच्या पायरीवर हळूहळू लोकजागृती करीत करीत जातिभेद नाहीसा करणे, असे व्यापक व मूलग्राही धोरण शाहूंनी विचारपूर्वक व योजनापूर्वक आणि सत्तेचा उपयोग करून अंमलात आणले. कीर यांनी शाहू राजांची ही कामगिरी अगदी तपशिलाने सर्व ग्रंथभर फार चांगल्या प्रकारे मांडल्याचे पां.वा.गाडगीळ यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रातील नव्या पिढीने या उत्कृष्ट ग्रंथातील इतिहास निर्लेप मनाने समजून घ्यावा व अजूनही होण्याचा संभव असलेल्या चुका टाळाव्यात. हे शाहू चरित्र मराठीतील चरित्र ग्रंथात अनेकदृष्टीने सर्वोत्तम ठरेल, असा विश्वासही व्यक्त केला आहे, तो रास्त आहे.

*** विचारांचा आढावा :–**

निर्मलकुमार फडकुले यांनी लिहिलेल्या 'लोकहितवादी:काल आणि कर्तृत्व' या ग्रंथाचे परीक्षण वसंत पळशीकर यांनी केले आहे. लोकहितवादी (उर्फ गोपाळराव हरि देशमुख) बराच काळ उपेक्षीतच राहिले होते. एकोणिसाव्या शतकातील वैचारिक प्रबोधनाचा पाया घालणाऱ्या लोकहितवादींच्या विचारांची चिकित्सा होण्याची गरज स्पष्य करण्याच्या हेतूने फडकूले यांनी केलेले लेखन महत्त्वाचे असल्याचे मत पळशीकर यांनी व्यक्त केले आहे. 'प्रभाकर' तून प्रसिद्ध झालेली शतपत्रे ही लोकहितवादींचे सर्वाच गाजलेले लेखन. के लेखन १८४८ ते १८५० या

काळात झाले. त्यावेळी लोकहितवादींचे वय २५–२७ वर्षांचे होते. लोकहितवादी १८९२ साली वारले. लोकहितवादी अखेरपर्यंत लेखन करीत होते. सुमारे ५० वर्षे त्यांचे लेखन अव्याहतपणे चालू होते. इतका प्रदीर्घ काळ व इतक्या विविध विषयांवर लेखन केलेले त्यांच्या पिढीत कोणीच झालेले नाही, तरीही त्यांचा प्रभाव म्हणावा तसा का पडला नाही, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न पळशीकर करतात.

इतके प्रदीर्घ काळ लेखन करणाऱ्या व जेथे असू तेथे सामाजिक संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्या व्यक्तीचा प्रभाव एवढा क्षीण का ठरावा, हा एक चिंतनीय प्रश्न आहे. या प्रश्नाला उत्तर शोधण्याचा प्रयत्न डॉ. फडकुले यांनी केलेला नाही. लोकहितवादींनी मांडलेले विचार पाहिले तर त्याची उंची, व्याप्ती व अमूलाग्रता कमी होती असे म्हणता येत नाही आणि तरीही लोकहितवादींपासून स्फूर्ती घेऊन प्रत्यक्ष कामात पडलेल्या व्यक्तींची परंपरा निर्माण झाली नाही ही वस्तुस्थिती उरतेच. लोकहितवादी व न्या. रानडे दोघेही सरकारी नोकरीत होते. दोघांच्याही प्रकृतीत सौम्यपणा तेवढाच सारख्या परिस्थितीत असूनही महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिवर्तनाच्या इतिहासात रानड्यांना जे स्थान आहे ते त्यांच्यापेक्षा वीस वर्षे अधिक क्रियाशील असलेल्या लोकहितवादींना का देता येत नाही. डॉ. फडकुले यांनी लोकहितवादींच्या विचारांचा आढावा घेण्यावर समाधान मानले आहे. ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीचा त्यात अभावच आढळतो. लोकहितवादींचे यथार्थ मूल्यमापन असूनही बाकी राहिलेच आहे असे पळशीकरांना वाटते. लोकहितवादींसारख्या वैचारिक प्रबोधनाचा पाया घालणारा समाज सेवक उपेक्षित राहावा ही खंत वसंत पळशीकरांना वाटते. ती योग्यच आहे. पळशीकरांनी केलेल्या परीक्षणामुळे वाचक वेगळ्या दृष्टीकोनातून लोकहितवादीकडे पाहतील आणि ऐतिहासिक दृष्टीने त्यांच्या कार्याचा आढावा घेतील.

*** उपेक्षित आणि प्रेरणादायी चरित्रे:–**

अ. ना. पेंडणेकर यांनी 'उपेक्षित दृष्टा'– दिवाकर बापट, 'तात्या करमळकर'– मोरेश्वर जोशी, 'अज्ञात नंदादीप'– म. दि. साखळकर, या तीन चरित्र ग्रंथावरील 'ध्येयवेडी माणसे' या शीर्षकांतर्गत केलेले परीक्षण वाचनीय आहे. या तिघांपैकी र. धो. कर्वे हे सर्वात अधिक परिचित.

ते हयात असताना त्यांची उपेक्षा झाली तरी त्यांनी सुरु केलेल्या संततिनियमनाच्या कामाचे महत्व आज निर्विवादपणे सर्वांना मान्य आहे. आपल्या अंगीकृत कार्यावर अढळ श्रद्धा असल्यावर एकाकी मनुष्य केवढे तेजस्वी कार्य करु शकतो, त्यांचे हे कार्य अलौकिक उदाहरण म्हणून पेंडणेकर नोंद करतात. प्रा. सुधीर गव्हाणे यांनाही र. धो. कर्वे हे अंधारातच राहिले. ते लिहितात, ''या व्यक्तीची १९८२ साली जन्म शब्तादी फक्त झाली! केवढा उपेक्षित राहिलेला हा कर्तृत्ववान पुरुष! ना याचे कुणाला भान, ना जाण! ग्रंथालय चळवळ सुरु करण्याच्या व्यक्तींचे फोटो प्रत्येक ग्रंथालयात दिसतात. साहित्यिकांचे फोटो प्रत्येक वाङ्मयीन संस्थेत दिसतात. समाजसुधारकांचे फोटो प्रत्येक समाजसेवी संस्थेत दिसतात, स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचे फोटो प्रत्येक सार्वजनिक संस्थेत दिसतात, पण र.धो. कर्वेंचा फोटो आणि चरित्र निदान आज संततिनियमनाचे कार्य करणाऱ्या आरोग्य विभागाच्या कार्यालयात दिसायला हवे होते. पण हा माणूस पडद्याआड नि अंधारातच राहिला.''[१७] र.धों. कर्व्यांचे हे छोटेसे पण माहितीपूर्ण चरित्र आहे. लहानपणी मनाची झालेली जडणघडण, शालेय आणि विद्यालयीन जीवनातील बुद्धिमत्तेची चमक, संततिनियमनाचे प्रचार कार्य, त्याला झालेला विरोध, त्या विरोधाला पुरून उरणारी जिद्द शक्य तेवढ्या तपशिलानिशी सादर केलेली आहे. तसेच माहिती परिश्रमाने गोळा केली असल्याचे परीक्षणात पेंडणेकर यांनी नमूद केले आहे.

स्वातंत्र्याच्या आंदोलनात ज्यांनी ज्यांनी देशासाठी उडी घेतली आणि स्वातंत्र्योत्तर काळात सत्तालोभ न धरता आमरण विधायक कार्य जे करीत राहिले असा थोर देशभक्तात तात्या करमळकरांची गणना करावी लागेल, अशा देशभक्ताला वाचकांसमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'पत्रिके'ने केले आहे. १९३० पासून १९५९ पर्यंतचा त्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याचा सार्वजनिक इतिहास हे अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांचे म्हणणे अतिशयोक्तीचे नाही. तात्यांवर शालेय जीवनातच तत्कालीन आंदोलनाचा परिणाम झाला. १९३० साली मुंबईची नोकरी सोडून त्यांनी काँग्रेसच्या कार्यास वाहून घेतले. रत्नागिरी जिल्ह्यात त्यांनी असहकारितेच्या काळात जेलयात्रा केली. खोतीपद्धती विरूद्ध लढा दिला. राजापूरची गंगा हरिजनांना खुली व्हावी म्हणून आंदोलनात सहभागी झाले. सर्वोदय केंद्राचे संचालकत्व वार्ध्यक्यामुळे सोडल्यावर ते

रत्नागिरीत संडाससफाई करीत राहिले. मुलाकडे राहिले नाहीत. आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी तीन वर्षाच्या मुलाला त्याच्या आजोळी ठेवले होते. 'ज्याअर्थी अपत्यसेवा माझ्याकडून घडली नाही. त्या अर्थी मला आता वार्धक्य आहे म्हणून अपत्याकडून सेवा करून घेण्याचा हक्क मला कसा मिळावा' असे त्यांनी आपल्या मुलास पत्रात लिहिले, या सर्व हकीकतीवरून पेंडणेकर यांनी तात्या करमरकरांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला आहे. तसेच गांधीहत्येच्यावेळी त्यांच्या मनाची झालेली तडफड लेखकाने चांगल्यातऱ्हेने व्यक्त केली आहे. पिता–पुत्रांचा संबंध हा सगळा भागच ह्या चरित्रातून मूळातून वाचावा असा चटका लावणारा आहे. तात्यांच्या सुनेने लिहिलेल्या तात्यांचे व्यक्तित्वदर्शन घडवणारा लेख चरित्रात समाविष्ट केला आहे. त्या सोळा पृष्ठात तात्यांच्या मनाचे जवळून दर्शन घडते. प्रामुख्याने सार्वजनिक जीवनातील तात्यांचे दर्शन मोरेपंत जोशींनी घडविले आहे, सौ. इंदुताईंनी त्यांच्या खाजगी जीवनाचे दर्शन कसे घडविले आहे, यावरही तेवढ्याच तळमळीने, पेंडणेकरांनी प्रकाश टाकला आहे. स्वातंत्र्य चळवळीतील एका सच्च्या देशभक्ताचे चरित्र, त्यांचे कार्य पेंडणेकरांच्या परीक्षणामुळे आपणास कळते.

शैक्षणिक संस्थांकडे कायदेशीर व्यापार म्हणून पाहिल्या जाणाऱ्या आजच्या काळात रत्नागिरी जिल्ह्यातील सामंत गुरूजींचे चरित्र अद्‌भूत, खोटे वाटावे इतके ध्येयवादाने पूर्ण भरलेले आहे, अशा चरित्र ग्रंथाचे अ.ना.पेंडणेकर यांनी परीक्षण केले. १९७८ सालापासून मरेपर्यंत त्यांनी विद्यादानाचे पवित्र कार्य केले. मुलांच्या जीवनास वळण लावले. दलितांसाठी शाळा आणि नंतर कुणबी समाजासाठी छात्रालये सुरू केली, अशा सामंत गुरूजींचे चरित्र साखळकरांनी मोठ्या आत्मीयतेने लिहिले असल्याने सामंत गुरूजींची धडपड, कर्तृत्व, कठोरता, प्रपंचातील विरक्ती, उपक्रमशीलता, दलितांसंबंदीची सक्रिय कणव, धार्मिकता हे सारे पैलू त्यांनी जिवंत केले आहेत, असा मार्मिक अभिप्राय पेंडणेकर यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर विद्यार्थी–शिक्षक–पालक या सर्वांनाच हे चरित्र स्फूर्ती देणारे असल्याचे परीक्षणात नमूद करतात, ते योग्य वाटते. प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करणारे सामंत गुरूजी कर्ते सुधारक होते.

*** अपूरे चरित्र:–**

बी.एन.दातार यांनी लिहिलेल्या 'हरिहरनाथ शास्त्री: लाईफ अँड वर्क' या चरित्रग्रंथाचे

स.द.पुणेकर यांनी परीक्षण केले आहे. या चरित्रग्रंथामुळे कामगार नेत्याचे चरित्र आणि कार्य वाचकांसमोर आल्याचे पुणेकर यांनी सांगितले आहे. पण हे चरित्र विस्तृत लिहिण्याची गरज होती, असेही पुणेकर यांनी नमूद केले आहे. कारण तशा त्यांच्या चरित्रात महत्त्वाच्या घटना होत्या. एका पोलीस सब इन्स्पेक्टरचा हा मुलगा लहानपणीच पोरका झालेला. विशी उलटण्याच्या आत पाटण्याच्या गांधी आश्रम, काशी विद्यापीठ, वाराणशी विश्वविद्यालय या मार्गाने लाला लजपतरायांच्या मार्गदर्शनाखाली आला. गांधीजींच्या पहिल्या कायदेभंगाच्या चळवळीत तुरूंगात जाऊन आला व परत काशी विद्यापीठात शिकून शास्त्री झाला. लाला लजपतरायांच्या लोकसेवक मंडळाचे हरीहरनाथ आजीव सेवक झाले आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली त्यांनी कामगार चळवळीत पदार्पण करून आपल्या पुढील कार्याकरीता क्षेत्र निवडले. अशा या हरिहरनाथांचे जीवन–कर्तृत्व चरित्रलेखनासाठी अनुकूल असूनही दातार यांनी पाचच पानात संपविले, याबाबत पुणेकर यांनी खंत व्यक्त केली आहे.

हरिहरनाथांचे एकंदर जीवन त्यागी, नि:स्वार्थी आणि कामगार चळवळीला समर्पित होते. निश्चित ध्येय, त्या ध्येयावर अचलनिष्ठा, त्या करीता लागणारे निरलस प्रयत्न आणि नानाविध संकटांनी विचलित न होता, सरळ आक्रमिलेला मार्ग हे त्यांच्या जीवनाचे विशेष होते. हे चरित्र विस्तृत लिहिले गेले असते तर त्यांच्या या जीवन विशेषांवर अधिक प्रकाश पडला असता, असे पुणेकर यांना वाटते, ते योग्यच आहे. कामगार चळवळीला समर्पित असणाऱ्या नेत्याचे चरित्र त्या चळवळीवर, त्याचबरोबर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे आहे. स.दं.पुणेकर यांनी या चरित्रातील काही दोषांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. कृतीप्रमाणे त्यांच्या मतांत देखील पुष्कळसा धरसोडपणा आढळतो. ‘जीवन वेतन’ व ‘वास्तविक वेतन’ याची ते गल्लत करतात. उत्पादकता किंवा सामाजिक सुरक्षितता याबाबत त्यांना निश्चित मत नसल्यामुळे अशा क्षेत्रात ते आंतरराष्ट्रीय श्रम संस्थेवर अवलंबून राहतात. शास्त्रींची म्हणून जी वचने दिली आहेत, त्यावरून त्यांची निश्चित मते स्पष्ट न झाल्यामुळे वैचारिक गोंधळ होतो, विविध भूमिका व विविध विषय एकत्र आल्यामुळे जी पुनरूक्ती होते त्यामुळे या गोंधळात भरच पडते, असे दोष ही त्यांनी परीक्षणात दाखविले आहेत. पण तरीही कामगार कार्यकर्त्यांना व कामगार प्रश्नांच्या अभ्यासूंना

उपयुक्त हे पुस्तक असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायात पुणेकर यांनी सांगितले आहे, ते योग्य वाटते.

*** जीवनकार्यावर प्रकाश:–**

धनंजय कीर यांनी लिहिलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: चित्रमय चरित्र' या चरित्रग्रंथाचे प्रभा आपटे यांनी परीक्षण केले आहे. एक थोर समाज क्रांतिकारक व दीनदलितांचे कैवारी या रूपात आपल्याला बाबासहेब आंबेडकर आढळतात. पुस्तकाच्या दुसऱ्या भागात विविध प्रसंगातून डॉ. आंबेडकरांचे दर्शन कसे घडते, यावर आपटे यांनी प्रकाश टाकला आहे. एक उच्च राजकीय नेते व स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेब आंबेडकर आपल्याला आढळतात. त्यांच्या आयुष्याच्या उच्चशिखरी पुस्तकाच्या तिसऱ्या भागात यात १९२८ मध्ये सायमन कमिशनच्या सदस्यांसमवेत, लंडनमध्ये भरलेल्या पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेत, १९३२ मध्ये लॉर्ड वेव्हलच्या मंत्रिमंडळातील मजूर मंत्री १९४६ मध्ये मुंबईत निवडणुकीत भाषण करताना, स्वतंत्र भारताचे पहिले विधिमंत्री, घटना समितीच्या कामकाजात मग्न असताना, भारताची राज्यघटना, डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सादर करताना, डॉ. प्रसाद यांच्या समवेत वेरूळची लेणी पाहताना अशा विविध रूपातील डॉ. आंबेडकर वाचकांसमोर उभे करण्याचे काम आपटे यांच्या परीक्षणाने केले आहे. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूवर प्रकाश टाकला आहे. परंतु हे परीक्षण वाचताना काहीतरी कमतरता आहे असे जाणवते. घटनांचा फक्त क्रम डोळ्यासमोर उभा राहतो. महात्मा गांधीजींच्या आमरण उपोषणाच्यावेळी डॉ. आंबेडकरांच्या मन:स्थितीचे दर्शन घडत नाही. प्रभा आपटे यांनी फक्त घटनाच सांगितल्या आहेत, त्यावर भाष्य केले नाही. तरीसुद्धा डॉ. आंबेडकरांच्या जीवन कार्यावर, घटनांवर प्रकाश पडतो, हेही नसे थोडके.

*** स्त्रियांची चरित्रे:–**

पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री उपेक्षितच राहिली. पुरूषांच्या बरोबरीने संसाराचा गाडा ओढणाऱ्या स्त्रीला धर्माने, ना समाजाने जवळ केले, परंतु म.फुले यांनी स्वत: सावित्रीबाईंना शिकविलेच, पण त्याचबरोबर सर्व स्त्रियांच्या शिक्षणाची दारे उघडी केली. 'समाजप्रबोधन

पत्रिके'ने त्या सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची दखल डॉ. मा.गो.माळी यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाची दखल घेऊन घेतली. माळी यांनी लिहिलेल्या या चरित्रग्रंथाचे पां.वा.गाडगीळ यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. १०२ पृष्ठांचे चरित्र सावित्रीबाईंच्या जीवन कार्याची माहिती देते. सावित्रीबाईंच्या अशा स्वतंत्र चरित्राची फार गरज होती, ती डॉ. माळी यांच्या ग्रंथाने पूर्ण केली, असे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षणात मत व्यक्त केले आहे. महात्मा जोतीबांची त्यांच्या हयातीत निंदा झाली. नंतर ते विसरलेच गेले. शाहू महाराज झाले नसते तर जोतिबा इतिहासात पुन्हा प्रकट झालेही नसते. शाहू महाराजांनी फुले यांची सारी शिकवण वीस–बावीस वर्षांच्या आपल्या अल्प कारकीर्दीत बड्या–बड्या शक्तींशी प्रखर झुंज देऊन प्रत्यक्ष व्यवहारात आणली आणि फुले यांच्या शिकवणीचा अभ्यास व प्रचार करणाऱ्या विद्वान विचारवंतांची एफ मोठी पलटण शाहू महाराजांनी साऱ्या मराठी मुलुखात उभी केली. शाहू महाराजांची स्वत:ची कामगिरी फार थोर आहेच, पण त्यांनी फुले संप्रदाय पुन्हा जिवंत व बलवान केला ही त्यांची कामगिरी मोठी, यावर परीक्षणात गाडगीळ यांनी प्रकाश टाकला आहे. शाहू महाराज झाले नसते तर म.फुले यांचा समाजाला पडलेला विसर तसाच राहून ते कायमचे पडद्याआड गेले असते. अशा परिस्थितीत सावित्रीबाई यांच्या कार्याची कोणी दखल घेतली असती?

जोतीबांच्या कार्याची थोरवी भव्य आहे हे लक्षात आले म्हणजे त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंनी जोतीबांच्या कार्यात सहकार्य दिले असल्यास ती गोष्ट चांगलीच झाली. दुधात साखर पडली. 'चंद्रासवे रोहिणी शोभली' असे मानून वाचक समाधान पावतो. प्रा.माळी यांच्या चरित्राचे वैशिष्ट्य सांगताना गाडगीळ लिहितात, 'सावित्रीबाई या एक पतिव्रता व फुले यांच्या निष्ठावंत सहधर्मचारिणी एवढ्याच योग्यतेच्या नसून त्या स्वतंत्रपणे विचारवंत, मतप्रचारक, शिक्षक, संघटनाकार, अहोरात्र समाजसेवेस वाहून घेतलेल्या, कार्य निवडून, उपाय संशोधून इतरांना विचार व प्रेरणा देऊन लोकजागृतीची चळवळ स्वतंत्रपणे उभारणाऱ्या स्त्री–नेता आहेत. हरि नरके यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना म्हटले आहे की, 'त्यांनी शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात होय.' [१८] याचा ठसठशीत प्रत्यय या चरित्रग्रंथाचून येतो यावर गाडगीळ यांनी

प्रकाश टाकला आहे. या ग्रंथात सावित्रीबाईंचे हस्ताक्षरचित्र घालून माळी यांनी सावित्रीबाईंची वैयक्तिक थोरवी अधिक स्पष्ट, रेखीव व बोलकी केली आहे. संशोधन, चिंतन, व्यक्तिचित्र व सामाजिक दृष्टीकोण या सर्व दृष्टीने हा ग्रंथ वाचनीय झाला असल्याचा अभिप्राय गाडगीळ यांनी नोंदवला आहे. प्रा. ना.ग.पवार लिहितात, ''सावित्रीबाईंचे बहुआयामी व आदर्श व्यक्तिमत्व होते. सावित्रीबाई यांच्या बाबतीत जसजसे संशोधन होत गेले, तसतसे त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे दर्शन घडत गेले. या असामान्य व्यक्तिमत्वाला प्रकाशात आणण्याचे व त्यांच्याविषयी पूर्वी नव्हती ती संशोधनात्मक माहिती प्रसिद्ध करऱ्याचे श्रेय डॉ. मा.गो.पाळी यांच्याकडे पार मोठ्या प्रमाणात जाते.''[१९] सावित्रीबाईंचे असामान्य व्यक्तिमत्व प्रकाशात आणल्याबद्दल गाडगीळ यांनीही माळी यांना धन्यवाद दिले आहेत. शिक्षणातील नेत्रदिपक कामगिरी, शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून केलेले कार्य हे भारतीय इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्याच्या योग्यतेचे आहे. हा इतिहासच स्त्रीशिक्षणाला दिशा देणारा ठरला व 'स्त्री' आधुनिक काळात प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहू शकली. या संदर्भात डॉ. मा.गो.माळी लिहितात, ''जोतीरावांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या या वटवृक्षाखाली सावित्रीबाईंची प्रतिमा अस्पष्ट दिसणे हे स्वाभाविक असले किंवा त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य अद्‌भूत व अशक्य कोटीतील आहे, हे एक वास्तव आहे, हे आता सिद्ध झाले आहे.''[२०]

सरोजिनी वैद्य यांनी लिहिलेल्या 'श्रीमती काशीबाई कानिटकर' या चरित्रग्रंथाचे इंदिराबाई सोवनी यांनी परीक्षण केले आहे. श्रीमती काशीबाई कानिटकर यांचे त्या काळातील कर्तृत्व खरोखरच अचाट होते असे म्हटले आहे. पण त्यांचे कर्तृत्व कोणत्या क्षेत्रात होते, कोणते कर्तृत्व अचाट होते याचा उलगडा सोवनी यांनी परीक्षणात केले नाही, फक्त रावसाहेबांनी त्यांना शिकवले व त्यांचे सार्थक त्यांनी उत्तम केले. मराठीतच काय पण इंग्रजीवरही प्रभूत्व मिळविले. पण त्यांच्या माहेरचे वातावरण जुन्या चालीचे असल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली नसल्याचे परीक्षणात सोवनी यांनी म्हटले आहे. वहिनी–रावसाहेबांचा बेबनाव झाल्यानंतरच्या काळात वहिनीबद्दल नाके मुरडली जात. आमच्या रावसाहेबांनीच त्यांना हौसेने शिकवले व सार्वजनिक कामात पुढे लोटले पण आता आपली बायको त्या क्षेत्रात फारच पुढे गेली व आपल्यापेक्षा सरस

झाली याचे त्यांना वैषम्य वाटते, असे बोलले जात. असे म्हटले आहे, यावरून त्याकाळातील स्त्रियांकडे पाहण्याचा जूनाट दृष्टिकोण दिसून येतो.

'समाज प्रबोधन पत्रिके'मध्ये स्त्रियांची चरित्रे जास्त प्रमाणात आली नसली तरी ज्यांच्या कार्याची दखल घ्यायला हवी, त्या सावित्रीबाईंच्या कर्तृत्वाची ओळख नव्याने वाचकांना करून दिली आहे. काशीबाई कानिटकर यांच्या व्यक्तिमत्वावर, कर्तृत्वावर परीक्षणामध्ये इंदिराबाई सोवनी यांनी सविस्तर प्रकाश टाकला असता तर त्यांच्याही कर्तृत्वाची ओळख वाचकांना नक्कीच झाली असती. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडण्याची मुभा नव्हती, त्या काळात या स्त्रियांचे कार्य नक्कीच कौतुकास्पद, अभिमानास्पद आहे.

*** उद्योजकांची चरित्रे:–**

देशाच्या व महाराष्ट्राच्या विकासात विविध प्रकल्पांची व ते निर्माण करणाऱ्या उद्योजकांचा मोठा वाटा आहे. याउद्योजकांची कर्तृत्वे निश्चितच पुढच्यांना प्रेरणा देणारी आहेत. पण अशी चरित्रे हाताच्या बोटशवर बोजता येतील एवढीच आहेत. 'पत्रिके'मध्ये शंतनुराव किर्लोस्करांच्या चरित्राची दखल घेऊन वाचकांना त्यांच्या उत्तुंग कार्याची माहिती करून दिली आहे. 'काळापुढती चार पाऊले' या सविता भावे यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथाचे पां.वा.गाडगीळ यांनी परीक्षण केले आहे. या परीक्षणामध्ये गाडगीळ यांची तळमळ दिसते. शंतनुराव किर्लोस्कर यांचे कार्य मुळात देशाची शान वाढविणारे होते. ते वाचकांपुढे यावे याची मनोमन तळमळ गाडगीळ यांच्या मनात असल्याचे दिसते. एकाच चरित्रग्रंथात दोन व्यक्तिमत्वांची ओळख आपणास होते. एक म्हणजे लक्ष्मणराव किर्लोस्कर आणि दुसरे म्हणजे शंतनुराव किर्लोस्कर. गत कालखंडात शेतीसाठी अवजारे तयार करणाऱ्या लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे चरित्र ही 'काळापुढती चार पाऊले' या शंतनुराव किर्लोस्कर यांच्याविषयी लिहिलेल्या चरित्रग्रंथात येते. त्यांनी आरंभलेले कार्य ऑईल इंजिन्सच्या रूपाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य करणाऱ्या शंतनुराव किर्लोस्करांचे चरित्र सविता भावे यांनी रोचक पद्धतीने माहिती देत साक्षेपाने रेखाटले असल्याचा, परीक्षणात्मक अभिप्राय पां.वा.गाडगीळ यांनी नोंदवला आहे.

प्रथम महाराष्ट्रात, नंतर भारतात व पुढे पुढारलेल्या आणि मागासलेल्या जगात ज्यांची यंत्रे

कारखाने व कीर्ती जाऊन पोचली आहे त्या शंतनुराव किर्लोस्करांचे सविता भावे यांनी लिहिलेले हे चरित्र नव्या पिढीला प्रेरणादायी आहे. पहिल्या प्रकरणात शंतनुरावांचे व्यक्तिमत्व प्रकाशित करणारे व त्यांच्या कर्तृत्ववान आयुष्याला व्यापून टाकणारे एक छोटे प्रश्नोत्तर आले आहे. शंतनुरावांना विचाले, 'तुम्ही एवढे यश कसे मिळविले?' शंतनुराव अगदी स्पष्ट व सहजपणे म्हणाले, 'मी योग्य ठिकाणी जन्म घेतला म्हणून.' या अगदी लहानशा उत्तरात गाडगीळ यांना शंतनुराव किर्लोस्करांची सत्य, मार्मिकता, नम्रता, कृतज्ञता, सहजपणा, कर्तृत्व, धडाडी,आत्मविश्वास असे गुण दिसतात. स्वत: धोके पत्करून परिश्रम केल्याशिवाय आपणा महाराष्ट्रीयनांना मोठे होता येणार नाही, हे माझ्या जीवनापासून शिकण्यासारखे आहे, असे पूर्वी नम्रतेने व उपदेशकाचा आव आणून शंतनुराव बोलू शकले असते. पण शंतनुरावांच्या अंगी धाडस, कर्तृत्व व आत्मविश्वास हे गुण ओतप्रोत असले तरी गर्विष्ठपणा मुळीच नसून वडीलधारी माणसे व सहकारी यांच्यामुळे आपणास औद्योगिक विकास करता आला ही कृतज्ञतेची जाणीव या जाणिवेमुळे आलेली नम्रता व स्नेहपूर्णता हे शंतनुरावांचे गुणविशेष गाडगीळ यांनी परीक्षणात नमूद केले आहेत.

१९०३ साली शंतनुरावांचा जन्मा झाला. १९१० ते १९११ ला औंध येथे लोखंडी नांगराचा कारखाना व किर्लोस्करवाडी वसाहत स्थापन होऊन पुढे १९१४ सालच्या महायुद्धामुले परदेशी लोखंडी नांगर येण्याचे बंद झाले व किर्लोस्करांच्या कारखान्याची वेगाने वाढ झाली. यंत्राची चित्रे काढणे, यंत्राचे अवयव, त्यांची रचना, त्यांचे उद्दिष्ट हे समजून घेणे याचा शंतनुरावांना छंद लागला. सहाजिकच शालेय अभ्यासाकडे त्यांचे लक्ष नव्हते. ते मॅट्रिक नापास झाले. पण लक्ष्मणरावांच्या डोक्यात अमेरिकेच्या यंत्रविद्येची प्रेरणा होती. त्यांनी शंतनुला शाळेतून काढून एकदम अमेरिकेतल्या मॅसेच्युसेटस इन्सिट्युट ऑफ टेकनॉलॉजी या जागतिक कीर्तीच्या संस्थेत शिकायला पाठविले. तेथून तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करूनच शंतनुराव जे परत आले ते वडिलांच्या कारखान्यात यांत्रितक मजुरांचा गणवेश अंगावर चढवून यंत्रे बनविण्याला व यंत्रे जोडण्याला उभे राहिले आणि हा वडिलार्जित धंदा उर्जितावस्थेत आणण्याची जोखमी शंतनुरावांनी वयाच्या २५ व्या वर्षी पत्करली, याची सविस्तर माहिती गाडगीळांनी केलेल्या

परीक्षणातून कळते.

शंतनुरावांचे चरित्रकार सविता भावे यांनी शंतनुरावांची संबंध ओळख वरील दृष्टिकोणातूनच करून दिली आहे. शंतनुरावांच्या प्रचंड कारखानदारी पसाऱ्याचा त्यांनी खोल अभ्यास केला. उपलब्ध वाङ्मय वाचले व पन्नास पाऊणशे संबंधितांच्या मुलाखती घेऊन हे तीनशे पृष्ठांचे उत्कृष्ट चरित्र लिहिले. महाराष्ट्रीय मध्यमवर्गात आदर्श महापुरूष शोधण्याची धडपड चालते व त्यासाठी मरून गेलेल्या इतिहासांची चिवडाचिवड चालते. अथवा विद्यमान राजकीय पुढाऱ्यांबाबतची आवड–नावड हे वांझोटे खटाटोप चालू असतात. अशा हावरट लोकांनी सविमा भावे यांचे हे शंतनुरावांचे चरित्र अभ्यासावे आणि इतिहासात अथवा राजकारणा थोर माणसे शोधण्याऐवजी आधूनिक अर्थकारणात शोधावी. या चरित्राचा नायक अलौकिक बुद्धीचा नाही, अलौकिक शक्तीचा नाही, उत्पादन वाढविण्याने, दर्जेदार माल निर्मिल्याने रोजगार वाढतो, संपत्ती वाढते, माणसाची पात्रता व प्रतिष्ठा वाढते हे शंतनुरावांचे तत्त्वज्ञान व व्यवहारशास्त्र आहे असे गाडगीळ यांनी म्हटले आहे, त्याचा प्रत्यय त्यांच्या कार्यावरून येतो.

भावे यांनी शंतनुरावांचे हे चरित्र फार चांगले लिहिले अहे, असे म्हटले आहे. आपण आपल्या काळापुढे धावले पाहिजे ही वृत्ती समग्र किर्लोस्करांत विशेषत: शंतनुरावांत आढळते. म्हणून 'काळा पुढती चार पाऊले' हे ग्रंथनाम भावे यांनी निवडले व ते सार्थ आहे, असा मार्मिक अभिप्राय नोंदवला आहे. पहिल्याच प्रकरणात शंतनुरावांचे जे शब्दचरित्र अनेकांच्या अनुभवी बोलातून वदविले आहे ते अनेक नामांकित कुंचल्यांनी रेखाटल्याचा भास होतो. हे चित्र खूपच जिवंत व प्रसन्न झाले आहे. शंतनुरावांच्या जीवनाची पार्श्वभूमी म्हणून लक्ष्मणरावांचेही संपूर्ण चरित्र या ग्रंथात आले असल्याने या ग्रंथात दोन चरित्रे आहेत व दोन्ही उत्कृष्ट झाली आहेत, याचे विवेचन करून सांगितले आहे. शंतनुरावांबद्दल चरित्रलेखकाला खुपच आदर आहे व तो त्याच्या लिखाणात पानापानांतून दिसतो पण तो देवभोळा आदर नव्हे, चिकित्सापूर्ण अभ्यासावर व निरीक्षणावर आधारलेला हा आदर असून इतर अनेकांशी शंतनुरावांसंबंधीची मते निरनिराळ्या संदर्भात चरित्रलेखकाने जी दिली आहेत ते वाचल्यानंतर शंतनुरावांची माहिती नसणारा वाचकही लेखकाशी सहमत व समरस होतो असे म्हटले आहे. लक्ष्मणराव किर्लोस्करांनी कारखाना

वाढविल्यानंतरही ते स्वत:ला, 'घिसाडी' म्हणून घेण्यात अभिमान मानीत. शंतनुरावांचे हे चरित्र महाराष्ट्रीय माणून घिसाड्याचा कारखानदार कसा होतो हे सत्य विकासाच्या सर्व टप्प्यांनी दाखवित आहे. आदर्शाच्या शोधासाठी राजकीय वाळवंटात वणवण हिंडणाऱ्या मराठी तरूण तरूणींनी या ग्रंथाचे परिशिलन करावे असे परीक्षण नमूद केले आहे. ते विचार करायला लावणारे आहे. कारण अशा व्यक्तिमत्वाची आजच्या तरूण–तरूणींना प्रेरणादायी ठरणारी व्यक्तिमत्वे आहेत. भावे यांच्या ग्रंथाने मराठी चरित्र वाङ्मयात मोलाची भर पडली असल्याचा मार्मिक अभिप्राय गाडगीळ यांनी नोंदवला आहे. तो सार्थ, यथार्थ वाटतो.

*** परखड समीक्षा:–**

नी.वि.सोवनी यांनी लिहिलेल्या, 'माझे गुरू धनंजयराव गाडगीळ' या चरित्रग्रंथाचे य.दि.फडके यांनी परीक्षण केले आहे. 'गुरूचरित्र की गुरूचारित्र्य हनन' या शीर्षकाने हे परीक्षण केले आहे. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या असामान्य बुद्धिमत्तेचे व अव्वल दर्जाचे अर्थशास्त्र व विचारवंत यांचे चरित्र नी.वि.सोवनी यांनी लिहिले. हे गुरूचरित्र लिहिताना गुरूचारित्र्य हनन झाले असल्याचे य.दि.फडके यांनी स्पष्ट केले आहे. गुरूचारित्र्याचे हनन होण्यामागे कोणती कारणे आहेत, याचा मागोवा फडके यांनी घेतला आहे. धनंजय गाडगीळ यांच्यावर सोवनी यांनी जे आरोप केले, ते का तेही सविस्तर सांगितले आहे. फडके लिहितात, ''गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालकपद कसे मिळाले नाही. हे आपण एक प्राप्त कर्तृत्व म्हणून सांगितले आहे. पण गाडगिळांमुळे सोवनी यांना काय काय मिळाले याचा त्यांनी फारसा तपशील दिला नाही. फक्त नियोजन मंडळाने पाच जलपायन प्रकल्पांची पाहणी करण्यासाठी नेमलेल्या एका समितीवर गाडगिळांच्यामुळे आपली कशी वर्णी लागली त्यासंबंधीचा उल्लेख अन्य संदर्भात जाता जाता सोवनी यांनी केला असल्याचे म्हटले आहे.

सोवनी यांनी आपल्या पुस्तकात काही ठिकाणी 'आम्ही' हा शब्द योजून गाडगीळांवर टीका केली असल्याचे नमूद केले आहे. स्वत:विषयी बोलताना 'आम्ही' हा शब्द वापरण्याचा अधिकार फक्त राजे–महाराज व वर्तमानपत्राचा सर्वज्ञ संपादकांनाच दिलेला असतो, हे सांगून आम्ही या शब्दांवर त्यांनी सोवनी यांच्या वापरावर आक्षेप व्यक्त केला आहे. गाडगिळांविषयी

आपल्याप्रमाणेच प्रतिकूल मत व्यक्त करणाऱ्या आपल्या अन्य सहकाऱ्यांचा नामनिर्देश आपण केला असता तर तेही आपल्या तथाकथित निर्भिडपणाशी सुसंगत ठरले असते, असे फडके यांनी सोवनी यांच्या या चरित्रग्रंथाचे परीक्षण करताना सौम्यपण स्पष्ट शब्दात आपले स्पष्ट मत प्रकट केले आहे.

गाडगीळांच्या विहितकार्याची सडेतोड समीक्षा करताना पुराव्यादाखल आपण निरनिराळे तीन प्रसंगांचे आपले व्यक्तिगत अनुभव सादर केले आहेत. यासंबंधीच्या प्रकाशित पुराव्याच्या आधारे आपल्या विधानांची चिकित्सा केली तर ती विधाने मुळीच विश्वसनिय वाटत नाही. एवढेच नव्हे तर अनेकदा आपण गाडगीळांच्या भूमिकेचा पद्धतशीर विपर्यास्त करीत आहात असा ग्रह झाल्याशिवाय रहात नाही. सोवनी यांनी गाडगीळांच्या जिवित कार्याची समीक्षा करतानाही त्यांच्या भूमिकेचा विपर्यास केला असल्याचा आरोप फडके यांनी चरित्रकार सोवनी यांच्यावर केला आहे, तो रास्तच वाटतो. फडके यांच्या मते सोवनी यांच्यामते गाडगीळांविषयी कडवटपणा आहे. पण ते सरळ सरळ असे सांगत नसले तरी पुस्तक वाचल्यावर ते स्पष्ट दिसते. सोवनी यांना संचालकपद मिळाले नाही याबद्दलचा संताप हाच त्यांच्या समीक्षेच्या मुळाशी असल्याचे फडके यांचे मत आहे. फडके यांच्या मते सोवनी यांच्यावार अन्याय झाला या भावनेने चिडून तेंव्हाच गाडगीळांचा मुलाहिजा न ठेवता त्यांच्या हयातीत आपले गाऱ्हाणे वेशीवर टांगले असते तर तेही समजण्यासारखे होते. मात्र गाडगीळ हयात असताना जे खाजगी हिशोब चुकते करण्यास सोवनींची इच्छा होती पण ते चुकते करण्याची धमक आपण कधीच दाखविली नाही ते गाडगीळांच्या मरणानंतर त्यांच्यावर वार करून आपण चुकते करणे हे त्रयस्थ वाचकाश निषेधार्थ वाटल्याशिवाय रहात नाही असे परखड शब्दात आपले विचार मांडले आहेत.

*** परकियांची चरित्रे:–**

महात्मा गांधी व रवींद्रनाथ टागोर यांचे दीर्घकालीन मित्र व सहकारी आणि भारतीय जनतेच्या वतीने ब्रिटिश साम्राज्याशीही सतत ३६ वर्षे झगडत राहिलेले इंग्रज मिशनरी सी.एफ. ॲन्ड्रयुज यांचे विस्तिर्ण चरित्र लंडन विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक ह्यू. टिकर यांनी लिहिले आहे. या चरित्रग्रंथाचे परीक्षण पां.वा.गाडगीळ यांनी केले आहे. 'प्रेमासाठी दिव्य' हे शिर्षक

देऊन गाडगीळ यांनी हे परीक्षण केले आहे. यामधुन आपणास ॲन्ड्रयुज यांच्याविषयी सविस्तर माहिती मिळते. चार्ल्सफीअर ॲन्ड्रयुज यांचा जन्म इंग्लडमध्ये १८७१ साली झाला. १९०४ साली एका ब्रिटिश मिशनतर्फे दिल्लीच्या स्टीफन्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल होण्यासाठी ॲन्ड्रयुज भारतात आले. पण ब्रिटिश मिशनरी हे ख्रिस्ताचे, समानतेचे तत्त्व गोऱ्या लोकांनाच लावतात. गोरे नसणाऱ्यांना भारतीयांना, आफ्रिकनांना हिनतेने वागवतात. त्यात प्रामाणिक ख्रिस्तनिष्ठा नाही असे त्यांचे मत झाले व ॲन्ड्रयुजने ब्रिटिश मिशनऱ्यांशी आपला संबंध तोडला. ब्रिटिश मिशनरी ही त्यांना पोरकेपणाने वागवू लागले. पण ॲन्ड्रयुजने ख्रिस्तभक्ती सोडली नाही. भारतात आल्यानंतर इथल्या जनतेला ब्रिटिशांकडून जी हिनतेची वागणूक मिळते तिच्याशी झगडण्याचे कामी त्यांनी ख्रिस्तभक्त या नात्याने स्वत:ला वाहून घेतले व भारताला दुसरी मातृभूमी मानले. ॲन्ड्रयुज यांनी हिंदू धर्माचा व बुद्ध धर्माचा अभ्यास केला. त्यावरून ख्रिस्ताने आपली शिकवण बुद्धापासून घेतली असावी असे त्यांना वाटू लागले. यामुळे ख्रिस्तधर्म विरूद्ध हिंदू धर्म ही इतर मिशनऱ्यांची भूमिका ॲन्ड्रयुज यांनी कधीच स्वीकारली नाही. ख्रिस्तधर्म व हिंदूधर्म यांच्या मिलाफाने हिंदूधर्म अधिक उदात्त होईल असे मत झाले ही त्यांची विचारसरणी पां.वा.गाडगीळ यांनी व्यक्त केली आहे.

ॲन्ड्रयुज हे नेहमी गांधी, टागोर यांना व इतर अनेकांना पत्रे लिहित. अशी हजारो पत्रे प्राध्यापक टिंकर यांनी जमविली आहेत. त्यांची ग्रंथस्थापनाही पुष्कळ असल्याचा उल्लेख या ग्रंथात आहे. पण ॲन्ड्रयुज यांच्या धार्मिक, सामाजिक, तत्त्वज्ञानविषयक मतांची माहिती अथवा चर्चा या ग्रंथात कोठेच नाही. ॲन्ड्रयुज यांचे वाङ्मय, तत्त्वज्ञान, धर्मविषयक मते इत्यादि प्रकारचे ॲन्ड्रयुजदर्शन घडविणे हा एक या ग्रंथाचा हेतू नसावा, कारण ग्रंथाचे मुख्य नाव, ‘ ॲन्ड्रयुज चरित्र’ असे नसून ॲड्रीयल ऑफ लव्ह म्हणजे ‘प्रेमासाठी केलेले दिव्य’ हे आहे. आणि भारताला दुसरी मातृभूमी मानल्यानंतर सतत अखेरपर्यंत ॲन्ड्रयुज मानवतेच्या प्रेमाने भारतासाठी जे अतोनात कष्ट केले त्या कष्टाचा इतिहास लिहावा एवढ्याच हेतुने हा सारा परिश्रम केल्याचे गाडगीळ यांनी नमूद केले आहे त्यामुळे लेखकाने ॲन्ड्रयुजच्या भारताविषयीच्या प्रेमाची महती सांगितल्याचे गाडगीळ स्पष्ट करतात.

१९०४ साली भारताच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवल्यापासून १९४० साली कलकत्त्यास मृत्युच्या अधिन होईपर्यंत भारतीयांच्या सेवेसाठी लिखाण, प्रवास,चर्चा, गाठीभेठी यात ॲन्ड्रयुज यांचे संपूर्ण आयुष्य खर्ची पडले. आपणास लोकसेवेत आयुष्य घालवायचे असल्याने कौटुंबिक पाश नसावे याच दृष्टीने ख्रिस्त व बुद्ध यांन विवाहबंधन स्वीकारले नाही, तसेच त्याच कारणांसाठी ॲन्ड्रयुजने विवाह केला नाही. महात्मा मुन्शिराम म्हणजेच नंतर प्रसिद्धीस आलेले स्वामी श्रद्धानंद यांच्याशी ॲन्ड्रयुज यांचा घनिष्ट संबंध होता. टागोरांच्या गितांजलीत, इतर वाङ्मयात ॲन्ड्रयुजना ख्रिस्ताच्या शिकवणीची पडछाया दिसली व रविंद्रनाथ हे ॲन्ड्रयुजचे प्रेमपूर्ती गुरूदेव झाले. गांधीजींनी दक्षिणअफ्रिकेत मुदतबंध भारतीय मजुरांच्या वतीने तेथल्या गोऱ्या सरकारशी शांततेचा संग्राम सुरू केला असता, गोपाळकृष्ण गोखले यांच्या प्रेरणेने ॲन्ड्रयुज दक्षिण अफ्रिकेत गेले. तेथे गांधीजींशी ॲन्ड्रयुज यांची ओळख झाली. प्रेम जडले ते ॲन्ड्रयुज यांच्या मृत्युपर्यंत टिकले. गाडगीळ यांनी ॲन्ड्रयुज यांच्या भारतप्रेमाविषयी महात्मा गांधी, रविंद्रनाथ टागोर यांच्याविषयीची आत्मियता यावर फार चांगला प्रकाश टाकला आहे.

प्रा.टिंकर यांच्या या ग्रंथाने एक मोठी कामगिरी केली आहे. ॲन्ड्रयुज यांचे नाव पुष्कळांना परिचित आहे, पण त्यांच्या कामगिरीची माहिती येते फार थोडी आहे. परदेशी गेलेल्या भारतीय मजुरांची आपत्ती दूर करण्यासाठी व गांधीजींची बाजू ब्रिटिशांना समजावून सांगण्यासाठी भारतात आल्यापासूनच्या ३६ वर्षांत ॲन्ड्रयुज जे जिवापाड परिश्रम केले त्याची तपशिलवार व सुसंगत माहिती या ग्रंथात पहिल्यानेच आली असून इंग्रजातील एका निष्काम कर्मयोग्याने भारतासाठी रोष पत्करूनही आपले जीवन कसे शिणवले हे या ग्रंथाने भारताला व जगाला सांगितले आहे असा पां.वा.गाडगीळ यांनी अभिप्राय नोंदविला आहे तो सार्थ वाटतो.

ॲन्ड्रयुज यांचे सर्व चरित्र टागोरांनी पाहिले व अनुभवले. ख्रिस्तांच्या शिकवणीचा प्रभाव ॲन्ड्रयुजच्या मनावर पडलेला असून तो ॲन्ड्रयुजच्या कृतीत उतरला होता हेही टागोरांना दिसत होते. स्वत: टागोर हिंदू धर्माचे अभिमानी असून हिंदूधर्म व ख्रिस्तीधर्म यांचे तौलनिक अवलोकन व चिंतन या आधुनिक भारतीय महाकवीच्या मनात चालले असणार. यामुळे ॲन्ड्रयुज यांची 'मी ख्रिस्तांचे कोणते ऋण लागतो?' या मथळ्याच्या इंग्रजी पुस्तिकेबंसंधी बोलण्याच्या निमित्ताने

टागोरांनी हिंदूधर्म व ख्रिस्तधर्म यांच्या परिणामावर जो तौलनिक अभिप्राय व्यक्त केला आहे; तो केवळ अॅन्ड्रयुज चरित्राच्या दृष्टीने नव्हे तर भारताच्या एकंदर इतिहासाच्या दृष्टीनेही चिंतनीय आहे. टागोर सांगतात, 'ख्रिस्त भक्ताच्या आत्मविष्काराची पद्धती कृतिपरायण प्रीती ही आहे. हिंदूची आत्मविष्कार पद्धती प्रीतिभावानेतच कळून येते. पण ही प्रीती कृतिपरायण नाही. आध्यात्मिक भावनेची तंद्री अनुभवणे एवढेच हिंदू माणसाचे उद्दिष्ट असते.' टागोरांच्या या मताबद्दल त्यांनी परिक्षणात मत व्यक्त केले आहे. टागोरांनी थोड्या शब्दांत पुष्कळ काही सांगितल्याचा अभिप्राय नोंदवला आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांवर रागवण्याची भारतीयांची प्रवृत्ती प्रसिद्ध आहे. पण या देशातील मानासलेल्या जातीजमातींच्या हितांसाठी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी जे कार्य केले त्या मानाने हिंदूंचे कार्य फारच कमी आहे. टागोरांच्या वरील अभिप्रायाच्या दृष्टिकोनातून अॅन्ड्रयूज यांच्या कतृत्वाचा अभ्यास करणाऱ्याला हा चरित्रग्रंथ फार उपयुक्त आहे, असे गाडगीळ यांनी सांगितले आहे. आपल्या देशातील राजकीय व्यक्तीमत्वांप्रमाणेच परदेशस्थ राष्ट्रवीरांची चरित्रेही त्यांच्या उदाहरणाने येथल्या तरूणांना प्रेरित व्हावे या उद्देशाने 'पत्रिके'मध्ये 'अॅन्ड्रयुज' चे चरित्र दिले आहे असे वाटते.

कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'जेम्स कमिंग हॅम ग्रॅट डफ' या चरित्र ग्रंथाचे वसंत पळशीकर यांनी परीक्षण केले आहे. 'ग्रॅट–डफचे हे चरित्र जुजबी स्वरुपात लिहिले गेले आहे.' मराठ्यांचा इतिहास ब्रिटिश दृष्टिकोनातून मांडणाऱ्या ग्रॅट–डफ चे विस्तृत चरित्र लिहिले जावे अशी अपेक्षा परीक्षणात्मक अभिप्रायात वसंत पळशीकर व्यक्त करतात.

*** कलावंताचे चरित्र :–**

माणसाच्या जीवनात चित्रशिल्पादी तसेच नाट्य–चित्रपट–संगीतासारख्या कलांना जरी महत्वाचे स्थान असले आणि त्यातून जरी त्या क्षेत्रांची सांस्कृतीक जडणघडण समजत असली, तरी या क्षेत्रांतील नामवंतापैकी फारच थोडे चरित्र नायक म्हणून मराठीत अवतरले आहेत. 'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या दोन चरित्रग्रंथांचे प्रभाकर नारायण परंजपे यांनी परीक्षण केले आहे. इसाक मुजावर यांनी लिहिलेल्या 'दादासाहेब फाळके' आणि बावकर व वाशीकर यांनी लिहिलेल 'तयाचा वेलू गेला गगनावरी' या चरित्रग्रंथांचे

परीक्षण रसिक–वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. दादासाहेब फाळके यांच्या कर्तृत्वाचे आणि व्यक्तिमत्वाचे कंगोरे स्पष्ट करणारे आहे.

जागतिक चित्रपटनिर्मितीच्या इतिहासात डेव्हिड वॉर्क ग्रिफिथ यांचे जे स्थान आहे, तेच स्थान भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात धुंडिराम गोविंद ऊर्फ दादासाहेब फाळके यांचे आहे. चित्रपट तंत्र, वितरण, मुव्ही कॅमेरा हे शब्दच ठाऊक नसण्याच्या काळात फाळके यांनी एकहाती प्रयत्न करुन पहिल्या भारतीय चित्रपटाची निर्मिती केली. ३ मे, १९१३ रोजी प्रदर्शित झालेला फाळकेंचा 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. त्यंत प्रतिकूल परिस्थितीत पाया घातला आणि म्हणूनच त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हटले जाते.

बावकर व वाशीकर यांनी लिहिलेल्या 'तयाचा वेलू गेला गगनावरी' या चरित्रग्रंथाचे परीक्षण करताना परांजपे यांनी चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रात दादासाहेब फाळके यांनी जे पायाभूत कार्य केले त्यावर प्रकाश टाकला आहे. दादासाहेब यांचा जन्म इ.स. १८७० मध्ये नाशिक येथे झाला. मुद्रण व्यवसायात असलेल्या फाळकेंना १९१० साली लाईफ ऑफ ख्राईस्ट हा चित्रपट पाहण्याची संधी मिळाली आणि त्यांनी चित्रपट निर्मिती करण्याचा ध्यासच घेतला. मित्र मंडळीकडून कर्ज उभारुन १९१२ साली ते इंग्लंडमध्ये चित्रपटतंत्र शिकून घेण्यासाठी गेले. तेथून आल्यावर थोड्याच अवधीत त्यांनी इंग्लंडहून यंत्र सामग्री मिळवली आणि राहत्या घरातच स्टुडिओ उभारला. चित्रीकरणाचे छोटे छोटे प्रयोग झाल्यावर त्यांनी पूर्ण लांबीच्या मूकपटाच्या निर्मितीला सुरुवात केली. द. दा. दाबके (हरिश्चंद्र) आणि भालचंद्र फाळके (रोहिदास) यांना प्रमुख भूमिकांसाठी घेऊन अत्यंत परिश्रमपूर्वक पहिल्या स्वदेशी चित्रपटाची त्यांनी निर्मिती केली.

आपल्या पहिल्या चित्रपटाच्या यशस्वी निर्मितीनंतर फाळके यांनी 'भस्मासूर मोहिनी' आणि 'सत्यवान सावित्री'(१९१४) या चित्रपटांची निर्मिती केली. १९१३ ते १९३३ दरम्यानच्या वीस वर्षात स्वत: निर्मिलेल्या तीन चित्रपटांसह एकूण सत्तेचाळीस मूकपट आणि एका बोलपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले. अत्यंत निष्ठेने दृकश्राव्य माध्यमाची मुहूर्तमेठ रोवणाऱ्या फाळकेंनी वितरण व्यवस्थेच्या अभावर मात करण्यासाठी प्रिंटस्चे डबे खांद्यावर घेऊन गावोगाव पायपीट केली, पैसा, मनुष्यबळ सर्वाचाच अभाव आणि इतिहास घडवला. या अट्टाहासापायी अमाप कर्ज

काढली. मात्र ‘लंकादहन’ च्या लक्षणीय यशामुळे ते आर्थिकदृष्ट्या सावरले. जिज्ञासा, संशोधकवृत्ती, कलात्मकदृष्टिकोण आणि कष्टाळूवृत्ती या भांडवलावर त्यांनी शून्यातून चित्रपट व्यवसायाचा पाया घातला, त्यात त्यांना यश मिळाल्यावर भारतभर निर्मितीचे प्रयत्न सुरु झाले. त्यांनी दाखवलेल्या मार्गावरुन इतरांनी आपली वाटचाल सुरु केली; चित्रपटसृष्टीत फाळके यांनी केलेल्या पायाभूत कार्याची ओळख आपणास या परीक्षणावरुन होते.

**निरीक्षणे :–**

- मराठी वाङ्मयक्षेत्राच्या चरित्रप्रांताचे मर्यादित पण वाचकांना प्रेरणादायी असणाऱ्या चरित्र ग्रंथाची ‘पत्रिके’ ने दखल घेतल्याचे दिसते.
- चरित्रनायकाचे केवळ गुणगान केले नसून त्यांच्या गुणदोषांसह त्यांचे समतोल चित्रण कसे झाले आहे, यावर परिक्षणात प्रकाश टाकल्याचे दिसते.
- संतचरित्रामध्ये मोडणाऱ्या ‘श्री गाडगेमहाराज’ या चरित्र ग्रंथामध्ये लेखकांची अवीट श्रद्धेची उत्कट भावना असल्याचे परीक्षणावरुन जाणवते. श्रद्धाभावाव्यतिरिक्त काही नसल्याचे नमूद केले आहे.
- ‘पत्रिके’तील परीक्षणे वाचकांना चरित्रनायकाकडे पाहण्याची नवी दृष्टी देतात. नव्याने विचार करायला लावतात.
- ‘पत्रिके’तील चरित्र ग्रंथावरील परीक्षणांमुळे समाज सुधारकांच्या कार्याची माहिती मिळते, प्रेरणा मिळते.
- बी. आर. नंदा यांनी लिहिलेल्या, गोखले चरित्राचे व. भ. कर्णिक यांनी परीक्षण वरुन गोखलेकालीन भारतीय राजकारण वाचकांना कळते.
- चरित्र नायकाच्या व्यक्तिमत्वाची उकल करणारे, त्यांच्या विचारांचे विश्लेषण करणारे व त्यांच्या भूमिकेची व कार्याची चिकित्सा करणारी चरित्र परीक्षणे ‘पत्रिके’ मधून झाली आहेत.
- साने गुरूजींच्या समग्र जीवनाचे दर्शन ‘पत्रिके’तील परीक्षणांमुळे वाचकांना होते.

- ‘समाज प्रबोधन पत्रिके’ मध्ये क्रांतिकारकांच्या चरित्रांची दखल घेतल्याचे दिसते. एम. एन. रॉय, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा समावेश होतो.
- ‘पत्रिके’ ने शाहू राजांचे व्यक्तिमत्व, कर्तृत्व, दूरदृष्टी, महत्वाकांक्षा, बुद्धिमत्ता यांचे भव्यदिव्य दर्शन वाचकांना घडविले.
- ‘१९ व्या शतकातील वैचारिक प्रबोधनाचा पाया घालणाऱ्या लोकहितवादींच्या विचारांची चिकित्सा होण्याची गरज आहे.’ ही चिकित्सा ‘पत्रिके’ परीक्षणातून झाली नसल्याचे दिसते.
- ‘समाज प्रबोधन पत्रिके’ खऱ्या अर्थाने उपेक्षित राहिलेल्या र. धों. कर्वे, देशभक्त तात्या करमळकर, सामंत गुरुजी यांच्या चरित्र ग्रंथाचे परीक्षण करुन त्यांच्या कार्याची माहिती परीक्षणातून मिळते. अंधारातले उजेडात आणले.
- हरिहरनाथांचे त्यागी, नि:स्वार्थी व कामगार चळवळीला समर्पित जीवन यांची ओळख ‘पत्रिके’मुळे वाचकांना झाली.
- ‘पत्रिके’तील परीक्षणातून सावित्रीबाईच्या कृर्तत्वावर, स्वतंत्र बुद्धीच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला आहे.
- नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणाऱ्या शंतनुराव किर्लोस्करांचे जीवनकार्याची माहिती परिक्षणातून मिळते. या परीक्षणामागे शंतनुराव किर्लोस्करांचे कार्य समाजाला, नव्या पिढीला कळावे, ही तळमळ दिसते.
- भारताला दुसरी मातृभूमी मानणाऱ्या ॲन्ड्रूयूज ने मानवतेच्या प्रेमाने भारतासाठी अतोनात कष्ट केले, त्या कष्टाचा इतिहास ‘पत्रिके’ ने वाचकांसमोर मांडला. त्याचबरोबर म. गांधी व रवींद्रनाथ टागोर यांच्याबरोबरच्या जीव्हाळ्याच्या नातेसंबंधावर ही प्रकाश टाकला असल्याचे दिसते.

‘समाज प्रबोधन पत्रिके’ मध्ये जी चरित्र ग्रंथावर परीक्षणे झाली ती वाचकांना समाजसेवक, राजकारणी, संत, क्रांतिकारक यांच्या कार्याची, पराक्रमाची माहिती देणारी, प्रेरणादायी ठरणारी अशीच आहेत. काही परीक्षणे अशी आहेत की, त्यामुळे समाजाच्या

विस्मृतीत गेलेल्या देशभक्तांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी आहेत. त्यांना पुन्हा उजेडात आणणारी आहेत. तसेच लोकहितवादी, र. धों. कर्वे या उपेक्षित राहिलेल्या समासुधारकांच्या कार्यावर प्रकाश टाकून त्यावर नव्याने लिखाण झाले पाहिजे, अशी अपेक्षा करणारी ही परीक्षणे 'पत्रिके'मध्ये आल्याचे दिसते. 'चरित्र ग्रंथांच्या परीक्षणामुळे वाचकांना शंतनूराव किर्लोस्करांच्या कार्याची माहिती होते.' त्यांचे महाराष्ट्राच्या, देशाच्या विकासामध्ये असलेले योगदान समजते. 'पत्रिके' चे हे कार्य उल्लेखनीय वाटते.

*** संदर्भ ग्रंथ**


१) ते स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा (इ.स. १९४७ ते २०००), संपा. रवींद्र दवी, पुष्पा भावे आणि इतर प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९१, पृ. क्र. २८३.

२) चरित्र–आत्मचरित्र, प्रा. जान्हवी संत, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९७०, पृ. क्र. ३.

३) चरित्र–आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास, प्रा. अ. म. जोशी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे तृतीयावृत्ती, १९९९, पृ. क्र. २२.

४) संत साहित्य आणि समाज प्रबोधन, संपा. प्रा. रा. तु. भगत, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. प्रथम आवृत्ती–२००५, पृ. क्र. ४८.

५) त्तत्रैव, पृ. क्र. ५०.

६) श्री संत गाडगेबाबा, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, नालंदा प्रकाशन, सांगली प्र. आ. १९५२, पृ. क्र. ९.

७) औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास, डॉ. जदूनाथ सरकार, अनु. डॉ. रा. गो. कोलालकर, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९, पृ. क्र. ३.

८) गोपाळ कृष्ण गोखले : ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, बलराज नंदा, अनुवादक वसंत पळशीकर, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे १९८६, पृ. क्र. ८.

९) गोखले चरित्र– ना. क कुलकर्णी, 'समाज प्रबोधन पत्रिका' वर्ष १५, अंक–८२, जुलै–ऑगस्ट, १९७८, पृ. २१९.

१०) मराठी चरित्र : रुप आणि इतिहास, जयंत वष्ट, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००९, पृ. क्र. १८४.

११) स्वातंत्र्यवीर सावरकर, धनंजय कीर, अनुवादक–द. पो. खांबेट, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००८, पृ. क्र. १४.

१२) धनंजय कीर : व्यक्ति आणि चरित्रकार, संपा. गं. दे. खानोलकर, प्र. आ. १९७४, पृ. क्र. ४९.

१३) व्यक्तिविमर्शक द. न. गोखले, डॉ. व. दि. कुलकर्णी, सोहम प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०००, पृ. क्र. ७२.

१४) क्रांतिवीर बाबाराव सावरकर, डॉ. द. न. गोखले श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७५, पृ. क्र. १०.

१५) वास्तव आणि दृष्टिक्षेप, प्रा. मो. नि. ठोके, पारख प्रकाशन, प्र. आ. १९८८, पृ. क्र. १०५.

१६) राजर्षी शाहू : संदर्भ आणि भूमिका, भोसले एस. एस. रणजित बुक स्टॉल, कोल्हापूर, पृ. क्र. ७४.

१७) पत्रकारिता विचार व व्यवहार, प्रा. सुधीर वामनराव गव्हाणे, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. १९९५, पृ. क्र. ५२.

१८) सावित्रीबाई फुले चरित्र आणि समीक्षा, जी. ए. उगले, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, २००५, पृ. क्र. ३१.

१९) सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्व, प्रा. ना. ग. पवार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वितीयावृत्ती २०१०, पृ. क्र. २२.

२०) सावित्रीबाई फुले : विचार आणि कार्य, प्रा. सुनिता बिडवे–ढगे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जाने. २०१०, पृ. क्र. १५.

# प्रकरण सहावे

# ‘समाज प्रबोधन पत्रिके’तील समीक्षा प्रकारनिहाय समीक्षा विचार

# प्रकरण सहावे

## ‘समाज प्रबोधन पत्रिके’तील समीक्षा प्रकारनिहाय समीक्षा विचार

या प्रकरणामध्ये ‘समाज प्रबोधन पत्रिके’तील समीक्षाप्रकार निहाय समीक्षा विचार करण्याचे योजिले आहे. समीक्षा प्रकार निहाय भाग पुढील प्रमाणे आहे. समाजशास्त्रीय समीक्षा, चरित्रात्मक समीक्षा, गांधीवादी समीक्षा, आस्वादक समीक्षा, स्त्रीवादी समीक्षा, रूपवादी समीक्षा, तौलनिक समीक्षा, मार्क्सवादी समीक्षा अशा विविध समीक्षा प्रकारानुरूप समीक्षेचा विचार केला आहे.

भारतीय संस्कृतीच्या इतिहासानुसार या भूतलावर काव्याचा म्हणजे सर्जनशील साहित्याचा पहिला अविष्कार वाल्मीकी ऋषींच्या ‘मा निषाद प्रतिष्ठ त्वमगन.....’ या श्लोकात झाला. या छंदोबद्ध म्हणून अननुभूत आणि नाविण्यपूर्ण आविष्काराने विस्मयचकित झालेल्या वाल्मिकींनाही ‘किम् इदम् व्यावहर्तम् मया’ ( मी जे उच्चारले ते काय आहे?) असा प्रश्न विचारावास वाटला. साहित्य समीक्षाही त्याचक्षणी जन्माला आली असे म्हणता येईल. पहिल्या क्षणापासून समीक्षेचे सर्जनाशी सावलीसारखे नाते जुळले. पंचापुढे लोकांमधील आपल्या अप्रियतेचे कारण स्पष्ट करताना सॉक्रेटिसने आपण समाजात विद्वान म्हणून समजल्या जाणाऱ्या मान्यवरांच्या विद्वतेचा पडताळा पाहण्याचा कसा शोध घेतला आणि त्यात आपली कशी निराशा झाली हे सांगितले. कवींच्या मुलांखतींचा उल्लेख करून तो म्हणाला ‘‘सभ्य गृहस्थहो, मला सत्य सांगायला लाज वाटते. मी काही अत्यंत सुरचित अशा कविता घेतल्या आणि कवींना त्याचा अर्थ विचारला..... पण (मला) असे दिसले की कवितेत काय म्हणायचे आहे हे त्यांना सांगता येत नव्हते....’’ सॉक्रेटिसने पुढे असेही नमूद केले की तेथे त्यावेळी उपस्थित असलेली इतर मंडळी कवींन केलेल्या कवितांवर कवींपेक्षा अधिक चांगली बोलत होती. सॉक्रेटिसने सांगितलेल्या घटनेमागील सत्य हे आहे की सर्जन क्षमता आणि समीक्षण क्षमता या दोन भिन्न शक्ती आहेत. आणि म्हणूनच समीक्षेचा जन्म झाला आणि तोही कविता काय हे सांगण्यासाठी.

जीवनशोध आणि आत्मशोध हे साहित्य निर्मितीचे मूलभूत प्रेरणास्त्रोत आहेत. जीवन विशाल आहे तसे मानवी मन हे ही अथांग आहे. त्यामुळे कितीही साहित्य लिहिले गेले तरी

लेखकांना विषयाची वानवा कधीच पडत नाही. परंतु साहित्यनिर्मितीसाठी एवढेच पुरेसे नसते, जीवनशोध आणि आत्मशोधामागील लेखकाची भूमिका कोणती आहे, म्हणजे कोणत्या जाणीवेतून किंवा भूमिकेतून तो जीवनशोध घेतो आहे, हेही तेवढेच महत्त्वाचे असते.

भाषा या माध्यमातून साकार होणारी साहित्यकृती ही एक कलावस्तू आहे या विषयी दुमत नसले तरी समीक्षा हे शास्त्र आहे की कला, असेही मुद्दे उपस्थित झालेले दिसतात. कलारूप साहित्यकृतीप्रमाणेच तिचे आस्वाद आणि विश्लेषण ग्रंथित करणारी समीक्षा ही देखील एकापरीने कलाच आहे, असे प्रतिपादन झालेले दिसून येते. या भूमिकेत काही प्रमाणात तथ्य असले तरी तारतम्याने विचार केला तर शेवटी समीक्षा शास्त्र आहे, या निष्कर्षाप्रत यावे लागते. समीक्षकाकडे आकलन आणि आस्वादनापलीकडे जाणारी काही तर्कशुद्ध शास्त्रीय प्रणाली नसेल तर कलाकृतींचे मूल्यांकन त्यांची वर्गवारी, प्रतवारी आणि गुणवत्ता निश्चिती ही प्रक्रियाच अशक्य होऊन बसेल.

साहित्यकृतीत देहीभूत झालेल्या आशयाचे जीवनाशी असलेले अनुसंधान शोधणे, त्याचे औचित्य शोधणे किंवा एक कलावस्तू म्हणून साहित्यकृतीचे सौंदर्यशास्त्र अभ्यासणे या दोन सारणींमधूनच समीक्षा व्यूहांचा प्रवास झालेला आहे. आणि अजूनही होत आहे. समीक्षेच्या कार्याविषयी वसंत आबाजी डहाके लिहितात, ''सर्जनशील साहित्याला दिशा देणे, साहित्य व्यवहाराचे संतुलन कायम ठेवणे आणि साहित्यकृतीच्या आकलनासाठी साधने पुरविणे हे समीक्षेचे कार्य आहे. त्यामुळे सर्जनात्मक साहित्याप्रमाणे समीक्षात्मक साहित्य ही तितकेच महत्त्वाचे ठरते.''[१]

*** समाशास्त्रीय समीक्षा:–**

समाज शास्त्रीय समीक्षेच्या अनुषंगाने 'माझा प्रवास' एक सामाजिक आकलन'– अशोक चौसाळकर, 'कर्म सिद्धांताचा सामाजिक अन्वयार्थ' –सरोज देशपांडे, 'इरावतीबाईंचे संस्कृतिविषयक लेखन'– गो. के. भट, 'सप्तपदी'– सुभाष पां. सोमण, 'धर्म आणि समाजपरिवर्तन : परस्परविरोधी की परस्परपूरक– अनिता पगारे, 'मराठी साहित्यातील ख्रिस्ती समाजदर्शन'–सिसिलिया कार्व्हालो, 'वाङ्मयीन बांधिलकीचा प्रश्न'– सु. श्री. पांढरी पांडे,

काळाची पाऊले– निलिमा भावे, समाजातील स्त्रियांचे स्थान– इंदुमती केळकर, भारतीय राजकारणातील जातीयता–वसंत पळशीकर, आगरकरांची जातिमीमांसा जुजबी का राहिली?– यशवंत सुमंत, शेजवलकरांचे संस्कृतिविषयक विचार–सदानंद मोरे, स्त्री–एक सामाजिक अभ्यास– ह. म. घोडके, साने गुरुजींच्या कादंबऱ्यातील आदर्श समाजाचा शोध–हरिश्चंद्र थोरात, साहित्य विचार आणि समाजचिंतन–स. ह. देशपांडे या लेखांचा विचार प्रस्तुत आहे.

'माझा प्रवास' एक सामाजिक आकलन या लेखात अशोक चौसाळकर यांनी गोडसे भटजी यांच्या 'माझा प्रवास' या पुस्तकाचे परीक्षण समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केले आहे. १८५७ चा शिपायांचा उठाव भारताच्या इतिहासातील एक महत्वाचे प्रकरण आहे. १८५७ च्या लष्करी उठावाबाबत त्यावेळी भारतात दोन मतप्रवाह होते. इंग्रजी शिक्षणाने पुष्ट झालेल्या लहानशा मध्यमवर्गाला हा उठाव मोडला जावा असे वाटत होते, पण देशातील बहुसंख्य परंपराप्रिय समाज बंडाच्या यशाची कामना करीत होता. कारण पुन: हिंदु–मुस्लमानी आली तरच आपला धर्म वाचेल असे त्यास वाटत होते. गोडसे भटजी याच वर्गाचे प्रतिनिधी असल्याने त्या घटनेकडे परंपरागत व्यवस्थेचे प्रतिनिधी म्हणून कसे पाहतात, त्यांचे सामाजिक विचार काय होते व त्यांच्या आजुबाजूचा समाज कसा होता हे सांगण्याचा प्रयत्न चौसाळकर यांनी केला आहे.

गोडसे भटजीच्या प्रवास वर्णनामध्ये त्या काळची सामाजिक परिस्थिती फार चांगल्या प्रकारे व्यक्त झाली आहे. बहुसंख्य भारतीय समाज अजूनही अज्ञानपणात पिचत होता आणि इंग्रजांनी काही सुधारणा करण्याचे योजिताच सर्व समाज 'एकंकार' होणार 'सब गोलंकार' होणार म्हरुन घाबरुन गेला. जातिव्यवस्थेला थोडासाही धोका निर्माण होताच परंपरागत समाज खवळून उठला. काडतुसाच्या प्रकरणी इंग्रजांकडे नोकरी मिळाल्यामुळे धीट झालेला चांभार जुन्या समाजरचनेत असा वागू शकला नसता. त्याने ब्राह्मणांचे ढोंग उघडकीस आणले. त्यांच्यामध्ये धीटपणा आला.

इंग्रजांनी सरंजामशाही पूर्ण मोडली नाही. तर टिकवून धरली. तिची बरीच मोडतोड झाली. इंग्रजांनी सर्व संस्थांनिकांना बाह्य आक्रमणापासून संरक्षण दिल्यापासून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात ते बेजबाबदार बनले. संरजामदारांच्या आश्रयावर आळशी ऐतखाऊ भिक्षुकांचा जमाव

पोसला गेला. पेशवाईच्या उत्तर काळात ब्राह्मण भिक्षुकांना मोठ्या प्रमाणात राजाश्रय मिळू लागला. त्यामुळे कुठलेही काम न करता केवळ ब्राह्मण म्हणून त्यांना फुकटात जगता येऊ लागले. ते निरुद्योगी बनले. उत्पादनव्यवस्थेशी त्यांचा संबंध राहिला नाही म्हणून ते बेकार, बेजबाबदार व अनैतिक बनले. गोडसे भटजींचे वडील घरी शेती असताना ती न करता देवधर्मात मग्न होते. त्यांचा संपूर्ण दिनक्रम कुटुंबाच्या फायद्याचा नव्हता. स्वत: गोडसे भटजीही प्रवास दक्षिणा मिळविण्यासाठी करावयाचा होता. त्यासाठी त्यांच्याजवळ लोकोत्तर विद्‌वत्ता होती असे नाही. पण त्यांना ती ब्राह्मण आहे म्हणून मिळवायची होती, याकडे अशोक चौसाळकर यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. सरंजामदारांकडून भरपूर दक्षिणा मिळत असल्यामुळे त्या काळातील ब्राह्मण वर्ग आळशी, बेजबाबदार बनल्याचे चौसाळकर नमूद करतात.

समाजातील जे वरकड उत्पन्न सरंजामदाराकडे मोठ्या प्रमाणात जमत होते. त्यातील बराचसा पैसा विलासात नष्ट होत होता आणि उरलेला पैसा केलेल्या पापांचे क्षालन करण्यासाठी यज्ञ करण्यात व उडाणटप्पू व खुशालचेंडू ब्राह्मण भिक्षुकांना दान देण्यात जात असे. बायजाबाई शिंदे व धारचे पवार आठ–आठ लाख रुपये दान धर्मात खर्च करतात. अशी उधळपट्टी अशा स्वस्ताईच्या काळात चालली होती की, त्यावेळी संपूर्ण कुटुंबाचे पोषण २५–३० रुपयांत होत असे. गावोगावच्या शेतकऱ्यांनी स्वकष्टाने निर्माण केलेल्या पैशाचा विनियोग या प्रकारे होत होता. गरीब शेतकऱ्यास मात्र रुपया गाडीच्या चाका एवढा मोठा वाटत होता. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांवर अन्याय होतच होता. झाशीच्या राणीसारखी लोकोत्तरबाई तिच्या रुपाने गंगाधरबाबा सारख्या विकृत माणसास देऊन टाकली. तिला इंग्रज रेसिडेंटने केशवपनाची परवानगी दिली नाही. ती दिली असती तर कदाचित ती खरी खुरीच 'आदपाव आण्याची धनीन' झाली असती. अशोक चौसाळकर या परीक्षणात १८५७ च्या उठावाच्यावेळची सामाजिक स्थिती, धार्मिक स्थिती, पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांची अवस्था यावर प्रकाश टाकला आहे.

'कर्मसिद्धांताचा सामाजिक अन्वयार्थ' या लेखात सरोज देशपांडे यांनी कर्माच्या सामाजिक फलिताचा विचार मांडला आहे. कर्मसिद्धांत हा भारतीय तात्विक विचारातील एक महत्वाचा सिद्धांत आहे. भारतीय मनात तो खोलवर रुजला आहे. त्याचा प्रभाव सामान्य

माणसाच्या मनावर व परिणामी त्याच्या जीवनसरणीवर पडला आहे. भारतीय तात्विक विचाराचा एक महत्वाचा विशेष असा किती केवळ सैद्धांतिक स्वरुपाचा कधीच नव्हता. भारतीय तात्विक विचारांचे अंतिम साध्य मोक्ष हे आहे. मोक्ष ही प्रत्येक व कोणीही माणसाला साध्य होऊ शकणारी वस्तू आहे व त्याचा एक मार्ग कर्ममार्ग हा मानला जातो. कर्मसिद्धांत अशा प्रकारे फक्त तत्वचर्चेत न राहता जीवनाला स्पशूर्न एका प्रकारे घडवीत असल्याने त्याचे स्वरुप समजून घेणे व त्यामध्ये अंतर्भूत झालेल्या तर्कहीन कल्पना बाजूला सारणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीने कर्म सिद्धांन्ताचा सामाजिक अन्वयार्थ सरोज देशपांडे यांनी स्पष्ट केला आहे.

अन्यायाला न्याय मानून तो सहन करण्यापेक्षा अन्याय म्हणून त्याचा स्वीकार करुन त्याचा निराश करण्याचा मार्ग शोधणे हे अंतिमत: समाजाच्या व परिणामी व्यक्तीच्याही हिताचे असते. यासाठी अन्यायाची कारणमीमांसा परंपरेने चालत आलेल्या या अपुल्या कर्मसिद्धांतानुसार न करता त्याला पूरक म्हणून समाजकर्म अशी एक वस्तू मान्य करुन तिच्या आधारे करण्याचा खटाटोप करणे आवश्यक असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायात सरोज देशपांडे यांनी सूचित केले आहे.

‘सप्तदशी’ या लेखात सुभाष पां. सोमण यांनी ‘सप्तदशी’ या लालजी पेंडसे यांच्या पुस्तकाचे परिक्षण केले आहे. ‘सन्तवाङ्‌मयाचा समाजिक पाया’ पाहत असताना लालजींनी केलेले विश्लेषण ‘वस्तुनिष्ठ’ आणि ‘मूलगामी’ आहे आणि त्या दृष्टीने सन्तवाङ्‌मयाच्या कार्याची त्यांनी लावलेला अन्वयार्थ एकदम नवीन आणि समाजजीवनाच्या क्रिया प्रतिक्रियात्मक सुसंवादाशी सुसंवाद साधणारा आहे. या सन्तवाङ्‌मयाच्या जीवनाच्या गतिशास्त्राशी लालजींनी नेमका संबंध जोडून दाखविला आहे. सन्तवाङ्‌मयाचे दोन भाग पडतात. एका भागात हरिनाम संकीर्तनाचा महिना गाऊन अध्यात्म विचार सांगितला आहे, दुसऱ्या भागात ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या कर्मभ्रष्टतेसंबंधी जळजळीत तक्रार केली आहे. संतवाङ्‌मय बहुजन समाजापर्यत जाऊन भिडते ते त्यातील अध्यात्मविचारामुळे नव्हे, त्यात ओतप्रोत भरलेल्या समाजभावामुळे आणि वर्णधर्माच्या विचारामुळेच ते बहुजन समाजापर्यंत जाऊन पोचले, हा लालजी पेंडसे यांचा या संदर्भातील निष्कर्ष मूलाला हात घालणारा आणि संतवाङ्‌मयाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी

देणारा असल्याचे नमूद केले आहे.

संत वाङ्मयाप्रमाणेच केशवसुतांवरही खूप लिहिले गेले आहे. पण लालजींनी केशवसुतांच्या युगप्रवर्तनाचा समाजजीवनाशी असलेला सुसंवाद अगदी नेमकेपणाने दाखवून दिला आहे. प्रबोधनाच्या प्रेरणेतून व्यक्त होणाऱ्या केशवसुतांच्या जीवनदृष्टीचे मूलगामी स्वरुप लालजींनी अगदी साधार स्पष्ट केल्याचे सोमण यांनी म्हटले आहे.

'इरावती बाईंचे संस्कृतिविषयक लेखन' या लेखात इरावतीबाईंच्या संस्कृतिविषयक विचारावर प्रकाश टाकला आहे. 'संस्कृति' या पुस्कातील 'रामायणावरील आणि धर्म' या विषयावरील निबंधातून व्यक्त झालेल्या इरावतीबाई संस्कृतिविषयक विचारांचा परामर्श घेतला आहे. यामध्ये रामायणावर सहा व महाभारतावर एक असे छोटे छोटे निबंध आहेत. जोडीला 'धर्म' या विषयावर महाभारतातील व्यासांच्या वचनाने आरंभ झालेला पण समाजशास्त्रीय तात्विक विवेचनाने रंगत गेलेला प्रदिर्घ निबंध आहे.

इरावतीबाईंनी रामायण आणि महाभारत यांच्यातील फरक स्पष्ट करुन सांगितल्याचे भट स्पष्ट करतात. एकीत (महाभारताच्या कथेत) मानवी संघर्ष व त्याचे भयंकर परिणाम तर दुसरीत (रामायणाच्या कथेत) तसाच संघर्ष व उदात्तेमुळे त्याचे निवारण हा फरक. संघर्ष तीव्रतर होत गेल्यामुळे महाभारताची गोष्ट एकसंघ व जिवंत वाटते. रामायणाची गोष्ट पुन्हा पुन्हा एकमेकांशी संबंध नसलेले संघर्ष आणावे लागल्यामुळे विस्कळीत वाटते, हा दुसरा फरक. बाईंचे हे परीक्षण काव्याभासाला मोलाची मदत करणारे आहे. त्यांची साहित्यिक मर्मग्रही दृष्टी प्रयत्ययाला येते आणि संस्कृत मूळातून वाचण्याचे संचित त्यांच्यापाशी आहे हे दिसून आल्यावर त्यांच्या अशा वाङ्मयीन विवेचनाला विशेष डोळसपणा येतो, असे भट यांनी म्हटले आहे.

रामायण–महाभारताची वाङ्मयीन तुलना, रामाच्या दक्षिणेतील प्रवासाचा तपशील, लंकेचे संभाव्य स्थान अशी जी अभ्यासस्थळे आहेत त्यांचा विचार करताना बाईच्या मधला बुद्धिवादी अभ्यासक, वाङ्मयीन समीक्षक किंवा तटस्थ संशोधक जागृत असतो असे नमूद करुन गो. के. भट यांनी व्यक्ती आणि घटना यांचे विवेचन करताना बाईचे स्वत:चे व्यक्तिमत्व अधिक डोकावते, असा अनुभव येतो असे म्हटले आहे. रामाने किंवा भीष्माने प्रतिसेला चिकटून

राहण्यात काय साधले? नैतिक मूल्ये कशावर अवलंबून असावीत? के बाईंचे प्रश्न रामायण–महाभारताच्या अभ्यासातून सुचलेले असले तरी त्यांची व्याप्ती या काव्यांच्या बाहेर जाणारी आहे. शास्त्रशुद्ध ग्रंथचिकित्सेचे हे प्रश्न नाहीत. तसे ते असते, तर बाईंना व्यास–वाल्मीकी समजले नाहीत असे म्हणण्याची वेळ येईल. खरे म्हणजे, आचार–विचारांची जी काही तत्वकालीन मूल्ये या प्राचीन कवींनी गृडित धरली आहेत त्यांचा शोध घेणे आवश्यक आहे. ही मूल्ये आज आपल्याला चूकीची वाटतात, एकान्तिक वाटतात हे सारे खरे पण ती तत्कालीन मूल्ये होती ती डावलणे प्राचीन कवींना शक्यही नव्हते. हा खुलासा करुन मगच या मूल्यांची सामाजिक दृष्टिकोनातून चर्चा करणे, त्याज्य स्वीकार्याचा निर्णय करणे शुद्ध विवेचनाला अनुरुप होईल, असे भट यांचे म्हणणे योग्य वाटते. साहित्य हे त्या–त्या काळाशी बांधलेले असते. त्या–त्या वेळची मूल्ये साहित्यातून प्रकटतात. रामायण–महाभारतामध्ये त्याकाळची मूल्ये रुजली आहेत असे वाटते.

'वाङ्मयीन बांधिलकीचा प्रश्न' या लेखात सु. श्री. पांढरीपांडे यांनी साहित्याच्या सामाजिक बांधिलकीवर प्रकाश टाकला आहे. साहित्यिकांच्या सामाजिक जबाबदारीचा प्रश्न साहित्याच्या क्षेत्रातील प्राचीन प्रश्नांपैकी एक आहे. ऐतिहासिक मागोवा घेताना प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या विचाराचा आधार घेतला आहे. 'रिपब्लिक' च्या अखेरीस प्लेटोने साहित्य, तत्वज्ञान यात एक जुने भांडण आहे, असे म्हटले आहे आणि आपल्या आदर्श राज्यामध्येही त्याने शोकांतिकांच्या लेखनाला मज्ज्ञाव केलेला आहे, 'अनुकंपा आणि भय' यासारख्या समाज स्वास्थ्याला घातक अशा भावभावनांना हे लेखन खतपाणी घालतात व समाजाचे अपरिमित नुकसान करतात. हा त्यांचा मुख्य आक्षेप. प्लेटो साहित्याचा शत्रू नव्हता. त्याला साहित्य हवे होते परंतु विशिष्ट प्रकारचे असावे असे त्याचे मत होते. धैर्य, संयम इत्यादी मूल्यांची जोपासना करणारी आख्यान काव्ये तयला समाजहिताच्या दृष्टीने अधिक योग्य वाटतात. आजच्या लोकप्रिय परिभाषेतही भूमिका 'साहित्याची बांधिलकी' या शब्दांतून व्यक्त होत असल्याचे पांढरीपांडे यांनी सांगितले आहे. बांधिलकीचे मूल्याधिष्टान व्यक्त करताना नेमाडे म्हणतात, ''साहित्य हे समूहमनाच्या अंत:स्तरावरचे विनिमयाचे साधन असल्याने बांधिलकीला सामूहिक म्हणजे

सामाजिक संदर्भ आपोआपच प्राप्त झालेले असतात. ज्या साहित्यकृती निखल शब्दांचा डोलारा असतो, भाषेच्या समूह जीवन सापेक्षतेचा स्पर्श असा साहित्याला होत नाही.''[२] नेमाडेंनी बांधिलकीच्या संकल्पनेत सामाजिक वस्तवाचीच मुळे नव्याने मांडली आहे.

पंढरीपांडे यांनी साहित्याच्या लैकिकाभिन्नतेचे घटक खालीलप्रमाणे सांगितले आहेत.

१) साहित्यातील वास्तव म्हणजे हुबेहुब वाद नव्हे.

२) चित्रित वास्तवाहून साहित्यातले 'सत्य' वेगळे असते.

३) कलानुभव हा लौकिकानुभवाहून मूळातच वेगळा असतो.

४) कलान्तर्गत सत्य, परिस्थिती व कलानिरपेक्ष असते, ते आन्तरिक असूनही सर्व मानवजातीस मान्य असते.

५) कलेचे विश्व आभासात्मक व स्वयंपूर्ण असते.

६) कला व जीवन यात एक अनिवार्य 'दुरावा' असतो या दुराव्यामुळेच एका विशिष्ट पातळीवर कला व क्रांती यांचा परस्परानुकूल असा संबंध प्रस्थापित होऊ शकतो.

७) साहित्य प्रक्रिया द्विविध असते, कठोर वास्तवाच्या चित्रणातच त्याचा निषेध व इन्कार असतो. काल्पनिक, स्वप्नमय 'अ–वास्तवांच्या' आविष्कारात नवे जग, नवी मूल्ये, नवे जीवन यांची आकांक्षा व पुरस्कार असतो.

८) कला व जीवन यांच्या बुडाशी असणारा दुरावा कलेच्या 'आकार' या घटकामुळे निर्माण होत असतो. या सर्व लक्षणांमध्ये नवे काहीच नाही. तसेच सर्वसाधारणपणे आदर्शवादी सौंदर्यशास्त्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विचारांशी वरील घटकांचे साम्य ही स्पष्ट आहे. या 'साहित्याची बांधिलकी' म्हणजे अखेरीस काही मुलभूत आणि शाश्वत अशा जीवन मूल्यांशी असलेली बांधिलकीच होय. कधी कधी 'स्वातंत्र्य' किंवा 'मुक्ती' या एकाच शब्दाने हा सारा मूल्यसंच या लेखात सूचित करण्यात आला आहे.

'काळाची पाऊले' या लेखात निलिमा भावे यांनी कृष्णाबाइ मोटे यांनी लिहिलेल्या 'काळाची पाऊले' या पुस्तकाचे परिक्षण केले आहे. सामाजिक विषयांवरच्या लेखांमधून स्त्रियां व मूले यांच्या काही प्रश्नांचा विचार मांडला आहे. आजच्या तरुण पिढीपुढे नवी ध्येये कोणती व

कशी निर्माण करावी, आजची सुशिक्षित, मध्यमवर्गीय स्त्री सामाजिकदृष्ट्या निष्क्रीय, केवळ सुखलोलुप बनली आहे, तर मग आमच्या पूर्वीच्या सुधारकांनी तिला शिक्षण देण्याचा आटापिटा केला तो फुकटच जाणार का? गेल्या तीन पिढ्या सामाजिक क्रांतीचे, नेतृत्व करणाऱ्या बुद्धिजीवी मध्यमवर्गीयांचे आजचे स्वरुप कसे आहे? हे त्यांच्या चिंतनाचे प्रश्न असल्याचे निलिमा भावे यांनी स्पष्ट केले आहे. आपल्या सामाजिक जीवनाचे काही पैलू ठळकपणे नजरेसमोर येताना काही प्रश्न सोडविण्याची निकड जाणवते. काही ठिकाणी बदललेल्या परिस्थितीतून नवे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता दृष्टी पडते व सावधगिरीचा इशारा मिळतो. आजच्या तरुण पिढीसमोर ध्येय नसणे ही गांभीर्याची गोष्ट असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर ज्या सुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी सर्वस्वाचा त्याग केला. त्यांना शिक्षण मिळावे यासाठी अहोरात्र कष्ट केले. तरी स्त्री आज आपल्याच सुखात मग्न आहे. समाजाबद्दल आपलेही काही कर्तव्य आहे, याचा तिला विसरच पडत चालला आहे, ही खंत भावे यांनी व्यक्त केली आहे.

'समाजातील स्त्रियांचे स्थान' या लेखात इंदुमती केळकर यांनी स्त्रियांच्या समाजातील स्थान काय आहे आणि ते कसे निश्चित करण्यात आले, याविषयी आपले विचार मांडले आहेत. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे आणि स्त्रियांच्या मागासलेपणाचे ते कारण आहे असे म्हटले जाते हे विधान पूर्ण सत्य आहे, असे वाटत नाही. इंदुमती केळकर लिहितात की, त्या पुरुषप्रधान संस्कृतीत समाजातील सर्वच पुरुषांचा समावेश होतो काय? कि विशिष्ट मुठभर पुरुषच समाजावर सर्व सत्ता गाजवतात? या दृष्टीने विचार केल्यास वरिष्ठ वर्गीय पुरुषच शतकानुशतके सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा, ज्ञान आपल्या ताब्यात ठेवून आहेत असे स्पष्टपणे दिसते. त्या विशिष्टांची संस्कृती म्हणजे तथाकथित भारतीय संस्कृती, पुरुषप्रधान संस्कृती.

या मुठभर उच्चवर्णियांनी ८० टक्के समाजाला मोठ्या धूर्ततेने आपले गुलाम बनविले. कनिष्ट वर्गातील पुरुषांना बौद्धिक अभावाचे तर स्त्रियांना शारीरिक क्षमतेच्या अभावाचे कारण सांगून नालायक ठरविले व सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आणि ज्ञान यापासून वंचित ठेवले याकडे केळकर यांनी लक्ष वेधले आहे.

पावित्र्य रक्षणाची जबाबदारी स्त्रियांची असे मानावयाला लावण्यातही भारतीयांना यश

मिळाले आहे. यो. नि. सुचिता यांचे दडपण स्त्रीयांवर इतके असते की ती प्राय:निर्जीव बनते तिचे सारे कर्तव्य लोप पावते. या भावनेपोटीच सती जाणे किंवा जाहर करणे ही पराक्रमाची क्षेत्र खास स्त्रियांसाठी ठेवली होती. आज त्या प्रथा नसल्या तरी त्या प्रवृत्तीचा प्रभाव तसाच आहे, असे केळकर उदाहरणे देऊन पटवून सागंतात. मातृत्व ही जीवनातील अन्य अवस्थांपैकी एक अवस्था. पण त्या अवस्थेचे स्तोम माजवून स्त्रीला त्यातच बुडवून ठेवले असल्याचेही त्या नमूद करतात.

लिंगभेदाच्या आधारावर मानवी गुणावगुणांचे विभाजन परंपरागत दोष हाही स्त्रियांच्या गुलामीला कारणीभूत असल्याचे इंदुमती केळकर नमूद करतात. भारतीय समाजात विचारविहीन व कर्मकांड व आचारविहीन पाखंड यांचा प्रभाव आहे. स्त्रिया तर मोठ्या संख्येने या ढोंगात फसलेल्या आहेत. व्रतवैकल्ये, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, अनिष्ठ रुढी, परंपरा यांचा प्रभाव त्यांच्यावर असल्याचे म्हटले आहे. या प्रभावामुळे रुढी, प्रथांच्या प्रभावामुळे स्त्रियांच्या गुलामीला अधिक बळकटी चढली, असे केळकर यांचे म्हणणे आहे, ते योग्य वाटते.

'भारतीय राजकारणातील जातीयता' या लेखात वसंत पळशीकर यांनी जात व राजकारण यांच्यातील परस्पर संबंधावर आणि त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियेचे जाती-व्यवस्था, जातीसंस्था आणि राजकारण यांवर होणारे परिणाम याविषयी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रकाश टाकला आहे. भारतातील राजकारण हे जातीधिष्टित आहे, हे विधान नवे राहिलेले नाही. प्रश्न वेगळेच आहेत. पंचवीस वर्षाच्या काळात राजकारणाच्या प्रक्रियेतून काही बदल घडून आला आहे की नाही? राकारणात जातीधिष्ठित आहे पण त्यातून जुनीच जातीव्यवस्था भक्क होते आहे काय? राजकारण जातीधिष्ठित आहे याचा नेमका अर्थ काय? असे बरेच प्रश्न मनात ठेवूनच 'कास्ट इन इंडियन पॉलिटिक्स' या ग्रंथाची आणखी केल्याचे नमूद केले आहे.

जातीव्यवस्थेला राजकीय अंग नेहमीच होते, एका अंगाने धार्मिक असलेली ही संस्था दुसऱ्या अंगाने राजकीय होती. गावात सत्ता कोणाची असायची ते ठरविण्यात तिचा भाग नेहमीच होता. एका व्यवस्थेतून संपूर्णपणे नव्या व्यवस्तेत आपण आज प्रवेश करीत आहोत असे नाही. राजकारणाची पातळी व संदर्भ, समाजाने अग्रक्रमाने समोर ठेवलेली उद्दिष्ट्ये यातील बदल आणि सामाजिक व राजकीय व्यवस्थेत प्रभावी असलेल्या विविध घटकांमधून काहींची गळती,

काहींवरचा बदलता भर या स्वरुपाचा हा बदल आहे. हे बदल घडवून आणण्याइतकी भारतीय सामाजिक व्यवस्था प्रगल्भ व लवचिक असल्याचे वसंत पळशीकर यांनी सुचविले आहे.

पूर्वीच्या व्यवस्थेत वरिष्ठ, वरचढ जातींना आपले प्रभूत्व टिकण्यासाठी धडपड करावी लागत नव्हती. आजच्या व्यवस्थेत त्यांचे प्रभूत्व जाऊ शकते, आणि ते टिकवायचे असेल तर इतरांना बरोबर घ्यावे लागते, त्याचा अनुनय करावा लागतो. यांचे परिणाम क्रांतिकारक होणार आहेत हे उघड आहे. या क्रांतीमध्ये जाती नष्ट होतीलच असे नाही. पण जुनी जातिव्यवस्था नष्ट होईल, ही अपेक्षा वसंत पळशीकरांनी व्यक्त केली आहे.

'आगरकरांची जातिमीमांसा जुजबी का राहिली?' याची मीमांसा यशवंत सुमंत यांनी केली आहे. १९ व्या शतकात म. फुले, लोकहितवादी यांनी जातिव्यवस्थेची आपापल्यापरीने जशी स्वतंत्रपणे दखल घेतली, त्यासंबंधीचे विचार मांडले तसे आगरकरांनी का केले नाही, याचा शोध त्यांनी 'आगरकरांची जातिमीमांसा जुजबी का राहिली?' या लेखात केली आहे.

समाज परिवर्तनाच्या संदर्भात आगरकरांनी जी एक वैचारिक चौकट स्वीकरली होती ती भारतातील जातिव्यवस्था विरोधी विचारांच्या संदर्भात महत्वाची होती, असे सुमंत नमूद करतात. श्रद्धा स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, करार स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य इत्यादी आधुनिक नगरी जीवनासाठी आवश्यक असलेल्या स्वातंत्र्याचा संकोच जातिव्यवस्थेमुळे होते आणि म्हणून जातिव्यवस्था नको असा आगरकरांचा विचार असल्याचे म्हटले आहे. अत्यंत जुजबी स्वरुपात आगरकरांनी मांडलेल्या विचारावरुन जातिव्युत्पत्ती संबंधाने निष्कर्ष सार रुपाने पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

अ) जाती या जित–जेत्यांच्या संबंधाचा परिपाक असू शकतो.

आ) जाती श्रमविभागणीच्या तत्वानुरुप आल्या, अशी श्रमविभागणी सर्वच सुधारलेल्या समाजात असल्याने जातीचा घटक सार्वत्रिक आहे.

इ) जाती या व्यवसाय भिन्नत्वामुळे निर्माण झाल्या व ट्रेड गिल्ड्स व क्रॅप्ट गिल्ड्स सारखेच त्यांचे स्वरुप आहे.

ई) पुरोहित वर्ग किंवा 'भट जात' ही जगभरच्या सर्वच समाजात दिसून येते.

आगरकरांच्या या प्रतिपादनाचा सूक्ष्मपणे विचार केला तर जाती वास्तव्याच्या सर्वच बाजू त्यांच्या आल्या नव्हत्या असे यशवंत सुमंत म्हटले आहे. जातिव्यवस्था का निर्माण झाली? ती इतकी वर्षे टिकली कशी? तिचे भौतिक आधार काय होते? ती सत्ताधारी वर्गाची विचारसरणी कशी झाली? या महत्वाच्या प्रश्नांना आगरकर भिडले नाहीत, हे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांची जातिमीमांसा जुजबी आहे, असा यशवंत सुमंत यांनी काढलेला निष्कर्ष सार्थ वाटतो.

'शेजवळकरांचे संस्कृतिविषयक विचार' या लेखात शेजवळकरांचे संस्कृतिविषयक विचार किती समृद्ध आणि मूलगामी होते यावर सदानंद मोरे यांनी प्रकाश टाकला आहे. शेजवळकरांचे सांस्कृतिक लेखन हे व्यक्ती, राष्ट्र, धर्म, जनसमूह इत्यादी भिन्न पातळ्यांवर व भिन्न संदर्भात प्रकट झाल्याचे मोरे नमूद करतात. तसेच शेजवळकर हे संस्कृतीचे केवळ निरीक्षक नव्हते तर समीक्षकही होते. त्यांना स्वधर्म आणि स्वजन यांच्याविषयी अभिमान होता. त्याचप्रमाणे एकूण मानव जातीविषयी आणि तिच्या भवितव्याविषयी गाढ आस्थाही होती. त्यामुळे त्यांच्या संस्कृतिविषयक लेखांना अनेक आयाम प्राप्त झाल्याचे म्हटले आहे.

'संस्कृती' या संज्ञेच्या लक्षणांचाही शेजवळकरांनी विचार केला आहे. शेजवळकरांच्या मते संस्कृतीच्या मानसिक आणि भौतिक सुधारणात्मक अंगापैकी संस्कृती हा शब्द प्राधान्याने मानसिक अंगांना लागू पडतो. भौतिक सुधारणात्मक अंगाला तो फारतर गौणत्वाने लागू करता येईल एवढेच. पण एकदा तो केल्यावर एखाद्या मनुष्यसमूहाच्या वागण्याच्या रीतीला तो आपोआप लागू होते. या वागण्याच्या दृश्यरितीचे अंतरिक व नियामक घटक म्हणजे श्रद्धविषय आणि जीवनमूल्ये हे होत. शेजवळकरांचे असे मत दिसते की साह्य भौतिक सुधारणा या इतरांच्या अनुकरणाने अंमलात आणता येतात; पण श्रद्धाविषय अथवा जीवनमूल्ये यांच्यासारख्या बाबी या आतूनच यायला हव्यात. भारतीय संस्कृतीबाबत त्यांचा समज काय होता, याबाबत ते विवेचन करतात. भारताच्या संस्कृतीला शेजवळकर प्रचलित पद्धतीला अनुसरुन वैदिक संस्कृती किंवा हिंदू संस्कृती म्हणत असले तरी तिच्या संमिश्रतेची आणि तिच्यातील अन्य घटकांची त्यांना जाणीव होती. किंबहुना अशा प्रकारची संग्राहकता हाच भारतीय संस्कृतीचा विशेष असल्याचे ते समजतात. सदानंद मोरे यांनी शेजवळकरांच्या संस्कृतीविषयक विचारांवर प्रकाश टाकला आहे.

‘स्त्री–एक सामाजिक अभ्यास’ या लेखात ह. म. घोडके यांनी गोपाळ दत्त कुलकर्णी यांच्या ‘स्त्री–एक समाजशास्त्रीय दर्शन’ या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. अनेक दृष्टीने नाविन्यपूर्ण असणाऱ्या या पुस्तकात ‘स्त्री’ या विषयांवरील सर्व उपलब्ध माहितीचा टीकात्मक पद्धतीने आढावा घेतला आहे. स्त्रीच्या सामाजिक जीवनाचा, तिच्या सामाजिक स्थानाचा विलक्षण रंजकतेने परिचय करुन दिला आहे. ‘स्त्री’ विषयाचे विविध पैलू विलक्षण जिव्हाळ्याने व आत्मीयतेने मांडण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे दिसते.

प्रस्तुत पुस्तकात स्त्रीचे जीवन चार विभागात विभागले असून त्यात विविध विषय हाताळले आहेत. स्त्रीच्या समस्यांचे उगमस्थान असलेल्या स्त्री शरीरापासून पुस्तकाची सुरुवात होते. दुसऱ्या विभागात वेश्याव्यवसाय, सती, विधवांचा प्रश्न, बालविवाह, हुंडा, सासुरवास, पडदा पद्धती, भारतीय मुस्लिम महिला हे विषय आहेत. तिसऱ्या विभागात स्त्री जीवनाचा जागतिक पातळीवरुन आढावा घेतला आहे. चौथ्या विभागात भारतीय स्त्रीच्या काळच्या व आजच्या काही समस्या लेखक आपणास दाखवतो, भारतीय स्त्री गेल्या दीड हजार वर्षापासून पीडित, शोषित असल्याची भेदक उदाहरणे लेखकाने विस्ताराने दिलेली आहे. भारतीय स्त्रीत्वाच्या प्रगतीचा, सुवर्णकाळाचा व नंतरच्या अध:पतनाचा ऐतिहासिक आलेख लेखकाने उत्कृष्टपणे रेखटल्याचे घोडके यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

या छोट्या पुस्तकातील सर्व सभावेशकता घोडके यांनी टिपली आहे. ती खास उल्लेखनीय बाब असल्याचे म्हटले आहे. स्त्रीच्या वेष–केशभूषा, अलंकार, सौंदर्य प्रसाधने, ह्यांसारख्या जिव्हाळ्याच्या विषयांबाबत मार्मिक विश्लेषण आहे. भारताच्या संस्कृतीच्या ४००० वर्षाच्या प्रवासात स्त्रीचे वस्त्रालंकार, वेष–केशभूषा कशा बदलत गेल्या? ही फॅशनमधील परिवर्तने स्त्रीला कोठे नेत आहेत? यावर लेखक भाष्य करताना एक मार्मिक वाक्य लिहून जातो– ‘‘स्त्रियांच्या शरीरावर ज्या प्रमाणात अधिक कपडे चढवले गेले तेवढ्या प्रमाणात स्त्रीची पीछेहाट अधिक झाली.’’

‘साहित्यविचार आणि समाजचिंतन’ या लेखात स. ह. देशपांडे यांनी प्रा. सरदार यांच्या षष्ट्यब्दीच्या निमित्ताने संपादित केलेल्या ‘साहित्यविचार आणि समाजचिंतन’ चे परीक्षण केले

आहे. श्री. स. शि. भावे यांनी 'साहित्य, साहित्यिक आणि समाज' या लेखात साहित्यनिर्मिती आणि साहित्यसंवाद या क्रियांवर ज्या नवीन प्रवृत्तींचे आक्रमण होत आहे, या नेमक्या हेरल्या आहेत; आणि कलानिर्मितीची व कलाभिरुचीची शुद्धता राखू इच्छिणाऱ्यांनी कोणते धोके ओळखले पाहिजे याचे स्पष्टपणे दिग्दर्शन केल्याचे स. ह. देशपांडे यांनी म्हटले आहे. लेखाच्या शेवटी विविध अपप्रवृत्ती आणि मोह यांपासून साहित्यिकांनी स्वत:ला बजावले पाहिजे आणि त्यासाठी काही निष्ठा पाळल्या पाहिजेत असे सांगितले आहे.

विचारांचे काही समाजशास्त्र आहे की नाही याचा शोध घेणे ही बाब अभिनंदनीय असल्याचे देशपांडे यांना वाटते. 'वर्ग' आणि 'जाती' या समाजशास्त्रांतर्गत सकल्पनांचा विश्लेषणाची आयुधे म्हणून उपयोग करणे यात तत्वत: काहीच गैर नाही. पण तसा उपयोग करताना त्या संकल्पना पारखून घेणे, त्या संकल्पनांनी वास्तवाची कोणती अंगे स्पष्ट होतात आणि कोणती नाहीत हे पाहणे उपलब्ध स्वरुपात त्या पुरेशा कार्यक्षम नसतील तर त्यांना नवे आकार देणे, इत्यादी क्रिया जबाबदारीने लिहिलेल्या समाजशास्त्रीय लेखांत अनिवार्य आहेत.

'मराठी साहित्यातील ख्रिस्ती सामजदर्शन' या लेखात सिसिलिया कार्व्हालो यांनी 'क्रिरीस्तांव'–प्र. श्री. नेरुलकर यांची लघुकादंबरी, 'काल आणि आज'– स. ना. सूर्यवंशी, 'सावट' सी. बी. दोडती, 'वापसी'–सतीश रणदिवे, 'प्रेमाची परिपूर्ति'–संदीप हळदणकर या कादंबऱ्यांच्या आधारे ख्रिस्ती समाजदर्शन मांडीत असताना एक गोष्ट लक्षात येते की, मद्यपानाच्या संदर्भात ख्रिस्ती समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोण आजही बदलेला दिसत नाही, हे वास्तव सत्य मांडले आहे. देवधर्मात, उपासनेत गुंतलेला हा समाज मद्यपानाला विसरु शकत नाही ही सत्यस्थिती आहे.

अंधश्रद्धच्या संदर्भात देवभीरु असा हा समाज 'बायबल' मध्ये मूर्तिपूजा निषिद्ध असतानाही त्यात गुंतून जाणारा व आपले निर्णय चर्चवर सोपवून दिल्याने आत्मविश्वास गमावल्यामुळे अंधश्रद्धेच्या जोखडाने जखडत जाणे स्वभाविक असल्याचे त्यांनी परीक्षणात सांगितले आहे. ख्रिस्ती समाजाचे सर्वांग स्पर्शी असे चित्रण मराठी साहित्यात घडायला हवे आहेत. तळागाळातील ख्रिस्ती लोकांचे त्यांच्या विविधतापूर्ण जीवनाचे निरीक्षण करणारे वर्णन

जेव्हा घडेल; तेव्हा ख्रिस्ती जीवनाच्या ख्रिस्ती अनुभूतीचे प्रकटन अधिक स्पष्टपणे होईल, असे कार्व्हालो यांना वाटते.

'साने गुरुजींच्या कांदबरीतील आदर्श समाजाचा शोध' या लेखात हरिश्चंद्र थोरात यांनी साने गुरुजींच्या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेल्या आदर्श समाजाचा शोध घेतला आहे. साने गुरुजींचा राजकीय विचार आणि त्यांची कादंबरी ही युरोपियाचे आदर्श समाजाचे रुप धारण करताना दिसते.

'धर्म आणि समाज परिवर्तन: परस्पर विरोधी की पूरकर' या लेखात अनिता पगारे यांनी धर्म आणि परिवर्तन यांच्या परस्पर संबंधावर प्रकाश टाकला आहे. धर्मही अफूची गोळी आहे, हे मार्क्सचे वचन प्रसिद्ध आहे. धर्माचा इतिहास हा क्रूर कत्तलीचा इतिहास आहे, अशी ठाम धारणा व्हावी अशा धर्मयुद्धाच्या आणि दंगलीच्या नोंदीनी इतिहास भरलेला आहे. कोट्यावधी धर्मसमूह धर्म चौकटीत राहण्यात समाधान मानणारा असल्यामुळे धर्म परिवर्तन त्यांच्यासाठी जीवनदायी मंत्र असल्याचे आनिता पगारे यांनी म्हटले आहे.

धर्मवादी व परिवर्तनवादी या दोघांनीही अनुक्रमे धर्माची व धर्माविरोधाची अफू चढवणे बंद करुन, सर्वसामान्य माणसांच्या पातळीवर विचार करायला हवा; चिकित्सा करायला हवी, पण ती इतरांना अपमान करणारी नसावी, असे सांगितले आहे. सामाजिक परिवर्तनांमध्ये वाङ्मयाचा सिंहाचा वाटा असतो. सामाजिक परिवर्तनांचा वाङ्मयीन परिवर्तनाशी मेळ घातला गेला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. डॉ. मोतीलाल रैना यासंदर्भात लिहितात, ''सामाजिक परिवर्तनाचा वाङ्मयीन परिवर्तनाशी मेळ घालण्याचे दोन मार्ग वाङ्मयेतिहासकारांसमोर असतात व सामाजिक परिवर्तनाच्या सांस्कृतिक रुपांचा शोध घेणे समाजाच्या व्यापक पयपासून त्यांना दूर करुन स्वतंत्रपणे त्याचा केन्द्रवर्ती मानून वाङ्मयेतिहासाची बांधणी करणे हा त्यातील एक मार्ग होय.''[३]

थोडक्यात, तत्कालीन साहित्याच्या आधारे सामाजिक बदलांमधून जाणवणारी स्थित्यंतरे समाजशास्त्रीय समीक्षेमधून अभ्यासण्यात मिळतात. 'समाज प्रबोधन पत्रिके' मधील समाजशास्यि दृष्टिकोनातून लिहिलेल्या लेखांमधून समाज, संस्कृती, वाङ्मयातील झालेले बदल व सुधारणा

यांचा आढावा घेतलेला दिसतो.

*** गांधीवादी समीक्षा:–**

गांधीवादी समीक्षेच्या अंगाने ‘आचार्य भगवतांचा गांधीवाद’ अभय कांता, ‘गांधीवाद आणि साहित्यविचार’–सु. श्री. पांढरीपांडे या लेखांचा विचार केला आहे.

महाराष्ट्रातील बौद्धिक परंपरेशी गांदी विचारांची सांगड घालण्याचा ज्या थोड्या व्यक्तींनी प्रयत्न केला. त्यापैकी आचार्य स. ज. भागवत होत. आचार्य भगवतांचा गांधीवाद कसा होतो याबाबत अभय कांता सांगतात की, आचार्य भागवत गांधीवादी जरुर होते, पण ते गांधीजींचे अंधानुयायी नव्हते, त्याचे यथार्थ वर्णन ‘‘प्रॉटेस्टंट गांधीवादी’’ असे करतात. कोणत्याही प्रकारची व्यक्तिपूजा त्यांच्या विवेकाला पटणारी नव्हती.

आचार्य भागवतांनी गांधीवादाचा स्वीकार बुद्धीवादी, शास्त्रीय दृष्टिकोनातून केला आणि त्याचा समन्वय महाराष्ट्रातील बौद्धिक परंपरेशी साधण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या उदात्त तत्वांचे ग्रहण करण्याची उच्च कोटीची बौद्धिक क्षमता असलेल्या आचार्य भागवतांनी गांधीवाद या भूमीत रुजविण्यासाठी आपली वाणी आणि लेखणी झिजवली.

स्त्रिया, इस्लाम आणि चतुर्वर्णपद्धती यासंबंधी भागवतांचे विचार पाहिले तरी त्यांच्यावरील गांधीचा प्रभाव जाणवतो. अनेक गांधीवाद्यांनी या विषयाकडे दुर्लक्ष केल्याची खंत कांता यांनी व्यक्त केली आहे. आचार्य भागवतांचा इस्लामविषयक दृष्टिकोन स्पष्ट करण्यासाठी त्यांनी खालील मुद्दे दिले आहेत :–

१) अललाहना नियम एकच आणि तो म्हणजे सत्य.

२) खरा मोमीन ती की जो स्वत:ला जाणतो आणि आचरणात व्यक्त करतो.

३) कारणाविषयी आदर बाळगणारा जर वेदांविषयी आदर बाळगीत नसेल तर तो सच्चा मुस्लिम नव्हेच.

४) ‘काफीर’ या शब्दाचा खरा अर्थ नास्तिक, परमेश्वर न मानणारा असा आहे.

५) कुराणात तलवारीचा उल्लेख केवळ स्वसंरक्षणाच्या संदर्भात करण्यात आला आहे.

भगवतांच्या दृष्टिकोणांतून इस्लाम संकल्पनांना ‘खरा अर्थ’ काय आहे, हे स्पष्ट करुन

सांगितले आहे. जातिव्यवस्थेबाबतचे आचार्यांचे विचार सर्वसाधारण ब्राह्मणी चौकट भेदून त्यापलिकडे जात नाहीत. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता याकडे मूलत: कलंक या दृष्टीने ते पाहतात. आचार्य भागवतांचा जातिव्यवस्थेचा दृष्टिकोण गांधीजींच्या दृष्टिकोणापेक्षा वेगळा असल्याचे कांता यांनी परीक्षणातून स्पष्ट करुन सांगितले आहे.

आचार्य स. ज. भागवतांनी गांधीवादाच्याबाजूने भूमिका घेतली, पण गांधींच्या अनेक महत्वपूर्ण कल्पनांवर त्यांचा विश्वास नसल्याचेही अभय कांता यांनी नमूद केले आहे. एकूण भगवतांच्या मनात गांधीवाद पूर्णपणे रुजला होता, असे म्हणता येणार नाही. महाराष्ट्रात गांधीवादाला फारसे स्थान मिळाले नाही. मराठी कांदबरीकारांनीही त्याकडे फारसे लक्ष दिल्याचे जाणवत नाही. खांडेकर म्हणतात, ''महाराष्ट्राने गांधीजींना राजकारणात साथ दिली ती दुभंगलेल्या मनाने, त्यांच्या तत्वज्ञानाचा प्रचार केला तोही अडखळणाऱ्या जिभेने, महाराष्ट्राची बुद्धी गांधीजींच्या मागून नि:शंक मनाने कधीच गेली नाही आणि महाराष्ट्राची वाणी पूर्ण आत्मीयतेने कधी चरखागीतही गाऊ शकली नाही.''[४]

गांधीवादी हा साचेबंद सिद्धांत नसून जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण आहे. मानवी जीवन, त्यांच्या समस्या, आव्हाने समजून घेऊन सत्य, अहिंसा अशा मूल्यात्मक संकल्पनाद्वारे नवी जीवनशैली गांधीवादाला अपेक्षित होती. या विचारसरणीला पाठींबा देणारे साहित्य, त्यातील विचार अनेक कलाकृतींच्या उदाहरणांसह सु. श्री. पांढरीपांडे यांनी 'गांधीवाद आणि साहित्यविचार' या लेखात मांडले आहेत. गांधीजींनी स्वातंत्र्य, कर्म, सत्याग्रह या साधनांच्या मदतीने सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न पाहिले. याचे पडसाद अनेक साहित्यिकांच्या कलाकृतींतून उमटलेले दिसतात. वीन्द्रकुमार भट्टाचार्य यांच्या आसामी 'लोकांचे राज्य', या कादंबरीत, केशव मेश्रामांच्या 'हकिकत व जटायू' मधील वास्तवतेचे भान, राजाराव यांच्या 'कांतापूर' कादंबरीत खेड्यातील लोकांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग व क्रांतीची चित्तवेधक कथा अशा अनेक साहित्यकृती गांधीवादी विचार सरणीचे संवेदनशील वर्णन करताना दिसतात. आपल्या 'माझे सत्याचे प्रयोग' या आतमचरित्रातूनही गांधीजींनी नैतिक बोधाची नवी दिशा देण्याची भूमिका ठेवलेली दिसते.

गांधीवादाचा खूप मोठ्या प्रमाणात मराठी कांदबरीवर प्रभाव असल्याचे दिसत नाही. गांधीजींबद्दल सर्वांना आत्मीयता वाटते. पण त्यांचे तत्वज्ञान स्वीकारण्यात मात्र लोक पुढे येत नाहीत. गांधीजींच्या तत्तज्ञानाचा मराठी कादंबरीने फारसा स्वीकार केल्याचे दिसत नाही. चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''गांधीजींच्या तत्वज्ञानावर मराठी कादंबरीकारांची फारशी निष्ठा आढळत नाही. गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमाचा पुरस्कार राष्ट्रीय शिस्त म्हणूनच केला. गांधीवादी कार्यक्रमाच्या स्वीकारापोटी गांधीवादापेक्षा गांधींच्या व्यक्तिमत्वाची मोहिनी अधिक दिसते. इतर विश्वासार्ह मार्गाच्या अभावी क्रियाशील तरुणांनी गांधीवादी मार्ग स्वीकारला. त्यांच्या भावनात्मक व वैचारिक अस्थिरपणाची प्रचीती कांदबरीत येते.''[५]

थोडक्यात, साहित्यकृतीवर विचार क्षेत्राचा, तत्वप्रणालीचा परिणाम होत असतो. गांधीवादीचाही परिणाम साहित्यनिर्मितीवर झालेला दिसतो. गांधीवादाच्या प्रभावाने निर्माण झालेल्या कलाकृतीतून पारंपारिक अध्यात्म, मूल्यात्मक जीवनदृष्टी, प्रगल्भ संवेदनशील जीवनव्यवहाराचा ठसा उमटलेला दिसतो.

*** चरित्रात्मक समीक्षा:–**

चरित्रात्मक समीक्षेच्या अनुषंगाने 'महात्मा फुले'– ग. वि. अकोलकर, 'रविन्द्रनाथांच्या व्यक्तिमत्वाची घडण'–सुजित मुखर्जी, 'केसरीची त्रिमूर्ती: चिपळूणकर, आगरकर, टिळक'– पां. वा. गाडगीळ, 'ध. रा. गाडगीळ आणि महाराष्ट्र'– पां. वा. गाडगीळ, 'गीता टीकाकारांचे व्यक्तिमत्वदर्शन–विलास खोले, लोकहितवादींचे पुनर्मूल्यांकन'– ग. वि. अकोलकर, प्रेषित टागोरांचे अपयश–वसंत पळशीकर, 'जग आणि कृष्ण मेनन'– ग. प्र. प्रधान, फिडेलचे आणि क्रांति– दिनकर साक्रीकर काकाजी, बापू–विनोबा–भा. रा. बापट, 'समर्पित जीवन'– ना. ग. जोशी, मे. पु. रेगे यांची वैचारिक वाटचाल–ग. प्र. प्रधान, क्रांतिसिंह नाना पाटील–श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न–एस. एस. भोसले, 'शेख महंमद', महान मराठी सूफी संत कवी–शेख शब्बीर, अच्युतराव कोल्हटकर, पां. वा. गाडगीळ, 'युग प्रवर्तक शास्त्रज्ञ चालर्स डार्विन'– भा. रा. बापट, इतिहास, समाज विचार आणि केशवसूत– राजा दिक्षित, 'कुटुंबवत्सल गांधी'– श्रीपाद जोशी, 'गांधींचा अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग'– वसंत पळशीकर, 'तीन दृष्टिकोनातून गांधी' –अ. के.

भागवत, 'गांधी, सत्याग्रह आणि डॉ. लोहिया'– वसंत पळशीकर, 'अमेरिकेकडून गांधींना मिळालेला प्रतिसाद'– ग. प्र. प्रधान, 'गांधी, लोहिया आणि दीनदयाळ'– माधव दातारा, 'मो. क. गांधी', 'भारत आणि जग'– वसंत पळशीकर, 'पंडित नेहरु', 'द एक्सटसी ॲड द ॲग्री'– प्रकाश कर्डिले, 'आधुनिक भारताचे नेतृत्व'– नलिनी पंडित, 'राजर्षी शाहू'– पां. वा. गाडगीळ, 'श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण'– द. रा. दोशी, 'याहाखानची कारकीर्द : एक अर्थबोध'– वसंत शिंदे, 'विद्रोही तुकाराम'– भाई वैद्य, यावरील सर्व लेखांचा विचार प्रस्तूत आहे.

महत्वा जोतिराव फुले हे महाराष्ट्रातील प्रबोधन युगातील एक ज्येष्ठ कार्यकर्ते होते. परंपरागत सामाजिक संस्थांच्या विरुद्ध बंड करणारे ते पहिले क्रांतिवीर, खऱ्या अर्थाने कर्मवीर होते. म. फुले यांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यावर ग. वि. अकोलकर यांनी मा. फुले या लेखात प्रकाश टाकला आहे. गुलामगिरीच्या शृंखला तोड्ल्याशिवाय आपल्याला भवितव्यच काय पण अस्तित्वही नाही, हे समाजाच्या गळी उतरविण्याचा आटोकाट प्रयत्न म. फुले यांनी केला. म. फुले यांच्या महनीय कामगिरीवर अकोलकर यांनी प्रकाश टाकला आहे. म. फुले यांच्या महनीय कामगिरीवर अकोलकर यांनी प्रकाश टाकला आहे. म. फुले यांनी आधुनिक काळातील स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही तत्वे स्वत:ला पटताच त्यांचा निर्भयपणे व हिरीरीने पुरस्कार केला. विशेषत: शूद्रांना व स्त्रियांना 'मानवी हक्क' मिळावेत, मानव या नात्याने इतरांबरोबर समान वागणूक मिळावी व सामाजिक न्याय लाभावा यासाठी धरलेला आग्रह व केलेले प्रयत्न ही त्यांची सर्वात महनीय कामगिरी. आधुनिक लोकशाहीचा व बुद्धिप्रामाणावर आधारित विसाननिष्ठेचा ते एक प्रकारे पाया घालत होते, हे मान्य केले पाहिजे. के पटवून देण्यासाठी जीवनाच्या अखेरच्या काळात लिहिलेल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात त्यांनी जी ३३ कलमी आचारसंहिता दिली आहे. ती मनन करण्याजोगी असल्याचे नमूद केले आहे.

सामाजिक स्वातंत्र्याबरोबरच धार्मिक स्वातंत्र्याचाही त्यांनी पुरस्कार केला आहे. धार्मिक बाबतीत त्यांची भूमिका मार्टिन ल्यूथरसारख्या सश्रद्ध सुधारकाची असल्याचे म्हटले आहे. म. फुले यांच्या विचारांची समीक्षा ग. वि. अकोलकर यांनी केली आहे. म. फुले यांच्या विचारांची समीक्षा करताना व केल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते व तेच त्यांचे 'जीवनसार' होय. ती

म्हणजे बहुजन समाजाविषयी त्यांच्या मनातील अपार कणव, त्यांची प्रामाणिक तळमळ, सर्वांगी 'स्नेहभाव प्रस्थापित करण्याची धडपड आणि नि:स्पृह, स्पष्टवक्तेपणा, या गुणांमुळेच ते 'महात्मा' ठरतात.

भारतीय संस्कृतीची ओळख अखिल जगताना करुन देणाऱ्या रविंद्रनाथ टागोरांच्या व्यक्तिमत्वाची ओळख सुजित मुखर्जी यांच्या 'रविंद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाची घडण' या लेखातून होते. कवी, कलावंत, साहित्यिक, तत्वज्ञ अशा अनेक भूमिकांमधून वावरणाऱ्या रविंद्रनाथांच्या जीवनात त्यांनी आध्यात्मिक आदर्शाला स्वीकारले होते. त्यांच्या विश्वात्मक मानवतावादी भूमिकेचा पाया ही अध्यात्मच होता त्यांनी आपले विचार व साहित्य अखिल मानवजातीला उद्देशून मांडलेले आहे.

मुखर्जी यांनी रविंद्रनाथांचय युवावस्थेपर्यंतच्या जीवनाचे आणि बंगालच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीचे एकमेकांशी असलेले नाते फारच चांगल्याप्रकारे, सहज व सोप्या भाषेत स्पष्ट केले आहे.

'रविंद्रनाथ टागोरांच्या अंगीभूत कार्याला चीन, जपान व हिंदुस्थान या देशातील काही व्यक्तिंनी कसा साद–प्रतिसाद दिला, त्यामागची पार्श्वभूमी काय होती याची कारणमिमांसा प्रेषित टागोरांचे अपयश' या लेखात वसंत पळशीकर यांनी केली आहे. रविंद्रनाथांची प्रकृती विश्वात्म्याची होती. विश्वबंधुत्व, विश्वैक्य हे त्यांचे स्वप्न होते. आध्यात्मिकताच पश्चिमेला विनाशाच्या खाईत लोटले जाण्यापासून वाचवू शकेल असा त्यांचा दृढ आत्मविश्वास असल्याचे वसंत पळशीकर यांनी म्हटले आहे. १९२९ साली ते जपानमध्ये व १९२४ मध्ये चीन मध्ये गेले. त्यावेळी तेथील समकालीन व्यक्तींचा प्रतिसाद कसा राहिला याची तपशीलवार माहिती मिळते.

महाराष्ट्रातले तीन लोकोत्तर महापुरुष चिपळूणकर, आगरकर व टिळक यांचय विचारसरणीची व कर्तृत्वाची ओळख 'केसरीच्या त्रिमूर्ती : चिपळूणकर, आगरकर, टिळक' या लेखात पां. वा. गाडगीळ यांनी करुन दिली आहे. आगरकर, चिपळूणकर व टिळक या तिघांत टिळक हे भारतातच नव्हे तर जगभर आपल्या श्रेष्ठ राजकीय नेतृत्वाने गाजले. आगरकर, टिळकांचे विरोधकपण समाजसुधारणेचे श्रेष्ठ मीमांसक व पुरस्कर्ते म्हणून महाराष्ट्रात गाजले.

चिपळूणकरांची ओळख सामान्य लोकांत त्यामानाने कमी आहे. किंबहुना लोकहितवादी, म. फुले व दयानंद यांच्यावर विष्णूशास्त्रींनी काहीशा अविचाराने प्रहारी लिखाण केल्यामुळे विष्णुशास्त्रींची नवविारवादी लेखकांनी निंदाही केली असून त्यामुळे विष्णुशास्त्रांची थोरवी थोडीशी बुजलेली आहे. सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या अणकुचीदार लेखणीने विष्णुशास्त्रींच्या प्रतिभेवरील निंदेचा हा चिखल काढून ती प्रतिमा स्वच्छ, स्पष्ट व तेजस्वी स्वरुपात येथे दाखविली ही त्यांची मोठी कामगिरी आहे.

आगरकर हे विष्णुशास्त्री व टिळक यांच्याहून बरेच वेगळे आहेत. आगरकरांचय विचारात जोम असल्याने त्यांच्या भाषेतही मधूनमधून जोम दिसतो. टिळक हे लोकोत्तर राजकीय नेते होते, ते संस्कृत पंडित होते व तत्त्वज्ञानाबाबत पढिक विद्वान होते, ही त्यांची थोरवी आहे.

शेतकऱ्यांचे व शेतीमालाच्या किंमतीचे प्रश्न, सहकारी चळवळ व सहकारी संघटना याविषयी विचारमंथन करणाऱ्या ध. रा. गाडगीळ यांच्या मतांचा विकास 'ध. रा. गाडगीळ आणि महाराष्ट्र' या लेखात पां. वा. गाडगीळ यांनी मांडला आहे. १९०१ साली त्यावेळच्या मुंबई सरकारने सावरकरांच्या पिळवणूकीतून शेतकऱ्यांस वाचविण्यासाठी लॅण्ड रेव्हिन्यू विल कौन्सिलात मांडले. त्यावेळी टिळकांनी सावरकरांची बाजू मोडली. ही चूक गाडगीळांनी दाखविली नाही पण गांदींच्या संबंधाने प्रा. गाडगीळांनी केलेले विवेचन चांगले आहे.

श्रीमद्भगववद्गीता हा प्राचीन काळी लिहिल्या गेलेल्या हिंदुधर्मविषयक ग्रंतातील सर्वाधिक मान्यताप्राप्त ग्रंथ. या ग्रंथाचा अन्वयार्थ सांगणारे लेखन करणाऱ्या तीन टीकाकारांच्या टीकांची परस्परांशी तुलना विलास खोले यांनी 'गीता टीकाकारांचे व्यक्तित्वदर्शन' या लेखात केली आहे. ज्ञानेश्वर, वामन आणि टिळक या तिघांच्या टीकेचा तुलनात्मक विचार मांडला आहे. गीतेतील कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती या प्रमुख विचारांच्या संदर्भात या तीन टीकाकारांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला आहे. संत ज्ञानेश्वर–टिळकांच्या वाट्याला आलेली कीर्ती व लोकप्रियता वामनांच्या वाट्याला आलेली नाही. वामनांच्या वाट्याला उपेक्षा व हेटाळणीच आल्याचे दिसते.

ज्ञानेश्वर, वामन आणि टिळक या तिघांच्याही मतानुसार गीता अद्वैतसिद्धांत प्रतिपादन

करणारी आहे. कर्म, ज्ञान, योग आणि भक्ती या चार विषयांसंबंधी ज्ञानेश्वरी, यथार्थदीपिका व गीतारहस्य या ग्रंथातील विवेचनाचा तुलनात्मक विचार हा करंदीकरांच्या ग्रंथाचा प्रधान विषय आहे. गीता टीकाकारांची वैशिष्ट्ये विलास खोले यांनी टिपली आहेत. १) अनेक परिमाणांमध्ये परावर्तित होणारा अर्थ एकेका शब्दात साठविण्याची किमया करणारे ज्ञानेश्वर. २) एकाही पदाला न डावलता प्रत्येक शब्दाचा यथार्थ सांगणारे वामन. ३) कर्मयोगाच्या दिशेने जाऊन गीतेद्वारे हिंदुचे जीवनविषयक, नितिविषयक व धर्मविषयक तत्वज्ञान सांगू पाहणारे टिळक. या तिघांना करंदीकरांनी तटस्थ परंतु सहृदय, चिकित्सक अभ्यासकाच्या भूमिकेतून तोलले आहे, असे खोले म्हणतात.

'पेशवाईचा अस्त आणि आंग्लाईची पहाट' या संधिकाळात महाराष्ट्रात उदय पावलेले विचारवंत लोकहितवादी. महाराष्ट्र आणि गुजरात यांतील समाजसुधारणेच्या आंदोलनांना जोडणारा लोकहितवादी हा अत्यत मोलाचा आरंभीचा दुवा ठरलेल्या 'लोकहितवादींचे पुनर्मूल्यांकन' या लेखात ग. वि. अकोलकर व्यक्तिमत्वाचे पैलू स्पष्ट करुन सांगितले आहेत.

लोकहितवादींच्या भूमिकेचे चार आधार वा सूत्रे आहेत. १) इतिहासाची जाणीव, २) धर्मविषयक भूमिका, ३) विध्याभिवृद्धीची गरज आणि ४) राज्य सुधारणेचा प्रश्न. तसेच लोकहितवादींवर 'विविधज्ञान विस्तार' म्हणून टीका झाली. लोकहितवादी प्रत्यक्ष कृतीच्या प्रसंगी कचरले. आद्य पिढीच्या सुधारकांत सर्वच जन 'बोले तैसा चाले' या प्रवृत्तीचे नव्हते. याची कारणे त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या दुबळेपणात नसून तत्कालीन समाजरुढींच्या जबरदस्त पकडीत आहेत.

१९४७ ते १९६२ या पंधरा वर्षाच्या कालखंडात मोठ्या दिमाखाने भारताच्या राजकीय रंगमंचावर वावरलेल्या श्री. कृष्ण मेमन यांच्या स्वभावातील प्रखर विशेषांवर आणि त्यांच्या कर्तृत्वावर ग. प्र. पधान यांनी 'जग आणि कृष्ण मेनन' या लेखात प्रकाश टाकला आहे. कृष्ण मेनन यांचे कर्तृत्व काहींना नेत्रदिपक भासले तर काहीजणांना त्यांच्या जीवनात कृतीपेक्षा शब्दांना, आणि विशेषत: काटेरी, बोचक शब्दांना अधिक महत्व होते असे वाटते.

नाटककार, विनोदी वक्ता, लेखक अशा विविध अंगांनी प्रसिद्धि मिळवलेल्या अच्युतराव वाङ्मयाचे व त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे चिकित्सक वर्रन अच्युतराव कोल्हटकर या लेखात पां.वां.

गाडगीळ यांनी केले आहे. चिपळूणकरांच्या परखड धारदार लेखणीने समाजात नवचैतन्य निर्माण केले. त्यानंतर शिवरामपंत परांजपे यांनी उपहास व उपरोधाच्या मदतीने स्वातंत्र्यनिष्ठ लोकांपर्यंत पोहचविली. याच कार्याचा वारसा पुढे कोल्हटकरांच्या लेखणीने चालविला. त्यांनी लोकमान्यांच्या विचारांचे शिष्यत्व पत्करून सामान्य लोकांमध्ये जागृती आणली. भारताचे स्वातंत्र्य हा त्यांचा अतिशय प्रिय विषय होता. इंग्रज सरकाने बंद पाडलेले त्यांचे 'संदेश' दैनिक त्यांनी पाच वेळा पुन्हा जिद्दीने सुरू केले. 'मेसेज' हे इंग्रजी दैनिक, मासिकेतून त्यांचे खूप लेख प्रसिद्ध झाले. 'मराठी काव्याची प्रभात', 'महाराष्ट्र नाट्यक्षेत्रातील विषयांवर तसेच अध्यात्म, हिंदूधर्म, भारतीय परंपरा अशा अनेकविध विषयांवर त्यांना मिष्कील, उल्हासितवृत्तीने लेखन केले. देशभक्ती, स्वातंत्र्यप्रीती त्यांनी लोकांपर्यंत पोचविण्याचे महत्तचे कार्य केले.

क्यूबामधील क्रांती ज्या नेतृत्वाने घडवून आणली आणि क्रांती यशस्वी होईपर्यंत जी वैचारिक भूमिका घेतली त्या क्रांतीचे प्रमुख दोन शिल्पकार कॅस्ट्रो व गेव्हाय यांचा परिचय दिनकर साक्रीकर यांनी 'फिडेल, चे आणि क्रांती' या लेखातून करून दिला आहे. कॅस्ट्रोची संपत्तीबद्दलची विरक्ती आध्यात्मिक वाटावी इतकी विलक्षण होती. द्रव्याचा तिटकारा करणारा हा कॅस्ट्रो पैशाच्या जगाबाहेर जगत होता. विलासाची त्याला रूची नव्हती. सुखासीनतेत तो अस्वस्थ होत असे. त्यामुळे तो क्युबाला एक अत्यंत प्रामाणिक शासन देण्याचे कार्य करू शकला. कॅस्ट्रोप्रमाणे चे गेव्हारा हा कर्मयोगी तर होताच पण त्याचा व्यासंग दांडगा होता. तो एक कृतिशील विचारक होता.

प्रसिद्ध उद्योगपती श्री. कमलनयन बजाज यांच्या जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या तीन व्यक्तिविषयी भा.रा.बापट यांनी 'काकाजी–बापू–विनोबा' या लेखात माहिती दिली आहे. पुस्तकाचा पहिला भाग 'काकाजी' अर्थात जमनालालजी यांच्या व्यक्तीमत्त्वावर प्रकाश टाकणारा आहे. पिता–पुत्र हे नाते सर्वस्वी स्वाभाविक आहे. त्यामुळे लेखकाने काकाजीबद्दल खूप मोकळपणाने लिहिले आहे. गांधींना भारतीय राजकारणापासून वेगळे करणे जवळ जवळ अशक्य आहे, पण कमलनयन बजाज यांनी या बाबतीत खूपच यश मिळविले आहे. 'विनोबा' या भागातही विनोबांच्या अनेक चळवळींचा ओझरतासुद्धा उल्लेख लेखकाने केलेला नाही. उलट त्यामानाने कमी महत्वाच्या गोष्टीवर बराच भर दिलेला आहे.

आपल्या वर्तनक्रमाने महाराष्ट्रीय समाजमनावर ठसा उमटविणाऱ्या संघटक शंकररावजी देव यांच्या कामगिरीवर ना. ग. जोशी यांनी 'तीन समर्पित जीवने' या लेखात प्रकाश टाकला आहे. शंकरराव देव यांनी बहुजन समाजाची व मध्यम वर्गाची अभेद्य संघटना निर्माण केली. त्यांनी महाराष्ट्रात गांधीमार्गाने राजकीय क्रांती घडवून आणली. त्यावेळीचे मराठी राजकारण आराम खुर्चीवर व गादी तकत्यांवर चालू होते. पांढरपेशा वर्ग दिशाहीन जीवन घालवीत होता व ब्राह्मणेत्तर बहुजन समाज आपल्या संकुचित राजकीय डब्यात डुंबत राहिला होता. शंकररावजी देव यांनी या सर्वांना एका नव्या युगाची जाग आणून दिली.

भारतीय व पाश्चात्य तत्वज्ञानाचे चिकित्सक अभ्यासक म्हणून परिचित असणाऱ्या प्रा. मे. फं. रेगे यांच्या वैचारिक वाटचालीचा आढावा ग. प्र. प्रधान यांनी 'मे. पुं. रेगे यांची वैचारिक वाटचाल' या लेखात घेतला आहे. रेगे यांनी दासगुप्ता यांचा भारतीय तत्वज्ञानाचा इतिहास वाचायला घेतला आणि त्या ग्रंथातील 'सांख्य', 'न्याय' इत्यादीवरचे विवेचन वाचताना पाश्चात्यांच्या तोडीचे तत्वज्ञान भारतात पूर्वी विकसित झाले होते. असा आनंददायी अनुभव त्यांना आला. 'प्रा. रेगे आणि ईश्वर' या लेखात डॉ. देव यांनी रेग्यांच्या परमेश्वराच्या अस्तित्वाबाबतच्या भूमिकेतील कच्चे दुवे सडेतोडपणे दाखवून दिले आहेत.

'महान कर्मयोगी महात्मा गांधी' या लेखात अ. क्र. देव यांनी गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करुन दिला आहे. प्रेम, सत्य, सेवा यांच्या आचरणातून परमेश्वराची प्राप्ती होते अशी त्यांची निष्ठ होती. सत्यदर्शनाबद्दल गांधीजी म्हणतात, 'सत्याच्या विश्वव्यापी स्वरुपाचे दर्शन घ्यायचे असेल तर आपल्याला क्षुद्रातल्या क्षुद्र जंतूवरही आत्मवत प्रेम करता आले पाहिजे.' परमेश्वरानेच निर्माण केलेल्या सृष्टीतील सर्व प्राणीजीवांवर प्रेम करुन, त्यांची सेवा करुन परमेश्वराचा साक्षात्कार घडतो अशी त्यांची श्रद्धा होती. स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे कार्य हा त्यांना परमेश्वर प्राप्तीच्या साधनेचाच एक भाग वाटत असे.

श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न पाहणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याची माहिती एस. एस. भोसले यांच्या 'क्रांतिसिंह नाना पाटील : श्रमिकांच्या राज्याचे स्वप्न' या लेखातून माहिती, 'पत्री' 'प्रती' सरकारी – पॅरलल गव्हर्नमेन्टची स्थापना, शेतकरी–कामकरी लढे, जमीन

मुक्तीचे, भू–आंदोलनाचे लढे, गोवा मुक्ती संग्राम, सीमा प्रश्न, बँक राष्ट्रीयीकरण, दलित भूमी आंदोलन, अशा अनेक लढ्यात नाना अग्रमागी होते. त्यांनी बलाढ्य ब्रिटिश शासनाला हे माय, धरणी ठाय करणाऱ्या 'पत्री सरकारची' स्थापना करुन वारकऱ्यांचा वारसा सांभाळला. आकाशात चमकणाऱ्या ताऱ्याइतके स्वच्छ, निर्मळ व स्पष्ट जीवन जगणाऱ्या क्रांतिसिंह नानांची अंतिम इच्छा, 'या देशातल्या कष्टकरी–कामकरी, मजूर–शेतकरी गरिबांतल्या गरिबाला भाकरी आणि भाकरीबरोबर तेलात कालवलेले तिखट व मीठ मिळावे.' 'प्वाट भरुन' 'मिली' हा होता. अण्णांनी अनेक स्टेशने बदलली, अनेक स्टेशनांवर ते उभे राहिले, पण गरिबांचा उद्धार या मूळ तत्वापासून ते एवढेही ढळले नाहीत.

इस्लाम धर्मातील एक भक्तिपंथ म्हणजे सूफी पंथ होय. या पंथाने यादवकाळातच इस्लाम धर्माच्या प्रसाराचे कार्य महाराष्ट्रात जोराने सुरु केलेले दिसते. महान मराठी सूफी संत कवी याच पंथातील आहे. शेख शब्बीर यांनी 'शेख महंमद : महान मराठी सूफी संतकवी' या लेखाने शेख महंमदाने जे लिखाण केले त्यावर प्रकाश टाकला आहे. शेख महंमत हा कबिराच्या प्रकृतीचा मुक्तचिंतक आणि प्रबोधक असल्यामुळे त्याने लोकजीवनातील अनिष्ट प्रवृत्तीचे सूक्ष्म निरीक्षण करुन ती अनिष्टे विवेकाच्या प्रखर अग्नीत जाळून टाकली आहेत. शेख महंमदाने मराठी, हिंदी, उर्दू, फारशी या भाषांत बरीच रचना केली आहे.

शेख महंमदाचा कविता संग्रह मोठा आहे. आचार–धर्माची किंवा वर्णातमधर्माची शृंखला दिवसेंदिवस अधिका–धिक कष्टद होऊ लागली, या परिस्थितीचे चित्र शेख महंमदाने 'योग संग्रामात' विषयानुसंधनाने रंगविले आहे. मराठी संत मंडळात 'कबीराचा अवतार' म्हणून शेख महंमदाची ख्याती आहे. जन्माने मुसलमान असूनही ज्याने हिंदू गुरुकडून परमबोध प्राप्त केला, हिंदू साधना स्वीकारली आणि हिंदू–मुसलमान भेदाच्या अतीत जाऊन शुद्ध परमार्थाचा अनुभव घेतला, त्या कबिराप्रमाणेच शेख महंमदांनीही महाराष्ट्रात मुक्तचिंतकाचे श्रेष्ठ स्थान प्राप्त केले.

जीवसृष्टीच्या उत्क्रांतीचे कोडं उलगडणाऱ्या चालर्स डार्विन यांच्या योगदानावर भा. रा. बापट यांनी 'युगप्रवर्तक शास्त्रज्ञ चालर्स डार्विन' या लेखात प्रकाश टाकला आहे. सृष्टिनिर्मिती व जीवउत्पत्तीच्या कुतूहलापोटी अविरत संशोधन करुन चालर्स डार्विन यांनी उत्क्रांतिवादाचा

मुलभूत सिद्धांत मांडला. या सिद्धांतामुळे तत्वकालीन समाजात शिराधार्य मानल्या जाणाऱ्या जीवसृष्टीच्या 'आकस्मिक' निर्मितीबाबतच्या बायबलप्रणीत विचाराला तर जोरधार धक्का बसलाच, शिवाय तर्कशुद्ध विचाराच्या आधारावर वैज्ञानिक संशोधनाचा पाया तयार करण्याचे महत्वाचे काम डार्विन यांनी केले. म्हणूनच डार्विन यांचे विज्ञानातील योगदान लक्षणीय व मुलभूत असल्याचे बाटप यांनी नमूद केले आहे. डार्विन यांच्या क्रांतिकारी विचारांमुळे जीवशास्त्रविषयक संशोधनाला नवं वळण, आणि गती मिळाली. वनस्पती व प्राण्यांमध्ये नैसर्गिक वर्गीकरणांचे तत्व आंमलता आणणे अत्यावश्यक आहे, त्याची संशोधकांना जाणीव झाली. लेखनाच्या संदर्भात डार्विन अतिशय नियमित होता. त्यामुळे तो भरपर लिहू शकला. २०–२२ पुस्तके मिळून त्याने ५००० ते ७००० पृष्ठे लिहिली असतील. त्याच्या अनेक पुस्तकांपैकी प्रजातीच्या उत्पत्तीविषयी त्याने लिहिलेले 'दि ओरिजिन ऑफ स्पीसीज' हे पुस्तक अत्यंत वादग्रस्त ठरले. याच पुस्तकाने मानवी जीवनात क्रांती घडवून आणली.

राजा दिक्षित यांनी मराठी काव्यातील प्रतिभावंत काव्यरचनाकार केशवसूत यांच्या काव्याची चिकित्सा 'इतिहास, समाजविचार आणि केशवसूत' या लेखात केली आहे. तुतारी, स्फुर्ती, गोफण, उत्तेजनाचे दोन शब्द अशा आशावादी मनाची कणखरता व्यक्त करणारी कविता केशवसूतांनी लिहिली. तसेच भृंग, फुलपाखरू, पुष्याप्रत अशा काही कवितेतून नैराश्याचे सूरही निघाले. यावर रा. श्री. जोगांनी पुढील दोन मते मांडली आहेत. कविचे व्यक्तिमत्व हे तत्वज्ञानाच्या व्यक्तिमत्वासारखे स्थिर अशा स्वरुपाचे असत नाही. ज्या–ज्या मन:स्थितीत जी–जी मनाची वृत्ती असेल तसा तसा अविष्कार कवी वेळोवेळी करीत असतो. दुसरे त्यांचे मन पुढीलप्रमाणे– इंग्रजी कवींप्रमाणे जीवनविषयीचे असमाधानही त्यांनी स्वीकारले होते. वरील दोन्ही मते दीक्षित यांना मान्य नाहीत. त्यांच्यामते कवीची जीवनविषय निश्चित भूमिका, तत्वज्ञान असू शकते.

स्वप्राणाने 'तुतारी' फुंकणाऱ्या कवी केशवसुतांचा इतिहास संबंध होता, हे दीक्षित यांनी 'नैऋत्येकडला वारा' या केशवसुतांच्या कवितेतील ओळी देऊन स्पष्ट केले आहे.

''ये येथे इतिहासपत्र पडके वाचुनि पाही जरा!''

केशवसुतांनी मराठी कवितेला नवे वळद दिले. वि. स. खांडेकर लिहितात, ''१८८०

नंतर मराठी काव्याला सर्वस्वी नवीन वळण लागले. काव्याचे हे नवे स्वरुप म्हणजे केवळ बहिरंगाची सुधारणा नव्हती. तो काही परिवर्तनाचा एक प्रयोग नव्हता. क्रांतीची बीजे असलेला तो बदल होता. या नव्या वळणाचे मुख्य श्रेय केशवसुतांना दिले पाहिजे.''[६] केशवसुतांच्या सर्वात अर्थपूर्ण कविता म्हणजे त्यांच्या सामाजिक कविता. या कविता तत्कालीन सामाजिक अंतसत्वाचे निर्देशन करणाऱ्या आहे. त्यामधून केशवसुतांचा सुधारणा वाद प्रत्ययास येतो. स्वातंत्र्याकांक्षेने भारलेली कविता आधुनिक मराठी साहित्य विश्वात प्रथम केशवसुतांनी लिहिली. त्यांच्या कवितेतील राष्ट्रीय आशय लक्षात घेतला तर सामाजिक सुधारणावादाप्रमाणेच, निबंधमाला व केसरीने आणि भारतीय राष्ट्रीय सभेने निर्माण केलेल्या राष्ट्रवादी वातावरणालाही केशवसुतांनी कलात्मक प्रतिसाद दिल्याचे स्पष्ट होते.

'समाज प्रबोधन पत्रिके' मध्ये जी ग्रंथपरीक्षणे झाली, त्यामध्ये सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये कार्य केलेल्या व्यक्तींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारी परीक्षणे आहेत. ज्यांच्या अथक प्रयत्नांमुले आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्या म.गांधींच्या कार्यावर प्रकाश टाकणारी परीक्षणे आहेत. तसेच पंडित नेहरू, छत्रपती शाहू महाराज, कृष्ण मेनन, डॉ. राममनोहर लोहिया, याह्याखान, यांचा समावेश होतो.

'कुटुंबवत्सल गांधी' या लेखात श्रीपाद जोशी यांनी आपल्या परीक्षणात म.गांधी यांच्या राजकारणी किंवा तत्वचिंतक विचारांची चिरफाड न करता त्यांचे सामान्य माणूस म्हणून असणारे व्यक्तिमत्व यावर प्रकाश टाकला आहे. लहान–लहान आठवणींमधून गांधीजींच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूवर प्रकाश टाकला आहे. माणूस या नात्याने गांधीचे नक्की स्थान कोणते होते हे समजून घेण्यास अशा प्रकारच्या वैयक्तिक आठवणींचा चांगला उपयोग होईल, असे सांगितले आहे. राजकारणी पुरूष म्हणून गांधीजींचे जे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते, त्यापेक्षा एक सामान्य निर्लेप मानव म्हणून ते किती थोर होते याची कल्पना यातील घटनांवर अवश्य येते, असे परीक्षणात म्हटले आहे.

'गांधीचींचा अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग' या लेखात वसंत पळशीकर हौसबर्ग यांच्या पुस्तकातील समृद्ध,सखोल आणि मार्मिक विवेचनाची काहीच अंगे येथे स्पष्ट केली आहेत.

गांधीजींच्या सत्याग्रहाचे अधिष्ठान, त्यांची पथ्ये, त्यांचे तंत्र यांचही सर्वांगीण विवेचन त्यांनी केले आहे.

'तीन दृष्टिकोनातून गांधी' या लेखात अ.के.भागवत यांनी गांधींच्या स्वनात्मक कार्यक्रमातही आधुनिक दृष्टीचा अभाव होता व त्यामुळे त्यांच्या यशस्वितेला मर्यादा पडल्या. गांधीच्या अहिंसेला मर्यादित यश आले व पुन:पुन्हा त्यांच्या हयातीत आणि नंतरही अत्याचार उफाळून आले. ह्याचे कारण, पुन्हा अहिंसक वृत्तीचा शास्त्रशुद्ध विचार त्यात नव्हता, असे नमूद केले आहे. ते पटण्यासारखे आहे. गांधींजींच्या मिशनरीवृत्तीला मूल्यांच्या आग्रहाला आधुनिक ज्ञान–विज्ञानाची साथ दिली पाहिजे. प्रत्येकाने स्वत:ला प्रतीत झालेले गांधी विचार–कार्याचे सत्य मांडले आहे. ही सत्ये एकत्र करुन गांधीवादातील गतिमानता व चैतन्य पकडण्याची ग्रंथामागील प्रेरणा असल्याचेही निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे.

'गांधी, सत्याग्रह आणि डॉ. लोहिया' या लेखात वसंत पळशीकर यांनी वसंत पळशीकर यांनी राममनोहर लोहिया यांनी लिहिलेल्या 'अंतहीन यात्रा' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. गांधींचे लोहियांवर पुत्रवत प्रेम होते. लोहियांनाही त्याचे भान होते. गांधीविषयी बोलताना, लिहियांची अवस्था भक्तासारखी होऊ जाई. गांधीच्या व्यक्तिमत्वाचे आकर्षण एवढे जबरदस्त का होते याचे रहस्य त्यांनी अतिशय हृद्य शब्दांत व्यक्त केले आहे. लोहिया, गांधी व त्यांचे नाते या तिन्हीवर उत्तर प्रकाश या परीक्षणातून टाकल्याचे दिसते.

गांधींनी या देशाला वारसा काय दिला या विषयीचे लोहियाचे विवेचन, मार्मिक आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची क्षमता माणसाच्या अगदी कोणत्याही सामान्य गोरगरीब माणसाच्याठायी असते. याचा प्रत्यय या सामान्य माणसाला गांधीनी आणून दिला. सत्यागृहाचे शस्त्र दिले. लढे, आंदोलन याला विधायक स्वनात्मक कार्याची जोड देण्याचे महत्त्व मनावर बिंबविले. साध्य–सादन यांच्यातील हा भेद संबंध व प्रत्यानुभूतीची गरज स्पष्ट केली. गांधीच्या वैचारिक वारशाचे विवेचन करणारा त्यांचा 'संत अधिक ऋषी' हा लेख या पुस्तकातला सर्वात सरस लेख असल्याचे वसंत पळशीकरांनी परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

'अमेरिकेकडून गांधींना मिळालेल्या प्रतिसाद' या लेखात ग.प्र.प्रधान यांनी सी शेषाचारी

यांनी महात्मा गांधींच्या जीवनाचा अमेरिकेतील जनमानसावर, वृत्तपत्रांवर आणि विचारवंतावर झालेला परिणाम या विषयी सखोल अभ्यास करून लिहिलेल्या पुस्तकाचे मार्मिक परीक्षण केले आहे. म.गांधींच्या अहिंसेच्या शिकवणीचा अमेरिकेतील निग्रो चळवळीवर काय परिणाम झाला याचे विस्तृत विवेचन केले आहे. म.गांधींचे विचार व कार्य यांचा उत्तम परिचय असलेल्या वाचकालाही वेगळ्या संदर्भात गांधीजींच्या विचाराच व कार्याचा प्रभाव यांचे दर्शन घडविणारे हे पुस्तक असल्याचे ग.प्र.प्रधान यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

'गांधी, लोहिया आणि दीनदयाळ' या लेखात माधव दातार यांनी प्रा.मधु दंडवते यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे परीीण करून गांधी, लोहिया आणि दीनदयाळ उपाध्याय या तीन राजकीय पुरूषांतील साम्यस्थळे यावर प्रकाश टाकला आहे. तिघांचीही वैयक्तिक जीवनातील साधी राहणी, सामान्य व पददलित जनतेविषयी जिव्हाळा, तिघांच्याही जववनातील ब्रह्मचर्य या कल्पनेचे कमी अधिक महात्म्य तिघांचाही अनैसर्गिक रीतीने झालेला मृत्यू, तिघांचाही फाळणीला असणारा विरोध, राजकीय सत्तेचे व उत्पादनाचे विकेंद्रीकरण, विदेशी विचार जसेच्या तसेच स्वीकारणाऱ्याला असलेला विरोध, लाभप्रधान उत्पादन तंत्राचा पुरस्कार, जास्तीत जास्त भौतिक गरजांची पूर्तता म्हणजे आर्थिक प्रगती ह्या समीकरणांत असणारा तिघांचा विरोध, इत्यादि ह्या विषयांवरील या तिघांच्या विचारात कमालीचे साम्य आढळत असल्याचे नमूद केले आहे.

'मो.ग.गांधी, भारत आणि जग' या लेखात एम.पी.सिन्हा आणि शिवनारायण रे यांनी संपादित केलेल्या पुस्तकाचे वसंत पळशीकर यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. गांधींच्या सत्याग्रहाचे ऐतिहासिक, मौलिकत्व, तो केवळ अहिंसक असतो यात नाही, तर सत्यागृह हा एक सामूहिक चळवळीचा मार्ग बनू शकतो. या संयोगामुळे त्याचे महत्त्व आहे, असे म्हटले आहे ते पटण्यासारखे आहे.

एम. बालसुब्रम्हण्यम यांनी लिहिलेल्या (Nehru: a Study Secutarism) या पुस्तकाचे सुनील शंकरराव आडगावकर यांनी परीक्षण केले आहे. भारताच्या सामाजिक व राजकीय इतिहासाच्या संदर्भात नेहरूंचा धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, हिंदूवादी विचारसरणी आणि असेचवादी मनोवृत्ती यांचे चिकित्सक दृष्टीने विश्लेषण केले आहे. नेहरूंची विज्ञाननिष्ठा आणि

सत्यसंशोधनाची बौद्धिक प्रेरणा त्यांना परंपरावाद, अंधश्रद्धा आणि पोथीनिष्ठा विचारसरणी यांच्या विरोधात उभे करण्यास कारणीभूत झाली आहे असा निष्कर्ष लेखकाने काढलेला आहे. याकडे आडगांवकर यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. नेहरूंच्या धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन आणि इहवादी विचारसरणी त्यावर आडगावकर यांनी प्रकाश टाकला आहे.

'पंडित नेहरू: द एक्सटसी अँड द अॅग्री' या लेखात प्रकाश कर्दिले यांनी नेहरूंच्या राजकीय कर्तृत्वाचे जास्त वास्तव आणि चिकित्सक मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. नेहरूंचे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे नायक म्हणून नेहरूंचे चरित्र, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने नेहरूंच्या कारकीर्दीचा आढावा, नेहरूंचे गुणविशेष आणि त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन केलेले आहे.

'आधुनिक भारताचे नेतृत्व' या लेखात मालिनी पंडित यांनी 'नवरोजी ते नेहरू' या गोविंद तळवळकर यारंनी लिहिलेल्या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. दादाभाई नौरोजी यांच्या पासून पं. जवाहरलाला नेहरूंपर्यंतच्या प्रमुख राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या विचारांचा, त्यांनी केलेल्या आंदोलनांचा व कार्याचा आढावा गेणे हा या ग्रंथाचा उद्देश असल्याचे स्पष्ट करून नव्या दृष्टिकोनातून त्यातील काही घटनांवर व विचारांवर प्रकाश टाकणारा हा ग्रंथ स्वागतार्ह असल्याचे परीक्षणात नमूद केले आहे. नेहरू हे स्वातंत्र्य चळवळीचे जसे एक प्रमुख नेते होते, तसेच ते स्वातंत्र्योत्तर काळातील पहिली अठरा वर्षे या देशाचे पंतप्रधान होते. त्यांच्या आर्थिक व राजकीय धोरणाची चर्चा लेखकाने केली. त्यावरही प्रकाश टाकला आहे. आजच्या राजकारणातील अनेक प्रवाह स्वातंत्र्यपूर्व काळात उगम पावले आहेत म्हणून हा विषय आजही लोकशिक्षणाच्या दृष्टीने खरोखरच महत्त्वाचा आहे. तळवलकरांनी राष्ट्रीय चळवळीतील आर्थिक विचार सरणीची साधार व विस्तृत चर्चा केली आहे, त्यामुळे त्यांचा हा ग्रंथ वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे, असा मार्मिक अभिप्राय नोंदवला आहे.

'राजषी शाहू' या लेखात पां.वा.गाडगीळ यांनी राजर्षी शाहू गौरवग्रंथाचे परीक्षण केले आहे. आठ विद्वानांचे शाहू महाराजांच्या अनेक गुणांवर विविध कर्तृत्वावर प्रकाश टाकणारे लेख आहेत. ते विविध विचारसरणीचे प्रतिनिधी असल्यामुळे त्यांची मते आधुनिक पिढीस

शाहूमहाराजांचा संबंधाने कळण्यास हा ग्रंथ मदत करेल, असे मत मांडले आहे. शाहू महाराजांनी प्रेरित केलेली ब्राह्मणेत्तर चळवळ ब्राह्मण विरोधी नसूनही बहुजन समाजाची समतावादी चळवळ होती, हे तिचे वैशिष्ट्य आहे व तिचे वैशिष्ट्य महाराजांच्या मृत्यूनंतर दीर्घकाळाने ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा म्हणून विशेष जोर देऊन मांडला गेला आहे, असे गाडगीळ यांनी परीक्षणात नमूद केले आहे.

भारतात उदार विचारांचे व उदार कृतींचे इतर राजे झालेच. पण महाराजांचे व्यक्तिमत्व काहीसे अद्वितीयच ठरले. शाहूमहाराजांनी राजवाड्यावरच्या मजल्यावरून विचारांची व कल्याणाची अवदान लोकांच्या अंगावर टाकली नाहीत. ते राजवड्याच्या बाहेर आले, लोकांत मिसळले, गरीब पण हुशार दिसणाऱ्या मुलांच्या पाठीवर हात फिरवून त्यांनी त्याला शिकविले व मोठे केले. मराठा समाजाचाही राग पत्करून अस्पृश्यांना राजवाड्यात, राज्यकारभारात, घरात, देवळात प्रतिष्ठा देऊन प्रवेश दिला. आपण लहान नाही, उच्चनीच कोणीही नाही, आपण सर्व समान आहोत ही जाणीव महारजांनी पहिलवानांत, मजुरात, शेतकऱ्यात, महार–मांगात सगळ्या सगळ्यात मिसळून त्यांच्यात जेऊन–खाऊन त्यांच्याशी आचाराने व भावनेने एकरूप होऊन दिली, त्या शाहू महाराजांच्या कर्तृत्वावर परीक्षणात प्रकाश टाकला आहे त्यामुळे शाहू महाराजांच्या कृर्तृत्वाचे मोठेपर नव्या पिढीला कळते. त्यांचे हे परीक्षण रसिक–वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे.

'श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण' या लेखात द.रा.दोशी यांनी शाहू महाराजांचे अर्थकारण समाजातील आर्थिक दरी कमी करण्याचे असल्याचे म्हटले आहे. सामान्यजनांना समाजात मानाचे स्थान मिळवुन देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतानाच त्याचंया आर्थिक उन्नतीसाठी ही पुरोगामी व प्रगत धोरणे शाहू महाराजांनी अनुसरून उद्योग, व्यापार, शेती, रोजगार, कामगार, संघटना, वगैरे बाबतीत नवीन विचार व उपक्रमांना चालना देऊन प्रजेच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग त्यांनी मोकळा केला, असे विवेचन करून त्यांचे हे कार्य समाजातील आर्थिक दरी नष्ट करण्यासाठी कसे उपयुक्त ठरले याकडे ही वाचकांचे लक्ष वेधले आहे.

कोल्हापूर संस्थानातील जनतेच्या आर्थिक उन्नातीचा पाया शेती व्यवसाय आहे हे जाणून

शाहू छत्रपतींनी शेतीच्या उर्जितावस्थेसाठी विविधांगी उपाय योजना केली. शेतकऱ्यांना चांगली बियाणे, खते व कर्ज मिळण्याची व्यवस्था केली. चहा, कॉपी सारख्या पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. पाणी पुरवठ्यांच्या योजना कार्यान्वित केल्या. शेतीला पूरक व्यवस्थायांचीही वाढ करण्याकडे लक्ष दिले. विविध प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन दिले, त्यांचे हे कार्य आर्थिक दूरवस्थेच्या जोखडासाठी दबलेल्या जनतेला बाहेर काढण्यासाठी महत्वपूर्ण ठरल्याचे दोशी यांनी म्हटले आहे. छत्रपतीनी शेतीला उर्जितावस्था येण्यासाठी तेव्हा केलेल्या उपायांची आजही गरज असल्याचे दिसते. शाहू महाराजांचे विचार काळाच्या पुढचे होते म्हणून आजही ते कालबाह्य ठरले नाहीत. या परीक्षणामुळे शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्वाच्या वेगळ्या पैलूवर परीक्षणातुन प्रकाश पडतो. सामान्य वाचकांनो शाहू महाराजांच्या आर्थिक व्यवहारांची कल्याणकारी प्रयत्नांची माहिती होण्याच्या दृष्टिने हे परीक्षण फार उपयोगी वाटते.

मायकेल ब्रेशर यांनी लिहिलेल्या 'इंडिया ॲड वर्ल्ड पॉलिटिक्स' या पुस्तकाचे ग.प्र.प्रधान यांनी परीक्षा करून कृष्णमेनन यांच्या राजकीय जीवनाचे यथार्थ दर्शन अतिशय कुशालतेने घडविले आहे. श्री कृष्णमेनन हे भारताच्या राजकीय रंगमंचावर १९४७ ते १९६२ या पंधरा वर्षाच्या कालखंडास मोठ्या दिमाख्याने वावरले.

डॉ. राममनोहर लोहिया यांनी लिहिलेल्या दाने हत्यारे सत्ताधाऱ्यांची भाषा आणि जाती या पुस्तकाचे सुधीर बेडेकर यांनी परीक्षण केले आहे लोहि यांच्या भाषा विषयक आणि जाती विषयक भूमिके विषयी या परीक्षणात प्रकाश टाकला आहे. प्रथम इंग्रजी ही परकी भाषा आहे यापेक्षा ती मूठभरांची भाषा आहे याचा दुप्पट परिणाम अधिक होत आहे हा मुद्दा ते अचूकपणे मांडतात. भाषा ही समाज जीवनातुन उगवलेली असते. भारतीय समाजातील वरिष्ठ थरांची ऐतिहासिक जडणघडण त्यांच्या हितसंबंधाची विशिष्ट रचना या वास्तवामुळे लोक इंग्रजी प्रेमी आहेत ते निबुद्ध वा कपटी असतील पण ते तसे का आहेत याच कारणे पलिकडे जाऊन स्पष्ट करायला घ्यावीत याकडे लक्ष वेधले आहे. तसेच जाति व्यवस्था हा भारताच्या प्रगतीतील एकमेव अडसर आहे असे विवरून सांगतात. भाषा आणि जातीचा सत्ताधाऱ्यांनी हत्यारे म्हणून वापर करून सामान्य जनतेची दिशाभूल केल्याचे त्यांनी म्हटले आह ते विचार करायला लावणारे आहे.

'याहाखानी कारकीर्द' एक अर्थबोध या लेखात वसंत शिंदे यांनी हर्बट फेलडमन यांनी लिहिलेल्या 'दि एण्ड ॲड दि बिगिनिंग' या पुस्तकाचे परीक्षण केले आहे पूर्व पाकिस्तान कधी तरी अलग होऊन स्वतंत्र देश बनणार ही जणू दैवगती होती. या प्रक्रियचे अपयेय घेण्याचे दुर्भाग्य ज्यांच्या वाट्याला आले त्या याहाय्यानाच्या कारकीर्दीची कथा वसंत शिंदे यांनी वाचकांसमोर मांडली.

फेलडमनचे पुस्तक बांगला देश निर्मितीची प्रक्रिया समजून  घेण्याच्या दृष्टिने विशेष साह्यभूत होत नसले तरी वेगळ्या कारणासाठी ते उपयुक्त व वाचनीय झाले आहे दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या अनेक आशियाई आफ्रिकी राष्ट्रापुढे राजकीय संघटन, टिकाऊ व अर्थपूर्ण बनविण्याच्या मार्गात अडचणी येत आहेत हे संघटन लोकशाही मार्गाने घडविण्यात अद्याप तरी कुणाला यश आलेले नाही या ना त्या स्वरूपाच्या एकाधिकारशाही राजवटी बहुतेक देशात कायम होत आहेत पण गंमत अशी की त्यासुद्धा टिकाऊ ठरत नाही असा अनुभव येत आहे. पाकिस्तानचा अनुभव व त्या दृष्टिने विशेष उद्‌बोधक आहे हे त्या पुस्तकावरून दिसुन येते, असे परीक्षणात्मक अभिप्रायात नमुद केले आहे.

'विद्राही तुकाराम' या डॉ. आ.ह.साळुंखे यांच्या ग्रंथाचे परीक्षण भाई वैद्य यांनी कले आहे. अभिजनविरूद्ध बहुजन हा हजारो वर्षाचा सांस्कृतिक संघर्ष चालू असुन त्यात तुकाराम महाराजांचे स्थान कार्य आहे व त्यांनी ब्राह्मण संस्कृती विरूद्ध आपला लढा जीवाचे मोल देऊन कसा लढविला याचे विस्फोटक, प्रत्ययकारी व दाहक चित्रण डॉ. आ.ह.साळुंखे यांनी विद्रोही तुकाराम ग्रंथात केले असल्याचे भाई वैद्य यांनी परीक्षणात नमुद केले आहे.

तुकाराम महाराज हे जगात शतकात एखादेच व्हावे असे विलक्षण चैतन्यदायी व बंडखोर व्यक्तित्व होते त्यांच्या अभंगाद्वारा त्यांचा अभ्यास महाकवी, थोर भगवद् भक्त आध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी या दृष्टिने अनेकांनी केला सर्वांपेक्षा साळुंखे यांची दृष्टि अलग व मौलिक आहे. साळुंखे म्हणतात ''तुकाराम आपल्या भोवती जमणारांना नुसते टाळ वाजवायला शिकवत नव्हते परंपरागत धर्माच्या विरोधात विद्रोहाचे तत्वज्ञानही शिकवत होते ते स्वत:वर विद्रोही होतेच पण लोकांच्या मनात महाविद्रोहाच्या बीजाची पेरणीही करीत होते... ते... युयुत्सु... आणि विजिगीषु ...

हाते म्हणुनच त्यांची 'विद्रोही तुकाराम' असे यथार्थ शीर्षक ग्रंथाला दिल्याचे वैद्य यांनी नमुद केले आहे.

'तुकाराम दर्शन' या सदानंद मोरे यांच्या ग्रंथाचे रा.गा.जाधव यांनी परीक्षण केले आहे परीक्षणामध्ये जाधव यांनी ग्रंथ रचनेच्या स्वरूपाविषयी गाथा स्वीकाराच्या विभिन्न शैली, तुकोबांचे कवित्व वारकरी संप्रदाय व मराठी समाज यावर प्रकाश टाकला आहे. 'डॉ. मोरे यांच्या या व्यासंगपूर्ण चिकित्सक ग्रंथाचे सर्वात मोठे मोल म्हणजे आल्या सातशे वर्षाच्या सांस्कृतिक परंपरेला आपल्या भाषेत, आपल्या भावनेने, आपल्याच परिप्रेदशात व आपल्याच निकषांनी एक आव्हानात्मक बौद्धिक चर्चेचा डिस्कोर्सचा– विषय त्यांनी बनवले' असे परीक्षणात्मक अभिप्रायात रा.ग.जाधव यांनी मत व्यक्त केले आहे. अत्यंत साधेपणाने तुकोबा केंद्रित वारकरी दर्शनाचा ऐतिहासिक परि प्रश्नात मार्गोवा डॉ. मोरे यांनी घेतल्याचे नमुद केले आहे.

'संताचे तत्वज्ञान' या लेखात ज.रा.दाभोळे यांनी 'संताचे तत्वज्ञान आणि धर्मविचार' या डॉ. शि.स.अंतरकर यांच्या पुस्तकाचे परीक्षण केले आहे. संतांच्या तत्वज्ञानाचा विचार करताना डॉ. अंतरकरांनी 'ज्ञानेश्वरी' व 'दासबोध' हे दोन ग्रंथच विचारात घेतले आहेत, असे त्यांनी आपल्या मनोगतात नमुद केले आहे. 'रडके अध्यात्म' टाकुन देऊन 'उमदे अध्यात्म' स्वीकारले पाहिजे, असे डॉ. अंतरकरांचे सांगणे असल्याचे नमुद करता ज्यांना संताचा विचार समजून घ्यावयाचा आहे व ज्यांना धर्माकडे, अध्यात्माकडे गांभीर्याने पाहण्याची इच्छा आहे अशांनी हे पुसत्क एक नवी दुष्टि देईल असा मला विश्वास वाटतो, हा त्यांचा अभिप्राय मार्मिक वाटतो रसिक वाचकांना नवी दृष्टि देणारा वाटतो.

भा.ल.भोळे यांनी लिहिलेल्या 'महात्मा जोतीराव फुले' वारसा आणि वसा या पुस्तकाचे अविनाश सप्रे यांनी परीक्षण केले आहे. 'एकेकाळी फुलल्यांची फार मोठी उपेक्षा झाली आजकाल तो उठतो तो फुल्यांचे नाव घेतो आणि त्यांच्या विचारांचे आपण जणू काही वारसदार आणि पाईक आहोत असा आभास निर्माण करतो. राज्यकर्ते, विरोधक पुरोगामी, प्रतिगामी अशा सर्वांनाच फुल्यांचा उदो उदो करण्यात धन्यता वाटते. या गदारोळात फुल्यांचा नेमका वसा काय होतो आणि त्यांचा वारसा कशा स्वरूपात आता प्रकट होतो आहे हे कळणे कठिण हाते अशा

वेळेत मी भोळे यांच्या प्रस्तुत ग्रंथामुळे फुल्यांचा वसा आणि वारसा कळायला मदत होते असे परीक्षात्मक अभिप्रायात अविनाश सप्रे यांनी नमुद केले आहे. परीक्षणामध्ये पुस्तकाचे वैशिष्ट सांगताना सप्रे नमुद करतात की, संकलित केलेल्या नऊ लेखातुन फुल्यांच्या वैचारिकतेची आणि व्यक्तिमत्वाची खास वैशिष्टये निदर्शनास आणुन दिली आहेत. म. फुले यांचा वारसा सांगणाऱ्या बहुजन समाजामध्ये जागृती होण्याची गरज आहे फुल्यांचा वारसा सांगण्याऱ्यांनी म. फुले यांचा कार्याचा रथ पुढे नेला पाहिजे. रा. ना. चव्हाण या संदर्भात लिहितात''म. फुले यांचे सर्वांगीण प्रगतीचे कार्य सर्वथा पुरे झाले आहे, असे मात्र नव्हे. पुरे करण्याची जबाबदारी बहुजन समाजावर आहे पण व्यापक प्रमाणात जागृती नाही, सत्यापेक्षा सत्ता हेच साऱ्याचे ध्येय आणि कार्य झाले आहे असे आजच्या वास्तवावर मार्मिक भाष्य केले आहे. अविनाश सप्रे यांच्या या परीक्षणातुन म. फुले यांचा वारसा आणि वसा सांगणाऱ्यांना विचार करायला लावणारे आहे.[७]

शरच्चंद्र मुक्ती बोधावरील 'ज्वालचे फुल शरच्चंद्र मुक्तिबोध व्यक्ति आणि वाङ्मय या डॉ. रणधीर शिंदे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे राजशेखर शिंदे यांनी परीक्षण केले आहे. 'ज्वालेचे फु' हे नाव मोठे अन्वर्थक आहे. ज्वाला लाल रंगाच्या त्यातुन दिसणारे फुलही लाल रंगाचे म्हणजे लाल बावय्याचा सरळ सरळ उल्लेख लाल रंग ही मार्क्सवादीची खूप शरच्चंद्र मुक्तिबोध मार्क्सवादी साहित्यिक म्हणूनच ओळखले जातात. या परीक्षणामध्ये मुक्तिबोधांच्या व्यक्तिमत्वाची घडण व जीवनकार्य आणि मुक्तिबोधांच्या साहित्याचे मोल जाणुन अनेक गोष्टी विस्तारणे साकारले आहेत.

मुक्ति बोधांच्या कविता 'नवी मळवाट' 'यांत्रिक सत्याची जात' या कविता संग्रहावर प्रकाश टाकला आहे. सामाजिक जाणिवेच्या कविता, विषमविषयक जाणिवेच्या कविता, निसर्ग संवेदनेच्या कविता, मार्क्सवादी दृष्टीचा कविता, निसर्ग कविता असे वर्गीकरण विश्लेषण करून केले आहे. कवितेतील आशय, विषय, सौदर्यदृष्टि आविष्कार विशेष यावर भर दिलेला आहे. कवीच्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणा, प्रयोजने सांगून कांदबऱ्याच्या अनुषंगाने लेखनाच्या संवेदन स्वभावाला समोर ठेवुन लेखन काळातील सामाजिक घटिते ते शोधू पाहतात. शरच्चंद्र मुक्तिबोधाच्या साहित्यातून व्यक्त होणारी मार्क्सवादी भूमिका यावरही प्रकाश टाकला आहे. मुक्तिबोध आणि मार्क्सवादी यांच्या जैविक संबंध स्पष्ट करताना डॉ. अरूणा देशमुख म्हणतात की,

''मुक्तिबोधांनी मार्क्सवादी जीवन जाणिवा स्वीकारलेल्या आहेत. त्यांच्या वैचारिक भूमिकेचे पोषण मार्क्सवादाने केले परिणामत: त्यांचा साहित्य विचार लौकिकतावादी सौदर्य विचारणा पुष्ट करताना दिसतो.''[८]

हे परिचय मुक्तिबोधांच्या साहित्याची नवी समज 'राम जगताप' यांनी लिहिलेल्या 'कर्ता माणसं' या पुस्तकाचे खंडू ज्ञानदेव खळदकर यांनी परीक्षण केले आहे. महाराष्ट्रातल्या दुर्गम, आदिवासी भागांत शहरांच्या वाड्या वस्त्यांमध्ये संस्थेच्या व संघटनेच्या माध्यमातुन वंचित शोषित, उपेक्षित घटकांचे प्रश्न हाती घेऊन संघर्ष करणाऱ्या सामाजिक कार्यकार्त्याचे काम अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावे हा संपादकाचा हेतू असल्याचे स्पष्ट करतात.

परीक्षणांमध्ये खळदकर यांनी 'कर्ती माणसं' या पुस्तकाची काही वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत या कार्यकर्त्याच्या जीवनविषयक प्रेरणा काय होत्या, त्यांना प्रतिकूल परिस्थितीतही लढण्याचे व टिकून राहण्याचे बळ कोढुन मिळाले आणि विकासाच्या वेगवेगळ्या पायवाटा कशा तयार करता आल्या याचे काही वस्तुपाठ या पुस्तकात असल्याचे नमुद करतात. तसेच या कार्यकर्त्यांनी संस्थेच्या व संघटेनच्या माध्यमातुन वंचित, शोषित व उपेक्षित घटकांचे प्रश्न ऐरणीवर कसे आणले त्यांची कैफियत शासन दरबारी कशी मांडली व त्यांना संघटित कसे प्रवृत्त केले याची झलक या असल्याचे स्पष्ट करतात. या पुस्तकातील महिला कार्यकर्त्यांच्या कार्यातुन स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य विषयीच्या जाणिवा आणि अन्याया विरूद्ध झगडण्याची ईर्ष्या जागृत होण्यास मदत होते यासर्व बाबींमुळे राम जगताप यांनी संपादित केलेला 'कर्ती माणंस' हा लेख संग्रह महत्वाचा असल्याचे परीक्षणात्मक अभिप्रायात खळदकर यांनी म्हटले आहे ते यथार्थ वाटते.

थोडक्यात, ग्रंथकारांच्या नावाविषयी मतभेद, कुटुंबाची पार्श्वभूमी, श्रेष्ठ सारस्वतांच्या जीवनाचा विविध दृष्टिकोणातून घेतलेला मागोवा, समाजसुधारकांच्या व्यक्तीमत्वाची जडण–घडण, लेखकांचा जीवनाभुव, कवींच्या कवितेतील सामाजिकता, इतिहासाचे संदर्भ या वैशिष्ट्यांचा चरित्रात्मक समीक्षेत समावेश होतो.

*** स्त्रीवादी समीक्षा :–**

स्त्रीवादी समीक्षाविचार व्यक्त करणारे पुढील लेख 'समाज प्रबोधन पत्रिके' मधून प्रसिद्ध झालेले आहेत. 'कमलादास यांच्या काव्यातील स्त्री', जया हादशीवार, 'भारतीय समाजशास्त्र आणि स्त्री–पुरुष विषमतेचा प्रश्न'– विद्युत भागवत, गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील सामाजिक वास्तव–अविनाश सप्रे, 'स्त्री कर्माची धर्मकहाणी'– अनिता पगारे, 'स्त्रीवादी परिप्रेक्ष्य'– स. मो. दहिवले, 'इरावती कर्वे यांचे स्त्रीजवनविषयक विचार : एक प्रश्नचिन्ह'– प्रभा गणोरकर, 'स्त्रीवाद आणि मराठी नाटक'– विजय तापस.

आधुनिक भारतीय इंग्रजी (Indian English) साहित्याच्या क्षेत्रात कमलादास या आघाडीच्या कवियत्री मानल्या जातात. जया द्वादशीवर यांनी कमला दास यांच्या काव्यातील स्त्री या लेखात यांच्या काव्यातील स्त्री धाडसी, बेदारकार अनुभवाचा सच्चेपणा मांडणारी असल्याचे स्पष्ट केले आहे. काव्यातील स्त्रीच्या विविध रुपांची माहिती दिली आहे. कमला दास यांच्या कवितेतील स्त्री मनाचा प्रवास देहवादापासून सुरु होतो. जीवनाच्या या भवसागरात पोहताना पहिली लाट येते ती वासनेची. देहतृष्णा ही चिरंतन असून तिला नाकारणे हा जीवनाकडे पाठ फिरवणारा पलायनवाद ठरतो. या विचारसरणीच्या प्रभावाखाली असल्यामुळे कमला दास यांच्या काव्यात बरोच ठिकाणी स्त्री–पुरुष देहाचे सविस्तर व भडक वर्णन असल्याचे म्हटले आहे. Summer in Calcutta या प्रसिद्ध कवितेत प्रियकराशी शृंगार करण्याच्या केवळ कल्पनेने येणारी धुंद व सुखद जाणीव प्रकट होते. तर A Relationship या कवितेत प्रेमाची उत्कटता व्यक्त होते. कमला दास यांच्या कवितेतील स्त्री अनुभवाचा सच्चेपणा मांडणारी आहे. म्हणूनच स्त्रीकडे पाहण्याचे पारंपारीक मूल्य झुगारून देऊन तिचे आंतरिक सत्यदर्शन घडविण्याचे कार्य हे काव्य करते.

'भारतीय समाजशास्त्र आणि स्त्री–पुरुष विषमतेचा प्रश्न' या लेखात विद्युत भावत यांनी स्त्री–पुरुष विषमतेची मूळे शोधले आहे. समाजशास्त्राने सुरुवातीला कारखानदारी आणि भांडवली अर्थव्यवस्था ह्यामुळे युरोपीय समाजात झालेले बदल अभ्यासले. कारखानदारीमुळे मानवी जीवनात जो मुलभूत फरक झाला तो म्हणजे उत्पादनाची पुनरुत्पादनापासून झालेली फरकत. जो

फरक गृहित धरुन म्हणजेच त्याची चिकित्सा न करता समाजशास्त्राचा पाया घातला गेला. सामाजिक रचना आणि त्यांचे कार्य अभ्यासताना, बाईच्या जीवनाचे क्षेत्र म्हणजेच तिचे घर आणि पुरुषाच्या जीवनाचे  क्षेत्र म्हणजे घराबाहेरील व्यापक जग ही लैंगिकतेवर आधारली गेलेली श्रमविभागणी नैसर्गिक मानली गेली असल्याचे विद्युत भागवत यांनी नमूद केले आहे.

समाजवादी स्त्रीवाद्यांनी इतिहासाकडे पाहण्याचा एकात्म दृष्टिकोन विकसित केला. उत्पादन पुनरुत्पादन आणि लैंगिकता यांच्या संरचनातून स्त्रियांची परिस्थिती घडते आणि या संरचना आंतरिकरित्या परस्परांशी जोडलेल्या असतात, त्या सामाजिक वास्तवाकडे त्यांनी लक्ष वेधले. सर्व स्त्रिया केवळ स्त्रिया आहेत म्हणून त्यांना स्त्रीजवनाविषयी अभ्यास करण्याचा मक्ता दिला जाता कामा नये, म्हणूनच स्त्रीवादी विचारांचा चिकित्सक अभ्यास होणे महत्वाचे असल्याचे विद्युत भागवत यांनी म्हटले आहे. स्त्रीवादाने काही महत्वाच्या गोष्टी प्रकाशात आणल्या. उदाहरणार्थ, लिंगभाव (बाईपणा, पुरुषपणा) समाजात घडतो, तसेच निसर्ग, मानव संस्कृती किंवा सार्वजनिक खाजगी द्वैत नैसर्गिक नाहीत. समाजशास्त्रामध्ये जातीव्यवस्थेचा विचार अनेक समाजशास्त्रांनी केला आहे. यामध्ये घुर्ये, केतकर, इरावती कर्वे आणि श्रीनिवास या चार समाजशास्त्रज्ञांनी जाती संस्थेच्या अभ्यासाच्या संदर्भात योगदान महत्वाचे असल्याचे विद्युत भागवत यांनी नमूद केले आहे.

'गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील सामाजिक वास्तव' या लेखात अविनाश सप्रे यांनी गौरी देशपांडे यांच्या लेखनातून जे सृजनशील विश्व निर्माण केले आहे, त्याचा वेध घेतला आहे. आपले सामाजिक  वास्तव बहुस्तरीय, बहुजिनसी, बहुजातीय असल्यामुळे त्यांच्यातील गुंतागुंत सोपी करुन पाहणे योग्य ठरत नाही. एका स्तराचे 'वास्तव' दुसऱ्या स्तराला 'काल्पनिक' वाटावे एवढे निर्णायक अंतर आपल्या वास्तवात असल्याने विशिष्ट साहित्यातील 'वास्तव' प्रतिनिधिक आहे की नाही यापेक्षा ते 'अधिकृत' आहे की नाही याचा शोध अविनाश सप्रे यांनी घेतला आहे. गौरी देशपांडे यांचे साहित्य म्हणजे स्त्री मुक्तीचे साहित्य नसून मुक्त स्त्रीचे साहित्य आहे. या विश्वातली स्त्री सुंदर असल्यामुळे पुरुषाला आवडते, हे वेगळेपण नमूद केले आहे.

'मी बाई आहे' याचा अर्थ मी पुरुषापेक्षा कमी आहे किवा पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे किंवा

पुरुषाशी संघर्ष करण्यासाठी आहे अशा स्वरुपात इथे घेतला नसल्याचे म्हटले आहे, हे शरीर माझे आहे आणि त्याच्यावर कुणाचाही असू शकत नाही, मात्र नाते असू शकते असा इथला भाव असल्याचे म्हटले आहे.

'स्त्री–कर्माची धर्मकहाणी' या फादर प्रशांत ओलालेकर यांच्या पुस्तकाचे अनिता पगार यांनी परीक्षण केले आहे. स्त्रीचे धर्मात, समाजात स्थान काय आहे, याचा शोध घेतला आहे. सर्वच धर्मात स्त्रीचे स्थान नेहमीच अतिशय तुच्छ लेखले गेले आहे. सर्वच धर्मग्रंथ पुरूषांनी लिहिले असल्याने स्त्रिला कनिष्ठ स्थान दिले आहे, या वास्तव सत्याकडे लक्ष वेधले आहे. फादर प्रशांत यांनी 'उपेक्षितांच्या चष्म्यातूनही इतिहास तसेच धर्मग्रंथ याचा अर्थ लावण्याची वेळ येऊन ठेपली आहे, असे मानून आपली भूमिका उभय रूपी स्त्रीवादी दृष्टिकोनातून बायबल, ख्रिस्ती परंपरा व इशसान यांचे पुनर्भाष्य करण्यासाठी बायबलमधील घटना व प्रसंगाचा अर्थाची नवी मांडणी प्रशांत यांनी केली आहे. 'स्त्री' ही देखील देवाचीच प्रतीक मानायला हवी. या आपल्या भूमिकेचे समर्थन करताना फादर प्रशांत यांनी अतिशय चांगले समर्थन केल्याचे पगारे यांनी स्पष्ट केले आहे.

'पवित्र मारिया आणि स्त्री मुक्ती' या प्रकरणातही त्यांनी येशूच्या मातेचे लढाऊपण व तत्त्वापाठी दुर्दम्यपणे उभे राहण्याची कृती याकडे लक्ष वेधले आहे. मारिया कुमारी माता होती, या चमत्कारावर ख्रिस्ती परंपरेचे लक्ष केंद्रित झाले. परिणामी तिच्या मातृत्वाच्या आणि स्त्रीत्वाच्यापायी उद्‌भवलेल्या समस्या आणि संघर्ष त्याकडे डोळेझाक झाली. येशूच्या धर्मकार्यात शेवटपर्यंत साथ देणारी ही खरे तर मुक्तीच्या कार्याची स्फूर्तिदायी ठरायला हवी, असे फादर प्रशांत मानतात. मारिया ही फक्त विनम्र शरण जाणारी, आसांकित दासी नसून देयाबरोबर स्वत:च्या हिंमतीवर सहकार्य करणारी सबला होती. परंपरेने कोंडून ठेवलेल्या मरियेच्या प्रतिभेला मुक्त करून या प्रेरक शक्तिचा स्त्री मुक्ती व मानव मुक्तिसाठी उपयोग करणे ही काळाजी गरज असल्याचे अनिता पगारे यांनी आपल्या परिक्षणात्मक अभिप्रायात नमूद केले आहे. ख्रिश्चन धर्माचा घाला घातला गेला त्या काळात द बूव्हाने केलेला जो चिकित्सक अभ्यास आहे तो फ्रेंच क्रांतीच्या सुरुवातीपर्यंत आणूक तिने ठेवला आहे. या संदर्भात ती स्पष्टपणे असे मांडते की,

''ख्रिस्ती विचार विश्वामध्ये स्त्रियांच्या दडपणूकीला पाठिंबाच दिला गेला आहे. या चौकटीत स्त्रीला प्रार्थनेमध्ये सहभागी होण्याइतपतच दुय्यम स्थान होते.''[९]

विद्युत भागवत यांच्या 'स्त्रीवादी सामाजिक विचार' या पुस्तकाचे स. मो. दहिवले यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. स्त्री–पुरुष भेदभाव, विषमता जैविक असल्याचे कालपर्यंत मानले जात होते. स्त्रीवाद्यांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेचे विश्लेषण केले आणि विवाह, कुटुंब, संपत्ती व राजकारण ह्या सामाजिक संस्थांचे नियमन करुन त्यांच्यामध्ये न्यूनगंडाची निर्मिती कशी केली गेली आणि त्याद्वारे स्त्री–पुरुष भेदभाव हा सामाजिक असल्याचे सिद्धांतन केले. त्यांचे हे योगदान मूलभुत स्वरुपाचे आहे, असे दहिवाले यांनी म्हटले आहे.

स्त्रियांची पुनरुत्पादनापासून मुक्ती मिळण्यासाठी गर्भनिरोध, कृत्रिम पुनरुत्पादन ह्या बाबी शक्य झाल्या असल्याने स्त्रीवाद्यांनी विज्ञान व तंत्रज्ञान यांचे स्वागत करणे स्वाभाविक आहे. परंतु बूव्हा, मिलेर आणि फायरस्टोन यांनी विवाह व कुटुंब व्यवस्ता नष्ट व्हायला पाहिजेत अशी भूमिका घेतली. कारण ह्या संस्था स्त्रीची स्वायत्तता हिरावून घेतात आणि तिला मुक्त होण्यापासून प्रतिबंध करतात. ह्या संस्था सामाजिक मानव शास्त्रज्ञ, समाज शास्त्रज्ञ समाजाचा पाया मानतात. स्त्रीवाद्यांनी संभाव्य सामाजिक परिणामांचा विचार केला असल्याचे दिसून येत नाही, असे मत दहिवाले परिक्षणात्मक अभिप्रायात व्यक्त केले आहे.

'इरावती कर्वे यांचे स्त्रीजीवन विषयक विचार : एक प्रश्न चिन्ह' या लेखात प्रभा गणोरकर यांनी कर्वेच्या स्त्रीजीवन विषयक विचारांचा स्त्रीवादी दृष्टीकोनातून विचार केला आहे. प्रभा गणोरकर यांनी लेखाच्या सुरुवातीलाच 'स्त्री–पुरुष तुलना' लिहिणाऱ्या तारबाई शिंदे, 'कळ्यांचे नि:श्वास' लिहिणाऱ्या विभावरी शिरुरकर यांचा स्त्रीवादी लेखिका म्हणून उल्लेख केला आहे. ताराबार्स शिंदे यांनी पुरुषांलाच नव्हे तर परमेश्वरालाही स्त्रियांवर असा सवर्था अन्याय का केला जात आहे असा जाब विचारला आहे. त्यामागे स्त्रीविषयाची अतीव कळकळ आहे. त्यांचा आवाज बंडखोरीचा आहे. विभावरींनी प्रथमच बदलत्या सामाजिक परिस्थितीने स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या नव्या दु:खांचा उद्‌गार व्यक्त केला आणि प्रौढ कुमारिकांची शारीरिक आणि मानसिक कुचंबना शब्दात मांडली. स्त्रियांची बाजू घेऊन त्यांची तडफड समाजापुढे ठेवणे ही ही

,क प्रकारे बंडखोरीच होती. त्यामुळे त्या लेखिका त्यांच्या काळातल्या स्त्रीवादी लेखिका असल्याचे गणोरकर नमूद करतात.

स्त्रियांच्या विषयी लेखन करणाऱ्या इरावती कर्वे या स्त्रीवादी लेखिका वाटत नाहीत. त्यांनी महाराभारतातील स्त्रियांबंधी असेच वेगळे, नेहमी मांडल्या जाणाऱ्या मतांहून निराळे विवेचन केले आहे. इरावतीबाईंचे विवेचन पाहता पुरुष प्रधान संस्कृतीने स्त्रीला दिलेल्या दुय्यम स्थानाची आणि विविध प्रकारे दिला दिलेल्या दु:खाची आणि मानहानीची, विटंबनेची चिकित्सा इरावतींनी केली, नसल्याचे गणोरकर यांनी स्पष्ट केले आहे. मार्मिक दृष्टी आणि बारकाईचे निरीक्षण असलेल्या इरावती कर्वे धर्म, संस्कृती आणि समाज यांचा स्त्रियांविषयीचा दृष्टिकोण कोणता आहेहे अचूक ओळखणारी ही स्त्री समाज पुरुषाचा हा दृष्टिकोण पाळण्यासाठी काय करावे याविषयी विचार मांडताना दिसत नाही.

विजय तापस यांनी मराठी नाटकातील स्त्रीवाद यावर 'स्त्रीवाद आणि मराठी नाटक' या लेखात प्रकाश टाकला आहे. मराठी नाटकात स्त्रीवादी / स्त्री केंद्री धारणा, अनुभव, विचार प्रणाली, त्याला विरोध करणारी मते यांचा वावर अजिबात झालाच नाही असा नाही, जो झाला त्याचा समाज मनावर निश्चित आणि ठोस प्रभाव टाकण्या एवढा झाला नाही, हे तापस यांचे म्हरणे योग्य वाटते. तापस यांनी नाटकातील स्त्रीवादासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आहेत. स्त्रीवादाच्या संदर्भात मराठी नाटकाने अशी उदासीनतेची भूमिका का घ्यावी, मराठी नाटकानं असं कोमट आणि भूमिकाहीन का असावं, तयने स्त्रीवास्तवाकडे दुर्लक्ष करुन साचेबंद्ध स्त्रीचित्रणातच का अडकून पडावं, स्त्रियांनीही मागे टाकलेल्या किंवा सहजतेनं सोडून दिलेल्या संकेतात्मक गोष्टीचेच हवळे इमले त्याने हट्टाग्रहाने का रचत जावेत, असे प्रश्न मराठी नाटकातील स्त्रीवादी दृष्टिकोनाबाबत निर्माण होतात.

साधारणपणे १९६८ ते १९८०–८५ पर्यंतच्या रंगभूमीवर विजय तेंडूलकरांचा फार मोठा गुणात्मक प्रभाव दिसतो. स्त्रीवाद आणि आधुनिक जाणिवेचे संवेदनेचे मराठी नाटक असा विशिष्टलक्ष्यी शेध घेऊ लागतो. तेव्हा तेंडूलकर हा स्त्री वादी – स्त्री लक्ष्यी संवेदनाचा एकमेव नाटककार दिसतो, असे तापस नमूद करतात. शांतता! कोर्ट चालू आहे! पासून कन्यादान

पर्यंतची त्यांची सारी नाट्यसंवेदना स्त्रीकेंद्री आहे आणि स्त्रीविशिष्ट अनुभवापासून स्त्रीवादी अनुभवापर्यंत सारे अनुभव त्यात संवेद्य झाले आहेत. कुटुंबाच्या रुढ चौकटीतही स्त्रीची घुसमट, तिची क्लेशकथा, तिच्या जाणिवेला फुटणारे स्वत्वकोंब आणि तिची पराभूतता यांचा अत्यंत वेधक आणि प्रखर असा शोध विजय तेंडूलकर घेताना दिसतात. तेंडूलकरी नाटक हे स्त्रीकेंद्री नाटक आहेच पण ते स्त्रीच्या परान्न जीवनाचे दु:खयुक्त आहे, असे मत तापस नोंदवतात.

व्यंकटेश माडगूळकर, भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, रंगनाथ पठारे, प्रतिभा इंगोले यांच्या साहित्यकृतीच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीवादावर प्रवीण चव्हाण यांनी प्रकाश टाकला आहे. ‘स्त्री वाद आणि अमहानरीय साहित्य’ या लेखामध्ये चव्हाण यांनी अमहानगरीय साहित्यातील स्त्रीवादाचे स्वरुप काय आहे, हे मांडले आहे. अमहानगरीय साहित्याच्या संदर्भात स्त्रीवादाचा विचार करताना शहरी–ग्रामीण, महानगरीय–अमहानगरीय या कोटीक्रमामध्ये स्त्रीयांचे बाईपण कसे घडले गेले; त्याचबरोबर जात–वर्ग यांच्यातूनही बाईपण कसे घडवले जाते. धर्म, निती, संस्कृती यासारख्यांबाबी मधून स्त्रियांना दुय्यमत्व कसे आणले जाते, ते आणखी घट्ट कशाप्रकारे केले जाते, यावर प्रकाश टाकला आहे. स्त्रीवादाचा उद्देश त्यांनी नमूद केला आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये पर्यायाने कला, साहित्य, संस्कृती, व्यवहारामध्ये निर्माण होणारे, प्रतिबिंबित होणारे, दृढ होत जाणारे स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे हा उद्देश आहे.

थोडक्यात, ‘स्त्री ही माणूस आहे’, या दृष्टिकोनातून स्त्रीकडे पाहिले जावे, भगिनी, पत्नी, माता या रुपात वावरणारी ‘स्त्री’ स्वत:च वेगळ अस्तित्व असणारी आहे, हे स्त्रीवादी समीक्षेतून स्पष्ट होते.

*** तौलनिक समीक्षा :–**

तौलनिक समीक्षेच्या अनुषंगाने ‘ताराबाई शिंदे आणि महात्मा फुले’ शुभांगी गोरे, ‘दोन महर्षी : कर्वे व शिंदे’ रा. ना. चव्हाण, ‘कुरुंदकर आणि अभिनवगुप्त’ कृष्ण श्री अर्जुन वाडकर, ‘महात्मा आणि बोधिसत्व’ अविनाश सपे या लेखांचा विचार प्रस्तुत आहे.

इ.स. ११८८२ मध्ये तराबाई शिंदे यांनी ‘स्त्री–पुरुष तुलना’ हा निबंध लिहिला. या ताराबाईंवर व ‘स्त्री–पुरुष तुलना’ तील प्रतिपादनावर म. फुले यांचा प्रभाव होता, असे डॉ. स.ग.

मालशे यांच्यापासून ते विलास खोले यांच्यापर्यंत अनेक समीक्षकांचे मत आहे, हे मत शुभांगी गोरे यानी 'ताराबाई शिंदे आणि महत्मा फुले' या लेखात खोडून काढले आहे. हे मत पारखून घेण्यासाठी म. फुले यांच्या 'स्त्री–पुरुष' व्यवहारविषयक भूमिकेचा पहिला टप्पा म्हणजे सत्सार अंग दोन पूर्वकाळातील मते यांची तुलना तराबाईंच्या 'स्त्री–पुरुष तुलना'तील मतांशी केली आहे. ताराबार्सनी निबंधामागील स्वत:ची भूमिका स्पष्ट शब्दांत नोंदविली आहे. विधवा पुनर्विवाहाच्या संधीच्या अभावी व विषम विवाहामुळे स्त्रियांकडून घडणाऱ्या तथाकथित अपराधांवरुन स्त्रियांवर केल्या जाणाऱ्या दुर्गुंणांच्या आरोपाचे खंडन ताराबाईंनी केले आहे. ताराबाई शिंदे यांची मानसिकता पितृप्रधान व्यवस्थेच्या चौकटीतलीच आहे. मात्र त्यांच्या एकूण प्रतिपादनातील स्त्री सापेक्षता विलक्षण मर्मभेदी आहे. विशेष करुन स्त्रियांच्या लैंगिक जीवनाशी संबंधित हक्कांबाबतची त्यांची सजगता, त्या काळाचा विचार करता अभिनवच आहे. म. फुलेंचा वैचारिक प्रभाव ताराबाईंवर पडला असणे शक्यच नाही. मात्र फुलेंच्या बदललेल्या मतांवर ताराबाईंच्या मतांचा परिणाम काही अंशी निश्चितच झाला आहे. परिणामी स. गं. मालशे ते विलास खोले यांच्यापर्यंतच्या सर्व समीक्षकांचे मत चूकीचे असल्याचे शुभांगी गोरे यांनी म्हटले आहे.

रा. ना. चव्हाण यांनी 'दोन महर्षी : कर्वे व शिंदे' या लेखात धोंडो केशव कर्वे व वि. रा. शिंदे यांच्या कार्याची तुलना केली आहे. जाती–जातीमधील भेद नामंजूर होते म्हणून अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात प्रो. कर्वे यांनी प्रामुख्याने भाग घेतला. कर्वे यांनी प्रार्थना समाजासारख्या नवपथ स्वीकारला नव्हता; नेमस्त पुढाऱ्यांनी कर्वे व शिंदे यांना शक्य तो जास्तीच साह्य व सहकार्य केले. कर्वे व शिंदे यांच्या कार्याची सतत वाढ होत आली. कर्वे पुण्याच्या पश्चिमेस कार्य करीत होते तर शिंदे यांनी पूर्व भागात नाना पेठेतील 'अहिल्याश्रम' ही कर्मभूमी केली होती. स्त्रिया व विद्येत मागासलेल्या लोकांचा उद्धार करण्याचे दोघांचेही माध्यम शिक्षण हेच होते. शाळा व वसतिगृहे यांच्या द्वारे दोघांनी या वर्गाची उन्नती करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला. या दोघांनी धर्मांत्तराचा मार्ग त्याज्य ठरवून स्वावलंबनाने ख्रिस्ती मिशनऱ्यांनी हातात घेतलेली कार्ये स्वत:च करण्यास सुरुवात केली.

शिंदे यांनी त्यागपूर्वक हातात घेतलेली दलितांचा प्रश्न सुटला नाही; उलट बिकट

झाल्यासारखा वाटतो. अध्यात्मिक समतेतून हा प्रश्न सोडविण्याचा शिंद्यांचा प्रयत्न होता. म्हणजे सत्तेच्या राजकारणातून हा सुटणार नाही, असा त्यांचा अनुभव होता, हा अनुभव आजही मार्गदर्शक वाटतो. कर्वे यांची 'निष्काम मठाची' कल्पना विठ्ठल रामजी यांच्या स्वभावाशी फार जुळती–मिळती वायते. वैयक्तिक महत्वकांक्षेला आळा घालणे हा विठ्ठल रामजीचा बाणा होता. यश येणे फार अवघड आहे हे दिसत असूनही ब्राह्म समाज, अस्पृश्यता निवारण ही अप्रिय कार्ये त्यांनी हातात घेतली. कर्वे यांनी देखील 'समता संघ' स्थापन जातिभेद मोडणे हा ह्या संघाचा उद्देश होता.

डिसेंबर १९७९ मध्ये बडोद्याला मराठी वाङ्मय परिषदेने ४३ वे अधिवेशन भरवली त्यावेळी आपल्या भाषणात कुरुंदकर यांनी संस्कृत परंपरेतल्या रसव्यवस्तेविषयीचा आपला विचार मांडला. कृष्ण श्री अर्जुन वाडकर 'कुरुंदकर व अभिनवगुप्त' या लेखात तौलनिक रसचर्चा मांडला आहे. करुंदकर यांनी संस्कृतमधील रसचर्चा याविषयी काही निष्कर्ष मांडले आहेत :–

१) असव्यवस्थेला परिपक्व स्वरुप आलं ते संस्कृत वाङ्मयाचा बहराचा काळ ओसरुन गेल्यावर आल म्हणजे परिपक्व रसचर्चेनं अभिजात संस्कृत वाङ्मय प्रभावित झालेल नाही. प्रभावित झाल ते देशी भाषांतल वाङ्मय ज्ञानेश्वर, तुलसीदास, सुरदार, मीराबाई, कबीर, विद्यापती या 'दिपस्तभां'च.

२) भट्टनायकानं प्रथम काव्यानंदाला 'ब्रह्मानंद सहोदर' म्हटल आणि अभिनव गुप्तानं त्याची री ओढली. इथूनच घोटाळ्याला सुरुवात झाली.

३) काव्योपासना धमोपासनेला जखडून टाकण्याची प्रक्रिया अभिनवगुप्तांच्या सर–पुरुषार्थसंबंध या संकल्पनेत सापडते.

४) भरतानं शृंगारवादी आठ रस सांगितले, अभिनव गुप्तानं शांत या नवव्या रसाची त्यात भर घातली आणि त्याला 'सर्वश्रेष्ठ रस' ठरवलं, 'तत्वमान' हा त्याचा स्थायी भाव ठरवला.

५) अभिनवगुप्तानं रुळवलेल्या वाटेवरुन ताज वैष्णवांनी भक्ती हा मोक्षोपयोगी सर्वश्रेष्ठ रस आहे, त्यांच्या पोटात अन्य सर्व रस येऊन जातात, अस ठरवलं. या भूमिकेतून तुलसीदास, सुरदास, मीराबाई, विद्यापती उपजतात.

६) धर्मदास्य हे कलावंताचे सर्वश्रेष्ठ स्वातंत्र्य आहे, असे कलावंतांना वाटावे ही मानसिक अवस्था शांत आणि भक्ती या रसांना मुर्धन्य स्थानी बसवणाऱ्या लोकांनी निर्माण केली.

कुरुंदकर समजतात तशा अभिनव गुप्तप्रणीत साहित्यसमीक्षेचा अभिनवगुणोत्तर देशी साहित्यावर प्रभाव आहे हे करुंदकर प्रत्ययकारकपणे सिद्ध करीत नाही.

डॉ. वकील यांनी लिहिलेल्या 'महात्मा आणि बोधिसत्व' या पुस्तकाचे अविनाश सप्रे यांनी परीक्षण केले आहे. महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या कार्याचा, विचाराचा समन्वय साधावा लागतो. म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व त्यांच्या आंदोलनाचा तपशीलवार आढावा घेऊन डॉ. वकिलांनी त्यांच्यातील फरक दाखविला आहे. गांधी आणि आंबेडकर यांच्या व्यक्तीमत्वाचा शोध घेताना गांधी ज्या भूमिका घेत होते त्यामागील त्यांच्या राजकीय भूमिकेबरोबरच त्यांना ध्यास असलेल्या प्रेषित बनण्याच्या भूमिकेचाही विचार झाला असता तर बरे झाले असते, तसेच 'मी पंतप्रधान होऊ इच्छितो' किंवा 'जगाला खरा बुद्ध धर्म सांगायचा आहे.' या आंबेडकरांच्या भूमिकांचाही विचार व्हायला होता, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या पुस्तकात गांधी–आंबेडकर वादांच्या निमित्ताने पाकिस्तानची निर्मिती, त्यावेळची मुस्लिम नेत्यांची परिस्थिती, भौगोलिक सत्ता इ. तपशील विस्ताराने आला आहे. ही माहिती वाचकांच्या दृष्टीने महत्वाची ठरते.

थोडक्यात, ताराबाई शिंदे, महात्मा फुले यांच्या स्त्रियांविषयीच्या विचारांचे मूल्यमापन, महर्षी कर्वे व महर्षी शिंदे यांच्या कार्याचे मूल्यमापन, कुरुंदकर, अभिनवगुप्त यांच्यातील रसचर्चा, महत्वा गांधी आणि डॉ. आंबेडकर या दोन महापुरुषांची तुलना तौलनिक समीक्षेत दिसते. तौलनिक समीक्षा साहितयतील वातावरण स्वच्छ, निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त ठरते. साहित्याच्या अनेकतेचे भान वाचकाला तौलनिक समीक्षेमुळे येते. या संदर्भात डॉ. निशिकांत मिरजकर लिहितात, ''तौलनिक साहित्य समीक्षा आपले साहित्याच्या अनेकतेचे भान सतत जागृत ठेवत असते. आपल्याला पसंत नसणाऱ्या साहित्यावर कठोर टीका करण्याचा आपला हक्क मान्य करुनही ती आपल्याला अन्य प्रकारच्या साहित्याची, त्याच्या कार्यकक्षेची, त्याच्या प्रभाव–

परिघाची दखल घ्यावयास लावते. साहित्य–व्यापाराच्या दृष्टीने एक निरोगी वातावरण यातून तयार होते.''[१०]

*** रुपवादी समीक्षा :–**

'साहित्य आणि समाज' या लेखात शरद नावरे यांनी रुपवादी समीक्षेचा आढावा घेतला आहे. रुपवाद्यांच्यामते साहित्याचे गमक त्यांच्या वास्तवनिष्ठेत किंवा काल्पनिकतेत नसून त्यात होणाऱ्या भाषेच्या विशिष्ट वापरात आहे. वाङ्मयीन भाषा रोजच्या व्यवहारातील भाषेहून वेगळ्या प्रकारे काम करते. भाषाविदांच्या भाषेत सांगायचे तर वाङ्मयीन भाषा वापरात चिन्हीत आणि चिन्ह यांच्यातील प्रमाणांचा सांधा निखळलेला असतो. त्यामुळे ही भाषा स्वत:चे जड अस्तित्व उल्लंघून लक्ष वेधून घेते. सारांश, वाङ्मय म्हणजे धर्मसदृश मानस किंवा सामाजिक वस्तू नसून भाषेची एक विशिष्ट संरचना होय. वाङ्मयीन कृती ही विचार–भावना–कल्पना–प्रणाली इत्यादी वाहक, समाजवास्तवाचे प्रतिबिंब किंवा केवळ तत्वाचा साक्षात्कार वगैरे नसून एक एहिक तथ्य आहे. एखाद्या यंत्राप्रमाणे तिचे कार्य तापसता येते. तिच्यातून काही वेगळा अर्थ शोधण्याऐवजी तिचे स्वत:चे नियम, रचनातत्व आणि तिची हत्यारे शोधायला हवीत. हे सगळे करणारी रुपवादी समीक्षापद्धत कशी असते?

ध्वनी, प्रतिमा, लय, छंद, प्रास, यमक, निवेदनशैली ही वाङ्मयीन 'साधने' आहेत. वाङ्मयीन कृती म्हणजे या साधनांचा जवळपास आकस्मित मेळ या प्रत्येक साधनाचा परिचिताला अपरिचित करणारा गुणधर्म आहे. या साधनांच्या दबावाने, प्रभावाने नेहमीची भाषा तीव्र होते. हानीभूत होते, वाकवली जाते, ताणली जाते, उफराटी बनते, भाषा अपरिचित झाल्यामुळे नेहमीचे जग अनोळखी बनते. साहित्यकृतीचा ऐहिक तथ्य म्हणून स्वीकार हे रुपवादाचे योगदान असल्याचे शरद नावरे यांनी म्हटले आहे.

रुपवादाच्या एकूण भूमिकेवर बरेच आक्षेप घेतल्याचे नमूद केले आहे. उदाहरणार्थ, 'शब्द' इकडचे तिकडे फेकून देण्याची कला, प्रतिमासंकर, भडक निरर्थक शब्दप्रयोग, यामुळे भाषेची मोडतोड होत असली तरी त्यामुळे शब्दाच्या अर्थाचा मनोमन प्रतीत होणारा ताल म्हणजे लय निर्माण होईलच असे नाही. छंद, शब्द्रप्रतिमा ही साधने अर्थानुसार लयीचे उपेक्षित साध्य पूर्ण

करु शकत नाहीत. रुपवाद्यांचे यावर म्हणणे असे की वाङ्मयीनपणा ही सापेक्ष कल्पना आहे. तुम्ही स्वत: तुमच्या भाविक जाणीवेसह उभे असता यावर तुमच्या लेखी वाङ्मयीनतेची व्याख्या ठरते.

थोडक्यात, वाङ्मयीनता हा गुण एका विशिष्ट रुढ निरुपणसापेक्षा दुसऱ्या निरुपणाच्या अलगपणावर आधारित आहे. वाङ्मयीन साधनांच्या वापराने भाषेचे अपरिचितसे रुप जागृत करणे. ही प्रक्रिया विशेषत: कवितेत होताना दिसते. रुपवाद्यांची गफलत अशी की कविता या विशिष्ट साहित्य प्रकारातून दिसून येणारा एक गुणविशेष सर्वच साहित्य प्रकारचे प्रमुख गमक आहे, अशा प्रकारची भूमिका घेतात.

*** आस्वाद समीक्षा :–**आस्वादक समीक्षेच्या अुनषंगाने पुढील लेखांचा विचार प्रस्तुत आहे.

'एक अवलियाचे हृदगत–चर्चबेल'– विश्वास पाटील, 'गतिमानी की मनमानी?'– श्रीकृष्ण दातार, 'वेदनेचा वेध'–निलिमा भावे, 'एका गूढरम्य सौदर्याचा कलावध'– ह. म. घोडके, 'अरुण कोल्हटकर यांची जेजुरी : देवाची वस्ती'– शांतिनाथ देसाई, चि. त्र्यं. खानोलकरांची 'सनई' मधील कथा –चंद्रकांत बांदिवडेकर, 'तेंडूलकरांची तीन नाटके'– द. भि. कुलकर्णी, 'बाबुराव बागुलांच्या कथेतील विद्रोहाच्या मर्यादा'– अनंत राऊत, 'शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता'– प्रफुल्ल शिलेदार, 'बलुत' आणि 'आत्मचरित्र : काही विचार'– गं. ब. ग्रामोपाध्ये 'एका अवलियाचं हद्‌गत : चर्चबेल' या लेखात विश्वास पाटील यांनी कवी ग्रेस यांच्या 'चर्चबेल' या ललित निबंध संग्रहाचे समीक्षण केले आहे. आपल्या संस्कृतीत आत्म्याचे सार्वभौम संगीत जर कुठे प्रत्ययाला येत असेल तर ते शिवालयातील घंटानादात. ह्या घंटानादात चर्चबेलचे मूळ आहे. ह्या घंटानादातील तीव्रता व शीलता, संहार व सृजन, उग्रता व सौम्यता ह्या द्वैतांचे एकलकोड मूलायम रुप म्हणजे 'चर्चबेल' 'ग्रेस' च्या 'चर्चबेल'चं विवेचन करताना विश्वास पाटील यांनी दोनच शब्द वापरले आहेत. १) प्रीती आणि २) एकान्त. ग्रेसने प्रीतीचा विचार करताना बालकवीप्रमाणे उदात्त, पवित्र, मंगल, अशरीरी, इंद्रियातीत प्रीतीचा विचार गुंतला आहे. ग्रेसला ही प्रीती अगदी क्रूर आणि हिस्त्र पशूच्या डोळ्यांतही दिसते. ज्यांच्या प्राक्तनाशी आपले जीवन निगडीत आहे. ज्यांना आपण काय देऊ शकतो? फक्त प्रेम!! आणि ते दिल्यावर दु:खाचा

स्वातंत्र्याचा प्रश्नच मिटतो. या विस्तृत निबंधाच्या शेवटी ग्रेसला अत्यंत प्रिय असलेला मृत्यु विचार उद्‌धृत केला आहे.

लेखक श्री. द. ग. गोडसे हे समीक्षा व चित्रकला या दोन्ही प्रांतात ख्यातनाम आहेत. त्यांच्या 'गतिमानी' या पुस्तकाचे श्रीकृष्ण दातार यांनी परीक्षण केले आहे. 'गतिमानी'ह्या पुस्तकात त्यांनी शिवकालीन बोलीभाषा, रेषा व हस्ताक्षर याचे विवेचन केले आहे. त्यांनी भाषेचा समर्थ भाविष्कार व क्षमता दाखविण्यासाठी दत्ताजी त्रिमल लिखित एक्याण्णव कलमी बखरीवर चर्चा आधारली आहे. उत्कट उर्मी, ज्वलंत प्रेरणा, जीवनदायी अंत:प्रवाह अशी विशेषणे वापरुन विशिष्ट काळात विशिष्ट भूप्रदेशातील कला, भाषा, रेषा व स्वर युगधर्मास अनुसरुन बलशाली व आशयघन बनतात हे आपले प्रमेय सिद्ध करण्याचा श्री. गोडशांचा आटापिटा निरर्थक वाटतो. तर्कमानी, गणितमानी रेषा म्हरजे सांकेतिक अवस्थेतील रेषा व उलट उदयकालीन भावगर्भ गतिमान रेषा, त्यावर आधारित हस्ताक्षराचा विचार, हे अशाच पद्धतीने पोकळ अनुमानावर रचलेले मनोरे आहेत. शब्दजंजालाखेरीज त्यात काही हाती लागत नसल्याचा अभिप्राय दातार यांनी नोंदवला आहे. या संदर्भात वसंत आबाजी दहाके म्हटले आहे की, ''शक्ती आणि गती यांची सहयोगी परिमाणे असलेली कोणतीही निर्मिती क्षमता म्हणजे ऊर्जा, असे गोडसे यांचे विचारपूस आहे. गोडसे यांनी आपल्या कलामीमांसेत महाराष्ट्रातील चित्र, शिल्प, साहित्य कलांमागील प्रेरणांचा आणि या कलांच्या रुपांचा, अविष्कारांचा शोध घेतला आहे.''[११]

म. गं. नातू यांच्या 'वेदनेचा वेध' या पुस्तकाचे निलिमा भावे यांनी परिक्षण केले आहे. खानोलकरांच्या कादंबरीची समीक्षा नातू यांनी केली आहे. साहित्यकृतीची समीक्षा हा त्या समीक्षकाचा त्या कृतीकडे पाहण्याचा वैयक्तिक दृष्टिकोन असतो. समीक्षकाची स्वत:ची मूळ प्रवृत्ती, वैचारिक बैठक, संवेदनक्षमता, आकलनशक्ती इत्यादी घटकांच्या संयोगातून त्याचा दृष्टिकोन ठरतो, असा दृष्टिकोन नातू यांचा असल्याचे भावे यांनी म्हटले आहे. त्याच दृष्टिकोनातून नातू यांनी खानोलकरांच्या कादंबऱ्यांचे समीक्षण केले आहे. त्यातून स्वत:चे असे काही निष्कर्ष त्यांनी काढले आहेत. खानोलकरांच्या प्रतिमांचा तरल रसिकतेने आस्वाद घेणाऱ्या नातूंनीच खानोलकरांच्या कादंबरीतील आशयाचं बोजड, ऐहिक निरुपण केल्याचे भावे यांनी म्हटले आहे.

वैचारिक मर्यादा नातूंनी आपल्या भोवती आखून घेतल्या नसल्या तर कादंबरीकार खानोलकरांच्यावर समीक्षा वाङ्मयात त्यांनी घातलेली भर अधिक मोलाची ठरली असती असे मत व्यक्त केले आहे.

श्री. द. ग. गोडसे यांनी आदिवासींच्या चालीरिती, धर्मश्रद्धा एकूणच संस्कृतीविषय लिखाण 'मातावळ' या पुस्तकात केले आहे. 'मातावळ' या पुस्तकाचे ह. म. घोडके यांनी परीक्षण केले आहे. द. ग. गोडसे यांनी लोकधारी अविष्काराची जडण–घडण, घाट व सौष्ठव यांच्या संदर्भात सुचलेले विचार 'मातावळ' मध्ये दिले आहेत. ह्या लोककलेची मीमांसा करताना समीक्षेची जी रुढ मळवाट असते, ती टाळून वेगळ्या ढंगाने रसिक मनाने विविध शास्त्रांचे संदर्भ देत देत त्यांनी ह्या कलेची विविध परिमाणे उलगडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. श्री. गोडशांना आदिवासींच्या शिल्पातील बाकवळणांनी झापटलेले आहे. त्या शिल्पांच्या पाठीमागे असलेल्या प्रेरणा, शास्त्राधार आणि लोकगीतांची खास असलेली पुष्टी ह्या सर्वांचा विचार ते सूक्ष्मपणे, जाणकारीने व विशेष म्हणजे रसिकल्या अंत:करणाने करतात. आदिवासींना सरळरेषा ह्या निर्जिव व कृत्रिम वाटतात, बाक वळणे मात्र त्यांना स्वयंप्रवाही, ओघवान आणि जीवदायी वाटतात, असा निष्कर्ष गोडसे यांनी नोंदवला आहे.

अरुण कोल्हटकर यांची 'जेजुरी : देवाची वस्ती' या लेखात शांतिनाथ देसाई यांनी कोल्हटकर यांच्या 'जेजुरी' या इंग्रजी कवितेचे मार्मिक परीक्षण केले आहे. असाधारण गुणांची, जीवनाएवढी विशल म्हणून त्रस्त आधुनिक मनाचे प्रतिकात्मक चित्रण करणारी कोल्हटकरांची वेस्ट लॉड सारखी कविता म्हणून ऱ्हास पावलेल्या परंपरेवरची श्रद्धा आणि अश्रद्धा यात भ्रांत झालेली मनोवस्था शब्दबद्ध करणारी सुंदर व समर्थ कविता म्हणून 'भारताच्या प्राचीन व भग्न' परिसराला वेढून उरलेल्या ऐहिक दारिद्र्यावरची कविता व्यक्तिगत प्रतिक्रिया म्हणून 'जेजुरी'चा गौरव झाला असल्याचे नमूद केले आहे. अधिक चौकसपणे आणि वस्तुनिष्ठ भूमिकेतून अभ्यास होणे आवश्यक आहे. सांस्कृतिक आपलेपणाच्या भूमिकेतून तिचे परीक्षण होणे गरजेचे आहे. या संदर्भात डॉ. स. ह. देशपांडे म्हटले आहे की, '' 'जेजुरी' काव्याच्या विश्लेषणाची आठवण करुन द्यावीशी वाटते. हे दीर्घकाव्य कोल्हटकरांनी मराठीत लिहिले असते, तर भावना राहिल्याचे,

सिनिकल व क्लिनिकल सांस्कृतिक गारठ्याचे त्यातील उठावदार सूर बदलले असते काय, असा प्रश्न देशपांड्यांनी उपस्थित केला आहे.''[१२] असे रा. ग. जाधव यांनी म्हटले आहे. कोल्हटकर मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये लेखन करतात. त्यांच्या विलक्षण संवेदनशीलतेबद्दल त्यांची ख्याती आहे. दिलीप चित्रे लिहितात, ''तटस्थ, प्रसन्न, औपचारिक, स्वप्नवास्तववादी, संन्यस्त, पारलौकिक, रोमॅंटिक, भावनिक गुंतागुंतीतून सर्वस्वी मुक्त.''[१३] अशा विशेषांनी त्यांच्या संवेदनशीलतेचे वर्णन केले आहे. 'जेजुरी'तील कवितांना प्रवासाची चौकट असली तरी आत्मशोधाची किंवा परिक्रमेची सहेतुकता तीत दिसत नाही, असे देसाई यांना वाटते. देसाई यांनी 'जेजुरी'च्या मर्यादावर ही प्रतिमा टाकला आहे. भाव उत्पन्न करणारी बाजू संपूर्ण दाबून टाकल्यामुळे किंवा अनुपस्थित ठेवण्याची काळजी घेतल्यामुळे कवितेतील व्यक्तीकरण दोन पातळ्यांवरचेच राहते. 'जेजुरी'त देवांची वस्ती आहे, हे जरी खरे असले तरी तेथे माणसाला जात्रा नाही. माणसाच्या आधुनिक मानसिक संकटांना 'जेजुरी'त जरी उकल सुचविली असली तरी त्याने समस्या टाळल्यासारखेच होते.

'तेंडूलकरांची तीन नाटके' या लेखात द. भि. कुलकर्णी यांनी 'शांतता! कोर्ट चालू आहे!', 'गिधाडे' व 'सखाराम बाईंडर' या तीन नाटकांची समीक्षा केली आहे. सखाराम, लक्ष्मी व चंपा या तिघांचाही कामविकृती वात्सल्य भावनेशी प्रत्यक्षपणे निगडित आहेत. लक्ष्मीला वात्सल्य व्यक्त करायचे आहे, ती संधी तिला अनैसर्गिकपणे मिळाली नाही. जेव्हा पूर्ववयात चंपाला वात्सल्यवत संबंध हवं असणार तेव्हा तिला तीव्र व विकृत कामसंबंध स्वीकारावा लागला. सखारामने बालपणी मातापित्याचे वात्सल्यच अनुभवले नाही. वात्सल्य भावातून निर्माण झालेल्या कामविकृती आणि कामजन्य क्रूरता यांचा संबंध नाटकात आकलनदृष्ट्या स्पष्ट असला तरी रसदृष्ट्या परिपुष्ट नाही, असे कुलर्णी यांनी नमूद केले आहे. मानवी मानसिक क्रूरतेचे व्यक्तिसापेक्ष व कामसापेक्ष चित्रण तिन्ही नाटकात असल्यानेच म्हटले आहे. ही मनोविकृती प्रकृती म्हणून या नाटकांनी रंगविलेली नाही. ही विकृतीच आहे आणि त्याज्यच आहे असाच या नाटकांचा मोहरा आहे.

या तीन नाटकांच्या मर्यादाही कुलकर्णी यांनी नमूद केलेल्या आहेत. त्यांना जे प्रधान

परत्वे सांगायचे होते ते त्यांनी गौणपरत्वे सांगितले आहे. त्याचे कारण जीवनातील विकृतीचा प्रत्यय येऊन तिचे स्वरुप शेधण्यातच या नाटकाची धन्यता मानली. कलावंताच्या आकलनधर्मात अंतिमत: विकृती–प्रकृती असे काही नसते, लौकिक अर्थाने विकृती ठरलेल्या अंगानेही अखेरीस समग्र जीवनध्यानातच अभिप्रेत असते. हे या नाटकांच्या लक्षात आले नाही. म्हणून अखेरीसाठी नाटके समग्र जीवन ध्यान चित्रित करणारी नाटके न ठरता जीवन विकृतीचे, कधी जुजबी स्पष्टीकरणासह, चित्रण करणारी नाटके ठरली. अशा प्रक्रियेतून महान वाङ्मयकृती निर्माण होत नसतात. हे विवरुन सांगितले आहे.

'बाबुराव बागुलांच्या कथेतील विद्रोहाची मर्यादा' या लेखात अनंत राऊत यांनी बाबुलांच्या कथेतील विद्रोहाचा विचार मांडला आहे. बागुल यांनी दलितांच्या दैन्य, दारिद्रय, अपमान, संघर्ष आणि लाचारीचे विदारक असे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. बागुलांच्या कथेमध्ये विद्रोह येतो आणि तो विद्रोह मानसिक, संवादात्मक आणि भाष्याच्या पातळीवरुन येतो. 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त आहे' या दोन कथासंग्रहामध्ये मिळून एकूण चोवीस कथा आहेत. पण त्यातील पात्रे स्वत: विद्रोह करतच नाही, या कथेतून येतो तो विद्रोह सूचकतेच्या पातळीवरील असल्याचे सांगितले आहे. दलितांची वेदना अशा प्रकारे ते साकार करतात की वाचकांच्या मनात विद्रोहाची जाणीव आपोआप निर्माण होते. बागुलांच्या कथेतील विद्रोहाचे स्वरुप मानसिक पातळीवरील आहे. या विद्रोहात क्रांती करण्याची इच्छा आहे पण क्रांती साठीची कृती नाही. बंडाची इच्छा असूनही त्यासाठी त्याने काहीच केलेले नाही. ''त्यांच्या कथेतील नायक बेदरकार व बंडाची भाषा बोलणारे नव्हे. बंडच जगणारे आहेत. त्यांना आपल्या उघड्यानागड्या जिण्याची जाणीव आहे. म्हणून ते शोभेची खोटी पिसे डकवीत नाहीत. रुढीग्रस्त व परंपरेच्या तुरुंगात गुदमरुन गेलेल्या आणि या तुरुंगाला धडका मारुन नवा आशय जगू पाहण्याची जीवनशब्तीच लक्षवेधी व जिवंत चित्र बागूलांच्या कथेत येते.''[१४] दलित जीवनाचे भीषण नाट्य समर्थपणाने पकडणारे ते एक सजग कलावंत आहेत. बंधुमाधवांच्या कथेत प्रकटणारा विद्रोह व नकार बागूलांनी अधिक गहिय केला आहे.

'शरचंद्र मुक्तिबोधांची कविता' या लेखात प्रफुल्ल शिलेदार यांनी मुक्तिबोधांच्या

काव्यविषयक जाणीवांवर त्यांचीच कविता तपासून बघण्याचा एक प्रयत्न केला आहे. शरच्चंद्र मुक्तिबोधांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला होता. मार्क्सला आत्मसात करुनच पुढे जाता येईल, नाकारुन नव्हे, अशी त्यांची गाढ श्रद्धा होती. त्यांचे हे आकर्षण त्यांच्या अनेक कवितांमधून दिसून येते. मुक्तिबोधांनी लिहिलेली लिरिकल कविता त्यांच्या वक्तृत्वशील कवितेपेक्षा वेगळी असल्याचे शिलेदार यांनी नमूद केले आहे. या कवितेमध्ये गर्द भावकविता आहे. मात्र ही कविता वाचताना जाणवते की बौद्धि ताण्याबाण्यामधून मोकळा होवून निखलपणे आपल्या आतल्या आवाजात सहज प्रतिसाद देत आहे. कवितेचा आणि कविचा संबंध आतड्यांशी आहे. तो नुसताच शब्दांपुरता वा आशयापुरता मर्यादित नाही. सच्चा कवितेला आवश्यक असणारी ही सेंद्रीय जाणीव मुक्तीबोधांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे. 'नवी मळवाट' मधील कविता अत्यंत आशावादी सुर घेवून येते. 'नवी मळवाट, नवीनच घाट, नवी क्षितीजे पहा अफाट' अशा नव्याचा शोध घेऊ पाहणारा आशावादी सुर पहिल्याच सनेवर लावून मानवी सामर्थ्यांचा आणि उज्ज्वल भविष्याचा उद्घघोष करीत शरच्चंद्र मुक्तिबोधांची कविता पुढे जाते. मुक्तिबोधांचे दीर्घकाळ झालेले जीवनविषयक चिंतन या कवितांमधून दिसते.

आपल्या अनुभवलेल्या जीवनाचा पुन:प्रत्यय आत्मचरित्रातून घेतला जातो. 'बलुतं' हे दया पवारांचे आत्मचरित्र याविषयी गं. ब. ग्रामोपाध्याय यांनी 'बलुतं आणि आत्मचरित्र : काही विचार' हा लेख लिहिला आहे. दगडू पवार हा नायक विचारी व कवी मनाचा आहे. त्याच्या या आत्मचरित्रात वेगळेपण जाणवते. ते म्हणजे दगडू पवार हा आपल्या बरोबरच इतर नायकांना घेऊन सगळ्यांची कहाणी सांगतो. 'मी' पेक्षा 'आम्ही'ला या आत्मचरित्रात महत्व दिले आहे. नायक ज्यांच्यामध्ये घडला त्यांचे चित्रण आहे. दलित जगण्याची सामाजिक प्रतिमा मांडणाऱ्या 'बलुतं' विषयी रा. ग. जाधव म्हणतात, '''बलुतं' ही कोणत्याही व्यक्तींच्या जिण्याची सामाजिक प्रतिमा नव्हे, ती केवळ दलित जगण्याचीच प्रतिमा आहे. समाजाने हक्काने द्यावे व घेणाऱ्याने ते हक्काने घ्यावे, ते म्हणजे 'बलुतं'.''[१५]

दलित समाज जीवनात दु:खाचा प्रवाह उत्कटतेने जाणवतो. कवी दगडू पवार यांनी कवी मनाचे अधिष्ठान 'बलुतं'ला दिले असते तर ते अधिक प्रभावी झाले असते. त्याचप्रमाणे या लेखात

ग्रामोपाध्ये यांना वाटते की, या आत्मकहाणीला कादंबरीचा घाट दिला असता तर आत्मचरित्रापेक्षाही त्याची खोली व रुंदी वाढली असती. आत्मचरित्रामध्ये स्वत:च स्वत:च्या जीवनात घडलेल्या प्रसंगाचा व आलेल्या अनुभवांचा आलेख असतो. त्याचा नायक अर्थात 'मी'च असणार इतरजन येतील पण ते ही 'मी' च्या हृदयेला जसे दिले वा त्याला आठवले तसे. 'बलुतं' बद्दल डॉ. पवन मांडवकर लिहितात, ''दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनाने आत्मचरित्राचे, आत्मनिवेदनाचे तथाकथित सर्व आकृतिबंध झुगारुन दिले. ज्या भीषण जातीभेदाने या देशातील गावकुसाबाहेरील सर्वसामान्य माणूस चिरडला गेला. कुजवला गेला, त्या भीषण जिण्याची एक जबरदस्त अनुभुती 'बलुतं'च्या रुपाने मराठी साहित्यात अवतरली.''[१६] असे आत्मचरित्राबाबत आणि त्यातील नायकाच्या रुपात वावरणाऱ्या 'मी' बाबत लेखकाने आपले विचार मांडले आहेत.

थोडक्यात माणूस व कला, समीक्षकांचा साहित्यकृतीकडे पाहण्याचा दृष्टिकोण, आदिवासींच्या संस्कृती विषयक विचार, कलाकृतीतील सौंदर्यस्थलांचा वेध, आत्मचरित्रांविषयी कुतूहल मिश्रीत माहिती या वैशिष्ट्यांचा आस्वादक समीक्षेच्या विवेचनात समावेश होतो.

*** मानसशास्त्रीय समीक्षा :–**

मानसशास्त्रीय समीक्षेच्या अनुषंगाने 'हिमालयाची सावली : एक मानसशास्त्रीय दृष्टिकोन'– व. वि. जोगावार, 'मानसशास्त्र, साहित्य आणि मराठी कादंबरी'– चंद्रकांत वांडिवडेकर या लेखांचा विचार प्रस्तुत आहे.

हिमालयाची सावली: एक मनासशासयि दृष्टिकोन या लेखात व. वि. जोगवार यांनी हिमालयाची सावली या नाटकाचे परीक्षण मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केले आहे. संघर्षाच्या मानसशास्त्राला अभिप्रेत असलेल्या संकल्पनेनुसार 'हिमालयाची सावली' नाटकात संघर्ष नाही. संघर्ष नाटकाचा आत्मा आहे, असे गृहित धरल्यास या नाटकात आत्मा नाही असा निष्कर्ष जोगावार यांनी नोंदवला आहे. नाटकातील नाना व बयो या दोन पात्रांच्या आचारविचार, तत्वप्रणाली, जीवननिष्ठा, जीवनमूल्ये, प्रेरणा इत्यादीत संघर्ष असल्याचे दिसत नाही. नानांच्या जीवननिष्ठा अगदी स्पष्ट आहेत. व्यक्तिजीवनापेक्षा समष्टिजीवनाला त्यांनी अधिक महत्व दिले

आहे. आश्रमाला त्यांनी वाहून घेतले आहे. जो त्यांच्या जीवन सर्वस्व आहे. बया ही बोलभांड परंतु तेवढीच प्रेमळ व संसारदक्ष स्त्री आहे. स्वत:च्या संसाराप्रमाणेच आत्मविषयीदेखील तिच्या मनात आत्मीयता आहे. नाना व बयो या दोन व्यक्तिरेखांतील संघर्षाचा प्रसंग पहिल्या अंकात रेखाटला आहे. प्रस्तुत प्रसंगातील नाना व बयोच्या भूमिका इतक्या काटेकोर व निश्चित आहेत की, त्यांच्यात संघर्ष निर्माण होऊच शकत नाही, असे जोगावार यांनी म्हटले आहे.

पुरुषोत्तमचा अपवाद वगळल्यास नाटकातील अन्य व्यक्तिरेखा एकतर नगण्य आहेत किंवा हिमालयाच्या व्यक्तिमत्वाने दिपून गेल्या आहेत. जीवनाच्या कल्पनेसंबंधी पुरुषोत्तम व नानांमध्ये मतभिन्नता आहे. नानांची दृष्टी चिमणाचिमणीच्या संसारापलिकडची विशाल आहे. पुरुषोत्तमची मर्यादीत आहे. नानांची जीवनमूल्ये पुरुषोत्तमला मान्य नाहीत हे अत्यंत उघड–उघड आणि सरळ आहे. या दोन विचारप्रणालीत कोठेही द्वंद्व नाही. भिन्न जीवन मूल्यांची ही माणसे आपआपल्या पद्धतीने जीवन जगतात. त्यांच्या जीवनमूल्यांची झुंज लागल्याची नाटकात आढळून येत नाही.

मानसशास्त्रीय समीक्षेचा मागोवा 'मानसशास्त्र साहित्य आणि मराठी कादंबरी' या लेखात चंद्रकांत बांदिवडेकर यांनी घेतला आहे. या लेखात चंद्रकांत बांदिवडेकर यांनी आधुनिक काळात मानसशास्त्राचा प्रभाव साहित्यावर कसा पडला त्याचे विवेचन करतात. तसेच लेखाच्या शेवटी त्यांनी मराठी साहित्यातील कादंबरी या वाङ्मय प्रकारावर मानसशास्त्रीय सिद्धांताचे प्रतिबिंब पडलेले दिसत असले तरीही निर्भेळ मानसशास्यि अशी कादंबरी मराठीत नाही असेही मत व्यक्त केले आहे. मानसशास्त्रीय सिद्धांताचे पडसात साहित्यात उमटू लागले आणि साहित्यात आशय, अभिव्यक्ती, मानसिक स्वास्थ्य, लैंगिक संबंधांचे समर्थन, अंतर्मनाचे दर्शन, प्रकट, अप्रकटन मन अशा संकल्पना अपतरु लागल्या आहेत. एक नवी जाणीव मानसशास्त्राने साहित्याला दिली.

फडक्यांच्या कादंबऱ्यांतून वरवर मानसशास्त्रीय दृष्टी दिसते तर माडखोलकर, पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतून फ्राऊंच्या सिद्धांताचा प्रभाव जाणवतो. फ्राइण्डच्या सिद्धातानुसार कलावंत आपल्या निष्फळ आशा आकांक्षा कलेतून प्रकट करुन मनाचा ताण हालका करतो. 'भंगलेले देऊळ', 'मुक्तामा' मधील कथानकात अनैतिक प्रेम, वासना अशा संकल्पना येतात. तर पु. य. देशपांडे यांच्या 'सुकलेले फूल' 'सदाफुली' यातील नायिका मनोविज्ञान प्रणालीनुसार

जगताना दिसतात. मराठी साहित्यावर मानसशास्त्रीय प्रभाव जाणवला तरी पूर्णत: मानसशास्त्रीय दृष्टी वगळून लेखन झालेले नाही अशी खंत चंद्रकांत बोडिवडेकर मांडतात.

थोडक्यात, पात्रांतील मानसिक संघर्ष, मानसशास्त्रीय संकल्पनांचा ठसा मराठी साहित्यात उमटू लागलेला असला तरी संपूर्ण मानसशास्त्रीय दृष्टिकोन ठेवून लेखन मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात होताना दिसत नाही.

*** मार्क्सवादी समीक्षा :–**

मार्क्सवादी समीक्षेच्या अनुषंगाने डॉ. लोहियांची केलेली मार्क्सवादाची मीमांसा– अशोक मोडक, 'ज्वालेचे फूल : मार्क्सवादी जीवनदृष्टीचे समग्रदर्शन' – राजशेखर शिंदे या लेखांचा विचार प्रस्तुत आहे.

अशोक मोडक यांनी डॉ. लोहिया यांच्या 'Economics after marx' या पुस्तकाचे परीक्षण करुन डॉ. लोहियांच्या मार्क्सवादाची मीमांसा केली आहे. लेखाच्या आरंभीच त्यांनी या पुस्तिकेची तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१) भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील खूप महत्वाची चळवळ सन १९४२ मध्ये साकार झाली. ब्रिटीश सरकारला 'चलेजाव' असा आदेश देण्याऱ्या या चळवळीत डॉ. लोहिया यांचा सिंहाचा हिस्सा होता. साहजिकच पोलिसांचा ससेमिरा त्यांच्या मागे लागला होता. ॠर्व तऱ्हेच्या शारीरिक, मानसिक व आर्थिक चिंता त्यांच्या शिरावर होत्या, पण या वातावरणातही थंड डोक्याने मार्क्सवादावर मीमांसा करावी, ही मीमांसा चपखल शब्दांत व तर्कशुद्ध प्रमाणांसह कागदावर उतरवावी, असा संकल्प त्यांनी पूर्णही करुन दाखवला. मोडक यांच्या मते, सार्वजनिक जीवनात आकंड बुडालेल्या पुढाऱ्याने स्वत:ची अध्ययनशीलता व्रत म्हणून जपायची असते, हा वस्तुपाठच डॉ. लोहियांनी या पुस्तिकेद्वारे सगळ्यांकरीता प्रस्तुत करुन ठेवला आहे, असे वाटते.

२) मार्क्सवाद स्वत:ला अतिशय शास्त्रशुद्ध विचार मानतो. किंबहुना सर्व मार्क्सवादी याच कारणांसाठी मार्क्सवादाचा झेंडा खांद्यावर घेऊन नाचतात आणि जगाचे भविष्य वर्तवितात. डॉ. लोहियांनी नेमक्या याच विचारांवर अत्यंत सप्रमाण व तर्कसंगत भाष्य

करण्याचा निर्णय घेतला आणि प्रचंड धामधूम मागे असतानाही या निर्णयाची कार्यवाही केली. हे मार्क्सवादाचे मार्मिक मीमांसा, हे दुसरे वैशिष्ट्ये मोडक नमूद करतात.

३) ज्या सोव्हियत युनियने मार्क्सवाद अंमलात आणण्याचा दावा केला, किंबहूना त्या विचारांची पालखी शिरावर घेऊन जगात स्वत:चा एक ध्रुव उभा केला, त्या सोव्हियत साम्राज्याची सुद्धा परखड चिकित्सा लोहिया लिखित पुस्तिकेत मिळते.

या पुस्तिकेतून डॉ. लोहियांची अध्ययनशीलता व चिंतनशीलता प्रकट होते. केवळ आर्थिक अंगावर भर देणे भारतास परवडणार नाही, म्हणून इथल्या समाजवाद्यांनी सप्तक्रांती छेडली पाहिजे. त्यांनी सांगितलेल्या सप्त क्रांतीची सूत्रे खालीलप्रमाणे :–

१) स्त्री–पुरुषांमध्ये समता उत्पन्न करणारी क्रांती.

२) कनिष्ठ जातींना वरिष्ठ जातींच्या स्तरावर पोचविणारी क्रांती.

३) लोकांना बाह्य गुलामगिरीतून मुक्त करणारी राष्ट्रीय क्रांती.

४) जातिजातींमधील विषमता संपुष्टात आणणारी सामाजिक क्रांती.

५) उच्च स्तरांवरचे वर्ग अथवा उत्पन्न गट आणि निम्न स्तरांवरचे वर्ग अथवा उत्पन्न गट यांच्यात समता निर्माण करणारी क्रांती.

६) वर्गभेदांना म्हणजे रंगभेदांना सुरुंग लावणारी क्रांती.

७) समूह–वर्चस्वापासून व्यक्तिमात्राला स्वातंत्र्य देणारी क्रांती.

अशी सात क्रांतिकारक परिवर्तने भारतात अमूलाग्र बदल घडवून आणतील अशी आशा व्यक्त केली आहे. डॉ. लोहियांनी केलेली मार्क्सवादाची मीमांसा त्यांच्या चिंतनामुळे आगळी वेगळी ठरल्याचे मोडक यांनी म्हटले आहे.

'ज्वालेचे फूल : शरच्चंद्र मुक्तिबोध' व्यक्ति आणि वाङ्मय या डॉ. रणधीर शिंदे यांच्या पुस्तकाचे राजशेखर शिंदे यांनी परीक्षण केले आहे. मुक्तिबोधांच्या समग्र साहित्याचे अभ्यासनीय असे विश्लेषण केले आहे. डॉ. रणधीर शिंदे यांच्या समीक्षावृत्तीवर राजशेखर शिंदे प्रकाश टाकतात. 'ज्वालेचे फूल' हे नाव मोठे अन्वर्थक आहे. ज्वाला लाल रंगाच्या, त्यातून दिसणारे फुलही लाल रंगाचे. म्हणजे लाल बावट्याचा सरळ सरळ उल्लेख लाल रंगही मार्क्सवादाची खुण.

मुक्तिबोध मार्क्सवादी साहित्यिक म्हणूनच ओळखले जातात. या परिक्षणामध्ये मुक्तिबोधांच्या व्यक्तिमत्वाची घडण व जीवनकार्य आणि मुक्तिबोधांच्या साहित्याचे मोल जाणून अनेक गोष्टी विस्ताराने सांगितल्या आहेत.

मुक्तिबोधांच्या कविता 'नवी मळवाट', 'यांत्रिक', 'सत्याची जात' या कविता संग्रहावर प्रकाश टाकला आहे. सामाजिक जाणिवेच्या कविता, विषम विषयक जाणिवेच्या कविता, निसर्ग संवेदनेच्या कविता, मार्क्सवादी जीवनदृष्टीच्या कविता, असे वर्गीकरण, विश्लेषण करुन केले आहे. कवितेतील आशय, विषय, सौंदर्यदृष्टी, अविष्कार रुपविशेष यावर भर दिलेला आहे. कवीच्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणा–प्रयोजने सांगून कादंबऱ्यांच्या अनुषंगाने लेखकाच्या संवेदन स्वभावाला समोर ठेवून लेखन काळातील सामाजिक घटिते ते शोधू पाहतात. शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या साहित्यातून व्यक्त होणारी मार्क्सवादी भूमिका यावरही प्रकाश टाकला आहे. मुक्तिबोध आणि मार्क्सवाद यांचा संबंध स्पष्ट करताना डॉ. अरुणा देशमुख लिहितात, ''मुक्तिबोधांनी मार्क्सवादी जीवन जाणिवा स्वीकारलेल्या आहेत. त्यांच्या वैचारिक भूमिकेचे पोषण मार्क्सवादाने केले. परिणामत: त्यांचा साहित्यविचार नैतिकतावादी सौंदर्य विचाराला पुष्ट करताना दिसतो.''[१७] हे परिक्षण मुक्तिबोधांच्या साहित्याची नवी समज देते.

*** तात्विक समीक्षा:–**

भालचंद्र नेमाडे समकालीन मराठी साहित्यातले एक प्रमुख लेखक म्हणून मान्यता पावले आहेत. अविनाश सप्रे यांनी नेमाडे यांच्या 'टीका स्वयंवर'या ग्रंथाचे परीक्षण केले आहे. नेमाडेंचे एकंदर टीकालेख, निबंध, परीक्षणे, आणि मुलाखती इत्यादी एकत्रित रूपात 'टीका स्वयंवर' या ग्रंथात समाविष्ट अहेत. नेमाडे यांच्या आकलनाचा व्याप, आवाका, खोली आणि उंची केवढी मोठी आहे ते प्रस्तुत ग्रंथाच्या पानापानावरून लक्षात येते. या चिंतनाला नेमकी दिशा असल्या कारणाने विचारात कुठेही भरकटलेपना आलेला नाही, असे परीक्षणात्मक अभिप्रायात सप्रे यांनी म्हटले आहे. 'टीका स्वयंवर' मधील लेख चार पोट विभागातून देण्यात आलेले आहेत. या सर्व ग्रंथातून व्यक्त झालेला टीका विचार मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती आणि मराठी वाचक यांच्या संदर्भात आहेत. हे भान नेमाड्यांनी कुठेही सोडल्याचे दिसत नाही.

नेमाडेंच्या 'टीका स्वयंवर' मुळे समीक्षा विचारांचे वेगळे 'लक्ष्य', वेगळी भाषा (उदा. आशयद्रव्य, भाषिक आशय, भाषिक कृती, संस्कृती संयोग, हे वेगळे संदर्भ (उदा. समाजशास्त्री, मानववंशशास्त्र इ.) आणि वेगळा दृष्टिकोण यांचे एक लक्षणीय प्रतिमान आपल्यासमोर उपलब्ध होत आहे, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. नेमाडेंची स्वत:ची अशी भूमिका आहे, ती त्यांच्या साहित्यातून आणि समीक्षेतून उघडपणे प्रकट होत राहते.

'तीन वाङ्मयीन टिपणे'या लेखात द.भि.कुलकर्णी, राम देशमुख, श्रीकांत तिडके यांनी अनुक्रमे ॲनातोली लुनाचार्की; समीक्षा व्यापराचे स्वरूप, पैस, आणि 'मंत्रावेगळा' प्रस्तावनेतील लोकहितवादी वरील टीका' या विषयी आपले विचार मांडले आहेत. ॲनातोली लुनाचास्की हा प्रसिद्ध रशियन समीक्षक. समीक्षक हा लेखकांचा आणि वाचकांचा शिक्षक असतो. तो क्रांतीचा योद्धा आणि निर्माता असतो. त्याची भूमिका साम्यवादी समाजशास्त्राची असते इत्यादी विचार लुनाचास्कीने मांडले असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले आहे. प्रचार साहित्य आणि ललित साहित्यातील प्रचार या विषयासंबंधी म्हटले आहे की, प्रचार साहित्यातील ललित्य त्याचे बल वाढविते, पण ललित साहित्यातील प्रचार साहित्याचे सामर्थ्य क्षीण करते.

लेखनाच्या बाबतीत निरनिराळ्या लेखकांचे वेगवेगळे अनुभव असतात. दुर्गा भागवत स्वत:च्या ललित लेखनाविषयी विचार करताना आणि त्यामागील भूमिका, प्रेरणा इ. शोधताना दुर्गाबाईंना जे जाणवते, ते नेमकेपणी काय असते? भाववृत्तीची नुसती आंदोलने असतात की पाण्यात खडा टाकल्यामुळे निघणाऱ्या वलयाप्रमाणे तो एखाद्या वृत्तिप्रधान शरीरापार घडतो हे त्या नेमके स्पष्ट करीत नाहीत, असे राम देशमुख यांना वाटते. आपला लेखनविषयक अनुभव दुर्गाबाईंनी अशा पद्धतीने ग्रंथित केला आहे. या अनुभवातून लेखन साधनेच्या इष्ट व आवश्यक दिशांचे दिग्दर्शनच त्यांना करावयाचे आहे.

'मंत्रावेगळा' कादंबरीच्या प्रस्तावनेत इनामदार यांनी लोकहितवादींवर जी टीका केली, ती कितपत योग्य आहे, न्याय आहे, या संदर्भात श्रीकांत तिडके यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, मराठी कादंबरीच्या क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून एक नवी प्रवृत्ती रूढ होत आहे, इतिहासातील किंवा इतिहासवजा महाकाव्यातील ज्या पात्रांना, परंपरेने वाईट मानले, त्या

पात्रांवर लक्ष केंद्रित करून, त्या पात्रास सर्वस्वी नव्या स्वरूपात उभे करण्याची जी नवी प्रवृत्ती वाढत आहे, त्यावर प्रकाश टाकला आहे. लोकहितवादीवरील प्रदीर्घ टीकेचा समारोप करताना इनामदार लिहितात; 'मराठी भाषेची पदवी लोकहितवादींना मिळायची. पण त्यांनी आपल्या पापामुळे मराठी भाषेचा पिसाळ' ही पदवी पदरात पाडून घेतली..... भाषेने समाजाचा एवढा घात यापूर्वी कधी केला नव्हता. इनामदार यांनी लोकहितवादींना दिलेली 'मराठी भाषेचा पिसाळ' ही पदवी कितपत सद्भिरूचीला धरून आहे. इनामदार यांनी लोकहितवादींच्या कार्याची केलेली 'समीक्षा' कितपत तर्कशुद्ध आहे? हे तिडके यांनी निर्माण केलेला प्रश्न विचार करायला लावणारे आहेत.

भारतीय साहित्यात आधुनिकता मुळात किती व कोणत्या प्रकारची आहे? आजच्या जागतिक समीक्षेच्या तुलनेत मराठी समीक्षा कुठे उभे आहे? या प्रश्नांच्या अनुषंगाने आनंद पाटील यांनी 'उत्तराधुनिक समीक्षेतील नव्या संकल्पना आणि मराठीचा दरिद्री संसार' या लेखात विचार मांडला आहे. आस्वादक समीक्षेतील दोष त्यांनी खालीलप्रमाणे सांगितले.

१) कच्ची आकडेवारी सोयीनुसार अध्येमध्ये फेकून वाचकांना फसवण्याचे प्रयोग आस्वादक समीक्षेत सहज खपून जातात.

२) अभ्यास पद्धतीत तुलनात्मक दृष्टी हेतुत: टाळण्याचा मोह होतो.

३) माहितीचे नियोजन व अर्थ लावण्यात भेदाभेद अडथळे आणतात.उदा. लेखकाचे संपूर्ण नाव वाचताच समीक्षकाचे विशिष्ट पूर्वग्रह कार्यरत होतात. पूर्वग्रहदुषितांना टाळणे कठीण आहे.

४) जीवशास्त्रीय वाढीतील व संदर्भानुरूप भेद लक्षात घेतले जात नाहीत.

५) अभ्यास पद्धतीतील निकष, समाज वगैरे बाबींमुले पडणारे फरक दुर्लक्षित राहतात. नकारात्मक मुद्दे सांगणेही महत्त्वाचे आहे परक नसणे हे टाळले जाते.

हे दोष टाळण्यात भेदवादी समीक्षेला बरेच यश येत आहे. आस्वाद समीक्षेचे वैशिष्ट्य नमूद करताना डॉ. पंडित टापरे लिहतात, ''आस्वादक समीक्षेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही समीक्षा मूळ कलाकृतीतील सौंदर्य तर विशद करतेच, पण त्यातील जो अपुरा भाग

आहे, ते पूर्ण करून दाखविण्याचे कार्य करते. ती आशय वैशिष्ट्याप्रमाणे रूपवैशिष्ट्यांचेही सौंदर्य उलगडून दाखवते.''[१८] म्हणजे आस्वादक समीक्षेमध्ये आशयाबरोबर रूपाचे सौंदर्य उलगडून दाखवले पाहिजे, ही अपेक्षा व्यक्त होते.

'शास्त्रकाट्याच्या कसोटीवर मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' या लेखात म.द.हातकणंगलेकर यांनी प्रभाकर पाध्ये यांच्या 'मर्ढेकरांची सौंदर्य मीमांसा' या पुस्तकाचे परीक्षण केले अहो. मराठी साहित्यात मर्ढेकरांच्या कर्तृत्वाची दोन क्षेत्रे आहेत. एक काव्याची व दुसरे साहित्यशास्त्राचे. या दोन्ही क्षेत्रांमधील त्यांचे कर्तृत्व परंपरेला आव्हान देणारे असल्याने वादाचा विषय झाल्याचे हातकणंगलेकर यांनी म्हटले आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यमीमांसेला तितकासा विरोध झाला नाही, याचे कारण सांगताना हातकणंगलेकर सांगतात की, सुरूवातीला सौंदर्यमीमांसेचा गंभीरपणे विचार करावा असे कोणास वाटले नसावे. त्यांच्या काव्याचा प्रसार होऊन त्यांचा पंथही स्थापन झाला तसे त्यांच्या सौंदर्यमीमांसेच्या बाबतीत घडले नाही. रवींद्र किंबहुने लिहितात, 'मर्ढेकरांनी आपल्या सैद्धांतिक लेखनाने एक नवीन मार्ग दाखविला. त्यांचा दबदबा नंतरच्या काळातील लेखनावर दिसतो. परंतु साहित्याविषयी त्यामुळे काही सिद्धांत निर्माण व्हावेत असा प्रभाव त्यांचे लेखन पाडू शकले नाही.'[१९] मर्ढेकरांनी आपल्या मीमांसेचे दिग्दर्शन करणारे फारसे समीक्षालेखन केले नाही.

सौंदर्यभावनेला जीवशास्त्रीय अधिष्ठान नाही; या मर्ढेकरांच्या विधानाला श्री. पाध्ये यांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. सौंदर्यभावनेला जीवशास्त्रीय आधार नसता तर उत्क्रांतीच्या चक्रात केव्हाच गळून पडली असती. जीवशास्त्रीय अनुभव व सौंदर्य भावना यांच्यामध्ये मर्ढेकरांनी जी चिनी भिंत उभी केली आहे. त्यामुळे त्यांची सौंदर्यमीमांसा अडचणीत सापडते, असा पाध्ये यांचा अभिप्राय असल्याचे हातकणंगलेकर यांनी म्हटले आहे.

प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे हे साहित्याचे साक्षेपी अभ्यासक म्हणून महाराष्ट्रात ओळखले जातात. उपेक्षित वर्गाची संस्कृती, त्यांचे शिक्षण, त्यांचे साहित्य हे त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत. 'साहित्य चिंतन' या त्यांच्या पुस्तकाचे सूर्यनारायण रणसुभे यांनी परीक्षण केले आहे. एकूण दहा लेखांपैकी शेवटचा लेख परीक्षणात्मक आहे. बाकी नऊ लेख हे परिवर्तनशील

साहित्याच्या स्वरूपाचे विश्लेषण करणारे आहेत. आजच्या समाज–व्यवस्था आणि साहित्याचे दायित्व या पुस्तकातील पहिला लेख प्रत्येक काळातील विचारवंतांनी साहित्यकाराला काही प्रश्न विचारले आहेत. समाजातील सर्वात संवेदनक्षम म्हणून घेणारा हा लेखक हा आपल्या समाज व्यवस्थेपासून अलिप्त राहून जगू शकतो काय? या अशा अलिप्ततेतून निर्माण होणाऱ्या साहित्याचे मोल ते काय? साहित्याने सामाजिक बांधिलकी पाळली पाहिजे. साहित्य समाजापासून दूर रहू शकत नाही. साहित्याचे समाजाशी नाते असते, तसेच समीक्षा साहित्यातील जीवनाशी असलेले नाते शोधते. भालचंद्र नेमाडे लिहितात, ''समीक्षा ही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ साहित्य ठरवत नाही. समीक्षा ही अमूक गोष्ट साहित्य आहे किंवा नाही एवढ फक्त ठरवते. ते या कसोटीवर ठरवते–की त्याची जीवनदृष्टी–जीवनाशी ते कितपत जोडलेले आहे– हे नातं– जीवनाचं साहित्याशी हे समीक्षा ठरवते.''[२०]

वाङ्मयीन मूल्यांची सांगोपांग चर्चा करताना त्याची उत्पत्ती सांगतात–

१) वाङ्मयीन मूल्यांचा अविष्कार हे साहित्य निर्मिती आणि साहित्य व्यवहारातले एक अनिवार्य गृहित कृत्य आहे.

२) वाङ्मयीन व्यवहार हा केवळ कला व्यवहार नव्हे तर ती एक समग्र सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे.

३) साहित्याला स्वत:ची स्वायत्तता असते आणि असली पाहिजे. पण साहित्याला ही स्वायत्तता प्राप्त झालेली असते, ती मानवी समाज व संस्कृतीपासून हे विसरता कामा नये त्याला आपले पोषण द्रव्य समाजाकडूनच घ्यावे लागते. त्याची वाढ त्या पोषण द्रव्यावर अवलंबून असते.

या लेखाच्या शेवटी श्री. शरणकुमार लिंबाळे यांची गाजलेली आत्मकथा 'अक्करमाशी' या समीक्षणासंबंधीचा आहे. हे प्रदीर्घ समीक्षण वाचल्यानंतर दलित साहित्याच्या वेगळ्या समीक्षा पद्धतीची गरज का लागते याचा खुलासा होतो. 'अक्करमाशी' तील सौंदर्यस्थळे शोधण्याऐवजी दु:खाची, करूणेची स्थळे हळुवारपणे उघडी करून ते दाखवतात. अक्करमाशी या आत्मकथनाची ताकद आणि त्यात व्यक्त झालेली दु:खे यांना डॉ. वाघमारे संवेदनक्षम मनाने सामोरे जातात.

परिवर्तनाशी बांधिलकी पत्करलेल्या एका संवेदनशिल अभ्यासकाचे हे चिंतन आहे आणि त्यामुळेच या चिंतनाला एक वेगळे परिमाण लाभलेले आहे.

डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे हे महाराष्ट्रातील एक आघाडीचे विचारवंत आहेत. राजकीय तत्त्वज्ञान, राजकारण, शिक्षण, लोकोत्तर महापुरूषांचा वारसा, साहित्य, संस्कृती इत्यादी गोष्टींची समाजाच्या व्यापक संदर्भात आस्थेवाईकपणे सतत चिंतनमननात्मक मीमांसा करून निष्कर्ष प्रस्थापित करणारे ते एक श्रेष्ठ मीमांसकही आहेत. त्यांच्या 'साहित्य प्रत्यय' या पुस्तकाचे दिलीप धोंगडे यांनी मार्मिक परीक्षण केले आहे. पुस्तकाची मांडणी दोन विभागात केली आहे. १) साहित्याची तत्त्वचर्चा २) महत्त्वाच्या पुस्तकांची समीक्षा. लोकप्रिय साहित्याच्या स्वरूपाची चर्चा भोळे यांनी केली आहे. लोकप्रिय साहित्य हे अनुभव गृहण दृष्ट्या उथळ, जुजबी, प्रासंगिक व खंडित असते असे मत व्यक्त केले आहे. मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यातील माक्सवादी आशयावर प्रकाश टाकला आहे. मराठी साहित्यातला मार्क्सवादी अविष्कार हा मार्क्सवादी शाब्दिक पोपटपंची, वर्ग संघर्षाचे ढोबख चित्रण, आणि राजकीय घटनांची वृत्तपत्रीय वर्णन यापलिकडे सहसा गेला नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. समीक्षेच्या क्षेत्रातही मार्क्सवादाची नीट मांडणी झाले नसल्याची खंत व्यक्त केली आहे. 'क्षिप्रा', 'सरहद्द', 'जन हे बोलतुजेचे' या मुक्तिबोधांच्या कादंबऱ्या मार्क्सवादी आशयाने संपृप्त झाल्या आहेत.

श्री.भोळे यांनी दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मचरित्राची समीक्षा केली आहे. डॉ. भोळे यांनी त्यातील साधेपणा व अनलंकृतता यामुळे त्याला प्राप्त झालेले सौंदर्य आधोरेखीत केले आहे. आत्मचरित्रकाराचे परखड आत्मपरीक्षण आत्मचरित्रात महत्वाचे परिणाम मिळवून देते. 'अभिताब' यांच्या 'पड' या कथासंग्रहाचे समीक्षण करताना अमिताभच्या कथालेखनाची विविध वैशिष्ट्ये नोंदवली आहेत. दलित जीवनासंबंधीचे हे लेखन असूनही ते एकपदरी नाही आणि संवेदनक्षम असले तरी भावविवश नाही.एकसुत्री होत चाललेल्या दलित कथाविश्वात डॉ. भोले अभिताभच्या लेखनाचे स्वागत करतात. 'खेळ' या ढसाळांच्या कवितेचा मुख्य विषय रतिबंधातला अदिसंबंध शोधणे हा आहे, पण नवसमाजाचे सर्जन तो करू शकत नाही असे स्पष्ट केले आहे. दलित समाजाचे दु:ख, दैन्य नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेतून मांडले. त्यांनी विद्रोह मांढला त्यातून

वैचारिकता स्पष्ट होते. विद्रोही चळवळ यशस्वी केली. त्याला वैचारिकतचे अंग होते. चळवळीची वैचारिकता हा मानवी चेतनेचा अविष्कार असल्याचे नमूद केले आहे. पानतावणे लिहितात, ''वैचारिकतेला समाज व्यवस्थेतील अनुदारतेचा, अंतविरोधाचा आणि स्थितीशीलतेचा सतत शोध घ्यावा लागतो. समाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेली वैचारिकता इतिहासाचा अन्वय लावते; वर्तमानाची चिकित्सा करते, आणि भविष्याचा कानोसा घेते, त्यातून नवसमाज रचनेला आरंभ होतो.''[२१]

मराठी सौंदर्यशास्त्र व साहित्यशास्त्र या क्षेत्रामध्ये मर्ढेकरांचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले जाते. 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र; पुनवचिार' या पुस्तकाचे परीक्षण 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' या लेखात केले आहे. डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी मर्ढेकरांच्या लिखाणाला 'मराठी साहित्यशास्त्राची गंगोत्री' मानले आहे. प्रा. नरहर कुरूंदकरांनी तर त्यांना शंकराचार्यांचे स्थान बहाल केले आहे. मर्ढेकरांच्या सिद्धांताचा तार्किक भक्कमपणा, त्यांच्या संपूर्ण मीमांसेची सुसंगता व तर्कशुद्धता या गोष्टींबाबत समीक्षकांना पराकोटीचा विश्वास वाटत असल्याचे मालशे यांनी म्हटले आहे.

कलेच्या माध्यमाचा विचार करताना मर्ढेकर 'साहित्यकाच्या चष्म्यातून' इतर कलांकडे पाहतात, तर त्यांचे लयतत्त्वाचे नियम दृश्यकलांच्या ओझ्याने वाकलेले आहेत; असे निष्कर्ष रानड्यांनी काढल्याचे मालशे यांनी परीक्षणात नमूद केले आहे. मर्ढेकरांच्या काही मतांची जी छाननी केलेली आहे ती थोडक्यात पण अतिशय धारदारपणे केलेली आहे. 'मर्ढेकरांचे लेखन संख्येने अल्प असले तरी, वसंत दावतरांनी म्हटल्याप्रमाणे; ''एक कलाकृती म्हणून साहित्यकृतीकडे पाहण्याची दृष्टी मराठी टीकेला व साहित्य स्वादकाला मर्ढेकरांनी दिली.''[२२]

प्रा.यशवंत मनोहर हे दलित जीवनाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक विद्रोहाची कविता लिहिणारेआजचे समर्थ कवी. 'उत्थानगुंफा' हा त्यांचा काव्यसंग्रह. त्यांच्या कवीमनाची जडणघडण व संस्कार, त्यांच्या वाङ्मयीनन व सांस्कृतिक जाणिवा, दलित काव्याविषयी त्यांची भूमिका या सर्वच कुतूहलाची पूर्ती करणारा 'स्वाद आणि चिकित्सा' या टीकालेख संग्रहाचे एस.डी.इनामदार यांनी 'दलित वाङ्मयाची भूमिका' या लेखात परीक्षण केले आहे. प्रा. मनोहर यांनी 'ज्ञानेश्वरील' ला कालबाह्य ठरविले आहे. नामदेवांच्या कवितेच्या संदर्भात ती भक्ताची

कविता होते, शिव्यांची कविता होत नाही, असे विवेचन केले आहे. चक्रधरप्रणित महानुभावपंथ हाही मूलत: वैदिक धर्मपंथ असल्याने तो वैदिक तत्त्वज्ञान व जीवनमूल्ये मानतो. त्यामुळे भौतिक प्रश्न सोडविण्यात निरूपयोगी ठरल्याचे जाधव यांचे मत असल्याचे इनामदार सांगतात. प्रा.मनोहरांच्या वाङ्‌मयीन जाणिवांमध्ये कवी केशवसुतांना फार मोठे स्थान आहे. केशवसुतांच्या कवितेतील सामाजिक बंडखोरी सर्वश्रेष्ठ असल्याचे त्यांचे म्हणणे अहे. कवी मनोहर केशवसुतांवरील गौरवपर कवितेत म्हणतात,

'अरे ईश्वराचे थोबाड खेटराने रंगविणारा तू!

माणसासाठी तुझा शब्द मात्र झाला!'

समाजजीवनात अत्याचाराचा जो काळोख साचून राहिला आहे, त्या काळोखाशी भांडण्यासाी केशवसुतांनी दाहकता व धगधगत्या वणव्याचा अंगार दिला, असे जाधव सांगतात. ज्या उच्चभ्रू, प्रस्थापित समीक्षांनी फडके, माडखोलकरांवर पानेच्या पाने भरून लिहिली, त्यांनीच अण्णाभाऊ साठे यांची उपेक्षा केल्याचे दु:ख व्यक्त केले आहे. ही उपेक्षा त्यांना जातीच्या 'दुर्दैवामुळे' त्यांना हा शाप भोगावा लागला, असे म्हटले आहे.

दलित काव्याचे विवेचन करताना दलित कविता म्हणजे सामाजिक जाणिवेची कविता. अन्यायग्रस्तांच्या बाजूने मूल्यांचे मनोरे उभी करणारी कविता असल्याचे म्हटले आहे. दलित कवितेतील आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा आहे. अनिल गजभिये लिहितात, ''दलित कवींचा संताप, आक्रोश, त्वेष मोठ्या मधूर व गोड लयबद्ध शब्दांत अविष्कृत झाला पाहिजे, अशी अपेक्षा करणे म्हणजे धगधगत्या अग्नीने मंद, मंद शेक द्यावा, होरपळून काढू नये असं म्हणण्यासारखे आहे.''[२३] अन्यायाच्या, अत्याचाराच्या बाबतीत वादळवाऱ्यात दलित कविता आक्रोश करते. त्यातून ती बंडाचा झेंडा उभारते. दलित समीक्षेच्या संदर्भात हे पुस्तक फार महत्त्वाचे असल्याचे एस.डी.इनामदार यांनी परीक्षणात्मक अभिप्रायात म्हटले आहे.

'केशवसुतांच्या काव्यातील सृष्टी:विवाद्य अन्वयार्थ' या लेखात गो.मा.पवाय यांनी डि.के. बेडेकर यांच्या 'केशवसुतांची काव्यदृष्टि' या ग्रंथाचे परीक्षण केले आहे. केशवसुतांच्या रोमॅंटिसिझमचे, त्यांच्या जाणीवविश्वाचे स्वरूप स्पष्ट करून दाखविणे, एकाचे केंद्रिय कल्पनेत वा

कल्पनाव्यूहात या जाणीवविश्वाचे दर्शन घेणे, हे बेडेकरांचे उद्दिष्ट असल्याचे पवार यांनी नमूद केले आहे. केशवसुतांची काव्यदृष्टी ही जीवनदृष्टीच होय. ह्या काव्यदृष्टीचे विवरण करणे हा या लेखाचा उद्देश आहे. केशवसुतांच्या काव्यात कोणती अनुभूती व्यक्त होते? केशवसुत कोणत्या पातळीवरून अनुभव घेतात हे बेडेकरांनी विशद केले आहे. बेडेकरांची केशवसुतांच्या आकलनामध्ये ही महत्त्वाची भर आहे.

बेडेकरांनी केशवसुतांची काव्यदृष्टीही विशद केली आहे. कवी, वास्तव आणि कविता या संबंधी केशवसुतांची एक दृढ व नवीन भूमिका होती. ही भूमिका म्हणजेच त्यांची सम्यक काव्यदृष्टी. कवितांकडून कवीच्या व्यक्तीतत्त्वाकडे जाणे व व्यक्तित्वाच्या संदर्भात पुन्हा कवितांकडे वळणे हा प्रवास काव्याच्या आकलनाच्यादृष्टीने कधी–कधी फलप्रद ठरतो. बेडेकरांनी 'स्वर्गसमकक्षाते' ची कल्पना मांडून याप्रकारे केशवसुतांच्या काव्याचे आकलन अधिक सुकर केलेले आहे, असे गो.मा.पवार परीक्षणात्मक अभिप्रायात नमूद करतात. बेडेकर केशवसुतांच्या 'सृष्टी' या शब्दांचे आकलन वेगळ्या प्रकारे करतात. ते 'सृष्टी' या शब्दाचा निसर्ग असा अर्थ घेत नाहीत. त्यांच्या दृष्टीने सृष्टी वस्तूच्या अंतर्यामी असणारे सौदर्यतत्त्व आहे, तेच तत्त्व होय. त्यांचे म्हणणे असे की, केशवसूत सृष्टी हा शब्द जगापलीकडील, निसर्गापलीकडील प्रकाशमय सौंदर्यतत्त्व, दिव्यतत्त्व या अर्थाने वापरीत होते.

**वरील सर्व विवेचनावरून पुढील निरीक्षण मांडता येतील.**

- तत्कालीन साहित्याच्या आधारे सामाजिक बदलांमधून जाणावणारी स्थित्यंतरे समाजशास्त्रीय समीक्षेतून अभ्यासण्यास मिळतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून आलेल्या लेखांमधून समाज, संस्कृती, वाङ्मयतील झालले बदल व सुधारणा यांचा आढावा घेतलेला असतो.
- साहित्यकृतीवर विचार क्षेत्राचा, तत्त्वप्रणालीचा परिणाम होत असतो. गांधीवादाचाही साहित्यनिर्मितीवर परिणाम झालेला दिसतो. गांधीवादाच्या प्रभावाने निर्माण झालेल्या कलाकृतीतून पारंपारिक अध्यात्म, मूल्यात्मक जीवनदृष्टी, प्रगल्भ संवेदनशील जीवनव्यवहाराचा ठसा उमटलेला दिसतो.

- मानसशास्त्रीय संकल्पनांचा ठसा उमटला असला तरी संपूर्ण मानसशास्त्रीय दृष्टिकोन ठेऊन लेखन मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात होताना दिसत नाही.
- लेखकाच्या व्यक्तिमत्वाची जडण घडण, त्यांच्या प्रेरणा, आदर्श, वाटचाल, कुटुंबाची पार्श्वभूमी, लेखकाचे जीवनानुभव, मतस्वातंत्र्य जपण्याचा लेखकाचा प्रयत्न या वैशिष्ट्यांचा चरित्रात्मक समीक्षेत समावेश होतो.
- वात्सल्याची तहान, मातृत्वाची ओढ, विविध प्रतिमांतून व्यक्त होणारी पत्नीची व्यक्तीरेखा, कुलीनता, पतिव्रत्य यातून भाविष्कृत होणारे स्त्रीरूपाचे दर्शन, सामाजिक जाणीव या परिघातील स्त्रीसुधारणा यांचे स्त्रीवादाच्या दृष्टीने विवेचन हे घटक स्त्रीवादी समीक्षेत येतात.
- ताराबाई शिंदे, महात्मा फुले, यांच्या स्त्रीविषयक  विचारांचे मूल्यमापन, कुरूंदकर आणि अभिनव गुप्त यांच्यातील रसचर्चा, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचे सामाजिक कार्य हे विषय तौलनिक समीक्षेच्या अंगाने चर्चिले आहेत.
- साहित्यकृतींच्या संदर्भात रूपवादी समीक्षेचे स्वरूप विविध घटकांसह रूपवादी समीक्षा लेखातून स्पष्ट झाले आहेत.
- आस्वादक समीक्षेच्या अंगाने साहित्य कृतीतील सौंदर्यस्थळांचा मर्मज्ञ दृष्टीने घेतलेला वेध, साहित्यकृतींच्या निर्मती विषयीची उकल, तसेच स्वत्वशोधन इत्यादी घटकांवर प्रकाश पडतो.
- डॉ. अशोक मोडक यांनी डॉ.लोहिया यांनी केलेल्या मार्क्सवादाची मीमांसा यावर केलेले भाष्य मार्क्सवादाचे स्वरूप स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरते. 'ज्वालेचे फूल–शरच्चंद्र मुक्तिबोध; व्यक्ती आणि वाङ्मय' या डॉ. रणधीर शींदे यानी लिहिलेल्या ग्रंतावर डॉ. राजशेखर शिंदे यांनी 'ज्वालेचे फूले' मार्क्सवादी जीवनदृष्टीचे समग्रदर्शन या शीर्षकाने लिहिलेल्या समीक्षा लेखातून मुक्तिबोधांच्या साहित्यातील मार्क्सवादाचे स्वरूप अधिक सुस्पष्य झालेले आहे.

- तात्विक विचारांमध्ये मराठी भाषा, मराठी साहित्य–समीक्षा, मराठी संस्कृती आणि वाचक यांच्या संदर्भात मौलिक भाष्य करणारी ग्रंथ परीक्षणे आणि स्वतंत्र लेख यांचा समावेश आहे.
- 'समाज प्रबोधन पत्रिके'तील समीक्षा ग्रंथावरील परीक्षणे आणि स्वतंत्र समक्षालेख मराठी भाषा व साहित्याला दिशा देणार आहे तसेच वाचकांच्या साहित्यविषयक दृष्टिकोन अधिक निकोप करणारे असून त्यांच्या अभिरूचीला नवे वळण देण्यास उपयुक्त ठरणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ:–**


१) वंसंत आबाजी डाके, मराठी समीक्षेची सद्य:स्थिती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २०११, प्र.क्र.२.

२) किशोर सानप, भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा, साकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५, प्र.क.४२.

३) संपा. दत्तात्रय पुंडे, वाङ्मयेतिहासाची संकल्पना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तिसरे आवृत्ती, २००५, प्र.क्र.९७.

४) डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ.७५.

५) चंद्रकांत बांदिवडेकर, मराठी कादंबरी: चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती,१९८३.

६) संपा.वि.स.खांडेकर, केशवसुतः काव्य आणि कला, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, २००१, पृ.क्र.१२.

७) संपा.रमेश चव्हाण, महात्मा फुले यांचा शोध व बोध, अनुपम क्रिएशन, पुणे प्रकाशन, २००३, पृ.क्र.४०.

८) डॉ. अरूणा देशमुख, मराठीतील लौकिकतावादी साहित्य विचार, साहित्य प्रसार केंद्र,नागपूर, प्रथमावृत्ती, १९९५, पृ.क्र.९१.

९) विद्युत भागवत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती–२००८, पृ.क्र.११३.

१०) संपा.रवींद्र ठाकूर, नंदकुमार मोरे, समीक्षा पद्धती: सिद्धांत आणि उपयोजन, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती–२०११, पृ.क्र.३६.

११) वसंत आबाजी डहाके, मराठी समीक्षेची सद्य:स्थिती, उनि, पृ.क्र.४८.

१२) रा.ग.जाधव, साठोत्तरी मराठी कविता व कवी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९७, पृ.क्र.६९.

१३) दिलिप चित्रे, 'ॲन ॲथोलॉजी ऑफ मराठी पोयट्री' १९४५–६५, निर्मला सदानंद पब्लिशर्स, मुंबई, १९६७, पृ.क्र. १९.

१४) संपा. चंद्रकुमार नलगे, गंगाधर पाणतावरे, 'दलित कथा: काही विचार', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे, द्वितीयावृत्ती १९९४, पृ.क्र.१४.

१५) भास्कर खांडगे, 'बलुतं: दया पवार यांच्या साहित्याचा अभ्यास' विमल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८१, पृ.क्र.५५–५६.

१६) डॉ. पवन मांडवकर, दया पवार: वाङ्मय दर्शन आणि चिकित्सा, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती–२०१०, पृ.क्र.११६.

१७) डॉ. आरूणा देशमुख, मराठीतील लौकिकतावादी साहित्य विचार, उनि, पृ.क्र.९१.

१८) डॉ. पंडित टापरे–कादंबरी संवाद, पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती–२००५, पृ.क्र.१०.

१९) संपा.विलास खोले, विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, २००४, पृ.क्र.१२७.

२०) तत्रैव, पृ.क्र.१५७.

२१) संपा.प्रा.मनोहर जाधव, साहित्य: शोध आणि संवाद, सुविधा प्रकाशन, पुणे, पृ.क्र.१२०.

२२) वसंत आबाजी डहाके, मराठी समीक्षेची सद्य:स्थिती, उनि, पृ.क्र.४०.

२३) अनिल गजभिये, दलित कविता: क्रांतिप्रवण, दलित साहित्य: विचार आणि वैभव, प्रथमावृत्ती, अहिल्या प्रकाशन, इंदूर, १९९१, पृ.क्र.१२.

# उपसंहार

# उपसंहार

प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात मराठी नियतकालिकांच्या समीक्षाविषयक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पेशावाईचा अस्त झाला आणि इंग्रजांची राजवट आली. इंग्रजी राजवटीबरोबरच अनेक नवीन गोष्टींचा परिचय समाजाला झाला. मुद्रण कलेची ओळख तसेच नियतकालियकांची ओळख याच काळातील आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दंर्पण' ने महाराष्ट्रातील नियतकालिकांचा प्रारंभ झाला. आजपर्यंतच्या नियतकालिकांचा प्रवास अभ्यासला असता काळानुरूप नियतकालिकात बदल झालेले दिसतात.

साहित्य छापणे, धर्माचा प्रसार करणे, ज्ञानदान करून समाज प्रबोधन घडवून समाजाला नवी दिशा देण्याचे उद्दिष्ट सुरूवातीच्या काळातील नियतकालिकांचे दिसते. 'मराठी ज्ञानप्रसारक' पासून समीक्षाविषयक लेख येण्यास प्रारंभ झाला. संस्कृत, इंग्रजी भाषांतरे नियतकालिकांमधून प्रकाशित होऊ लागली. 'काव्यसंग्रह', 'काव्यार्थ दिपिका' अशा मासिकांनी मराठी भाषा समृद्ध करण्यास हातभार लावलेला दिसतो. नियतकालिकांच्या इतिहासात प्रदीर्घ काळ प्रकाशित होणारे एकमेव मासिक म्हणजे 'विविध ज्ञानविस्तार' होय हे मासिक ६९ वर्षे चालले. काव्यरतनावलीने ४७ वर्षे आपले अंक प्रकाशित केले तर 'करमणुक' ने २७ वर्षे साहित्यसेवा केली. काही नियतकालिके अगदीच अल्पायूशी ठरली. 'उपदेश चंद्रिका' १८४४ मध्ये सुरू होऊन १८४७ मध्येच बंद पडले. या मासिकास हवा तसा वाचकांचा प्रतिसाद मिळाला नाही. 'पारिजात', 'ज्योति', 'उपदेश चंद्रिका' या मासिकांचे काही अंकच प्रसिद्ध होऊन बंद पडले. 'पारिजात' हे एक वर्ष चाललेले अल्पजीवी मासिक होते, तसेच 'इंद्रायणी' हेही अल्पजीवीच होते.

एकेका वाङ्मय प्रकाराला वाहिलेली नियतकालिके निघाली होती. 'काव्य रत्नावली' मधुन काव्यालाच प्रसिद्धी दिली जात असे. 'कादंबरी क्लपद्रम' नियतकालिाकचे उद्दिष्टच कादंबऱ्या प्रसिद्ध करणे होते. 'रंगभूमी' नियतकालिकामधुन नाट्यतंत्राचा इतिहास प्रकाशित होत असे. 'नाट्यकल्प' 'नाट्यमाला', 'नाट्यकथार्णव', 'ऐतिहासिक नाटकमाला' अशा नाट्य कलेसाठी प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांनी नाटक या वाङ्मय प्रकारास आपल्या मासिकात स्थान

आहे. ‘निबंधचंद्रिका’, ‘निबंधमाला’ ‘निबंधसार’, या मासिकांनी मराठी निबंधाला उत्तेजन दिले. ‘भाषांतर, ‘विहंगम’ या मासिकांनी भाषांतरित साहित्य प्रसिद्ध केले. ‘इंद्रायणी’ हे संत संदेश देणारे मासिक प्रसिद्ध होत असे, तर ‘हंस’ हे कथाप्रधान मासिक फक्त कथेला महत्व देत असे. या नियतकालिकांनी मराठी लेखकाला वाव देण्याची कामगिरी केलेली दिसते. तसेच मराठी भाषेला मानाचे स्थान मिळवून देण्याचे उदात्त कार्यही या नियतकालिकांनी केले असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

‘विविध ज्ञानविस्तार’ या मासिकाने साहित्य समीक्षेच्या संदर्भात महत्वाचे काम केले आहे. साहित्य तत्त्वविचार आणि साहित्य समीक्षा या दोन्ही क्षेत्रातील लेखन या नियतकालिकाने आवर्जून प्रकाशित केले. गुंजीकरांची ‘काव्य–विचार’ ही लेखामाला श्री. कृ. कोल्हटकरांच्या ‘मराठी वाङ्मयातील विशेष व त्यांचे उगम’ हा निबंध, वा.गो.आपट यांची ‘लेखन व्यवसाय’ ही लेखमाला हे उल्लेखनीय लेखन या काळात प्रसिद्ध झाले आहे. ‘विविधज्ञनविस्तारात’ लिहिणाऱ्या समीक्षकात ना.म.भिडे हे एक उल्लेखीनय नाव आहे. ‘कला व तिचे महत्व’ (१९२५) या त्यांच्या लेखातील कलांचे वर्गीकरण लक्षात घेण्यासारखे आहे. चिपळूणकरांच्या निबंधातले त्यांचा ‘ग्रंथावर टीका’ हा समीक्षे विषयीचे पहिलेच सूत्रबंद्ध विवेचन करणारा निबंध आलेला आहे. चिपळूणकरांनी या निबंधात ‘ग्रंथाची संख्या’ जशी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामानाने त्यात हितावह अशी गुणदोषविवेचकांची संख्याही वाढत जावी हे अत्यंत इष्ट होय. पण हे मात्र बहुधा मुळीच आढळत नाही, अशी वस्तुस्थिती सांगितली आहे. त्यांच्या मते, ‘ग्रंथाचे यथार्थ परीक्षक असणे’ हे फार आवश्यक आहे. चिपणूळकरांनी ‘मोरोपंताची कविता’ हा प्रदीर्घ निबंध लिहिताना टीकाकारांच्या अंगी असावयाच्या गुणांचे भान ठेवलेले दिसते त्याचबरोबर मोरोपंतांच्या कवितेकडे कसे पाहिले जाते व कसे पाहिले पाहिजे याचे दिग्दर्शनही या निबंधात केले आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वाधात विद्यासेवक, विहंगम, समाज स्वास्थ, प्रतिभा, मनोहर, किर्लोस्कर, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, यशवन्त, संशोधक, सह्याद्री, ज्योत्स्ना, लोकशिक्षकण, वागीश्वरी, विश्ववाणी, समीक्षक इत्यादी नियतकालिकांनी साहित्य आणि साहित्येतर कलांचा साहित्यकृतींना प्रभावित करणाऱ्या राजकीय सामाजिकविचारांचा, साहित्यातील आणि

समाजातील विविध चळवळींचा वेध घेतला, साहित्यरुपांचा व साहित्यतत्वांचा शोध घेतला. यातून मराठी वाङ्मयीन संस्कृतीची घडण होऊ लागली होती. ही वाङ्मयीन संस्कृती सामाजिक दृष्टीने उच्च आणि आर्थिकदृष्टीने मध्यम वर्गाची होती. त्याचप्रमाणे ती भारतीय साहित्यकला विचारापेक्षा पाश्चात्य विचारांनी अधिक प्रभावित होती असे दिसते.

नियतकालिकांची स्वत:ची अशी काल–चौकट असल्यामुळे ते समकालीन वाङ्मयीन व इतर चळवळींना समांतर राहू शकते, त्या चळवळींना गती देऊ शकते आणि त्यांना रुपही देऊ शकते. नियतकालिकांच्या चालकांचा अथवा त्यांत लिहिणाऱ्या प्रभावी लेखकांच्या विचार प्रणालीची मुद्रा चळवळींवर उमटत असते. स्वत:च्या वाङ्मयदृष्टीचा, विचारसरणीचा अविष्कार करण्यासाठी नियतकालिके काढली असल्याचे लक्षात येते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारप्रवाहांना अभिव्यक्तीसाठी स्थान उपलब्ध करुन द्यावे हा ही विचार त्यामागे असावा, असे दिसते. १९४०, १९५० ते १९६० च्या दशकात निघालेल्या अभिरुची (१९४३), 'युगवाणी' (१९४६), 'हंस' (१९४६), 'नवभारत' (१९४७), 'साहित्य' (१९४७), 'प्रतिष्ठान' (१९५३), 'मराठी संशोधन पत्रिका' (१९५३), 'छंद' (१९५४), 'पंचधारा' (१९५८), 'आलोचन' (१९६२), 'ललित' (१९६४), 'मुद्रा' (१९६६), 'अस्मितादर्श' (१९६८), 'वैखरी' (१९६९) इत्यादी नियतकालिकांच्या मागे हे दोन्ही दृष्टिकोण होते, ही सर्वच नियतकालिके समकालिन वाङ्मयीन चळवळींशी कमी अधिक प्रमाणात निगडीत होती असे दिसते.

'अभिरुची' हे केवळ वाङ्मयीन नियतकालिक म्हणून निघालेले नसले तरी उच्च अभिरुचीचे काव्य, कथा, टीका यांना तिथे प्राधान्य होते, तसेच विविध भाषांत प्रकट होणाऱ्या साहित्याचे संकलन हेही आवश्यक असे वाङ्मयीन कार्य मानले होते. 'अभिरुची' या नियतकालिकातील मुक्तिबोधांच्या गोविंदाग्रजांवरील लेखातून (मे १९४७) निराळी समीक्षादृष्टी दिसते. या लेखात मुक्तिबोधांनी गोविंदाग्रज हे एक मध्यमवर्गीय हिंदु कवी होते असा मुद्दा मांडला असून मध्यमवर्गीय आणि 'हिंदू' या दोन्ही संकल्पनांचे त्यांनी स्पष्टीकरण केले आहे. 'अभिरुची'च्या ऑगस्ट १९४७ च्या अंकात मुक्तिबोदांचा 'काव्य आणि सौंदर्य' हा लेख आहे. त्यात म्हटले आहे, 'महान साहित्य नेहमी महान सामाजिक प्रेरणांमधूनच निर्माण होत असते.'

मुक्तीबोधांच्यामते, जीवनाच्या अपूर्णतेचा नाश व नवीन जीवनाचे स्वप्न कवी आपल्या काव्यात प्रकट करतात.

'अभिरुची', 'साहित्य' या नियतकालिकांप्रमाणे सत्यकथा, युगवाणी, नवभारत, प्रतिष्ठान, छंद, आलोचना, अस्मितादर्श इत्यादी नियतकालिकांतून साहित्य–विचार व्यक्त झालेला आहे. उदाहरणार्थ 'नवभारत' मध्ये कला आण जीवन, कला व नीती, रससिद्धान्त, वास्तवता या विषयांवरील चर्चात्मक, आधुनिक मराठी कविता, कादंबरी या विषयांवरील समालोचनात्मक आणि प्राचीन मराठी साहित्याविषयीचे संशोधनात्मक लेख प्रकाशित झाले. 'प्रतिष्ठान'ने काव्यविशेषांक, नाट्यविशेषांक, कादंबरीविशेषांकांचे आयोजन केले, जुन्या मराठी संहितांचे प्रकाशन केले, कथा आणि कविता या श्रेणीतील नवनव्या रचनाकारांचे लेखन आवर्जुन छापले, पुस्तक परीक्षणे नियमितपणे दिली.

'छंद'ने आपल्या पहिल्याच अंकात 'भाषा वाङ्मय आणि ललित कला' हे क्षेत्र निश्चित केले होते. मराठी टीकेचा प्रांत वाङ्मयविषयक टीकेनेच व्याप्त असल्यामुळे 'छंद' ने चित्र, शिल्प, वास्तू आदि ललितकलांची प्रकृती काय आहे, त्यांचे स्वतःचे प्रश्न कोणते आहेत, त्यांचा वाङ्मयकलेच्या प्रातांत चालू असलेल्या प्रयत्नांशी कोणता संबंध आहे. इत्यादींचा शोध घ्यावा असे ठरवले. 'छंद' ने पुढल्या काळात ठरवले होते त्याप्रमाणे काम केले आणि ते वाङ्मय कलाविषयक विचारांच्या दृष्टीने महत्वाचे होते. 'कलेचे जीवशास्त्र', 'स्वन्दकारिका' हे अनुवादित लेखन आजही महत्वाचे वाटते. 'छंद'ने पाश्चात्य किंवा पौर्वाच्य असा एखादा पक्ष आग्रहाने मांडलेला नसला तरी भारतीय साहित्य–कला विचाराला अधिक महत्व दिलेले दिसते.

'आलोचना' हे समीक्षा लेखनासाठी निघालेले नियतकालिक होते, तरी सुरुवातीच्या अंकातून कथा व कविता हा अनुवादरुप मजकूर आढळतो. आलोचनेतही आरंभीच्या काळात वाङ्मय आणि वाङ्मयेतर कलांविषयीचा समीक्षात्मक मजकूर छापला जात असे. नंतरच्या काळात वाङ्मय हेच मुख्य केंद्र बनले. मराठीत केवळ समीक्षात्मक लेखन प्रसिद्ध करणारे हे नियतकालिक अपूर्व असे आहे. पुस्तकपरिक्षणे, साहित्याच्या अभ्यासक्रमाविषयीचे लेखन, अध्यक्षीय भाषणे व त्यांची चिकित्सा, एकेका लेखकाविषयीचे विशेषांक, गीत–काव्य, शोक

संवेदक नाटक, सुखात्मिका, कथा, साहित्य : स्वरुप आणि समीक्षा, कादंबरी इत्यादी विषयांवरील विशेषांक तर 'आलोचन' ने काढलेच, मर्ढेकर पूर्वकालिन व मर्ढेकर युगातील टीकेविषयीचे देखील विशेष अंक प्रसिद्ध केले. पाश्चात्य साहित्य–कला विचारातील वेगवेगळ्या वादांचा परिचय आलोचनेने घडवलाच, त्याचबरोबर मराठी साहित्यातील वेगवेगळ्या चळवळींचीही दखल घेतली. मराठीतील समीक्षेच्या इतिहासात आलोचनेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

१९३५ नंतर मराठीतील 'कालावाद–जीवनवाद' या विवादाचे स्वरुप बदलले, वाङ्मय आणि इतर कलांविषयक 'अलौकिकतावादी– लौकिकतावादी' भूमिकांचा उदय झाला. मर्ढेकर, वा. ल. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, इत्यादी अलौकिककतावादी, तर मुक्तिबोध, दि. के. बेडेकर इत्यादी लौकिकतावादी अशी स्थूल मानाने विभागणी होऊ लागली. मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मता' (सह्याद्री १९३५ ते १९३९), 'सौंदर्य भावना म्हणजे काय' (चित्रा, १९४३), 'सौंदर्य शास्त्रातले काही प्रश्न' (सह्याद्री, १९४५), 'सौंदर्य शास्त्रातील एक दोन ससे' (मौज, १९४५) या लेखनाने मराठीतील समीक्षा विचारात क्रांती केली होती.

१९६० नंतरच्या पाश्चात्य समीक्षाविचाराचा सविस्तर परिचय करुन देणारे 'अनुष्टुभ' हे नियतकालिक साहित्य समीक्षेतील नव्या प्रवाहांना चालना देणारे ठरले. 'अस्मितादर्श' ने दलित चळवळीच्या आणि साहित्याच्या विविध अंशांचा परिचय व चिकित्सा करणारे लेखन तर छापलेच, तात्वीक समीक्षात्मक असे लेखनही प्रकाशित केले. 'मौज' साप्ताहिक आणि दिवाळी अंक यांचेही साहित्य विचाराच्या घडणीत महत्वाचे स्थान आहे. मौज ने कथा, कादंबरी आणि साहित्य विचार या तीनही प्रकारांतले मौलिक लेखन दिले.

अशा प्रकारे पहिल्या प्रकरणांमध्ये 'मराठी नियतकालिकांच्या' समीक्षा विषयक कार्याचा आढावा घेतला आहे. या प्रकरणामुळे 'समाज प्रबोधन पत्रिके'च्या आधीच्या नियतकालिकांनी मराठी समीक्षेत मोलाची भर घातली, त्याची माहिती आपणास मिळते.

'समाज प्रबोधन पत्रिके'तील ग्रंथपरिक्षणांकडे वळण्यापूर्वी 'समाज प्रबोधन पत्रिके'ची भूमिका, स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न दुसऱ्या प्रकरणात केला आहे.

विवेकनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व लोकशाही ही मूल्यनिष्ठा ठेवून १९५९ रोजी 'समाज प्रबोधन संस्थेची' स्थापना झाली. आपल्या समाजापुढे असणाऱ्या समस्यांचा खोल असा अभ्यास करुन वैचारिक जागृतीचे काम करण्याच्या हेतूने 'समाज प्रबोधन पत्रिका' हे द्वैमासिक या संस्थेने सुरु केले. डिसेंबर १९६२ मध्ये 'पत्रिके'चा पहिला अंक प्रकाशित झाला. पण १९६५ पासून अंकाच्या नियमित प्रकाशनास सुरुवात आणि तेव्हापासून समाजातील ज्वलंत प्रचलित समस्यांवर जागरुक मंडळीमध्ये सातत्याने चर्चा घडवून आणून अशा मंडळींची एक बैठक निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य 'पत्रिका ' करत असल्याचे दिसते.

या प्रकरणामध्ये 'पत्रिके'चे स्वरुप, संपादकांची भूमिका, 'पत्रिके'ची विशेष उल्लेखनीय कामगिरी, 'पत्रिके'ची पन्नास वर्षे याच्या आधारे 'पत्रिके'ची कामगिरी स्पष्ट केली आहे.

'समाज प्रबोधन पत्रिके'चे संपादक वसंत पळशीकर, भा. शं. भणगे, स. ह. देशपांडे, महेश गावसकर, राजेंद्र व्हारा, सुहास पळशीकर, किशोर बेडकिहाळ, अशोक चौसालकर यांच्या वेगवेगळ्या भूमिकांचा ठसा 'पत्रिके'मध्ये उमटल्याचे दिसते. श्री. वसंत पळशीकर हे संपादक असताना 'समाज प्रबोधन पत्रिके'ला चांगला दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त झाली. पळशीकरांनी आपल्या सकस गद्याच्या माध्यमातून अनेक विषयांना हात घातला. अनेक पुस्तक परीक्षणे लिहिली, वाङ्मयाच्या विविध प्रकारांद्वारे जनसामान्यात जागृती करण्याचा निर्धार 'पत्रिकेच्या' मार्फत वसंत पळशीकरांनी साध्य करण्याचा आटाकोट प्रयत्न केला आहे. 'पत्रिके'ने सुरुवातीपासून आजपर्यंत पहिल्या अंकात मांडलेल्या भूमिकेप्रमाणेच वाटचाल केली असल्याचे दिसते.

'पत्रिके'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखामध्ये वैचारिक साहित्याबरोबर राजकारण, ललित साहित्य, अर्थकारण, इतिहास अशा विविध विषयांना स्थान देऊन त्यावर चर्चा घडवुन आणण्याचे काम 'पत्रिकेने' केले आहे. तसेच 'पत्रिके' ने वेगवेगळ्या विषयांवर विशेषांक काढून वाचकांना माहिती पुरवली विचार प्रवृत्त केले. सोवियत क्रांतीच्या निमित्ताने काढलेला विशेषांक 'काश्मिर विषयक विशेषांक', डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जनता पक्षाच्या विजयानंतर काढलेला विशेषांक रवींद्रनाथ टागोर विशेषांक, अशा विविध विशेष प्रसंगाचे औचित्त साधून विशेषांकांचे प्रकाशन 'समाज प्रबोधन पत्रिके' ने केले. चर्चा, परिसंवाद, टीका–प्रतिटिका, वाद–संवाद,

परीक्षणे अशा समीक्षात्मक अंगाला जुन्या–नव्या साहित्यकांच्या सहित्यात ‘पत्रिके’ ने प्रसिद्धी दिली. नवीन लेखकांना अनुकूल वातावरण निर्माण केले.

तिसऱ्या प्रकरणामध्ये ‘समाज प्रबोधन पत्रिके’ तील वैचारिक ग्रंथ परीक्षणे–स्वरूप’ त्याचा विचार केलेला आहे. या प्रकरणात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक असे वर्गीकरण करताना आशयनिष्ठ या तत्वाचा अवलंब केला आहे. समग्र वैचारिक साहित्याला सामाजिक परिपेक्ष्य असतो. ‘पत्रिके’तील वैचारिक ग्रंथपरीक्षणातून समाजव्यवस्थेतील जे विविध प्रश्न आहेत त्या संदर्भातील विचार मांडले आहे. तर ‘धर्मचिंतन’ हे ‘पत्रिके’तील वैचारिक साहित्याचा गाभा आहे. धर्म हा मानवी जीवनाला पोषकच असतो. त्यामुळे धर्मचिंतन हे वैचारिक साहित्याचे महत्वाचे आशयतत्त्व ठरते. वैचारिक साहित्यात शिक्षणविषयक विचारांना महत्वाचे स्थान आहे. शैक्षाणिक संदर्भ, वाढती बेरोजगारी, शिक्षण क्षेत्रातील बेबंदशाही, ढासळली मूलव्यवस्था इ. गंभीर प्रश्नांचा आढावा ‘पत्रिके’तील वैचारिक साहित्यातील शिक्षणाविषयक विचारात घेताना गेला. उदा. द.ना.धनागरे यांच्या ‘उच्च शिक्षण–ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे’ या पुस्तकाचे र.घ.वराडकर यांनी केलेले परीक्षण आजच्या शिक्षण क्षेत्रातील वास्तवावर प्रकाश टाकणारे आहे.

वैचारिक साहित्यात आर्थिक मांडले आहेत. मात्र त्यांना अर्थ शास्त्रातील गणित परिवेश नसुन मानवी जीवनातील आर्थिक व्यवस्थेचा सामाजिक परिप्रेक्ष्य आहे. ‘पत्रिके’तील वैचारिक परीक्षणात आर्थिकतेचा विचार समाजव्यवस्थेचा कणा म्हणूनच केला आहे. वैचारिक साहित्याची भूमिका आर्थिक विकास करण्याची आहे. त्याचबरोबर आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा आग्रह धरते.

राजकीय विचार हा वैचारिक साहित्यातील महत्वाचा घटक आहे. राजकारण व समाजकारण यांचा संबंध परस्परपूरक आणि परस्परावलंबी असा दुहेरी असतो. ‘पत्रिके’तील सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या वैचारिक साहित्यात राजकीय विचार मोठ्या प्रमाणात व्यक्त झालेले दिसतात. कॉ. शरद पाटील यांनी डॉ. गेल ऑम्बेट यांच्या ब्राह्मणोत्तर चळवळीवरती पुस्तकाचे विस्तृत परीक्षण करून कम्युनिस्ट पक्षांच्या जातीविषयक भूमिकेवर कडक टीका केली.

'संस्कृती' ही मानवी समाजव्यवस्थेतील महत्वाची संस्था आहे. संस्कृतीच्या जडणघडणीत अभौतिक (तत्वज्ञान, धर्म, कला, वाङ्मय इ.) संस्कृतीचा वाटा मोठा असतो. साहित्याचा वाटाही त्यात महत्वाचा आहे. वैचारिक साहित्य समाज सापेक्ष असल्याने संस्कृती विचार यात महत्वाचे असतात. गो.के.भट यांचा 'इरावतीबाईंचे संस्कृतिविषयकलेखन, पां.वा.गाडगीळ यांचा 'श्री.ल.केतकर यांचे वाङ्मयविषयक ले' ही परीक्षणे महत्वाची आहेत. विचार ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. त्यामुळे वैचारिक साहित्यात विचार अभिव्यक्त होताना तो तुमच्या बुद्धिला आवाहन करतो. बुद्धिला आवाहन करेल असेच 'पत्रिके'तील वैचारिक ग्रंथपरीक्षणांचे स्वरूप आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये 'पत्रिके'तील वाङ्मय प्रकारनिहाय ग्रंथपरीक्षणचे स्वरूप याचा विचार केलेला आहे.

'कविता संग्रह' या परीक्षणामध्ये गो.ग.कुलकर्णी, वसंत जाधव, भा.ल.भोळे, मालती किर्लोस्कर, ज्योती लांजेकर, दि.के.बेडेकर, देवानंद सोनटक्के, प्रभाकर नेरूरकर, मुकूल बोरसे, सरिता पदकी यांची परीक्षणे रसिक वाचकांसाठी दिशादर्शक आहे. त्यांच्या परीक्षणातुन कवींची काव्यलेखनामातील भूमिका आणि त्यांच्या कवितांचे स्वरूप वाचकांना कळण्यास मदत होते.

'पत्रिके'मध्ये जुन्या–नव्या कवींच्या कविता संग्रहांवरती परीक्षणे झाली आहेत. 'चैत्रपुनव (बोरकर), वही (महानोर), 'तुलसीदल' 'अंजली ठकार' (ग्लोरिया) (धुरी) 'जाहीरनामा' (नारायण सुर्वे) 'वृंदावन' (शिंदे), 'उत्थान गुंफा' (यशवंत मनोहर) इत्यादी जुन्या–नव्या कविंच्या कविता संग्रहांना प्रसिद्धी देण्याचे काम 'पत्रिके'ने केले आहे. गेल्या सुमारे तीस–चाळीस वर्षातल्या मराठी कवितेत दृष्टिस पडणाऱ्या विविध प्रवृत्ती आणि रसिक–वाचक ह्यांची बदलत गेलेली काव्याभिरूची आपणास कळते. कविता संग्रहांच्या परीक्षणामध्ये सामाजिक विषमता, निसर्गानुभव, जीवन चिंतन, प्रतिकात्मकता यावर प्रकाश टाकल्याचे दिसते.

कथा संग्रहांच्या परीक्षणामध्ये चंद्रकांत बांदिवडेकर, ल.ग.जोग, नागनाथ कोत्तापल्ले, सुभाष भेन्डे यांचे योगदान महत्वाचे आहे. कथा संग्रहाच्या परीक्षणात स्त्री समीक्षकांनी केलेल्या समीक्षेने वाचकांच्या अभिरूचीस समृद्ध केल्याचे दिसते. मोहिनी वर्दे, मंगल दाभाडे, शकुंतला

आठवले, प्रतिभा पोरे, शकुंतला जोग यांनी केलेली परीक्षणे उत्कृष्ट झाली आहेत. लेखकाच्या अनुभव घेण्याच्या आणि व्यक्त करण्याच्या या पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. कथामधून येणारे नियतीचे पाशवी रूप यावरही परीक्षणात प्रकाश टाकल्याचे दिसते. 'काजलमाया' वरील परीक्षणात चंद्रकांत बांदिवडेकर यांनी आशयाची वैविध्य पूर्णता, भौतिकता व भाषा यांचे एकरूपत्व यावर लक्ष केंद्रित केलेले दिसते.

'पत्रिके'मध्ये कांदबरी या वाङ्मय प्रकारावर सर्वात जास्त परीक्षणे झाली आहेत ही परीक्षणे कृष्णाबाई मोटे, चंद्रकांत बांदिवडेकर, श्री. ज. जोशी, मीनाक्षी रायकर, प्रमोद मुनघाटे, वसंत पळशीकर, इरावती कुलकर्णी, शकुंतला जोग, म.गं.नातू, सुधीर बेडेकर, उत्तम क्षीरसागर, गौतम सात्विक, सुभाष भेन्डे, सीताराम रायकर, मंगेश पदकी, सदाशिव कोडीलिकर, भा.ल.भोळे, सुधीर जोगळेकर, देवीदास मुळे इत्यादी समीक्षकांनी समीक्षा केली.

'कादंबरी' या वाङ्मयामधील 'ग्रामीण' आदिवासी प्रवाहातील कादंबऱ्यावरती परीक्षणे झाली आहेत. त्यातून ग्रामीण कादंबऱ्यातील निसर्ग आणि बदलत्या मानवी संघर्षाचे दर्शन घडविले आहे. तसेच आदिवासींचे निसर्ग निष्ट जीवन आणि लैंगिक व नैतिक स्वातंत्र्य नागर संस्कृतीशी त्यांचा संघर्ष यावर प्रकाश टाकल्याचे दिसते 'पत्रिके'चे माजी संपादक वसंत पळशीकर यांनी एकाच वेळी पाच कांदबऱ्यांचे अतिशय परखड शब्दांत परीक्षण केले आहे. चरित्रात्मक कादंबऱ्यांची दखल 'पत्रिके'ने घेऊन संत ज्ञानेश्वर, मं. गांधी, र.धो.कर्वे यांच्या जीवन कार्याचा परीचय वाचकांना करून दिला.

आत्मचरित्राच्या परीक्षणांमध्ये वसंत पळशीकर, प्र.भा.तुळपुळे, सुमित्रा भावे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, वसंत चिंचाळकर, शरद कुलकर्णी, दि.के.बेडेकर, विभा सारंग, पां.वा.गाडगीळ, राजा मंगळवेढेकर, ग.वि.अकोलकर, राजेंद्र मुढे यांनी मोलाची भर घातली आहे. 'पत्रिके'मध्ये आत्मचरित्रावरती जी परीक्षणे झाली आहेत त्यामध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या जास्त आहे. या आत्मचरित्रावरील परीक्षणातून त्या काळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवन यावर प्रकाश टाकल्याचे दिसते. 'हे मीच सांगितले पाहिजे'(वसंत पळशीकर) 'एका रणरागिणीची हकीकत' (वसंत चिंचाळकर) 'कोसबाडच्या टेकडीवरून' (शरद कुलकर्णी),

'सांगाचे ऐका' (प्रभा तुळपुले, सुमित्रा भावे) इत्यादी आत्मचरित्रावरील परीक्षणांमूळे वाचकांना वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य केलेल्या व्यक्तींच्या कार्याची ओळख होते. प्रेरणादायी असणारी ही आत्मचरित्रे वाचकांना दिशादर्शक ठरणारी आहेत. वाचकांना कार्यप्रवण करणारी आहेत.

'पत्रिके'ने 'नाटक' या वाङ्मय प्रकाराची दखल घेतल्याचे दिसते त्या त्या काळातील महत्वाच्या नाटकांची नोंद 'पत्रिके'ने घेतल्याचे दिसते. प्र.ना.परांजपे, मंगेश पत्की, ह.म.धोंडेके, श्रीपाद जोशी यांनी नाटकांची केलेली परीक्षणे मार्मिक आहेत. 'नटसम्राट', 'शांतता'! कोर्ट चालू आहे. 'उज्वळल्या दिशा' या नाटकांवरील परीक्षणांनी वाचकांना नाटकाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली आहे.

'पूर्वाचलाची मुशाफरी' 'अठरालक्ष पावलं' 'लागेबांधे', 'पूर्णिमा' या प्रवास वर्णनावरील परीक्षणे त्या त्या प्रदेशातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक माहिती मिळते वसंत पळशीकर, कुसुम पटवर्धन, संध्या कागलकर, भा.रा.बापट, यांनी केलेली परीक्षणे मार्मिक असून वाचकांच्या ज्ञानात भर घालणारी आहेत.

पाचव्या प्रकरणांमध्ये 'पत्रिके'तील चरित्रग्रंथावरील परीक्षणाच्या स्वरूपाचा विचार केला आहे. मराठी वाङ्मयक्षेत्राच्या चरित्रप्रांताचे मर्यादित पण वाचकांना प्रेरणादायी असणाऱ्या चरित्रग्रंथाची 'पत्रिके'ने दखल घेतल्याचे दिसते. चरित्र नायकांचे केवळ गुणगान केले नसून त्यांच्या गुणदोषासह त्यांचे समतोल चित्रण कसे झाले आहे यावर परीक्षणात प्रकाश टाकल्याचे दिसते.

चरित्र ग्रंथाच्या परीक्षणामध्ये एस.एस.भोसले, म.श्री.माटे, अ.के.भागवत, व.भ.कर्णिक, वसंत पळशीकर, ग.प्र.प्रधान, ना.ग.जोशी, पां.वा.गाडगीळ, अ.ना.पेंडणेकर, स.दा.पुणेकर, प्रभा आपटे, इंदिराबाई सोवनी, य.दि.फडके इत्यादी समीक्षकांनी मोलाची भर घातली आहे.

संत गाडगेमहाराज, महात्मा गांधी, साने गुरूजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी यांच्या प्रेरणादायी कार्य–कृर्तत्वाची ओळख परीक्षणातून वाचकांना करून दिल्याचे दिसते. उद्योग क्षेत्रामध्ये आपल्या कृर्तत्वाचा ठसा उमटवणाऱ्या शंतनुराव किर्लोस्करांच्या चरित्र ग्रंथावरील परीक्षण वाचकांना प्रेरणादायी आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या कर्तृत्वावर पां.वा.गाडगीळ यांनी प्रकाश टाकला आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा स्वतंत्रपणे विचार केला आहे पण सरोजिनी वैद्य यांनी लिहिलेल्या 'श्रीमती काशीबाई कानिटकर' यांच्या चरित्र ग्रंथाचे इंदिराबाई सोवनी यांनी केलेले परीक्षण चरित्र ग्रंथाला न्याय देणारे नाही. काशीबाईच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकला असता तर वाचकांना त्यांच्या कार्याची माहिती कळली असती. ज्या काळामध्ये स्त्रियांना घराबाहेर पडण्याची मूभा नव्हती त्या काळात इंग्रजीवर प्रभुत्व मिळवणाऱ्या आणि समाज कार्यात पतीपेक्षा अग्रेसर असणाऱ्या काशीबाई कानिटकर वाचकांना कळल्या असल्या.

'पत्रिके'ने खऱ्या अर्थाने उपेक्षित राहिले त्यांचे कर्तृत्व समाजासमोर मांडण्याचे महत्वपूर्ण कार्य केल्याचे दिसते. र.धो.कर्वे, देशभक्त तात्या करमळकर, सामंत गुरूजी यांच्या चरित्र ग्रंथाचे परीक्षण करून त्यांच्या कार्याची माहिती वाचकांना करून दिली. अंधारातले उजेडात आणले. भारताला दुसरी मातृभूमी मानणाऱ्या सी.एफ.ॲन्ड्रयूज यांच्या व्यक्तिमत्वाचे कंगोरे, भारतासाठी अतोनात केलेले कष्ट याची माहिती 'पत्रिके'ने वाचकांना करून दिली. तसेच ब्रिटिश दृष्टिकोणातुन भारताच्या इतिहास लिहिणाऱ्या ग्रॅट–डफ च्या चरित्रग्रंथाचे परीक्षण वसंत पळशीकर यांनी केले आहे जिज्ञासू वाचकांना उपयोगी असे हे परीक्षण आहे.

क्रांतिकार्यामध्ये अग्रेसर असणाऱ्या क्रांतिवीर सावरकर, एम.एन.रॉय यांच्या चरित्र ग्रंथावरील परीक्षणामध्ये वसंत पळशीकर आणि पां.वा.गाडगीळ यांनी चरित्र ग्रंथाचे मर्म टिपलेले आहे. ऐतिहासिक चरित्र ग्रंथावरील परीक्षणामध्ये 'औरंगजेब, 'टिपू सुलतान' यांच्या व्यक्तिमत्वाच्या वेगवेगळ्या पैलुवर प्रकाश टाकला आहे. म.नी. माटे यांनी औरंगजेबाच्या व्यक्तिमत्वावर वेगळ्या भूमिकेतुन प्रकाश टाकला आहे. त्यामुळे वाचक औरंगजेबाचा वेगळ्या दृष्टिकोणातुन विचार करण्यास प्रवृत्त होईल.

सहाव्या प्रकरणात 'समीक्षाप्रकार निहाय समीक्षा विचार' येतो सामाजिक विचार मांडला या लेखामधून कलाकृतीचे सामाजिक आकलन, धर्म आणि समाजपरिवर्तन यातील परस्पर संबंधावर प्रकाश टाकला आहे. तत्कालिन साहित्याच्या आधारे सामाजिक बदलामधून जाणवणारी स्थित्यंतरे, समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून लिहिलेल्या लेखांमधून समाज, संस्कृती, वाङ्मयातील

बदल, स्त्रियांचे समाजातील स्थान, जातियता यांचा आढावा घेतलेला दिसतो.

साहित्यकृतीवर विचारक्षेत्राचा, तत्त्वप्रणालीचा परिणाम होत असतो. गांधीवादाचा परिणाम साहित्यनिर्मितीवर झालेला दिसतो. गांधीवादाच्या प्रभावाने निर्माण झालेल्या कलाकृतीतून पारंपरिक अध्यात्म, मूल्यात्मक जीवनदृष्टी प्रगल्भ संवेदनशील जीवन व्यवहाराचा ठसा उमटलेला दिसतो. मानसशास्त्रीय संकल्पनांचा ठसा मराठी साहित्यात उमटू लागलेला असला तरी संपूर्ण मानसशास्त्रीय दृष्टिकोण ठेवून लेखन मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात होताना दिसत नाही.

लेखकाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण, कुटुंबाची पार्श्वभूमी, लेखकाचे जीवनानुभव, लेखकाचे साहित्यिक योगदान, सामाजिक कार्यातील त्याचे योगदान, राजकीय क्षेत्रामध्ये अतुलनीय कामगिरी केलेल्या व्यक्तिच्या जीवनाचे समग्र दर्शन या वैशिष्ट्यांचा चरित्रात्मक समीक्षेत्रात समावेश होतो. काव्यातून प्रकट होणारी स्त्री प्रतिमा, गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यातुन प्रकट होणारी स्त्रीप्रतिमा, आणि इरावती कर्वे यांचे स्त्रीविषयक विचार, सामाजिक जाणीव या परिघातील स्त्रीसुधारणा यांचे स्त्रीवादाव्या दृष्टीने विवेचन स्त्रीवादी समीक्षेत केले आहे.

समाज सुधारकांच्या स्त्रीविषयक, अस्पृश्यता निवारणा विषयक विचारांचे मूल्यमापन, रसाची चर्चा याचा तौलनिक समीक्षेत विचार मांडला आहे. तसेच साहित्य कृतीतील रूपाचे ज्ञान रूपवादी समीक्षेत दिसते. कलाकृतीतील सौदर्यस्थळांचा वेध मर्मज्ञ दृष्टिने,स्वत्व शोधन, कलाकृतीच्या निर्मितीविषयी माहिती आस्वादंक समीक्षेत येते. तात्विक विचारामध्ये मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती आणि मराठी वाचक यांच्या संदर्भात टीका विचार आहेत.

**वरील सर्व विवेचनानंतर आपणास खालील निरीक्षणे नोंदवता येतात.**

- नियतकालिके हे त्या त्या काळातील विचार प्रसाराचे व प्रबोधनाचे साधन मानल्याचे दिसते.
- वाचकांची साहित्य विषयीची आस्था वाढविणे, लेखकांना प्रेरणा देणे, त्याचे साहित्यविषयक अनुभव, त्यांच्या साहित्यकृतीचे मोल महत्व स्पष्ट करणे, वाचकांची साहित्यविषयक अभिरूची संवर्धीत करणे.
- काव्य परीक्षणे समाज प्रबोधन पत्रिकेतील रसिकांची काव्यदृष्टि अधिक सूक्ष्म व

डोळस करणारी आहेत.

- कला आणि जीवन यांच्यातील नाते किती प्रकारे आणि किती विविध पातळ्यांवर असू शकते. याविषयी विकसित होणारी जाणीव 'पत्रिके'तील काव्य परीक्षणात दिसते.
- काळाच्या बहुपदरी/बहुस्तरीय प्रकृतीचे भान काव्य शिक्षणात समीक्षकाने आणुन दिल्याचे दिसते.
- दलित काव्य संवेदन हे एकाच वेळी विध्वसंक व विधायक जाणिवांचा ताण कसा अनुभवत आहे हे दलित काव्य समीक्षेतुन स्पष्ट होते. चांगल्या समीक्षेचे वैशिष्टय असे की, ती केवळ संवाद विरोध लयाची नाती/अनेक पदरीपणा सांगुन थांबत नाही तर त्याची अटीपूर्णता, कथात्म कार्य ही स्पष्ट करते उदा. नागनाथ कोतापान्लेंनी वसंत चिंचाळकरांच्या कथामध्ये असलेल्या पात्र–पात्रांमध्ये विरोधामुळे कथेला गती मिळते, वातावरण, स्थळकाव्य बोलके होतात, तपशिलांना अर्थ प्राप्त होतो, हे मार्मिकतेने स्पष्ट करतात.
- समाज प्रबोधन पत्रिकेतील कथा परीक्षणांतून कथातील पात्रे, त्यांच्या कृतिउक्ती व नातेसंबंध तसेच त्यांच्या चित्रणाची विविधता यांची चिकित्सा झाल्याचे दिसते.
  परीक्षणांतुन कलात्मकता पारखण्याची जाण परीक्षणाकर्त्यामध्ये असल्याचे ही जाण मानसशास्त्रीय ज्ञानाच्या साहाच्याने पात्रांच्या चित्रणाचे मूल्यमापन करणे या अंगाने प्रकट झालेले दिसते.
- 'कथा' परीक्षणामध्ये नवीन कथालेखकाचे स्वागत कौतुक करणे, त्यांच्या कथांचा आपल्या मनावर होणारा भावनात्मक परिणाम नोंदवणे, गुण–दोषांचे दिग्दर्शन करणे, सूक्ष्मनिरीक्षण, मोजके प्रसंग, स्वभाव चित्रणातील जिवंतपणा, मानवी प्रवृत्तीचे दर्शन, वातावरण निर्मिती, रसोत्कर्ष, अलंकाराचा मर्यादित वापर, भाषेचा साधेपणा, रसरशीतपणा, कलात्मकतेला बाधा न आणता बोध देणे इत्यादी मापदंडाच्या आश्रयाने ही कथा परीक्षणे साकार झालेला दिसतात.

- कथेतील विविध तंत्रे, आशय, उपमा, रूपकांच अप्रय्यास कथा परीक्षणांतून मांडलेला दिसतो.
- आत्मचरित्राची 'पत्रिके'तील शिक्षणे वाचताना असे जाणवते कि त्यांच्या त्या आत्मचरित्र नायकाने भोगलेले दु:ख, केलेला संघर्ष सारांश रूपाने सांगितल्याचे दिसते.
- स्त्रियांच्या आत्मचरित्रांवरची समीक्षा वाचताना समीक्षकांची त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकल्याचे दिसते. उदा. 'एका रणरागिणीची हकीकत' 'कोसबाडच्या टेकडीवरून' 'जेव्हा माणूस जागा होतो' इत्यादी.
- 'नाटक' या वाङ्मय प्रकारावरील परीक्षणामध्ये कथानक, पात्रे, संवाद, भाषा आणि प्रेक्षकावरील प्रभाव याचा विचार केलेला आढळतो.
- 'पत्रिके'ने अनेक नाटकांवर परीक्षणे लिहून नाट्य रसिकांची नाटकाविषयीची अभिरूची जोपासली. प्र.ना.परांजपे, मंगेश पत्की, यांच्या प्रदीर्घ लेखनातुन नाट्यतत्त्वांची मीमांसा आढळते. त्यांनी नाट्यतत्त्वांच्या सूक्ष्मतेच्या शोध घेतला. नाट्यानुभव, नाटयाविष्कार याविषयी आपले विचार 'पत्रिके'मधुन मांडले.
- 'चरित्र'ग्रंथावरील परीक्षणांमधुन चरित्र नायकाच्या व्यक्तिमत्वाबरोबरच कार्य–कर्तृत्त्वावरही प्रकाश टाकल्याचे दिसते.
- चरित्र ग्रंथावरील परीक्षणामध्ये खऱ्या अर्थाने उपेक्षित राहिलेल्या व्यक्तिंच्या चरित्रग्रंथाची दखल घेऊन त्यांना उजेडात आणण्याचे कार्य या 'पत्रिके'तील परीक्षणांनी केल्याचे दिसते.
- चरित्र, आत्म–चरित्रावरील परीक्षणावरील लेखात व्यक्तिला केंद्रबिंदू ठेवुन समीक्षा केल्याचे दिसते.
- 'पत्रिके' मधून आलेल्या कादंबरी परीक्षणातून कादंबरीचे स्वरूप, आशय, रचना, संविधान या गोष्टींची चिकित्सा केली आहे.

- आत्म–चरित्राच्या वेगवेगळ्या वाटा दाखविण्याचा किंवा दिशा शोधण्याचा कुणी जाणकार समीक्षाकाने मन:पूर्वक प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. आत्मचरित्रातील केवळ आशयाची मीमांसा करूनहे संशोधन पूर्ण केलेले दिसते. त्यांच्या वेगळ्या वाङ्मयीन रूपाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसते.
- 'पत्रिके' ने प्रसिद्ध व्यक्तींची चरित्र विषयक लेखांची दखल घेतलेली आढळते. समाज सुधारणा, इतिहास, राजकारणातील मान्यवर, व्यक्तींचे जीवन व कार्य व कर्तृत्त्वाची माहिती समाजासमोर चरित्रलेखनाच्या स्वरूपात मांडली प्रस्तुत परीक्षणांच्या माध्यमातुन साहित्याच्या विविध वाङ्मय प्रकाशंना 'पत्रिके' मध्ये स्थान मिळाले. तसेच पुस्तक परीक्षणातुन साहित्याचे विविध वाङ्मयीन प्रश्न हाताळले. वाङ्मयाच्या विविध प्रकारांद्वारे जनसामान्यान जागृती करण्याचे कार्य 'पत्रिके' ने केले आहे.
- कादंबरी हा वाङ्मय प्रकार विस्तृत काल अवकाश व्यामिश्र आशय सूत्र व एखाद्या पोटसमूह संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर घडणारा वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराचे विस्तृत रूप व विस्तृत रचनाही आढळते. साहिजिकच तिच्या रूपरचनेप्रमाणे तिची विस्तृत परीक्षणे 'पत्रिके'तील मध्ये आलेली आहेत.
- परीक्षणे मराठीतील समीक्षकांना सुद्धा समीक्षेविषयी काही नवे मानदंड सूचविणारे आहेत. मराठी समीक्षा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टिने ही परीक्षणे उपयुक्त ठरणारी आहेत.
- समीक्षा व्यवहाराची व्याप्ती आणि मर्यादा यांचे मान निर्माण करण्यास ही परीक्षणे साह्यभूत होणारी आहेत.
- संशोधकांबरोबरच मराठी रसिक–अभ्यासकांनासुद्धा ही समीक्षा समीक्षाग्रंथाचे महत्व अधिक तीव्रतेने जाणवून देण्यास उपयोगी पडतात.
- मूळ साहित्यकृती व त्याआधारे झालेली समीक्षा याबद्दल वाचकांची जागृती करणे हा उपदेशही येथे बऱ्याच अंशी सफल झालेला दिसतो.

- समीक्षेच्या वेगवेगळ्या पद्धतीची ओळख होऊन साहित्यविषयक नव्या जाणीवा, नवनवे दृष्टिकोन निर्माण होण्यास ही परीक्षणे चालना देतात.
- मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती यांच्या विकासाबरोबरच विश्व साहित्य संकल्पनेविषयी जाणीव करून देऊन ज्ञानांच्या विचारांच्या कक्षा वाढविण्यास ही परीक्षणे सातत्याने चालना देणारी आहेत.

*** संशोधनाची नवी दिशा :–**

- 'पत्रिके' तील ग्रंथपरीक्षणांचा आशयनिष्ठ अभ्यास करता येईल.
- समीक्षकांच्या समीक्षाविषयक दृष्टिकोणांचा अभ्यास पुढील संशोधकांना करता येईल.
- 'पत्रिके'तील इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या विषयासंबंधी असणाऱ्या लेखांचा अभ्यास पुढील संशोधकांना करता येईल.

'पत्रिके'चा अभ्यास करताना संशोधनासाठी ह्या नव्या दिशा जाणवतात. त्यावर स्वतंत्ररित्या संशोधन पुढील काळात होईल, अशी अशा आहे.

# संदर्भग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची


१) डॉ. पाटील बी.एन., **'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास'**, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती–२०१२.

२) सुर्वे भा.ग., 'साहित्य' मराठी विश्वकोश खंड १२ (संपा) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मुंबई,१९८५.

३) (संपा)– कोल्हटकर संजय, **प्रसाद कुलकर्णी**, **'महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमे'**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्र.आ. २००९.

४) जोग रामचंद्र श्रीपाद, **'मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन'**, व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती–जाने–१९७६.

५) डॉ. मनोहर यशवंत **'समाज आणि साहित्य समीक्षा',** सुगावा प्रकाशन, पुणे–३०, प्रथमावृत्ती– ६ डिसेंबर १९९२.

६) सातोस्कर बा.द., **'मराठी मासिकांचे पहिले शतक'**, पुणे, १९८६.

७) चुनेकर सु.रा.,**'मराठी वाङ्मयाचा इतिहास'**, खंड पाचवा भाग दुसरा, (संपा.) रा.भी.जोग, पुणे, १९७३.

८) (संपा) डॉ. देशमुख उषा मा.**'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास'**, खंड तिसरा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ.१९९५.

९) कुलकर्णी व.दि. **'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास**', खंड१, १८३२–१८८२, पुणे १९८७.

१०) व.दि.कुलकर्णी, **तत्रैव.**

११) डॉ.मनोहर यशवंत, **उनि.**

१२) सातोस्कर बा.द., **उनि.**

१३) कुलकर्णी गो.म., **'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी'**, पुणे, १९९४.

१४) कोपरपंत सोमनाथ, **'मराठी विश्वचरित्रकोश२'**, (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००३.

१५) बापडेकर ऋता मनोहर, **'महाराष्ट्रातील प्रमुख संपादक'**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ. १८ नोव्हेंबर २००९.

१६) सातोस्कर बा.द., **उनि.**

१७) सातोस्कर बा.द., **तत्रैव.**

१८) (संपा.) कामत श्रीराम, **'मराठी विश्वचरित्र कोश१'**, गोवा, २००३.

१९) सातोस्कर बा.द., **उनि.**

२०) देशमुख उषा, **'विविधज्ञानविस्तार–साहित्य आणि साहित्यविचार'**, पुणे, १९९५.

२१) आंबेकर वि.वा.,**'मराठी वाङ्मयाचा इतिहास'** खंड पाचा, भाग पहिला, (संपा.) रा.श्री.जोग, म.सा.प.पुणे, १९७३.

२२) सातोस्कर बा.द., **उनि.**

२३) सातोस्कर बा.द., **तत्रैव.**

२४) चुनेकर सु.रा., **उनि,** पृ.३४८.

२५) पांगारकर ल.रा., **'निबंधमालेचे स्वरूप कार्य', 'मुमुक्षु'**, पुणे, आवृत्ती जानेवारी, १९९२.

२६) कांबळे आर.एच.,**'मराठी विश्वचरित्रकोश५'** (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००८.

२७) शकुंतला आठवले, 'काव्यरत्नावली खानदेशचे एक लेणे', पुणे, १९८६.

२८) (संपा.) कुलकर्णी गो.म., व.दि.कुलकर्णी, **'मराठी वाङ्मयाचा इतिहास'** खंड सहावा–भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे, प्र.आ.१९९१.

२९) ठाकूर अ.ना., **'मराठी विश्वचरित्रकोश ४'**, (संपा.) श्रीराम कामत, गोवा, २००४.

३०) (संपा) डॉ. देशमुख उषा मा., **उनि.**

३१) (संपा) डॉ. देशमुख उषा मा., **तत्रैव.**

३२) कोमरपंत सोमनाथ, **उनि.**

३३) मंत्री रा.वि., **'प्रतिभेचा वाङ्मयविहार'** महाराष्ट्र साहित्य पत्रिका, व. ५०, अं.२०२, जुलै–सप्टेंबर १९७७.

३४) (संपा.) कुलकर्णी गो.म., **'मराठी वाङ्मयाचा इतिहास'**, खंड सहावा,भाग–दुसरा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे–३०.

३५) रसाळ सुधीर **'साहित्य:अध्यापन आणि प्रकार'**, मुंबई, १९८७.

३६) रसाळ सुधीर, तत्रैव.

३७) महाम्बरे गंगाधर, **'मराठी विश्वचरित्रकोश १'** गोवा,२०००.

३८) रसाळ सुधीर, उनि.

३९) जोशी वसंत स., **'महाभारताची तपस्या'**, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २००–२०१ ते २०३, जानेवारी ते जून १९७७.

४०) जोशी वसंत स., **तत्रैव.**

४१) गावडे प्र.ल., **'मुद्रा' मधील काव्यविचार**, महाराष्ट्र साहित्य पत्रिका व ५०, अंक–२०२, जुलै–सप्टेंबर, १९७७.

४२) किरवले कृष्णा, **''अस्मितादर्शचे ऐतिहासिक कार्य''**, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, आक्टोबर–डिसेंबर १९८७.

४३) संपा. पळशीकर वसंत, **निवेदन**, अंक–१८, वर्ष–३,१९६७.

४४) दाभोळकर देवदत्त, **८,९, जोडअंक**, सप्टें.डिसेंबर १९६५, वर्ष २ रे.

४५) गोरे दत्तू, **अंक–५०**, मार्च–एप्रिल १९७३.

४६) पळशीकर वसंत, **सत्याग्रही सॉक्रिटिसचे वीरमरण**, अक्षर मुद्रा, पुणे१९९६.

४७) संपा. बेडकिहाळ किशोर, **निवडक वसंत पळशीकर, चौकटीबाहेरचे चिंतन, लोकवाङ्‌यसंग्रह**, पहिली आवृत्ती, जुलै–२००९.

४८) भोळे भास्कर लक्ष्मण, **वसंतराव**, मराठवाडा दिवाळी अंक.

४९) डॉ. देशपांडे स.ह., **भालचंद्र शंकर भणगे**, वर्ष–१७, अंक ८२, मार्च–एप्रिल१९८०.

५०) डॉ. देशपांडे स.ह, **संपादकीय नीतीविषयी**, वर्ष–१८, अंक–१००, जुलै–ऑगस्ट–१९८१.

५१) **तत्रैव**–पृ.१९६.

५२) कामतीकर प्रकाश, **मराठी लघू अनियतकालिके**, अंक–११३.

५३) **सोविएत रशिया विशेषांक**, वर्ष–५, अंक१९,२०, डिसें.जाने.फेब्रुवारी–मार्च–१९६९.

५४) **सोविएत रशिया विशेषांक** वर्ष–५, अंक १९,२०, १९६८.

५५) **भारतीय राजकारण विशेषांक**, वर्ष–३६, अंक १४३.

५६) पाटणकर वसंत:**'साहित्यशास्त्र'स्वरूप आणि समस्या**, पद्मगंधा प्रकाशन पुणे, प्र.आ.२००६.

५७) डॉ. शेरे निळकंड:**'डॉ. आंबेडकर आणि दलित वैचरिक साहित्य'**, सुविधा प्रकाशन, पुणे प्र.आ.२००५.

५८) जाधव रा.गा.:**साहित्य आणि सामाजिक संदर्भ,** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, तृतीय आवृत्ती–२००३.

५९) ENCARTA World English Dictionary Machmillan Publication, India, First Ed. 1999.

६०) मनोहर यशवंत:**'निबंधाकार डॉ. आंबडेकर'** संघामित्र बुद्धाहाऊस प्रकाशन, नागपूर, प्र.आ.१९८८.

६१) वाघमारे जनार्दन: **'समाजपरिवर्तनाच्या दिशा'**साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९५.

६२) जनार्दन वाघमारे:**तत्रैव.**

६३) आपटे वा.शि. **'दि स्टुडंट संस्कृत–इंग्लिश डिक्शनरी'** मोतीलाल बनारसीदार प्रकाशन, दिल्ली. दु.आ.१९७०.

६४) जाधव मनोहर (संपा.) **'साहित्य: शोध आणि संवाद'** सुविधा प्रकाशन, पुणे,प्र.आ.२०००.

६५) भागवत श्री.पु. व इतर (संपा.)**'साहित्य, अध्यापन आणि प्रकार'** मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९८९.

६६) जनार्दन वाघमारे:**उनि.**

६७) सारथी अरूण:**भारतीय लोकशाही: शोध आणि आव्हाने**, रविराज प्रकाशन, पुणे, २००८.

६८) डॉ. शानेदिवाण राजेखान: **भारतीय मुसलमान: वर्तमान आणि भविष्य.** निर्मिती विचारमंच कोल्हापूर, प्र.आ.२००८.

६९) बोस निर्मलकुमार:**द.स्ट्रक्चर ऑफ हिंदू सोसायटी**, ओरिएंट लॉगमन.

७०) प्रा. पानसे रमेश:**नयी तालीम, गांधीप्रणित शिक्षण विषयक प्रयोगाचा इतिहास**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ.२००७.

७१) नाईक जे.पी.:**'एज्युकेशन इन दि फोर्थ प्लॅन'** नचिकेत पब्लिकेशन्स, १९६८.

७२) जॉन व्ही.व्ही.:**फ्रीडम टू लर्न**, विकास, न्यू दिल्ली.

७३) गर्गे स.मा.(संपा.):**समाज विज्ञान कोश**, खंड–१, समाज विज्ञान कोश मंडळ, पुणे, प्र.आ. १९९६.

७४) नामजोशी एम.व्ही.: **मोनॉपलीज इन इंडिया**, ललवाणी पब्लिशिंग हाऊस, मुंबर्स,१९६६.

७५) शेनॉय बी.आर.: **इंडियन इकॉनॉमिक पॉलिसी**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.

७६) पटवर्धन ए.के.: **आर्थिक विकासाच्या सामजिक बाजू** अंक १०६, १०७, १०९, जुलै–डिसेंबर, समाज प्रबोधन पत्रिका, १९८२.

७७) लॅसी क्रेटन: **इंडियन इनसाईटस्: पब्लिक इश्युज इन प्रायव्हेट परस्पेक्टिव्हज ओरिएंट लॉगमन**, लि. नवी दिल्ली, १९७२.

७८) सोवनी नी.वि.:**'आपल्या आर्थिक विकासाची समस्या'** नागपूर विद्यापीठ, नागपूर.

७९) मोगले शांताराम:**राजकीय संकल्पना, सिद्धांत आणि संस्था**, विद्याभारतीय प्रकाशन, लातूर, प्र.आ.१९९७.

८०) झुल्फिकार आणि भुट्टो:द मिथ ऑफ इंडिपेडन्स ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६९.

८१) कुरूंदकर नरहर:**'जागर'**देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६९.

८२) फडके डॉ.भालचंद्र:**डॉ.आंबेडकर आणि दलित साहित्य**, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ.१९८९.

८३) प्रा. जाधव मनोहर (संपा.): **'साहित्य', शोध आणि संवाद'** सुविधा प्रकाशन, पुणे २०००.

८४) नातू म.गं. :**'वेदनेचा वेध'** अभिनव प्रकाशन, मुंबइ.

८५) डॉ. कोटबागी उषा: **इरावती कर्वे: व्यक्ति आणि वाङ्मय**, पद्मगंधा प्रकाशन, प्र.आ.२००५.

८६) कुलकर्णी व.दि.: **सरस्वतीच्या सान्निध्यात**, पद्मगंधा प्रकाशन, प्र.आ.२००७.

८७) संपा. डॉ. धोंगडे रमेश/डॉ. अश्विनी धोंगडे, **मराठी भाषा आणि शैली** मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि., तृ. आ. १९९३.

८८) सरदेसाई मनोहर हि.: **बा. भ. बोरकर व्यक्ती आणि वाङ्मय**, गोमंतम कराठी आकादमी, पणजी, प. आ. १९९२.

८९) डॉ. मोरे दादा, **साहित्यरुप** प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

९०) डॉ. हेगे नागनाथ, **साहित्य शोध आणि आस्वाद**, प्रतिता प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

९१) शिंदे फ. मु., **कालमान,** परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९८६.

९२) **तत्रैव.**

९३) जाधव रा. ग., **निलीपहाट**, श्रीविद्या प्रकाशन, चतुर्थावृत्ती– १९९५.

९४) कऱ्हाडे सदा,**दलित साहित्य चिकित्सा**, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

९५) डॉ.बिरादार वसंत, **आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास**, इ.स. १८१८ ते १९९९, , कैलास पब्लिकेशन्स.

९६) भडकमकर रोचना, **आर्वाचिन मराठी कवींच्या काव्याचा शोध**, प्रफुल्लता प्रकाशन, पुण.

९७) संपा– पवार गो. मा., म. द. हातकणंगलेकर, **निवडक मराठी समीक्षा**.

९८) संपा. खोले विलास, **विसाव्या शतकातील मराठी समीक्षा**, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००४.

९९) पाटील शरद, **अब्राम्हणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र**, सुगावा प्रकाशन, १९८८.

१००) संपा–बापट प्रभाकर, **गोडबोले नारायण मराठी कादंबरी तंत्र आणि विकास**, व्हीनस प्रकाशन, पुणे, तृ. आ. १९७३.

१०१) डॉ. कुलकर्णी द. भि.,**'तिसऱ्यांदा रणांगण'** विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९७६.

१०२) धोंड म. वा., **'जाळ्यांतील चंद्र'** राजहंस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९४.

१०३) डॉ. शहा विभा., **मराठी ऐतिहासिक कादंबरी:एक अभ्यास**, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र. आ. १९९९.

१०४) मंचकर र. बा., **मराठी विश्वकोश (खंड–१४)**, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबइ.

१०५) संपा–प्रा. त्रिभुवन शैलेंद्र, **साहित्य संवाद**, के. एस. पब्लिकेशन्स, पुणे, प्रकाशन वर्ष २००६.

१०६) सारडा शेखर, **'कोरकू पार्श्वभूमीवरील चूटपूट लावणारी हळूवार प्रेमकथा'**, ग्रंथ विशेष, मेहता ग्रंथ जगत, मेहता प. हाऊस, पुणे, १९९०.

१०७) कुलकर्णी वा. ल., **वाङ्मयातील वादस्थळे**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ. .

१०८) बांदिवडेकर चंद्रकांत, **मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आर. १९९६.

१०९) थोरात हरिश्चंद्र, **कथनात्मक साहित्य आणि समीक्षा**, शब्द पब्लिकेशन्स, प्र.आर. २०११.

११०) प्रा. चौघुले वि. शं., **आस्वाद आणि आलेख**, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

१११) डॉ. टापरे पंडित: **कांदबरी संवाद**,पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५.

११२) Encyclopedia Britanica, rol 2, London, 1764.

११३) यादव आनंद: **आत्मचरित्र मीमांसा**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९९८.

११४) डॉ. हेगे नागनाथ, **साहित्य शोध आणि आस्वाद**, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

११५) वाल्हेकर ज्ञानेश्वर, **आदिवासी साहित्य : एक अभ्यास**, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००९.

११६) डॉ. धोंगडे रमेश, **शैली वैज्ञानिक समीक्षा**, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे.

११७) डॉ.मोराळे महालक्ष्मी, **आत्मचरित्रात्मक कादंबरी : वाङ्मयप्रकार व वाङ्मयचर्चा**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१०.

११८) जोशी अ. म., **चरित्र–आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास**, स्नेहसवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृ. आ. १९९९.

११९) कुलकर्णी द. भि., **पस्तुरी,** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००२.

१२०) संपा. प्रा. त्रिभुवन शैलेश, **साहित्यसंवाद** : के. एस. पब्लिकेशन्स, पुणे, प्रकाशन– २००६.

१२१) डॉ. लिंबाळे शरणकुमार, **दलित आत्मकथा एक आफलन**, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे, प्रकाशन, २००८.

१२२) यादव आनंद, **आत्मचरित्र मीमांसा,** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९९९.

१२३) डॉ. धाडे चंद्रकांत: **मराठी नाट्यसमीक्षा** कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००६.

१२४) डॉ. कुलकर्णी व. दि. **नाटक : रंगविष्कार आणि रंगस्वाद**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ.

१२५) प्रा. डॉ. कुंटे नरेंद्र, **'नटसम्राट' आस्वाद नि समीक्षा**, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. २००२.

१२६) साठे मकरंद,**मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : एक सामाजिक, राजकीय इतिहास**, खंड दुसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २०११.

१२७) डहाके वसंत आबाजी : **मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१२८) डॉ. सपकाळ अनिल, **समीक्षा : पहिली खेप,** प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००८.

१२९) गाडगीळ गंगाधर:**साहित्याचे मानदंड,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६२.

१३०) संपा. रवींद्र दवी, **स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा** (इ.स. १९४७ ते २०००), पुष्पा भावे आणि इतर प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९१.

१३१) प्रा. संत जान्हवी, **चरित्र–आत्मचरित्र**, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९७०.

१३२) प्रा. अ. म. जोशी, **चरित्र–आत्मचरित्र : तंत्र आणि इतिहास**, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे तृतीयावृत्ती, १९९९.

१३३) संपा. प्रा. भगत रा. तु., **संत साहित्य आणि समाज प्रबोधन**, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. प्रथम आवृत्ती–२००५.

१३४) **तत्रैव.**

१३५) प्रबोधनकार ठाकरे के. सी., **श्री संत गाडगेबाबा**, नालंदा प्रकाशन, सांगली प्र. आ. १९५२.

१३६) डॉ. सरकार जदूनाथ, **अनु. कोलालकर डॉ. रा. गो., औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास**, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९.

१३७) गोखले गोपाळ कृष्ण: **ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग**, बलराज नंदा, अनुवादक वसंत पळशीकर, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे १९८६.

१३८) कुलकर्णी ना. क., **गोखले चरित्र– 'समाज प्रबोधन पत्रिका'** वर्ष १५, अंक–८२, जुलै–ऑगस्ट.

१३९) वष्ट जयंत, **मराठी चरित्र : रुप आणि इतिहास**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००९.

१४०) कीर धनंजय, **अनुवादक–द. पो. खांबेट, स्वातंत्र्यवीर सावरकर**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००८.

१४१) कीर धनंजय: **व्यक्ति आणि चरित्रकार**, संपा. गं. दे. खानोलकर, प्र. आ. १९७४.

१४२) डॉ. कुलकर्णी व. दि., **व्यक्तिविमर्शक द. न. गोखले**, सोहम प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०००.

१४३) डॉ. गोखले द. न., **क्रांतिवीर बाबाराव सावरकर**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७५.

१४४) प्रा. ठोके मो. नि., **वास्तव आणि दृष्टिक्षेप**, पारख प्रकाशन, प्र. आ. १९८८.

१४५) भोसले एस. एस., **राजर्षी शाहू : संदर्भ आणि भूमिका**, रणजित बुक स्टॉल, कोल्हापूर.

१४६) प्रा. गव्हाणे सुधीर वामनराव, **पत्रकारिता विचार व व्यवहार**, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. १९९५.

१४७) उगले जी. ए., **सावित्रीबाई फुले चरित्र आणि समीक्षा**, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, २००५.

१४८) प्रा.पवार ना.ग.,**सावित्रीबाई फुले :अष्टपैलू व्यक्तिमत्व**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे द्वितीयावृत्ती २०१०.

१४९) प्रा.बिडवे–ढगे सुनिता,**सावित्रीबाई फुले:विचार आणि कार्य,** चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जाने. २०१०.

१५०) डहाके वसंत आबाजी, **मराठी समीक्षेची सद्य:स्थिती**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २०११.

१५१) सानप किशोर, **भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा**, साकेत प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००५.

१५२) संपा. पुंडे दत्तात्रय, **वाङ्येतिहासाची संकल्पना**, प्रतिमा प्रकाशन, पुणे तिसरी आवृत्ती, २००५.

१५३) बांदिवडेकर चंद्रकांत, **मराठी कादंबरीचा इतिहास**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३.

१५४) बांदिवडेकर चंद्रकांत, **मराठी कादंबरी: चिंतन आणि समीक्षा**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३.

१५५) संपा. खांडेकर वि.स., **केशवसुत: काव्य आणि कला**, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, २००१.

१५६) संपा. चव्हाण रमेश, **महात्मा फुले यांचा शोध व बोध**, अनुपम क्रिएशन, पुणे प्रकाशन २००३.

१५७) डॉ. देशमुख अरूणा, **मराठीतील लौकिकतावादी विचार,** साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९५.

१५८) भागवत विद्युत, **स्त्रीवादी सामजिक विचार**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती–२००८.

१५९) संपा. डॉ. ठाकूर रवींद्र, **डॉ. नंदकुमार मोरे, 'समीक्षा पद्धती : सिद्धांत आणि उपयोजन',** पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०११.

१६०) डहाके वसंत आबाजी, **मराठी समीक्षेची सद्य:स्थिती**, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. २०११.

१६१) जाधव रा. ग., **साठोत्तरी मराठी कविता व कवी**, साकेत प्रकाशन, प्र. आ. १९९७.

१६२) चित्रे दिलीप, **'ॲन ॲथोलॉजी ऑफ मराठी पोयट्री'(१९४५–६५),** निमीन सदानंद पब्लिकेशर्स, मुंबई,१९६७.

१६३) संपा. नलगे चंद्रकुमार, **गंगाधर पानतावणे, 'दलित कथा: काही विचार'** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे द्वितीयावृत्ती, १९९४.

१६४) खांडगे भास्कर, **'बलुतं: दया पवार यांच्या साहित्याचा अभ्यास**, निमल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९८१.

१६५) डॉ. मांडवकर पवन, **दया पवार: वाङ्मय दर्शन आणि चिकित्सा**,सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती–२०१०.

१६६) डॉ. देशमुख अरूणा, **मराठीतील लौकिकतावादी साहित्य विचार**, उनि.

१६७) डॉ. टापरे पंडित: **कांदबरी संवाद**, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००५.

१६८) संपा. खोले विलास, **विसाव्या शतकातील मराठी समीक्षा**, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती–२००४.

१६९) **तत्रैव.**

१७०) संपा. प्रा. जाधव मनोहर, **साहित्य: शोध आणि संवाद**, सुविधा प्रकाशन, पुणे.

१७१) डहाके वसंत आबाजी, **मराठी समीक्षेची सद्य:स्थिती**, उनि.

१७२) गजभिये अनिल, **दलित कविता: क्रांतिप्रवण दलित साहित्य: विचार आणि वैभव**, प्रथमावृत्ती, अहिल्या प्रकाशन, इंदूर, १९९१.

# संपादक मंडळ

# समाज प्रबोधन पत्रिका

## संपादक मंडळ

१) श्री. वसंत पळशीकर – १९६५ – १९७२ पर्यंत

२) श्री. भा. श. भणगे – १९७२ – १९८० पर्यंत

३) डॉ. स. ह. देशपांडे – १९८० – १९८२ पर्यंत

४) संपादक –राजेंद्र 'व्होरा' रेखा इनामदार – साने सुहास पळशीकर –१९९०– १९९४

संपादक मंडळ –भास्कर भोळे, शांताराम पंदेरे, किशोर बेडकिहाळ, राजीव साने

५) संपादक –राजेंद्र 'व्होरा' सुहास पळशीकर किशोर – बेडकिहाळ– १९९४– २०००

संपादक मंडळ –भास्कर भोळे, शांताराम पंदेरे, राजीव साने, रेखा इनामदार साने

६) संपादक –राजेंद्र 'व्होरा' सुहास पळशीकर किशोर – बेडकिहाळ, भास्कर भोळे, आनंद तेलतुंबडे, शांताराम पंदेर– २००० – २००४

७) संपादक –श्री. महेश गावस्कर २००५ – २०१०

संपादक– श्री.नीरज हातेकर, उमेश बगाडे, संजय देशपांडे, सुलक्षणा महाजन

८) संपादक –डॉ. अशोक चौसाळकर २०११ पासुन

संपादक मंडळ –डॉ. माधव दातार, डॉ. हेमा मोरे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. शैलेंद्र खरात

# साधन सूची

# साधन सूची

## समाज प्रबोधनपत्रिकेतील द्वैमासिक/त्रैमासिक नियतकालिक लेख/परीक्षणे


- अभ्यंकर अजित,**युगांतर? छे! जंतर-मंतर,** जाने.-मार्च,२००१, वर्ष-३९,अं.१५५.
- अकोलकर ग. वि.,**भारत: एकराष्ट्रत्वाचा शोध,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष-६,अं.३०.
- अकोलकर ग. वि.,**महात्मा फुले,** मार्च-एप्रिल, १९७०, वर्ष-७,अं.३२.
- अकोलकर ग. वि.,**शिक्षणातील नियोजनबद्ध परिवर्तनाची प्रक्रिया,** सप्टेंबर,ऑक्टोबर,१९७३, वर्ष-१०, अं.५३.
- अकोलकर ग. वि.,**कोठे आणि कधीतरी,** जुलै-ऑगस्ट,१९७२, वर्ष-९,अं.४६.
- अकोलकर ग. वि.,**जीवनपोषक साहित्याची स्वरुपचिकित्सा,** मे-जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- अकोलकर ग.वि.,**भारतातील शिक्षणाची वाढ आणि राजकीय विकास,** जुलै, ऑगस्ट,१९७४,वर्ष-११, अं.५८.
- अकोलकर ग.वि.,**अध्ययनाचे स्वातंत्र्य,** सप्टें., ऑक्टो.,१९७६,वर्ष-१३, अं.७१.
- अहेरवाडकर लक्ष्मीकांत,**ग्राहक सहकारी चळवळींच्या पुनर्रचनेची दिशा,** सप्टेंबर-ऑक्टोबर,१९७१,वर्ष-८,अं.४१.
- आयरन जे. डब्ल्यू.,**भारताच्या विकासात ख्रिश्चन महाविद्यालयांचा सहभाग,** जाने. -फेब्रु.,१९७२, वर्ष-९,अं.४३.
- आचार्य हेमलता,**अति-बालबोध व्याख्या,** जाने.-फेब्रु. ,१९७०, वर्ष-७, अं.३१.
- आपटे प्रभा,**अफगाण डायरी,** जुलै-डिसें. १९८२, वर्ष-१९, अं.१०६,१०७,१०८.
- आपटे प्रभा,**डॉ. बाबासाहेब आंबेडकर,** जुलै-डिसें. १९८२, वर्ष-१९, अं.१०६,१०७,१०८.

- आपटे के.वा.,**श्री.शंकराचार्य,** मार्च–एप्रिल, १९८१, वर्ष१८,अं.९८.
- आठवले वि.रा.,**संगीताचा न संपणारा शोध,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७९, वर्ष–१६, अं.९०.
- आठवले शकुंतला,**एरिअल आणि पोरकं पाखरु,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- आठवले सदाशिव,**मराठ्यांच्या इतिहासाची परकीय साधने**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- आठवले सदाशिव,**प्राचीन भारतीय राजनीती,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- आडगांवकर सुनिल शंकरराव,**नेहरु,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- आडगांवकर सुनिल शं.,**घटक राज्यातील संविधानिका पेचप्रसंग,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- बापट भा.रा ,**तरंग–यामिक आणि पुंज – यामिक,** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- भेंडे सुभाष,**शेलूक,** जुलै–ऑगस्ट, १९७३, वर्ष–१०, अं.५२.
- भावे निलिमा,**उद्ध्वस्त क्षितिज,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- भावे निलिमा,**काळाची पाऊले,** मे–जून,१९७७, वर्ष–१४, अं.७५.
- भावे निलीमा,**वेदनेचा वेध ,नोव्हेंबर,** डिसेंबर,१९७९, वर्ष–१६, अं.९०.
- भावे स. शि.,**आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थी: आशास्थान की जबाबदारी**,ऑगस्ट–स्पटेंबर,१९६८, वर्ष–५, अं.२३.
- भावे सुमित्रा,**तीव्र, तीक्ष्ण स्त्री मनाच्या हंसाबाई,** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- भावे पुष्पा,**भाषाविकारांची प्रक्रिया,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- भागवत विद्युत,**कनिष्ठ जातीची चळवळ आणि जोतिराव फुले,** एप्रिल–जून, वर्ष–२७, अं.१११.
- भागवत अ. के.,**महात्म्याची जडण घडण,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.

- भागवत अ. के.,**गांधी चरित्र,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- भागवत अ. के.,**तीन दृष्टीकोनातून गांधी,** मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- भागवत अ.के., **संक्रमणावस्थेतील भारतीय विद्यापीठे,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- भोसले एस.एस.,**श्री.गाडगेमहाराज,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- भोसले द.ना.,**मृगावर्त,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- भोळे भा.ल.,**मुस्लिम प्रश्न रुळावर आणणारी मीमांसा,** जुलै–सप्टें., १९९५, वर्ष–३२, अं.१३३.
- भोळे भा.ल.,**दलित साहित्य चळवळीतील संवाद आणि विसंवाद,** जुलै–सप्टे.२००१, वर्ष३९, अं.१५७.
- भोळे भास्कर ल.,**बंधमुक्त जीवाचे स्वातंत्र्यचिंतन,** मार्च, एप्रिल,१९७९, वर्ष–१६,अं.८६.
- भोळे भास्कर लक्ष्मण,**सखोल दलित जाणिवांचे समग्र व साक्षेपी चित्रण,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- भोळे भास्कर व पळशीकर वसंत,**भारतीय राष्ट्रवादाच्या घडणीतील काही टप्पे.,** जाने. –फेब्रु.,१९७२, वर्ष–९,अं.४३.
- भोळे भास्कर, **'परीक्षण' च्या निमित्ताने,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- भोळे भास्कर,**भारतीय राज्यघटनेची कॉझ व्हेटिव्ह चिकित्सा,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- भोळे भास्कर,**सात सक्कं त्रेचाळीस,** नोव्हें.–डिसेंबर,१९७६, वर्ष–१३, अं.७२.
- भोळे भास्कर लक्ष्मण,**दलित कवितेची (उत्थान गुंफा),** मे–जून,१९७८, वर्ष–१५, अं.८१.

- भेण्डे सुभाष, **उगवती पिढी–(उगवतीचे रंग–भाल पाटील),** मार्च, एप्रिल,१९७८, वर्ष–१५, अं.८०.
- भेण्डे सुभाष, **श्री.ना.पेंडसे : लेखक आणि माणूस,** मार्च, एप्रिल,१९७६, वर्ष–१३, अं.६८.
- भट गो. के.,**इरावतीबाईंचे संस्कृतिविषयक लेखन,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष–१३,अं.६७.
- भणगे भा. शं.,**शिक्षण,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- भणगे भा. शं.,**अध्यापनाचे आधुनिकीकरण,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- भणगे भा. शं.,**कॉलेज व्यवस्थापन–एक शिफारस आमची ओळख**–२,जून,१९६६, अं.११.
- भणगे भा.शं.,**भारताचे औद्योगिक नियोजन,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- भणगे भा.शं.,**अर्थसिद्धांत–काही चिकित्सक निबंध,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- बंडेवार सुनिता,**आरोग्य आणि शास्त्रीय औषध धोरण,** जुलै–सप्टे., १९९९, वर्ष–३७, अं.१४९.
- बर्वे चंद्रशेखर,**सर्वोत्कृष्ट मराठी कथा,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- बहुलीकर शुभांगी,**भारतीय संगीत : स्वरुप आणि प्रयोजन,** जुलै–सप्टे.२००१, वर्ष३९, अं.१५७.
- बांदिवडेकर चंद्रकांत,**मोगरा फुलला,** मे–जून,१९७७, वर्ष–१४, अं.७५.
- बांदिवडेकर चंद्रकांत,**राखी पाखर,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- बांदिवडेकर चंद्रकांत,**कॉग्ज,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- बांदिवडेकर चंद्रकांत,**काजळमाया (जी.ए.कुलकर्णी),** मे, जून,१९७४,वर्ष–११, अं.५७

- बांदिवडेकर चंद्रकांत,**जरीला (नेमाडे),** जुलै, ऑगस्ट,१९७८, वर्ष–१५, अं.८२.
- बांदिवडेकर चंद्रकांत,**जनांचा प्रवाहो चालिला,** मे–जून,१९८९,वर्ष१७,अं.९४/९५.
- बांदिवडेकर चंद्रकान्त,**अधोलोक (वसंत आबाजी डहाके),** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- बारलिंगे सुरेंद्र, **इतिहास,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- बारलिंगे सुरेंद्र,**इतिहास चक्राच्या निमित्ताने,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- बाचल वि. मा.,**भारतीय घटना,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- बापट भा.रा. ,**तरुण मित्रा,** नोव्हें., डिसेंबर,१९७३, वर्ष–१०, अं.५४.
- बापट भा.रा. , **युवक समस्या अहवाल,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- बापट भा.रा. , **कोकणचे गांधी आप्पा पटवर्धन,** नोव्हें., डिसेंबर,१९७३, वर्ष–१०, अं.५४.
- बापट भा.रा. ,**विवेकाची गोठी (लेख संग्रह),** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- बापट भा.रा. ,**जय की पराजय,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- बापट भा.रा., **माडगावकरांचे संकलित वाङ्मय,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- बापट भा.रा., **विद्यार्थ्यांची समाजसेवा,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- बापट भा.रा., **दोन सुमार कथासंग्रह,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- बापट भा.रा.,**नाथ पै यांचे जीवन आणि चिन्तन दोन सहप्रवास,** मे–जून, १९७३, वर्ष–१०, अं.५१.
- बापट भा. रा. ,**वैज्ञानिक सिद्धांत आणि विश्वविचार,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.

- बापट भा. रा.,**मानवशास्त्राची ओळख,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- बापट भा.रा.,**काकाजी–बापू –विनोबा,** जुलै, ऑगस्ट,१९७४,वर्ष–११, अं.५८.
- बापट भा.रा.,**अनुकरणीय उपक्रम,** मार्च, एप्रिल,१९७४,वर्ष–११, अं.५६.
- बापट भा.रा.,**इहवाद, धर्म आणि नीती,** मे–जून,१९७८, वर्ष–१५, अं.८१.
- बोरसे मुकुल,**नक्षत्राचे देणे,** मे–जून,१९७६, वर्ष–१३, अं.६९.
- बेलसरे अरूण,**ग्रामपंचायतीचा अभ्यास,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- बेडेकर दि. के.,**मार्तिक (काव्य),** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- बेडेकर दि. के.,ब**हुभाषिक देश आणि राष्ट्रीयत्वाचा विकास,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- बेडेकर दि. के.,**प्रभा तुळपुले, वारल्यांची जाग,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- बेडेकर दि. के.,**जीवन सौख्याचा शोध,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- बेडेकर दि. के.,**धर्मभावना आणि मानवविकास,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- बेडेकर दि.के.,**धर्म आणि राजकिय सामाजिक परिवर्तन,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- बेडेकर सुधिर, **लोहियांची विचार पद्धती,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- बेडेकर सुधीर, **मुद्दलास न भिडणारे विश्लेषण (जोगळेकर : भारतातील युद्धशास्त्राची अपेक्षा),** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- बेडेकर सुधीर,**महाराष्ट्रीय विचारवंतांची बूझर्वा प्रकृती,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- बेडेकर सुधीर,**मुद्दा आहे जग बदलण्याचा,** जाने.–मार्च,१९९०,वर्ष–२७,अं.११०.
- बेडेकर सुधीर,**जगणे आणि मरणे,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.

- बुवा ऋतुराज,**शिवसेनेचे चरित्र : काही अनुत्तरित प्रश्न,** जुलै–सप्टें. १९९८, वर्ष–३९, अं.१४४.
- चौसाळकर अशोक,**भारत–चीन व युद्धाचा एक चिकित्सक अभ्यास,** आक्टो.–डिसे.,१९९६,वर्ष–३३, अं.१३४.
- चौसाळकर अशोक,**वा.रा.कोठारींच्या कार्याचे मूल्यमापन,** एप्रिल–जून.,१९९४,वर्ष–३१, अं.१२७.
- चौसाळकर अशोक,**नव वसाहतवादाची चिकित्सा,** जाने.–मार्च,१९९७,वर्ष–३६, अं.१३७.
- चौसाळकर अशोक,**हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम व मराठवाडा,** आक्टो.डिसे.२००२, वर्ष–४०, अं.१६१.
- चिंचाळकर वसंत,**मेघ, मोर आणि मैथिली,** मे–जून, १९९१, वर्ष१८, अं.९९.
- चिंचाळकर वसंत,**पार्वतीबाई भोर,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- डॉ. गोखले द. न.,**माधवराव पटवर्धनांच्या वाङ्मयाचा जीवनसंबंद्ध अभ्यास,** जाने., फेब्रु.,१९७४, वर्ष१०,अं.५५.
- डोळस अनिवाश,**महात्मा आणि बोधिसत्व,** जाने.–मार्च,१९९१, वर्ष–२८,अं.११४.
- दाभोलकर दे. अ.,**परम धर्म,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- दाभोलकर दे. अ.,**धर्म, शिक्षण आणि आर्थिक विकास,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- दाभोलकर देवदत्त,**भारतातील विद्यापीठांचे स्वातंत्र्य**,मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- दाभोलकर देवदत्त,**महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध,** नोव्हें., डिसेंबर,१९७३, वर्ष–१०, अं.५४.

- दाभोलकर देवदत्त,**शिक्षण क्षेत्रातील दोन महत्वाचे प्रश्न**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- दाभोलकर देवदत्त,**अजून उत्तर न मिळालेला भारतापुढील एक यक्षप्रश्न**,मे–जून १९६९,वर्ष–६, अं.२७.
- दाभोळकर देवदत्त,**युवा स्यात्, साधू युवा स्यात्,** मे–जून, १९७३, वर्ष–१०, अं.५१.
- दाभाडे मंगल, **बाहुले (सुधाकर शंकर देशपांडे),** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- दामले य. भा.,**जातिव्यवस्थेवरील विवेचनाचे केवळ संकलन,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- दास्ताने संतोष,**समाजवादी शाहू ,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- दोशी द.रा.,**श्री.शाहू छत्रपतींचे अर्थकारण,** जून,१९७६, वर्ष१३, अं.६९.
- दातार माधव,**भांडवलशाहीच्या विरोधात,** एप्रिल–जून,२०००, वर्ष–३८, अं.१५२.
- दातार माधव,**गांधी, लोहिया आणि दीनदयाळ,** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- दातार माधव,**जागतिकीकरण: एक आढावा,** जाने–मार्च,२००३,वर्ष–४१,अं.१६२.
- दातार मु.र.,**खाडिलकरांची नाटके,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- दातार श्रीकृष्ण,**सामाजिक व्यथांचा आर्त हुंकार (उकंडा),** जानेवारी–फेब्रुवारी,१९८०, वर्ष–१७, अं.९१.
- दातार श्रीकृष्ण,**गतिमानी की मनमानी,** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- दाते सुनिल,**महाराष्ट्रातील दलित चळवळीचा वेध,** जाने.–मार्च,१९९२, वर्ष–३०, अं.११२.

- देवरे पी.डी.,**वैदिक धर्मसूत्र आणि बहुजनांची गुलामगिरी,** जाने.,मार्च,१९९९,वर्ष–३७, अं.१४६
- देशमुख सुधाकर,**'हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व' च्या निमित्ताने,** एप्रिल–जून, २००३, वर्ष–४१,अं.१६३.
- देशमुख सुधाकर,**मुक्त अर्थव्यवस्थेचे निर्भीड समर्थन,** जुलै–सप्टे.२००१, वर्ष३९, अं.१५७.
- देशमुख सुधाकर,**अरुंधती रॉय यांचे राजकीय निबंध,** जुलै–सप्टें.२००३, वर्ष–४१, अं.१६४.
- देशपांडे वि.भा.,**मरुद्भान,** जुलै–ऑगस्ट,१९७३, वर्ष–१०, अं.५२.
- देशपांडे दि.य.,**गांधींचे सत्य 'धृवपदाच्या निमित्ताने',** जाने.–मार्च,१९९२, वर्ष–३०, अं.११२.
- देशपांडे वसंत,**कर्ज पुरवठा पद्धतीतील दोषांचे दिग्दर्शन**, मे–जून १९६९,वर्ष–६, अं.२७.
- देशपांडे वसंत,**द इंडिया वुई वाँट**,ऑक्टो.–नोव्हें.,१९६७, वर्ष४,अं.१८.
- देशपांडे दा.गो.,**कामगार आकांक्षा आणि आव्हान,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- दडगे विश्वनाथ,**शिक्षणक्षेत्रातील समन्वयकाची भूमिका,** मे–जून, १९७३, वर्ष–१०, अं.५१.
- धर्मदिलीप,**भारती आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार,** जाने.–मार्च,२००१, वर्ष–३९,अं.१५५.
- धर्माधिकारी सतीश,**केन्सनंतरचे जग**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- धोंगडे ए. रा.,**स्फूर्तिदायक कहाणी,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- धोंडगे दिलीप,**साक्षेपी 'साहित्य प्रत्यय',** आक्टो.डिसे.२००२, वर्ष–४०, अं.१६१.

- धोडके ह.म.,**परंपरा आणि आधुनिकता,** मार्च, एप्रिल,१९७८, वर्ष–१५, अं.८०.
- धोडकेह.म.,**उद्ध्वस्त करणारी वैचारिक अनुभूती,** मे–जून,१९७६, वर्ष–१३, अं.६९.
- गावसकर का. म.,**भारतीय नियोजन,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- गावसकर का. म.,**भारतीय नियोजनापुढील पेच,** सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- गावसकर का. म.,**विषयाला बगल देणारे पुस्तक,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- गावसकर का. म.,**औद्योगिक अर्थ पुरवठ्याचे बदलते स्वरुप,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- गोरे अनिल,सुबोध, **अनौपचारीक विषय प्रवेश,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- गोरे अनिल,**पर्यावरण चळवळीचील कार्यकर्त्यांना उपयुक्त पुस्तक,** जाने.–मार्च,१९९७,वर्ष–३४,अं.१३७.
- गोखले प्रदीप,**भारतीय धर्म आणि सामज यातील अंत:संबंध,** ऑक्टो.–डिसें.,१९९१, वर्ष–२८, अं.११७.
- गोखले प्रदीप,**परिचय :कितपत चिकित्सक? कितपत तात्विक?** एप्रिल–जून, वर्ष–२७, अं.१११.
- गोखले प्रदीप,**जात्यंतक भांडवलदारी लोकशाही क्रांती,** जाने.–मार्च–२००४, वर्ष–४२, अं.१६८.
- गोखले प्रदीप,**नवबौद्धयानाच्या सम्यक् आकलनाच्या दिशेने,** आक्टो–डिसें,२००४,वर्ष–४२,अं.१६९.
- गोखले द.न.,**व्यक्तिचित्रणाचा एक आदर्श,** जुलै, ऑगस्ट,१९७४,वर्ष–११, अं.५८.
- गोळे रा. मा.,**कुत्तरओढ (बॅनर्जी : अंडर टू मास्टर्स),** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.

- गाडगीळ पां. वा.,**केसरीची त्रिमूर्ती : चिपळूणकर–आगरकर, टिळक,** मे–जून,१९७६, वर्ष–१३, अं.६९.
- गाडगीळ पां. वा.,**श्री. व्यं. केतकर यांचे वाङ्मयविषयक लेख,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष–१३,अं.६७.
- गाडगीळ पां. वा.,**पाकिस्तानचे विघटन,** मार्च, एप्रिल,१९७६, वर्ष–१३, अं.६८.
- गाडगीळ पां.वा.,भा**रतातील राजकीय विचार,** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- गाडगीळ पां.वा.,**भाकरी आणि स्वातंत्र्य,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- गाडगीळ पां.वा.,**भूतान : ड्रॅगन किंग्डम इन् क्राइसिस,** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- गाडगीळ पां.वा.,**यशवंतरावांची भूमिका,** मे, जून,१९८०, वर्ष–१७, अं.९३.
- गाडगीळ पां.वा.,**बाबाराव सावरकर,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- गाडगीळ पां.वा.,**अंधश्रद्धा एक पुर्नर्विचार,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- गाडगीळ पां.वा.,**अच्युतराव कोल्हटकर,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- गाडगीळ पां.वा.,**आपल्या आर्थिक विकासाची समस्या,** जाने., फेब्रु.,१९८१, वर्ष–१८, अं.९७.
- गाडगीळ पां.वा.,**राजर्षी शाहू महाराज,** जाने., फेब्रु.,१९८१, वर्ष–१८, अं.९७.
- गाडगीळ पां.वा.,**राजर्षी शाहू,** मार्च, एप्रिल,१९७८, वर्ष–१५, अं.८०.
- गाडगीळ पां.वा.,**प्रेमासाठी दिव्य,** मे, जून,१९८०, वर्ष–१७, अं.९३.
- गाडगीळ पां.वा.,**वृद्ध आणि त्यांचे प्रश्न,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७९, वर्ष–१६, अं.९०.
- गाडगीळ पां.वा.,**एम्.एन्.रॉय,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७८, वर्ष–१५,अं.८३.
- गाडगीळ पां.वा.,**शहरातील बेकारी,** मे–जून,१९७७, वर्ष–१४, अं.७५.

- गाडगीळ पां.वा.,**सहकारावरील ध.रा.गाडगीळ यांचे विचार,** सप्टें., ऑक्टो.,१९७६,वर्ष–१३, अं.७१.
- गाडगीळ पां.वा.,**से नॉट दि स्ट्रगल,** मे, जून,१९७९, वर्ष–१६,अं.८७.
- गाडगीळ पां.वा.,**सेनापती बापट,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- गाडगीळ पां.वा.,**कालापुढती चार पाऊले,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७९, वर्ष–१६, अं.९०.
- गाडगीळ पां.वा.,**क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- गाडगीळ पां.वा.,**परदेशातील भारतीय,** मे–जून,१९७८, वर्ष–१५, अं.८१.
- गाडगीळ पां.वा.,**जागतिक अर्थव्यवस्तेचे भवितव्य,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७८, वर्ष–१५, अं.८४.
- गाडगीळ पां.वा.,**हिंदू समाजाची संस्पना,** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- गाडगीळ पां.वा.,**ध.रा.गाडगीळ आणि महाराष्ट्र,** मे–जून,१९७६, वर्ष–१३, अं.६९.
- गाडगीळ पां.वा.,**ध.रा.गाडगीळ,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- गाडगीळ पां.वा.,**ना.नि.परुळेकर,** नोव्हें., डिसेंबर,१९७६, वर्ष–१३, अं.७२.
- गाडगीळ पां.वा.,**नेहरु विचार संग्रह,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- गुराम अशोक,**ग्रामीण बँक व्यवसाय,** सप्टें.–ऑक्टो.,१९८१, वर्ष–१८, अं.१०१.
- गुरु गोपाळ,**पाण्याच्या पाटातून वाहणारे सत्तेचे राजकारण,** एप्रिल–जून, १९९९, वर्ष–३७, अं.१४८.
- घोडके ह.म.,**एका गुढरम्य सौंदर्याचा कलावेध,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.

- घोडके ह.म.,**स्त्री–एक सामाजिक अभ्यास,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७८, वर्ष–१५, अं.८४.
- घोणसगी भी.द.,**वित्तधोरण आणि नॉन बँकिंग कंपन्यांकडील ठेवी,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- हरोळकर ल.व.,**'साधनवादा'चे चिकित्सक परीक्षण,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- हर्षे गो. ना., **प्रिंसिपल्स ऑफ क्रिमिनॉलॉजी**, ऑगस्ट–सप्टेंबर १९६७, वर्ष ४, अं.१७
- हातकणंकलेकर म. द.,**धुसर जग,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- हातकणंगलेकर म. द.,**मराठी विचारवंतांचे आत्म संशोधन व समर्थन,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- हातकणंगलेकर म. द.,**ब्रिटीश ललित लेखकांनी पाहिलेला भारत,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- हातकणंगलेकर म. द.,**अस्तित्वाचे नवे भान,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- हातकणंगलेकर म. द.,**साहित्यातील अश्लीलता : खऱ्या केवळ समस्येचा एक मुखवटा**,मे, जून,१९६९, वर्ष–६वे, अं.२७.
- हातकणंगलेकर म. द.,**टीकाविवेक,**ऑगस्ट–सप्टेंबर,१९६७,वर्ष४,अं.१७.
- हातकणंगलेकर म. दा.,**श्री निवासांच्या पिंपळातले सोने,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७९, वर्ष–१६,अं.८९.
- इनामदार चि.शं.,**यात्रा (लेख संग्रह),** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- इनामदार चि.शं.,**हिंदुत्ववाद राष्ट्रवाद : कितपत खरे समीकरण,** जाने.–मार्च,१९९२, वर्ष–३०, अं.११२.
- इनामदार रेखा,**व्यासंगदार परखडपणाचे भरघोस दर्शन,** मे–जून, १९८९, वर्ष१७, अं.९४/९५.

- इनामदार लीला,**राज्यसहोशिवाय समाजवाद,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- इनामदार एस.व्ही.,**दलित वाङ्‌मयाची भूमिका,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७८, वर्ष–१५,अं.८३.
- इनामदार ना.र.,**भारतातील ब्रिटीश इतिहास : एक प्रमाण इतिहास,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- जांगडा विजयकुमार,**भारतीय वैद्यकशास्त्र आणि धर्म निहास,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- जोशी मा.ग.,**तीन समर्पित जीवने (साने गुरुजी, सेनापती बापट, शंकरराव देव),** जुलै, आक्टोबर,१९८०, वर्ष–१७, अं.९४/९५.
- जोशी र.रा.,**द्रव्यनीति,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- जोशी अरुण,**शिवकालीन महाराष्ट्र,** जानेवारी–फेब्रुवारी,१९८०, वर्ष–१७, अं.९१.
- जोशी रा.भि.,**भारतीय मुसलमान : एक न सुटलेला प्रश्न,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- जोशी रा.भि.,**विचार–विलसिते,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- जोशी वसुधा,**भारतातील द्रारिद्रयाची नेटकी चिकित्सा,** एप्रिल–जून, १९९८, वर्ष–३९, अं.१४३.
- जोशी श्री. ज.,**पुत्र मानवाचा (कादंबरी),** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- जोशी श्रीपाद,**कुंटुंबवत्सल गांधी**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- जोशी श्रीपाद,**गांधीजींचे बृहद् आत्मचरित्र,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- जोशी पां.म.,**नवी अर्थव्यवस्था, नवी दुखणी,** एप्रिल–जून,२०००, वर्ष–३८, अं.१५२.
- जोग ल.ग, **विदेही,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.

- जोग ल.ग.,**मराठी रंगभूमी : मराठी नाटक,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- जोग शकुंतला,**भागधेय आणि अगोचर,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७८, वर्ष–१५,अं.८३.
- जोग शकुंतला,**रमल खुणा (जी.ए.कुलकर्णी),** मे–जून,१९७७, वर्ष–१४, अं.७५.
- जोगळेकर सुधीर,**एका स्पृश्याची डायरी,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- जोगदंड प्रल्हाद ,**दलित पॅंथरवरील दोन अभ्यास,** जुलै–सप्टें.,१९९१, वर्ष–२८, अं.११६.
- जाधव रा.ग.,**तुकाराम दर्शन : एक जिज्ञासूची निरीक्षणे,** एप्रिल–जून, १९९८, वर्ष–३९, अं.१४३.
- जाधव वसंत मा.,**आंधळ्या वेदनेचा प्रखर स्वर,** मार्च, एप्रिल,१९७९, वर्ष–१६,अं.८६.
- किर्लोस्कर मालती, **पाथेय,** जुलै–ऑगस्ट, १९८१, वर्ष–१८,अं.१००.
- कर्डिले प्रकाश,**बेकारीची समस्या,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- कर्णिक व.म.,**भारत सेवक गोखले,** मे–जून,१९७८, वर्ष–१५, अं.८१.
- कर्णिक ग.भ., **शेजारी,दूरचे की जवळचे,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- करंदीकर वि. रा.,**विनायक दामोदर सावरकर,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- करंदीकर वि. रा.,**लोकनायक अणे यांचे लेखन,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- करंदीकर वि.रा., **भागवतोलान संत एकनाथ,** मार्च–एप्रिल, १९७३, वर्ष–१०, अं.५०.
- करंदीकर वि.रा.,म**हानुभव पंथीयांचे विवेकी आणि समजुतदार आवाहन,** सप्टें., ऑक्टो., १९७४, वर्ष–११, अं.५९.
- करंदीकर वि.रा.,**सुधाकर जोशी यांचे उत्साही संपादन,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७८, वर्ष–१५,अं.८३.

- कामत अ. रा.,**महराष्ट्रातील विचारवंताची वाटचाल,महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास**,जून–जुलै,१९६८, वर्ष–५, अं.२२.
- कामत अ.रा.,**अन्य भाषिकांसाठी महाराष्ट्राचे परिचय पत्रे,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- कामत अ.रा.,**अनुसूचित जातींच्या शैक्षणिक स्थितीचा आलेख,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष–१२,अं.६०.
- कार्डिले प्रकाश,**नेहरु: द एक्स्टसी ॲड द ॲगनी**, मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- कालदाते सुधा,**मोठ्या शहराच्या परिघातील खेडे,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- कालदाते सुधा,**एकत्र कुटुंब पद्धतीतील स्थित्यंतर**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- काकडे सुरेश,**भारत–अमेरिका संबंध,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७८, वर्ष–१५,अं.८३.
- काळे अनुभव,**संगणकशास्त्राचा सुबोध परिचय,** जाने.–मार्च,२००२,वर्ष–४०,१५८.
- काळदाते सुधा,**अदिवासींचे सामाजिक जीवन,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- काळदाते सुधा,**आओ नाग,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष– १२,अं.६०.
- काळदाते सुधा,**सामाजिक मानवशास्त्राची प्राथमिक ओळख,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- कागलकर संध्या,**तरुणाचा जगप्रवास : लागेबांध (बाबा भांड),** जाने., फेब्रु.,१९७७, वर्ष १४, अं.७३.
- कोशल दिपक,**१६१ ब्रिगेडची गौरवगाथा,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- कोपर्डे प्रमोद,**नरक सफाईची गोष्ट,** जाने.–मार्च,१९९०,वर्ष–२७,अं.११०.
- कोडोलीकर स.ज.,**महाभारत आदिपर्व,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.

- कोडोलीकर सदाशिव जनार्दन,**काळा सूर्य–(अनिल दहिवाडकर),** मे–जून, १९८९, वर्ष१७, अं.९४/९५.
- कोतापल्ले नागनाथ,**प्रवाहानुगामी प्रतिभा,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- कोतापल्ले नागनाथ,**रक्तपंख,** सप्टें., ऑक्टो.,१९७६,वर्ष–१३, अं.७१.
- कोतापल्ले नागनाथ,**शब्दुली (प्रकाश कामतीकर),** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- काणेकर अनंत,**गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर,** मार्च, एप्रिल,१९७८, वर्ष–१५, अं.८०.
- कदम संभाजी,**ललित लेणी**,सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- केळकर अशोक रा.,**प्रबंध शोकांतिका,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- केळकर अशोक रा.,**ग्रंथसंपादनाचा वस्तुपाठ,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- केळकर वसंत महादेव,**एक निरस क्रमिक पुस्तक**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- केळकर चंद्रकांत,**परकीय मदतीसाठी मागचे राजकारण –कम्युनिस्ट प्रकार,** मे,–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- कुलकर्णी मनोहर,विज्ञान, **संस्कृती आणि भारतातील साम्राज्यवादी राजवट,** एप्रिल–जून, १९९८, वर्ष–३९, अं.१४३.
- कुलकर्णी इरावती,**टिकलीएवढं तळं,** सप्टें.–ऑक्टो.,१९८१, वर्ष–१८, अं.१०१.
- कुलकर्णी शरद, **दलित सुशिक्षित आणि सामाजिक बदल,** जानेवारी–फेब्रुवारी,१९८०, वर्ष–१७, अं.९१.
- कुलकर्णी शरद,**बिहारमधील आदिवासींवरील अत्याचार,** मार्च, एप्रिल,१९८०, वर्ष–१७, अं.९२.

- कुलकर्णी शरद,**लातूर येथील भूकंप : एक प्रतिक्रिया,** जाने.–मार्च,१९९७,वर्ष–३६, अं.१३७.
- कुलकर्णी शरद,**कोसबाडच्या अनुताई,** सप्टें.–ऑक्टो.,१९८१, वर्ष–१८, अं.१०१.
- कुलकर्णी गो. म.,**खोतांचे थिटेपण (खोत : उभयान्वयी अव्यय),** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- कुलकर्णी गो. ग.,**काही मराठी कविता,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- कुलकर्णी गो.म.,**मराठी कथेचा सविस्तर परंतु अपुरा विचार,** जाने., फेब्रु.,१९७४, वर्ष१०,अं.५५.
- कुलकर्णी श्रीनिवास,**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे विश्लेषण करणाऱ्या दोन पुस्तिका,** जाने.,मार्च,१९९९,वर्ष–३७, अं.१४७.
- कुरुंदकर नरहर,**लोकसाहित्याचे अंत : प्रवाह,** जाने., फेब्रु.,१९७७, वर्ष १४, अं.७३.
- खैरे विश्वनाथ ,**मराठी शब्दांचे भ्रामक भाषाशास्त्र,** जुलै–सप्टें.२००३, वर्ष–४१, अं.१६४.
- खरात शैलेंद्र,**जमातवादाची चिकित्सा,** एप्रिल–जून, १९९८, वर्ष–३९, अं.१४३.
- खांदेवाले श्रीनिवास,**नफ्याची लोककल्याणावर कुरघोडी : नॉन चॉन्स्की,** जाने–मार्च
- खोले विलास,**गीता टीकाकाराचे व्यक्तित्व दर्शन,** सप्टें., ऑक्टो.,१९७६,वर्ष–१३, अं.७१.
- खुराणा पन्नालाल,**भारत आणि सेक्युलॅरिझम,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- खुराणा पन्नालाल,**मोईन शाकीर,इस्लामचा हिंदी अवतार**,जुलै–ऑगस्ट,१९६९,वर्ष–६, अं.२८.
- खुराणा पन्नालाल,**आर्थिक मक्तेदारी,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- क्षीरसागर उत्तम,**सार्वत्रिक पडझडीच्या पंचनाम्यातला आदर्श सामान्य माणूस,** जाने., फेब्रु.,१९७७, वर्ष १४, अं.७३.

- लिमये माधव,**भारतातील वृत्तपत्र स्वातंत्र्य,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- लिमये माधव,**बंगाली अराजकाची पार्श्वभूमी,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- लिमये माधव,**द्रविड मुन्नेन कझगमची राजवट,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- लिमये माधव,**चौथी सार्वत्रिक निवडणूक,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- लिमये माधव,**दक्षिण आशियाई राष्ट्रांची परराष्ट्रनिती,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- लंजेवार ज्योती,**मत्वगंधा (राम बसाखेत्रे),** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- लोखंडे शशिकांत,**पहाटपाणी,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष– १३,अं.६७.
- लेदर्ले मॅश्यू रायनर,**बायबलचे नवे भाषांतर,** जाने. –फेब्रु.,१९७२, वर्ष–९,अं.४३.
- लेदर्ले मथ्यू रायनर,**हेगेलच्या अभ्यासाचे विश्वसनीय साधन,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- मंगळवेढेकर राजा,**निर्मळ आणि तर्ककठोर,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- मंगळवेढेकर राजा,**गोष्टिरुप विनोबाजी,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- मंगळवेढेकर राजा,**चेहरे मोहरे (कचे : चेहरे मोहरे),** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- माईणकर त्र्यं.गो.,**ग्रंथवेध,** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.
- मालशे मिलिंद स.,**मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र,** जाने.,फेब्रु.,१९७७, वर्ष–१४, अं.७३.
- माळवी नूतन,**अब्राह्मणी साहित्यातील महत्त्वपूर्ण भर,** आक्टो.डिसें.२००३, वर्ष–४१,अं.१६५
- मोरे नीतिन,**भाषाविज्ञानाच्या चर्चेतील काही उणिवा,** जाने.–मार्च,१९९७,वर्ष–३६, अं.१३७.

- मोट कृष्णाबाई,**विकृत व खोटे चित्रण : रघुनाथाची बखर,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७७,वर्ष–१४, अं.७७.
- माटे म.श्री.,**औरंगजेबाचे नवे चरित्र,** एप्रिल–जून, २००३, वर्ष–४१,अं.१६३.
- मेश्राम योगेंन्द्र,**जीवनाशयपूर्ण सामाजिकतेचा सहजविष्कार,** मार्च, एप्रिल,१९८०, वर्ष–१७, अं.९२.
- मुलाट वासुदेव,**झूल– एक टिपण,** जाने., फेब्रु.,१९८१, वर्ष–१८, अं.९७.
- मुळे देवीदास,**अजून उजाडायचं आहे (माधव कोंडविलकर),** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- मुखर्जी क्षितिमोहन,**भारतीय शेती १८९१–१९४७,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- मुखर्जी क्षितिमोहन,**राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप,** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- मुखर्जी सुजित,**रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाची घडण,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.
- नामजोशी प्रा.म. वि.,**प्लॅनिंग फॉर डेमॉक्रसी ॲड अदर एसेज**, एप्रिल–मे, १९६८, वर्ष–५, अं.२१.
- नाडकर्णी आनंद,**भारतीय शेतीचे अंशलक्षी दर्शन**, मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- नातू म.गं., **ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- नेरूरकर प्रभाकर,**कालस्वर, सप्टे.–आक्टो,** १९७२, वर्ष–९, अं.४७.
- नुपे सु.दा.,**महाराष्ट्रातील ऊस उद्योग,** जाने. फेब्रु.,१९७६वर्ष– १२,अं.६०.
- फडके भालचंद्र,**संघ परिवाराच्या ब्राह्मणी षड्‌यंत्राचे विश्लेषण,** जुलै–सप्टेंबर,१९९३, वर्ष–३०, अं.१२४.
- फडके य.दि.,**गुरुचरित्र की गुरुचरित्र्यहनन,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.

- फडके अनंत रा.सी.,**नवीन आर्थिक धोरणावर प्रकाशझोत,** जुलै–सप्टें.,१९९२, वर्ष२९, अं.१२०.
- फडके अनंत ए.सी.,**राखीव जागांचा वाद,** जुलै–सप्टें.,१९९१, वर्ष–२८,अं.११६.
- फतेह अली शामा,**वास्तववादी, स्तुत्य परंतु कलाहीन,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- फतेहअली शमा,**सत्तेची मादक भूल,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- फतेहअली शमा,**भारतीय वन्यजीवनाचा अस्त,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- प्रा. गोखले प्रदीप,**मनुस्मृति– समर्थकांच्या संस्कृती–प्रा. प्रदीप गोखले,** जाने.–मार्च,१९९४ वर्ष–३१,अं.१२६.
- प्रा. सिंग अत्तार,**बलराज सहानी : एक श्रेष्ठ पंजाबी साहित्यकार,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७८, वर्ष–१५, अं.८४.
- प्रधान ग. प्र.,**माझे काही वृत्तपत्रीय लेखन**,डिसेंबर,१९६६,अं.१३,वर्ष–४.
- प्रधान ग. प्र.,**अमेरिकेकडून गांधींना मिळालेला प्रतिसाद,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- प्रधान ग. प्र.,**जग आणि कृष्ण मेमन**, मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- प्रधान ग.प्र., **सोविएत रशियाच्या पतनाचा इतिहास,** एप्रिल–जून–२००२, वर्ष–४०,अं.१५९.
- प्रधान ग.प्र.,**मे.पुं.रेगे यांची वैचारिक वाटचाल,** एप्रिल–जून,२००१, वर्ष–३९,अं.१५६.
- प्रधान ग.प्र.,**साने गुरुजींची जीवनगाथा,** सप्टें., ऑक्टो.,१९७६,वर्ष–१३, अं.७१.
- पेंडणेकर अ.ना.,**सूड,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पेंडणेकर अ.ना.,**ध्येयवेडी माणसे,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.

- पेंडणेकर आ.ना.,**एक अपयश,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- पंडित नलिनी,**सेक्युलॅरिझम, राष्ट्रवाद आणि लोकशाही,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- पंडित निलीनी,**महाराष्ट्राचा राजकीय इतिहास,** ऑक्टो.–नोव्हे.,१९९०, वर्ष–२७,अं.११३.
- पंडित निलीनी,**महाराष्ट्राचा राजकीय इतिहास,** ऑक्टो.–नोव्हे.,१९९०,वर्ष–२७,अं.११३.
- पंडित नलिनी,**आधुनिक भारताचे नेतृत्व,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.
- परांजपे य. श्री.,**भारताच्या संरक्षणाची समस्या**, मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- परांजपे प्र.ना.,**बाकी इतिहास,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- परांजपे प्र.ना.,**१८६५ ते १९०० या काळातील इंग्लिश नाटक,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- परांजपे प्र.ना.,**काव्यमय भाषा, फिके नाटक,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- परांजपे प्र.ना.,**चांगुणा : यशस्वी रुपांतर,** जाने., फेब्रु.,१९७७, वर्ष–१४, अं.७३.
- परांजपे प्रभाकर नारायण,**खोटं नाटक,** नोव्हें.,डिसेंबर,१९७६, वर्ष–१३, अं.७२.
- परांजपे प्रभाकर नारायण,**दादासाहेब फाळके यांची दोन चरित्रे,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- परांजपे प्रभाकर नारायण,**नाटककाराची कला,** जुलै–ऑगस्ट,१९७६, वर्ष–१३, अं.७१.
- परांजपे प्रभाकर,**प्रांजळ आत्मदर्शन,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- पवार गो. मा.,**केशवसुतांच्या काव्यातील सृष्टी विवाद्य अन्वयार्थ,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.

- पवार दया,**दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य,** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- पत्की मंगेश,**कानेटकर आणि पेंडसे,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- पत्की मंगेश,**कु. बेणारेचा नाटकी आक्रोश,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- पत्की मंगेश,**नाटककाराची शोकांतिका,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- पळशीकर वसंत, **मो.क.गांधी: भारत आणि जग,** जाने.–फ्रेबु., १९७३, वर्ष–१०, अं.४९.
- पळशीकर वसंत, **रॉलैट सत्याग्रह,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- पळशीकर वसंत, **संक्रमणावस्थेतील भारतीय ग्राम रचना व जीवन,** नोव्हे.–डिसें, १९७२, वर्ष–९, अं.४८.
- पळशीकर वसंत,**भविष्यकालीन पाकिस्तानी परराष्ट्रनीतीचा संभाव्य आकृतिबंध,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- पळशीकर वसंत,**भारताचे ब्रिटिश इतिहासकार,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- पळशीकर वसंत,**भारतातील मुस्लिम विचारप्रवाह,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वसंत,**भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सम्यक मूल्यमापन,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- पळशीकर वसंत,**भारतातील हिंसक जनआंदलनांचे राजकारण**,जून–जुलै,१९६७,वर्ष ४, अं.१६.
- पळशीकर वसंत,**भारतीय राजकारण : एक निसरडे क्षेत्र,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.
- पळशीकर वसंत,**भारतीय इतिहासाच्या जेसुइट साधनांची प्राथमिक जंत्री,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.

- पळशीकर वसंत,**भारतीय लोकशाहीला आव्हान अंधधर्मश्रद्धेचे की राजकारणी महत्वाकांक्षेचे?,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- पळशीकर वसंत,**भारतीय सेनादल व एकात्म भारताची निर्मिती,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वसंत,**भारतीय जनसंघ,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वसंत,**मलमपट्टीचे दिवस संपले,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- पळशीकर वसंत,**महाराष्ट्रातील लोकशाही विचार**,डिसेंबर,१९६६,अं.१३.
- पळशीकर वसंत,**मध्ययुगीन वैभव व गुलामी आणि क्रांती (अवचट : पूर्णिया),** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वसंत,**मुस्लिम जातीयवादी राजकारणाची समस्या आणि तिच्यावरील उपाययोजना**,१९६८, ऑगस्ट–सप्टेंबर, वर्ष–५, अं.२४.
- पळशीकर वसंत,**ब्रिटीशांचे ऋण**, सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- पळशीकर वसंत,**विकारवश, दुबळे चिंतन,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- पळशीकर वसंत,**विग्रहविषयक एक अपत्ती,** सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- पळशीकर वसंत,**विचारवंताचा पोकळ विचार,** मे,–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- पळशीकर वसंत,**टिपू सुलतान,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- पळशीकर वसंत,**तिबेट,** सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- **पळशीकर वसंत,राजकारण आणि समाजपरिवर्तन**,ऑगस्ट–सप्टेंबर, १९६८, वर्ष–५,अं.२३.
- पळशीकर वसंत,**राजकारणी झकेरियाकृत सावध चिकित्सा,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.

- पळशीकर वसंत,**राजकीय विचारांची मार्ग दीपिका,** जाने. –फेब्रु.,१९७२, वर्ष–९,अं.४३.
- पळशीकर वसंत,**प्रेषित टागोरांचे अपयश,** जाने. –फेब्रु.,१९७२, वर्ष–९,अं.४३.
- पळशीकर वसंत,**प्रदेशाधिष्ठित राज्यसंस्था आणि आप्तसंबंधाधिष्ठित राज्यसंस्था,** जुलै–ऑगस्ट,१९७३, वर्ष–१०, अं.५२.
- पळशीकर वसंत,**लहान तोंडी मोठा घास,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- पळशीकर वसंत,**लोकहितवादी,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- पळशीकर वसंत,**लेनिनचे बालपण,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- पळशीकर वसंत,**एक आद्य प्रबोधनकार,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- पळशीकर वसंत,**शेती प्रधान समाजांचे आधुनिकीकरण,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- पळशीकर वसंत,**सहकाराचा व्यवहार : काही उदाहरणे,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.
- पळशीकर वसंत,**सदोष चरित्रलेखनाचा नमुना,** सप्टें.,ऑक्टो.,१९७४, वर्ष–११, अं.५९.
- पळशीकर वसंत,**सूर्यास्त (हचिन्स : द इलयूजन ऑफ पर्मनन्स),** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- पळशीकर वसंत,**कम्युनिकेशन ॲण्ड डेव्हलपमेंट,** सप्टे.–आक्टो, १९७२, वर्ष–९, अं.४७.
- पळशीकर वसंत,**कोल्हापूर घराण्याचा इतिहास,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- पळशीकर वसंत,**ग्रॅट –डफचे जुजबी चरित्र,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- पळशीकर वसंत,**गांधी, सत्याग्रह आणि डॉ. लोहिया,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.

- पळशीकर वसंत,**गांधींचा अहिंसक सत्याग्रहाचा मार्ग,**मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- पळशीकर वसंत,**गोहत्या बंदी,** मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- पळशीकर वसंत,**श्री. गोवलकर,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- पळशीकर वसंत,**श्रीकैलास ते सिंधूसागर,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वसंत,**पर्वतप्राय माणूस,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- पळशीकर वसंत,**पाच कादंबऱ्या,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- पळशीकर वसंत,**पापाचा खरा धनी,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- पळशीकर वसंत,**जातीवाद आणि वर्गवाद**,सप्टेंबर,१९६६,अं.१२.
- पळशीकर वसंत,**जस्टीस पार्टीचा उदय, उत्कर्ष आणि ऱ्हास,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- पळशीकर वसंत,**क्लाइंबिंग ए वॉल ऑफ ग्लास**,मार्च–एप्रिल, १९६६, अं.१०.
- पळशीकर वसंत,**दुसरे स्वातंत्र्य– अल्पजीवी ठरणार काय?,** जुलै, ऑगस्ट,१९७८, वर्ष–१५, अं.८२.
- पळशीकर वसंत,**नाही उद्धारा विना सहकार,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- पळशीकर वसंत,**नेताजी सुभाषचंद्र बोस,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- पळशीकर वेणू,**संख्याशास्त्रीय पद्धतीचा आंधळा व यात्रिक वापर,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पळशीकर वेणू,**ग्रामीण बचत आणि शेतीचे परिवर्तन,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- पगारे अजिता,**धर्म आणि समाज परिवर्तन : परस्पर विरोधी की पूरक?,** एप्रिल–जून, १९९२, वर्ष–२९,अं.११९.

- पारसनीस इला,**आदिवासींमध्ये रमेलेला प्रशासक,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- पारसनीस इला,**सेन्सपेक्षा नॉन्सेन्स अधिक,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- पोरे प्रतिभा,**प्रौढ मनाच्या कथा,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- पाटील विश्वास,**एका अवलियाचं हद्‌गत : चर्चबेल,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- पाटील विश्वास,**हे देवाघरचे लेणे,** मार्च, एप्रिल,१९८०, वर्ष–१७, अं.९२.
- पाटील शरद,**मुक्तिसूचक कलेचे न कमावलेले कातडे,** आक्टो.डिसे.२००२, वर्ष–४०, अं.१६१.
- पाटील शरद,**दिपंकर गुप्तांचे ककलेली आधुनिकता,** एप्रिल–जून,२००१, वर्ष–३९,अं.१५६.
- पाटील चंद्रकांत,**अरुण कोल्हटकरांच्या कविता,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७८,वर्ष–१४, अं.७८.
- पाध्ये म. द.,**पंचायत राज्याच्या निमित्ताने,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- पाध्ये रमेश,**जाती आणि वर्ग,** मार्च–एप्रिल, १९८१, वर्ष१८,अं.९८.
- पानसे मु. ग.,**पानशेत प्रलय,** सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- पानसे रमेश,**हरित क्रांतीची वाटचाल,** मार्च–एप्रिल, १९७०, वर्ष–७,अं.३२.
- पेडणेकर अ. ना.,**प्रचारकी प्रवचनरुप,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- पेडणेकर अ. ना.,**लेखकांच्या जीवनाविषयीचे रंजक तपशील,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- पेडणेकर अ.ना.,**कथाकार गो. गं. लिमये,** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- पेडणेकर आ.ना.,**मोकाशी : अठरा लक्ष पावलं,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.

- पटवर्धन ए.के.,**आर्थिक विकासाच्या सामाजिक बाजू,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- पटवर्धन कुसूम,**१९ व्या शतकातील नाग लोक,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७, अं.३६.
- पटवर्धन कुसूम,**रंजक पण काहीसे सवंग,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- पटवर्धन कुसूम,**ग्रामीण महाराष्ट्रातील शिक्षण संख्यात्मक प्रसार व प्रगतीचा आलेख,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- पी. अनिल,**आदिवासींवरील विविध वाङ्‌मय,** मार्च, एप्रिल,१९८०, वर्ष–१७, अं.९२.
- पुंडे द. दि.,**सत्यशोधक सामाजाच्या अभ्यासासाठी उपयुक्त ग्रंथ,** एप्रिल–जून,२०००, वर्ष–३८, अं.१५२.
- पुंडे द.दि.,**कोशनिर्मितीचा आदर्श नमुना,** आक्टो.डिसे.२००२, वर्ष–४०, अं.१६१.
- पुरंदरे प्रदीप, **माते नर्मदे परिक्रमेचे एक कंत्राट,** जुलै–सप्टें.,१९९१, वर्ष–२८, अं.११६.
- पुजारी सुहास,**सामाजिक व आर्थिक प्रश्नांची चिकित्सा,** जाने.–मार्च,२००१, वर्ष–३९,अं.१५५.
- पुणेकर स. द.,**हरिहरनाथ शास्त्री**, जुलै–ऑगस्ट, १९६९, वर्ष–६,अं.२८
- पुणेकर स.द.,**भारतीय कामगार चळवळीचा इतिहास,** सप्टेंबर, ऑक्टोबर,१९७३, वर्ष–१०, अं.५३.
- पदकी मंगेश,**शिदोरी,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- पदकी सरिता,**बहिणाबाईंची गाणी,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.
- रसाळ सुधीर,**कलानिर्मिती, कलास्वाद आणि समतोल व्यक्तीमत्व,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- रायकर मीनाक्षी,**लोभस प्रवासवर्णन,** मार्च–एप्रिल१९७१, वर्ष–८, अं.३८.

- रायकर मिनाक्षी,**दोन खेडवळ माणसं आणि त्यांची परवड,** मार्च– एप्रिल, १९७२, वर्ष–९,अं.४४.
- रायकर सी.रा.,**ग्रंथ संग्रहालये,** जाने.–फेब्रु. ,१९७०, वर्ष–७, अं.३१.
- रायकर सीताराम,**आशिया खंडातील आधुनिक महाभारत,** मे–जून,१९७०, वर्ष–७,अं.३३.
- रायकर सीताराम,**रोगट मनाचे प्रतिबिंब ,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- रायकर सीताराम,**प्राध्यापकांचे तत्वचिंतन,** नोव्हेंबर–डिसेंबर,१९७१,वर्ष–८, अं.४२.
- रायकर सीताराम,**एकेरी उत्तराचा अट्टाहास,** सप्टें.– ऑक्टो.,१९७०, वर्ष–७,अं.३५.
- रायकर सीताराम,**जीवनानुभवासाठी आसुसलेल्या दुर्गाबाई (भागवत : पैसे),** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- रायकर सीताराम,**नाट्य : जिवंत आणि पोकळ,** मे–जून,१९७१, वर्ष–८, अं.३९.
- राईलकर जयंत,**उत्पन्न–विवरण : एक न सुटलेले कोडे,** जानेवारी–फेब्रुवारी,१९८०, वर्ष–१७, अं.९१.
- राव सुनिती,**नव्या सामाजिक चळवळी आणि परिवर्तनाच्या दिशा,** एप्रिल–मे–जून,१९९५, वर्ष–३२,अं.१३१.
- राणे गोपाळ,**हिंदुधर्माच्या इतिहासाचे पैलू,** मार्च–एप्रिल,१९६८,वर्ष–५,अं.२६.
- रानडे अशोक दामोदर,**मराठी नाट्यसमीक्षा,** सप्टें.–ऑक्टो.,१९६९, वर्ष–६, अं.२९.
- रानडे अशोक,**महाराष्ट्र आणि भारतीय संगीत,** मे–जून, १९७३, वर्ष–१०, अं.५१.
- रानडे श्री.बा.,**एका मांत्रिकाची तांत्रिक कथा,** मे–जून,१९७२, वर्ष९, अं.४५.
- रेगे मे. पु.,**शब्द आणि वस्तू,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- रेडकर चैत्रा,**मृदुला साराभाई–एक बंडखोर स्त्री,** एप्रिल–जून, १९९९, वर्ष–३७, अं.१४७.

- रणसुभे सूर्यनारायण,**मराठी साहित्याची जीवनवादी समीक्षा,** एप्रिल–जून.,१९९४,वर्ष–३१, अं.१२७
- शिरवाडकर वि.वा.,**जर्नी इन्टू रशिया पोस्ट**,एप्रिल,१९६७, वर्ष–४, अं.१५.
- शिरोडकर सु.स.,**वैज्ञानिक कुतूहल,** मार्च, एप्रिल,१९७९, वर्ष–१६,अं.८६.
- शहा मृणालिनी,**लोकसाहित्यातील स्त्री प्रतिमा,** एप्रिल–जून,१९९३,वर्ष–३०,अं.१२३.
- शहा अ. भि.,**मुस्लिम समाजमानस घडविण्याऱ्या विचारधारा,** नोव्हें. डिसें.,१९६९, वर्ष–६,अं.३०.
- शहाणे मो.शा.,**कस्तुरीचे कण,** मे–जून,१९७६, वर्ष–१३, अं.६९.
- शेळके शान्ता ज.,**नवे कवी, नवी कविता,** मे, जून,१९७४,वर्ष–११, अं.५७
- संवगे विलास,**पूर्णार्ध्य,** नोव्हेंबर, डिसेंबर,१९७८, वर्ष–१५, अं.८४.
- संगवई संजय,**पत्रकारिता कुणासाठी? कशासाठी,** एप्रिल–जून, २००३, वर्ष–४१,अं.१६३.
- सप्रे अविनाश,**भालचंद्र नेमाडे यांचे टिका स्वयंवर,** जाने.–मार्च,१९९१, वर्ष–२८,अं.११४.
- सप्रे अविनाश,**महात्मा फुले यांचा वारसा,** एप्रिल–जून, १९९२, वर्ष–२९,अं.११९.
- सरदार अजित,**कारगिल: द इनसाईड स्टोरी,** जुलै–सप्टें.२००२, वर्ष–४०, अं.१६०.
- सगवई संजय,**पर्यायी विकासाविषयी चळवळीचे बीज : मुळशी सत्याग्रह,** एप्रिल–मे–जून,१९९५, वर्ष–३२,अं.१३१.
- सारंग विभा,**आहे मनोहर तरी : एक वाचन,** जुलै–सप्टे.२००१, वर्ष३९, अं.१५७.
- साक्रीकर दिनकर,**फिडल, चे आणि क्रांती,** मे, जून,१९७४,वर्ष–११, अं.५७
- साक्रीकर दिनकर,**नेपाळचे राजकारण,** मार्च, एप्रिल,१९७६, वर्ष–१३, अं.६८.

- साखळकर एकनाथ, **आर्थिक विकास आणि समाज परिवर्तन,** जाने., फेब्रु.,१९७४, वर्ष१०,अं.५५.
- साखळकर एकनाथ, **इच्छित जगाकडे,** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.

- सोमवंशी बी.सी.,**सर्वे : दलितांवरीलच नव्हे तर भारतीय अर्थव्यवस्थेवरील अरिष्ट,** जुलै–सप्टे., १९९९, वर्ष–३७, अं.१४९.
- सोमण सुभाष पा.,**सप्तदशी,** जुलै–ऑगस्ट,१९७३, वर्ष–१०, अं.५२.
- सोहनी इंदिराबाई,**श्रीमती काशिबाई कानिटकर,** जुलै–ऑगस्ट, १९८१, वर्ष–१८,अं.१००.
- सोनवणे सुभाष,**विकसनशील देश,** मार्च–एप्रिल,१९७७, वर्ष–१४,अं.७४.
- सोनावणे सुभाष,**ज्ञाननिधीच्या सान्निध्यात,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७७,वर्ष–१४, अं.७७.
- सात्विक गौतम,**कॅलि डेस्कोपिक नसलेली कादंबरी,** जाने., फेब्रु.,१९७८, वर्ष–१५,अं.७९.
- सुराणा पन्नालाल,**फ्रीडम ॲट मिडनाईट, एक साहित्यकृती,** मार्च, एप्रिल,१९७६, वर्ष–१३, अं.६८.
- सुराणा पन्नालाल,**भारतातील मतदारांचे वर्तन**– फेब्रुवारी,१९६७, अं.१४.
- सुराणा पन्नालाल,**भारतीय कम्युनिस्टांचे धोरण व स्वभाव,** जाने–फेब्रु,१९७१, वर्ष–८, अं.३७.
- सुखटणकर द.कृ.,**कृष्ठरोग भावना शीलता आणि कार्य,** नोव्हें., डिसेंबर,१९७३, वर्ष–१०, अं.५४.
- सूर्यदा **कथा व कादंबरिका,** जानेवारी, फेब्रुवारी,१९७९, वर्ष–१६, अं.८५.

- शिंदे वसंत,**याखानची कारकीर्द : एक अर्थबोध,** जुलै–ऑगस्ट,१९७६, वर्ष–१३, अं.७०.
- सिंग के. जगतीज,**शीख परंपरा,** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- टिल्लू अरुण,**विश्वाचा पसारा,** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.
- टिकेकर अरुण,**ब्रिटीश राजवटीचा परिणाम,** नोव्हें., डिसेंबर,१९७६, वर्ष–१३, अं.७२.
- टिकेकर श्री.रा.,**भारतातील सत्तांतर,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७७,वर्ष–१४, अं.७७.
- ठकार निशिकांत,**सचेतन समीक्षेचा एक अविष्कार,** सप्टेंबर–ऑक्टोबर,१९७१,वर्ष–८,अं.४१.
- तेलतुंबाडे आनंद,**गुजराथ हत्याकांडाची एक मननीय चिकित्सा,** आक्टो.डिसे.२००२, वर्ष–४०, अं.१६१.
- तुळपुले बगाराम,**कर्मचारी व्यवस्थापन,** मे–जून, १९७०, वर्ष–७, अं.३३.
- तुळपुळे बगाराम,**भारतीय कामगार नेते**, मे–जून १९६९,वर्ष–६, अं.२७.
- तुळपुळे बगाराम,**मालकांच्या दृष्टीतून कर्मचारी व्यवस्थापन,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- तुळपुळे प्रभा,**मनस्विनीचे दुबळे चिंतन,** जुलै–ऑगस्ट,१९७०,वर्ष–७, अं.३४.
- तुळपुळे प्रभा,**स्त्रियांची मुक्ती,** जाने. –फेब्रु.,१९७२, वर्ष–९,अं.४३.
- तुळपुळे प्रभा,**क्रांतीसंबंधी बोलणारी ही माणसे!,** जुलै–ऑगस्ट,१९७२, वर्ष–९,अं.४६.
- तुळपुळे प्रभा,**चांगला विषय, ढोबळ हाताळणी ,** जुलै, ऑगस्ट,१९७१, वर्ष–८, अं.४०.
- तुळपुळे प्रभा,**स्त्रीविषयीचा प्रतिनिधिक उद्गार!**, मे–जून १९६९,वर्ष–६, अं.२७.
- तुळपुळे प्रभा,**स्त्रीची खरी प्रकृती? (वाडकर : सांगत्ये ऐका),** नोव्हें.–डिसेंबर,१९७०, वर्ष–७,३६.

- थत्ते यदुनाथ,**महान संकल्प आणि अल्प शक्ती यांची शोकांतिका,** सप्टें.–ऑक्टो.,१९८१, वर्ष–१८, अं.१०१.
- थत्ते यदुनाथ,**जुन्याच मुक्कामवर पोचवणारे नवे वळण!,** जाने–फेब्रु.,१९८२, वर्ष–१९, अं.१०३.
- थत्ते अनिल,**पूर्णारण्यातील वडवानल,** मे–जून, १९७३, वर्ष–१०, अं.५१.
- विद्वांस विद्या,**भारतीय शिक्षणाची वाटचाल,** मे–जून,१९८९,वर्ष१७,अं.९४/९५.
- वैद्य भाई,**विद्रोही तुकाराम : एक वस्तुनिष्ठ विश्लेषण,** एप्रिल–जून, १९९८, वर्ष–३९, अं.१४३.
- वर्दे मोहिनी,**माळ (विद्याधर पुंडलिक),** जुलै–डिसें. १९८२, वर्ष–१९, अं.१०६,१०७,१०८.
- वनारसे  शामला,**नितिक्षा,** नोव्हें., डिसेंबर,१९७३, वर्ष–१०, अं.५४.
- वनारसे श्यामला,**पिढ्यांतील संघर्ष,** जुलै, ऑगस्ट,१९७४,वर्ष–११, अं.५८.
- वनारसे श्यामला,**ग्रामीण लोकमताचा अभ्यास,** जुलै–ऑगस्ट,१९७२, वर्ष–९,अं.४६.
- यादव आनंद,**एका पिढीचे आत्मकथन,** जाने., फेब्रु.,१९७७, वर्ष १४, अं.७३.